टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत
''तत्त्वज्ञान'' या विषयाच्या पीएच.डी. पदवीकरिता
सादर केलेला शोध प्रबंध

प्रबंध शीर्षक

# श्री. गोरक्षनाथांच्या चिद्‌विलासवादाची तात्त्विक चिकित्सा व प्रस्तुतता

**Title**

# Philosophical and Critical Representation of Chidvilãsavãda of Shri. Gorakshnath

संशोधक
**श्री. श्रीनिवास द. शाळीग्राम**
बी.एस्सी.(ऑनर्स), सी.डब्ल्यू.एम. (लंडन) एम.ए.

मार्गदर्शक
**डॉ. ज. रा. दाभोळे**
एम.ए., पीएच.डी.
अध्यक्ष - महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद

**ऑगस्ट २०१२**

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled **“Philosophical and Critical Representation of Chidvilãsavãda of Shri. Gorakshnath”.**

**‘‘श्री. गोरक्षनाथांच्या चिद्‌विलासवादाची तात्त्विक चिकित्सा व प्रस्तुतता’’** which is being submitted herewith for the award of the Degree of Doctor of Philosophy, in Philosophy of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of the original research work completed by **Shri. Shriniwas Dattatraya Shaligram** under my supervision and guidance and to the best of my knowledge and belief the work embodied in this thesis has not formed earlier the basis for the award of any Degree or similar title of this or any other University or Examining body.

Place : Kolhapur — **Dr. J. R. Dabhole**

Date : — Research Guide

# DECLARATION

I hereby declare that the thesis entitled **“Philosophical and Critical Representation of Chidvilãsavãda of Shri. Gorakshnath”.**

‘‘**श्री. गोरक्षनाथांच्या चिद्‌विलासवादाची तात्त्विक चिकित्सा व प्रस्तुतता**’’ completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or Diploma or other similar title of this or any other University or Examining body.

Place : Kolhapur **Shri. Shriniwas Dattatraya Shaligram**

Date : Research Student

# ऋणनिर्देश

श्रद्धा व भक्तीचा महिमा वर्णन करताना श्री. गोरक्षनाथांनी त्यांच्या 'सिद्ध सिद्धांत पद्धति' या ग्रंथात श्री. गणेश या देवतेचे वर्णन ''चारी पुरूषार्थ सिद्ध करून देणारी ज्ञानदेवता'' असे केले आहे. त्या मंगल मोरयाचे प्रथम स्मरण करूनच माझ्या प्रबंधाचे काम मी सुरू केले. कोणत्याही आर्थिक किंवा लौकिक लाभाची इच्छा त्यामागे नसून स्वानंदाप्रीत्यर्थ केलेले हे काम आहे. काहीतरी वेगळे असे आपण करून दाखवायचे असेही मनात अधूनमधून येत असे. पण जसजसा मी यथाक्रम नवनाथांच्यात रमत गेलो तस तसा मीच त्यात हरवत गेलो व तो माझ्या आनंदाचा व उत्साहाचा विषय होत गेला. माझेपण लोपो। नामरूप हरपो। असे होत गेले हे मात्र खरे.

माझा जन्म १९३६ चा. कराड सारख्या शांत व शैक्षणिकदृष्ट्या उत्तम व्यवस्था असलेल्या वातावरणात टिळक हायस्कूलमधून एस.एस.सी. झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शाळेत असल्यापासूनची तालीम व मल्लखांब याची आवड पुण्यामध्ये योग्य दिशेने विकसित झाली. वाचनाची आवड आधीपासून होतीच. पण एका सहज प्रसंगातून स्वा. विवेकानंदांचा वाङ्मय स्पर्श झाला. बी.एस्सी. नंतर भूगर्भशास्त्रातील पीएच.डी. करण्याचे मनात होते. पण काही कारणाने ते झाले नाही. पुढे १९५८ मध्ये एका सुप्रभाती सज्जनगडनिवासी सिद्धपुरूष श्री. प.पू. श्रीधरस्वामींचे आमचे घरी येणे झाले व त्यांचे आशिर्वादाचा स्पर्श माझे मस्तकी झाला. त्यानंतरच्या व्यवहारी व संसारी जीवनातही योगाभ्यास, वाचन, व्यायाम हे सुरू असे. त्याच दरम्यान आमचे व्यवसायाशी संबंधित इंग्लंडमधील एका संशोधन संस्थेची परीक्षाही दिली. मात्र पीएच.डी. होण्याचा विचार मनात होताच. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठातून तत्त्वज्ञानातील एम.ए. ही केले. नंतरचा बराचसा काळ असाच जात राहिला. त्या काळात विविध विषयांवर वाचन चालूच होते. त्यातूनच नाथसंप्रदायातील वेगवेगळे विषय माझ्या वाचनात येत राहिले व त्यातील काहींचा अनुभवही स्वत:च्या जीवनात घेण्याचा प्रयत्न करत राहिलो. नंतर मात्र २००७ मध्ये पीएच.डी. पूर्ण करायचीच असे नक्की करून हालचाल सुरू केली. शिवाजी विद्यापीठात चौकशी करता ''तत्त्वज्ञान विषयात पीएच.डी. करायची असल्यास अन्य कुठेही हिंडू नका. मा. डॉ. दाभोळे सरांना भेटा'' असे निक्षून सांगण्यात आले. त्यांची भेट घेतली. व दैवी योग म्हणजे कसा असतो ते पुन्ह: स्पष्ट झाले. त्यांचा तत्त्वज्ञान क्षेत्रातला निर्विवाद अधिकार, अहंकार विरहित शांत, चिकित्सक व साक्षेपी वृत्ती, अभ्यासकाला सतत प्रोत्साहित करणारे मार्गदर्शन व प्रेमप्रक्षेपण हे शब्दात बांधणे अवघड आहे. पुढे जाताना आपण भूतकाळातही डोकावतो. त्यावेळी मला असे जाणवले की, १९५३ मध्ये झालेला स्वा. विवेकानंदांचा वाङ्मय स्पर्श व १९५८ मधील श्रीधरस्वामींचा आशिर्वाद स्पर्श हेच

पुढे कार्यान्वित होऊ पहात आहेत. पुढे २००७ मध्ये मा. डॉ. दाभोळे सरांच्या सहयोगात्मक स्वभावामुळे मी जेव्हा आश्वासित झालो तेव्हा माझे अंतरविश्व एका अनामिक आनंदाने भरून गेले. त्यांचेशी झालेल्या चिकित्सक चर्चेनंतर 'श्री गोरक्षनाथांचा चिद्‌विलासवाद' हा विषय निश्चित झाला. पुढील दिशा निश्चित करणे हे आता आवश्यक होते. त्याचवेळी कर्मसंयोगातूनच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे या विद्यापीठाचे डीन मा. प्रा. विजय कारेकर सर यांची भेट झाली. अभ्यासतले व स्वभावातले नेमकेपण, सहजता, उत्साहित करणारे मार्गदर्शन व सहयोग यामुळे माझ्यासारख्या जेष्ठ नागरिकाची विद्यापीठात २३/३/२००९ मध्ये नोंदणी (रजिस्ट्रेशन) झाली. त्यादृष्टीने मी जेव्हा जेव्हा पुण्यात मा. श्री. कारेकर सरांचे ऑफीसात जात असे त्यावेळी मा. सरांचे ऑफीसमधील व ॲडमिनिस्ट्रेशन विभागामधील सर्वांचे उत्तम सहकार्य मला प्राप्त झाले.

प्रबंध लिहिण्याचे काम दि. २७/३/२००९ दिवशी पाडव्याचे सुमुहूर्तावर श्री. गोरक्षनाथांचे स्मरण करून त्यांचीच मंत्ररूप सरस्वती ''ॐ नम: श्रीं श्रीं. अहम् वद्‌वद्‌वाग्वादिनी भगवती सरस्वत्यै नम: स्वाहा विद्या देहि मम ऱ्हीं सरस्वती स्वाहा'' - तिला शरणागत झालो व हे माझे काम महाराष्ट्र सारस्वताच्या पायी रूजू व्हावे अशी प्रार्थना केली. नाथसंप्रदाय व श्री गोरक्षनाथ यांच्यावरील माझ्या कामाचे स्वरूप ऐतिहासिक चिकित्सेचे नसून, मच्छिंद्रगोरक्षप्रणीत योग हा सामरस्यात्मक संतुलन योग आहे व सर्व उच्चनीचभेदांना दूर ठेवून सर्वांना कवेत घेऊन हा समरसीकरणक्रिया करणार योग जीवनसफलतेचा साक्षात्कारमार्ग कसा घडवू शकतो व वर्तमान जीवन समस्यांना तो कसा भिडू शकतो हे समाजासमोर ठेवणे असे आहे.

हे काम गेली ३ वर्षे मी पूर्णवेळ करत असताना त्यात सहजपणे जास्त गुंतत गेलो. अशावेळी माझी पत्नी, दोन मोठी मुले, सुना या सर्वांनी माझी अत्यंत काळजी घेतली. उत्साह दिला. नातवंडांचा सहवास हे तर टॉनिकच असते. त्यामुळे तब्येतीनेही चांगली साथ दिली व हे काम पूर्ण करू शकलो. विद्यापीठीय आवश्यकतेप्रमाणे कॉम्प्युटर टाइपिंगचे कामात श्री. गणेश पाटील दौलतनगर, कोल्हापूर यांनी चांगले सहकार्य दिले. हे मला मुद्दाम नमूद करावे वाटते कारण ते नुसते काम करत नाहीत तर सर्वार्थाने कामाशी एकरूप होतात. सध्याच्या व्यावहारिक जगात अशी विशेषता क्वचितच आढळते.

एखादे काम करू म्हटले तर अनंत अडचणी येतात. पण योगायोगातून प्राप्त झालेली कृपा व आपला संकल्प यातून संकल्पसिद्धी होते. म्हणून त्या अदृष्य नियंत्याचे ऋण मनोमनी ठेवत हे मनोगत पूर्ण करतो.

**श्रीनिवास द. शाळिग्राम**

# विषय प्रवेश

**प्रास्ताविक :**

भारतीय उपखंडाला एक महान अशी दार्शनिक परंपरा लाभलेली आहे. त्यामध्ये महायोगी गोरक्षनाथांचे स्थान केंद्रस्थानी आणावे या हेतूने प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्याचे मी ठरविले आहे. नाथ परंपरा अथवा नाथ संप्रदाय अनेकांना परिचित आहे. त्यामध्ये श्री गोरक्षनाथांचे स्थान सर्वोच्च पातळीवरचे आहे. हे स्थान त्यांच्या समग्रलक्षी तत्त्वज्ञानानामुळे त्यांना प्राप्त झालेले आहे. एका अर्थाने गोरक्षनाथांनी एक जीवनदर्शनच आपल्यापुढे ठेवलेले आहे. कालौघात त्याकडे किंचित दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. माझा प्रयत्न असा राहील की गोरक्षनाथांच्या जीवनदर्शनाचा चिकित्सक अभ्यास करून आजच्या परिस्थितीत त्यांच्या विचाराचे व तत्त्वज्ञानाचे महत्व मराठी जनतेसमोर मांडावे. हे करताना तात्त्विक चिकित्सेच्या जोडीने आजच्या जीवनातील या विषयाची प्रस्तुतता स्पष्टपणे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

**अभ्यासाचे महत्त्व :**

संत ज्ञानेश्वरांचे मुख्य योगदान ज्ञानेश्वरी हा ग्रंथ होय. तो घराघरात जावून पोहोचला आहे. तथापि अमृतानुभवाबद्दल काही अपवाद वगळल्यास फारशी चर्चा होताना दिसत नाही. या अमृतानुभवाबद्दल ज्ञानेश्वरांनी चिद्‌विलासवादी भूमिकेतून एक सलग असा तात्त्विक विचार मांडलेला आहे. ज्ञानेश्वरांचे गुरू श्री. निवृत्तीनाथ यांनाच ज्ञानेश्वरांनी संपूर्ण श्रेय दिलेले आहे. परंतु ज्ञानेश्वरांच्या विचाराचे मूळ श्री गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानात आढळून येते ही गोष्ट तितकीशी स्पष्ट झालेली नाही. ही माहिती करून द्यावी या सद्‌हेतूने या प्रबंधाचा अभ्यास विषय मी निवडलेला आहे. दुसऱ्या बाजूला गोरक्षनाथांच्या तात्त्विक विचारांचा आधुनिक विज्ञानाशी कांही संकल्पनांचा धागा जोडता येतो का हे पाहण्याचे काम ही होणे जरूरीचे आहे. म्हणूनच या विषयाचे महत्त्व माझ्या दृष्टीने दुहेरी आहे. अशा प्रकारे आजच्या जीवनामधील गोरक्षनाथांच्या विचारांची प्रस्तुतता दाखवून द्यावी आणि आधुनिक विज्ञानाशी असलेला त्याचा लागाबांधा स्पष्ट करावा असे हे महत्त्वपूर्ण संशोधन कार्य आजच्या पिढीपुढे मांडावे ही या मागची मुख्य प्रेरणा आहे. या संशोधनातून मराठी भाषेमध्ये भारतीय दर्शन परंपरेचे सम्यक आकलन करून द्यावे अशी माझी भूमिका आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

नाथ संप्रदायाचा अभ्यास अनेकांनी केलेला आहे. परंतु जो काही अभ्यास उपलब्ध आहे तो बहुधा साहित्याच्या अंगाने जाणारा आहे. तो अभ्यास महत्त्वपूर्ण आहेच परंतु असे

असूनही खुद्द गोरक्षनाथांच्यावर फारसा भर दिलेला दिसत नाही. असा भर देवून गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान चिकित्सक दृष्टीने मांडण्याची नितांत आवश्यकता आहे. याची कारणे आजच्या जीवनात सापडतील. आजचे जीवन धावपळीचे झालेला आहे. विचार विसरून माणसे धावताना दिसत आहेत. याला पायबंद बसावा, थोडे मागे वळून पाहावे आणि आजच्या जीवनातील उणीवा दूर कराव्यात या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास वाटतो. मानवी जीवन मंगलमय कसे होईल, ताणतणाव मुक्त कसे होईल, जीवनातील तापदायकता कशी नष्ट करता येईल असे कितीतरी प्रश्न आज अनुत्तरित आहेत. या प्रश्नांना भिडण्याचे सामर्थ्य श्री. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानात शोधावे लागेल हे माझ्या दृष्टीने या विषयाचे महत्त्व आहे. त्यासाठी हे संशोधन कार्य हाती घेतलेले आहे.

**वैचारिक भूमिका :**

चिद्‌विलासवाद हे जगभर मान्यता पावलेले आणि बहुचर्चित असे तत्त्वज्ञान आहे. श्री. गोरक्षनाथांच्या चिद्‌विलासवादाला वैश्विक परिमाण लाभलेले आहे. हेगेल, ब्रॅडले आदि पाश्चात्य तत्त्वचिंतकांनी चिद्‌वादाची मांडणी केली त्याच तातकुळीची मांडणी श्री गोरक्षनाथांना केलेली आहे. चिद्‌वाद आणि मानवी जीवन यांची बहुदा फारकत झालेली दिसते. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानात तत्त्वज्ञान आणि जीवन यामध्ये फारकत आढळत नाही. कारण भारतीय परंपरेत तत्त्वज्ञान या शब्दा ऐवजी दर्शन हा शब्द रूढ झालेला आहे. म्हणून गोरक्षनाथांच्या अभ्यासातून मला हे दाखवून द्यायचे आहे की ज्ञान, कर्म, भक्ती, जीवनध्येय, नीति आदि सर्व गोष्टी एकत्रितपणे अभ्यासल्याशिवाय संपूर्ण ‘दर्शन’ होणार नाही अशी एक उच्च वैचारिक भूमिका घेवून मी हे संशोधन पूर्ण करणार आहे.

**संशोधनाचे ध्येय :**

श्री गोरक्षनाथांच्या चिद्‌विलासवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना मी नाथपूर्व काळातील तात्त्विक विचारांचे अवलोकन करणार आहे. श्री गोरक्षनाथांच्या वरील एकूण प्रभाव कोणते याचे विश्लेषण या संशोधनात केले जाईल. पाश्चात्य परंपरेत विचारांची जी जवळीक सापडेल त्याचा तुलनात्मक पद्धतीने आढावा घेण्याचा प्रयत्न राहील. एखाद्या विषयाची चिकित्सा करावयाची असल्यास विश्लेषणाचा आधार घ्यावा लागतो. ही विश्लेषणात्मक पद्धती अन्वयार्थ लावण्यास उपयोगी पडते. श्री. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना ऐतिहासिक दृष्टी बरोबरच विश्लेषणात्मक पद्धतीचाही अवलंब करून त्यांच्या तत्त्वज्ञानाची नीतिविचारांची आणि त्यांना अपेक्षित असलेल्या मानवी जीवनाची खोलवर जावून मांडणी करण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

**अभ्युपगम, व्याप्ती आणि मर्यादा :**

श्री गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानात शंकराचार्यांचा अद्वैत वेदांत प्रकट झालेला दिसून येतो. अहम् ब्रम्हास्मि हे शांकर वेदांताचे अंतिम विधान होय. मात्र मी आणि माझ्यातील उणीवा वगळल्यास उर्वरीत विश्व हे माया आहे असे शंकराचार्यांचा वेदांत स्पष्ट करतो. श्री गोरक्षनाथांना ही भूमिका मान्य नाही. ब्रह्मांडी ते पिंडी आणि पिंडी ते ब्रह्मांडी हा गोरक्षनाथांचा मुख्य उद्देश आहे. मानवी व्यक्तीला ‘‘तू वैश्विक शक्तीचा स्वामी आहेस’’ असे प्रतिपादन गोरक्षनाथ करतात. माझ्या मते चालू घडीला माणसांना हेच ज्ञान करून देण्याची गरज आहे. आणि माझ्या संशोधनाचे ते मुख्य अंग असेल. मनुष्याच्या इच्छा, स्वातंत्र्य, संकल्प, हेतू, शील याचा उहापोह गोरक्षनाथांनी अतिशय सुगम अशा भाषेत केलेला आहे. त्यानी व्यक्तींना केंद्रस्थानी मानून जो पर्यंत व्यक्ती बदलत नाही तो पर्यंत सामाजिक बदल आणि सुधारणा होवू शकणार नाही असे आग्रही प्रतिपादन केलेले आहे. हे एकदा मान्य केले म्हणजे संशोधनाचे उद्दिष्ट आपोआप सिद्ध होते. ही भूमिका घेवून आणि विषयाची व्याप्ती निर्धारित करून हे संशोधन पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न करणार आहे. माणसाने स्वत:ला ओळखल्या शिवाय काहीही रचनात्मक असे घडू शकत नाही हे ओळखणे आणि जाणणे हीच खरोखरी या संशोधनाची फलप्राप्ती ठरेल.

**संशोधन पद्धती :**

अ) श्री गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे ऐतिहासिक व तात्त्विक दृष्टीने अर्थ प्रतिपादन करण्याचे हे काम आहे.

ब) हे करताना विश्लेषण पद्धतीचा आधार घेतलेला आहे.

क) श्री गोरक्षनाथांना केंद्रस्थानी ठेवून तुलनात्मक पद्धतीने त्यांच्या योगदानाचे व तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

‘‘श्री. गोरक्षनाथांच्या चिद्‌विलासवादाची तात्त्विक चिकित्सक प्रस्तुतता’’ या विषयावरचे हे संशोधन आहे. प्रस्तुत संशोधनात श्री. गोरक्षनाथ ही एक व्यक्ती असून तिला केंद्रस्थानी ठेऊन हा अभ्यास करावयाचा आहे. गोरक्षनाथांनी जे तत्त्वज्ञान सांगितले त्या तत्त्वज्ञानाचा तात्विक व ऐतिहासिक दृष्टीने अर्थविवरण करण्याचे हे काम आहे. हे काम करताना जशी ऐतिहासिक व सामाजिक दृष्टी मी मनाशी बाळगली आहे त्याचप्रमाणे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे विश्लेषण करण्याचाही प्रयत्न करणार आहे. दुसरे असे की श्री. मत्स्येंद्रनाथांपासून सुरू झालेल्या या नाथसंप्रदायाचे जे समग्र तत्त्वज्ञान आहे त्यावर भाष्य करण्याचा प्रयत्नही या संशोधनात करणार आहे. शेवटी तुलनात्मक पद्धतीने भारतीय

तत्त्वज्ञानाला त्यांचे जे योगदान लाभले आहे त्याचा आढावाही या संशोधनात मी घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

व्यष्टी आणि समष्टी यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करण्याचे दृष्टीने या संशोधन प्रबंधाचे प्रकरणीकरण खालील प्रमाणे सुचवीत आहे.

**प्रकरणीकरण :**

**प्रकरण पहिले -** नाथपंथ : वैशिष्ट्यासह व्यापक परिचय

**प्रकरण दुसरे -** श्री गोरक्षनाथांचे सिद्धांत स्वरूप तत्त्वज्ञान

**प्रकरण तिसरे -** पायाभूत सिद्धांत

**प्रकरण चौथे -** श्री गोरक्षनाथांच्या साहित्यातील सूत्रचर्चा

**प्रकरण पाचवे -** श्री गोरक्षनाथकृत सद्वस्तुमीमांसा

**प्रकरण सहावे -** सामरस्ययोग

**प्रकरण सातवे -** श्री गोरक्ष तत्त्वज्ञानाची वर्तमानकालीन प्रस्तुतता

**प्रकरण आठवे -** नाथ संप्रदायाचा वैश्विक चिद्विलासवाद

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| पहिले | **नाथपंथ : वैशिष्ट्यांसह व्यापक परिचय**<br>१) प्रस्तावना<br>२) विषय प्रवेश<br>३) श्री मत्स्येंद्रनाथांची ऐतिहासिकता<br>४) श्री गोरक्षनाथांचा ऐतिहासिक कालखंड<br>५) नवनाथांचे एकमेकांशी संबंध<br>६) नाथसंप्रदायाचे मूळ स्थान<br>७) नाथ संप्रदायाची महत्वाची ठिकाणे<br>८) तत्कालीन सामाजिक परिस्थिती<br>९) उगमस्थान<br>१०) नाथसंप्रदायाच्या प्रसारामागची कारणमीमांसा<br>११) परंपरेची ऐतिहासिकता<br>१२) ज्ञानेश्वरांचे नाथसंप्रदायाशी असणारे नाते<br>१३) सामाजिक परिवर्तनासाठी श्री ज्ञानेश्वरांचे उपाय<br>१४) उपसंहार<br>१५) संदर्भ व टीपा | **१-४०** |
| दुसरे | **श्री गोरक्षनाथांचे सिद्धांत स्वरूप तत्त्वज्ञान**<br>१) प्रस्तावना<br>२) पिंडोत्पत्ति<br>३) नाडीविवेचन<br>४) नवचक्र (पिंडविचार)<br>५) मन:संयमाच्या साधनप्रक्रिया (लक्षत्रय)<br>६) अष्टांगयोग<br>७) उत्क्रांतीक्रमाची मांडणी<br>८) योगाचे सर्वसमावेशक स्वरूप<br>९) श्री गोरक्षनाथांचा मध्यमार्ग<br>१०) गोरक्षयोग व पातंजलयोग यामधील फरक<br>११) परमोच्च अवधूत अवस्था, लय, सामरस्य व अस्पर्श योग<br>१२) मानसशास्त्रीय चिकित्सा<br>१३) उपसंहार<br>१४) संदर्भ व टीपा | **४१-६९** |

| | | |
|---|---|---|
| **तिसरे** | **पायाभूत सिद्धांत**<br>१) प्रस्तावना<br>२) पिंडी ते ब्रम्हांडी व ब्रम्हांडी ते पिंडी<br>३) वृत्तींचे उदात्तीकरण व शक्तींचे संचालन<br>४) संसारी लोकही हा योग आचरू शकतात<br>५) ब्रम्हचर्य दमनात्मक नाही तर एक संतुलित अवस्था<br>६) नाथ संप्रदाय हा शिवशक्तिसामरस्य योग आहे<br>७) उपसंहार<br>८) संदर्भ व टीपा | **७०-११३** |
| **चौथे** | **श्री गोरक्षनाथांच्या साहित्यातील सूत्रचर्चा**<br>१) प्रस्तावना<br>२) ग्रंथविस्तार<br>३) गोरक्षनाथांच्या साहित्याचा विस्तार<br>४) श्री. गोरक्षनाथांच्या विविध सूत्रांतर्गत विषय<br>५) उपसंहार<br>६) संदर्भ व टीपा | **११४-१४१** |
| **पाचवे** | **श्री गोरक्षनाथकृत सद्‌वस्तुमीमांसा**<br>१) प्रस्तावना<br>२) सद्‌वस्तुमीमांसा<br>३) गोरक्ष वाङ्मयातील ‘माया’ विवरण<br>४) ब्रह्मजगत संबंध व त्याच्या कारणउपपत्ती<br>५) अंतिम शक्तीची किंवा तत्त्वाची अनुभाव्यता<br>६) श्री गोरक्षतत्त्वज्ञानांतर्गत विविध योगांची मांडणी<br>७) श्री गोरक्षग्रंथ व त्यातील गुरूमहिमा<br>८) विविध मानसिक अवस्था व मच्छिंद्र-गोरक्ष-निवृत्ती संबंध<br>९) उपसंहार<br>१०) संदर्भ व टीपा | **१४२-१७१** |
| **सहावे** | **सामरस्ययोग**<br>१) प्रस्तावना<br>२) सामरस्ययोगाचा अर्थ<br>३) मध्यमार्गाची व सामरस्य साधनेची काही महत्त्वाची सूत्रे<br>४) सामरस्यानुभूती व अन्य सिद्ध पुरूषांचे समर्थन<br>५) अवधूत संप्रदाय व नाथ संप्रदाय<br>६) उपसंहार<br>७) संदर्भ व टीपा | **१७२-१८६** |

| | | |
|---|---|---|
| **सातवे** | **श्री गोरक्ष तत्त्वज्ञानाची वर्तमानकालीन प्रस्तुतता**<br>१) प्रस्तावना<br>२) वर्तमानकालीन जीवन व त्यातील समस्या<br>३) सिद्धांतांचे अनुसरण व समस्यांचे निरसन व 'नरवैबोध' सूत्रे<br>४) श्री गोरक्षनाथांचा केंद्राभिगामी प्रेरणांचा सिद्धांत<br>५) नैतिक संकट<br>६) मानसिक संतुलनाची आवश्यकता<br>७) पिंडब्रह्मांड एकता व ग्रीक तत्त्वज्ञानातील संदर्भ<br>८) उपसंहार<br>९) संदर्भ व टीपा | **१८७-२१४** |
| **आठवे** | **नाथ संप्रदायाचा वैश्विक चिद्‌विलासवाद**<br>१) प्रस्तावना<br>२) गोरक्षनाथांच्या परमार्थ साधनेचे स्वरूप<br>३) चिद्‌विलासवादाची सामाजिक अभिव्यक्ती<br>४) चिद्‌विलासवादाची चिकित्सा<br>५) नाथसंप्रदायातील ब्रम्हतत्त्व<br>६) चिद्‌विलासवादी तत्त्वज्ञानाचे पाश्चात्य पुरस्कर्ते<br>७) चिद्‌विलासवाद म्हणजेच वैश्विक एकता<br>८) श्री. ज्ञानेश्वरांचे ऐतिहासिक योगदान<br>९) समारोप<br>१०) संदर्भ व टीपा | **२१५-२४४** |
| | **संदर्भ ग्रंथ सूची** | |
| | **परिशिष्ट क्र.१ - नाथसंप्रदायातील तंत्र, मंत्र व यंत्र** | |

# प्रकरण - पहिले

---

# नाथपंथ : वैशिष्ट्यांसह व्यापक परिचय

# प्रकरण - दुसरे

# श्री गोरक्षनाथांचे सिद्धांत स्वरूप तत्त्वज्ञान

# प्रकरण - तिसरे

# पायाभूत सिद्धांत

# प्रकरण - चौथे

# श्री गोरक्षनाथांच्या साहित्यातील सूत्रचर्चा

# प्रकरण - पाचवे

# श्री गोरक्षनाथकृत सद्वस्तुमीमांसा

# प्रकरण - सहावे

## सामरस्ययोग

# प्रकरण - सातवे

---

# श्री गोरक्ष तत्त्वज्ञानाची वर्तमानकालीन प्रस्तुतता

# प्रकरण - आठवे

# नाथ संप्रदायाचा वैश्विक चिद्विलासवाद

# संदर्भ ग्रंथ सूची

# परिशिष्ट क्र. १
# नाथसंप्रदायातील तंत्र, मंत्र व यंत्र

# प्रकरण - पहिले

# नाथपंथ : वैशिष्ट्यांसह व्यापक परिचय

## १) प्रस्तावना :

नाथसंप्रदाय हा शिवोपासक असून शिव हाच सर्वांचा गुरू अशी या संप्रदायाची शिकवण आहे. 'शिव' संबंधात जे जे पंथ व उपपंथ भारतात उदयास आले. त्या सर्वांचा या ना त्या प्रकारे नाथसंप्रदायाशी संबंध पोचतो. त्या दृष्टीने भारतामध्ये शैव तत्त्वज्ञान खूप रूजल्याचे दिसून येते. श्री गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, एकनाथ, कबीर ते सुफी पंथीय अशा महाराष्ट्रातील व बाहेरील विविध परंपरातून नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान व आचार संस्कार तसेच शिव-दत्त, कृष्ण, राम, सोहं साधना, अशाप्रकारे समाजजागरण व साधना चालू असलेली दिसून येते. या परंपरेतील महान विभुतींच्या अलौकिक जीवनाचे दूरगामी परिणाम समाजाच्या विविध स्तरांमध्ये होत राहिले आहेत. या सर्वांच्या जीवनचरित्रातून व शिकवणूकीतून प्रेम, भक्ती, समर्पण व प्रचिती यांच्याद्वारे सामरस्य-योग साधण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. तुलसीदासांच्या बद्दल तर असे म्हटले जाते की उत्तर भारतात घराघरामध्ये तुलसीरामायण गायिले वा वाचले जाते. श्रीकृष्णांची गीता, चैतन्य साम्राज्य चक्रवर्ती श्री ज्ञानेश्वर महाराज यांची ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा, नामदेव एकनाथांचे अभंग यांना व्यक्ती व्यक्तींच्या अंतर्विश्वात एक संवेदनशील असे आदारस्थान आहे. या सर्व विभुतींनी नाथ तत्त्वज्ञान त्यांच्या त्यांच्या पद्धतीने मांडले पण ते लोकभाषेच्या माध्यमातूनच. महायोगी गोरक्षनाथ जे तत्त्वज्ञान देतात यामध्ये योगाची सर्व अंगे वा शाखा अंतर्भूत झाल्याचे लक्षात येते. एकाअर्थी त्यांचे तत्त्वज्ञान म्हणजे दिव्य रसायनच आहे. हठयोग (संयम), कर्मयोग (निरपेक्ष सेवा), मंत्रयोग (समाजसेवेचे एक विशेष अंग), भक्तियोग (समर्पण), ज्ञानयोग (चिकित्सक बुद्धी), राजयोग (संतुलन), क्रियायोग (तंत्रशास्त्रांतर्गत) असे सर्व समावेशक असे तत्त्वज्ञान त्यांच्या विस्तृत वाङ्मयात सूत्ररूपाने मांडलेले आढळते. श्री गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञानाची जी मूलभूत बांधणी आहे त्यानुसार गोरक्षनाथांच्या वा पतंजलींच्या नावावर नसेल पण भारतामध्ये व पाश्चिमात्य देशातही अनेक ठिकाणी सामाजिक स्तरावर अनेक प्रकारे योगदान चालू असलेले दिसून येते. उदाहरणादाखल क्रियायोगी स्वामी योगानंदानी सन १९१७ साली स्थापन केलेल्या 'योगदा सत्संग सोसायटी' (Self Realization) चे देता येईल. ते म्हणतात. When you go beyond the consciousness of this world knowing that your are not the body or the mind and yet aware as never before that you exist, that Divine Consciousness is what you are. You are that in which is rooted every thing in the Universe (Ref. Bulletin of the Y.S.S. of India. म्हणून श्री गोरक्षनाथ एका

महत्त्वाच्या मध्यवर्ती सूत्रातून निर्देश करीत आहेत की, ''अदेषि देषिबा देषि बिचारिबा अदिसीटि राषिबा चीया पातालकी गंगा ब्रम्हंड चढाइबा तहॉं विमल विमल जल पीया'' (संदर्भ : 'सुक्ष्मवेद' - सूत्र २ - गोरक्षनाथ उवाच)

**अर्थ :** जे दिसत नाही ते पहायचे आहे. पाहून जाणायचे आहे. जे अदृष्य आहे त्याला आपल्या चित्तात धारण करायचे आहे. व उर्जेच्या गंगेला खालून वरच्या दिशेला नेऊन तिथे अमृत प्राप्त करून घ्यायचे आहे. या संकल्पित प्रबंधाच्या ८ प्रकरणातून कठोर हठयोगापासून ते द्वैताद्वैतविलक्षण चिद्‌विलासवादापर्यंतचा प्रवाह व त्यानंतरचे कालखंडातील विविध प्रवाह, त्यातले बदल, त्यांचा सामाजिक आशय महत्त्वाचा आहे. वरील प्रबंधात्मक अभ्यासाचा, आजच्या चालू घडीला जे चिंताजनक असे सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहेत व होत आहेत, त्यांच्या सोडवणूकीसाठी काही निर्णायक स्वरूपात उपयोग होऊ शकतो का हे पहाणे महत्त्वाचे ठरते. श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या तत्त्वज्ञानात काही विषय केंद्रस्थानी ठेवले आहेत ते का? अणुगर्भरहस्याप्रमाणे त्यातील रहस्य ते कशाप्रकारे स्पष्ट करतात? या सर्व अभ्यासास शास्त्र, विज्ञान व अनुभव यांचा आधार देण्यावर भर राहील असा प्रयत्न करण्याचा हेतू आहे. हे सर्व काम चिकित्सा व त्यांच्या विस्तार या दृष्टीने मोठे आहे. त्याचवेळी पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील जे विविध प्रवाह आहेत त्यांचेशी शक्य असेल तिथे तुलना करण्याचा व त्या संबंधात विवेचनाचा प्रयत्न केलेला आहे.

## २) विषय प्रवेश :

।। श्री ।।

श्री महायोगी गोरक्षनाथांचा जीवनपरिचय करून घेताना त्यांचे गुरू श्री मत्स्येंद्रनाथांच्या परिचयाशिवाय पुढे जाताच येणार नाही. तसेच त्यांचा जीवनपरिचय करून घेताना त्याची ऐतिहासिकता व तो काळ, त्याचप्रमाणे दोघांची अनुश्रुती अशा दोन्ही बाजू पहायला हव्यात. अशा तुलनात्मक पध्दतीनेच त्यांचा मागोवा घेणे आवश्यक आहे. नवनाथांपैकी पहिले मानवी देहातील नाथ म्हणजे मत्स्येंद्रनाथ. नाथसंप्रदायाचे हे आद्यप्रवर्तक आहेत. स्कंद, शंकर दिग्विजय, नाथलीलामृत, नवनाथभक्तिसार, भक्तिविजय अशा विविध संस्कृत व प्राकृत ग्रंथातून त्यांच्या कथा आहेत. काही संदर्भावरून ते भृगुवंशी ब्राम्हण असावेत तर मच्छप्रपाद या नावावरून ते कोळी कुटुंबातील असावेत.[१] (संदर्भ : नाथसंप्रदाय- उदय व विस्तार, पृष्ठ १८७) ते जन्माने कोणत्या जातीचे होते व जन्म कसा झाला यावर एकमत होत नाही. जन्म ठिकाणाबाबतही एकमत नाही असे दिसून येते. बंगाली भाषेत जसे त्यांचे बाबतीत लिखाण आहे, तसेच संस्कृत, हिंदी, मराठी, गुजराथी, उडिया, राजस्थानी,पंजाबी भाषेमध्येही त्यांचे संबंधात बरेच वाड:मय उपलब्ध आहे. तुलनात्मक

दृष्टीने बंगाली भाषेत जास्त वाड:मय आहे. यावरून काही जण असा निष्कर्ष काढतात की त्यांचा जन्म बंगाल मधील असावा. नाथगुरूंचे बंगाली वाड:मयातील प्राबल्य हा त्यांचा जन्म बंगाल मधील असण्याबद्दलचा पुरावा तर्कदृष्टीने अयोग्य वाटत नाही. १० व्या शतकातील श्री मत्स्येंद्रनाथांचे लोकसाहित्यातील योगदान म्हणजे लोकप्रिय गाथा, लोकगीते, गद्य-पद्य रचना. या दृष्टीने श्री मत्स्येंद्रनाथ बंगालचे आदिकवीच ठरतात असे या विषयातील अभ्यासकांचे मत आहे.

## ३) श्री मत्स्येंद्रनाथांची ऐतिहासिकता :

श्री मत्स्येंद्रनाथांच्या ऐतिहासिकतेबद्दल व त्यांच्या कार्यकाळाबद्दल (Period) ठरवताना नेपाळमध्ये प्राप्त झालेला कौलज्ञान निर्णय  हा ग्रंथ महत्वाचा ठरतो. यातील प्रत्येक अध्यायाच्या शेवटी मत्स्येंद्रनाथ वा मीननाथ असा उल्लेख आहे. यातील भाषा प्राचीन संस्कृतचेच एक रूप असून भाषेवरून ती ११ व्या शतकापूर्वीची आहे असे डॉ. बागची यांनी संशोधनांती ठरवले आहे.[२] (नाथसंप्रदाय- उदय व विस्तार, पृष्ठ २०७) या सर्व वाड्:मयात श्री मत्स्येंद्रनाथांना शिवाचे अवतार मानले आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तिमत्वास अवतार स्वरूपात महत्व दिले जाते तेव्हा तो काळ १०० वर्षापूर्वीचा तरी असतो अशा विचारातून श्री मत्स्येंद्रनाथांचा कार्यकाल १० व्या शतकातील मानावा असे व्यक्त केले जाते. प्रख्यात विद्वान अभिनवगुप्त यांनी त्यांच्या 'तंत्रालोक' ग्रंथात नमन केले आहे ते मत्स्येंद्रनाथांना! 'तंत्रालोक' ग्रंथाची रचना सन १०१५ ची आहे. याचा अर्थ या काळापूर्वी श्री मत्स्येंद्रनाथ झाले. कल्याणी मलिक यांचेही अनुमान असेच आहे. तिबेटी परंपरेप्रमाणेही साधारण असाच कालनिर्देश होतो.[३] (नाथसंप्रदाय - उदय व विस्तार, पृष्ठ २०९)

या कार्यकाळातील वाड्:मयात श्री गोरक्षनाथांचा कुठेही उल्लेख आलेला नाही हे नमूद करणे जरूर आहे. हरिद्वार येथून प्रकाशित झालेल्या 'योगीसंप्रदायाविष्कृति' ग्रंथात श्री. मत्स्येद्रनाथांची जन्मकहाणी सांगितली गेली असून त्यामध्ये त्यांना त्यांच्या आईवडीलांकडून समुद्रात फेकले गेले पण मत्स्य योनीद्वारे त्यांना जीवदान मिळाले. (म्हणजे जन्म झाला) व शिवाकडून पार्वतीला दिला जाणारा उपदेश ग्रहण करण्याने अद्वैतज्ञान प्राप्त झाले. श्री मत्स्येंद्रनाथांनी कोणत्या मार्गाचे प्रवर्तन केले याबद्दल विविध मते आहेत. ते कौलमार्गी (कुल=शक्ती व अकुल=शिव) होते म्हणजे शक्ती व शिव यांच्या समरसीकरणाचा मार्ग म्हणजेच कौलमार्ग आचरणारे, तसेच ते शैव होते, तांत्रिकपण होते व ते सर्वात असूनही त्या पलिकडचे होते. हे कसेही असले तरी त्यांनी श्री गोरक्षनाथांसारखा क्रांतिकारी योगी जगाला दिला यामधेच सर्व काही समाविष्ट होते आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. गिरनार पर्वतावर समाधी घेण्यापूर्वी श्री गोरक्षनाथांना आपले अुत्तराधिकारी म्हणून निर्णय करुन नाथपंथाची भविष्य योजनाच निश्चित केली असे म्हणता येईल.

## ४) श्री गोरक्षनाथांचा ऐतिहासिक कालखंड :

आता श्री गोरक्षनाथांचा ऐतिहासिक कालखंड कोणता? वरील ऐतिहासिकतेवरुन व इतर ग्रंथावरुन त्यांचा कालखंड हा ११ व्या शतकातला ठरतो. श्री गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ- ज्ञानेश्वर अशी परंपरा सर्वश्रुत आहे. श्री ज्ञानेश्वरानी इ.स.१२९० मध्ये ज्ञानेश्वरीचे लिखाण केले. हे सर्व विद्वानांनी मान्य केले आहे. त्यानंतर ६ वर्षानी म्हणजे इ.स.१२९६ मध्ये ज्ञानेश्वरानी समाधी घेतली आता.

निवृत्तीनाथांचा जन्म इ.स. १२७३, ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स.१२७५ (सि. सि. प. पान ६ वर ज्ञानेश्वरांचा जन्म इ. स. १२९० असा दिलेला आहे.)

गोरक्षनाथांचा काळ (अंदाजे) इ. स. १०७५, मत्स्येद्रनाथांचा काळ इ. स. १० वे शतक[४] (नाथसंप्रदाय- उदय व विस्तार, पृष्ठ ३६१) असे सर्वसाधारणपणे मान्य झालेले आहे. श्री गोरक्षनाथांचा कालखंड नक्की करताना राजा गोपीचंदाचा इतिहास महत्त्वाचा ठरतो. गोपीचंद हे बंगालचे राजे होते. वडीलांचे नांव माणिकचंद होते. हे राजे पालवंशीय. पालवंशाचे पतन ११ व्या शतकात झाले व माणिकचंदांचा उल्लेख त्रिलोचन म्हणून नवनाथ कथासार मध्ये आहे. गोपीचंदाची आई मैनावती ही जालंदरनाथांची शिष्या होती. या उल्लेखाचा उपयोग श्री गोरक्षनाथांच्या कालखंडाचा अंदाज करण्यासाठी होऊ शकतो. नाथपंथाची मुळे ज्या वज्रयान व सहजयान पंथातून दिसतात, त्याचे श्रेष्ठ सिध्दाचार्य शांतिरक्षित हे ७ व्या शतकातील होते. त्यांच्या तिबेटी परंपरेप्रमाणे किंवा वज्रयानी परंपरेप्रमाणे जालंदरनाथांचा कार्यकाळ १०व्या शतकातील तर श्री गोरक्षनाथांचा कार्यकाळ १० किंवा ११ व्या शतकातील असावा.[५] (संदर्भ : नाथपंथ उदय विस्तार, पृष्ठ १०१) त्याचप्रमाणे श्री गोरक्षनाथांनी अनेक मुसलमानही आपल्या दीक्षेत घेतले होते. काबूलमध्ये अशा मुसलमान शिष्यांना 'रतन हाजी के फकीर' म्हणत असत. त्यातील एका हाजीने जे 'काफिरबोध' म्हणून लिखाण केले आहे, त्याचा कार्यकाळ ११ व्या शतकाचा आहे.[६] (संदर्भ : सि.सि.पध्दती, पृष्ठ १०) नाथसंप्रदायातील इतर सिध्दांच्या ऐतिहासिक काळाबद्दलही अशाच पध्दतीने पहावे लागते. व अनेक संशोधकांच्या भिन्नभिन्न मतांमुळे बराचसा भाग अंदाज व तारतम्य यातूनच पुढे ठेवावा लागतो. ऐतिहासिक नोंदी हा एक भाग झाला. दुसरा भाग म्हणजे अनुश्रुती (पौराणिक). 'नवनाथ भक्तिसार' च्या अनुश्रुतीनुसार कलियुगाचा प्रारंभ होताच या नवीन युगातील धर्मकार्यासाठी भगवान श्री विष्णूनी निर्देश दिल्याप्रमाणे नव-नारायणानी यात सक्रीय भाग घेतला. त्यानुसार कविनारायण मत्स्येंद्रनाथ झाले. (जन्ममाध्यम-मासळी), हरिनारायण गोरक्षनाथ झाले. (जन्ममाध्यम-राख), करभंजननारायण गहिनीनाथ झाले. (जन्ममाध्यम-चिखल), अंतरिक्ष नारायण जालंदरनाथ झाले. (जन्ममाध्यम - अग्नी), प्रबुद्ध नारायण कानिफनाथ झाले. (जन्ममाध्यम-हत्ती), द्रुमिल नारायण -

भर्तरीनाथ झाले. (जन्ममाध्यम-भिक्षापात्र), चमस नारायण रेवणनाथ झाले. (जन्ममाध्यम - रेवातीर), अग्निहोत्र नारायण नागनाथ झाले. (जन्ममाध्यम-सर्प), पिप्पलायन नारायण चर्पटिनाथ झाले. (जन्ममाध्यम-भागीरथी नदी) अशाप्रकारे नाथांच्या जन्मकथा आहेत. या संबंधातील साधनसाहित्य दोन प्रकारामध्ये विभागले गेलेले आहे.

१. सांप्रदायिक ग्रंथ २. सांप्रदायिक केंद्रातून होणारे वाङ्मय प्रकाशन. सांप्रदायिक ग्रंथामध्ये- गोरक्षशतक, सि.सि.पध्दती, अमरौघ शासनम्, अमनस्क योग, ज्ञानदीप बोध, घेरंडसंहिता, नवनाथ भक्तिसार, नाथलीलामृत, सिध्दचरित्र असे अनेक ग्रंथ आहेत. सांप्रदायिक प्रकाशनामध्ये - योगप्रचारिणी महासभा - काशी, तसेच गोरखनाथ मंदीर - गोरखपूर यांची प्रकाशने आहेत.

त्याचप्रमाणे नाथपंथाच्या अभ्यासासाठी शिवतत्व ज्यामध्ये प्रमुख येते असे शैव वाङ्मय, शाक्त वाङ्मय, पातंजल योगदर्शन, गोरक्षोपनिषद्, गोरखबानी, महार्थ मंजरी, अवधूतगीता, विवेकदर्पण, ज्ञानकैवल्य (लेखक - डॉ. ढेरे), वगैरे ग्रंथ प्रकाशने अत्यंत उपयुक्त आहेत.

श्रीमद् भागवत ग्रंथात ११ व्या स्कंदामध्ये निमिराजाशी नवनारायणाचे संवाद झालेले आहेत. हे नवनारायण म्हणजे ऋषभदेवांच्या पुत्रांपैकी ९ श्रेष्ठ भक्त होते. श्रीकृष्णाच्या आज्ञेने त्यांनी विविध अवतार घेतले. नाथपंथातील सिध्दपुरूष हे इतर संतापेक्षा गूढ चारित्र्याचे असल्यामुळे लोकांमध्ये त्यांचेविषयी अधिक आकर्षण आहे. त्यांचेविषयी अनेक भारतीय भाषांमधून लोककथा व लोकगीते प्रचलित आहेत. नवनाथांच्या कालखंडानंतर इ.स. १८०० मध्ये 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथामध्ये धुंडीराज मालुकवींनी या लोककथांमध्ये जे प्रचलित होते त्यालाच ग्रंथरूप दिले. तप, ब्रम्हचर्य, अपूर्व भक्तिभाव व अनन्य गुरूनिष्ठा यांचेबळावर निर्माण झालेल्या दिव्य शक्तींचा उपयोग नवनाथांनी गैरपध्दतीने केल्याचे एकही उदाहरण नाही हे महत्वाचे आहे. निष्ठा व भक्तिभाव समाजात रूजवून त्यातून लोककल्याण साधण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला दिसून येतो. स्वत:च्या चारित्र्यातून सामाजिक चारित्र्याची निर्मिती हा उद्देश स्पष्ट होत असतानाच निवृत्ती व कर्मयोग यांचे अनोखे मिश्रण व्यक्त होताना दिसते. नराचा नारायण होणे ही किमया कशी करायची हे तर त्यांनी दाखवलेच पण प्रत्येक व्यक्ती ही नारायणरूपच असते व तिला या मूळ स्वरूपाची ओळख होण्यासाठी विश्वशक्तीची मूलभूत चक्रव्यवस्था (९ चक्रे) ही प्रत्येक व्यक्तीतच उपस्थित असते हा मूलभूत सिध्दांत हा या नाथतत्वज्ञानाचा पायाच आहे. अशा ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या नवनाथांचे एकमेकांशी संबंध पाहणे व ते कसे प्रस्थापित झाले हे ही पाहणे उद्बोधक आहे.

**५) नवनाथांचे एकमेकांशी संबंध :** (लोककथेच्या किंवा अनुश्रुतीच्या आधारे)

नवनाथांचे एकमेकांशी संबंध कशाप्रकारे प्रस्थापित झाले हे पाहणेही उद्‌बोधक आहे.

बंगालमधील चंद्रगिरी गावात श्री मत्स्येंद्रनाथांच्या आशिर्वादातून १२ व्या वर्षी राखेतून प्रगट झाले.

**अ) गोरक्ष-गहिनी संबंध :**

श्री गोरक्षनाथ मातीचा पुतळा तयार करत असताना संजीवनी मंत्र म्हणत होते व त्याच्या प्रभावाने करभंजन नारायण गहिनीनाथांच्या रूपात प्रगट झाले. जालंदरनाथ हे यज्ञकुंडातून प्रगट झाले.

**ब) जालंदर-कानिफनाथ संबंध :**

जालंदर नाथांच्या आव्हानानुसार हत्तीच्या कानातून कानिफाचा जन्म व अनुग्रह झाला अशी नोंद आहे. त्यावेळी जालंदर नाथांनी कानिफनाथाला बदरिकाश्रमी तपाला बसवले. त्याचवेळी श्री गोरक्षनाथही तिथेच तप करत होते पण परिचय नव्हता असा उल्लेख आहे.[७] (संदर्भ : नवनाथ कथासार, पृष्ठ २९) यावरून श्री गोरक्षनाथ व श्री जालिंदरनाथ समकालीन होते असे दिसून येते. नंतरच्या काळात प्रवासाच्या दरम्यान श्री गोरक्षनाथ व श्री कानिफनाथ यांची भेट झाली. त्यावेळी त्या भेटीतून श्री गोरक्षनाथांना मत्स्येंद्रनाथाचे स्त्रीराज्यवास्तव्य कळले व कानिफनाथांना जालंदरनाथांचे स्थान कळले. त्यानुसार पुढील घटनांचा इतिहास आहे.

**क) गोरक्षनाथ-भर्तरीनाथ संबंध :**

भर्तरींचा जन्म कौलिक ऋषींच्या भिक्षापात्रात द्रुमिल नारायण संचार होऊन झालेला आहे. नंतरच्या राजयोगांतर्गत कारणाने विक्रमराजाचा सहयोग होऊन भर्तरीनाथांना राज्यप्राप्ती झाली. पुढे पिंगला राणीचे सती जाण्याचे निमित्त व पूर्वयोजनेनुसार श्री दत्तात्रेयांनी श्री गोरक्ष-भर्तरी भेट घडवून त्यानंतर भर्तरींना श्री दत्तात्रेयांकडून नाथदिक्षा दिली गेली.

**ड) मत्स्येंद्रनाथ-रेवणनाथ संबंध :**

श्री गुरूदत्तात्रेयांनी दिलेल्या प्राथमिक सिध्दीतून रेवणनाथ प्रसिध्दीस आले. पण त्यांना भक्तिमार्गात स्थिर करण्यासाठी मच्छिंद्रनाथांनी रेवणनाथ-दत्तात्रेय भेट घडवून आणली. वर त्यांना नाथदिक्षा दिली. तेथून रेवणनाथांचे विटेगावी येणे झाले व सिध्दींच्या माध्यमातून लोकसेवेचे व्रत पार पाडत राहिले.

**इ) भगवान शंकर-दत्तात्रेय व नागनाथ संबंध :**

कोल्हापूरमध्ये दत्तात्रेय-नागनाथ भेट होऊन त्यांना दीक्षा दिल्यानंतर श्री मत्स्येंद्रनाथांची भेट घडल्याची नोंद आहे. चर्पटीनाथ - ब्रह्मदेवाच्या शक्तीमाध्यमातून

पिप्पलायन नारायणांनी चर्पटीनाथांच्या रूपात जन्म घेतलेला आहे व ज्ञानप्राप्तीनंतर मत्स्येंद्रनाथांनी त्यांना दिक्षा दिली.

नाथसंप्रदायाची सुरूवात आदिनाथ भगवान शंकर व अत्रिसुत दत्तात्रेय यांच्या आज्ञेने व दीक्षेने झालेली आहे, असे अनुश्रुतीच्या व ऐतिहासिक संदर्भांवरून दिसून येते.

**६) नाथसंप्रदायाचे मूळ स्थान :**

नाथसंप्रदायाचे मूळ स्थान उत्तर हिंदुस्थान, बंगाल, श्रीशैलपर्वत (आंध्र) किंवा महाराष्ट्र अशा प्रकारची विद्वानांची मते नाथसंप्रदायांच्या मूळ स्थानाबद्दल आहेत. एक मात्र स्पष्ट आहे की सर्व देशभर जनमानसात नाथ सिध्दांचे विषयी कुतुहल व आदरस्थान आहे. नेमके स्थाननिर्देश हे अजूनही एक कुतुहलच आहे. हा विषय असा अवघड होण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे कोणत्याही भारतीय दार्शनिकांनी वा सिध्द पुरूषानी वैयक्तिक इतिहास लिपिबध्द केलेला नाही. ही एक भारतीय परंपरेतील श्रेष्ठताच आहे. मात्र अनेक राजेलोकांनी व महत्वाच्या व्यक्तींनी या पंथासाठी सर्वस्वाचा त्याग केला. त्याच्या बऱ्याच ऐतिहासिक नोंदी उपलब्ध आहेत. एक गोष्ट स्पष्ट होत जाते की, श्री गोरक्षनाथ हे ईश्वरी पुत्ररुपात ओळखले जातात. संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी येथून प्रकाशित झालेल्या 'गोरक्षसिध्दांतसंग्रह' मध्ये नवनाथांचा खालीलप्रमाणे उल्लेख मिळतो.[८] (संदर्भ - सि.सि.पध्दति, पृष्ठ ७) श्री गुरुआदिनाथ - मत्स्येंद्रनाथ - उदयनाथ - दण्डनाथ - सत्यनाथ - संतोषनाथ-कूर्मनाथ-भवनार्जि- व श्री गोरक्षनाथ: (ईश्वरसंतान आदिर्ब्राम्हण:) सूक्ष्मवेदी. मात्र अन्य उपलब्ध स्त्रोतातून श्री गोरक्षनाथ हे श्री मत्स्येंद्रनाथांचे परमशिष्य होते व त्यांचेजवळच त्यांनी सर्व योगसाधना केली असे संदर्भ आहेत. इ. स. ११ व्या शतकात श्री गोरक्षनाथ उत्तर व पश्चिम भारतात पूर्ण प्रसिध्दीस आले होते. नंतरच्या काळामध्ये सिक्कीम, नेपाळ, हरिद्वार, उत्तरप्रदेश, बंगाल, काश्मीर, पेशावर, सिंध, बलुचिस्तान, कच्छ, महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब या सर्व प्रदेशात त्यांना प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. अकबर बादशहानी नाथ योग्यांच्याकडून दीक्षा घेतली होती, अशी जनश्रुती आहे.[९] (संदर्भ - सि.सि.पध्दति, पृष्ठ ८)

**७) नाथ संप्रदायाची महत्त्वाची ठिकाणे :**

हरिद्वार, बद्रिनाथ, अयोध्या, प्रयाग, द्वारका, वृंदावन, गोरखरपूर, पुष्कर, त्र्यंबकेश्वर, अमरनाथ, पशुपतिनाथ, श्री शैल, अहमदनगर जिल्हयातील मढी, वृध्देश्वर डोंगर, पैठण, आळंदी, सप्तशृंग, अंभोरे, मच्छिंद्रगड, बत्तीस शिराळा ही ठिकाणे अतिशय पवित्र मानली जातात. त्याचप्रमाणे कच्छ-धीनोधर, सिंध-कोटेश्वर, बलुचिस्तान-हिंगलाज, नेपाळ-देवीपाटण. देवीपाटण येथे मत्स्येंद्रनाथांच्या प्रतिमेचे पूजन केले जाते. नेपाळमध्ये पशुपतिनाथांइतकाच श्री गोरक्षनाथांना मान आहे.

नाथसंप्रदायाच्या संबंधित ग्रंथामध्ये या संप्रदायांची वेगवेगळी नांवे दिलेली आढळतात. सि.सि. पध्दतीमध्ये सिध्दमत, (उपदेश ६ श्लोक ७५ ते ७९), योगबीज ग्रंथात सिध्दमार्ग व सिध्दसंकेत (श्लोक १३४), सि.सि. संग्रहमध्ये पान ५१ वर योगसंप्रदाय, अवधूतसंप्रदाय, कबीर, नानक, दादू दयाल इत्यादी निर्गुणवादी संतांनी नाथसंप्रदायिकांचा उल्लेख अवधू, जोगी, सिध्द अशा प्रकारे केलेला दिसून येतो.

'कौलज्ञाननिर्णय' या खुद्द श्री मत्स्येंद्रनाथांच्या ग्रंथात त्यांनी स्वत:चा उल्लेख 'सिध्दकौलसंप्रदायाचा पाईक' असा केला आहे. 'नाथपंथ' यातील 'नाथ'चा काय अर्थ आहे? नाथसंप्रदायिक मताप्रमाणे 'ज्याला प्रारंभच नाही तो नाथ' या अर्थाने नाथपंथ हा अनादि ठरतो. याचाच अर्थ आत्मचिंतनातून झालेले स्वाभाविक असे प्रारंभीचे स्फुरण म्हणजे नाथपंथ. नाथ याचे अन्य अर्थ पहाताना नाथ म्हणजे स्वामी, मालक या अर्थाने तो सृष्टीचा निर्माताच ठरतो. पं. गोपीनाथ कविराज यांनी संपादित केलेल्या 'गोरक्ष सिध्दांतसंग्रह' यातील राजगुह्यास अनुसरून दिलेले सूत्र ''नाकारो ऽ नादिरूप थकार: स्थाप्यते सदा भुवनत्रयमेकैक: श्री गोरक्ष: नमोस्तुते''

**अर्थ -** 'ना' म्हणजे अनादिरूप व 'थ' म्हणजे भुवनत्रय स्थितीचे कारण असे नाथ तत्व आहे अशा अवस्थेतील श्री गोरक्षास नमस्कार असो. त्याचप्रमाणे नाथ म्हणजे ब्रम्हपद, मोक्षरूप असाही अर्थ घेंतलेला दिसतो. त्याचप्रमाणे 'नाथ' शब्दातून पदकर्त्यांचा बोध होतो. त्यासाठी खालील दोन सुत्रे ध्यानात घ्यावी लागतात.

नाथ कहै तुम सुन रे अवधू दिढ करी राषहु चीया।। - गोरखबानी/२९

किंवा

नाथ कहै तुम आपा राषौ उठ करि बाद न करणा।। - गोरखबानी/७४

**अर्थ -** श्री गोरक्षनाथ म्हणतात की, हे अवधू ''आपले चित्त स्थिर ठेव.'' - सूत्र २९.

व

श्री गोरक्षनाथ म्हणतात की, ''तू आपल्या आत्म्याचे रक्षण कर व उगीच हट्टाने वादविवाद करू नकोस.'' - सूत्र ७४.

या पंथाच्या अध्ययनानंतर दिली जाणारी दीक्षा असाही अर्थ इथे अभिप्रेत आहे. नाथपंथातील सर्व भेद हे भिन्नभिन्न आचारानुसार झालेले दिसून येतात. त्याविषयी तपशीलवार अशी चर्चा पुढील प्रकरणात करणार आहे. तथापि नाथसंप्रदायाने तात्कालीन विविध धर्मप्रवाहातून काय स्वीकारले? अथवा काय नाकारले? हे अभ्यासणे मोठे अवघड काम आहे. यासंदर्भात आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी व परशुराम चतुर्वेदी यांच्या अनुक्रमे 'मध्यकालीन धर्मसाधना' व 'मध्यकालीन प्रेमसाधना और भारत की परंपरा' या ग्रंथातील संदर्भ महत्वपूर्ण ठरतात.[१०] (संदर्भ - नाथ संप्रदाय - उदय व विस्तार, पृष्ठ ६३, ६४)

## ८) तत्कालीन सामाजिक परिस्थिती :

तत्पूर्वी त्यावेळची सामाजिक परिस्थिती कशी होती? तत्पूर्वीचा भारतभूमीवरील सर्वात प्राचीन धर्म व उपासना कोणती होती? देव, धर्म, आत्मचिंतन इत्यादींची साधना करणारा कोणता पंथ इथे प्रथम विकसित झाला? नासदीय सूक्तांतून चिंतन करणारी वैदिक धारा इथे प्रभावी असली तरी वेदांच्या आधी आर्यांच्या आगमनापूर्वी इथे काय होते? माणसाच्या मनातील पहिली भावना कोणती होती? भीती, क्रोध, त्वेष, प्रेम, वात्सल्य, शृंगार या भावना कशा व्यक्त होत होत्या? प्रचंड वादळ, मुसळधार पर्जन्य, भयंकप निर्माण करणारे भूकंप, महापूर, समुद्राचे अथांग दर्शन, यांचे परिणाम स्वरूप होऊनच अनेक भावभावनांच्या कल्लोळित मिश्रणातून प्रथमच्या प्रार्थना, पूजा, उपासना सुरू झाल्या असाव्यात.

आर्यांचे आगमन भारतात केव्हा झाले ते कुठे होते याबाबत आधुनिक संशोधन झाले आहे. त्यानुसार आर्य भारतात येण्यापूर्वीची इथली जी नाग-द्रविड संस्कृती होती तिचा मोठा परिणाम भारतीय जीवनावर दिसून येतो. हरप्पा व मोहेंजोदारो येथील उत्खननातून जे अवशेष सापडले त्याच्या अभ्यासातून इ.स.पू. ३००० वर्षाच्या कालावधीवर प्रकाश पडतो. त्या संशोधनावरून असे निष्कर्ष काढले गेले आहेत की त्यावेळी सिंधू नदीच्या काठावर सभ्य आणि समृध्द संस्कृती नांदत होती. त्यावेळी या प्राचीन संस्कृतीवर आर्य संस्कृतीचा कोणताही पगडा नव्हता. सर जॉन मार्शल यांनी आपल्या "Mohenjo-Daro-Indus Civilisation" या ग्रंथात त्याबाबत विस्ताराने माहिती दिलेली आहे. त्यातून असे स्पष्ट होते की मातृदेवी शक्ती व पुरूषदेव शिव यांची उपासना प्रचलित होती. ही बाब शाक्तोपासक संप्रदायाच्या उपासनेशी मिळती जुळती आहे.[११] (संदर्भ : शिवयोग और प्रार्थना योग, पृष्ठ ३७) त्यावेळी मूर्तिपूजा होती. तेथील उत्खननात लिंग व त्रिकोणाकृती ($\Delta$) या आकाराचे दगड विपुल प्रमाणात आढळले आहेत. पुढे शिवोपासनेत व नाथपंथात जे पूजेचे प्रकार निर्माण झाले त्याचे मूळ या सिंधू संस्कृतीत दिसते. तंत्रमार्ग, पूजापाठ, देवदैवते यांचा मूळ संदर्भ सिंधू संस्कृतीत आढळतो. ऋग्वेदातील ‘रूद्र’ हा बहुधा पणी द्रविडांचा देव असावा. शिवाचा रूद्रावतार, स्मशानवास, विभूती, गळयातल्या माळा व सर्पमैत्री, वृषभाशी सान्निध्य, लिंग स्वरूपात होणारी शिवाची पूजा, यज्ञविरोध यावरून रूद्र व शिव हे आर्येतरांचे दैवत होते व पुढे पुराणकाळात ते शिव किंवा महादेव स्वरुपात हिंदू धर्मात स्थिरावले असे निष्कर्ष अभ्यासांती काढले गेले आहेत.

यावरून असे म्हणता येईल की, हिंदू संस्कृतीमध्ये विविधतेला सामावून घेण्याचे वैशिष्ठ्य अभ्यासकांना प्रत्ययास आलेले आहे. या संदर्भात डॉ. एस. राधाकृष्णन म्हणतात, "The Hindu attitude of religion is interesting. While fixed intellectual beliefs mark of one religion from another, Hinduism sets itself no such limits. Intellect

is subordinated to intuition, dogma to experience, outword expression to inword realization. Religion is not the acceptance of academic abstractions or the celebrations of ceremonies but a kind of life or experience. It is insight into the nature of reality or experience of reality. This experience is not an emotional thrill or a subjective fancy but is the response of the whole personality, the integrated self to the central reality. Religion is a specific attitude of the self, itself and no other, though it is mixed up generally with intellectual views, aesthetic forms and moral valuations.[12] (Ref. : Hindu view of life, P. 15)

वरील उत्खननात सापडलेले काही गूढ शीलालेख द्रवीड संस्कृतीच्या धर्म व तत्वज्ञान कल्पनेवर प्रकाश टाकतात. एका शीलालेखावर 'इरूवन' शब्द आहे. याचा अर्थ ''तो की ज्याची सत्ता आहे.'' योगासन घातलेल्या मूर्तीस : 'आन' म्हटले जाते. स्त्री देवतांना 'अम्मा' म्हटले आहे. द्रविड भाषेत अम्मा म्हणजे आई. या उत्खननात अम्माच्या अनेक मूर्ती सापडल्या आहेत. फादर हॅरॉस (Father Haros) यांनी सिंधू संस्कृतीतील × या खुणेचा संबंध सध्याच्या लिंगायत लोकांच्या घरासमोरच्या दिसणाऱ्या अशा खुणेशी लावला आहे. याला 'कुडु' म्हटले आहे.

थोडक्यात द्रविड संस्कृतीमध्ये आन म्हणजे परमेश्वर म्हणजेच शिव, अम्मा म्हणजे मातृदेवी म्हणजेच शक्ति, अनिल म्हणजे पुत्र म्हणजेच शरण. शैवागमामध्ये शिव-शक्ति सामरस्य हा अर्थ उच्च दर्जाच्या सत व चित शक्तीचे समरसीकरण अशा अर्थाने घेतलेला आहे. पुरूष व स्त्री यांचा एकत्र संबंध असा अर्थ शैवागम ग्रंथात नाही.[१३] (संदर्भ : शिवयोग और प्रार्थना योग, पृष्ठ २३) शैवागमात भक्तीलाही स्वतंत्र पुरूषार्थाचे मूल्य आहे. चित, आनंद, इच्छा, मन व क्रिया या ५ शक्ती परमात्म्याच्या ठिकाणी अभिन्नत्वाने नांदतात. सगुण निगुर्णात काहीही भेद नाही.[१४] (संदर्भ : नाथपंथ -उदय व विस्तार, पृष्ठ ८१) शिव हे निर्गुण निराकार तत्व शक्तीच्या माध्यमातून व्यक्त होते. काया साधनेच्या माध्यमातून सामरस्य हे योगातून सिध्द होणे हा श्रेष्ठ व योग्य उपाय होय. परंतु तांत्रिकांनी विकारवश होऊन उपासनापंथ वाममार्गी केला. अशा वेळी वेदातले आपल्या सोयीचे काय? तर अथर्व वेदातील अभिचार म्हणजे मारण, जारण, उच्चाटनाचे तांत्रिक विधी यांच्याबरोबरच इतर मंत्र व तंत्र याचा प्रभाव वाढून देवतांच्या उपासना कर्मकांडात बसवल्या गेल्या. त्यातूनच मद्य, मास, मत्स्य, मुद्रा, मैथुन अशा विचित्र तांत्रिक साधना, यंत्रपूजा, पशूबळी, होमहवन, भांगसेवन, लता साधना अशा साधनांमधून मनुष्य शिवरूप होतो असे ठरवूनच त्याची वाङ्मय निर्मितीही केली गेली. उदा. कुलार्णवतंत्र, आगमसार, मेरूतंत्र, विजयतंत्र, महानिर्वाणतंत्र वगैरे ग्रंथ त्यासंबंधात लिहिले गेले.

श्री मत्स्येंद्रनाथांनी स्वत:ला कौलमार्गी म्हटले आहे म्हणजे काय? कुल म्हणजे शक्ती व अकुल म्हणजे शिव. यांचे एकीकरण म्हणजे कौलमार्ग, या शब्दांचे शिव म्हणजे पुरूष व शक्ती म्हणजे स्त्री असे अर्थ लावून आतून चोरट्या व अमंगल उपासना करत बाहेरून शैवपंथाचे म्हणून मिरवत असत. या मार्गातील सात्विक लोकांना - तंत्रमार्गी, राजस लोकांना - यामलमार्गी, तामस लोकांना - डामर मार्गी म्हटले जात असे.

यामधील श्रेष्ठ व शुध्द आचरणाचे जे होते त्यांना 'अवधूत' मार्गी म्हटले जात असे. त्यांच्या शुध्दाचाराबद्दल व अवधूतसंप्रदायाबद्दल सविस्तर कल्पना देणारा असा सि.सि. पध्दती उपदेश (अध्याय) ६ वा आहे. त्यामध्ये अवधूतयोगी लक्षण पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

य : सर्वान् प्रकृतिविकारान् अवधुनोति इति अवधूत:।

**अर्थ -** सर्व प्रकृती विकारांना त्यागून निर्मळ स्वरूपात स्थिर होतो तो अवधूत. त्याचप्रमाणे माणसाची कवटी धारण करणारा तो कपाली म्हणजेच शिव व अशा शिवाचे भक्त ते कापालिक. सि.सि.पध्दती ग्रंथाच्या नाथपंथ परिचयामध्ये कापालिक परंपरा, गोरखनाथी शाखा, 'योगीसंप्रदायाविष्कृती ग्रंथाचे अनुसार मत्स्येंद्रनाथ व जालंदरनाथ यांची शिष्य परंपरा, नेपाळी परंपरा, नवनारायण- नवनाथ परंपरा, तसेच कवी शेखराचार्य ज्योतिरीश्वर यांच्या वर्णरत्नाकर ग्रंथात तसेच महापंडित राहूल सांकृतायन द्वारा वज्रयान सूची अशा ग्रंथामधून नाथसिध्दांची नावे व संख्या ७६ व सहजायानी सिध्द संख्या ८४ नावासह दिलेली आहे. तसेच संत ज्ञानेश्वरांची परंपरा पण दिलेली आहे. यावरून असे म्हणता येते की १४ वे शतक सुरू होण्यापूर्वीपर्यंत जवळजवळ १२५ सिध्दांची नोंद मिळते. त्याचप्रमाणे वर्णरत्नाकर, महार्णवतंत्र, हठयोगप्रदीपिका, ज्ञानेश्वर चरित्र, गोरक्षसिध्दांत संग्रह, योगीसंप्रदायाविष्कृति, सुधाकर चंद्रिका या सर्व आधार ग्रंथामधून नामावली एकत्र केल्यास ती संख्या १३७ होते.[१५] (संदर्भ- सि.सि.पध्दती, पृष्ठ ४१)

वर उल्लेख केलेल्या पंथ- उपपंथांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे.

**अ) शिवोपदिष्ट योगमार्ग :** नाथपंथाचा मार्ग हा योगमार्ग आहे. इ.स. २०० च्या दरम्यान महामुनी पतंजलीनी योगाचे प्रमाणित शास्त्र निर्माण केले. ऋग्वेदात दिर्घतमा ऋषींच्या सूत्रांमधेही प्राणसंयमन व नाडयांचा उल्लेख आहे. गौतम बुध्दांचा योगही 'गुह्यसमाज' या बौध्दग्रंथातून ग्रंथित झालेला आहे.

कोणत्याही पदार्थाचे अविच्छिन्न ध्यान म्हणजे अनुस्मृती. अनुस्मृतीच्या नित्य अभ्यासाने प्रतिभास साधतो. नंतर प्रज्ञा व उपाय यांच्या संयोगातून एकपिंडरूप अवस्थेची अनुभूती येते. हेच ते पिंडी ते ब्रम्हांडी तत्व होय.

अशा प्रकारच्या योगधारणांचा विकास होत होत त्याचे मंत्रयोग, हठयोग, लययोग व राजयोग असे प्रमुख ४ प्रकार झाले.

**ब) अवधूतमार्ग :** अवधूत मार्ग हा वरील सर्व मार्गांचा समन्वय साधणारा आहे. याचे कारण नाथपंथी योगी हे अवधूतच समजले जातात. ते जात-पात-गोत आदी बंधने न पाळता अजगर वृत्तीने राहतात. त्यांच्यामध्ये ब्रम्हावधूत-शैवावधूत-वीरावधूत- कुलावधूत असे प्रकार केले गेले आहेत. प्रभू श्री दत्तात्रेयांनी श्री गोरक्षनाथांना केलेला उपदेश अवधूत गीतेमध्ये आहे. तेथे मनाच्या वृत्तीला महत्व देण्यात आलेले आहे.

**क) भागवत धर्म :**

विष्णू उपासनेवर आधारित नाथसंप्रदायातून दीक्षा घेतलेल्या श्री ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रातील भागवतधर्माचे नव्याने प्रवर्तन केले. या भागवत धर्माचा प्रसार मराठी संतांनी १३ व्या शतकापासून केला. निवृतीनाथ हे गुरू व ज्ञानेश्वर हे त्यांचे शिष्य. यांचा शिवतत्वाशी व विष्णूतत्वाशी जो संबंध सांगितला जातो त्याबाबत खालील ओव्या महत्त्वपूर्ण ठरतात.

महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर। - जनाबाई
विष्णुचा अवतार। माझा सखा ज्ञानेश्वर। - सेना न्हावी
सदाशिवाचा अवतार। स्वामी निवृत्ती दातार। - जनाबाई
आमचा आचार आमचा विचार। सर्व हरिहर एक पुरे। - निवृत्तीनाथ[१६]

(संदर्भ : नाथसंप्रदाय - उदय व विस्तार, पृष्ठ ७६, ७७)

लोकांना सुलभपणे आत्मप्राप्ती व्हावी म्हणून भगवंतांनी जे उपाय सांगितले ते म्हणजे भागवत धर्म. शाक्त व तांत्रिक यांच्या विपरीत कर्मकांडामुळे क्षीण झालेला हा प्राचीन विष्णुभक्तीचा मार्ग मध्ययुगीन काळात वर उल्लेखलेल्या वैष्णव धर्माच्या अनेक सिध्दांनी व उपासकांनी केलेला प्रयत्न व समर्पणामुळे पुन्हः कात टाकल्याप्रमाणे पुनरूज्जीवित होऊन सर्व प्रकारचे लोक यात येऊ शकतात असा आग्रह धरून वैष्णवधर्माच्या किल्ल्याची दारे उघडी केली. यज्ञामधील पशुहत्या बंद केली. नवविधा भक्तीच्या सर्व अंगातून भक्तीचे महत्व वाढवले. श्री ज्ञानेश्वरांनी गहिनीनाथ-निवृत्तीनाथ परंपरेतून म्हणजे नाथदीक्षित होऊन महाराष्ट्रामध्ये भागवत धर्माचे असे नवप्रवर्तन केले की त्यामुळे नाथ-परंपरेचा अजर-अमर प्रवाह अखंडपणे वहात राहिला आहे. हा प्रवाह शिव व विष्णू असा आहे. म्हणून निवृत्तीनाथ म्हणतात.

आमचा आचार आमचा विचार। सर्व हरिहर एक पुरे।
शिव विष्णू दोघे एकचि अवतार। वेदानी निर्धार हाच केला।। - नामदेव

**अर्थ -** सर्व जग हरिहररूप आहे असा आमचा आचार व विचार असतो. शिव व विष्णू एकच आहेत ही वेदाचीच घोषणा आहे.

श्री निवृत्तीनाथांना गहिनीनाथांचा उपदेश झालेनंतर ते म्हणतात,

निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्णनामे।।

**अर्थ -** निवृत्तींनी शिवउपासना पावन अशा कृष्णनामात प्रवर्तित केली. हीच परंपरा एकनाथांनी व तुकाराम महाराजांनी चालू ठेवली.

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ। - तुकाराम

**अर्थ -** सर्व जग हे विष्णूमय असल्याने त्यात भेदाभेदाच्या अपवित्र भ्रमास जागा नाही.

**ड) महानुभाव पंथ :**

चक्रधरस्वामी हे या पंथाचे संस्थापक होत. हा पंथ सगुण ईश्वर अवतारांची तसेच कृष्णाची उपासना करतो. कडक वैराग्य पाळले जाते. देश, जात, कुळ, धर्म, वर्ण, आश्रम या सर्वांचा त्याग करून पूर्णपणे परमेश्वराधीन होऊन राहणे आवश्यक असते. चक्रधरोक्त मार्गांनी वागावे, भिक्षान्न सेवन करून वृक्षतळी निवास करावा, शृगांर व स्त्री यांचा त्याग करण्यावर भर असतो. चातुर्वण्यावर विश्वास ठेवत नाहीत. स्त्री व शुद्रांनाही मोक्षाधिकार देणारा हा पंथ वारकरी व नाथ संप्रदायास जवळचा आहे. चक्रधर म्हणत,

नाथवाणी ते निकी। नाथवाणी सीधवाणी।

**अर्थ -** नाथांचे शब्द हे सिध्द शब्द असतात व ते सत्य स्वरूपच असतात. यावरुन नाथसंप्रदायाचा प्रभाव किती होता ते कळून येते.

चक्रधर स्वामींचा काळ हा ज्ञानेश्वरांच्या आधीचा आहे.

**इ) शैवागम पंथ :**

काश्मिरातील हा पंथ नाथपंथाचाच विभाग म्हटला तरी चालेल. या पंथाचा काळ ९ व्या शतकाचा मानला जातो व हा पंथ वसुगुप्ताने प्रवर्तित केलेला असून त्यांचे 'शैवदर्शन', 'प्रत्यभिज्ञादर्शन', 'स्पंदशास्त्र', 'शांभवी व्दैतशास्त्र' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

श्री गोरक्षनाथ शैवागमी सिध्द होते असे मत श्री. खुपरेकर शास्त्री यांनी मांडले आहे. शैवागम पंथात ज्ञान व भक्ती यांचा मिलाफ असून भक्ती हेच साध्य मानून त्याला स्वतंत्र असे पुरूषार्थाचे मूल्य दिले गेले आहे. या पंथात समर्पणात्मक भक्तीची जिथे जिथे मांडणी आहे त्याला रामानुजांच्या शब्दात 'प्रपत्ति' म्हटले जाते. या पंथात "अंतिम तत्वाचे ज्ञान गुरू उपदेशाशिवाय होत नाही" हा सिध्दांत आहे. यांचा अद्वैतवाद सामरस्यावर आधारित आहे. शिव हा त्याच्या समस्त शक्तीसह जगात व्यवहार करतो. त्यामध्ये सगुण-निर्गुण असा भेद नाही.[१७] (संदर्भ : नाथसंप्रदाय उदय व विस्तार, पृष्ठ ८०)

**ई) पाशुपतसंप्रदाय :**

शाक्त व तांत्रिक, कापालिक, अघोरपंथी, कौलमार्गी वीरशैव लिंगायत (१२ वे शतक) यांचाही परामर्ष या अभ्यासात येतो.

बसवाण्णांनी १२ व्या शतकात महाराष्ट्र व कर्नाटक प्रांती लिंगायत धर्माचा प्रसार केला. बसवेश्वरांना थोर अधिकारी अल्लमप्रभू यांचे सहाय्य झाले. बसवेश्वरांचा भक्तिमार्ग हा 'षट्स्थलसिध्दांत' म्हणून प्रसिध्द आहे. अल्लमप्रभूंचे वाङ्मय हे तटस्थता व आदर्शवाद याचे उत्तम उदाहरण असून त्यांचे वाङ्मय वाचताना शेक्सपियरच्या सॉनेट्सची व लॉर्ड टेनिसनच्या 'इन मेमोरियम'ची आठवण होते व त्यातून पुरोगामित्व दिसून येते. शिवयोगाच्या साधनेतून सर्व शिवशरण भक्तांना लिंगांक सामरस्याचा म्हणजेच वैष्विक चैतन्य व व्यक्तिचैतन्याच्या एकरूपतेचा अनुभव येतो. इथे लिंग म्हणजे विश्वातले चैतन्य व अंग म्हणजे व्यक्तितले चैतन्य. याची एकरूपता म्हणजेच सामरस्य होय.[१८] (संदर्भ : शिवयोग और प्रार्थना योग, पृष्ठ ३३)

**उ) बौध्दधर्म :**

नाथपंथाच्या उगमाचा संबंध बौध्द धर्माच्या उन्नतीतून निर्माण झालेल्या सामाजिक परिस्थितीशी जोडला जातो. बौध्द धर्माच्या करूणा, अहिंसा, त्याग, सदाचार अशा सहजसुलभ तत्वांमुळे त्यांचा विकास झपाट्याने झाला. अनेक राजांचा राजाश्रय बौद्ध धर्माच्या प्रसारास कारणीभूत ठरला. परिणामत: भारताप्रमाणे चीन, जपान, सिलोन, जावा, सुमात्रा, बाली, ब्रम्हदेश अशा देशांमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला. सम्राट अशोकापासून राजे महाराजे, पंडित, ब्राम्हण, मुमुक्षू, साधक अशा सर्वांचा या धर्मात प्रवेश होत गेला.

मात्र ८ व्या शतकातील आद्य शंकराचार्यांच्या चळवळीमुळे वैदिक धर्मास चालना मिळाली. बौध्द धर्मात पूर्वीचे आकर्षण राहिले नाही. माणसाच्या मनाची, आधाराची भूक बौध्द धर्म भागवू शकला नाही. या पार्श्वभूमीवर शैव व वैष्णव धर्मातील भक्तीमार्ग व त्यातून आधारांची मिळणारी शाश्वती यामुळे अनेक लोक वैष्णव धर्माकडे ओढले गेले. बौद्धधर्मात हीनयान व महायान असे दोन पंथ इ.स. पूर्वीच निर्माण झाले होते. त्यातून आणखी काही उपपंथ निर्माण झाल्याची इतिहासात नोंद केली गेली आहे. 'मंत्रयान' आणि 'वज्रयान' हे दोन उपपंथ महायान पंथातून उदयास आले. मंत्रयान मध्ये बुद्धांची वचने संक्षिप्त करून त्यातून मंत्र तयार करण्यात आले. त्यातून सिध्दी प्राप्त होतात असे मानले गेले. 'मंजुश्रीकल्प' हा ग्रंथ त्यातूनच तयार झाला. वज्रयान हे मंत्रयानाहून वेगळे आहे. 'वज्र' म्हणजे शस्त्र नव्हे. वज्र याचा अर्थ शून्यतेचे प्रतिक असणारी स्त्री असा घेतला आहे. तिचा उपासक हा विधिनिषेधाच्या पलीकडे जाणारा असतो. मैथुनास महत्व दिले जाते. यामध्ये सर्व तऱ्हेच्या

अमंगल साधनांची व तंत्र मंत्राची रेलचेल झाली. विकारांचेच भरण पोषण करणाऱ्या या पंथाची सन ८०० ते १२०० या काळात मोठी भरभराट झाली. श्री शैलपर्वत हे या पंथाचे प्रमुख ठिकाण होते. यातूनच सहजयानी पंथाची निर्मिती झाली.[१९] (संदर्भ : नाथसंप्रदाय उदय व विस्तार, पान ८८,८९,९०)

**ऊ) सूफी पंथ :**

या उपरिनिर्दिष्ट धर्मसाधनेमध्ये सूफी संतांची प्रेमसाधना महत्वाची ठरली आहे. राबिया, उमरखैयाम, अल जुन्नेद, अबु हाशिम, जलालउद्दीन रूमी, अलहल्लाज, अबू सुलेमान, अजमेरचे मोइनुद्दीन चिश्ती म्हणजेच गरीब नवाज, अहमद-अल- गझली, शेख फरीउद्दीन, शेख सलीम, नागपूरचे ताजुद्दीन, कुतुबुद्दीन बख्तियार, या सर्व सूफी संतांचा व त्यांच्या शिकवणूकीचा प्रभाव कबीर, दादू, दरिया इत्यादी कवींच्या काव्यावर पडलेला दिसून येतो.[२०] (संदर्भ : नाथ संप्रदाय उदय व विस्तार, पृष्ठ ९२)

महाराष्ट्रामध्ये कल्याणचे हाजिमलंग, नागपूरचे ताजुद्दीन बाबा, गुलबर्ऱ्याचा दर्गा, शिर्डीचे साईबाबा अशा संतांनी भक्ती, श्रध्दा, प्रेम, त्याग यांची शिकवण देत असतानाच आपल्या सिद्धींचा उपयोग लोकांची दु:खे, अडचणी दूर करुन समाजस्वास्थ व बंधुभावाची वृद्धी करण्यासाठी केला. अशा प्रकारे नाथसंप्रदायाच्या कालखंडात ज्या इतर अनेक धर्मसाधना होत्या त्यांचा मागोवा आपण घेतला.

त्याकाळातील विविध धर्मप्रवाह व धर्माच्या व्यक्ती यांच्या दरम्यान सामाजिक अभिसरण होत असे. विविध संप्रदायात लोक सहभागी होत राहिले. तत्वज्ञान, व्यक्तिप्रतिष्ठा, श्रध्दा, नैतिक व बौध्दिक बळ यामधून त्या त्या संप्रदायांच्या व्यक्तींचे व्यक्तीमत्त्वही घडत गेले. पण त्याचवेळी काही अपप्रवृत्तीचीही निर्मिती होत गेली.

सूफी संत परंपरेतील काही महत्वाच्या संतांविषयी थोडी अधिक व विशेष स्वरूपाची माहिती सांगणे जरूर वाटते म्हणून ती खाली नोंदविली आहे.

सूफी संत जलालुद्दीन यांचे 'मसनवी' म्हणून काव्य आहे. रुमीच्या एका काव्याचा नमुना पाहिला तरी त्यातील भक्ती, समर्पणभाव व त्या विश्वचैतन्यशक्तीशी झालेली बालसदृष समरसता यांचे अनोखे दर्शन होते. श्री गोरक्षतत्वज्ञानात यास एकच शब्द यथार्थपणे वापरला आहे आणि तो म्हणजे 'अवधूतवृत्ती'. या अवधूताची श्री गोरक्षनाथांनी खालीलप्रमाणे व्याख्या केलेली आहे.

य: सर्वान् प्रकृतिविकारान् अवधुनोतीत्यवधूत:।[२१] (संदर्भ सि.सि.पध्दति, पृष्ठ ८३)

याच अवधूतवृत्तीचा प्रभाव सूफी संतांवरही पडला. हे सर्व संत ईश्वराधीन वृत्तीने जीवन जगत असत. जलालुद्दीन रुमी यांचे 'मसनवी' हे काव्य खालीलप्रमाणे आहे.

If He makes me a cup, a cup am I.
If He makes me dagger, a dagger I.
If He makes me  Fire, gave forth Heat.
If He makes me a friend, serve my friends.
I am as the pen in the fingers of the writer.
I am not in a position to obey or not at will.[२२]

(संदर्भ : Paths of Meditation, P. 193)

याचा सरळ अर्थ असा होतो की, श्री. गोरक्षनाथांची पिंडी ते ब्रह्मांडी व ब्रह्मांडी ते पिंडी ही भूमिका जलालुद्दीन रूमी यांनी स्वत: अनुभवली होती. "A pool of standing water becomes dirty when dirt is thrown in. It takes the colour of the dirt. However when it is joined with a perennially flowing stream it becomes purified sooner or later. Similarly if an individual is able to get in contact with Universal self the individual's pettiness and dross have no effect".[२३] (संदर्भ : Paths of Meditation, P. 194) अल जुन्नेद यांनी असे म्हटले आहे की, God should cause thee to die from thyself and live in Him. याचा अर्थ स्वत:चा त्याग करावयाचा व ईश्वरात विलीन होऊन रहायचे. त्याचाच समकालीन अल हल्लाजने घोषणाच केली की 'अनल् हक', मीच सत्य आहे. हे सत्य हुकुमशाहीला पटले नाही आणि म्हणून अल हल्लाज यांना फाशी देण्यात आले. नंतरच्या सूफी संतांनी आपल्या भूमिकेत बदल घडवून आणला. त्यांनी प्रेमाला महत्त्व दिले. परंपरागत विचार आणि ईश्‍वरावरील प्रेम यांचा मेळ घालून मध्यमार्गी जीवन जगण्याचा प्रयत्न अल हल्लाज नंजरच्या सर्व सूफी संतांनी केलेला दिसून येतो. सूफी संप्रदायाने 'परिपूर्ण दृष्टीला' महत्त्व दिले. त्यासाठी 'मूरक्विबा-इ-निजामी' असा शब्दप्रयोग केला गेला. त्याचा अर्थ 'अनेकत्वात एकतेचा अनुभव घेणे असा होतो.' सूफी संप्रदायाचा हा विचार 'एकम् सद्विप्रा बहुदा वदंति' या उपनिषदाचे विचाराशी मिळताजुळता आहे. श्री. गोरक्षनाथांचा सिद्धांत हेच प्रतिपादन करतो. त्यांचे सूत्र असे-

ब्रम्हांडवर्ती यतकिंचित् तत् पिंडेप्यस्ति सर्वथा।
इति निश्चय एवात्र पिंडसंविन्तिर्उच्यते।।        -सि.सि.संग्रह/उपदेश३/२

**अर्थ -** ब्रह्मांडामध्ये जे असते तेच परिपूर्ण रितीने पिंडात असते. असा अनुभव आल्यानंतर त्याला पिंडसंविन्ति म्हणतात. त्याचप्रमाणे गरीबनवाज म्हणजे अजमेर शरीफ हे संत व नागपूरचे ताजुद्दिन बाबा यांची चरित्रे व त्यांचा व्यापक असा सर्व समावेषक कार्यविस्तार हा प्रेमाच्या परस्पर आदान-प्रदानावरच अवलंबून असलेला दिसून येतो.

श्री. ताजुद्दीन बाबांचा कार्यकाळ इ.स. १८६१ ते इ. स. १९८५ असा होता. व त्यांचे क्षेत्र नागपूर होते. हिंदू व मुस्लीम धर्मातील गूढवाद अथवा साक्षात्कारवादाच्या

इतिहासात ताजुद्दीन बाबांचे स्थान खरोखरच अपूर्व आहे. सर्वजण त्यांच्या प्रेमात पडले होते. त्यांच्या अलौकिक आश्चर्यकारक सिध्दीसामर्थ्यामुळे लोकांच्या अपार आदरास ते प्राप्त झाले होते. मानवी जीवनातील दु:खे दूर करीत असतानाच ईश्वरी कृपेचा अनुभव देत जवळ येणाऱ्या प्रत्येकाला जीवन कसे जगावे व स्वत:ला कसे सांभाळावे हा लोकशिक्षणाचा वसा त्यांनी सतत सांभाळलेला दिसून येतो. त्यांच्या जीवनाविषयी जी संक्षिप्त माहिती प्राप्त झाली ती खाली देत आहे.

हजरत इमाम असकारी (अरब वंश) - सइद अबदुल्ला मद्रासमधे रहात होते. त्यांचा नातू सइद बद्रुद्दीन हे आर्मीत सुभेदार होते. ते कामटी (नागपूर) येथे रहात असत. त्यांचा मुलगा ताजुद्दीन यांचा जन्म इ.स. २७ जानेवारी १८६१ मध्ये झालेला होता. त्यांचे वय वर्षे १ असतानाच वडील वारले व वय वर्षे ९ असताना आईचे निधन झाले. नंतर आजीने त्यांचा सांभाळ केला. ६ व्या वर्षी त्यांना शाळेत पाठविण्यात आले. त्यांनी वय वर्ष १८ पर्यत अरेबिक, पर्शियन व इंग्लीश शिक्षण घेतले. शाळेत असताना त्याभागातील प्रसिध्द मुसलमान संत हजरत अबदुल्ला शाह यांनी (कामटी रेल्वे स्टेशनजवळ दर्गा आहे.) शाळेत येऊन त्यांना दीक्षा दिली. त्यावेळचे त्यांचे उद्‌गार - "कम खावो कम बोलो और कम सोओ और कुराण शरीफ को ऐसे पढो की तुम खुद मुहम्मद हो और तुमपर नजूल हो रहा है।।" या त्यांच्या म्हणण्याचा त्या छोट्या मुलावर खोलवर प्रभाव पडला व त्यांच्या जीवनातील नवा अध्याय सुरू झाला. नंतर हजरत दाऊद शहा चिस्तीचे सहवासात राहून सतत समाधीच्या अनुभवात ४ वर्षे घालविली. त्यानंतर संपूर्ण आयुष्य ईश्वराच्या (अल्लाच्या) - शक्तीचा अनुभव लोकांना देतदेत सहवासात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे दु:ख दूर करुन त्यांच्या जीवनात श्रध्दा निर्माण करण्याचा विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. जात, पात, धर्म यांचे पलिकडे खरा धर्म असतो याचे चालतेबोलते उदाहरण म्हणजेच ताजुद्दीन बाबांचे आयुष्य होय. समर्पित जीवन, ईश्वरी सत्तेचा अनुभव, प्रेम प्रक्षेपण, श्रध्देची निर्मिती, नैतिक शिकवण, मानवी मूल्यांचे रक्षण एका आदर्श साक्षात्कारी जीवनाचे उदाहरण म्हणून आपल्यापुढे येते. त्यांची काही वचने खाली उद्‌धृत केलेली आहेत.

'मागा आणि तुम्हास ते मिळेल'

'स्थिर रहा - भिऊ नका'

'मी तुमच्या बरोबर आहे'

'जसा देश तसा वेश'

'मला तुमच्यापासून कोण दूर नेऊ शकेल?'

ही वचने किती आश्वासक आहेत हे वेगळे सांगायला नको.

अजमेर ख्वाजा मोइनुद्दीन चिस्ती यांचे कार्यही तितकेच उल्लेखनीय ठरावे असे आहे. त्यांचा जन्म पर्शिया येथे ५३६ हिजरी (स.) मधे एका उच्च कुळात झाला. ते वयाच्या १६ वर्षाचे असतानाच माता-पित्यांचे छत्र हरपले. घरचा व्यवसाय ते सांभाळत होते. एक दिवस एक फकीर तिथे आला असता ख्वाजासाहेबांनी त्यांना द्राक्षे दिली. खुश होऊन त्या फकीराने आपल्या पोतडीतून काही तरी काढून ते चघळून ख्वाजांना खायला दिले. त्यानंतर त्याचा काय परिणाम झाला हे कळले नाही. मात्र त्याचक्षणी त्यांना ज्ञानप्राप्ती होऊन प्रकाशाचा अनुभव आला. त्यांनी आपली सर्व मालमत्ता विकून आलेले पैसे गरिबांना वाटून टाकले. तिथून ते समरकंद व बसऱ्यास धार्मिक शिक्षणासाठी गेले. नंतरच्या काळात गुरुच्या शोधात फिरत असताना त्यांची गाठ ख्वाजा उस्मान हरुनी या श्रेष्ठ आध्यात्मिक व ज्ञानी व्यक्तीशी पडली व त्यांना ते पूर्ण शरण गेले व २० वर्षे त्यांची सेवा केली. त्यांचेकडून त्यांना पूर्ण ज्ञान व अनुभव प्राप्त झाला. हाज यात्रा करुन मक्का-मदीना येथे ते थांबले व प्रत्यक्ष मुहम्मदांचा आदेश त्यांना मिळाला. त्या आदेशानुसार ते बसरा-लाहोर-दिल्ली येथे ते काही काळ राहिले व तेथून त्यांनी राजस्थानला येण्याचे निश्चित केले. येताना हजारो लोकांना ज्ञान व प्रेमाची शिकवण देत वयाच्या ५२ व्या वर्षी अजमेरला आले व वयाच्या ९७ वर्षापर्यंत लोकांची सेवा करत धर्मज्ञान देत सर्व धर्माच्या लोकांना आपलेसे करीत आपली जीवनयात्रा संपवली. अजमेरचा दर्गा एका वेगळया अर्थाने सर्व धर्माच्या लोकांना माणुसकीचा, नीतीचा व प्रेमाचा संदेश देत आहे असा लोकांचा आजही विश्वास आहे.[२४] (संदर्भ : “Internet imformation the holy biography of Hajarat Baba Tajuddin Aulia and Kowjha Moinnuddin Chisti")

**ए) तिबेटी सहजयानी किंवा वज्रयानी परंपरा :**

शांतिरक्षित हे सिद्धाचार्य होते. ते बौद्धधर्माचा प्रचार करत असत. त्यांचे प्रथम शिष्य हरिभद्र हे होते. त्यांचेपासून एक सलग शिष्यपरंपरा आढळून येते. सरहपाद, शबर, लुइपा, घंटापा, जालंदर, मत्स्येंद्रनाथ, कानिफनाथ, गोरक्षनाथ, चौरंगीनाथ अशी ती परंपरा दाखवून देता येते. हा संपूर्ण कालखंड ८वे शतक ते ११ वे शतक असा मानला जातो.[२५] (संदर्भ : नाथसंप्रदाय उदय विस्तार, पृष्ठ १००, १०१)

**१) उगमस्थान :**

या परंपरेचे उगमस्थान कोणते? याबद्दल विद्वानामध्ये मतभिन्नता असल्याचे दिसून येते. काहींच्या मते त्यांचे उगमस्थान उत्तर भारतात असावे तर काहींच्या मते दक्षिण भारतात असावे. नेपाळ, पंजाब, उत्तरप्रदेश, आसाम यापैकी कोणतेतरी असावे असे मत खालील विद्वानांचे आहे. डॉ.मोहनसिंग, प्रो.ब्रिग्ज, डॉ.हजारीप्रसाद द्विवेदी, डॉ. कल्याणी मलिक, प्रा. सोनोपंत दांडेकर, प्रा. पेंडसे व मोकाशी.[२६] (संदर्भ : नाथसंप्रदाय उदय व विस्तार, पृष्ठ १४)

याउलट दक्षिण भारतातील अहमदनगर हे सहजयानि परंपरेचे उगमस्थान असावे असे मतर सरदार मिरीकर यांनी मांडले आहे. यासंदर्भात नेमका पुरावा मिळत नाही असे मत डॉ. भिंगारकर यांनी त्यांचे नाथसंप्रदाय व ज्ञानेश्वर या ग्रंथात मांडलेले आहे. यासंदर्भात एक वेगळे मतही मांडले गेलेले आहे. ते म्हणजे, वामाचारांतर्गत गैर व विकृत उपसानांच्या उच्चाटणासाठीच जर नाथसंप्रदायाचा उदय झाला असेल तर अशा विकृत साममार्गाचे मुख्य ठिकाण कुठे होते? आंध्र प्रदेशातील शैलपर्वत हेच ते ठिकाण होय. तेथे योगिनींचे तांडे असत व स्त्रीप्रधान साधनांचा व तद्अंतर्गत प्रक्रियांचा उदोउदो झाला केला जात असे. कदलीबन हे आसाममध्ये आहे असे मानले जाते. तर मग कदलीबन म्हणजे शैलपर्वत असे असेल तर? ज्ञानेश्वरांच्या आधीचे चक्रधरस्वामी, वीरशैव मताचे अल्लमप्रभू, रेवणसिध्द व महादेवी आक्का यांनी शैलपर्वतावर समाध्या घेतल्याचा उल्लेख लिंगायत धर्म ग्रंथामध्ये आढळतो. अक्कमहादेवीचे मंदीरही शैलपर्वतावर आहे. ते प्रत्यक्ष पाहण्यात आले. याचा पुरावा म्हणून गुरुचरित्रामध्ये नरसिंहसरस्वती यांनी शेवटी शैलपर्वताजवळच्या कर्दळीबनात प्रवेश करुन समाधी घेतल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे 'श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत' ग्रंथातील उद्बोधानुसार 'भगवान दत्तात्रेय' हे जगदोध्दारासाठी इ.स. १३२० मध्ये आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात पीठापूर क्षेत्रामध्ये अपलराजू व सुमती यांच्या पोटी श्रीपाद श्रीवल्लभ नावाने प्रकट झाले. त्यानंतर कारंजा क्षेत्री श्री नरसिंह सरस्वती या नावाने दुसरा अवतार घेतला. श्री श्रीपाद श्रीवल्लभ यांचे परमभक्त श्री. शंकरभट यांच्याकडून त्याच काळात वरील ग्रंथाची रचना झालेली असून त्या ग्रंथाच्या मराठी अनुवादात श्रीपादश्रीवल्लभ म्हणताहेत की, ''श्री नरसिंह सरस्वती अवतार काळात श्री शैलजवळील कदलीवनात गुप्तपणे ३०० वर्षे समाधीत राहीन.''[२७] (संदर्भ : श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत, पृष्ठ २२)

अशारितीने सहजयानी परंपरेचा हा विषय वेगवेगळ्या अंगानी मांडला गेला आहे.

**१०) नाथसंप्रदायाच्या प्रसारामागची कारणमीमांसा :**

नाथसंप्रदायाचा प्रभाव व प्रसार भारत व भारताबाहेरही झाला त्याची कारणमीमांसा थोडक्यात केलेली आहे. ती खालीलप्रमाणे.

१) श्री गोरक्षनाथांचे (अन्य प्रमुख नाथांचे) उज्वल चारित्र्य.

२) कुशाग्र बुध्दी

३) पाखंड विरोध व निरर्थक रुढींना विरोध

४) मद्य-मांसादिकांचा पूर्ण त्याग.

५) सर्वमानव परमेश्वरी अंश या भूमिकेतून धार्मिक संघर्ष टाळण्याचा प्रयत्न.

६) संस्कृतचे ज्ञान असूनही सोपे संस्कृत व लोकभाषेचा वापर. हिंदीचा सर्वदूर वापर केला. या दृष्टीने श्री.गोरक्षनाथ हे हिंदीचे पहिले प्रचारक ठरतात.

७) वर्णाश्रमाला बाजूला ठेवून पददलितांसकट सर्वांना, शूद्र स्त्रियांना पण त्यांनी सामावून घेतले.

८) बाह्य अवडंबर विरोध व साधनेच्या प्रदर्शनास बंदी.

९) पुस्तकी पांडित्याचा उपहास.

१०) अनुभव प्रामाण्य

११) अनुभव निष्ठ तत्वज्ञान.

वरील प्रत्येक मुद्यांचे संदर्भासह विवेचन खाली दिले आहे.

**अ) उज्वल चारित्र्याबद्दल -**

ग्यान सरीषा गुरु न मिलिया चित्त सरिषा चेला।
मन सरीषा मेलु न मिलिया तीथैं गोरष फिरै अकेला।। - गोरखवाणी/१९०

**अर्थ:** ज्ञानासारखा गुरु मिळत नाही. चित्तासारखा शिष्य मिळत नाही. मनासारखा मित्र मिळत नाही. म्हणून श्री गोरक्षनाथ आपल्या ज्ञान, चित्त व मनाला बरोबर घेऊन एकटेच भ्रमण करतात. याचा विस्तारित अर्थ असा की, त्यांनी समाजकार्य केले पण 'कमलवत' अलिप्त राहून.

श्री ज्ञानेश्वरांनी गोरक्षनाथांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

तेणे योगाब्जीनि सरोवरु। विषय विध्वंसैक वीरु।
तिये पदी का सर्वेश्वरु। अभिषेकिले।। - ज्ञा. अ. १८/१७५५

**अर्थ :** त्या सर्वेश्वर मत्स्येंद्रनाथांनी श्री गोरक्षनाथांना कमळाचे सरोवर म्हटले आहे. विषयवासनांचा नाश करणारा एकमेव वीर म्हणून श्री गोरक्षनाथांना समाधिपदाचा अभिषेक केला.

त्याचप्रमाणे बंगाली साहित्यातील कथेनुसार पार्वतीने अतिसुंदर रुप घेऊन प्रमुख ४ सिध्दांची परीक्षा घेतली. ते चार सिद्ध म्हणजे हाडिपा, कानिफा, गोरक्षनाथ व मीननाथ हे होत. ह्या परिक्षेत फक्त गोरक्षनाथच उत्तीर्ण झाले. अशी अतिसुंदर स्त्री मला मातेसमान आहे व तिच्या दुग्धपानातच मी समाधान मानेन असे उद्‌गार त्यांनी काढले.[२८] (संदर्भ: सिध्दसिध्दांत पध्दती, संक्षिप्त परिचय पृष्ठ ५०)

त्याचप्रमाणे गोरखवाणीमधील खालील सूत्रे श्री गोरक्षनाथांचे उज्वल चारित्र्य स्पष्ट करणारी आहेत.

सुत्रे : १०२, १३२, १४२, १४५, २०१, २४०, २४३, २४४, २५१, २६४, २६५, २६७, २६८, २६९.

उदाहरणादाखल एक सूत्र खाली देत आहे.

साइ सहली सुत भरतार सबद सिसटि कौ एकौ द्वार।

पैसता पुरसि निकसता पूता ता कारणि गोरष अवधूता।। - गो.वाणी/२४३.

**अर्थ :** स्वामी, मित्र, पुत्र, पति या सर्वांचे एकच द्वार आहे व ते म्हणजे स्त्री. म्हणून तिथून जन्माला येणारा प्रत्येकजण कर्मविपाक भोगत असतो. म्हणून श्री. गोरक्षनाथांनी वैराग्य सांभाळले आहे.

'नवनाथ भक्तिसार' या प्रसिध्द ग्रंथामध्ये अध्याय २१ मध्ये स्त्री राज्यात त्यांना मोहात पाडण्याचा खूप प्रयत्न झाला, पण ते अविचल राहिले.

म्या कांता दोन गुरुकृपेनी। वरल्या आहेत जननी ये। - न.भक्तिसार २१/८८

वरल्या आहेत तरी चांग। नित्य करितो करुन भोग।

म्हणशील कवण नामी सांग। तरी कर्णमुद्रा म्हणती त्या। - न.भक्तिसार २१/८९

तया कांतालागी सोडून। अन्य कांता न वरी व्यभिचारिण।

हे योग्य नव्हे मजकारण। गुरुभक्ती जननी ये।।[२९] - न.भक्तिसार २१/९०

(संदर्भ : नवनाथ भक्तिसार)

त्याचप्रमाणे 'गोरखज्ञान' मध्येही चारित्र्य श्रेष्ठता व्यक्त करणारी सूत्रे दिलेली आहेत. १०, १४, १५, २१, ३२

**ब) कुशाग्र बुद्धीबद्दल -**

वरील सर्व सूत्रातून श्री गोरक्षनाथांची बौध्दिक परिपक्व पातळी पण स्पष्ट होते.

**क) पाखंडास व निरर्थक रूढींना विरोध -**

पाखंडास विरोध करणारे सूत्र :

सांग का पूरा ग्यान का ऊरा पेट का तूरा डिंभ का सूरा।

बदंत गोरखनाथ न पाया जोग करि पाषंड रिझाया लोग।। -गोरखवाणी/१९१

**अर्थ :** अपुरे ज्ञान असूनही ज्ञानाचे ढोंग करतात, मोठ्या पोटाचे खादाड व गर्व करण्यात तरबेज अशांना योगप्राप्ती होत नाही. लोकांना ढोंग करुन खुश करत बसतात परंतू स्वत: मात्र फसतात.

**ड) मद्य मांसाचा पूर्ण त्याग -**

आहार, विहार, व्यसन याबाबतीत गोरक्षनाथ स्पष्ट होते.

जोगी होई पर निंद्या झषै मदमास अरुभांगी जो भषै।

इकोतर सै पुरिषा नरकहि जाई सतिसति भाषत श्री गोरषराई।। -गोरखवाणी/१६५

**अर्थ :** जोगी म्हणजे सन्यासी होऊनही जो परनिंदेत रमतो, दारु मांस, भांग आदीचे सेवन करतो त्याच्या ७१०० पिढया नरकात जातात. हे सत्य वचन गोरखनाथ सांगत आहेत. अशा अर्थाची गोरखवाणी सूत्र २२७ व २२८ आहेत. सूत्र २२९ महत्वाचे वाटते ते असे :

कथंत गोरष मुकति लै मानवा मारी लै रै मन द्रोही।

जाकै बप बरण मास नही लोही।। - गोरखवाणी/२२९

**अर्थ :** श्री गोरक्षनाथ म्हणताहेत की हे मानवा ! मुक्तीसाठी प्रथम द्रोही मनाला मारा की ज्याला शरीर, मांस, रक्त, रंग असे काहीही नाही.

अशीच पथ्ये सांगणारी सूत्रे - १६३, १६४, १६६, २०९, २१४

**इ) सर्व मानव परमेश्वराचे अंश -**

जीवता जोगी अमीरस पीवता अहनिस अषंडित धारं।

दिष्टिमधे अदिष्टि विचारिबा ऐसा अगम अपार।। - गोरखवाणी/१९३

**अर्थ :** जीवनमुक्त योगी दिवसरात्र अमृत धारेचे प्राशन करत असतो. सर्व दृष्य पदार्थात, मानवात अदृष्य परमात्म्याचे दर्शन करायला पाहिजे. अशा प्रकारे अगम-अपार योगाची प्राप्ती होते.

**ई) लोकभाषेसंबंधी -**

श्री गोरक्षनाथांचे वाङ्‌मय हेच त्याचे उदाहरण आहे.

**उ) वर्णाश्रम व्यवस्थेला दूर ठेवले -**

पददलितांसकट सर्वांना सामावून घेतले. पदभ्रष्ट, शूद्र स्त्रियांना नाथ प्रवाहात घेतले. श्री गोरक्षनाथांच्या प्रमुख शिष्या विमलादेवी, मयनामति, मुक्ताई वगैरे होत्या.

गोरक्षोपनिषद् विमलादेवीला सांगितले गेले आहे. तिथेच 'आईपंथ' ही शाखा प्रवर्तित केली गेली. शुद्रादिशुद्रांच्या अगतिकतेचे ज्ञान श्री गोरक्षनाथांना होते, म्हणून त्यांचाही सहानभूतीपूर्वक विचार केला गेला.

**ऊ) बाह्य अवडंबर विरोध -**

पंडित ग्यांन मरौ क्या झूझि औरै लेहु परमपद बूझि।

आसण पवन अुपद्रह करै निसिदिन आरंभ पचि पचि मरै।। -गोरखवाणी/१३५

**अर्थः** हे पंडितांनो। बहिरंगी चर्चा करत शब्दयुध्द करत का मरता आहात? आंतरिक ज्ञान नसेल तर काही उपयोग नाही. ते परमपद शब्दातीत आहे. ज्ञानानुभवाशिवाय आसन, प्राणायाम त्रासदायक होतात. प्रगती होत नाही.

**ए) पुस्तकी पांडित्याचा उपहासः**

गोरखवाणीमधे वरील मुद्याला आधारभूत अशी सूत्रे १२०, १२१, १५५, १९७, २०६, २४९ आढळतात.

**उदा.**

पढि पढि पढि केता मूवा कथि कथि कथि कहा कीन्ह।

बढि बढि बढि बहु घटि गया पारब्रम्ह का चीन्ह।। -गोरखवाणी/२४९

**अर्थः** शिकून शिकून किती मेले कुणास ठाऊक. सांगत सांगत काय काय न कळत सांगून गेले. वाढत वाढत असता वास्तविक ज्ञान इतके चुकत गेले की परब्रम्हाला जाणूच शकले नाहीत.

पुस्तकी पांडित्याबदद्ल गोरक्षसिध्दांतसंग्रहमधे खालील सूत्र आढळते.

गृहे गृहे पुस्तकभारभार: पुरे पुरे पंडित यूथयूथा।

बने बने तापसवृंदवृंद: न ब्रम्हवेत्ता नच कर्मकर्ता।। - गो. सि. संग्रह/५०

**अर्थः** घराघरांमध्ये पुस्तकांचे ढीग आहेत. गावागावात पंडित म्हणवणारे आहेत. अरण्यात तापसी ही खूप आहेत पण त्यात कुणी ब्रह्मवेत्ता नाही वा कर्मयोगी नाही.

त्याचप्रमाणे ''नायनात्मा प्रवचनेन लभ्य:न मेधया न बहुधा श्रुतेन'' हे श्रुतिवचन प्रसिद्धच आहे. (मुंडकोपनिषद् - ३/२/३ व कठोपनिपद् - १/२/२३)

त्याचप्रमाणे उत्तरगीतेमधे -

अधीत्य चतुरो वेदान् धर्मशास्त्राण्य नेकश।

ब्रम्हतत्वं न जानाति दर्वी पाकरसं यथा।। - उत्तरगीता २/४१

**अर्थः** चार वेद व धर्मशास्त्रांचा अभ्यास करुनही ब्रह्मतत्वाचे ज्ञान जर झाले नाही तर ज्याप्रमाणे रवी ५६ प्रकारचे पदार्थ स्पर्शते पण त्यांचा स्वाद तिला मिळत नाही असे म्हणण्यासारखे आहे.

अशाप्रकारे श्री गोरक्षनाथांच्या आचारविचारांचा, सिध्दांतस्वरुप आदर्शाचा व त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचा मोठा परिणाम समाजावर होत गेला. त्यावेळची सामाजिक परिस्थिती कशी होती हे पाहणे जरूरीचे आहे.

इ.स. चे १० वे ते ११ शतक हा श्री गोरक्षनाथांचा काळ मानला जातो. साधारणत: ७ ते १२ व्या शतकापर्यतचा काळ हा सामाजिक अभिसरणाचा समजाला जातो. सामाजिक व सांस्कृतिक प्रवाहांचे विघटन व वेगवेगळया जातींची व जमातींची मिश्र संस्कृती असा हा कालखंड समजला जातो. व्यवसाय, संप्रदाय, धर्म, मिश्रविवाह, एकत्र भोजन अशा माध्यमातून जातिव्यवस्थेची उलथापालथ होत राहिली. पारंपरिक वर्णव्यवस्था स्थिर राहिली नाही. अवैदिक धर्म प्रवर्तकांनी श्रमण व्यवस्थेसाठी खुलेआम सर्वाना मुभा ठेवली. बौध्द धर्माचे शुध्द स्वरुप न राहता बौध्द भिक्षू आणि भिक्षुणींनी मठ व विहारांना वैयक्तिक स्तरावर आणून ठेवले. त्यामुळे शुध्दतेला महत्व न राहता त्यातून निर्माण झालेल्या मंत्रयान, वज्रयान, सहजयान यांचा प्रभाव सामान्य जनावर पडत राहिला. श्रीशंकराचार्यांसारख्या दार्शनिकानी वैदिक धर्माची पुनर्बांधणी केली हे जरी खरे असले तरी वर निर्देश केलेल्या उपपंथाचाच

प्रभाव सामान्य लोकांच्यावर होत राहिला. तंत्र, मंत्र, जादू, कार्यसिध्दी, चमत्कार हेच आकर्षणाचे विषय ठरत गेले. अशा काळात श्री मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, कानिफनाथ, जालंदरनाथ इत्यादी प्रमुख नाथसिध्दांनी संस्कृत व बोलीभाषेत ग्रंथ लिहून, वैयक्तिक संबंध, प्रश्नोत्तरे, व अलौकिक योगसिध्दी यांच्या बळावर समाजाला एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला. नाथसंप्रदायातील काही साधना, गुप्तता, कार्यसिध्दी, चिरतारुण्य, अमरत्व, दीर्घायुष्य इत्यादी विषयांचे मोठे आकर्षण तयार होऊन मोठया संख्येने लोक नाथसंप्रदायाकडे आकर्षित झाले. याचवेळी इस्लामचे आक्रमण भारतावर होऊ लागले होते. ८ व्या शतकापासून अशी आकमणे प्रथम सिंधमध्ये होऊन पुढे जवळजवळ ५०० वर्षे सतत इस्लामी स्वाऱ्या हात राहिल्या. खलिफा उमर,महंमद-इब्न-कासीम, गझनीचा महंमूद, महंमद घोरी, बाबर यांच्या अतिरेकी धर्मवेडामुळे अनेक धर्मपंथांना व कर्मकांडात्मक हिंदू धर्मास मोठी हानी पोहोचली. आक्रमण, संघर्ष, जबरदस्ती, अत्याचार, लूटमार यामुळे अनेकांनी पर्याय नाही म्हणून सामुदायिक रीतीने इस्लाम धर्म स्वीकारला असे इतिहास सांगतो.[३०] (संदर्भ : नाथपंथ - उदय व विस्तार, पृष्ठ १४१)

१२ व्या शतकाचे संदर्भात काही विषय समोर येतात. श्री ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स.१२७५. दक्षिण भारतात त्यावेळी चालुक्य व यादव घराणी वैभवात होती. नंतर मात्र १२७१ ते १३०९ मध्ये क्षात्रतेजाचा लोप होत गेला. मुक्तीच्या व परमार्थाच्या विकृत कल्पनांनी राजघराणी निस्तेज झाली. याचा फायदा घेऊन इ.स.१२९४ मध्ये अल्लाउदद्दीन खिलजीने प्रत्यक्ष देवगिरीवर स्वारी करुन ते जिंकले. इ.स. १३०६ नंतर दक्षिणेत मोगली अंमल सुरु झाला. याचा अर्थ श्री ज्ञानेश्वारांच्या काळात सामाजिक अवस्था विकलांग स्थितीत होती. अशा वेळी वैदिकांनी समाजमताचा कौल घेऊन आवश्यक तेवढे सुधारित नियम जनतेसमोर ठेवले नाहीत. उत्तरेकडे तर वैदिक धर्माची चेष्टा होत होती.[३१] (संदर्भ : दिव्यामृतधारा, पृष्ठ ७३)

अशा या काळात नाथसंप्रदायाने महत्वाची भूमिका स्वीकारली. पंथप्रवेशासाठी जाति, वर्ण, धर्म यांचे कोणतेही बंधन ठेवले नाही. अशा या समिश्र अवस्थेत हिंदू फकीर, हिंदू जोगी, मुसलमान फकीर, नाथ, पीर अशा साधकांचा एक वेगळाच वर्ग निर्माण झाला. सूफी संप्रदायी फकीरांचा काही परिणाम नाथसंप्रदायावर झाला. त्यामुळे एकमेकातील प्रभावातून वेगळयाच श्रध्दास्थानांचा उदय व भिन्नसंस्कृती एकत्र येऊन उदयास आलेले तत्वज्ञान हा एक मोठा अभ्यासविषय ठरतो आहे. नाथपंथाचा शेजारच्या देशामध्येही विस्तार होत गेला. त्यामुळे या पंथात मुसलमान पीर, फकीर यांचा समावेश झाला. अनेक सिध्दांना 'पीर' ही उपाधी लागली गेली.

## ११) परंपरेची ऐतिहासिकता :

नाथसंप्रदाय कसा प्राचीन आहे यास वरील विवेचनातून त्या परंपरेच्या ऐतिहासिकतेलाच बळकटी येते. नाथ परंपरेतील तंत्र, मंत्र, यंत्र साधना पूर्वपरंपरेंतून पुढे विकसित झाल्याचे दिसते.

उदा. शिव पार्वतीला म्हणतात.

तस्माद वेदात्मकं शास्त्रं विध्दी कौलागमं प्रिये। - कुलार्णव तंत्र /१४०

**अर्थ :** हे प्रिये कौलागम हे वेदात्मक शास्त्र आहे.

हरित गोत्राचे प्रवर्तक हरित ऋषि म्हणतात-

श्रुतिश्र्च द्विविधा वैदिकी तांत्रिकी च।

**अर्थ :** श्रुती वैदिक व तांत्रिक अशा दोन प्रकारच्या आहेत.

यासंदर्भात H.H. (His Holiness) महातपस्वी कुमारस्वामी म्हणतात:

"The scriptures of Hinduism are known as Nigamagama. Nigama is another name for Veda. The vedic tradition represents the Aryan culture while Agamic tradition represents Dravidian culture. The Vedas and the Agamas act & react upon each other to enrich the contacts of Hinduism. That's why later thinkers admit the authority of both Vedas and Agamas. Harit rishi who seems to have flourished about the start of Christion era says "The sruti is two fold, Vedic & Tantric" Tantra is another name for Agama. To day the religious rights of Hinduism are more tantric than vedic. The living religion of today, is Tantric" असेच मत डॉ. राधाकृष्णन यांनी मांडलेले आहे.[३२] (संदर्भ : Dimesions of Yoga, P. 246)

अशारीतने योग, शैव, वैष्णव, बौध्द, तांत्रिक अशा विविध विचार प्रणालींचे एक विशेष असे मिश्रण नाथपंथात दिसून येते.

नाथपंथ हा योगप्रधान असला तरी त्याचेमधे भक्तीला अनन्य साधारण महत्व आहे.

नाथपंथ योगप्रधान कसा? तर श्री गोरक्षनाथांचा सि.सि.पध्दती हा पायाभूत ग्रंथच योगात्मक अनुभवाचा आहे. योगातून सिध्दावस्था व त्या अवस्थेत जे सृष्टीरहस्य उलगडले ते म्हणजे सर्व सृष्टीचा ज्ञानप्रपंच!, योगमार्गाचे वैशिष्टय सांगताना श्री गोरक्षनाथ म्हणतात.

योग मार्गात् परोमार्गो नास्ति नास्ति श्रुतोस्मृतौ।

शास्त्रेष्वन्येषु सर्वेषु शिवेन कथित: पुरा।। - सि.सि.प./उप. ५/२१

तसेच

योग: सन्नहनोपायो ज्ञानसंगति युक्तिषु।। - सि.सि.प./उप. ५/२२

**अर्थ :** श्रुती वा स्मृती असो योगमार्गाशिवाय श्रेष्ठ मार्ग नाही. शास्त्रातले सर्व काही पूर्वीच भगवान शिवानी सांगितले आहे. व योग म्हणजे युक्तीतून प्राप्त होणारे मोक्षप्रद ज्ञान होय.[३३] (संदर्भ सि.सि.प., पृष्ठ ६७)

यासंदर्भात पुढील दोहा विचारात घेण्यासारखा आहे.

शिव गोरक्ष शिव रुप है घटघट जिनका वास।

ज्योतिरुपसे आपने किया योग प्रकाश।।

**अर्थ :** प्रत्येक घटाघटात ज्यांचे अस्तित्व आहे असे श्री गोरक्षनाथ हे शिवस्वरुप असून त्यांनी स्वत:च्या आत्मज्योतीतूनच 'योगप्रकाश' विस्तारित केला.[३४]

(संदर्भ: नवनाथस्वरुप नाथ नित्यक्रम)

गोरखवाणी या ग्रंथात योगाची युक्ती म्हणजे हे शरीर व तेच त्याचे साधन होय अशा अर्थाची अनेक सूत्रे सांगितली गेली आहेत. त्या सर्वांच्या तपशीलात जाण्याची आवश्यकता नाही. मात्र यातून स्पष्ट होणारी एक बाब स्वच्छपणे पुढे येते. ती म्हणजे श्री गोरक्षनाथांनी योगशास्त्राचा संपूर्ण विचार केलेला आहे. आता श्री गोरक्षनाथांचे योगशास्त्रासंबंधीचे म्हणणे पतंजलींच्या योगसूत्रांशी कसे मिळतेजुळते आहे हे पाहणे गरजेचे आहे.

पतंजलींनी योगदर्शनाची शास्त्रीय स्वरूपात मांडणी केली आहे. योगशास्त्राला मानसशास्त्राची बैठक आहे. कैव्यलप्राप्ती हे योगशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट असून व्यक्ती स्वप्रयत्नाने या उद्दिष्टापर्यंत पोहोचू शकते.

पतंजलींचे योगशास्त्र चित्ताला साम्यावस्थेपर्यंत नेण्याचे एक साधन होय. एका अर्थाने त्यास साम्यरसावस्था असेही म्हणता येईल. ही अवस्था कशी प्राप्त होईल? हे सांगण्यासाठीच श्री. गोरक्षनाथांच्या सि.सि.प. या ग्रंथाच्या पाचव्या प्रकरणात याचा खुलासा आढळतो. समरसता हेच परमप्राप्तव्य होय. त्या परमप्राप्तव्यातून आनंदानुभूतीची निर्मिती होते. सिद्ध पुरूषांच्या ठिकाणी याच समरसतेमुळे प्रेम व भक्ती यांचा उदय होत असतो. हे साध्य करताना गुरूकृपेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यादृष्टिने सि.सि.प. मध्ये श्री गोरक्षनाथांचा खालील श्लोक विचारात घेण्यासारखा आहे.

''तस्मात् गुरूकटाक्षपातात् स्वसंवेद्यतयाच महासिध्द योगिभि: स्वकीयं पिडं निरूत्थानानुभवेन (व्यष्टि पिंड का समष्टि पिंड से अभिन्नत्व ) समरसं क्रियते इति सिध्दांत:'' - सि.सि.प पंचम उपदेश सूत्र ७

**अर्थ -** म्हणून महान सिध्दसुध्दा गुरूच्या कृपेनेच स्वत:च्या पिंडाचे समष्टी पिंडाशी अभिन्नत्व अनुभवतात व आनंद रूप होऊन जातात.

येथे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. साम्यावस्था प्राप्त झालेल्या योग्यास त्याच्या समोर असलेल्या विश्वाशी, विश्वाच्या संतुलनाशी कोणता संबंध असतो? योग्याचे अस्तित्व आणि हे विश्वसंतुलन यांच्यात काही संबंध असतो काय? का हा संबंध त्या व्यक्तीपुरताच मर्यादित राहतो? या संदर्भात स्वामी विवेकानंदांनी म्हटलेले आहे की, ''जे तुमच्या हाती आहे ते पिंडजगत वा अंतर्जगत नीट सुस्थितीत ठेवा म्हणजे ब्रम्हांड वा बहिर्जगतही नीट व्यवस्थित होऊन जाईल. हे जलस्थितीशास्त्रातील जलस्थीतीशास्त्रीय विरोधाभासासारखे (Hydrostatic paradox) आहे. पाण्याचा एक बिंदू अवघ्या विश्वाला समतोल अवस्थेत ठेऊ शकतो. पिंड ब्रम्हांड संबंध म्हणजे एखादे प्रचंड इंजीन व तयाची छोटी प्रतिकृती यांचे संबंधासारखी आहे''.[३५] (संदर्भ : दैवी -वाणी, पृष्ठ ५८)

साम्यरसावस्था साधलेल्या योगी व्यक्तीच्या देहिक माध्यमातील शक्तींचा विकास घडत असतो व अशा विकसित झालेल्या शक्ती त्या योग्याचे माध्यमातून व्यक्त होत राहतात असे मत श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या सि.सि.प. ग्रंथात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

तेषां पिंडसिध्दौ सत्यां सर्वसिध्दय:सन्निधाना भवन्ति। - सि.सि.प./उप.५/१७

**अर्थ :** योगसाधनेत तत्पर झाल्यावर योग्याला पिंडसिध्दीचा म्हणजे व्यापक परमात्म्याचा स्वत:चे देहात अनुभव येतो व त्यास सिद्धी प्राप्त होतात. त्या खालीलप्रमाणे.

निरोगता, सर्वभाषासिध्दी, तेजस्वी शरीर, तहान, भूक, उष्णता, थंडी पासून संरक्षण, दूरश्रवण, वाकसिध्दी व परकाया प्रवेश, आकाश गमन व दूरदृष्टी, आणिमा आदि ८ सिध्दी त्या अशा- आणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राकाम्य, ईशत्व, वशित्व. या सर्व सिद्धी देहसिद्धीतूनच प्राप्त होतात. मात्र गुरूकृपेनेच ते शक्य होते अन्यथा नाही.

### १२) ज्ञानेश्वरांचे नाथसंप्रदायाशी असणारे नाते :

ज्ञानेश्वरांनी ज्यांचे वर्णन योगाब्जीनि सरोवरु। विषयाविद्वंसैकवीरु।। असे केले त्या महायोगी गोरक्षनाथांचे वसतीस्थान म्हणजेच योगरुपी सरोवर. ज्ञानेश्वरांचे सर्व जीवनच श्री. गोरक्षनाथांच्या कृपाशिर्वादरूपी विचारांशी जोडले गेले आहे. मात्र त्यासाठी श्री. ज्ञानेश्वरांची घराण्यातील परंपरा पहावी लागते.

ज्ञानेश्वरांचे मूळ घराणे पैठणजवळील आपेगावच्या कुलकर्णी यांचे.

या घराण्यातले ज्ञात पुरुष - हरिहरपंत कुलकर्णी (शके १०६०)

रामचंद्रपंत केशवपंत

↓

गोपाळपंत

↓

त्र्यंबकपंत ← (गोरक्षनाथांचा अनुग्रह )

(गहिनीनाथांचा अनुग्रह) गोविंदपंत हरिहरपंत

↓

विठ्ठलपंत हरिहरपंत

विठ्ठलपंतांची निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताई ही चार अपत्ये. विठ्ठलपंतांची तीर्थयात्रा, विरक्तवृत्ती व अपत्यप्राप्ती नव्हती तेव्हा त्याअवस्थेत ते सन्यास घेण्यासाठी काशीला गेले व तेथे सन्यास घेतला. सन्यास कुणी दिला त्याबद्दल एकमत नाही. श्रीपादस्वामी का नससिहाश्रम का रामानंद (कबीरावेळचे नव्हेत) असे मतभेद आहेत.[३६] (संदर्भ : श्री. नानामहाराज साखरे ज्ञानेश्वरी पान २०) श्रीपादस्वामीनी सर्व परिस्थिती ज्ञात होताच श्री विठ्ठलपंताना पुन्हः गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा देताना धर्म संकट निर्माण झाले.

सन्यास ग्रहण शास्त्राला धरुन नाही तर सन्यास घेतल्यावर गृहस्थाश्रम नाही.

या ठिकाणी, पुढील अवतार कार्याचा श्रीगणेशाच होता म्हणूनच श्रीपादस्वामींना ईश्वरी इच्छेनुसारच अंत : प्रेरणा झाली असावी, असा निष्कर्ष काढावा लागतो. कारण एक दोष सुधारला तर तद्नुषंगिक अन्य दोषांचे निवारण होते.

म्हणूनच,

अविधी कर्माचे न धरावे भय। यासी आहे सहाय्य जगदीश।

स्वदेशा जाऊनि करावा आश्रम। सुखरुप स्वधर्म चालवावा।।

असा आदेश देण्याची प्रेरणा कुणाची? एका अर्थी ही आज्ञा व श्रीपादस्वामींची प्रेरणा हीच ज्ञानेशांची गुप्त सुप्त जन्मप्रेरणा आहे. ज्ञानेश्वरांचा जन्म तरी इ.स.१२७५ (शके ११९७) चा असला तरी त्यांच्या शुभजन्म तिथीच्या व्यवस्थेची सुरुवात वरील स्वामींच्या आज्ञेतच आहे। हे जन्मकारणरहस्य खूप महत्वाचे आहे, कारण नियतीच्या उदरात ४

वेगवेगळ्या माध्यमातून दिव्य शक्तींचे जागरण करण्याची योजनाच जणू त्र्यंबकपंतांच्या (ज्ञानेश्वरांचे पणजोबा) माध्यमातून अनुग्रह शक्तीच्या काही अलौकिक क्रियेद्वारे केली असावी काय? त्याची शास्त्रीय चिकित्सा कशी करायची? काही निसर्ग क्रिया मंत्रशक्तीद्वारे देहमाध्यमातून सुरु करुन दिल्याप्रमाणे पुढे त्याचे परिणामस्वरुप दिसून येते का? हा एक स्वतंत्र असा संशोधनाचा विषय होऊ शकतो.

याबाबतीत विज्ञानाचा निर्देश कसा आहे? श्री ज्ञानेश्वरांचे पणजोबा त्र्यंबकपंत यांना श्री गोरक्षनाथांसारख्या महान योग्याचा अनुग्रह होता असा ऐतिहासिक उल्लेख आहे. अनुग्रह म्हणजे शक्तिपातदीक्षाच असते हे स्पष्ट आहे. हा शक्तिपातयोग नेमका आपल्या स्थूलदेहातील सूक्ष्मतत्वांवर काय परिणाम करतो व हा परिणाम पुढे पिढ्यानपिढ्या संक्रमित होऊ शकतो का याबाबत काही उल्लेख मिळतात का हे पाहण्याचा प्रयत्न केला. त्या बाबतीत मान्यताप्राप्त अशा खालील ग्रंथात पुढीलप्रमाणे मांडणी केलेली दिसून येते.

The transformation of body, life and mind is effected through the grace, through the inflow of spiritual power. The seeker opens himself fully to this divine flow. Now here in the degree that he opens himself to this inflow, he is changed from mere man into Godman. This method is more practical and experimental and in this it is bold for it leaves aside all intellectual subtleties and insists on the release of the forces of life. It releases all the finest spiritual dynamism.[३७] (संदर्भ Dimensions of Yoga, P. 82) याचा अर्थ असा की, ही प्रदत्त शक्ती ही शरिराच्या अत्यंत सूक्ष्म स्तरावर परिणाम करते व जीवनास दिव्य बनवते. हा सूक्ष्म परिणाम सजीव प्राण्यामध्ये असणाऱ्या सूक्ष्म घटकावर होतो. तो घटक आहे “Gene” याबाबत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. जॉर्ज गॅमाऊ त्यांच्या ग्रंथात म्हणतात :

“In the gene we have the missing link between organic & inorganic matter, the living molecule. Indeed, considering on the one hand the remarkable permanence of genes which carry almost without any deviation the properties of a given species through thousands of generations and on the other hand the comparatively small number of individual atoms that form one gene one cannot consider it otherwise, than as a well planned structure in which each atom or atomic group sits in its pre-determined place”[३८] (संदर्भ One-Two-Three to Infinity P. 243)

यातून एक विषय असा सूचित होतो की, गुरूअनुग्रहाच्या माध्यमातून जो शक्तीपात साधकाच्या दैहिक माध्यमात होतो, त्याचा परिणाम दैहिक माध्यमातील सूक्ष्मात सूक्ष्म अशा ‘Gene’ या घटकापर्यंत पोहचू शकतो व त्यातून त्या ‘Gene’ मध्ये होणारे बदल हे वंशपरंपरेने पुढे संक्रमित होऊ शकतात. या संक्रमित शक्तीतत्त्वाचे प्रगटीकरणास लागणारा

वेळ व त्याच्या अभिव्यक्तीची व्यापकता व प्रखरता या विषयी कोणताच नेमकेपणा स्पष्ट होताना दिसत नाही.

"Gene" मध्ये जे Protons, electrons and neutrons असतात त्यातील "electon" ला २ प्रकारचे गुणधर्म असतात. वर दिल्याप्रमाो कणाचे गुणधर्म व लहरींचे गुणधर्म असे ते प्रकार आहेत. त्यातील लहरीच्या गुणधर्माचा या "Gene" मधून संक्रमित होणाऱ्या गुणधर्मांच्यावर परिणाम होतो का? ते स्पष्ट होणे आवश्यक आहे.

श्री ज्ञानेश्वरांचा नाथसंप्रदायाशी संबंध हा नुसता ऐतिहासिक नसून तो वैज्ञानिक अशा सूक्ष्म प्रेरणास्त्रोत्राशी संबंधित असावा असे वरील वैज्ञानिक चिकित्सेतून सुचित केल्यासारखे दिसते. योगेश्वर गोरक्षनाथांची दिव्यता, भव्यता, शुध्दता, गुरुभक्ती, सामाजिक ऋणाची जाणीव, सर्व विश्वाला कवेत घेण्याची तळमळ अशा या सर्वसंग्राहक शक्तींना व्यक्त व्हायचे होते एका माध्यमातून! सूर्य शक्तीला अभिव्यक्त व्हावयाचे हाते चंद्राच्या शीतल किरणांतून! वैश्विक शक्तीला प्रगट व्हायचे होते मातृभावाच्या ज्ञानधारेतून! उपनिषदरुपी गाईंचे दूध भक्तांना पचायला जड पडू लागले म्हणून की काय या दुधाची निर्मिती मातृभावातून श्री ज्ञानेश्वरांकडून करवून घेण्याची नियतीची योजना होती? अशा विचारांना व्यक्त करण्यासाठी हा ज्ञानेश्वर गोरक्षनाथ संबंध स्पष्ट करावासा वाटला. नंतरच्या काळात श्री गहिनीनाथांनी श्री निवृत्तीनाथांना दीक्षा देऊन आपल्या गुरुंचे (म्हणजे श्री गोरक्षनाथांचे) संकल्पित कार्यच करण्याचा आदेश दिला. तो आदेश बदलत्या सामाजिक परिस्थितीत कृष्णनामाच्या भक्तिसरितेत रुपांतरित झाला. त्याचे अध्वर्यू होते खुद्द श्री ज्ञानेश्वर,

निवृत्ती कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्णनामे।।

निवृत्तीनाथांच्या कडून हा नाथबोधपरंपरेचा वारस कशा प्रकारे मिळाला हे
श्री निवृत्तीनांथाच्या अभंगातूनच पाहता येते-

आदिनाथ अुमाबीज प्रगटले। मत्स्येंद्रा लाधले सहजस्थिती।
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली। पूर्ण कृपा केली गैनीनाथा।
वैराग्ये तापला सप्रेमे निमाला। ठेवा जो लाधला शांतिसुख।
निद्वंद्व निशंक विचरता मही। सुखानंद हदयी स्थिर झाला।
विरक्तीचे पात्र अन्वयाचे मुख। देऊनि सम्यक अनन्यता।
निवृत्ती गयनी कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्णनामे।।[३९]

( संदर्भ : नाथसंप्रदाय - उदय व विस्तार, पान ३६४)

नाथसंप्रदायामध्ये या प्रकारे शिव उपासना व कृष्ण (विष्णू) उपासना एकत्र येऊन त्यास नंतरच्या काळामध्ये व्यापक स्वरुप प्राप्त झाले. गहिनीनाथांच्या रुपाने निवृत्तीनाथांच्या

द्वारे कृष्णभक्तीचा प्रवाह महाराष्ट्रात मुक्तपणे वाहू लागला. ही कृष्णभक्ती कृष्णाचेच एक बालरुप म्हणून उपासिल्या जाणाऱ्या विठ्ठलाच्या भक्तीत परिणत झाली. आणि महाराष्ट्रातील नाथसंप्रदायाचा हा प्रवाह पुढे वारकरी संप्रदायाच्या रुपाने व्यापक बनला.

नाथसंप्रदाय हा उन्मुक्त जीवन अनुभवणाऱ्या साधकांचा साधनमार्ग आहे. वैदिक परंपरेतील अद्वैत तत्वज्ञानावरच तो आधारित आहे. परंतु वैदिक कर्मकांडास त्यांचा विरोध आहे. वर्णाश्रमधर्माचे नियम व त्याचा बंदिस्तपणा सर्वसामान्यांच्या विकासासाठी त्यांनी बाजूला ठेवला. व हे जग हे सत्यं शिवं सुंदरम् असून तेच प्रमुख अधिष्ठान आहे. या विचारास व अनुभवास प्रतिष्ठा निर्माण करुन इतर सर्व नियम व परंपरा गौण ठरवून सर्वसमावेशकतेच्या एका व्यापक कल्पनेस नाथसंप्रदायाचा मुख्य विषयच बनवले.

निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई यांचे प्रमाणेच या नाथसंप्रदायाच्या विहंगममार्गामध्ये नामदेव, नामदेवांचे गुरु विसोबा खेचर, चोखामेळा, सावतामाळी, नरहरी सोनार, मुक्ताईकडून अनुग्रह घेतलेले चांगदेव आशा आशिर्वादित सिध्दभक्तांचेही त्या त्या परीने हा भक्तिपंथ कार्यान्वित करण्यासाठी जीवनाचे योगदान रुजू झालेले पहावयास मिळते. त्याकाळातील स्वकेंद्रित उच्चनीच वर्गाधिष्ठित विचारांना व्यापक अशा सर्वसमावेशक भक्तीप्रवाहातून निर्माण होणाऱ्या जीवननिष्ठांचेमध्ये रुपांतरित करण्याची तळमळ वर उल्लेखलेल्या सर्व नाथसिध्दांचे जीवनात पहावयास मिळते. या सामाजिक चळवळीचा पाया होता श्री ज्ञानेश्वरांचे सिध्द - शुध्द जीवन व ईश्वरानुभूतीतून त्यांना झालेला त्यांच्या जबाबदारीचा साक्षात्कार. या अवस्थेत ते पितृत्वाच्या अवस्थेत प्रथम गेलेले आहेत. त्यांना माऊलीच्या भावात पहाणे हा समाजाचा सहजभाव जरी त्यावेळी झाला असला तरी त्यांनी पित्याची भूमिकाही तितक्याच स्पष्टपणे व समर्थपणे स्वीकारली आहे. आवश्यक तिथे कुटुंबसंरक्षण व कुटुंबसंवर्धन साधण्यासाठी स्पष्ट व कठोर भूमिकाही पिता घेतो. श्री ज्ञानेश्वरांचे बाबतीतही ही स्पष्टता व कठोरता अनेक अंगानी त्यानी सामाजिक स्वास्थ व सामंजस्य निर्माण करण्यासाठी वापरलेली पहावयास सापडते. त्यामागे त्यांची दृष्टी होती धर्मस्थापनेची व समाजाचे मानसिक परिवर्तन करण्याची.

यासाठी त्यानी एका कुशल धन्वंतरीची भूमिका घेऊन शल्यचिकित्सेनुसार शस्त्रक्रियेची आवश्यक ती सर्व हत्यारे वापरली. आणि ती सर्व हत्यारे होती एका जागातिक कीर्तीच्या धन्वंतरीच्या मान्यताप्राप्त परंपरेतील! ते धन्वतरी म्हणजे खुद्द श्री गोरक्षनाथ!

त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचे स्पष्टीकरण या प्रकरणात आलेले आहेच.

राजाकारणात तत्वाच्या शुध्दतेचा अभाव, ज्ञानाच्या क्षेत्रात चरित्र्याचा अभाव, आनंदाच्या क्षेत्रात विवेकाचा अभाव, परमार्थाच्या क्षेत्रात त्यागाचा अभाव, स्वार्थी व स्वमतांध

अवस्थेतून निर्माण झालेली सामाजिक जबाबदारीबाबत बेफिकीरी अशा विविध रोगांनी समाजपुरुषाच्या शरीरात घर केलेले होते व त्यासाठी महत्वाच्या शस्त्रक्रिया व औषधयोजनेची आवश्यकता होती.[४०]

(संदर्भ : याप्रकारच्या पापांचा उल्लेख पू. महात्मा गांधीनी केला असून त्याचा निर्देश वर्ध्याच्या त्यांच्या आश्रमात केलेला आहे.)

**१३) सामाजिक परिवर्तनासाठी श्री ज्ञानेश्वरांचे उपाय :**

श्री. गोरक्षनाथांनी त्यांच्या काळात म्हणजे इ.स. १००० चेवेळी त्या सामाजिक शास्त्रक्रिया केल्या होत्या. पण पथ्ये न पाळल्यामुळे इ.स. १२७५ मधे त्याच रोगांची उपस्थिती पुन्हः समाज -शरीरात स्पष्ट होत होती. म्हणून श्री ज्ञानेश्वरांनी त्यांच्या समर्थ गुरु परंपरेतीलच हत्यारे वापरली.

**अ) लोकभाषा :**

१० व्या शतकातील काळात श्री गोरक्षनाथांनी आसेतुहिमाचल कार्यक्षेत्रात जनसामान्यांना नाथपंथाचा भागिदार करण्यासाठी त्यावेळच्या लोकभाषेचा व भारतीय स्तरांवर हिंदी भाषेचा आधार घेऊन व्यापक स्वरुपात परिणाम साधला. कोणत्याही जीवनपध्दतीचा व तत्वज्ञानाचा स्वीकार भाषेच्या माध्यमाशिवाय कसा साधणार? त्यासाठी उच्च भाषेचा स्वाभिमान बाजूला ठेवण्याची व्यवहार्यता स्वीकारली. हीच व्यवहार्यता श्री. ज्ञानेश्वरांनी दाखवत महाराष्ट्रातील मराठी भाषेचा वापर दिव्य प्रेरणेतून व अधिकारी वाणीत केलेला दिसून येतो. तो अधिकार उच्च श्रेणीचा होता व त्या भाषेच्या कवित्वास परतत्वाचा नित्य स्पर्श होत राहिल्याने ती भाषा शब्दसृष्टीचे वैभव तर ठरलीच पण त्या वैभवातले माधुर्य व रसास्वाद असा होता की त्यासाठी इंद्रियांच्यात भांडण लागावे व अमृताशी पैज लावून चंद्रशीतलतेचा हात धरुन शांत रसातून सुख समाधानाची अनुभूती प्रत्येकास यावी.

माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। - ज्ञानेश्वरी अध्यास ६/१४

**अर्थ -** माझे बोल शुद्ध पाकृत आहेत हे खरे. पण ते सहजपणे व प्रतिज्ञापूर्वक अमृतालाही जिंकतील अशी रसभरित रचना मी करेन.

किंवा

ऐका रसाळपणाचिया लोभा। कीं श्रवणींचि होती जिभा।
बोले इंद्रियां लागे कळंभा। एकमेका।। - ज्ञा.अध्याय ६/१६

**अर्थ -** पहा की, अक्षरांच्या रसाळपणाच्या आशेने कानालाच जिभा उत्पन्न होतील. अशा शब्दांमुळे इंद्रियांच्यात कलह उत्पन्न होईल. याचा ज्ञानेश्वरांना विश्वास किती ? तर-

तेणे कारणे मी बोलेन। बोली अरुपाचे रुप दावीन।

अतींद्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवी।।          - ज्ञा.अध्याय ६/३६

**अर्थ -** त्या गुरूकृपेच्या योगाने मी बोलेन व त्या निराकाराचे स्वरूप दाखविन व ते रूप इंद्रियांच्या कक्षेत नसले तरी त्याचा अनुभव इंद्रियांकडून देईन.

असे हे आध्यत्मशास्त्र एका वेगळ्या पध्दतीने कर्म व बुध्दीला भक्तीच्या मुशीत घालून दिव्य ईश्वर प्रेमानुभूतीच्या दागिन्याच्या रुपात श्री ज्ञानेश्वरांनी या युगपुरुषाच्या गळ्यात अशा पध्दतीने घातले की, प्रत्येकास तो उपहार आपलाच वाटावा!

म्हणून श्री गोरक्षनाथ म्हणतात - (मनाबाबत)

अवधू मन चंगा तो कठौती ही गंगा। बांध्या मेल्हा तौ जगत्र चेला।

बदंत गोरख सति सरुप। तत बिचारै ते रेष न रुप।।       - गो.वाणी/१५४

**अर्थ -** म्हणजे गंगा सेवनानी जे फल मिळते ते फळ मन शुध्द करण्याने मिळते. मनाला मायेपासून मुक्त केले तर सर्व जग त्याचा चेला होईल. गोरखनाथ म्हणतात त्याप्रमाणे या सत्यस्वरुपाचा विचार करणारा स्वच्छ, मोकळा होऊन जाईल.

**ब) सामाजिक भेदभावाला विरोध -**

नाथसंप्रदायामध्ये जातिभेदास अमान्यता असून याबाबत नाथ संप्रदाय वांङ्मयांत स्पष्ट निर्देश आहेत. गोपीचंद, भर्तृहरी, ज्ञानेश्वर समकालीन राजा रामदेवराय, असे राजे, बंगालचे हाडिपानाथ हे शूद्र, तर विमलादेवी, मयनामती सारख्या स्त्रिया! अशा प्रकारे वर्णभेद न करता सर्व समावेशक अशी दृष्टी नाथसंप्रदायात होती. शुद्ध आत्मज्ञानाचा जातिभेदात्मक विचाराशी काहीच संबंध नसतो. त्यासाठी एक महत्त्वाचे सूत्र खालीलप्रमाणे आहे.

अजातिमत्वहक प्राज्ञे: द्वितीयम् इति स्मृतम्।

चत्वार एते भावा: स्यु: परमोदयहेतव:।।               - सि.सि.संग्रह/५/२१

म्हणजे प्रकाशमय आत्म्याला स्वत:च्या स्वरुपात एकरुप करुन राहणे अशा ज्ञानाला बुध्दीवान लोकांनी जाति-जन्माचे बंधन ठेवलेले नाही व अशा ज्ञानाला 'साद्वय ज्ञान' म्हटलेले आहे. या ज्ञानाच्या चार अवस्था परम उदयाला कारणीभूत आहेत. (सहज, ससंयम, सोपाय व साद्वय)

श्री ज्ञानेशांनी गीता अध्याय ९ वर भाष्य करताना असे म्हटलेले आहे की, आत्मस्वरूपाचे ज्ञान ही कोणा एकाची मक्तेदारी नाही. तो सर्वांचा हक्क होऊ शकतो व हा अनुभव सर्वसामान्यांना कसा प्राप्त करता येईल हे ही विवेचन केलेले आहे. वरील संदर्भातून श्री ज्ञानेश्वरांची, हे गुहय ज्ञान सर्वांसाठी खुले करण्याची तीव्र इच्छा दिसून येते. म्हणून पुढे ते म्हणतात

यालागी पापयोनीही अर्जुना। का वैश्य शूद्र अंगना।

माते भजता सदना। माझिया येती।।                    - ज्ञा. ९/४७४

**अर्थ :** म्हणून हे अर्जुना! वैश्य, शूद्र वा कोणीही पाप योनीतला असो तो माझ्या प्रेमभजनाद्वारे मलाच पोहोचतो. हे सामाजप्रबोधन करत असतानाच जीवनाची क्षणभंगुरता व सुखदु:खमिश्रित जीवनाचे यथार्थ स्वरुप उलगडून दाखवत या भवचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वांना आवाहन केले आहे.

तरि झडझडोनि वहिला निघ। इथे भक्तिचिये वाटे लाग।

जिया पावसी अव्यंग। निजधाम माझे।।                    - ज्ञा अ.९/५१६

**अर्थ :** सर्व अनावश्यक व अयथार्थ असे जेजे आहे. ते झटकून टाका व तत्काळ भक्तिमार्गी व्हो. या एकाच निष्ठेने व दिशेने तू माझ्या पूर्णस्वरुप अशा मला येऊन मिळशील हे आव्हान सर्व मानव जातीला होते. त्यामुळे परिणामस्वरुप वारकरीपंथामध्ये जातिभेद दिसून येत नाही. सर्व जातिभेद विसरा व एक व्हा या आव्हानामागे सामाजिक स्तरावर अनुभवास येणाऱ्या तीन बाबी पुढीलप्रमाणे होत्या.

जातिसंस्थेची घट्ट चौकट, पुस्तकी पांडित्य व त्यातला अपुरेपणा, शुद्रादि लोकांची अगतिकता.

श्री ज्ञानेशांनी या ठिकाणी काही मर्यादा संभाळल्या आहेत. त्यांना जे समाजजागरण घडवायचे होते त्यासाठी समाजातील लोकांची होकारात्मक उपस्थिती व ते जे सांगतात त्याचे बद्दलचा आदरभाव जपणे आवश्यक होते. ''ज्यांना खरे ज्ञान म्हणजे काय हे कळलेले नाही किंवा कळवून घ्यायचे नाही अशांची फिकिर का करता?'' असे निवृत्तीनाथांनी म्हटल्यानंतर श्री ज्ञानेश्वरांनी निश्चयी स्वरात श्री. निवृत्तीनाथांना सांगितले आहे की लौकिकाला सांभाळूनच अलौकिकाची स्थापना करायची असते. लौकिक व्यवहारावर आघात केला तर लोकमानस बिघडून जाते व सत्यधर्माचे कार्य अवघड होते. म्हणून श्रीज्ञानेश्वर म्हणाले

कुळीचा कुळधर्म अवश्य पाळावा / सर्वथा न करावा अनाचार।।

प्रत्यवाय आहे अशास्त्री चालता। पावन अवस्था जरी झाली।।

ज्ञानदेव म्हणे ऐकाजी निवृत्ती। बोलिलि पध्दती धर्मशास्त्री।।

**अर्थ :** कुळधर्म जरुर पाळावेत. अनाचार करु नये. आपली स्वत:ची परम शुध्द स्थितीरुप अवस्था जरी झाली तरी अशास्त्रीय पध्दतीने लोकव्यवहार करु नये असेच शास्त्र सांगते असे श्री ज्ञानेश्वर श्री निवृत्तींना सांगत आहेत. नंतरच्या काळात श्री ज्ञानेशांची ही शुध्द बैठक समोर ठेऊन श्री ज्ञानेशादि चारी भावंडांनी भक्तीच्या क्षेत्रात जातिभेद व वर्णभेद मानला नाही.

अशा तऱ्हेने लोकसंग्रहार्थ परंपरेचे पालन करत शुध्द आचरण व विचाराची लवचिकता ठेऊन सामरस्य योग साधला.[४१] (संदर्भ: श्री ज्ञानेश चरित्र, साखरेकृत ज्ञानेश्वरी, पृष्ठ २४)

**क) खोटया आचरणास विरोध :**

नसलेल्या गुणांचा देखावा करत खोटे आचरण करणे, साधना गुप्त न ठेवता त्याचे प्रदर्शन करुन स्वतःच्या अहंकाराला खतपाणी घालणे, धर्मतत्वांच्या नांवाखाली संकुचित जीवन दृष्टीकोन स्वीकारणे अशा सर्व स्वभावदोषांना श्री गोरक्ष नाथांनी सक्त विरोध केला आहे. शब्दपांडित्य व ढोंगीपणा यास विरोध करताना श्री. गोरक्षनाथ म्हणतात.

कहणी सुहेली रहणि दुहेली बिन पाया गुड मीठा।
खाई हिंग कपूर बषाणै गोरष कहै सब झूठा।।            -गोरखवाणी/१२१

**अर्थ :** म्हणजे गूळ न खाता गोड आहे म्हटले म्हणजे काही त्या गोडीचा अनुभव येत नाही अशा अनुभवहीन व्यक्तीला वास्तविकता कळू शकत नाही. खातोय हिंग व म्हणतोय कापूर. गोरखवाणी सूत्रे क्र. १५३, १९१, २६१ याच आशयाची असून कोरड्या पुस्तकी पांडित्यावर श्री. गोरक्षनाथांनी सडकून टीका केल्याचे दिसून येते.

खोटे आचरण, अंधविश्वास व पुस्तकी पांडित्य याबाबतचे संदर्भ मवाळ भाषेमध्ये पण स्पष्टच आहेत.

भोगासक्त कर्मठाबद्दल श्री ज्ञानेश्वर म्हणतात.

अर्जुना वेदु जरी जाहला। तरी माते नेणता वाया गेला।
कणु सांडुनि अुपणिला। कोंडा जैसा।।            - ज्ञाने.अ.९/३३३

**अर्थ :** अर्जूना! मला जर जाणले नाही तर विद्वत्ता व्यर्थ आहे. धान्य दवडून कोंडा गोळ्या करण्यासारखे ते आहे.

ज्ञानेश्वरांनीही पुस्तकी ज्ञानाच्या पोकळपणावर अशीच टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की,

कर्मकांड तरी जाणे। मुखोद्गत पुराणे।
ज्योतिषी तो म्हणे। तैसेचि होय।।            - ज्ञा.अ.१२/८२८

**अर्थ :** कर्मकांडी, पुराणिक, ज्योतिषी सांगतात म्हणून काय ते ज्ञानी होतात ?

**ड) अनुभवप्रामाण्य :** याबद्दल श्री. गोरक्षनाथांचे खालील सूत्र अत्यंत महत्त्वाचे असून त्याचे पार्श्वभूमीवर श्री ज्ञानेश्वरांनी साधकांने सर्वार्थाने योगमार्गात कसे रमावे व एकरूप होऊन साम्यावस्था कशी प्राप्त करून घ्यावी हे नेमकेपणाने स्पष्ट केले आहे.

श्री गोरखनाथ 'गोरख ज्ञान' या प्रकरणामध्ये म्हणतात-

ऐसे रमहूँ जैसे नष सिष भेदै। संक्या शरीर न लुटै।
चलत फिरत पद माहि समावै। जामण मरण भै छूटै।।  - गोरखज्ञान२३/पान ७९

**अर्थ :** ईश्वरानुभूतीत भक्ताने नखापासून मस्तकापर्यंत एकरस होऊन असे रममाण झाले पाहिजे की मायेचा (शंकेचा) प्रभावच राहू नये. चालत फिरत असतानाही त्या ब्रह्मानुभूतीत रहायला हवे की जेणेकरुन जन्ममरणाची भीतीच नाहीशी होते.

श्री ज्ञानेश्वरांनीही आत्मशुध्दी हेच मुख्य साक्षात्काराचे साधन आहे हे आग्रहाने सांगताना व योगमार्गाचे काठिण्य कमी करताना भक्ती मार्गाचा आग्रह धरून साधक त्या अंतिम तत्त्वाचा अनुभव कसा घेतो हे सांगीतले आहे.

ऐसा मिया आथिला होशी। तेथ माझि याचि स्वरूपा पावसी।
हे अंत:रकरणीचे तुजपाशी। बोलिजत असे। - ज्ञा. अ.९/५१९

**अर्थ :** असा माझ्या योगाने तू संपन्न होशील त्याच वेळेस माझ्या स्वरूपालाही पावशील. ही माझ्या अंत:करणातील गुप्त गोष्ट तुला सांगतो आहे.

म्हणोनि फळी लागू। सांडोनि देहसंगू।
कर्मे करावी हा चांगु। निरोप माझा। - ज्ञा. अ.१८/१७६

**अर्थ :** म्हणून फळाविषयी आशा सोडून व मी कर्ता आहे हा अभिमान सोडून कर्मे करावीत अशी माझी अपेक्षा आहे.

**इ) नैतिक आचरण :**

नाथसंप्रदायाच्या कार्यपध्दतीमध्ये जर सर्वात जास्त महत्व व आग्रह धरला गेला असेल तर तो आचरणाचा! वाममार्गानी, अनैतिक आचरणातून सिध्दिसाधनांचा जो खटाटोप त्याकाळात मोठया प्रमाणावर चालला होता त्यास खणखणीत विरोध जर कुणी केला असेल तर तो श्री गोरखनांथांनी. त्याची गोरखवाणीमध्ये १७, ३५, ३६ अशी सूत्रे आहेत.

**उदा. -**

अरधै जाता अुरधे धरै। कामदग्ध जे जोगी करै।
ताजै अल्यंगन काटै माया। ताका बिसनु पशालै पाया।। - गोरखवाणी सूत्र १७

**अर्थ :** खाली जाणाऱ्या शक्तिप्रवाहास वरच्या दिशेने प्रेरित करुन जो कामाला भस्म करतो तसेच जो कामिनीचे आकर्षण त्यागून मायेला जिंकतो अशा योग्याचे पाय धुण्यासाठी विष्णू तयार असतात.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनीही याचप्रकारे पण वेगळया शब्दात संयम व नीतीचा आग्रह धरला व हा विषय वैयक्तिक न ठेवता त्याला सामाजिक जाणिवेचे रुप दिले. शास्त्राप्रमाणे आचरण हे देहाभिमान सोडलेल्या सिद्ध लोकांसाठीही आवश्यक आहे. हा दंडक सामाजिक आचरण सुधारण्यासाठी जरुर आहे. हे सांगताना ते म्हणतात.

१) देखे प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।
तयांसी कर्तव्य असे उरले। लोकांलागी।। - ज्ञा. अ. ३ ओ. १५५

**अर्थ :** जे ज्ञानी होऊन निष्काम झालेत त्यांनी लोकांना मार्गदर्शक होणे हेच कर्तव्य असते.

२) मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे।
अलौकिक नोहावे। लोकांप्रती।। - ज्ञा. अ. ३/१७१

**अर्थ :** आपण स्वत: योग्य मार्गी होऊन सर्वांना तसे न्यावे. लोकांमधे आपण श्रेष्ठ आहोत असे भासवू नये.

३) एथ वडिल जेजे करिती। तया नाम धर्मु ठेविती।
तेचि येर अनुष्ठिति। सामान्य सकळ।। - ज्ञा.अ.३/१५८

**अर्थ :** मोठे लोकांचे आचरणाचे अनुकरणच सामान्य लोक करतात व तोच धर्म समजतात.

हे ऐसे असे स्वभावे। म्हणोनि कर्म न संडावे।
विशेषे आचरावे। लागे संती।। - ज्ञा.अ.३/१५९

**अर्थ :** हा जन स्वभाव आहे. म्हणून योग्य कर्म आचरावे साधुसंतानी सतकर्म विशेष करुन आचरावे.

नाथपरंपरेच्या महत्तेचे विवेचन करत असताना एक विशेष बाब सतत समोर येत राहते. ती म्हणजे या परंपरेची अखंड धारा! या ना त्या प्रकारे या ना त्या माध्यमातून शिवशक्ती सामरस्याचा व सत-चित-आनंदपूर्ण धारणेतून संतुलित अशा मध्यमार्गाची व्यवहारिक स्वीकृती व त्यातून आदर्शभूत सुखी जीवनाची निर्मिती असा रोकडा अनुभव देण्याचे सामर्थ्य या तत्वज्ञानात आहे. हा जो अनुभव सामान्य लोकांना मिळत गेला. त्यामधेच या परंपरेच्या अस्तित्वाचे रहस्य दडले आहे असे म्हणावे लागते. श्री गोरक्षनाथांच्या कार्यपध्दतीबाबत व कार्याचे परिणाम स्वरुपाबद्दल आवश्यक ती नीतिशास्त्रीय चिकित्सा करावी लागेल.

श्री गोरक्षनाथांचे वेळी जी सामाजिक परिस्थिती होती त्यावेळी नैतिक आचरणाबाबत योग्य काय व अयोग्य काय हाच प्रश्न पडत होता. एका अर्थाने आजच्या नैतिक संकटाची (moral crisis) पाळेमुळे इ.स. १००० ते ११०० पर्यंत पोचतात असे म्हणावे लागेल. त्यामुळे योग्य कर्म कोणते? यासाठी नीतिशास्त्रातील २ पर्यायांचा विचार करावा लागतो.

नियमवाद (Rule Based) व परिणामवाद (End Based) असे हे दोन पर्याय आहेत.

नियमवादामधे खेळाचे नियम, राजकीय नियम, तर्कशास्त्राचे नियम व निसर्ग नियम असे प्रकार येतात.

नियमवादामध्ये नियमाला, तत्त्वाला प्राधान्य दिले जाते. कोणतीही कृती नियमावर आधारलेली असेल तरच युक्त ठरते. याउलट कोणत्याही कृतीपासून कोणते चांगले-वाईट परिणाम मला प्राप्त झाले अशी भूमिका घेतल्यास त्यास परिणामवाद म्हणतात. नियमवाद

तत्त्वाला महत्त्व देतो. तर परिणामवाद हा कृतीपासून पाप्त होणाऱ्या परिणामावर भर देतो. या दोन उपपत्तींपेक्षा वेगळी अशी 'ध्येयवादी' उपपत्ती मांडली गेली आहे. तिच्यामध्ये माझ्या जीवनाचे काहीएक प्राप्तव्य असू शकते. काहीतर साध्य असते. जी कृती केल्याने त्या साध्याप्रत जाता येईल ती नैतिकदृष्ट्या इष्ट होय. ही ध्येयवादी उपपत्ती बऱ्याचवेळा 'अंत:प्रज्ञावादी' उपपत्ती म्हणून ओळखली जाते. कारण माझ्या जीवनाचे ध्येय माझ्या सद्सद्विवेकातून अथवा माझ्या बुद्धीतून पुढे आलेले असते व त्याचा मी पाठपुरावा करीत असतो. म्हणून येथे जी भूमिका असते ती काय आहे यापेक्षा काय असावी यावर आधारीत असते. श्री. गोरक्षनाथांनी 'तू काय आहेस यापेक्षा तू कसा आहेस' यावर भर देवून तू ब्रह्मांडाची प्रतिकृती आहेच असेच स्पष्ट केले आहे.

**१४) उपसंहार :**

या प्रथम प्रकरणाचा सारभूत अर्थ काढताना असे म्हणावे वाटते की गोरक्षनाथांना अभिप्रेत असलेले व्यक्तीचे वैश्विकत्व व श्री ज्ञानेश्वरांचा वैश्विक मानवतावाद यांचे मनोज्ञदर्शन म्हणजेच नाथसंप्रदायांच्या विविध शाखारुपी हातांनी समाजपुरुषाला दिलेले आलिंगनच होय. या प्रेमस्फुरणामागे आहे भक्ती! ती भक्ती प्रत्येकाकडून आध्यात्मनिष्ठ मानवतावाद अपेक्षिते. हे प्रेम ब्रम्हभाव जागवते, तर दुसऱ्या बाजूनी माणसामाणसातले देवपण शोधून ब्रम्हभावाचे मानवतावादी रुप उभे करते. असे हे सर्वसमावेशक संतसाहित्य हा एक अर्थाने आपल्या देशाचा लोकवेदच ठरतो. भारतीय जीवनाच्या सांस्कृतिक परंपरेतील काळानुरुप निर्माण झालेल्या कमतरता दूर करुन, विवेकाचे अधिष्ठान निर्माण करत ज्ञानदर्शन व भावदर्शन घडवत व्यक्तीला स्वत:च्या स्व-स्वरुपाचे दर्शन घडवण्याचा हा एक प्रचंड खटाटोप म्हणजेच नाथसंप्रदायाचे हे जीवनव्यापी दर्शन।।

## १५) संदर्भ व टीपा :


१. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार - डॉ. प्र. न. जोशी, प्रकाशक - अंजली पब्लिशिंग हाऊस - पुणे, २००४.

२. तत्रैव.

३. तत्रैव.

४. तत्रैव.

५. तत्रैव.

६. सि.सि. पध्दति - संपादक स्वामी द्वारिकादास शास्त्री, प्रकाशक चौखंबा विद्याभवन, वाराणसी, २००६.

७. नवनाथ कथासार - ले. सौ. तारा चौधरी सेंट्रल प्रकाशन, मुंबई. १९९१.

८. सि.सि. पध्दति.

९. तत्रैव.

१०. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार आधीच्या नोंदीप्रमाणे, २००४.

११. शिवयोग और प्रार्थना योग - ले. डॉ. भगवानदास तिवारी, प्रकाशक श्री. कुमारस्वामी अमृत महोत्सव कमिटी, धारवाड, १९८५.

१२. Hindu view of life - ले. डॉ. राधाकृष्णन, प्रकाशक मॅकमिलन कं. न्युयॉर्क, १९२८.

१३. शिवयोग और प्रार्थनायोग - आधीच्या नोंदीप्रमाणे.

१४. नाथपंथ उदय व विस्तार - आधीच्या नोंदीप्रमाणे.

१५. सि.सि. पध्दति : आधीच्या नोंदीप्रमाणे.

१६. नाथसंप्रदाय उदय व विस्तार आधीच्या नोंदीप्रमाणे.

१७. नाथसंप्रदाय उदय व विस्तार - आधीच्या नोंदीप्रमाणे.

१८. शिवयोग और प्रार्थनायोग - आधीच्या नोंदीप्रमाणे.

१९. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार आधीच्या नोंदीप्रमाणे, २००४.

२०. तत्रैव.

२१. सि.सि. पध्दति - आधिच्या नोंदीप्रमाणे.

२२. Paths of Meditation - रामकृष्ण प्रकाशन, मद्रास, १९८०

२३. तत्रैव.

२४. Internet Information.

२५. नाथसंप्रदाय उदय व विस्तार - आधीच्या नोंदीप्रमाणे.

२६. नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर - ले. डॉ. के. डी. भिंगारकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७.

२७. श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत - प्रकाशक श्रीपाद श्रीवल्लभ महासंस्थान वेणुगोपाळ मंदीर - पीठापूर - आंध्रप्रदेश.

२८. सि.सि. पध्दति - आधिच्या नोंदीप्रमाणे.

२९. नवनाथ भक्तिसार : ओवी ८८, ८९, ९०.

३०. नाथपंथ - उदय व विस्तार - आधीच्या नोंदीप्रमाणे.

३१. दिव्यामृतधारा - ले. बाबामहाराज आर्वीकर, प्रकाशक के. भि. ढवळे, मुंबई, २००७.

३२. Dimensions of Yoga - ले. महातपस्वी कुमारस्वामी, प्रकाशक - कुमारस्वामी फाऊंडेशन, धारवाड, १९८८.

३३. सि.सि. पध्दति - आधीचे नोंदीप्रमाणे.

३४. नवनाथ स्वरुप नाथ नित्यक्रम भाग - संपादक योगी नरहरिनाथ योगप्रचारिणी - गोरक्षटिल्ला. वाराणसी.

३५. दैवी वाणी - ले. स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ नागपूर प्रकाशन पान ५८

३६. नाना महाराज साखरे - ज्ञानेश्वरी, सारर्थी प्रकाशन, पुणे.

३७. Dimensions of Yoga - आधीचे नोंदीप्रमाणे.

३८. One-Two-Three to Infinity - जॉर्ज गॅमाऊ, प्रकाशक - द. न्यु. अमेरिकन लायब्ररी, १९५५.

३९. नाथसंप्रदाय उदय व विस्तार - आधीचे नोंदीप्रमाणे.

४०. म. गांधीचा 'पाप' विषयीचा सिध्दांत वर्धा आश्रम मधील व यंग इंडिया या पत्रातील नोंद.

४१. श्री. ज्ञानेश चरित्र : श्री साखरे महाराज कृत ज्ञानेश्वरी.

# प्रकरण - दुसरे

# श्री गोरक्षनाथांचे सिद्धांत स्वरूप तत्त्वज्ञान

## (गोरक्ष तत्त्वज्ञानाची सामान्य व तौलनिक चिकित्सा)

**१) प्रस्तावना :**

हा विषय खूपच विस्तृत व गोरक्षनाथांच्या मूलभूत तत्त्वज्ञानाच्या मांडणीशी संबंधीत आहे. ही मांडणी करताना ठिकठिकाणी श्री गोरक्षनाथांच्या विविध ग्रंथांचा आधार घेतलेला आहे. श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या 'सिध्दसिध्दांतपध्दति' या ग्रंथात योगशास्त्राची खालीलप्रमाणे मांडणी केलेली आहे. ज्याला ईश्वर, परमसत्य, चेतनेचा मूलस्त्रोत म्हणतात अशा तत्त्वाचे ज्ञान करून घेण्याचा सूक्ष्म मार्ग हा सि.सि.प. मागचा उद्देश असून ते परमसत्य ज्या ६ अवस्थांमधून स्वत:ला भौतिक रचनेमध्ये परावर्तित करते त्याची स्वानुभवाधिष्ठीत मांडणी श्री. गोरक्षनाथांनी या ग्रंथात केलेली आहे. सिध्दसिध्दांतपध्दतीचा अर्थ काय? तर प्रत्यक्ष अनुभवातून जे मत बनते त्याकडे जाण्याचा मार्ग. या मार्गाची प्राप्ती शब्दपांडित्यातून कधीच होत नाही. सद्‌गुरु प्रदत्त साधनमार्गातील साधना सिध्द होताना गहन ध्यानावस्था प्राप्त होते. त्या अवस्थेतून पुढील मार्ग मोकळा होतो. त्याची परिणत अवस्था म्हणजे समाधी! योगमार्गातील हे अनुभव मनाच्या अतीत अवस्थेत प्राप्त होतात. ध्यानातून सूक्ष्मशरिरात बदल होतो. त्यातून सूक्ष्मशरीरातील चक्रजागृती होते. चक्रजागृतीमुळे ग्रंथीच्या कार्यावर परिणाम होत जातो. या सर्व प्रक्रियेतून शरीरातून दिव्यत्व प्रगट होते. अशी या सर्व विषयाची संगती आहे. सि.सि.प. या ग्रंथात एकूण ६ विभागात त्यानी उपदेश केला असून त्याची मांडणी मी सर्वप्रथम देत आहे.

१) प्रथम उपदेश या प्रकरणात गोरक्षनाथ म्हणतात, की मूलभूत असे जे परमसत्य आहे ते या दृष्य सृष्टीची रचना करते. परंतु नामरहित असे जे परमसत्य आहे ते स्वत: ही सृष्टी निर्माण करु शकत नाही. तर मूलभूत शक्तितत्त्वाचा आधार घ्यावा लागतो. ही मूलभूत शक्ती या सर्वसृष्टीचा आधार आहे. ती शक्ती पाच माध्यमातून काम करते.

निजा : अलक्ष निरंजन ब्रम्ह

परा : ब्रम्हाचे सृष्टी निर्मितीचे स्फुरण

अपरा : वरील स्फुरणाचे क्रियाप्रधान स्वरुप

सूक्ष्मा : अपरा + अहंकार

कुंडलिनी : चैतन्य स्वरुप माया.

या पाच माध्यमातून कार्य करताना मूळ अनामतत्त्व कायमच रहाते (पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते!)

यानंतर प्रथमउपदेश मधील सूत्र क्र. १० ते १५ मध्ये वरील पाच प्रकारच्या शक्तीचे स्वरुपातील प्रत्येकात ५-५ गुण सांगीतले आहेत.

निजाशक्ती चे पाच गुण : नित्यता, निरंजनता, निष्पंदता, निराभासता, निरुत्थानथा.

पराशक्ती चे पाच गुण : अस्तिता, अप्रमेयता, अभिन्नता, अनंतता, अव्यक्तता.

अपराशक्ती चे पाच गुण : स्फुरता, स्फुटता, स्फारता, स्फोटता, स्फूर्तिता.

सूक्ष्माशक्ती चे पाच गुण : निरंशता, निरंतरता, निश्चलता, निश्चयता, निर्विकल्पता.

कुंडलिनीशक्ती चे पाच गुण : पूर्णता, प्रतिबिबंता, प्रबलता, प्रोश्चलता, प्रत्यंगमुखता.

**२) पिंडोत्पत्ति :**

अशा प्रकारे प्रत्येक शक्तितत्त्वातील पाच शक्तितत्त्वे × पाच गुण = २५ गुण होतात. यापासून परपिंड तयार होतो त्यालाच सगुण साकार परमेश्वराचा पिंड म्हणतात. या परपिंडामध्ये सर्वज्ञ, चेतन अशा सृष्टीची उत्पत्ती, स्थिती व लय हे सर्व हेतु अंतर्हित होतात. अशा प्रकारचा हा परमेश्वर पिंड नाशवंत नाही. तो विश्वाचे अंताचे वेळी द्वैताद्वैतस्थितीतील निरंजन परमेश्वर तत्त्वात लीन होतो. त्या पिंडाचा नाश होत नाही. वरील प्रत्येक शक्तीच्या विकासातून तो तो पिंड बनतो. अशा प्रत्येक पिंडाचा स्वतंत्र अधिष्ठाता 'देव' असतो व या देव निर्माण होण्याच्या प्रक्रियेस श्री गोरक्षनाथांनी 'शक्तिचक्रक्रम' असे म्हटले आहे. त्या ५ अधिष्ठाता देवांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

अपरंपरम् म्हणजे उत्साह, परमपद्म म्हणजे भावना, शून्यम् म्हणते स्वसत्ता, निरंजनम् म्हणजे अहंकार, परमात्मा म्हणजे सृष्टीउत्पादन हेतूनी समष्टीपिंड बनवणे.

वरील प्रत्येक देवाचे ५-५ गुण आहेत. अशा प्रकारे प्रथम अनादिपिंड तयार होतो. त्यानंतर या अनादि पिंडापासून आद्यपिंड पुरुषाची उत्पत्ती कशी होते याचे विवरण प्रथमउपदेश सूत्र २५ मध्ये आहे.

अनादिपिंड - परमानंद - प्रबोध - चितउदय - चितप्रकाश - सोहंभाव - आद्यपिंड

या प्रत्येक स्थितीचे ५-५ गुण आहेत. अशा प्रकारे २५ देवशक्तींचा समूह आद्यपिंडपुरुष बनवतो. यालाच शास्त्रात 'हिरण्यगर्भ' असे नांव आहे. यापूढे क्रमश: उत्पत्ती पुढीलप्रमाणे होते. आद्यपिंड पुरुषापासून (हिरण्यगर्भापासून)- महाकाश - महावायू-महातेज-महासलील (पाणी) - महापृथ्वी या प्रत्येक अवस्थेचे ५-५ गुण आहेत.

**उदा.:** महाकाश म्हणजे सर्व पदार्थांचे आश्रयस्थान होय. त्याचे गुण अछिद्रत्त्व (छिद्र नाही), अस्पृष्यत्त्व (स्पर्श करता येत नाही) नीलवर्णत्त्व (निळा रंग दिसतो), शब्दत्व (शब्दांनी परीपूर्ण असते) महावायू म्हणजे संचार (चलन क्रिया), संचालन (दुसऱ्याला चालवतो), स्पर्श (सर्व पदार्थांना स्पर्श करतो), शोषण (वाळवण्याची क्रिया), धूम्रवर्ण (रंग), महातेज

म्हणजे दाहकत्व, पाचकत्व, उष्णत्व, प्रकाशत्व, रक्तवर्णत्व, महाजल म्हणजे महाप्रवाह (नित्य वहात रहातो), आप्यायन (वाढत वाढत वहात रहातो, पसरतो) द्रव (पातळ होऊन रहातो) रस (मधुर) श्वेतवर्ण (स्वच्छ पांढरा म्हणजे निर्मलत्व), महापृथ्वी म्हणजे स्थूलता, नानाकारता (पर्वत, वृक्ष, वेली अशी विविध रुपे धारण करणे) काठिण्य - (कठिणता), गंध (गंधवती - वास) पीतवर्ण (पिवळा रंग) अशाप्रकारे हिरण्यगर्भापासून उत्पत्ती होते. ह्या महासाकारपिंड अवस्थेमधून ८ शक्ती काम करतात. शिव, भैरव, श्रीकंठ, सदाशिव, ईश्वर, रुद्र, विष्णू, ब्रम्हा या ८ देवता म्हणजे शक्तीतत्वे असून त्यांच्यापासून सृष्टीची निर्मिती - पालन व संहार होत राहतो. याच शक्ती मानवाला भवसागर पार करण्यास मदत करतात व मोक्ष देऊ शकतात. म्हणून त्या पूजनीय आहेत (सूत्र ३७) यानंतर पुरुष व स्त्रीची प्रथम उत्पत्ती कशी झाली हे स्पष्ट करताना श्री गोरक्षनाथ सूत्र ३८ मध्ये म्हणतात: ''तत्तद् ब्रम्हण: सकाशादवलोकनेन नरनारीरुप प्रकृतिपिंड: समुत्पन्न:'' म्हणजे सर्वप्रथम ब्रम्हाच्या अवलोकनाच्या संकल्पानेच स्त्रीयुक्त पुरुषप्रकृती पिंडाची उत्पत्ती होते. हा प्रकृतिपिंड पृथ्वी - आप - तेज - वायू - आकाश या ५ गुणांनी युक्त होऊन पंचभौतिक शरीर (पिंडशरीर) तयार होते. या प्रत्येक तत्त्वाचे ५-५ गुण आहेत.

पृथ्वीतत्त्व - अस्थि, मांस, त्वचा, नाडी, केस, जलतत्त्व - लाल,मूत्र, वीर्य, रक्त, घाम, तेजतत्त्व - भूक, तहान, झोप, तेज, सुस्ती, वायूतत्त्व - पळणे, फिरणे, पसरणे, आकुंचन, विरोध, आकाशतत्त्व - राग, द्वेष, भय, लज्जा, मोह अशा प्रकारे स्थूल शरीरपिंड तयार झाल्यानंतर त्या शरिराचा संचालक म्हणजे लिंगात्मा. हा लिंगात्मा अंत:करणाचे माध्यमातून व्यक्त होतो.

**अ) अंतःकरणपंचक**

अंत:करण म्हणजे मन, बुध्दि, अहंकार, चित्त, चैतन्य. अशा पाच घटकाद्वारे कार्य होत असते.

या प्रत्येक घटकाचे ५-५ गुण आहेत.

१) मन - संकल्प, विकल्प, मूर्च्छा, जडता, मनन

२) बुध्दी - विवेक, वैराग्य, शांती, संतोष, क्षमा

३) अहंकार - अभिमान, मद, सुख, दु:ख, मीच माझे हा भाव

४) चित्त - मति, धृति, स्मृति, त्याग, स्वीकार

५) चैतन्य - विमर्श (प्रमाणाचे माध्यमातून वस्तु विचार ), शीलन (प्रयत्नपूर्वक गुणदोष चिकित्सा),धैर्य, चिंतन (स्वत:चे कार्याबद्दल सावधानता), निष्पृह (विषयभोगापासून अलिप्त)

अशा प्रकारे अंत:करणपंचकानंतर- कुलपंचक, व्यक्तिशक्तिपंचक, प्रत्यक्षकरण-पंचक, नाडी स्थान व त्यांचे कार्य , १० वायू, स्थूलशरीराचा उत्पत्तीक्रम असा विषय येतो.

**ब) कुलपंचक :**

कुल म्हणजे प्रमुख. व्यक्तीचे मन, बुध्दी, भाव, इंद्रिये यांचे जे व्यापार चालू रहातात त्यामध्ये ५ गोष्टी प्रमुख असतात. सत्व, रज, तम, काल, जीव यालाच कुलपंचक म्हणतात. आता या प्रत्येक गुणाचे कार्यगुण कोणते? ते आता पाहू.

सत्व - दया, धर्म, क्रिया, भक्ती, श्रध्दा.

रज - दान, भोग, शृंगार, वस्तुसंचय, स्वार्थीवृत्ती.

तम - विवाद, कलह (भांडण) शोक, वध, वंचन (फसवणे)

काल - कलना (मोजदात), कल्पना (वेगवेगळ्या काळातील विविध रचना उदा. ऋतुवैचित्र्य), भ्रांती(वय परत्वे होणारा बदल) प्रमाद (असावधानी व आळस) अनर्थ (अनिष्ट कार्य प्रवृत्ती)

| जीव → | जागृति, | स्वप्न, | सुषुप्ति, | तुरिया, | तुरियातीतता |
|---|---|---|---|---|---|
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | कर्माचे भान असणे | मनातले व्यवहार | मनोव्यापार नाही गाढ निद्रा | आत्मस्वरुपी एकाग्रचित्त | समाधीमध्ये चित्तलीन होणे |

**क) व्यक्तिशक्तिपंचक :**

व्यक्तीचे सूक्ष्म शरिरात ज्या गुणांनी व्यवहार चालू रहातो त्यास 'व्यक्तीपंचक' म्हटलेले आहे. ते आहे इच्छा, क्रिया, माया, प्रकृति, वाणी. त्यांचे द्वारे व्यक्त होते.

इच्छा - उन्माद, वासना, वांछा, चिंता, चेष्टा, संपत्तीची हाव.

क्रिया - स्मरण, उद्योग, कार्य, निश्चय, स्वकुलाचार. (मनोवृत्तीला क्रियात्मकरुप).

माया - मद, मत्सर, दंभ, कृत्रिमता, असत्य.

प्रकृति - आशा, तृष्णा (असमाधान). स्पृहा (अुमक एक वस्तू मिळावी अशी इच्छा),

कांक्षा - (एखादी वस्तू सतत जवळ रहावी ती कुणी घेऊ नये ही इच्छा), मिथ्या (न मिळू शकणाऱ्या गोष्टीची इच्छा )

वाणी - परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी, मातृका (बीजरुप वर्णमाला)

**ड) प्रत्यक्षकरणपंचक :**

याबाबतचा खुलासा असा आहे की, मानवाचे सुख व दु:ख भोगणारे हे जे शरीर आहे त्या शरीरप्राप्तीची ५ कारणे आहेत. ती म्हणजे कर्म, काम, चंद्र, सूर्य, अग्नि ही होत. योगशास्त्रानुसार हे भौतिक शरीर अग्नितत्त्व + चंद्रतत्त्व यांच्या संयोगातूनच स्थिर रहाते.

इथे भोग्यवस्तू चंद्ररस किंवा सोमरस असून अग्नितत्त्व  भोक्ता आहे. सूर्य व अग्नी हे काही ठिकाणी एकच असे सांगितले जाते. पण योगशास्त्रानुसार सूर्य १२ कलेने युक्त असून अग्नी १० कलानी युक्त आहे. चंद्राच्या १६ कला सांगितल्या आहेत. अशाप्रकारे या शरीराचे उपादानकारण सूर्य, अग्नी आणि चंद्र आहे. कर्म आणि वासना निमित्तमात्र आहेत. प्रत्यक्षकरणपंचक मध्ये प्रत्येकाचे ५-५ गुण असून ते शुभ, अशुभ, यश, अपकीर्ति अदृष्टफल असे आहेत.

कर्म - शुभ, अशुभ, यश, अपकीर्ती, अदृष्टफलसाधन

काम - रति, प्रीति, क्रीडा, कामना, आतुरता.

चंद्र - १६ कला + १७ वी १ कला जिला 'निवृत्ति' (निजकला) म्हणतात.

सूर्य - १२ कला + १३ वी १ कला जिला 'स्वप्रकाशता' (निजकला) म्हणतात.

अग्नी - १० कला + ११ वी १ कला जिला 'ज्योति' (निजकला) म्हणतात.

यानंतर नाडीसंख्येबद्दलचे विवेचन आहे.

**३) नाडीविवेचन :**

शरीराच्या १० द्वारासाठी १० नाड्यांची योजना आहे.

२ नाकपुडया - इडा आणि पिंगला, १ तोंड - सरस्वती, डोळे पूषा आणि अलंबुषा, २ कान - गांधारी आणि हस्तिजिंव्हिका, गुदद्वार-कुहू, लिंग-शखिनी, १ ब्रम्हरंध्र - सुषुम्ना. त्याचप्रमाणे १० वायूंचे शरिरातील काम पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

प्राण - ह्दय, नाग - ढेकर, अपान - गुदप्रदेश, कुर्म - डोळयाची उघड झाप, व्यान - सर्व शरीरभर, कृकल - शिंक, उदान - कंठ, देवदत्त - जांभई,  समान - नाभिप्रदेश, धनंजय - सर्व शरीर. यानंतर गर्भधारणा झालेनंतर जिवात्म्याचे स्थूल शरीराची वाढ कशी होते व अशा उत्पन्न झालेल्या स्थूल शरीरात कोणकोणते धातू काय प्रमाणात असतात याचे सविस्तर विवेचन या प्रथम उपदेशाच्या समारोपात श्री गोरक्षनाथांनी केलेले आहे. या पुढील विवेचनात श्री गोरक्षनाथांनी पिंड विचार म्हणजे व्यष्टिशरीर विचार स्पष्ट करताना मानवी शरीरात स्थित अशा ९ चक्रांचा उहापोह करुन नंतर या पिंडाचे आधारस्वरुप अशा क्रिया स्पष्ट केल्या आहेत. हठयोग शास्त्रातील त्या क्रिया कशा करावयाच्या व त्याचे या शरीरावर काय परिणाम होतात त्याची चिकित्सा वरील विवेचनात आहे. या शारिरिक क्रियांचे विवेचनानंतर मनाचा विचार महत्वाचा मानला आहे. मनावर संयम कसा करावा की जेणेकरुन आपले ध्येय साध्य करता येईल हे स्पष्ट केले आहे. त्यानंतर आत्म्याचा विचार पुढे ठेवला आहे. आत्मा हा आकाशाप्रमाणे व्यापक आहे. मनाच्या संयमानंतर आकाश तत्त्वावर ध्यान करणे जरुर आहे. त्यासाठी व्योमपंचकवर (आकाशतत्व) ध्यान कसे करावे ते स्पष्ट करुन

या आकाश तत्त्वावर ध्यान सिद्ध झालेली व्यक्ती (साधक) आकाशाप्रमाणे निर्मल, व्यापक व तेजोमय होते असे स्पष्ट केले आहे.

वरील विवेचनात श्री गोरक्षनाथांनी साधकासाठी जे अनिवार्य आहे जे केलेच पाहिजे अशा बाबींचेच विवेचन आहे. अशा प्रकारे शरीर, मन व आत्मा अशा सूत्रानुसार शरीर घटकाची साधकाचे दृष्टीने उपासना किंवा साधना कशी करावी हा तत्त्वाचा किंवा योगक्रियांचे पध्दतीचा खुलासा करुन त्यानंतर श्री गोरक्षनाथ हे अष्टांग योगाचे विवेचन करतात. पिंडाची उत्पत्ती झाल्यानंतर या पिंडाची व्यापक अशी ब्रम्हांडावस्था कशी प्राप्त करावी किंवा त्याचा अनुभव कसा घ्यावा हा उद्देश समोर ठेवून हे शास्त्रविवेचन साधकांना सांगितले आहे.

वरील विवेचनातील महत्वाचे स्पष्टीकरण

## ४) नवचक्र (पिंडविचार)

| क्र. | चक्र | स्थान | ध्यान | विशेष |
|---|---|---|---|---|
| १. | ब्रम्हचक्र | मूलाधार | अग्नीचे | मुलकंद + कामरुपपीठ |
| २. | स्वाधिष्ठान | स्वाधिष्ठान | शिवलिंगाचे | उड्डियान पीठ या साधनेने आकर्षण शक्ती प्राप्त होते |
| ३. | नाभिचक्र | मणिपूर | अरुणोदयी सूर्याचे (व्यापक) | समग्रसिध्दिप्राप्ती |
| ४. | अनाहतचक्र | हृदय | शिवलिंगाचे आकृतीची ज्योत | यातून ''हंसकला'' शक्ती प्राप्त सर्व इंद्रिये ताब्यात येतात |
| ५. | कंठचक्र | विशुध्द (कंठ) | सुषुम्ना नाडीचे किंवा ब्रम्हनाडीचे ध्यान | मानसिक संकल्पाची सिध्दी |
| ६. | तालुचक्र | पडजीभ (घंटिका) | निराकार शून्याचे ध्यान | पडजिभेच्या मुळापासून तालुपर्यंतचा मार्ग आहे त्याला ''राजदंत'' मार्ग किंवा ''शंखिनी विवर'' म्हणतात.हेच दशमद्वार आहे. (लय समाधी प्राप्त) |
| ७. | भ्रूचक्र (आज्ञाचक्र) (मध्यमचक्र) | दोन भुवया मध्ये | ज्ञाननेत्राचे | वाणी सिध्दी |
| ८. | ब्रम्हरंध्रचक्र (निर्वाणचक्र) | ब्रम्हरंध्र | धूमसदृष तेजाचे | मोक्षप्राप्ती (जालंदर पीठ) |
| ९. | आकाशचक्र | सहस्त्रारचे वर | निराकार परमशून्याचे | पूर्ण गिरीपीठ सर्व संकल्पसिध्दी |

वरीलप्रकारे पिंडस्थित चक्रांची स्थाने, ध्यान व त्याचे परिणाम स्वरुप विशेष सिध्दीप्राप्तीचे विष्लेषणानंतर आता हठयोगाच्या क्रिया की ज्यामुळे हे शरीर अष्टांगयोगासाठी सिध्द होऊ शकेल त्या क्रिया या आधारस्वरुपच ठरतात.

**षोडशआधार:** अथ षोडश आधारा: कथ्यन्ते।। म्हणून त्याबाबत विवेचन उपदेश २ मध्ये सूत्र १० ते सूत्र २५ पर्यंत दिलेले आहे.

| क्र. | आधार | ध्यान | परिणाम |
|---|---|---|---|
| १. | आंगठा (पायाचा) | आंगठ्याच्या टोकावर | नेत्रज्योत स्थिर होते |
| २. | मूलाधार | डाव्या पायाचे टाचेने शिवण दाबून धरणे | शरीरातील अग्नी प्रदीप्त होतो |
| ३. | गुदद्वाराधार | आकुंचन + प्रसरण व नंतर स्थिर | अपानवायू स्थिर |
| ४. | लिंगाधार | लिंगसंकोच | भ्रमर गुंफेत वीर्यस्तंभन यालाच 'वज्रोली' क्रिया म्हणतात. |
| ५. | उड्डियाणाधार | लिंगमूळ व नाभीमूळाच्या मध्ये | मलमूत्र कमी होते. |
| ६. | भाभि आधार | एकाग्रतेने ॐ उच्चार | नादलय |
| ७. | हृदयाधार | प्राणवायू संयम | अनाहत चक्रविकास |
| ८. | कंठाधार | हनुवटी गळ्यावर दाबून जालंदर बंध साध्य करणे | चंद्रसूर्य नाडींमध्ये वायू स्थिर केला जातो. |
| ९. | घंटिकाधार | पडजिभेच्या मुळाला आपल्या नेहमीच्या जिभेने (उलटी फिरवून) स्पर्श करणे | अमृतपानाचे फायदे शरीर स्वस्थता व पुष्टता. |
| १०. | तालुआधार | पडजिभेच्या वर आत घशात जिभेचा प्रवेश | 'खेचरी' मुद्रा साधक काठीप्रमाणे स्थिर होतो (जडसमाधी) |
| ११. | जिंव्हाधार | जिभेच्या मुळाला जिभेचे टोक लावून स्थिर रहाणे | समस्त रोग निवृत्ती |
| १२. | भ्रुमध्याधार | भ्रुमध्यामध्ये चंद्रमंडळाचे ध्यान | शीतलता + प्रसन्नता |
| १३. | नासाधार | नाकाचे टोकावर | मनाची चंचलता नष्ट होते |
| १४. | नासामूलक कपाटाधार | नाकाचे दोन्ही छिद्रामध्ये | ६ महिन्यात ज्योतिपुंजदर्शन |
| १५. | ललाटाधार | ललाटावर | तेज |
| १६. | आकाश (ब्रम्हचक्राधार ) | गुरुचरणकमलाचे ध्यान | साधक आकाशाप्रमाणे व्यापक होतो |

### ५) मन:संयमाच्या साधनप्रक्रिया (लक्ष्यत्रय) :

मनाचा संयम करण्यासाठी ज्या क्रिया करायचा आहेत त्या बाबत 'त्रिविध लक्ष्य' असे सांगून त्याचे स्पष्टीकरण सूत्र २७ ते सूत्र २९ मध्ये केलेले आहे.

मन:संयमासाठी साधनप्रक्रिया दिल्या आहेत त्या अशा:

**अ) अंतर्लक्षी साधना :**

१) बेंबीखाली पक्षाच्या अंड्याच्या आकाराचा ७२००० नाडींचा गोळा - त्यापासून सहस्त्रार पर्यंत पाठीच्या कण्यातून करोडो वीजेच्या चमचमाटात प्रकाशमान अशी कुंडलिनी शक्ती वहात आहे असे ध्यान करणे

२) मस्तकाचे वरील भागास 'गोल्हाट' म्हणतात त्यावर ध्यान करणे

३) भ्रमरगुंफेमध्ये रक्तवर्णी भुंग्यावर ध्यान करणे

४) दोन्ही कान बंद केल्यानंतर येणाऱ्या आवाजावर ध्यान करणे

५) दोन्ही डोळ्यांमध्ये निळ्या जोतिरुप बाहुलीवर ध्यान करणे

**ब) बहिर्लक्षी साधना :**

१) नाकाचे शेंड्यावर (लाल तेजावर)

२) नाकापुढे १० बोटावर (जलतरंगावर)

३) नाकापुढे १२ बोटावर (पिवळे पृथ्वीतत्त्व)

४) आकाशाकडे (आकाशतत्त्व )

५) उर्ध्वदृष्टी (त्याचा मध्य)

६) अंतर्मुख दृष्टी (सुवर्णरंगाची पृथ्वी)

**क) मध्यम लक्षी साधना :**

यामध्ये कोणतेही स्थान नक्की केलेले नसते. तर कोणत्याही प्रकारच्या बाहेरच्या वस्तूवर वा रंगावर ध्यान करण्याचा अभ्यास असतो.

यानंतर आत्म्याचा विचार आहे. त्यासाठी आत्मा हा व्यापक स्वरुपात आकाशासारखा असतो म्हणून 'व्योमपंचक' दिले आहे.

आकाश
पराकाश
महाकाश
तत्त्वाकाश
सूर्याकाश

} यामध्ये अंध:कार समान, अग्नीसमान, आनंदस्वरुप, प्रखर सूर्यप्रकाश, निराकार अशा वेगवेगळ्या आकाश स्वरुपावर ध्यान सांगितले आहे.

हा आत्मतत्वाचा योगाभ्यास झाल्यानंतर अष्टांगयोगाचा प्रत्यक्ष व्यवहार व अभ्यास दिलेला आहे.

**६) अष्टांगयोग :**

१) यम : हळूहळू इंद्रियांना विषयापासून दूर करणे (शांती मिळवणे). (अुपशम:)

२) नियम : मानसिक क्रियांचे नियंत्रण. (मनोवृत्तीनां नियमनम्)

३) आसन : परमात्मस्वरुप चेतनेला एक निश्चित बैठक देणे. (स्वस्वरूपे समासन्नता)

४) प्राणायाम : शरीरनाड्यामधून वहाणाऱ्या वायूला स्थिर करणे. (प्राणस्य स्थिरता)

५) प्रत्याहार : इंद्रियांची विकार समाप्ती. (चैतन्यतुरंगाणां प्रत्याहरणम्)

६) धारणा : शरिराचे बाहेर व आत एकच आत्मतत्त्व आहे. (स्वात्मानं निर्वातदीपमिव संधारयेत)

७) ध्यान: सर्व वस्तूत आत्मतत्त्व पहात समदृष्टी धारण करणे. (सर्वभूतेषु समदृष्टि:)

८) समाधी : परिश्रम रहित सहज अशी तटस्थ अवस्था. याठिकाणी एक बाब लक्षात येते की. (सर्वतत्वानां समावस्था)

श्री गोरक्षप्रणीत व पातंजलप्रणीत योग यात काही भेद आहेत. त्याबाबतची चर्चा याच प्रबंधात नंतरचे प्रकरणात केलेली आहे.

वरीलप्रमाणे पिंडविचार व विस्तार समजून घेतल्यानंतर रक्त, मांस, अस्थि यांनी युक्त अशा या मर्त्य शरीराचा योगशास्त्रात इतका खोलवर विचार का केलेला आहे? देह नष्वर आहे व साध्य हे ईश्वरानुभूती हे आहे मग हा देहाचा विचार इतका बारकाईने का? तर त्याबाबत श्री गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञानांतर्गत जे विचार आहेत त्यामधला महत्वाचा व केंद्रस्थानी ठेवता येईल असा विचार म्हणजे पिंडी ते ब्रम्हांडी व ब्रम्हांडी ते पिंडी. याबाबत तृतीय उपदेश मधील सूत्रच पुढीलप्रमाणे आहे.

पिंडमध्ये चराचर यो जानाति स योगी पिंडसंवित्तिर्भवति। - उपदेश ३/१

म्हणजे या देहामध्ये, जो चर - अचर ब्रम्हांडाचे ज्ञान प्राप्त करुन घेतो त्यास ‘पिंडसंवित्ति’ म्हटलेले आहे. त्याबाबत विस्तारानी सांगत असताना ते म्हणतात. त्याची सूत्रे : देहामध्ये - ७ पाताळ (सूत्र २), २१ ब्रम्हांड (सूत्र ३-४+५), ६४ कला (सूत्र ६), ७ समुद्र (सूत्र ७+८), ९ खंड (सूत्र ९), पर्वत (सूत्र १०), ९ महानद्या (सूत्र ११), २७ नक्षत्रे, १२ राशी, ९ ग्रह, १५ तिथी, ७२ हजार नाडी, कुलनाग, मुनींचे संघ, देवदेवता, भूतप्रेत, दानव, राक्षस, तंत्रपीठ, पर्वत, गंधर्व किन्नर, देवताशक्ति, मेघ,तीर्थ, सिध्द, चंद्र सूर्य, वृक्षलता, कृमी कीटक, स्वर्ग, नरक, मोक्ष या सर्वांची स्थूलसूक्ष्मरुपाने उपस्थिती.

या पिंडसंवित्तीचा समारोप करताना सूत्र १३ मध्ये श्री गोरक्षनाथ म्हणतात.

एवं सर्व देहेषु विश्वरुपपरमेश्वर: परमात्मा अखंडस्वभावेन घटे घटे चित्स्वरुप: तिष्ठति। एवं पिंडसंवित्तिर्भवति।।’ - उपदेश ३/१३

**अर्थ :** अशाप्रकारे सर्व देहामध्ये हा विश्वरूप परमात्मा परमेश्वर अखंड स्वरूपात प्रत्येक शरीरात एकरूप होवून उपस्थित आहे असे जाणणारा साधक ‘पिंडसंवित्ती’ होतो.

अशा प्रकारे पिंडामध्येच चराचरसृष्टीचे ज्ञान होणे व अनुभव येणे अशा प्रकारच्या ज्ञानस्थितीनंतर या सर्व चराचर सृष्टीची व पिंडाचीच नव्हे तर सर्व भौतिक पदार्थाचे माध्यमातून जे चेतन ब्रम्ह त्याच्या निजा, परा व सूक्ष्म शक्तीद्वारे अभिव्यक्त होते ती शक्ती आदि शिव+शक्ती अशा समरसतेतून व्यक्त होत असताना तिचे कार्य महाशक्ती कुंडलिनीच्या माध्यमातून चालते. सिध्दसिध्दांतपध्दतीच्या चतुर्थ उपदेशामध्ये कुंडलिनी शक्तीच्या कार्यपध्दतीचे विश्लेषण केले आहे. या शक्तीला त्यांनी पिंडाधारशक्ती म्हटलेले

आहे. ही शक्ती परा, सत्ता, अहंता, स्फुरता व कला या पाच प्रकारे सर्व विश्वाची आधारभूत बनते. शिवतत्त्वात ती सुप्त रुपात असते. त्याला 'अकुल' अवस्था म्हणतात. विश्वाचे सृजन करती झाली की तिला 'कुल' म्हणतात. परमेश्वरी तत्त्वात ती सामरस्यात्मक अशी एकरुप रहाते. पण लोकव्यवहारात कुंडलिनी शक्ती अनंत रुपात प्रकट होते. मात्र शिव व शक्ती यांचे तादात्य सततच असते.

शिवस्याभ्यंतरे शक्ति: शक्तेरभ्यंतरे शिव।

अंतरं न एव जानीयात् चंद्रचंद्रिकयो रिव।। - उपदेश ४/२६

**अर्थ -** शिवाच्या अंतरंगात शक्ती व शक्तिच्या अंतरंगात शिव असतो. चंद व चंद्रिका यांच्या प्रमाणे त्यात भेद नाही.

प्रत्येक देहपिंडात ही कुंडलिनी शक्ती स्वभावत:च प्रबुध्द (चेतनस्वरुप) असते. पण जोपर्यंत तिला जागे केले जात नाही तोपर्यंत ती संसारी लोकांसाठी शोक, चिंता, मोह या घटकांशी संबंधीत रहाते व एक प्रकारे भवबंधनकारिणी बनते. पण जेव्हा तिला जागे केली जाते तेव्हा ती उर्ध्वगामिनी बनून सर्व विकारांचा नाश करते. तिला जागृत करण्यासाठी प्राणायाम, उड्डियानबंध व जालंदरबंध सिध्द करावे लागतात. ही शक्ती उर्ध्व, मध्य व अध अशा तीन प्रकारे कार्यरत असते. ही शक्ती समस्त जगत् प्रपंचात विद्यमान रहाते. ती परमसत्ताधीश असल्यामुळे तिला 'विमर्शरुपिणी' विद्या असे म्हटले जाते व ती 'अलख निरंजन' म्हणजे आत्मस्वरुपाचा साक्षात्कार घडवते. म्हणून श्री गोरक्षनाथ म्हणतात.

अथ उर्ध्वशक्ति निपातेन महासिध्दयोगिभि: परमं पदं प्राप्यत इति सिध्दम्।।

- उपदेश ४/२७

**अर्थ -** म्हणून महासिद्धयोगी उर्ध्वशक्तीपातनातून परमपद प्राप्त करून घेतात.

श्री. गोरक्षनाथांनी अशा प्रकारे कुंडलिनी शक्तीचे स्वरुप व कार्य चतुर्थ उपदेशामध्ये स्पष्ट केले आहे. यानंतरचा विषय आहे स्वकीय पिंड व समष्टी पिंड यांचे ऐक्यत्व अनुभविणे. हे ऐक्यत्व अनुभविणे म्हणजेच पिंडी ते ब्रम्हांडी व ब्रम्हांडी तेच पिंडी याचा निर्विकल्पक अनुभव घेणे होय. यासाठी मूलाधारस्थित कुंडलिनी महाशक्तीला गुरुंच्या नेटक्या मार्गदर्शनाखाली व कृपेच्या छायेत जागृत करणे व तिचा सहस्त्रार पर्यंतचा प्रवास होण्यासाठी योग साधना करुन व्यष्टिपिंड आणि सच्चिदानंद- परमात्मरुप समष्टीपिंडाचे ज्ञान प्राप्त करुन त्यांचे ऐक्य अनुभवून मोक्षाचे व आनंदाचे स्वामी होणे अशासाठी योगानुष्टान करणे आवश्यक असते. हे जे परमज्ञान व परमपद आहे त्यास प्रत्यक्ष शिवानी स्वसंवेद्य परमपद म्हटले आहे. या अवस्थेचे अनिर्वचनीय स्वरुप व त्याची दु:साध्यता यासाठी मार्गदर्शक गुरुंची नितांत आवश्यकता सांगितली आहे. त्याबाबत श्री गोरक्षनाथ पंचम उपदेश मध्ये म्हणतात.

तस्माद् गुरुकटाक्षपातात् स्वसंवेद्यतयाच महासिध्दयोगिभि:।

स्वकीयं पिंड निरुत्थानानुभवेन समरंस क्रियते इति सिध्दात:।। - उपदेश ५/७

**अर्थ -** म्हणून मोठे योगी सुद्धा गुरूकृपाकटाक्ष व स्वत:चे उपासनेतून व्यष्टी व समष्टीचे अभिन्नत्व अनुभवितात असा सिद्धांत आहे. अशा प्रकारच्या समरसतापूर्ण अनुभवानंतर तो योगी सिध्दयोगी बनतो. त्यास अनेक सिध्दी प्राप्त होतात. त्याच्या वेशभूषेबद्दलही सूत्रे दिलेली आहेत. त्याचबरोबर या विशेष अवस्थेच्या साध्यतेसाठी गुरुकृपेबरोबरच सद्‌गुरुसेवा ही आवश्यक असते. त्याचप्रमाणे, परमात्मा व जिवात्मा यांचे एकरुपतेबद्दल सहज ज्ञान (अद्वैत), संयम, गुरु उपदेश, अशा प्रकारचे प्रयत्न हे १२ वर्षे करावे लागतात व त्यामध्ये क्रमश: योगसिध्दी प्राप्त होतात असे म्हटले आहे. व तो योगी शिवस्वरुपच होऊन जातो. म्हणून श्री. गोरक्षनाथ म्हणतात.

अनुबुभूषितयोनिजविश्रमं स गुरुपादसरोरुहमाश्रयेत्।

तत् अनुसंसरणात् परमं पदं समरसीकरणं न च दूरत:।। - उपदेश ५/४५

**अर्थ :** जो योगी शांती व मोक्षाचा अनुभव घेऊ इच्छितो त्याने गुरुचरण कमलांचा आश्रय घेतला पाहिजे. त्या अनुसरणातून परमपदाचा व एकतेचा अनुभव सहजशक्य होतो. त्याचप्रमाणे सिध्दगुरुंची वंशपरंपरा, परमपदप्राप्तीनंतर कोणतेहि नियमबंधन योग्यास नसते, योगाच्या ५ अवस्था, गुरु प्रसाद हा हेतू, गुरुसामर्थ्याचे वर्णन, भवसागराची भीषणता व तो पारकर्ता एकमेव गुरु, गुरुकृपेशिवाय चित्तविश्रांती नाही हा निष्कर्ष असा विषयविस्तार करुन पंचम उपदेशाचा समारोप केला आहे. आता या मुद्यांचा थोडक्यात परामर्ष घेणे जरूरीचे आहे. त्याचप्रमाणे गोरक्षनाथांनी सिद्धवंशपरंपरेचेही विवेचन केले आहे. मात्र त्या तपशीलात जाणेचे फारसे कारण नाही. कारण माझ्या दृष्टीने गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन हेच महत्त्वपूर्ण आहे. गुरूप्रसाद व गुरूसामर्थ्याचे उल्लेख गोरक्षनाथांनी अनेकवेळा केलेले आहे. तथापी त्यासंदर्भात फारशी मांडणी करण्याची आवश्यकता नाही असे वाटते. श्री. गोरक्षनाथांच्या मते, ज्या शिष्याला अखंडपरमात्मस्वरूप परमपद प्राप्ती होते असा शिष्य 'अवधूत' अवस्थेला पोहोचतो. अशा अवधूत अवस्थेला पोहचलेला शिष्य जितेंद्रिय असतो तसाच तो आत्मबुद्धीरत असतो. ब्रह्मरूपता हीच त्याची ध्येयप्राप्ती असते. एका अर्थाने तो ब्रह्मांड जाणणारा असतो. स्वत:ला जाणणे व ब्रह्मांडाला जाणणे या दोन्ही गोष्टी 'सामरस्य मोक्षात' अंतर्भूत असतात.

**७) उत्क्रांतीक्रमाची मांडणी :**

परपिंड (ईश्वरपिंड), अनादिपिंड, आद्यपिंड, हिरण्यगर्भ, महासाकारपिंड, पंचभौतिक शरीर, लिंगात्मा, अंत:करण व पुढील वेगवेगळे पंचक, नाड्या, वायू असा क्रम

देऊन शरीर, मन, आत्मा या क्रमाने विषयाची मांडणी केली आहे. तसेच साधना कशी करावी त्यासाठी योगाचे अष्टांगविवेचन गोरक्षनाथांनी केले आहे. हा सृष्टीविकासक्रम ऋग्वेदामधेही येवून गेला आहे. ऋगवेदीय प्रार्थनेमध्ये याचा उल्लेख आढळतो. वेदाप्रमाणेच प्रश्न, मुंडक, ऐतरेय, श्वेताशतर इत्यादी उपनिषदांमध्येही विश्वोत्पत्तीचा विचार केलेला दिसून येतो. गीता अध्याय १३ व त्यावरचे ज्ञानेश्वरांच्या भाष्यामध्येही विश्वोत्पत्तीचा (ज्ञानेश्वरी १३/९८१ ते १०००) विचार मांडलेला आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, शरीरात आहे ते ब्रम्हात आहे. हाच अर्थ ब्रम्हांडी ते पिंडी व पिंडी ते ब्रम्हांडीमधून व्यक्त होतो. हे श्री गोरक्षनाथांचे जे तत्त्व आहे ते परमतत्त्व आहे. मानवाच्या शरीरातील सूक्ष्मातिसूक्ष्म तत्त्व म्हणजे इलेक्ट्रॉन, प्रोटॉन व त्यावरचा विद्युतभार हे ब्रम्हतत्त्वच आहे. तेच विश्वात आहे. ही विश्व व्यापकता व एकरुपता जेव्हा व्यक्ती समजून घेत नाही किंवा अनुभवत नाही तेव्हा अनेक दुष्कृत्ये करत स्वार्थी जीवन जगत रहाते व जीवनमृत्यूच्या चक्रात अडकते. एकरुपत्व अनुभवलेली व्यक्ती मात्र परमतत्त्वाचे साम्राज्याचा नागरिक बनते.

## ८) योगाचे सर्वसमावेशक स्वरूप :

येथे योगाविषयीची परिपूर्ण चर्चा करण्याचा विचार आहे. माझ्या मते पातंजलयोग व नाथयोग यांच्यात काही भेद आहेत. पहिली गोष्ट अशी की, पातंजलयोग हा नाथयोगापेक्षा प्राचीन आहे. असेही म्हणता येईल की, पतंजलींच्या पूर्वी योगमार्ग प्रचलीत असावा. पतंजलींचे कार्य म्हणजे त्या काळात प्रचलीत असलेल्या योग्यमार्गाची त्यांनी योगसूत्रात मांडणी केली. हे त्यांचे कर्तृत्व होय. असे हे पातंजलकृत योगदर्शन व त्याची मांडणी मी येथे करणार आहे. हे करताना नाथयोग व पातंजलयोग या दोहोंची योग्य तेथे तुलनाही करणार आहे. 'डायमेन्शस् ऑफ योग' हा कुमारस्वामींचा प्रसिद्ध ग्रंथ असून त्याचाही आधार घेतलेला आहे. त्यादृष्टीने खालील मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतील असे मला वाटते.

१) योग क्रिया ही रुपांतरणाची क्रिया आहे. नुसती अुन्नयनाची नाही (it is not only sublimation but a process of transformation). आंबट फळ यथावकाश गोड होते. इथे गुणांचा नाश होत नाहीतर त्यात बदल होतो. त्याप्रमाणे जेव्हां वासना या असीमाच्या म्हणजे ईश्वरानुभूतीच्या प्रेमाने व ओढीने क्रियाशील होतात तेव्हा त्या वासनांचे शांततेत रुपांतरण होते. योग हे असे तंत्र आहे की जे मानवास वासनेच्या अतीत म्हणजे पार जाण्याचा मार्ग खुला करते. इंद्रियजन्य जाणिवेच्या पलिकडील कक्षेत कसे जायचे याचा अनुभव देते. या प्रकारे एका सुसंगत अशा परिपूर्ण जीवनाची निर्मिती होऊ शकते. इथे अुन्नयन व रुपांतरण (Transformation) यातला फरक स्पष्ट करताना असे म्हणता येते

की रुपांतरण ही जाणिवेची सर्वोच्च अवस्था असते तर अुन्नयन (sublimation) मध्ये फक्त मान्यता प्राप्त बदल म्हणजे एकप्रकारचा दिशाबदलच असतो.

२) योगात मानसिक शुध्दी व शिस्त अभिप्रत असते. आता मानस कसे बनते? तर मनाच्या निर्मितीमध्ये सत्व, रज व तम हे तिन्ही अंतर्भूत होत जातात. योग साधनेमुळे सत्व हे ज्ञानाच्या प्रकाशातून दिसते, रज हे तप:सामर्थ्यातून प्रगट प्रगट होते व तम हे समज व शांततेतून प्रगट होते.

३) उत्क्रांती वादाच्या अनेक सिध्दांतांतून जे निष्कर्ष मांडले गेले आहेत त्याबाबतीत योग असे म्हणतो की, भौतिक वस्तू म्हणजे शक्तीतत्व + तम (Matter = Energy + Tamas). या तमसमधील जडत्व जर बाजूला केले तर वस्तूचे अस्तित्वच बदलते. हा एक मूलगामी सिध्दांतस्वरुप विचार योगशास्त्राने मांडला आहे. 'तम' जर बाजूला करु शकलो तर सत्वाचे तेजात, रजाचे सुखद स्पंदात, तमाचे शांत संतुलित अवस्थेत रुपांतर होते. हा फार महत्वाचा विचार योगाने दिलेला आहे.

४) योगाची व्याख्या गीतेच्या २ ऱ्या अध्यायात मध्ये केलेली आहे.

योगस्थ कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।
सिध्द्यसिध्द्यो: समो भूत्वा समत्वं योग उच्यते।। - गीता २/४८

**अर्थ:** म्हणजे आसक्तीचा त्याग करुन सिध्द असो वा असिध्द असो समान बुध्दी ठेऊन योगस्थ होऊन कर्तव्यकर्म कर।

५) सांख्य तत्वज्ञानाचा व्यावहारिक जीवनात उपयोग करणे म्हणजे योग

६) योगाची पध्दती ही तार्किक किंवा आध्यात्मिक नसून ती मानसिक व व्यावहारिक आहे.

७) प्रकृतीला आध्यात्मिक प्रवासातील अडचण न मानता प्रकृती हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे असे योग मानतो.

८) वैश्विक चैतन्यशक्तीला स्वत:कडे प्रवाहित करण्याची इच्छा व प्रयत्न करणे. व त्याचवेळी आपण मानसिकदृष्टया स्वीकृतीसाठी खुले (open) असणे, ही क्रियायोगात अभिप्रेत आहे.

इंडोनेशियामध्ये वरील तंत्र वापरुन ध्यानाचा विधी शिकवला जातो. त्याला 'लतिहान' म्हणजेच स्वत:स खोलणे असे म्हणतात. (To make oneself open to the Cosmos) या तंत्राच्या मुख्य गुरुंचे नांव आहे 'वपक सुबुद'[१] (संदर्भ: योगदर्शन भाग १ व २, पान ४६९ / ४७०)

९) सर्व अस्वस्थता व गैरव्यवस्था दूर करण्याची शक्ती योगामध्ये आहे.

१०) योगाचे मूलभूत सूत्र हेच गोरक्षतत्त्वज्ञानाचे मूलभूत सूत्र आहे. ते म्हणजे ब्रम्हांडी ते पिंडी व पिंडी ते ब्रम्हांडी.

११) अंत:प्रेरणेची शक्ती कार्यान्वित करण्याचे कार्य योग करतो.

१२) योग हा विषय मानवाच्या स्वत:च्या खऱ्या स्वरुपाविषयीच्या ज्ञानाशी निगडीत आहे असा निष्कर्ष आधुनिक विज्ञानाचे प्रांतातील प्रतिथयश शास्त्रज्ञांनीही स्वीकारला आहे उदा. -

अ) सर आर्थर एडिंग्टन म्हणतात – “That science is concerned with the rational co-relation of experiences, that is, with sensory awareness rather than with the discovery of fragments of absolute truth about the external world, is a view which is now widely accepted.”

ब) सर जेम्स जीन्स म्हणतात – “Our studies can never put us into contact with reality. We can never penetrate beyond the impressions that reality implants in our mind. A science which confines itself to correlating the phenomena can never learn anything about underlying the phenomena.”

क) श्री टायरेल लिहितात – “The world of science is not in fact an access of deeper insight into the nature of things. Rather an artificially separated view of reality or a peep of the world seen from a particular angle.”

ड) श्री ॲलेक्सिस कॅरेल म्हणतात – “The only possible remedy for this evil is much more profound knowledge of ourselves”.

यावरून स्पष्ट होते की, अनुभववादी शास्त्रातून निसर्गाचे रहस्य व मानवाचे खरे स्वरुप कळू शकत नाही. योगमार्गातून अस्तित्वाचे मूलभूत स्त्रोत जसे कळत जातील तसे तसे ह्या स्वरुपाचा उलगडा होत जातो. बहिर्गत व अंतर्गत सृष्टीचा संबंध व त्याचा व्यक्तीच्या व सामाजिक स्वास्थाशी निगडित असा जो परिणामस्वरुप विचार आहे त्याचा ही अर्थबोध होऊ लागतो.[२] (Ref : अ, ब, क, ड Dimensions of yoga page 92, 93)

१३) हाच विषय जाणिवेच्या गहनस्तरावरचे जे मानसशास्त्र आहे. (Depth psychology) त्यामध्ये स्पष्ट केला गेला आहे. त्याची व्याख्या दिलेली आहे. ती अशी - "that which probes into the motivation or so called dynamic aspects of personality especially those of which an individual is not aware of”[३] (Ref : Int. to psychology, Page 500)

१४) योग : आचार विचारांचा संयम व समन्वय म्हणजे योग. उदा. पाश्चात्य जीवनाची व्याप्ती वाढलेली दिसते. पण खोली व तृप्ततेचा अभाव दिसतो.

तर पौर्वात्य जीवनात जीवनाच्या व्याप्तीकडे लक्ष दिले गेले नाही. या दोन्हीचा समन्वय म्हणजे योग. श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या तत्त्वज्ञानात या ‘समन्वय’ किंवा ‘सामरस्य’ किंवा ‘समरसीकरण क्रिया’ यांना मूलभूत स्वरुपात महत्व देऊन त्याची स्पष्टता विविध सूत्रातून केलेली आहे. तिचा परामर्श नंतरच्या प्रकरणात करण्यात आला आहे.

१५) शरीर विज्ञानाच्या दृष्टीकोनातून योग म्हणजे प्राण व अपान यांचे संतुलन. शरिरांतर्गत प्राण, अपान, व्यान, उदान, समान असे पाच वायू काम करत असतात. यामध्ये प्राणाची उर्ध्वगती व 'अपान'ची अधोगती या दोन विरुध्द दिशेच्या क्रियांचे संतुलन साधून एक स्थिर अवस्था तयार करणे अशी क्रिया योगामध्ये अंतर्भूत असते.

१६) योग हा शब्द अनेक अर्थानी वापरलेला दिसून येतो उदा: आत्मसंयमन पूजा, ध्यान, ईश्वराशी एकरुपत्व. योग ही एकाच वेळी क्रिया पण आहे व साध्य पण आहे. याचा अर्थ असा की ही एक अशी क्रिया असते की ज्यामुळे आपले व्यक्तिमत्वाचे पूर्ण परिवर्तन होऊन आपल्या आत्म्याचा विश्वात्म्याशी असलेल्या एकरुपतेचा अनुभव येतो. ही एकता अनुभवण्यासाठी योग्य प्रयत्न, उत्कट भक्ती, तीव्र ज्ञानसाधना अशा माध्यमातून प्रयत्न करावे लागतात. त्यातूनच कर्म योग, भक्ति योग, ज्ञानयोग असे काही विभाग त्यामध्ये केले गेले. याचप्रमाणे ध्यानयोग, शिवयोग, कुंडलिनीयोग, मंत्रयोग, लययोग अशाही विविध प्रकारच्या साधना आहेत. पण हे प्रकार फक्त विश्लेषणाच्या सोयीकरता आहेत. उदा. शरिराच्या शिस्तीसाठी व नियमनासाठी हठयोग, मनाच्या शिस्तीसाठी व नियमनासाठी राजयोग, इच्छेच्या शिस्तीसाठी व नियमनासाठी कर्मयोग, ज्ञानाच्या शिस्तीसाठी व नियमनासाठी ज्ञानयोग, डॉरमंट पिनिअल ग्लँडच्या (ग्रंथी) कार्यासाठी शिवयोग. या सर्वांचे संतुलन व विकसन आध्यात्मिक जीवनात होत असते. व त्यातूनच संपूर्ण रूपांतरण घडते.

१७) योगक्रियेतून निर्माण होणारी अंत:चेतनेची शक्ती (intuitive power) ही शास्त्रीय संशोधनाच्या जिथे मर्यादा येतात तिथून पुढे वापरता येऊ शकते.

१८) योगाभ्यासामुळे तसेच एकाग्रता व निदिध्यासामुळे जे अंत:स्फुरण जागे होते त्यातून अनेक आश्चर्यकारक असे अनुभव अनेकांनी घेतलेले आहेत. विज्ञानाचे क्षेत्रातील उदा. घायचे झाले तर बेझीन रिंगची रचना ही 'केकुले' नावाच्या शास्त्रज्ञास सापाने आपलीच शेपटी तोंडात धरली आहे या स्वप्न दृष्यातूनच स्फुरली. व सर्व Organic Chemistry ची बैठकच त्यातून तयार झाली.[४] (Ref: Dimensions of yoga page 155)

डॉ. जगदीशचंद्र बोस म्हणतात - This I know that no vision of truth can come except in the absence of all soures of distraction & when the mind has reached the point of rest. ही अंत:स्फूर्ती कशी काम करते? तिचा उगम कुठे असतो याविषयीचा खुलासा करताना प.पू. कुमारस्वामी त्यांच्या Dimensions of yoga मध्ये म्हणतात:

"We cannot understand intuition unless we view the elementary act of consciousness in its totality and the psychology of yoga alone will enable us to do this. Yoga is introspective psychology where the person is both observer and also object of observation which takes one away from two dimentional view of science."

प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ कार्ल युंग म्हणतो "We Europeans are not the only people on earth. We are just a peninsula of Asia and on that continent there are old civilization where people have trained their minds in introspection and psychology for thousands of years where as we began our psychology not even yesterday but only this morning. These people have an insight that is simply fabulous & I have to study eastern things to understand facts of consciousness."

न्यूटन, गॅलिलिओ, ऑपियर, फॅरेडे, सी. बनार्ड या शास्त्रज्ञांच्या महत्त्वपूर्ण संशोधनात ह्या अंतस्फूर्तीने (intuition) महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. डॉ. सी. जी. युंगने यासाठी introversion हा शब्द वापरला आहे. जाणिवेच्या कक्षेच्या पलिकडून हा विषय येतो असे त्यांचे म्हणणे आहे.[५] (Ref: Dimensions of yoga page 159 and Psy. By Munn Page 235)

योगी अरविंदांनी योगाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण काम केलेले आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी 'मुक्तीगाथा महामानवाची' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये 'प्रमेयांचे उद्यान' असे एक प्रकरण आहे. त्यामध्ये श्री. अरविंदांचे उद्‌गार पुढीलप्रमाणे दिलेले आहेत. ''आजच्या युगातील दु:खे, क्लेश, विस्कळीतपणा, भोग, रोग, मृत्यु यावर एकच उपाय आहे व तो म्हणजे 'The Man of Today has to grow inwardly' म्हणजेच चालू यूगातील माणसाने अंतर्मूख होवून प्रगती केली पाहिजे. त्यासाठी पूर्णयोगाचे आचरण हाच एकमेव उपाय श्री. अरविंद सूचवतात. त्यासाठी ईश्वरकृपा, श्रद्धा, प्रामाणिकपणा व समर्पण हवे.[६] (संदर्भ - मुक्तीगाथा महामानवाची, पान २०१) त्याचा मूलमंत्र त्यांनी खालीलप्रमाणे मांडला आहे.

Be yourself, Transform yourself & Transcend yourself.

योगाच्या या सर्वसमावेशक अवस्थेतील हा विश्वएकत्वाचा अनुभव योग्याचे सर्व ठिकाणचे व्याप्तव्य स्पष्ट करतो. या अतिसूक्ष्म स्तरावरचा अतिव्यापक अनुभव श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत खालील प्रमाणे ओवीबध्द केलेला आहे.

ऐसिया प्रतीती बोधसागरी। तू आपणेयाते कल्लोळू एककरी।
मग जव पाहासी चराचरी। तव तूचि आहासी।। - ज्ञा./९/९३

**अर्थ :** या अनुभवरुपी सागरात तू एक लाट बनून रहा. मग या चराचराकडे पाहू लागलास तर सर्वत्र तूच आहेस असे तुला दृष्टीस पडेल.

योग या विषयाचा वरीलप्रमाणे आढावा घेल्यानंतर योगाच्या क्षेत्रात पातंजल योग व नाथयोग असे जे दोन भिन्न मतप्रवाह आहेत, त्यांच्यामधील महत्वाचे फरक पहाणे हे तुलनात्मक मूल्यमापनासाठी आवश्यक आहे. त्यासाठी संदर्भ म्हणून पातंजल योगसूत्रे व श्री. गोरक्षनाथांचे सि.सि.प. व योगबीज हे ग्रंथ महत्त्वाचे ठरतात. योग, मग तो पातंजल योग असो अथवा नाथ योग असो, ती एक अंतर्यात्रा आहे व तिचे उद्दिष्ट मुक्ती हेच असते. प्राथमिक स्वरुपात ईश्वर म्हणून काही तत्त्व सुरवातीला मानण्याची गरज पडत नाही. मार्गस्थ होणे व तद्नुषंशिक अनुभव घेणे असा हा प्रयत्न व प्रचितीचाच विषय आहे. त्यामुळे मार्गावरील लहानसहान गोष्टींवर जरी एकमत असले तरी मुक्तीच्या प्रवासातील टप्प्यांबाबत मतभेद आहेत.

पंतजलींचा योग = ८ टप्पे

गौ. बुध्द = अष्टांगिक मार्ग (Eightfold path)

जैन = रत्नत्रय (श्रध्दा, ज्ञान व वर्तणूक)

याबाबतचे मुद्देसूद विष्लेषण "Renunciation" The path of freedom या प्रकरणात मिळते.[७] (Ref: Presuppositions of Indian philosophies page 36 to 44)

पातंजल योगपध्दती व गोरक्ष योगपद्धती यात साम्य दिसत असले तरी या दोन्ही पध्दती पूर्णपणे वेगळ्या आहेत. गोरक्षयोग पद्धतीस समांतर असे ज्ञानेशयोग, हठयोग, राजयोग असेही शब्द वापरले जातात.

१) पातंजल योग हा चित्तधारणेचा योग आहे. 'देशबंधश्चितस्य' धारणा - विभूतिपाद सूत्र १ म्हणजे शरिराच्या आतील देश (भाग) किंवा बाहेरील देह (सृष्टी) यातील कोणत्याही पदार्थावर चित्ताची वृत्ती स्थिर करणे असा या धारणेचा अर्थ आहे. तर ज्ञानेशयोग किंवा गोरक्षयोग हा कुंडलिनी योग व शक्तीसामरस्य योग आहे. येथे शक्तिजागरण व चक्रोत्थान या प्रक्रियांचा निर्देश आहे. याचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी शास्त्रकारांनी देहस्थ तत्त्वांच्या वेगवेगळ्या संख्या मांडल्या आहेत. प्रकृतीची ८ तत्त्वे व १६ विकार अशी २४ तत्त्वे मांडली आहेत. गीतेमध्ये अष्टधा प्रकृती स्पष्ट केली आहे.

भूमिरापोनलो वायु: खं मनो बुध्दिरेवच। अहंकारं इतीयं मे भिन्ना प्रकृतिअष्टधा।।

- भ.गी. ७/४,

**अर्थ -** पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी व अहंकार अशी मिळून आठ प्रकारे विभक्त झालेली माझी प्रकृति आहे.

नाथसंप्रदायात यामध्ये अधिक सूक्ष्म भेद करुन ३६ तत्वांचा देह आहे असे प्रतिपादन केलेले आहे.[८] (संदर्भ : दिव्यामृतधारा, पान ८००) यालाच 'आगममत' असेही म्हणतात. नाथसंप्रदायात पिंड ब्रम्हांडाची उभारणी ज्या स्वरुपाची आहे तोच विचार ज्ञानेशांचा आहे. ज्ञानेशांचा योग वरील धारणेचा आहे. सोळा विकारातील पंचमहाभूतांचा उल्लेख हा सूक्ष्म तन्मात्रांचा आहे.

२) पातंजलयोग अष्टांग आहे:

यमनियमासन प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान समाधयोऽष्टावंगानि।।

-साधनपाद सूत्र/२९ (पातंजल योगदर्शन) तर गोरक्षयोग (ज्ञानेशयोग) अमृतोपनिषदामधील सूत्राप्रमाणे षडंग योग आहे.

सूत्र -

प्रत्याहारस्तथाध्यानं प्राणायामोऽथ धारणा। तर्कश्चैव समाधिश्च षडंगो योग उच्चते।।''

ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात व योगमार्तंड ग्रंथातहि षडंगयोग सूत्र दिले आहे. आसनं प्राणसंरोध: प्रत्याहारश्च धारणा ध्यानं समाधिरेतानि योगांगानि भवंति षट्।।

गोरक्षयोगामध्ये यम नियम ही योगांगे मानलेली नाहीत. कारण यम व नियम हा न संपणारा भावनात्मक विषय आहे. योगाची पात्रता येण्यासाठीच त्या अंगाचा (यमनियमांचा) विचार असतो. पण ज्ञानेशमताप्रमाणे ही पात्रता केवळ गुरुकृपेनेच येते. योगात गुरुकृपा हाच सर्वोच्च महान अत्यावश्यक आश्रय आहे. गुरुकृपेवाचून योग वा त्यातील अनुभव असंभव आहेत. असा स्पष्ट भाव ज्ञानेश्वरीत सर्वत्र विखुरलेला आहे. 'गुरुकृपा' 'आत्मप्रसाद' ईशकृपा हे एकार्थाचेच प्रयोग आहेत.[९] (संदर्भ: दिव्यामृतधारा पान ८६५)

श्री गोरक्षनाथांनी सिध्दसिध्दांतपध्दतीमध्ये म्हटले आहे :

तत्कथं गुरुदृकपातनात् प्रायो दृढानां सत्यवादिनां सा स्थितिर्जायते।। - उप. ५/६४

**अर्थ :** गुरुंनी कृपादृष्टीने पाहिल्यानंतर सत्य दर्शनेच्छुना ती परमस्थिती प्राप्त होते.

प्रसादात् स्वगुरो: सम्यक प्राप्यते परमं पदम्।। - उप ५/६५

**अर्थ :** गुरुंच्या कृपाप्रसादातूनच ते परमपद प्राप्त होते.

त्याचप्रमाणे श्री ज्ञानेश्वर म्हणतात,

मग तेथ आपण। एकाग्र अंत:कारण। करुनि सद्‌गुरुस्मरण। अनुभविजे।।

- ज्ञा ६/१८६

**अर्थ:** आपण एकाग्र अंत:करण करुन सद्‌गुरुस्मरण करुन अनुभव घ्यावा.

तरी गुरु दाविलिया वाटा। येऊनि विवेक तीर्थतटा।
धुऊनिया मळकटा। बुध्दिचा तेणे।। - ज्ञा. १८/१०११

**अर्थ :** श्री गुरुनी दाखविलेल्या वाटेने विवेकाच्या तीर्थावर येऊन साधकाने बुध्दीचा मळ धुऊन टाकावा.

यាप्रमाणे एकाग्रता, समर्पण व गुरुभक्ती यातून आवश्यक ते यम नियम होत जातात असा त्याचा भावार्थ आहे. नाथसंप्रदायामध्ये नाथमत, नाथयोग, नाथसंकेत हे शब्दप्रयोग कोणत्या अर्थाने वापरले जातात? नाथमत म्हणजे सृष्टीविकासक्रमाबाबत श्री गोरक्ष तत्वज्ञानातील मांडणी. तर हे जे सृष्टीसृजन आहे ते कुंडलिनीशक्तीच्या आधारेच घडते असे सिध्दसिध्दांतपध्दतीत पूर्णपणे स्पष्ट केलेलेच आहे. प्रस्फुरित शिवतत्त्व म्हणजे सृजनयुक्त कुंडलिनी. ती म्हणजे निजा, परा, अपरा, सूक्ष्मा व कुंडलिनी अशा पाच माध्यमातून काम करते. शक्तिसामरस्याने शिवतत्त्वच विश्व अुन्मेषणास येते. हे जे शक्ती स्वरुप असते त्याचे पूर्णता, प्रतिबिंबता, प्रबलता, प्रोच्चलता व प्रत्यंगमुखता असे ५ धर्म आहेत. (सि. सि. प. उपदेश १) कुंडलिनीचे विश्वकार्यप्रसंगी तीन प्रकार होतात. अहंप्रधान, इदंप्रधान व उभयप्रधान (शुध्द विद्या). या शुध्दविद्येतच पिंड घडतो. हा पिंड जेव्हा अस्मिता त्यागेल तेव्हा जीवच सदाशिव होतो व पुढे सामरस्य प्राप्त करतो. ही पिंड ब्रम्हांड ऐक्य अवस्था अशी असते की जिथे संदेह, संशय वगैरेला जागाच रहात नाही. याचा खुलासा देणारे उपनिषदातले एक सूत्र खालीलप्रमाणे आहे.

भिद्यते हृदयग्रंथि: छिद्यंते सर्व संशया: । क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन दृष्टे परावरे।।

- मुंडक २/ खंड२/८ ईषादि नौ उपनिषद्, पान २३६[१०]

**अर्थ:** कार्यकारणरुप परमात्म्याचे ज्ञान झाल्यानंतर हृदय ग्रंथी मोकळया होतात. सर्व संशय नष्ट होतात. सर्व शुध्द अशुध्द कर्म नष्ट होते.

अशा संशयरहित अवस्थेत अर्जुनानी गीतेच्या १८ व्या अध्यायात 'स्थितोस्मि गतसंदेह:' असे कबूल केले आहे. कारण इथे फक्त हा एकच कबुलीजबाब असतो. व्यक्तीचे ब्रम्हांडतत्त्वातील चक्रांशी एकरुपत्व होऊन एका दैवी अतींद्रियावस्थेची (Divine superconscious state) निर्मिती होते व त्या अवस्थेत ती व्यक्ती पूर्ण भानावर असूनही (conscious) भानमर्यादांच्या पलिकडे गेलेली असते. ही बोधनिष्ठ अवस्था ही जीव - ब्रम्हैक्याची अंतिम दशा नाही. तरीसुध्दा ही बोधावस्था सामान्य नाही. या अवस्थेच्या प्राप्तीसाठी लीनता व विनय हवा. या वृत्ती म्हणजे अहंकाराचे परिमार्जन असते. भक्तीच्या क्षेत्रात याच वृत्तींना महत्व आहे. ज्ञानी व्यक्तीची विद्या 'विद्या विनयेन शोभते' अशा अवस्थेत हवी. सर्व माधुर्य संपदेचा ठेवा विनयात आहे. देवाला, ईश्वरी शक्तीला स्पर्श करुन तोच साम्राज्याचा पाइक होऊ शकतो की जो विनयशील असतो. म्हणून श्री ज्ञानेश्वर म्हणतात.

माझे असतेपण लोपो। नामरुप हारपो।

मज झणे वासिपो। भूतजात।।                    - ज्ञानेश्वरी १३/१९८

**अर्थ :** माझ्या अस्तित्वाचा लोप होवो. माझे नावरुप नाहीसे होवो. व प्राणिमात्रांना माझी भीति न वाटो।। बायबलमध्ये येशूख्रिस्तांनीही हीच भूमिका मांडलेली आहे.

"Except ye be as children,ye cannot enter the kingdom of God"

किंवा

चार्लस फिलमोर (Charles Philmore) नी सर्व सुखाच्या व सामर्थ्याच्या मुळाशी ईश्वर विनयता असते असे म्हटले आहे.

"I am the child of God and therefore I do not inherit sickness"[११]

(संदर्भ : दिव्यामृत धारा पान ५७२ - ५७३)

नम्रता व समर्पणातून ज्ञान, विद्या, नीती सर्व प्रकाशमान होतात.

'शिवशक्ती व कुंडलिनी' (महाकुंडलिनीचा अंश) यांच्या एकरसतेतून निर्माण होणारी सामरस्य अवस्था जेव्हा गुरुकृपांकित असते तेव्हा सर्वदर्शनमतांचा समन्वय करणारी एक विशेष अवस्था ज्याला 'निरुत्थान' अवस्था म्हणतात ती प्राप्त होते. यालाच 'सामरस्य मोक्ष' किंवा 'निरुत्थान विश्रांती' असे श्री गोरक्षनाथांनी म्हटलेले आहे (उपदेश ६). या योगालाच 'सिध्दयोग' किंवा 'सिध्दमत' असेही म्हटले जाते. अशाप्रकारे नाथमत म्हणजेच सिध्दमत. तसेच कुंडलिनीयोग म्हणजेच सिध्दयोग. व या योगाशिवाय निरुत्थान अवस्था प्राप्त होऊ शकत नाही.

### ९) श्री गोरक्षनाथांचा मध्यमार्ग :

श्री महायोगी गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते तत्त्वाचे व नियमांचे बाबतीत कुठेच तडजोड करत नाहीत. त्यांच्या विविध सूत्रातून जेव्हा 'मध्यमार्ग' स्वीकारण्याबाबत निर्देश असतो, तेव्हां तो विचार तडजोडीच्या स्वरुपातला नसून 'संतुलन' या अत्यावश्यक सिध्दतेसाठी असतो. म्हणजे तोहि नियमस्वरुपच असतो. उदा.

हबकि न बोलिबा ठबकि न चालिबा धीरे धरिबा पावं।

गरब न करिबा सहजै रहिबा भणत गोरष रावं।।                    - गो. वाणी /२७

**अर्थ :** एकदम फटकारुन बोलू नये. पाय आपटत चालू नये. धीरानी सावकाश चालावे गर्व करु नये. तर सहजस्थितीत रहावे. असा गोरक्षनाथांचा उपदेश आहे.

धाये न षाइबा भूषे न मरिबा अहनिसि लेबा ब्रम्हअग्नि का भेवं।

हट न करिबा पड्या न रहिबा युँ बोल्या गोरष देवं।।                    - गो. वाणी /३

**अर्थः** आधाशासारखे खाऊ नये तसेच उपाशी पण राहू नये दिवस-रात्र ब्रम्हाग्नीच्या अनुभवात असावे. शरिराबाबत फार हट्ट पण करु नये. तसेच आळशीपणाने पडून राहू नये.

नाथमार्ग म्हणजेच सिध्दमार्ग. या बाबतीत श्री गोरक्षनाथांच्या ''योगबीज'' ग्रंथातील सूत्रे -

सर्व सिध्दिकरो मार्गो मायाजाल निकृंतनः।
जन्ममृत्युजराव्याधिनाशकः सुखदो भवेत।। - यो. बीज./६
बध्दायेन विमुच्यंते नाथमार्गमतः परम्।
तमहं कथयिष्यामि तव प्रीत्या सुरेश्वरी।। - यो. बीज./ ७

**दोन्हीचा अर्थ :**

हा सिध्दयोग सर्व सिध्दिदाता आहे. हा नाथमार्ग अत्यंत कठीण असे मायेचे जाळे तोडण्यास समर्थ आहे. जन्म, मृत्यू, म्हातारपण, व्याधी इत्यादी सर्व गोष्टींचा नाश करण्याचे अपूर्व सामर्थ्य या महायोग मार्गात आहे. आत्यंतिक सुख व परमानंद देणारा हा मार्ग बध्दजीवास मुक्त करतो. तुझ्या प्रेमाखातरच हे सुरेश्वरी, हे पार्वती मी हे सर्व तुला सांगतो आहे.

त्याचप्रमाणे योग बीजमध्येही नाथसंकेत, सिध्दसंकेत किंवा योगसंकेत या शब्दप्रयोगांचे स्पष्टीकरण पुढील श्लोकातून मिळू शकते.

पुनःपुनस्तद्वदेतत्पश्चिमद्वार लक्षणम्।
पुरितस्तु नवद्वारैरीषत्कुंभकतां गतः।। - यो.बीज /१३२
प्रविशेत्सर्वगात्रेषु वायुः पश्चिममार्गतः।
रेचके क्षीणतां याते पूरकं शोषयेत्सदा।। - यो.बीज /१३३
स एव नाथसंकेतः सिध्दसंकेत लक्षणः।। - यो.बीज /१३४

**तीन्हीचा अर्थ :**

दररोज अभ्यास करुन प्राणवायूचे सुषुम्नेमध्ये पुनःपुनः चालन करणे हे पश्चिमद्वाराचे लक्षण आहे. थोडासा कुंभक होऊन प्राणांचे पश्चिममार्गामध्ये म्हणजे सुषुम्नेमध्ये संचालन होते व नवद्वारे भरुन जातात. तेव्हा या पश्चिममार्गाच्या द्वारेच प्राण सर्व गात्रांमध्ये प्रवेश करतो. यामुळे रेचक व पूरक कमी होतात. यालाच नाथसंकेत किंवा योगसंकेत म्हणतात. (यो. बी. १३२,१३३,१३४)

**१०) गोरक्षयोग व पातंजलयोग यामधील फरक :**

वरील चर्चेवरून आपणास ध्यानात येते की, पातंजलयोग व गोरक्षयोग या दोहोंच्या मांडणीत मूलतः काही फरक दिसून येतात. तथापी, गोरक्षयोग खूप तपशीला घेवून जाणारा

आहे. या तपशीलाचा प्रभाव श्री. ज्ञानेश्वरांच्यावर पडलेला दिसून येतो. असे म्हणता येईल की, संत ज्ञानेश्वर जेंव्हा म्हणतात, ''हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।'' तेंव्हा ज्ञानेश्वरांची दृष्टी विश्वचैतन्यावर स्थिरावलेली दिसते. नाथपरंपरेतील 'सामरस्ययोग' हा देखील ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे असे म्हणता येईल. याचे कारण ज्ञानेश्वर हे योगातून भक्तीकडे व भक्तीतून समर्पणाकडे जात आहेत. साहजकिच पातंजलयोगापेक्षा ज्ञानेश्वरांना 'नाथयोग' अधिक भावलेला असून कोणाही व्यक्तीने कर्म करताना निष्काम कर्मयोग सिद्धांताचे अनुसरण करावयाचे असते. तोच साक्षेपी विचार प्रसिद्ध जर्मन तत्त्वचिंतक ई. कॉन्ट यांनाही प्रेरित करणारा दिसतो. कोणत्याही कर्माचरणात स्वार्थ व इच्छा यांचा प्रभाव पडला की ते कर्म हे कर्मच राहत नाही. कर्म हे सूचित्त भावनेनेच केले पाहिजे. म्हणून कॉन्टने म्हटले आहे की, "Act only on that maxim or principle which thou canst at the same time will to become a universal law."[१२] (संदर्भ ; नीतिमीमांसा, पान १६४) याचा अर्थ स्पष्ट आहे की, माझे आचरण असे असावे की इतरांनी तसे आचरण माझेशी केल्यास ते मला मान्य होईल. गोरक्षनाथांनी सामरस्ययोग हा महत्त्वाचा विषय मांडला. त्यासाठी योगमार्गाला सहजता प्राप्त करून दिली. त्याच परंपरेतील श्री. ज्ञानेश्वरांनीही योगामध्ये सहजता आणल्याचे दिसून येते. थोडक्यात सांगायचे झाल्यास साधकाने अथवा कोणत्याही व्यक्तीने सर्वप्रकारे अतिरेक टाळणे आवश्यक आहे.

**श्री ज्ञानेश्वरांचा मुक्तिविचार :**

श्री ज्ञानेश्वरांचा मुक्ति विचार हा नाथ परंपरेस धरुन आहे.

पिंडे पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु।
परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णू।। - ज्ञा. ६/२९१

**अर्थ:** शरीराने शरीर नाहीसे करणे हा योगशास्त्राचे नाथ जे शंकर त्यानी केलेल्या सिध्दांताचा हा अभिप्राय आहे. हे नाथपंथाचे मुख्य सूत्रच आहे. याचा अर्थ शरिरानेच उत्कट असे साधन करुन ते साधन कर्म, योग, ज्ञान, भक्ती अशा कोणत्याही मार्गाचे असो- त्यातून वासनेची आसक्ती नाहीशी करणे व शरिरस्थित ईश्वरी शक्तीची जाणीव करुन घेणे असा आहे. सर्व संतांना याचा अनुभव येत राहिला म्हणून त्या सर्वांनी आत्मानंदाचे गुणगान केले आहे. आत्मानंद स्वसंवेद्य व विना आलंबनाचा असतो. आवश्यकता असते स्वत:ला जाणण्याची. ही जाणीव प्रगल्भ होण्यासाठी वासना नेणीव स्वरुपात झाली पाहिजे. विकारांना बळी न पडता जीव व शिवाचे ऐक्य अनुभवणे म्हणजे पिंडाने पिंडाचा ग्रास करणे. यासाठी तप, शुचिता, सत्यधर्मपालन, साधनेवरील निष्ठा, प्राणिमात्रांबद्दल प्रेम, करुणा व आत्मज्ञानप्रेरणा या गोष्टी आवश्यक आहेत. पिंडाने पिंडाचा ग्रास केल्यावर दिव्यत्वाची

प्रचिती येऊन तृप्ती, समाधान व आत्मज्ञानाचा नित्य आनंद मिळत रहातो. अशा स्थितीतून पुनरावृत्ती नाही. हेच ते 'परमधाम' होय. याबाबत श्री ज्ञानेश्वर म्हणतात, ''जेव्हा ब्रम्ह हे ब्रम्हत्वाने 'मी'तून प्रगट होते. ती अवस्था म्हणजे मोक्ष म्हणजेच मुक्ती.'' अशा ब्रम्हरुप झालेल्या देहाचा सहज अनुभव कसा असतो? तो श्री. ज्ञानेश्वरांनी एका अभंगात मांडला आहे.

ठसावली देही परब्रम्हमूर्ती। सोहंशब्दगती प्राप्त झाली।
सहजी सहजस्थिती झाली वो माये।। - अभंग

**अर्थः** सोहंशब्दाला गती प्राप्त झाली व या मानवी देहातच परब्रम्ह स्थिर झाले अशी ही सहजस्थिती होऊन गेली. इथे ब्रम्हदेहाची सहजस्थिती म्हणजे मोक्ष असे स्पष्ट होते. अशी व्यक्ती जेव्हा स्वरुपस्थितीतून विश्वपसाऱ्याकडे वळते तेव्हा ती विश्वसंवदेनेशी एकरुप होत जाते. अशी व्यक्ती ब्रम्हलोकात जाते असा उल्लेख मुडंकउपनिषदामध्ये आहे.

ते ब्रम्हलोकेषु परान्तकाले परामृता: परिमुंचंति सर्वे।। - मुं उप/मुंडक३/खंड२/६

**अर्थ :** सर्व कर्मातून मुक्त होऊन असे आत्मे अंतकाली ब्रह्मलोकास प्राप्त होतात. इथे 'ब्रम्हलोक' असा स्पष्ट उल्लेख आहे. हा 'लोक' म्हणजे गोलोक, पितृलोक, वैकुंठलोक अशा स्थानांप्रमाणेच एखादे स्थान किंवा अवस्था आहे हे स्पष्ट होत नाही.

**११) परमोच्च अवधूत अवस्था, लय, सामरस्य व अस्पर्श योग :**

श्री दत्तावतार हा अवधूत अवस्थेचा परमोत्कर्ष आहे. निरंजनपदाचा जो अर्थ तो म्हणजेच हा अवतार. प.प. भगवान श्रीधरस्वामी त्यांच्या प्रवचनात म्हणतात ''महर्षींनी आपल्या अनुसया नावाच्या अर्धांगीसह केलेल्या तपाचे फळ म्हणजेच श्री दत्तांचा अवतार.'' ब्रम्हा, विष्णू व महेश्वर या तिन्ही शक्ती त्यांचे संकल्पानुसार पुत्ररूपात प्रकटतात. तिघांचेही एकवटलेले रुप म्हणजेच श्री दत्तावतार.

''गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु म्हणजे श्री सद्गुरुच साक्षात् परब्रम्ह.'' श्री गुरु हा त्रिमूर्तीस्वरुपी असतो. हे तत्त्व त्यांनी अवतार घेऊन जगाच्या निदर्शनास आणून दिले. प्रत्यक्ष ब्रम्हच सत् चित् आनंद या पदत्रयाच्या त्रिमुखाने प्रगट झाले तेव्हा त्या सच्चिदानंद ब्रम्हालाच 'श्रीदत्त' हे नांव प्राप्त झाले. 'स्मरणानुगामी' असे त्यांचे विशेषण आहे. श्री दत्तांची स्थिती 'अवधूत' आहे. संपूर्ण ज्ञानवैराग्याच्या पराकाष्ठेचे हे स्वरुप असल्यामुळे त्यांना 'श्रीगुरु' म्हणतात. निरिच्छेमुळे ते अत्यंत लवकर प्रसन्न होत असल्यामुळे त्यांना 'अशुतोष' असेही नांव पडले आहे.[१३] (संदर्भ: श्री श्रीधरस्वामी प्रवचने पान २५६)

**लययोग :** प्राण व नाद याच्या सहयोगाने शून्यतेत मन लीन होणे म्हणजे लययोग.
(संदर्भ: दिव्यामृतधारा पान ८७९ )[१४]

**सामरस्य योग :** यावर स्वतंत्र प्रकरणच पुढे आहे.

**अस्पर्श योग :** हा एक गूढ व रहस्यमय योग आहे. ज्या योग्यास सिध्ददेहाची प्राप्ती झाली आहे त्यांचेठिकाणी हा अस्पर्शयोग सिध्द होतो. पातंजल योगदर्शनमध्ये कायासंपदचे विवरण आहे. ही कायासंपदची प्राप्ती भूतजयाच्या प्रभावाने होते. सिध्ददेहाला वज्रांग देह असेही नाव आहे. श्री गोरक्षनाथांच्या सिध्ददेहावर पंचभूतांच्या कोणत्याही आघाताचा परिणाम होत नसे. 'प्रभुदेव' या योग्यांच्या सिध्ददेहाला पंचभूतांचा स्पर्शच होत नसे. या योगामध्ये स्थूलदेह व सूक्ष्मदेह हे एकत्रित येतात व एकरुप होतात. एका दृष्टीने हा देह इंद्रियगोचरही आहे व अतींद्रियही आहे. जसे प्रयोजन असेल तसा अनुभव असतो.[१५] (संदर्भ: सिध्दयोग्यांच्या सान्निध्यात पान २००)

**१२) मानसशास्त्रीय चिकित्सा :**

प्रकरण २ च्या समारोपाकडे जाताना मागे नोंद केलेले महत्वाचे मुद्दे व त्या अनुषंगाने तर्क व मानसशास्त्र यावर आधारित चिकित्सा करणे आवश्यक वाटते. त्याशिवाय काही बाबींचा उलगडा होत नाही.

श्री गोरक्षनाथांचा काळ हा इ.स. ९५० ते १०५० च्या दरम्यान आहे. व हे प्रथम प्रकरणात विस्ताराने पाहिले आहे. आता प्रत्यक्ष शिवस्वरुप अशी ज्यांची योग्यता व अशा परमोच्च स्थानावर असलेल्या महासिध्द गोरक्षनाथांच्या योगप्रक्रिया व त्यांचे तत्वज्ञानात कुंडलिनी शक्तीचे देहपिंडातील अस्तित्व व कुंडलिनी शक्तीचे जागरण व संचालन व त्यातून साध्य होणारी निरुत्थान अवस्था असा मूलभूत विषय आहे. म्हणजे त्यांच्या योगव्यवस्थेचा मुख्य आधार ही कुंडलिनी शक्ती आहे. इथे प्रश्न असा समोर येतो की पतंजलीसारख्या महामुनींना म्हणजे साक्षात्कारी व्यक्तीस देहस्थ शक्तीकेंद्रे व त्यातील निद्रिस्त शक्तीचे स्वरुप माहित नसणे शक्य वाटत नाही. तसा तर्क करणे हा कुतर्क ठरेल. मग त्या शक्तीस्वरुपाचा कोणताही उल्लेख त्यांच्या पातंजल योग दर्शन मधील १९५ योगसूत्रात कुठेही नाही. यामागचा काही वेगळा असा उद्देश किंवा कारण की ज्याचा संबंध मानसशास्त्रीय धारणांशी असावा, त्याचा मागोवा घेणे जरुर आहे.

विचार केल्यास असे म्हणणे संयुक्तिक ठरेल की पतंजलींनी अंतिम सत्याप्रत जाण्याचा मार्ग 'वितर्क' या प्रक्रियेतून अनुसरला आहे. देहधारी मानवाचे अंतरप्रदेश व बर्हिप्रदेश असे दोन प्रदेश (भाग) 'देहबंधश्चितस्य धारणा' या त्यांच्या सूत्रातून व्यक्त होतात. श्री गोरक्षनाथांनी पिंडापासून व पिडांच्या मूलभूत आधारभूत शक्तिस्त्रोतातून सुरवात केली आहे. तर पतंजलींनी देहमाध्यमाच्या अंतर-स्थितीचा विषयच बाजूला ठेऊन तर्क, बुध्दी, मानवाचा अहंकार व त्याचे मानसशास्त्र या सर्वांची सांगड घालत पूर्ण विज्ञाननिष्ठ शास्त्र

देण्याचे ठरवूनच योगसूत्रांची रचना केलेली आहे. पिंडी ते ब्रम्हांडी हे गोरक्षनाथांनी स्पष्टपणे आदेश स्वरुपात सांगून 'ते तसे आहे' हा निर्देश देत त्याचा अनुभव घेण्याचे शास्त्र प्रक्रियांचे स्वरुपात दिले. पतंजलींच्या काळातील सर्वसामान्य जनमानस कशा प्रकारचे होते यावरच पतंजलींची योगशास्त्राची बांधणी अवलंबून असावी. त्यांच्या भविष्याचा वेध घेऊ शकणाऱ्या दृष्टीस असे जाणवले असावे की पुढील भावी काळात लोक अहंकारी, कावेबाज, शिष्ठ व स्वार्थी असे जास्तजास्त होत जाणार! अशा या अस्थिर व बेभरवशी काळात योगविद्येच्या माध्यमातून प्रबोधन करायचे असेल तर काही वेगळ्या पध्दतीने व्यक्तीच्या अहंकाराला, बुध्दीला, तर्काला, जाणिवेला खाद्य पुरवठा करता येईल अशी वैज्ञानिक पध्दतच पुढे ठेवली पाहिजे. अशा मानसशास्त्रीय चिकित्सेतून दूर दृष्टीने या सर्व योग - सूत्रांची रचना केली गेली असावी. अन्यथा ज्यांना देहमाध्यमातील अंतरविश्व ज्ञानदृष्टीने व योगबलाने दिसू शकते त्यांनी हा बर्हिगामी योगमार्ग स्वीकारला नसता.

योग मार्गातून जे साधायचे आहे मग तुम्ही त्याला साक्षात्कार म्हणा, संबोधी म्हणा, निर्वाण म्हणा किंवा निजत्वाचा अनुभव म्हणा, किंवा मोक्ष म्हणा - त्या अवस्थेकडे जाण्याचे अनेक मार्ग असू शकतात. त्यामुळे काही विश्वास किंवा ईश्वरासारखे तत्त्व मानणे ही पूर्वअट त्यांनी (पतंजलींनी) ठेवलीच नाही. विश्वास असेल तरी ठीक आहे. त्याचा उपयोग करुन लक्ष्य प्राप्त करा. अविश्वास असेल तरी चालेल. अविश्वासाच्या मार्गाने चालत चालत प्रवास करत लक्ष्य साध्य करा. असे रोख ठोक प्रतिपादन श्री पतंजलींनी करुन एक मानसशास्त्रीय अशी वैज्ञानिक योगसूत्रव्यवस्था निर्माण केली, त्याचे अनुशीलन करण्याचे कुणीही ठरवावे. त्यास ईश्वरावरील विश्वासाची अटच नाही. नास्तिक, अहंकारी बुध्दीवादी जगात या पध्दतीचीच जर एकादी व्यवस्था दिली तर ती लोक स्वीकारतील हे त्यानी ओळखले असावे. कारण त्यानी दिलेल्या व्यवस्थेत (योग सूत्रात) व्यक्तीच्या अहंकाराची मी पणाची, बुध्दीच्या सामर्थ्याला कमी लेखून कुठेही कुणाचीही निंदानालस्ती न करता तुम्ही जसे असाल तसे स्वीकार्य आहात. फक्त योगसूत्रांच्या निर्देशानुसार तुम्ही आभ्यास, आचरण व अविरत प्रयत्न करा. तीव्र प्रयत्न करा असे सांगितले आहे. त्याचे सुत्र-

तीव्र संवेगानां आसन्नः।। - समाधीपाद सूत्र २१

त्याप्रमाणे प्रयत्नांच्या गुणमानानुसार यशाची संभावना बदलते. म्हणजे मंद, मध्यम, उत्कट प्रयत्नाप्रमाणे यशात फरक पडतो. त्याचे सूत्र -

मृदुमध्याधि मात्रत्वात्ततोपि विशेषः।। - समाधीपाद - सूत्र २२

अशा प्रकारे योगसूत्रांच्या माध्यमातून पतंजली विविध मार्गासंबंधी बोलतात ते अंतिम साध्याबद्दल किंवा अंतिम उद्दिष्टाबद्दल बोलतच नाहीत. पतंजलींना काळजी दिसते साधनेची.

त्यामुळे त्यांचा मार्ग म्हणजे उत्कट प्रयत्नांची साधना आहे. त्यामुळे पंतजलींना स्वीकारावे वाटते. कारण ते पूर्ण बुध्दिवादी आहेत. त्यांनी सांगितलेली साधना आचरणात आणण्यासारखी असते. साधना कशी करायची काय काय करायचे ते सर्व ते सांगतात.

अंतिम लक्ष्य किंवा साध्यासंबंधी पंतजली का बोलत नाहीत? कारण अंतिम लक्ष्य किंवा फल हे गूढ रहस्य आहे. तसे असले तरी त्याचा अनुभव घेण्याचे मार्ग शास्त्रीय स्वरुपाचे आहेत. त्यामुळे सामान्य माणसाला ते मार्ग भावतात .

हा महत्वाचा फरक श्री गोरक्षयोग व पातंजल योग यात दिसून येतो. गोरक्षयोगात पिंडीते ब्रम्हांडी व ब्रम्हांडी ते पिंडी हे मूलभूत विचारसूत्र स्वीकारणे हीच मोठी मानसिक उडी आहे. ही गोष्ट स्वीकारा! कारण ती वस्तुस्थिती आहे असा एक प्रकारचा निरपेक्ष आदेशच (काँटच्या निरपेक्ष आदेशाप्रमाणे) त्यांनी दिला आहे असा आदेश शुभसंकल्परूप बुद्धीद्वारा निर्माण होत असतो व नंतर त्याचे विवरण - खुलासा देऊन त्याची अनुभूती कशी घेता येते याबाबत सूत्रमांडणी केली आहे. यातील अवघडपणा किंवा दुर्बोधता अनेकांना त्याचा अभ्यास व अनुशीलन करताना जाणवली. मग त्यातून पर्याय - अुपपर्याय, सवलती अशा प्रकारे भिन्नमार्ग निर्माण झाले. यातील अवघडपणा टाळण्यासाठी समर्थ रामदासांनी पिंडी ते ब्रम्हांडी याबाबत असे नमूद केले आहे, की पिंडातल्या गोरक्षलिखित शेकडो गोष्टी सामान्य मानवास अनुभवास येणे दुर्घट आहे. म्हणून पंचमहाभूते जशी बाहेर आहेत तशीच ती देहपिंडात आहेत असे स्पष्ट करुन पिंडी ते ब्रम्हांडीचा अर्थ अशा प्रकारे घेतला तरी पुरे असेच त्याना सुचवायचे आहे समर्थ रामदास त्यांच्या दासबोध ग्रंथात म्हणतात:

पाचा भुतांचे ब्रम्हांड। आणि पंचभूतिक हे पिंड।
या वेगळे ते उदंड। अनुमानज्ञान।। - दास. द. ९/५/३८

**अर्थ :** ब्रम्हांडात जशी पंच महाभूते त्याचप्रमाणे हा पिंडही पंचभौतिक आहे. यावेगळा विचार म्हणजे अनुमानच असते.

जेचि पिंडी तेचि ब्रम्हांडी। प्रचित नाही की रोकडी।
पंचभुतांची तातडी। दोन्हीकडे।। - दशक ९/समास५/३८-४०

**अर्थ :** जे पिंडा मध्ये तेच ब्रम्हांडात हा स्पष्ट अनुभवच आहे. दोन्हीकडे पंचमहाभूतेच आहेत हे लगेच समजून येते.

पतंजलींच्या सूत्ररचनेमागे जी मनोवैज्ञानिक बैठक आहे ती महत्वाची वाटते. जेव्हा असे सांगितले जाते की परमेश्वर, ईश्वर किंवा ते अंतिम सत्य हे कुठे दूर नाही तर ते अगदी जवळ-नव्हे तुमच्यातच आहे तेव्हा प्रत्येकाला असे वाटते की मी इतका शिकलेला विद्वान व समजूतदार असताना मला हे कसे काय समजत नाही? याचा अनुभव कसा काय येत नाही?

यामुळे व्यक्तीचा अहंकार दुखावला जातो व ती व्यक्ती नाउमेद होते. पण सत्य तुमच्यातच आहे असे कोणतेही विधान पतंजली करत नाहीत. ते म्हणतात की तो (ईश्वर) मिळवण्यासाठी तुम्हाला खूप चालावे लागेल, खूप अंतर काटावे लागेल आणि मग तुम्हाला ते प्राप्तव्य मिळू शकेल. म्हणून प्रत्येक व्यक्तीत परमेश्वर आहे, वगैरे काहीच ते सांगत नाहीत. कारण सगळेच मोठे! विद्वान! प्रत्येकात इतकी महत्तता? मग ही महत्तताच सर्वसामान्य ठरते. म्हणून लहानमोठे असायलाच हवे. उच्चश्रेणी व कनिष्ट श्रेणी असायलाच हव्यात. या सर्वाच्या मुळाशी अहंकार काम करत असतो. अस्तित्व हे फक्त महत्तताच निर्माण करते हे जरी खरे असले तरी आपण अुच्चनीच श्रेणींना आपल्या अहंकार पुष्टतेसाठी निर्माण करत असल्यामुळे हे सत्य स्वीकारले जात नाही. म्हणून या अहंकाराचा व खोट्या विद्वत्तेचा वेध घेण्यासाठी त्याचाच स्वीकार करुन पतंजली त्याचा भेद करु इच्छितात. काट्याने काटा काढण्याचाच हा प्रकार आहे. हा पतंजलींचा व्यवहारीपणा मानसशास्त्रावर आधारित आहे. मार्ग लांबचा असला तरी तुम्ही काही सामान्य नाही. तुम्ही नक्की तुमच्या उद्देशाप्रत पोचाल! त्यामुळे पतंजली मोठया प्रमाणात लोकांकडून स्वीकारले गेले.

योगमार्ग साधना ही १००% संदेहाकडून १००% परमजीवनाकडे नेणारी रसायनप्रक्रिया आहे. आणि या रसायनप्रक्रियेची आचंबित करणारी प्रयोगशाळा (Laboratory) आहे हे मानवी शरीर! इथे संदेह, निष्ठा व श्रद्धा यातील सूक्ष्म अर्थभेद समोर असणे जरूर आहे. संदेह व विश्वास हे तर्कावर आधारित असतात. निष्ठा ही संस्कारातून पक्की होते व श्रध्दा ही अनुभवातून पक्की होते. श्रध्देतून जिज्ञासा, त्यातून विकास, त्यातून अनुभूती अशा प्रकारे १००% परमजीवनाचा अनुभव मिळतो. निष्ठा ही समाजाने, आपल्या संस्कृतीते दिलेली असते तर श्रध्दा ही शोधून सापडलेली असते. म्हणून श्रध्दा हे पूर्णपणे व्यक्तीचे रुपांतरण (Transformation) करते. पतंजली सांगतात की दिव्यत्वाच्या अंतिम अनुभवाचा पाया म्हणजेच श्रध्दा!

**१३) उपसंहार :**

अशा या सामाजिक संदर्भाच्या पाश्वभूमीवर श्री पतंजलींचे योगदान पाहिले पाहिजे. त्यांच्या योग प्रक्रिया व योगाचे नियम यांच्या द्वारे त्यांनी एक सामाजिक आंदोलनच सुरु केले असे म्हणता येईल. त्याचा परिणाम व परिणती त्यांना अपेक्षित अशा प्रकारे त्यांचे म्हणजे पतंजलींचे नंतरचे काळात राहिली नसावी. त्यानी सुस्थापित केलेल्या योगशास्त्राचे नंतरचे लोकांनी व्यवसायात रुपांतर केले असण्याची शक्यता असावी व आजही योग म्हणजे देह व मनाचे आरोग्य व दीर्घायुष्याची खात्री असा बहिर्गामी प्रचारच जास्त होत आला आहे.

सद्यस्थितीत भारतात व पाश्चिमात्य जगतात जास्त करुन जे योगवर्ग चालतात व लाखो लोक योगा करतात त्यांचा उद्देश फारसा व्यापक असतोच असे नाही. पंडित सातवळेकरांसारखे सिध्द योगी त्यांच्या ग्रंथात स्पष्ट सांगतात की योग हा जर भोगाकरता असेल तर मुळीच करु नका. काही अपवाद वगळल्यास योग म्हणजे उत्तम आरोग्य व त्यातून मनसोक्त उपभोग असेच सुरु झालेले दिसते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. अशीच परिस्थिती श्री गोरक्षनाथांचे काळात असणार असे म्हटलेतर ते तर्कदृष्टीने योग्य ठरेल. कारण श्री गोरक्षनाथानी व्यापकपणे व सर्वसमावेशक अशा पध्दतीने समाजसुधारणेचा वसा पत्करला व आसेतु हिमाचल नव्हे तर शेजारच्या अन्य देशातही त्यांनी योगविद्येचा प्रसार केला. हे प्रयत्न करत असताना श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाची व योगाची प्रक्रिया व्यक्तीच्या अंतर विश्वाशी म्हणजे मानवी देहाच्या सूक्ष्म तत्वांशी जोडून का मांडली? त्यानी योगमार्गाचा प्रवास अंतरसृष्टीकडे का वळवला? ही क्रिया नेमकी पतंजलींच्या पद्धतीपेक्षा वेगळी का?

कारण बहिर्गत दिशेला म्हणावे तसे यश नाही तेव्हा आता दिशाबदलाशिवाय पर्याय नाही. म्हणून मानवाला त्याच्या मूलभूत स्त्रोताचे व दैवी चेतनेचे भान देऊन जागे करण्याचा प्रयत्न करत असताना तर्क किंवा बुध्दीचे लाड न करता 'आदेश' (order) स्वरुपात सर्व सांगितले आहे. त्यांची सर्व सूत्रे सिध्दांतस्वरुपात त्यांच्या ग्रंथात मिळतात. श्री गोरक्षनाथांचे जीवनच इतके दिव्यभव्य होते की त्यांची आज्ञा वा आदेश स्वीकारला जात असावा. अशा पध्दतीने त्यांनी माणसाला अंतर्विश्वातील त्याच्या धारणेची व दैवी संपत्तींच्या मालकीची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला, ही एकप्रकारे समाजसुधारणेची चळवळच होती. त्यांनी योगाचे व्यावसायीकरण बंद केले. देहमाध्यम हे भोगसाधन नसून दिव्य असे निरुत्थानपद प्राप्त करण्याचे साधन आहे हा विचार दिला. असा जीवनसंकल्प प्रत्येक व्यक्तीने स्वीकारावा हा त्यांचा प्रयत्न त्यावेळच्या सामाजिक स्थितीची व त्यातील बहिर्मुख भोगप्रवृत्तीची दखल घेऊनच केला असणार असे म्हणता येते. सिध्द पुरुषांच्या कार्याचा अशा प्रकारे सामाजिक संदर्भ व कारणमीमांसा स्पष्ट करणे जरुर वाटते. त्याशिवाय त्या कार्यामागची सुप्त प्रेरणा स्पष्ट होत नाही.

श्री गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाची चिकित्सा करणारा हा प्रबंध अथपासून इतिपर्यंत सामाजिक संदर्भासह स्पष्ट झाला नाही तर ती चिकित्सा केवळ शुष्क तात्विक चिकित्सा ठरेल. त्यासाठी ही तुलनात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यानंतर गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानातील मुख्य सिद्धांतांकडे वळणार आहे.

## १४) संदर्भ व टीपा :


१. योगदर्शन भाग १ व २ - ओशो - जीवन जागृती केंद्र प्रकाशन, पुणे, १९९३.

२. Dimensions of Yoga – by Kumarswami Foundation, Dharwad, 1988.

३. Introduction to Psychology – by N. L. Munn, Oxford & B. H. Publishing Co. Bombay, 1969.

४. Dimensions of Yoga – by Kumarswami Foundation, Dharwad, 1988.

५. तत्रैव.

६. मुक्तिगाथा महामानवाची - प्रा. शिवाजीराव भोसले, विजयंता प्रकाशन, पुणे, १९७३.

७. Presuppositions of Indian Philosophies – by K. H. Potter, Prentice, Hall of India Pri. Ltd., Delhi, 1965.

८. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, केशव भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.

९. तत्रैव.

१०. ईषादि नौ उपनिषद् - संपादन - गोयंदका - गीता प्रेस, गोरखपूर, सं. २०६०, वि.

११. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, केशव भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.

१२. नीतिमीमांसा - प्रा. चौधरी, ए. बी. मुस्कुटे, विद्या प्रकाशन, नागपूर, १९६२.

१३. श्री. श्रीधरस्वामी प्रवचने - डॉ. केशवराव मुळे, श्रीधर संदेश, नाशिक, १९८५.

१४. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, केशव भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.

१५. सिद्धयोग्यांच्या सान्निध्यात - पं. गोपिनाथ कविराज, व्होरा आणि कं. पब्लिशर्स प्रा. लि., पुणे, १९७५.

# प्रकरण - तिसरे

# पायाभूत सिद्धांत

।। श्री ।।

## १) प्रस्तावना :

प्रकरण दोन मध्ये गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचा, नाथयोगाचा आणि तत्संबंधी ज्ञानेश्वरांशी त्यांचा असलेला अनुबंध स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न केला. पातंजलयोग आणि नाथयोग यांच्यात कसा भेद आहे हेही दाखवून देण्याचा प्रयत्न मी केला आहे. आता या तिसऱ्या प्रकरणात गोरक्षदर्शनाचे मुख्य सिद्धांतांचा उहापोह करणे आवश्यक आहे. गोरक्षयोग म्हणजे आत्मा व शरीर यांच्यात असलेली अभिन्नता. अभिन्नता म्हणजेच एकरसता - समरसता - या समरसतेतून परमात्म्याचा साक्षात्कार करून घेणे कसे शक्य आहे? हे दाखवून देण्याचे काम या प्रकरणात करण्याचा प्रयत्न आहे. मूलत: स्वानुभव हेच गोरक्षदर्शनाचे मुख्य अधिष्ठान आहे. मनुष्यास परमात्मस्वरूप प्राप्त होणे हे गोरक्षनाथांचे उद्दिष्ट आहे. माणसे विविध प्रकारच्या अंध:कारात चाचपडत असतात. अशा अंध:कारातून बाहेर पडण्याचा एक शाश्वत मार्ग गोरक्षनाथांच्या मुख्य सिद्धांतांच्या मार्फत मांडण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. त्यासाठी गोरक्षनाथांचे मूळ ग्रंथ मला उपयोगात आणावे लागले. योगबीज, सि.सि.प., महार्थमंजरी, सि.सि.संग्रह, गोरखवाणी और गोरखयोग हे ग्रंथ मी या अभ्यासासाठी निवडले. मुख्य प्रश्न सामरस्ययोग कसा साध्य करावयाचा हा आहे. योगसाधनेतून साम्यावस्था व त्याचा परिणाम म्हणून जी सहजावस्था प्राप्त होते त्याचे स्पष्टीकरण करणे हा या प्रकरणाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी गोरक्षनाथांचे वेगवेगळे सिद्धांत तपासून घेणे अगत्याचे आहे. गोरक्षनाथांनी सामरस्य साधनेच्या विद्येला 'महायोगज्ञान' म्हटले आहे. हे महायोगज्ञान प्राप्त झाले की, साधकाला परमपद प्राप्त होते. जे परमपद प्राप्त होते त्याचा आधार कोणता? या प्रश्नाचे उत्तर 'शिवशक्ती सामरस्य' व 'पिंडब्रह्मांड एकरसता' असे गोरक्षनाथांनी दिले आहे. या अर्थाने जिवात्मा व परमात्मा ह्यांचे अंखड स्वरूपाचे ज्ञान गोरक्षनाथांना अभिप्रेत आहे. असे जे ज्ञान तेच त्या परमपदाचा आधार आहे. यासंदर्भात पूढील सूत्र खूपच बोलके आहे.

शिवस्याभ्यंतरे शक्ति: शक्तेरभ्यंतर: शिव:।
अंतरं न एव जातीयात् चंद्र चंद्रिकयोरिव।। - सि.सि.प./उप ४/२६

**अर्थ :** शिवांतर्गत शक्ती व शक्तिअंतर्गत शिव असतो. चंद्र व चंद्रीकेप्रमाणेच त्यात अंतर नसते.

अशा या अनुभवाच्या क्रियांना श्री गोरक्षनाथांनी 'समरसीकरण सिध्दांत' असे नांव दिले असून त्याचा अर्थ पिंडात ब्रम्हांड दर्शन व ब्रम्हांडात पिंडदर्शन असा आहे. या सर्व क्रियांमध्ये सदगुरूंच्या कृपाशिर्वादाशिवाय, कृपाकटाक्षाशिवाय अन्य उपाय नाही. त्यांचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

तस्माद् गुरूकृपाकटाक्षपातात् स्वसंवेद्यतयाच महासिध्दयोगिभि: स्वकीयं।

पिंडं निरूत्थानानुभवेन समरसं क्रियते इति सिध्दांत:।। - सि.सि.प./उप५/७

**अर्थ :** म्हणून मोठ्यातला मोठा योगी सुद्धा गुरूंचा कृपाकटाक्ष व स्वत:च्या मनोनिग्रह इत्यादी साधनांनी स्वत:च्या व्यष्टिपिंडामध्ये समष्टीपिंडाच्या समरसतेचा अनुभव घेवून तो सच्चिदानंद स्वरूप होऊन जातो.

आता या पिंडब्रम्हांड एकरुपता व समरसता याबाबत वेगवेगळया ग्रंथातले उल्लेख व अनुभवी सिध्दांची मते खालीलप्रमाणे दिसून येतात.

**२) पिंडी ते ब्रम्हांडी व ब्रम्हांडी ते पिंडी :**

पिंडमध्ये चराचरं यो जानाति स योगी पिंडसंवित्तिर्भवति।। - सि.सि.प./उप३/१

**अर्थ :** या देहपिंडामध्येच सर्व ब्रम्हांडातील चर-अचर सृष्टी उपस्थित आहे. याचे ज्ञान योगसाधना व गुरूकृपेच्या माध्यमातून करून घेणारा साधक हा 'पिंडसंवित्ति' होतो. म्हणजे व्यष्टी व समष्टी पिंडाचा ज्ञानी होतो. व्यष्टिपिंडामध्ये काय काय असते त्याबद्दल सविस्तर खुलासा सि.सि.प. तृतीय उपदेश मध्ये आहे.

यांचे सविस्तर खुलासे सिध्दासिध्दांतपध्दति तृतीय उपदेशामध्ये आहेत. वरील अवस्थेबाबतचे श्री गोरक्षसूत्र खालीलप्रमाणे आहे.

एवं सर्वदेहेषु विश्वरूपपरमेश्वर: परमात्मा अखंड स्वभावेन।

घटे घटे चित्स्वरूप: तिष्ठति। एवं पिंड संवितिर्भवति।। - सि.सि.प./उप३/१३

**अर्थ :** अशाप्रकारे सर्व देहामध्ये विश्वरूप परमेश्वर परमात्मा अखंड स्वरूपात प्रत्येक शरीरामध्ये चिद्रूप होऊन उपस्थित असतो. हे जाणणारा साधक पिंडज्ञानी होतो.

असे ज्ञान करून घेऊन या एकरूपतेचा शब्दातीत अनुभव घेऊन निरूत्थान अवस्था अनुभवणे असा ''ब्रम्हांडी ते पिंडी व पिंडी ते ब्रम्हांडी'' या सिध्दांत सूत्राचा अर्थ आहे. हा योग साधणे हेच चरमलक्ष्य असे श्री गोरक्षनाथ सूचित करतात. व त्यासाठी एक स्वतंत्र अनुभवसिध्द योग शास्त्र व त्याचे तत्वज्ञान व सिध्दांत निर्माण करतात. याबाबत 'सिध्दसिध्दांत संग्रह' या ग्रंथातील सूत्र महत्त्वपूर्ण ठरेल असे आहे.

घंटाकाहलमर्द्दलं त्वथ महाभेरी निनादं यथा।

सम्यङ्. नादम् अनाहतं ध्वनियुतं शृण्वन्ति ये तादृशम्।

पिंडे सिध्दि परं निरंतरतया ब्रम्हांडमध्येऽथ वा।

तेषां सिध्दमतेस्कते: समुदितं सत्यं परं लभ्यते।। - उपदेश ७/१३

याचा अर्थ असा की जे साधक गुरूकृपेने कुंडलिनी जागी झाल्यावर घंटा, मर्दल, झांज (काहल) दुंदुभी हे नाद सम्यक गतीने ऐकतात त्यांना या अनाहत नादाच्या श्रवणाने पिंडसिध्दी प्राप्त होते. पिंड-ब्रम्हांडाचे स्वरूप पूर्णपणे समान असल्यामुळे त्यांना परम सत्याची प्राप्ती होते. ही सत्यप्राप्ती म्हणजेच शिवशक्ती सामरस्याचा अनुभव व त्यातून फलित होणारी आत्मज्ञानावस्था!

यातील 'अनाहतनाद' ही संकल्पना स्पष्ट करणे जरूरीचे आहे. अनाहत नादाच्या श्रवणाच्या शक्यतेची जेव्हा देहस्थिती येते त्यावेळी पिंडसिध्दी सारखी अतिउच्च दर्जाची स्थिती तयार होते असाच अर्थ स्पष्ट होतो. त्यासाठी अनाहत नादाचे वेगवेगळे संदर्भ व स्पष्टीकरणे पुढीलप्रमाणे नोंदता येतात.

गोरखवाणीमधील १३०, १३६ व १७८ क्रमांकाची सूत्रेही अनाहत नादासंबंधी आहेत. त्याचप्रमाणे गोरखज्ञान गोदडी मधे खालील सूत्र दिलेले आहे.

अनहत नाद नाम की पूजा। ब्रम्हवैराग्य देव नही दूजा।।

- गोरख ज्ञान गोदडी/२०

**अर्थ :** अनाहत ध्वनी हीच नामाची पूजा आहे. ब्रम्ह व वैराग्याव्यतिरिक्त अन्य देव नाही.

वरीलप्रकारे श्रवणविषयक (Auditory) अनुभवांच्या नोंदी संत वाङ्मयातही आढळतात. श्री निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, नामदेव, गोरा कुंभार, जनाबाई, तुकाराम, मीरा, गोरखनाथ, कबीर, काडसिध्द महाराज, गुरूदेव रानडे अशा अनेकांना या अनाहत नादाचे अनुभव आल्याची नोंद आहे.

**संदर्भ :** गुरूदेव आर. डी. रानडे चरित्र आणि तत्त्वज्ञान, पान २५८-२५९-२६०.[१]

पिंडब्रम्हांड ऐक्याबद्दल श्री दत्तात्रय यांच्या ''अवधूत गीता'' अध्याय ३ मध्ये एकूण ४६ श्लोक आहेत. त्यामध्ये ४० वेळा एकच ओळ प्रत्येक श्लोकाबरोबर घेतली गेली आहे. ती ओळ आहे.

ज्ञानामृतं समरसं गगनोपमोहम्।।

याचा अर्थ असा की मीच ते अंतिम अस्तित्व, ज्ञान व आनंदरूप आहे व मी व माझे स्वरूप वास्तविक आकाशाप्रमाणे अमर्याद आहे. श्लोक ४५ मध्ये 'स्वरूपरूपं परमार्थतत्वम्' म्हणजे अंतिम सत्यस्वरूप म्हणजे मीच ज्ञानरूप, अमृतरूप व सामरस्यरूप व आकाशप्रमाणे अमर्याद आहे. अशा प्रकारे ब्रम्हांड तत्वाशी पिंडात्मक व्यक्तीचे एकरूपत्व व अभेदत्व स्पष्ट केले गेले आहे.

'महार्थ मंजरी' या श्री गोरक्षनाथ विरचित ग्रंथात पिंड ब्रम्हांड ऐक्यत्वाबद्दलचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

अंडमये निजपिंडे पीठे स्फुरन्ति करणदेव्य:।

प्रस्फुरति च परमशिवो ज्ञाननिधिस्तासां मध्ये।। - महार्थ मं गाथा/३४

याचा अर्थ असा की अंडमय असे स्वशरीरस्वरूपी पीठामधे करणदेवी म्हणजे इंद्रियांच्या शक्ती स्फुरित होतात. व त्यामध्येच ज्ञान निधी परमशिव प्रकाशित असतो. पंचमहाभूतांनी बनलेला देह म्हणजे पिंड व विश्व म्हणजे अंड यांचे एकरूपत्व अनुभवणे हाच योगाचा उद्देश आहे. या अंतर्बाहय अनुभवाच्या आदान प्रदानाच्या क्रियेबाबतचा 'श्रीशिवसूत्र' या ग्रंथातील उल्लेख 'महार्थमंजरी' या ग्रंथात खालीलप्रमाणे दिला आहे.

''चित्तस्थितिवत शरीरकरणबाह्येषु''. शरीरस्थित चित्ताच्या आनंदावस्थेचा जसा अनुभव घेतला तसाच शरीराच्या बाहेरच्या विश्वातही घ्यावा असा याचा लक्ष्यार्थ आहे. उदा. 'प्रत्यभिज्ञा' ग्रंथातील सूत्र ''विश्वरूप: अहम् इदमित्यखंडानंद बृंहित:''

**अर्थ :** मी विश्वरूपीच आहे व अशा अखंड आनंदाने विस्तृत झालेलो आहे.

पिंडब्रम्हांड ऐक्याबद्दल 'गोरखवाणी और गोरखयोग' ग्रंथामध्ये - गोरखज्ञान (यालाच 'ज्ञानतिलक' म्हणतात) विभागात पुढील श्लोक आहे.

तुंबी मे तिरलोक समाणा, तिरबेणी रवि चंदा ।

बूझौ हो कोई ब्रम्ह गियांनी, अनहत नाद अभंगा।। - गो.ज्ञा./३५

म्हणजे या शरिरातच त्रैलोक्य सामावलेले आहे. याच पिंडात हे ब्रम्हांड आहे. याच्यातच त्रिवेणी; सूर्य,चंद्र, अनाहत नाद आहेत. कुणी ब्रम्हज्ञानीच हे जाणू शकतो.

दैवी वाणी या श्री विवेकानंदांच्या ग्रंथात त्यांनी साधकाला अनुभवाला येणाऱ्या या पिंडब्रम्हांड ऐक्याबद्दल थोडक्यात मार्मिक विवेचन केलेले आहे.

''प्रेम, धर्म आणि पवित्रता हे विशेष घटक हे आपल्या स्वत:च्या हृदयात जसे जसे वृध्दिंगत होतात तसे तसे आपल्याला बाहेर जास्त जास्त प्रेम, धर्म आणि पवित्रता दिसू लागते. आपण दुसऱ्याची जी सारी निंदा करतो तिने वस्तुत: आपण स्वत:च निंदिले जात असतो. जे तुमच्या हाती आहे ते पिंडजगत वा अंतर्जगत तुम्ही नीट ठेवा म्हणजे ब्रम्हांड वा बहिर्जगतही तुमच्या पक्षी आपोआप नीट व्यवस्थित होऊन जाईल. हे त्या जलस्थितीशास्त्रातील विरोधाभासासारखे (Paradox) आहे. पाण्याचा एक बिंदू अवघ्या विश्वाला समतोल अवस्थेत ठेऊ शकतो. आपल्या आतमध्ये जे नाही ते आपल्याला बाहेर दिसणे शक्य नाही. एकाद्या अवाढव्य इंजिनाच्या पक्षी जशी त्याचीच एक लहानशी प्रतिकृती तसेच विश्वाच्या पक्षी आपण आहोत. पिंड आणि ब्रम्हांड यांचा संबंध म्हणजे एकादे प्रचंड

इंजिन आणि त्याचीच एक छोटी प्रतिकृती यामधील संमंधासारखा म्हणता येईल.''[२] (संदर्भ 'दैवी वाणी' - पान ५८)

वरील परिच्छेदातील (Hydrostatic Paradox) ची माहिती Internet वरून घेतल्यानंतर असे स्पष्ट झाले की १९६३ मध्ये पास्कलनी जो नियम मांडला तो असा आहे.

"The Pressure at a certain level in a fluid is proportional to the vertical distance to the surface of the liquid" या नियमावर हा जलस्थितीशास्त्रातला सिध्दांत अवलंबून आहे. त्यासंबंधात प्रयोगशाळेमध्ये प्रयोगासाठी वापरता येणारी अशी साधने विविध कंपन्यांनी बनवली आहेत. ट्रानसिल्व्हानिया युनिव्हर्सिटी, अमेरिकेची मिलिटरी ॲकॅडमी (Westpoint) व्हँडरबिल्ट युनिव्हर्सिटी इत्यादी ठिकाणी हा प्रयोग पहाता येतो.उदा. १५० पौंडाची व्यक्ती २.४ फूट पाण्याच्या स्तंभानी तोलून धरली जाते. हे खरे वाटत नाही म्हणून त्याला Paradox म्हटले आहे.

महातपस्वी श्री. कुमारस्वामी यांच्या शिवयोग और प्रार्थना योग या ग्रंथातील पिंड - ब्रम्हांडाबाबतची मांडणी खालीलप्रमाणे केलेली दिसून येते.

''शिवयोग की साधना के माध्यमसे सभी शिवशरणो को जीवनोद्देश की प्रचिती हुई जिसे दुसरे शब्दोमे 'लिंगांग सामरस्य' कहा जाता है. तात्विक दृष्टी से वैश्विक चैतन्य और व्यक्तिचैतन्य पूर्णत: दोनो एक जैसे अत: एकही है। किंतु व्यक्ती के अंतरंगमे व्याप्त चैतन्य को 'अंग' कहते है जो चित स्वरूप और शुध्द चेतन है। परंतु विश्वव्यापी विराट चैतन्य को 'लिंग' कहलाता है। वह सत रूप और शुध्द अस्तित्व स्वरूप है। पूजा की आत्मनिष्ठ पध्दती 'अहम् ग्रहोपासना' से यह सिध्द हो गया है की अंग और लिंग दोनो एक ही है और एकरूप भी हैं। आत्मजागृती के साधनो द्वारा वस्तुनिष्ठ जगत मे एकत्व की प्रचिती होना ही सामरस्य है और ये सामरस्य आनंदरूप है।[३] (संदर्भ- शिवयोग और प्रार्थनायोग - पान ३३)

पुरूषसूक्तामध्ये खालील सूत्र आढळते.

''प्रजापतिश्वरति गर्भे अंतरजायमानो बहुधा विजायते तस्य योनिं परिपष्यंति धीरा: तस्मिन ह तस्थुर्भुवनानि विश्वा।'' असे सूत्र आहे. - पुरूषसूक्त/ २०

याचा अर्थ असा की हा जो प्रजापति परमात्मा आहे तो अनंत ह्दयात स्थित होऊन गर्भात प्रवेश करतो व अनेक रूपाने या सृष्टीत उत्पन्न होतो. ज्ञानी मनुष्य त्याचे स्थान व रूपाला ज्ञानदृष्टीने पहातो. ही संपूर्ण सृष्टी यांच्यात स्थिर आहे. व पुरूषसुक्ताच्या शेवटच्या श्लोकात ''ईष्णन्निषाणामुं म ईषाण सर्व लोकं म ईषाण'' म्हणजे मी सर्वलोकात्मक बनावे (व्यापकत्वाचा व एकरूपत्वाचा अनुभव यावा ) अशीच प्रार्थना आहे. श्वेताश्वतर उपनिषदातील एक प्रार्थना याच अर्थाची असून तिच्याद्वारे व्यक्ती व विश्व यांचा संबंध स्पष्ट होतो.

नील: पतंगो हरितो लोहिताक्ष ।

स्तडिद्गर्भ ऋतव: समुद्रा:।

अनादि मत् त्वं विभुत्वेन वर्तसे।

यतो जानाति भुवनानि विश्वा।। - श्वे.श्व.उ./अध्याय ४/४

**अर्थ :** तूच नीलवर्ण लाल डोळयांचा व रंगाचा पक्षी आहेस, तूच मेघ वसंतादि ऋतु व सप्तसमुद्ररूप आहेस. तुझ्यातूनच सर्व विश्व उत्पन्न झाले आहे. तूच अनादि स्वामी व व्यापकरूपाने सर्वामधे विद्यमान आहेस. श्री गोरक्षनाथांच्या ब्रम्हांडी ते पिंडी या सिध्दांताचीच ही औपनिषदिक स्पष्टोक्ती आहे असे म्हटले तरी चालेल. स्वामी मुक्तानंदांच्या "The Perfect Relationship" या ग्रंथामध्येही वरील विषयाचा उहापोह केलेला दिसून येतो. तंत्रग्रंथामध्ये या संबंधात स्पष्ट निर्देश आहेत. त्यातील एक खालीलप्रमाणे पाहता येतो.

पिंडब्रम्हांड योरैक्यं स्थितं यो वेत्ति तत्वत:।

शिरास्थि रोमसंख्यादि स गुरूर्नापर :प्रिये।। - कुलार्णवतंत्र (१३/८८)[४]

म्हणजे अर्थ असा की,

"O beloved only that being who is fully aware of the oneness of the macrocosm (बहिर्जगत) and the microcosm (अंतर्जगत) and who even knows the number of all nadis, bones & hairs is in truth a Guru.[४] (संदर्भ -The perfect relationship- page 9) पिंडब्रम्हांड ऐक्याचा विषय योगी अरविंदांच्या तत्त्वज्ञानातही स्पष्ट करण्यात आला आहे. त्यांच्यामध्ये मोक्ष हा शरीर व मनासह मिळवायचा असतो. मनाने युक्त असे मानव्य म्हणजे प्रवासाची अखेर नव्हे. अतिमानसाच्या पातळीवरचे महामानवाचे रूप हे आदितत्वाचे त्या पुढचे प्राप्तव्य आहे. हे पुढील उत्थान नीट होण्यासाठी श्री अरविंदानी तीन प्रक्रिया सांगितल्या आहेत त्या अशा. Psychic change, spiritual change and supra - mental change. श्री. अरविंदानी पुढे असेही म्हटले आहे की, अतिमानसाचे अवतरण ही आध्यात्मिक गरज आहे. त्याचा ओझरता स्पर्श मनुष्याच्या जीवनात अमूलाग्र परिवर्तन घडवून आणू शकतो. हे भाग्य जेव्हा लाभते तेव्हा नेमके काय होते? त्याचेही उत्तर श्री. अरविंद देतात. ते म्हणतात, In all sights & forms one sees the Eternal & Reality in all sounds one hears it, in all touches one feels it (Life Divine- page 946) ही जी प्रक्रिया घडते त्याचा परिणाम असा होतो की, जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी, सदासर्वदा परब्रम्हाचा प्रत्यय येतो. म्हणजे अतिमानसाने आपल्या दिशेने उतरणे व आपण त्याच्या दिशेने जाणे अशी ही संयुक्त प्रक्रिया आहे. All objective life will become part of his subjective existence and by which he will realize, perceive, feel, see, hear, the Divine in all forms and in reciprocation all forms & movements will be

realized, seen, heard and felt as if taking place in his own vast self of Being म्हणजे चराचराशी एकरूप होण्याच्या शक्तीमुळे सहजपणे व्यक्तीला ब्रम्हरूप होता येते.[५] (संदर्भ-मुक्तिगाथा महामानवाची -पान १७७ ते १८०)

पिंडी ते ब्रम्हांडी व ब्रम्हांडी ते पिंडी यामध्ये जो व्यापक अशी सामरस्यानुभवाची अवस्था आहे ती ब्रम्हसाक्षात्काराचीच आहे. हा विषय भावनेचा किंवा काल्पनिक नसतो. तर ती अनुभवाच्या पातळीवरची एक प्रगाढ प्रचिती असते. त्यामध्ये 'मी' चे विसर्जन व 'त्या' च्या व्याप्तीच्या अमर्याद कक्षांचे दर्शन व त्या दर्शनानंतरची ती एकरूपतेच्या अनुभवातून निर्माण होणारी आनंदाची अवस्था असा हा आदान-प्रदानात्मक ब्रम्हानुभूतीचा विषय भगवद्गीतेमध्ये जीव व ईश्वर यांच्या संबंधातून विस्ताराने स्पष्ट केला गेला आहे. त्यासंबंधात अनेक श्लोक सांगता येणे शक्य आहे. तथापि, तो मुख्य विषय नसल्यामुळे त्या तपशीलात मी जाणार नाही. गोरक्षनाथांचा मुख्य सिद्धांत जीव व शीव हे एकरूप आहेत हे सांगण्याचा आहे. दुसऱ्या भाषेत जीवाचा जीवाचा शिवतत्वात विलीन होण्याचा अथवा एकरूप होण्याचा प्रयत्न असतो.

अशा रितीने भगवद्गीतेमध्येही गोरक्षसिद्धांत हा त्याच अर्थाने पण थोड्या वेगळया परिभाषेमधे मांडलेला आहे. श्री गोरक्षसिध्दांतात ज्या जिवाचा शिवतत्वात जाण्याचा किंवा एकरूप होण्याचा प्रयत्न असतो त्या जिवाची धारणा व बैठक ज्यात असते ते देहमाध्यम हे अत्यंत महत्वाचे व मूलभूत आहे. हा विचार त्यांच्या समस्त योगक्रियांचा पायाच आहे असे म्हटले तरी चालेल.

श्री. बाबामहाराज आर्वीकरांनाही पिंडब्रह्मांड अनुभूती स्पष्टपणे मान्य होती असे दिसते. त्यांनी असे म्हटले आहे की, ''सामरस्य प्रबोध हा भक्तजीवनाचा विशेष होय. मात्र योगी व्यापकता अनुभवेलच असे नाही. पिंडेपिंडाचा ग्रास होऊन भगवंतच भक्तातून व्यक्त व्हावयास लागतो. भक्तिभाव शून्य अवस्थेमध्ये हा अनुभव येत नाही. भक्तीतून समर्पित जीवन हाच त्यांचा स्थायिभाव झालेला असतो.''[६] (संदर्भ- दिव्यामृतधारा पान-२३२)

विश्वाशी वृत्तिएकरूपता गुरूप्रेमात आपोआप साधते. ज्या प्रमाणात भक्त गुरूशी एकरूप होतो त्या प्रमाणात त्याला त्यांचे रूप दिव्य व विश्वव्यापक आहे असे कळते. आपली जीवशक्ती व विश्व एकच आहे हे त्यास अनुभवास येऊ लागते. म्हणून निवृत्तीनाथ म्हणतात.

ब्रम्हसुखे झालो मी सदा संपन्न। ब्रम्ह परिपूर्ण अनुभविले।
गुरूकृपे ज्यासी सतपथ पावला। जीव सुखावला ब्रम्हसुखे।।[७]
(संदर्भ - निवृत्तीनाथ/दिव्यामृतधारा, पान २३३)

गुरूच्या दिव्य प्रेमस्वरूपाची संवेदना अनुभवताना विश्वाच्या तत्वरूपाची संवेदना भक्त अनुभवत असतो, अशा वेळी मानवी देहातील अवस्थांचे गूढ उकलू लागते. नाथपरंपरा सामरस्ययोगाला महत्त्व देते. योगमार्गाने सामरस्याकडे जाणे अभिप्रेत आहे. क्रियेच्या पातळीवरून पाहू गेल्यास योगातून भक्तीकडे व भक्तीतून समर्पणाकडे अशी क्रियात्मक वाटचाल अपेक्षित आहे. साधक उपासना करीत राहतो. त्या उपासनेतून ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग हे सर्व साध्य होतात. आणि त्या प्रकारची प्रचिती साधकाला घेता येते. अशी प्रचीती घेतलेला साधक सामरस्यावस्थेतील जिवाशिवाच्या अनुभूतीत बुडून रममाण होतो.

'महार्थ मंजरी' या श्री गोरक्षनाथांच्या ग्रंथातील पिंड ब्रम्हांडऐक्य कसे घडते व पंचमहाभूतांची देहांतर्गत कशी अवस्था होते या विषयांशी समांतर असे गोरखज्ञानमध्ये' सूत्र आहे ते पुढील प्रमाणे,

यंद्र मिल्यां तै धरती निपजै, यंदी बरषै देही।
गुरू हमारा बांनी बोली मांणिक चुगि चुगि लेही।। - गोरखज्ञान/२७

**अर्थ :** पर्जन्यवर्षावाने पृथ्वी धनधान्य देते (इंद्र ही जलदेवता आहे) त्याप्रमाणे इंद्रिये अंतर्मुख होऊन जेव्हा अनुकूल वर्षाव करतात तेव्हा देहांतच ज्ञान उत्पन्न होते व ज्ञानाचे मोती चघळण्यास मिळतात अशी आमच्या गुरूंची वाणी आहे. त्याच अर्थाच्या काही ओव्या ज्ञानेश्वरीमध्ये आढळून येतात त्यातील काहींचा उल्लेख खाली केला आहे.

ऐसी शरिरा बाहेरली कडे। अभ्यासाची पाखर पडे।
तव आत त्राय मोडे। मनोधर्माची।। - ज्ञा ६/२११

**अर्थ :** अभ्यास योगाची प्राप्ती झाल्यानंतर तिच्या खुणा शरिराच्या आत व बाहेर दिसू लागतात व मनाच्या चंचलतेचे बळ नाहीसे होते. त्याचप्रमाणे,

विषयांचा विसरू पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। हृदयामाजी।। - ज्ञा ६/१८८

**अर्थ :** विषयांचा विसर पडतो, इंद्रियांची विषयाविषयीची हाव व तळमळ नाहीशी होते. मन स्थिर होऊन हृदयामध्ये शांतपणे स्थिरावते. श्री ज्ञानेश्वरांनी एक विचार असाही मांडला आहे की, जर जीव परमात्म्याहून भिन्न नाही तर जिवाच्या बंधमोक्षाचा विचार करण्याची काय जरूरी आहे? आत्मा नित्यमुक्त आहे. मग जर बंधनच नाही तर तिथे 'मोक्ष' कशाचा ? वास्तविक हा ब्रम्हरूप जीव कुठे लपला पण नाही व कुठे प्रगट ही झाला नाही. त्यासंबंधी श्री ज्ञानेश्वर अमृतानुभवात म्हणतात-

आणि पूर्ण अहंता वेढलो। सैंध आम्हीच दाटलो।
ना लोपलो ना प्रगटलो। कोणा होऊनी।।[८]

(संदर्भ नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर पान ७८)

**अर्थ :** शरिराला पकडून राहणारी अहंता जेव्हा ज्ञानाने वेढली जाते तेव्हा मीच सर्वत्र आहे असे दिसते. म्हणून मी कुठे दडलेलोही नाही व प्रगटही होत नाही. आत्मतत्त्वाचे हे उभयांगी स्वरूप चांगदेव पासष्टी मध्येही मांडले गेले आहे.

प्रगटे तंव तंव न दिसे। लपे तंव तंव आभासे।
प्रगट ना लपला असे। न खोमतां जो ।। - चांगदेव पासष्टी २

**अर्थ :** जेव्हा जेव्हा परमात्मा प्रगट होतो तेव्हा दृष्यरूपात जग दिसत नाही. जेव्हा तो लपतो तेव्हा जग भासमान होते त्याचे हे व्यक्त अव्यक्तपण क्षोभ न पावता चाललेले असते. म्हणून ज्ञानेश्वरीमध्ये अशा अव्यक्त तत्त्वाची उपासना कशी करावी याचा उलगडा करत मार्गदर्शन केले गेले आहे व भक्ताच्या दृष्टीने ते अत्यंत आवश्यक आहे.

तू मन हे मीचि करी। माझिया भजनी प्रेम धरी।
सर्वत्र नमस्कारी। मज एकाते।। - ज्ञा/अध्याय९/५१७

**अर्थ :** तू आपले मन माझेशी एकरूप कर. माझ्या भजनात प्रेमाने एकरूप हो. सर्वत्र मीच आहे असे समज व मला नमस्कार कर. असे सांगून पुढील ओवीमध्ये शक्तीच्या परमसाध्याचेच विश्लेषण ज्ञानेश्वरांनी केले आहे.

ऐसा मिया आथिला होसी। तेथ माझियाची स्वरूप पावसी।
हे अंत: करणीचे तुजपाशी। बोलिजत असे।। - ज्ञा/अध्याय९/५१९

**अर्थ :** असा माझ्या योगाने जेव्हा संपन्न होशील त्यावेळी तू माझे स्वरूपच होशील. हे अंत:करणातले गुह्य मी तुला सांगत आहे.

अशा प्रकारे सदगुरूंकडून महावाक्याचा उपदेश मिळाल्यानंतर साधक जेव्हा ब्रम्हतत्वाशी एकरूप होऊन जातो त्याचे ज्ञानेश्वरीच्या१८ व्या अध्यायात ओवी क्र. - १०३२ ते१०३४ मध्ये वर्णन मिळते .

हरिपाठातील ओव्यांमधूनही हेच सामरस्य व गुरूमहिमा व्यक्त होताना दिसतो.

साधूबोध झाला तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभवे।
कापुराची वाती उजळली ज्योती। ठायीच समाप्ती झाली जैसी।
मोक्षरेखे आला भाग्ये विनटला। साधुचा अंकिला हरिभक्त।
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी। हरी दिसे जनी आत्मतत्वी।। - हरिपाठ अ/६

**अर्थ :** साधूकडून ज्ञान झाल्यानंतर मुमूक्षू देहभानरहित होऊन आत्म्याशी एकरूप होतो. कापराची ज्योत उजळते पण कापूरही जळतो व ज्योतही उरत नाही. साधक जेव्हा गुरूअंकित असतो तेव्हा मोक्ष पायाशी येऊन तो भाग्यवान ठरतो. ज्ञानदेवांना संतसंगतीत जनवन आत्मत्वात एकत्व अनुभवास आले.

अशा प्रकारे श्री गोरक्षनाथांचा महत्वाचा पिंड-ब्रम्हांड संबंधाचा सिध्दांत इतर अनेकांच्या तुलनात्मक दर्शनाने जास्तच स्पष्ट होऊन त्यातील अर्थबोध अंतर्मनास खोलवर जाणवू लागतो व व्यक्ती ही सर्व तत्वज्ञानाच्या मांडणीमध्ये मध्यवर्ती का असते याचा उलगडा होत जातो. श्री गोरक्षनाथांच्या समाज प्रबोधनाची मुहूर्तमेढ व्यक्ती ही केंद्रस्थानी मानून का पक्की केली गेली हे स्पष्ट होते.

**३) वृत्तींचे उदात्तीकरण व शक्तींचे संचालन :**

नाथसंप्रदायात वरील विषयाची मांडणी कशाप्रकारे केली आहे? त्या मांडणीला शरीरशास्त्रीय व मानसशास्त्रीय आधार आहे का? आपल्या देहमाध्यमातून विविध संयोजनक्रिया कशा चालतात? त्या क्रिया सुरू असताना काही अडथळे येतात का? ते अडथळे दूर करून पुढील साधनेतील वाटचाल कशी करायची? यासाठी वृत्तींचे उदात्तीकरण व शक्तीचे संचालन या विषयासंबंधीची चर्चा आवश्यक ठरते.

हा विषय स्पष्ट करण्याची सुरवात पातंजल सूत्र समाधीपाद सूत्र १ व सूत्र २ पासून करता येईल.

अथ योगानुशासनम्।।१।। व

योगश्चित्तवृत्ति निरोध:।।२।।

अशी ती सूत्रे असून सुरवातीलाच चित्त व वृत्तींचा निरोध करण्याचा विषय मांडलेला आहे. थोडक्यात चित्त व वृत्ती म्हणजे नेमके काय हे समजले पाहिजे. देहमाध्यमातून बाह्य जगताचा प्रत्यय कसा येतो? त्याची मांडणी थोडक्यामध्ये पुढीलप्रमाणे करता येते.

डोळा → मेंदूतील दर्शनेंद्रिये → मन → निश्चयात्मिका बुध्दी → बुध्दीची प्रतिक्रिया अहंभावाची अभिव्यक्ती यांचे संमिश्रण → अंतस्थ पुरूषास सादरीकरण (आत्मा) आत्म्यास होणारा वस्तूचा प्रत्यय.

या सर्व क्रिया मन,इंद्रिये, निश्चयात्मिका बुध्दी, अहंभाव यांचे एकत्रीकरणातून अत:करणाचे माध्यमातून प्रगट होतात. अंत:करणाचे मागे चेतन आत्मा असतो. म्हणून अंत:करणातील 'मन' हा घटक चेतन नसूनही चेतना असल्याप्रमाणे काम करतो. थोडक्यात मनाचे मागे जेव्हा द्रष्टारूपाने आपण उभे असतो तेव्हा मन सचेतन होते. व ज्यावेळी आपण मनाचा त्याग करू म्हणजे मागे उभे राहणार नाही त्यावेळी मनाचे अस्तित्व शून्यवत होते. मनाच्या कार्यपध्दतीची वरील दिलेली मांडणी ही राजयोगांतर्गत आहे. मनाच्या क्रिया प्रतिक्रियांचा उलगडा होण्यासाठी मनाच्या तीन अवस्थांचे नीट आकलन होणे आवश्यक असते.

तम; यामध्ये मूढावस्था असते. लोकांचे अनिष्ट करण्याची प्रवृत्ती दिसून येते. रज; यामध्ये क्रियाशीलता असते. सत्ता व भोगाची ओढ असते.

सत्व; यामध्ये प्रसन्नता व शांती असून शुध्द व उत्कृष्ट क्रिया शक्ती कार्यरत राहते.

चित्त हे मनाचे घटकद्रव्य (उपादान) किंवा तत्व असल्यामुळे ते नेहमी शुध्दस्वरूपात जाण्याचा प्रयत्न करत असते पण इंद्रिये त्याला बाहेर खेचत असतात. निकृष्ट प्राण्यांपासून ते श्रेष्ठ प्रतीच्या प्राण्यांपर्यत सर्वांचे ठिकाणी चित्त असते. पण फक्त मानवदेहातच ते बुध्दीच्या रूपात विकास पावलेले असते.

चित्त हे मनाचे माध्यमातून ४ प्रकारे व्यक्त होते.

| | | | |
|---|---|---|---|
| क्षिप्त - | मूढ - | विक्षिप्त - | एकाग्र |
| (विखुरलेले) | (अंधारलेले) | (जमा झालेले) | (धर्ममेघ ) |
| १ | २ | ३ | ४ |
| | | | (निरूध्द नव्हे) |

(कारण रोधलेल्या वृत्तीला चित्तवृत्ती म्हणता येणार नाही)

असे मन (चित्त) एकाग्र झाले की द्रष्टा म्हणजे पुरूष आपल्या शुध्द स्वरूपात स्थिर होतो. त्याचे सूत्र क्र.३ आहे.

तदा द्रष्टु: स्वरूपेऽवस्थानम्। - पा.यो.सू./स.पाद./३

जसा तरंगविरहित तलाव शांत झाला कि तळ दिसू लागतो. अशी अवस्था जेव्हा नसते तेव्हा द्रष्टा हा चित्तातील स्पंदाशी किंवा लहरींशी एकरूप होऊन तो त्यावेळी तसा होतो त्याचे सूत्र असे आहे;

वृत्ति सारूप्यम् इतरत्र। - पा.यो.सू./स.पाद./४

वृत्तींचे निरोधन अभ्यासाने व वैराग्याने होते. वृत्तींचे पाच प्रकार आहेत.

**पाच प्रकार :**

प्रमाण (सत्यज्ञान), विपर्यय (भ्रम),विकल्प (शब्दभ्रम), निद्रा (शुन्यत्व बोध), स्मृती (अनुभवलेल्या विषयांची जाणीव (संस्कार )

अशा वृत्तींच्या निरोधाचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

अभ्यास वैराग्याभ्यां तन्निरोध:। - पा.यो.सू./स.पाद./१२

**अर्थ :** अभ्यास व वैराग्य यांनी वृत्तींचा निरोध होऊ शकतो. पुढील विवेचनात जाणेपूर्वी 'अथयोगाअनुशासनम्' म्हणजे आता योगाचे अनुशासन। अशा सूत्रानी पातंजल योगाची सुरवात झालेली आहे. त्यासंबंधात थोडे विवेचन आवश्यक वाटते.

वृत्तींचे उदत्तीकरण वगैरे विषयात जाण्यापूर्वी 'आता योगाचे अनुशासन' या सूत्रातील 'आता' या शब्दातच खोल अर्थ दडलेला आहे. तो शब्द साधकाची एक विशेष

स्थिती दाखविती. म्हणजे योग प्रवेशोत्सुक साधक योग प्रक्रियांमधून तेव्हाच यशस्वीपणे प्रगती करू शकतो जेव्हा त्याची मनस्थिती आशावादीही नसते व निराशावादीही नसते. हे दोन्हीही दृष्टीकोन आजाऱ्यासारखे व अडथळा निर्माण करणारे ठरतात. भविष्यासंबंधी, पुढील अवस्थांसंबंधी कल्पना राज्यात रमणे, अपेक्षा ठेवणे यामुळे मनाला येणारी गती रोखणे प्रथम आवश्यक असते व साधकास सुरवातीपासूनच ही जाण असणे, किमान एवढी परिपक्वता असणे अपेक्षित असते. भूत व भविष्य दोन्ही मधून पूर्णपणे मोकळे होऊन अलिप्त झाल्यास मनास एक प्रकारची शांत अवस्था प्राप्त होते व अशी मनस्थितीचीच योगात उतरण्यापूर्वी असणे आवश्यक असते. सुखदु:खातून हेलकावे खात जाणाऱ्या जीवनाबद्दल एक प्रकारची तीव्र व्यर्थता जाणवल्याखेरीज ही योगाची नवीन दिशा उत्साहाने स्वीकारली जात नाही. स्वत:चे अस्तित्वाची निरर्थकता स्पष्टपणे जाणवणे व अशा निरर्थक अस्तित्वाचे रूपांतरण करून ते सार्थकी लागल्याचा अनुभव घेणे अशी मन:स्थिती जेव्हा निश्चित होईल तेव्हाच योग संभवतो. जीवनाची निरर्थकता व्यक्त करताना गौतम बुध्दांनी जीवनाचे दु:खद स्वरूप तीव्रतेने मांडले. बुध्दांच्या समग्र परिवर्तनाचे मूळ या पायाभूत दु:ख दर्शनातच आहे. त्यामुळे गौतम बुध्दांचे तत्वज्ञानास निराशावादी तत्वज्ञान समजण्याची मोठी चूक होत आलेली आहे. बुध्दांनी जीवनास अर्थहीन म्हटलेले नाही. तर मानवाच्या सांप्रत जीवनास अर्थहीन म्हटले आहे. या अर्थहीनतेतून बाहेर पडण्याच्या क्रियेमागे ''हे वर्तमान जीवन अर्थवाही नाही'' हा अनुभव स्पष्ट असणे अत्यंत जरूर आहे. त्याशिवाय तो धागा तोडता येणार नाही. म्हणून एच.जी.वेल्स ने गौतम बुध्दांबद्दल म्हटले आहे की, “He is so Godless but so God- Like”.[१] (संदर्भ योगदर्शन भाग १ व २ पान ३३) योगशास्त्राच्या विज्ञानाची जी मानसशास्त्रीय बैठक आहे, तिचेच दिग्दर्शन यामधून होते. ही स्पष्टता योगप्रवेशासाठी नितांत आवश्यक आहे. तरच अभ्यासाचे अनुषंगाने मन-चित्त-वृत्ती यांचे कार्य कसे चालते हे साक्षीभावाने स्वत:स अलग करून आपण पाहू शकू. समजू शकू व नंतरच त्या मनोव्यापारावर नियंत्रण आणण्याच्या क्रिया करू शकू राजयोगांतर्गत मनोव्यापाराचा हा विस्तृत खुलासा या विषयाच्या सुरूवातीलाच स्पष्ट असणे आवश्यक असते. मनाचे व्यापार (कार्य) समजण्यासाठी म्हणून कोणत्याही धारणेचा आधार महामुनी पतंजलींनी न घेता स्पष्टपणे योगानुशासनाचे विधीच सांगितले आहेत.

मन समजण्यासाठी पहिली अट म्हणजे मनास स्थिर करणे,व त्याची गती रोखणे ही असते. योग कोणताही असो मनाची गती रोखणे ही मूलभूत प्रक्रिया आहे. अनेक साधूसंतांनी व सिध्दांनी हाच विषय आग्रहाने सांगितलेला आहे. शब्द वेगवेगळे असतीलही. शिरडीचे श्री साईबाबांचे ‘श्रध्दा रख और सबुरीसे काम ले’ किंवा अक्कलकोटच्या समर्थांचे

वचन 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' अशा स्वरूपाचे आदेश किंवा आश्वासनेही मानवास एका जागी शांत, स्थिर व अंतर्मुख करण्यासाठी असतात. औषधाचे नाव न घेता दिलेली ही औषधे म्हणजे योगानुशासनाची प्राथमिकताच आहे. “Be a child or you can not enter into the Heaven” किंवा "First yee seek the kingdom of God and all else shall be added unto you" ही बायबलमधील वचने एक प्रकारच्या आज्ञाच आहेत. योग हा समझोत्याचा विषय नाही. ते श्री गोरक्षनाथांच्या भाषेत पिंडविज्ञान आहे. पिंडसंवित्ति आहे. अशा यथार्थ बोधाचे स्थितीनंतरच चित्तवृत्तींचे निरोधीकरण अथवा त्यांचे उदात्तीकरण म्हणजे काय व ते कसे होते व त्याच्या क्रियांना देहपिंडांतर्गत कोणत्या वैज्ञानिकक्रिया घडतात हे कळू शकते व या सर्वांचे पर्यवसान एका वेगळया आत्मविश्वासाच्या स्थितीत होते. मनाच्या स्थिरीकरणाला योगामध्ये इतके महत्त्व का? मनाच्या भ्रमणकक्षा व स्पंदन-वहन शक्ती ही, मन हे वायुरूप असल्यामुळे कल्पनेपलिकडची आहे. एक मार्मिक टिपणी म्हणून मनाबद्दल संत बहिणाबाई चौधरी काय म्हणाल्या आहेत ?

मन जह्यरी जहयरी। त्याच न्यारं ते तंतर।
अरे इचु साप बरा। त्याले उतारे मंतर।।१।।

मन पाखरू पाखरू। त्याची काय सांगू मात।
आता व्हत भुईवर। गेल गेल आभायात।।२।।

मन एवढ एवढ। जसा खाकसंचा दाना।
केवढ केवढ। आभायात भी मायेना।।३।।

देवा असं कसं मन। आसं कसं रे घडलं।
कुठे जागेपणी तुले। असं सपन पडलं।।४।। - संत बहिणाबाई

जो विषय सूक्ष्मातून पहायचा आहे तो आहे 'मन', त्याच्या वृत्ती व त्यांचे उन्नयन (sublimation). मन हे बहूअंगी शक्तीरूपात काम करू शकते कारण त्यामागे आत्मपुरूषाची शक्ती असते. म्हणून

मन एवं मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो: ।
बंधाय विषयासंगि मोक्षे निर्विषयम् स्मृतम्।। - मैत्र्यु./६/३४

**अर्थ :** मनुष्याच्या कर्माचा बंध किंवा मोक्षास मन हेच कारण आहे. मन विषयासक्त झाले म्हणजे बंध व निर्विषय झाले म्हणजे मोक्ष. इथे कर्म करणाऱ्याच्या बुध्दीला महत्त्व दिले आहे. याचा अर्थ असा की मन ही दुधारी तलवार आहे. तेच बंधाला कारण असते व तेच मोक्षालाही कारण असते. अशा या न दिसणाऱ्या मनासंबंधी प्राथमिक विवेचन करायचे झाले तर ते असे करता येईल.

मानवी देहमाध्यमातील सर्व इंद्रिये मन या न दिसणाऱ्या सूक्ष्म इंद्रियाशी जोडलेली असतात. वेगवेगळी इंद्रिये वेगवेगळी कामे करत असतात. व त्यांचा योग्य वापर व त्यातून आनंदाच्या निर्मितीसाठी मन ओतावे लागते. एका अर्थी मन ओतणे- किंवा लावणे यातून एक वेगळी भावनिर्मिती होत असते. आपले मानवी शरीर हे वेगवेगळया इंद्रियांचा एक संघ आहे. व प्रत्येक इंद्रियाचा एक स्वतंत्र गुण आहे. या सर्व इंद्रिय संघाच्या एखाद्या अधिपतीसारखे मन काम करत असते. अशा मनाच्या स्थिरतेचे महत्त्व व त्यातून साधले जाणारे सामरस्य स्पष्ट करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर म्हणतात :

म्हणोनि मन एक निश्चल राहेल।
मग आम्हासी साम्य येईल।। - ज्ञा. ६/४१७

**अर्थ :** म्हणून एक मन जर स्थिर राहील तर आम्हाला साम्यावस्था प्राप्त होईल.

मनुष्याला मनुष्य ही संज्ञा मनापासून प्राप्त झाली आहे. मानवाच्या सर्व अवयवांगावर मनाचे प्रभुत्व असते. मनाच्या धारणेप्रमाणे शरीरावर परिणाम होतात म्हणून शरीर व मन या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्याला मनो-शरीर असेही म्हटले जाते. देह माध्यमात पाच कोश असून त्यातील सूक्ष्म भेदानुसार ते अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे आहेत. मनरूपी वायूचे रोधन किंवा ऊर्ध्वचालन ज्या योगक्रियांनी व आचार-विचारांनी करावे लागते त्यामध्ये आहार हाहि मुद्दा महत्वाचा ठरतो. खालील श्रुतिवचन- आहाराचे दूरगामी व सूक्ष्मपरिणाम स्पष्ट करते.

''आहारौ सत्वशुध्दि: सत्वशुध्दौ धृवा स्मृति: स्मृतिशुध्दौ सर्वग्रंथींना विप्रमोक्ष:''
छां उप./ ३/७/२५

**अर्थ :** आहार शुद्ध असेल तर मन शुद्ध राहते. मन शुद्ध असेल तर स्मरण स्थिर होते व स्थिर स्मरणाने सर्व ग्रंथी मोकळ्या होतात. हे शरिरात कसे घडते? अन्न + ते ग्रहण करणाऱ्याची वृत्ति यापासून अन्नरस तयार होतो या अन्नरसावर वायू व विचारशक्ती यांचा परिणाम होतो. या दोन्हींतून परिणामस्वरूप मन बनत जाते. या प्रक्रियेत देहस्थित अग्नीही भाग घेत असतो.[१०] (संदर्भ - दिव्यामृतधारा पान ३११) याचा अर्थ मन हे अन्नमय व वृत्तिमय असून अन्नाच्या सूक्ष्मपरिणामातून त्याचे कार्य चालते. दही घुसळल्यावर लोणी वर येते त्याप्रमाणे अन्न व विचार यांच्यावर देहस्थित वायू व अग्नि यांच्या प्रक्रियेतून मनाची निर्मिती होते. व या अग्नीच्या रूपातच सर्व प्राणीमात्रांच्या देहात ईश्वरी चैतन्य कार्य करत असते. भगवद्गीतेमधील पुढील श्लोकातून हा विषय स्पष्ट होतो

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रिता।
प्राणापानसमायुक्त: पचामि अन्नं चतुर्विधम्।। - गीता अ.१५/१४

**अर्थ :** सर्व प्राण्यांच्या देहात असलेला मी वैश्वानर, अग्निरस होऊन प्राण व अपान यांच्या माध्यमातून चारी प्रकारचे अन्न (भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य) पचवतो. मनाचा धर्म म्हणजे वायूची गती कशी तयार होते हे वरील विवेचनातून स्पष्ट होते. मन व त्याचे स्वरूप व साधकाचे किंवा योग्याचे त्याबाबतचे नियम याबाबत 'गोरखवाणी' मध्ये अनेक सूत्रे आहेत. ती पुढील विवेचनात घेतलेली आहेत. श्री गोरक्षनाथांच्या सिध्दांतांची मांडणी व विवेचन करणेचा प्रयत्न करत असताना त्यामधील मन, चित्त, वृत्ती व त्यांचे कार्यकारण भावाबद्दल व अंतर्गत क्रिया-प्रक्रिया पहाताना मानसिक क्रियास्पंदांचे संयोजन देहमाध्यमातील ग्रंथी (glands) द्वारा जसे होते त्याच प्रमाणे चित्तवृत्तींचा परिणाम ग्रंथींच्या कार्यावरही होत असतो. हा विषय समजून घेतला तरच वृत्तींचे निरोधन किंवा उदात्तीकरण करणे म्हणजे काय हे स्पष्ट होऊ शकते. ही देहमाध्यमांतर्गत रासायनिक प्रक्रिया असते व ती आत्मतत्वाच्या शक्तीने मनाचे माध्यमातून पार पाडली जात असते. मन या घटकाबाबत प्रत्यक्ष श्री गोरक्षनाथ त्यांच्या गोरखवाणी और गोरखयोग यामधून कोणते मार्गदर्शन करतात हे पहाणे संयुक्तिक ठरेल.

**श्री गोरखवाणीतील काही सूत्रे**

अह निसि मन लै उनमन रहै, गम की छांडि अगम की कहै।
छाडै आसा रहै निरास, कहै ब्रम्हा हूँ ताका दास।। - गो. वाणी/१६

**अर्थ :** रात्रंदिवस जो मनाला उन्मावस्थेत ठेवतो, गम्य जगताची चर्चा न करता अगम्य अश्या अध्यात्मिक क्षेत्राची वार्ता तो करतो, व सर्व आशा-निराशेच्या पलिकडे राहतो. त्याचे दास म्हणून ब्रम्हाजी राहतात.

यहु मन सकती यहु मन सीव। यहु मन पाँच तत्व का जीव ।
यहु मन लै जै उनमन रहै। तौ तीनि लोककी बातां कहै।। - गो. वाणी/५०

**अर्थ :** म्हणजे हेच मन शिव आहे, शक्ती आहे, पंचतत्वातून निर्मित असे मन उर्ध्वस्थितीत ठेवल्यास त्यास सर्वज्ञता येते व तिन्ही लोकांसंबंधी तो बोलू शकतो.

कै मन रहै आसापास, कै मन रहे परम उदास।
कै मन रहै गुरू कै ओलै। कै मन रहै कांमनि कै षोले।। - गो.वाणी/१७३

**अर्थ :** मन एकतर आशेच्या पाशात रहाते तर केव्हा उदास रहाते, किंवा गुरूशरणांकित होऊन रहाते किंवा कामिनीच्या शृगांरात आडकून रहाते.

जिनि मन ग्रासे देव दाण। सो मन मारिले गहि गुरू ग्यान बांण।। - गो.वाणी/२३०

**अर्थ :** ज्या मनानी देवदानवांना ग्रासले त्याला गुरूच्या ज्ञानरूपी बाणानीच मारले पाहिजे.

अवधू यो मन जात है, याही तै सब जांणी।
मन मकडी का ताग ज्यूं, उलटि अपूठौ आंणि।। - गो.वाणी/२३५

**अर्थ :** हे अवधू! मन हे बाहेर जातेच हे तू जाणतोसच. कोळी ज्याप्रमाणे त्याचा धागा उलटून परत घेतो तसे मनाला उलट दिशेला फिरव.

अशा प्रकारे मनाचा स्वभाव समजून घेऊन त्याची दिशा बदलण्याचे काम हेच योग्याचे लक्ष्य असते. पण श्री. गोरक्षनाथ इथेच थांबले नाहीत. त्यासाठी आवश्यक त्या नियमांचे पालनही तितकेच महत्त्वाचे आहे हे त्यांनी अनेक सुत्रातून स्पष्ट केले आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, मीठ, आंबट व गोड पदार्थ यांचे मर्यादित सेवन व दारू, मांस व भांग यांचा पूर्ण त्याग असे स्पष्ट करून अन्न पाण्याचा व्यवहार व काही कडक पथ्ये योगसिद्धीस अनिवार्य आहेत असे त्यांनी स्पष्ट केले आहेत. यासाठी आहार-विहाराचे नियमही त्यांनी दिले आहेत.

वरील विवेचनातून मनाची मध्यवर्ती भूमिका स्पष्ट होते. बहिर्सृष्टी व अंतर्जगत यामध्ये मन हे द्विमुखी संचलित झडपे प्रमाणे काम करत असते. अशा मनाला एक मुखी झडपेप्रमाणे काम करायला लावणे जरूर असते. स्तंभित प्रवाह व ज्ञानोत्तर समर्पण युक्त भक्तिप्रेम प्रवाह यांच्या चिकित्सेत मनोधर्माच्या सर्व अंगांचे स्पष्टीकरण होऊ शकते. मानवी देहिक माध्यमात उपलब्ध असलेल्या ज्ञानसाधनांच्याद्वाराच जे साध्य साधायचे, मग ते ऐहिक असो अगर पारमार्थिक असो, ती साधने म्हणजे मन-बुध्दी, पंचज्ञानेंद्रिय व पंचकर्मेंद्रिये. चित्तवृत्तींची म्हणजे मनाच्या स्पंदनांची निरोधावस्थेतून एकाग्रता साधणे व त्यायोगे द्रष्ट्या पुरूषतत्वाचा स्थिर स्वरूपात अनुभव घेणे व त्यातून अष्टांग योग प्रक्रियेद्वारा समाधी स्थितीचा अनुभव घेणे हाच उद्देश योगाचा असतो.

श्री गोरक्षनाथांचा किंवा श्री ज्ञानेशांचा योग हा अष्टांग योग नसून षडंग योग आहे. अष्टांग योग ही पातंजलमान्य व्यवस्था आहे. त्यामध्ये यम व नियम ही दोन अंगे महत्त्वाची मानली गेली आहेत. नाथ परंपरेत मात्र ही दोन्ही अंगे गुरूकृपेच्या प्रभावात सहजपणे संभाळली जातात अशी धारणा आहे. त्या अनुषंगाने नाथयोग हा षडंगयोग म्हणून ओळखला जातो. त्याचे योगमार्तंडमधील सूत्र हे नाथसंप्रदायाने स्वीकारलेले षडंगसूत्र म्हणून मानले गेले आहे. ते सूत्र खालीलप्रमाणे आहे.

आसनं प्राणसंरोध: प्रत्याहारश्च धारणा।
ध्यानं समाधिरेतानि योगांगानि भवन्ति षट्।। - योगमार्तंड/२

**अर्थ :** आसन, प्राणायाम् प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि ही योगाची सहा अंगे आहेत.

श्री ज्ञानेश्वरांनी हठयोगाचे अनुसरण केलेले असून गीता अध्याय ६ मध्ये ही षडंगे स्पष्ट झालेली आहेत. भगवद्गीतेचा सहावा अध्याय 'आत्मसंयमयोग' या नावाचा असून त्यामध्ये आसन, श्वासनिरोध, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधीच्या अवस्थांचे उल्लेख

वेगळ्या पद्धतीने व्यक्त केलेले आहेत. तसेच श्रीकृष्णानी ''सर्व योग्यांमध्ये जो त्याचा आत्मा माझ्या ठिकाणी स्थिर ठेऊन भक्ती करतो तोच श्रेष्ठ होय''. असे सांगूनच अध्याय सहाचा समारोप केला आहे. एका अर्थाने गुरू या स्थानाचे श्रेष्ठत्व त्यांनी सांगितले आहे. श्री गोरक्षयोग किंवा ज्ञानेश योगामध्ये 'गुरूकृपा' हाच सर्वोच्च भरवसा व आधार असून त्या गुरूकृपेच्या भरवशातच सर्व असंभव अनुभवांची खैरात केली जाते असा स्पष्ट भाव संपूर्ण ज्ञानेश्वरीत ईशकृपा, आत्मप्रसाद, गुरूकृपाकटाक्षाचा अमृतवर्षाव अशा अर्थाने विखुरलेला आहे.[११] (संदर्भ दिव्यामृतधारा पान ८६५)

मुलत: हे पहायचे आहे की, चित्तवृत्तींचे उदात्तीकरण व परिवर्तन जे साधायचे आहे त्याबाबतची श्री गोरक्षनाथांना अभिप्रेत मांडणी काय आहे? त्याचा संबंध वरील सद्‌गुरूप्रसाद वा कृपा याचेशी कसा काय लागू शकतो? हे पहाताना 'वृत्तिनिरोध' या क्रियेबद्दल मानसशास्त्रीय स्पष्टीकरण महत्त्वाचे आहे. मनमाध्यमाद्वारे चित्तात उठलेल्या लहरी म्हणजे वृत्ति. त्या लहरींचा किंवा लाटांचा निरोध केला तर त्या एकमेकांवर दबल्या जातात. व कोणतीही वृत्ती दबली गेली तर ती तिच्यावरील दडपणातून पुन्ह: उलट दिशेने मुक्त होऊ पहाते. जितकी दबली जाईल तितकी त्या वृत्तीची ताकत वाढत जाते. इथे स्प्रिंगच्या क्रिये-प्रतिक्रियेप्रमाणे कार्य होत रहाते. म्हणून दबलेला राग, दबलेली इच्छा अशी कोणतीही दबलेली वासना-भावना ही उलट प्रतिक्रियेची संधी पहात असते.[१२] (संदर्भ- Introduction to psychology chapter-page 225, 226)

याचा अर्थ असा की, हा काही वासनेच्या परिणामापासून किंवा वृत्तितरंगांपासून सुटण्याचा मार्ग ठरत नाही. हे तर हँडग्रेनेडच्या पिनवर ठेवलेल्या पायासारखे होत आहे. पाय बाजूला की स्फोट होणार! म्हणून वृत्तिनिरोध करून दबलेला तरंग किंवा लाट ही जोपर्यंत त्यावर विशुध्द प्रक्रिया होऊन गंगेच्या पाण्याची लहर बनत नाही तोपर्यंत श्री गोरक्षनाथांना किंवा नाथसंप्रदायी सिध्दांना अपेक्षित असे वृत्तींचे उन्नयन किंवा परिवर्तन होऊ शकणार नाही.

भारतीय मानसशास्त्राच्या चिकित्सेमध्ये नेणीवेच्या पलिकडची एक अवस्था सांगितलेली असून ती पराजागृत (supra-conscious) या नावाने ओळखली जाते. गोरक्षनाथाना अभिप्रत असणारे वृत्तींचे उदात्तीकरण समजण्यासाठी सिद्धसिद्धांत पद्धतीमधले सूत्र ४५ समोर ठेवणे आवश्यक आहे.

संकल्प : विकल्प: मूर्च्छा: जडता,मननम् इति पंचगुणं मन:।

- सि.सि.प. प्रथम उपदेश/४५

या ठिकाणी संकल्प म्हणजे इच्छा व कल्पना, विकल्प म्हणजे आहे नाही अशी स्थिती, मूर्च्छा म्हणजे मनाची अचेत वृत्ती जडता म्हणजे विवेकाचा अभाव व मनन म्हणजे तर्कसंगत विचारणा. या ठिकाणी एक महत्त्वाचा विचार समोर येतो तो असा की, अंत:करण पंचकात प्रत्येक घटकाचे पाच गुण आहेत. त्यामुळे अंत:करण घटकात अनेक क्रिया प्रतिक्रिया निर्माण होऊ शकतात. त्याची यथार्थ जाणीव साधकाला असणे आवश्यक आहे. भगवद्‌गीतेला, श्री गोरक्षनाथाना व श्री ज्ञानेश्वरांना साधकाचा जो अंतर्विकास अपेक्षित आहे त्यासाठी अंत:करण घटकांची शुद्धी ज्ञान व भक्तीच्या माध्यमातून करून ते घटक नंतर जीवनात कार्यरत जर झाले तर वृत्तींचे उदात्तीकरण शक्य आहे. व शक्तीच्या संचालनासाठी ते अनिवार्य आहे.

वृत्तींचे उदात्तीकरण किंवा परिवर्तन जे श्री गोरक्षतत्वज्ञानात अपेक्षित आहे तोच विषय श्री ज्ञानेश्वरांनी विस्तारासहित ज्ञानेश्वरीत मांडलेला आहे. आंतरविश्वाचा विकास साध्य करण्यासाठी अभ्यास, चिंतन, मनन, वैराग्य, शुद्ध व संतुलीत कर्मविचार अत्यंत आवश्यक आहे. असे हे बुद्धीतत्त्व तरल अवस्थेतून पुढे जाते व त्यामुळे ते अदृश्य जगताशी व चैतन्य प्रवाहाशी एकरूप होते. असा प्रयत्न जो साधक करेल त्याला तेच जगत्‌चैतन्य आपणामध्ये आहे असा अनुभव येतो. अशा प्रकारे प्रयत्न केल्यास तो साधक भक्तीच्या प्रवाहाशी एकरूप होता. त्याचे ठिकाणी द्वैताचा निरास होतो. त्यास एकरूपतेचा व प्रेमपूर्ण अस्तित्वाचा साक्षात अनुभव येऊ लागतो, असे ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे. अंत:करणातील वरील घटकांमधून ज्या क्रिया घडून येतात त्यांचे माध्यम वायू हे असते. मन हे वायूरूप आहे. याचा अर्थ वायूचे कार्य साधकाला ज्ञात असणे आवश्यक आहे, असे गोरक्षनाथांचेही म्हणणे आहे. आता मनासंबंधी गोरक्षनाथांनी त्यांच्या विविध ग्रंथांमध्ये जे विवेचन केले आहे त्याचा विचार करू.

श्री गोरक्षनाथांच्या महत्त्वाच्या ग्रंथातील 'मन' या घटकासंबंधीचे संदर्भ :-

नाना विधैर्विचारैस्तु न साध्यं जायते मन:।

तस्माद् अस्य जयोपाय: प्राण एव हि नान्यथा।। - यो. बीज/७९

**अर्थ -**म्हणजे नाना प्रकारानी महावाक्यांचा कितीही विचार केला तरी मन ताब्यात येऊ शकत नाही. यासाठी प्राणजय हाच मनोजयाचा उपाय आहे.

चित्तं हि नष्टं यदि मारूते स्यात्। तत्र प्रतीतो मरूतोऽपि नाश:।

न चेदिदंस्यान्न तु तस्य शास्त्रं। नात्म प्रतीतिर्न गुरूर्न मोक्ष:।। - यो.बीज./१३६

**अर्थ :** म्हणजे मनोलय व प्राणलय दोन्हीही एकमेकांत लय पावून जोपर्यंत सामरस्य होत नाही तो पर्यंत आत्मप्रचिती नाही. हे सामरस्य नाही तोपर्यंत सर्व शास्त्रे व साधनमार्ग निष्फळ ठरतात. अशी प्रचिती देत नाही तो गुरू नव्हे व मोक्षही नाही.

**अमरौघप्रबोध -**

या ग्रंथात चित्तविक्षेप स्थिर करून साम्यावस्था प्राप्त करण्यासाठी ७४ सूत्रामध्ये योगाचे व सामरस्य साधनेचे रहस्य व महत्व विशद केले आहे. मन-चित्त संबंधाबाबतचे उल्लेख सूत्र ५, ८ व १६ मध्ये आढळून येतात.

या विषयांचे विशेष स्पष्टीकरण करणारे सूत्र -

औषध्योऽध्यात्मकश्र्चेति राजयोगो व्दिधा क्वचित्।

हटोऽपि व्दिविध: क्वापि वायुबिंदुनिषेवणात्।। - अमरौध प्रबोध सूत्र ५

**अर्थ :** औषधी द्रव्याच्या सेवनानी चित्तवृत्तिराहित्य होते हा पहिला प्रकार होय. तर आपण ब्रम्हस्वरूप आहोत हे ज्ञान अंगी बाणणे हा दुसरा प्रकार होय. हठयोगाचे दोन प्रकारही कुठे कुठे सांगितले आहेत. वायुसेवन (प्राणायाम) हा एक प्रकार तर ऊध्वरेतस् होऊन अमृतसेवन करणे हा दुसरा प्रकार अशी मांडणी दिसून येते.

नैतेषां देहसिध्दिर्विगतनिजमनो राजयोगा दृतेऽस्मात्। - सूत्र ८

**अर्थ :** म्हणजे चित्तवृत्ती नाहीशी करणाऱ्या राजयोगाशिवाय देहसार्थक नाही.

निर्याते चित्तरागे व्रजति खररूचौ मेरूमार्ग समंतात्।

उद्रिक्ते वन्हिभावे स्त्रवति शशधरे पूरयत्याशुकाये।

उद्यति आनंदवृंदे त्यजति तव मम इत्यादि मोहान्धकारे।

प्रोभ्दिन्ने ब्रम्हरंध्रे जयति शिवशिवा संगम: कोप्यपूर्व:।। - सूत्र १६

याचा अर्थ असा की चित्तातील विषयप्रीति कमी झाली असताना, सूर्य मेरूमार्गातून जात असताना, अग्नी प्रदिप्त झाला असताना, चंद्र अमृतधारानी देहाला भिजवीत असताना, आनंद ओसंडत असताना, तुझे माझे हा अहंकार नष्ट झाला असताना व ब्रम्हरंध्राचा भेद झाला असताना शिवशक्तीचा संगम होतो. तसेच गोरक्षशतकमध्ये व अवधूत गीतेमध्येही मनासंबंधी अशाच अर्थाची सूत्रे आढळतात. त्यातील सूत्र ८ मध्ये असे सूचित केलेले आहे की, श्री.सदगुरू शक्तिपातयोगदीक्षेद्वारे जेंव्हा शिष्याची आत्मचैतन्य शक्ती जागृत होते. त्या वेळी शक्तीस्वरूप वायूच्या जागृतीमुळे वायू हा सुषुम्नेत प्रवेश करतो व चित्ताची समता आपोआप साधली जाते. त्याचप्रमाणे सूत्र १२ चा अन्वयार्थ असा आहे की मन व वायू आणि दूध व पाणी या गोष्टी एकमेकांत मिसळल्यासारख्या आहेत. मन असेल तर वायूची प्रवृत्ती रहाते. या दोन्हीमध्ये एकाचा नाश झाला की दुसऱ्याचा नाश आपोआप होतो. यालाच श्री गोरक्षनाथांनी अमनस्क योग म्हटलेले आहे.

अशा प्रकारे वेगवेगळया प्रकारांनी श्री गोरक्षयोगामध्ये वृत्तींचे उदात्तीकरण साधणे व त्यातूनच शक्तीचे म्हणजे कुंडलिनी-संचालन (श्री गुरूकृपाशिर्वाद युक्त) करणे या सर्व क्रियेला श्री शिवशक्तीचे सामरस्य नांव देऊन राजयोगाची किंवा सिध्द योगाची हीच ती

फलश्रुती असा मौलिक सिध्दांत मांडला गेलेला आहे. यावर भाष्य करताना श्री ज्ञानेश्वर म्हणतात -

अर्जुना समत्व चित्ताचें। तेचि सार जाण योगाचें।
जेथ मना आणि बुध्दीचे। ऐक्य आथी।। - ज्ञा.२/२७३

**अर्थ :** अर्जुना! चित्तसाम्य हेच योगाचे सार आहे. हे तू जाण की ज्यामध्ये मन व बुध्दीचे ऐक्य असते. अशा प्रकारे सामरस्य हे सर्व योगाचे सार आहे, असे सांगून,

ऐसे समरसे मंथन केले। तेथ झडकरी काजा आले।
जे उज्जीवन जहाले। ज्ञानाग्नीचे। - ज्ञा.४/ १३३

**अर्थ :** अशा प्रकारे सर्व वृत्तींचे ऐक्य करून मंथन केल्याने तेथे तात्काळ काय झाले? तर व्यक्तीचे ठिकाणी ज्ञानाग्नि प्रकट झाला.

आता हृदय हे आपुले। चौफाळूनिया भले।
बरी बैसऊ पाऊले। श्री गुरूंची।। - ज्ञा.अ-१५-ओवी १

**अर्थ :** आता आपले हृदय स्वच्छ करून त्यावर सदगुरूच्या पदकमलाची स्थापना करू.

या सर्व क्रिया सामरस्य साधनेसाठी श्री गुरू त्यांच्या विशेष अधिकारात करून घेतात. हे नेमकेपण ज्यांचेकडे असते तोच सदगुरू. सर्व योगशास्त्र हे देहमाध्यमातून यशस्वीरित्या व्यक्त करणे व सर्व योगशास्त्रातील शब्दांचा अर्थ प्रत्ययाला आणून देणे हे काम समर्थ अशा सद्‌गुरूंच्या मागदर्शनाशिवाय अशक्य आहे असा अंतिम निष्कर्ष यामधून निघतो. म्हणून श्री ज्ञानेश्वर पुढे म्हणतात -

तया चक्रवाकांचे मिथुन। सामरस्याचे समाधान।
भोगवी जो चिद्गगन। भुवनदिवा।। - ज्ञा.१६/६

**अर्थ :** बुध्दी व बोधरूप चक्रवाक पक्षाचे जोडप्याला चिदाकाशरूपी भुवनातील गुरूरूपी सूर्यप्रकाशात सामरस्याचे समाधान भोगवतो तो सदगुरू. याबाबतीत विवेकाने हे देहमाध्यम ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे असे की, माझे शरीर असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपण देहावेगळे आहोत हे कळते. माझे मन म्हणजे मी मनापेक्षा वेगळा आहे. मन म्हणजे मी नव्हे हे उघड होते. देहासंबंधी विचार केला की देह म्हणजे पंचभौतिक तत्वांचे तत्वात विलिनीकरण करण्याच्या क्रियांचे माध्यम. यालाच योग म्हणतात. म्हणजे असे की, तत्वच तत्वात विलीन होत कार्य करत असते. या न्यायाने पंचमहाभूतांचा निरास होत जातो व फक्त आत्मतत्वच शिल्लक रहाते. त्यामुळे ज्याला 'मी' म्हणतो त्याला स्थानच नाही. मग त्याला पाहण्याचे कारणच उरत नाही. ज्या पंचमहाभूतांचा देह बनलेला असतो त्याचे अस्तित्वच तत्वश: नाहीसे होते. व मूलभूत तत्व उरते ते म्हणजे आत्मतत्व! म्हणजे 'मी'

म्हणजे देह या विचाराने जो बांधला गेला होता त्याला विवेकाने आपण देह नाही हे कळले की देहबुध्दीचे बंधनच नष्ट होते. अशा प्रकारे देह असून देहातीत अवस्था आहे हे व्यक्तीला स्पष्ट होऊ लागते. हे जे तत्त्व बुध्दीला कळले त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा प्रयत्न म्हणजे योगसाधना. हा अनुभव किंवा अशा प्रकारचे अनुभव हे जाणिवेच्या सूक्ष्म पातळीवर घ्यावे लागतात व त्यासाठी सर्व पारमार्थिक अट्टाहास करावा असे सांगितले गेले आहे.

मानसिक स्तरावर उठणाऱ्या विविध स्पंदांचे उदात्तीकरण करणे म्हणजे त्यांचा आत्मस्वरूपात लय करणे. अशा स्थितीत मनच रहात नाही. या अवस्थेला उन्मनी अवस्था म्हटले जाते. ही निरूपाधिक स्थिती आहे व या स्थितीत संसारातील व जीवनातील सर्व दु:खे, आधी-व्याधी नष्ट होतात. हीच योग्याची विश्रांती आहे. हीच ती निरूपाथिक सामरस्य अवस्था होय. सामरस्ययोग म्हणून श्री गोरक्षनाथ ज्याचा उल्लेख करतात तोच विषय श्री. समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधात नेमकेपणाने मांडला आहे.

अनुर्वाच्य ते निवृत्ती। तेंचि उन्मनीची स्थिती।
निरोपाधी विश्रांती। योगीयांची।। - दा. ७-३-४४

त्याचेच अधिक स्पष्टीकरण पुढील ओवीमध्ये मिळते.

साक्षत्व वृत्तीचे कारण। उन्मनीते निवृतती जाण। जेथे विरे जाणपण। विज्ञान ते।।
- दा. ७/४/५०

**अर्थ :** साक्षित्व ही एक वृत्तीच आहे. साक्षीत्वाची जाणीवही जेव्हा विरते- तेव्हा पूर्ण निवृत्ती होऊन उन्मनी अवस्था व जीव-शिव ऐक्य होते. यालाच विज्ञान म्हणतात. मूलत: मन व त्याच्या वृत्ती व त्यातून अनुभवाच्या पातळीवरील जीवन याबाबतीत एक विषय स्पष्ट होत जातो तो असा की, मन हा घटक म्हणजे आपले स्वरूप नव्हे किंवा आपण म्हणजे मी नव्हे. म्हणून मन उन्मुख करण्याचे प्रयत्न हे मनाची नैतिक पातळी प्राप्त करण्याच्या प्रयत्नापेक्षा वेगळे ठरतात. नीतिनियम पाळण्यासाठी करावी लागणारी मनाची चौकट ही समाज मान्यताप्राप्त जीवन व्यवहारासाठी स्वीकृत सक्तीच्या स्वरूपात असते. इथे मनोव्यवहारात नियम पाहिले जातात. दैवी संपत्तीचे जे विविध गुण गीताअध्याय १६ मध्ये सांगितले आहेत ते प्राप्त करण्याची सहजभावना व त्यासाठी सहजतद्रुपता होते का? ही तद्रुपता येत जाणे म्हणजेच मनाची उन्नत अवस्था होत जाणे व त्यापुढची अवस्था म्हणजे मनाच्या सर्व शक्याशक्यतेतील वृत्तींचे म्हणजे अंत:करणातील सर्व घटकांचे रूपांतरण (Tranformation) होणे.

मानवी देहामध्ये काय काय समाविष्ट आहे हे गोरक्षनाथांनी गोरखवाणीमध्ये स्पष्टपणे सांगीतलेले आहे. त्यामध्ये देहरूपी किल्ल्याचे कुलूप कसे असते? ते कसे उघडायचे असते? या प्रश्नांच्या संबंधात अतिशय मार्मिक सूत्र मांडलेले आहे.

सबदहि ताला सबदही कूंची, सबदहि सबद जगाया।

सबदहि सबद सूं परचा हुआ, सबदहि सबद समाया।।   - गो. वाणी /२१

**अर्थ :** शब्दच कुलूप आहे व शब्दच किल्ली आहे. शब्दांनीच म्हणजे गुरूवाक्यांनी नाद जागृत करावयाचा आहे. अशा रितीने स्थूल शब्दातून सूक्ष्म शब्दाचा परिचय होत जातो. व स्थूल आणि सूक्ष्म एकरूप होत जातात.

तात्पर्य हे की, मनाला जर निश्चल अशा परमतत्वाकडे प्रवाहित करायचे असेल तर मनाला अत्यंत विशुध्द पातळीवर आरूढ केले गेले पाहिजे. मनाची परिशुध्दता ही मनाच्या निश्चल परिस्थितीकडे जाण्याच्या प्रयत्नातून साधू शकते. यासाठी अनेक मार्ग सूचित केले गेले आहेत. हठयोग, राजयोग, कर्मयोग, लययोग वगैरे. भक्तीच्या माध्यमात मन:शुध्दीसाठी काही वेगळे मार्ग सूचित केलेले आहेत. आता अंतकरण या विषयासंबंधी माहिती करून घेऊ.

अंत:करण या संज्ञेमध्ये मन, बुद्धी, चित्त, अहंकार व चैतन्य हे घटक येतात. चित्ताचे व्यापारात अहंकार व प्राण चैतन्य हे दोन्ही घटक कार्यरत असतात. स्थूल व सूक्ष्म अशा देहांतर्गत क्रिया घडताना जेव्हा त्यांचा संबंध मनाशी येतो त्यावेळी त्याचे स्पंद हे चित्त प्रदेशात उमटतात व ते बुद्धी या केंद्रात साठवले जातात. बुद्धी केंद्राची ही जाणिवरूप शक्तीच असते असे म्हणता येईल. बुद्धी या केंद्राचे मूलभूत असे जे शुद्धस्वरूप असते ते तेच ज्ञानशक्तीच्या रूपात कार्यरत होऊ शकते. परंतु या शुद्ध बुद्धीचे मनाच्या माध्यमातून जेव्हा बाहेरच्या जगाशी संबंध येत राहतात तेव्हा बहिर्गत सुख दु:खाच्या , वासनेच्या व नानविध मनोव्यापारांच्या संबंधातून ही शुद्ध बुद्धी गढूळ होत राहते. ज्या प्रमाणात मनाचा वस्तूंशी भोगलोलुप संबंध घडू लागतो त्याप्रमाणात ही बुध्दी सुखदु:खाच्या स्मृतींनी बध्द होऊ लागते व त्यातून मनाला मार्गदर्शन करणारी बुध्दीच मनाच्या मागे जाऊ लागते. यासाठी मनाचा भोगसंग सुटला पाहिजे. हे नि:संगत्व येण्यासाठी सतसंग आवश्यक असतो। म्हणून हरिपाठामध्ये श्री ज्ञानेश्वरांनी मानसशास्त्रीय विज्ञानच खालील ओवीमध्ये व्यक्त केले आहे.

संतांचे संगती मनोमार्गे गति। आकळावा श्रीपति येणे पंथे।।

- हरीपाठ अभंग ८/ओवी १

**अर्थ :** संतांच्या संगतीतच मनाच्या गती योग्य रितीने मार्गस्थ होतात. अशा मार्गांनी जाऊन हरितत्त्व कळवून घ्यावे. मनाला परत वळवणे, बहिर्मुखी सुखसंवेदनांचा परिणाम पुसणे व मनावर बुध्दीने संयम करणे फार अवघड होऊन बसते. कारण हीच बुध्दी मनामार्फत उपभोगलेल्या सुख दु:खानी भ्रष्ट झालेली असते. म्हणून अनेक सिध्द पुरूषांनीही

घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरीचा।। - करूणाष्टके ओवी ५/रामदास

असे लिहून मनास आवर घालणे किती दुष्कर आहे हे मान्य करावे लागले. स्थूल इंद्रियांना आवरणे जिथे कठीण तिथे सूक्ष्म मनोव्यापारांना आवर घालणे अतिअवघड असते. म्हणून केवळ विवेक-वैराग्याने मनाला आवर घालणे सोपे नाही. म्हणून भक्तीचे माध्यमातून मनाला सतसंग घडवणे व या मनरूपी शक्तीची दिशा ही ईश्वरचिंतनात बदलणे हाच मनाचे व त्याच्या वृत्तींचे उदात्तीकरणाचा एकमेव मार्ग होय. या चिंतनात मन:शक्ती एकत्र करण्याचा उपाय म्हणजेच नामस्मरण. नामस्मरणात जे 'नाम' असते त्याचे ठिकाणीच नामीचे स्मरण स्थिर असते. त्यामुळे बुध्दीही त्या नामीशी स्थिर होऊ लागते. त्यामुळे मनही आपोआप तिथे येऊन स्थिर होऊन त्या अवस्थेतील शांतता व स्थिरता अनुभवू लागते. त्यामुळे नंतर असे होत जाते की मनाचे सर्व व्यापार त्याच अंतस्थ सुखाच्या दिशेने होऊ लागतात. इथे एक उत्तम उदा. देता येते. झोपलेल्या मुलाला घेऊन त्याची आई कुठेही बाहेरून फिरून आली तरी ते मूल कुठेच गेले नाही असे होते. तद्वतच अशा नामीच्या अंतर्गत सुखाच्या गोडीत मन व बुध्दी दोन्हीही रंगून जाऊन एका उच्च व शुध्द पातळीवर त्यांचे एक अतुट मैत्रीचे नातेच निर्माण होते असे म्हणता येईल. ही एकरूपत्वाची (शुध्द बुध्दी+स्थिर मन)- गती इतकी प्रभावी बनते की प्राणही त्याच गतीने व त्याच दिशेने प्रवाहित होऊ लागतो. व त्यामुळे या प्राणाचा जो अभिमानी, तो म्हणजे अहंकार, या प्राणगतीबरोबरच भक्तीमधे एकरूप होऊ पहातो. अशा प्रकारे अहंकाराचे देह व मन माध्यमाशी संपर्क तुटून तो भक्तीत विसर्जित होणे ही काही सामान्य गोष्ट नाही. हे अत्यंत दुर्घट काम नामस्मरण माध्यमातून सहजपणे होऊ शकते हा महत्वाचा मुद्दा इथे लक्षात घेतला पाहिजे. अशी ही नामस्मरणामागची मानसशास्त्रीय मीमांसा अतिशय महत्त्वाची आहे.

पारमार्थिक क्षेत्रात ईश्वराचे प्रातिनिधिक स्वरूप असे जे 'नाम' असते ते अनुभवी अशा सदगुरूकडून इतरांना जेव्हा देण्यात येते त्यास अनुग्रह देणे किंवा 'नाम' देणे असे म्हटले जाते. अनुभवी सदगुरूंकडून दिले जाणारे असे हे 'नाम' सबीज म्हणजे अनुभवक्षम असते व असे सबीज नामच सफल होऊ शकते. श्री गुरूदेव रानडे यांच्या साक्षात्कार वादातील हा प्रमुख सिध्दांत आहे.[१३] (गुरूदेव रानडे चरित्र- उपदेशाची मेघवृष्टी पान १५९) या नाममहात्म्याचे स्वरूप समाजाला समजावून देण्यासाठी अनेक महात्म्यांनी आयुष्य वेचले. उदा. श्री गोंदवलेकर महाराज, श्री गुरूदेव रानडे वगैरे. इथला महत्वाचा मुद्दा असा आहे की मन व बुध्दी हे दोनीही घटक समपातळीवर विकसित झाल्याशिवाय क्रियात्मक व वैचारिक संतुलन शक्य नाही. त्यासाठी मन व बुध्दी हे दोन घटक अन्योन्याश्रयी म्हणजे

परस्परांशी अति संलग्न आहेत हे स्पष्ट असणे आवश्यक आहेत नुसता बुध्दीचा विकास झाला व मन खालच्या पातळीवर स्थूल भोगांशी संबंधित राहिले तर ही विकसित झालेली बुध्दी घातक ठरू शकते. म्हणून मन व बुध्दी हे दोन्ही घटक जर समदशेत विकास पावले व त्या विकासाची दिशा जर ईशतत्वाकडे असेल तर त्यामधून निर्माण होणारी साम्यावस्था ही साधकाला विश्वसमरसतेकडे नेत रहाते. अशा दिशागत प्रगती मध्ये 'अहंकार' या घटकाचे आपोआपच विश्व चेतनेमध्ये विसर्जन होऊ लागते. व आपलाच विस्तार हा विश्वरूपात झालेला अनुभव येतो. संत तुकाराम महाराजांचा पुढील अभंग त्याच अर्थाचा आहे.

देव पहावया गेलो। तेथे देवचि होऊनि ठेलो।। - अभंग/तुकाराम

म्हणून श्री. ज्ञानेश्वर महाराजांनीही मन व बुद्धी या दोन्ही घटकांच्या शुद्धतेवर व संतुलनावर भर देताना गीता अध्याय १२ वर भाष्य करताना म्हटले आहे की,

म्हणौनि माझिया स्वरूपी। मनबुध्दी इये निक्षेपी।
''येतुलेनि सर्वव्यापी। मीचि होसी।। - ज्ञा १२/१०२

याचा अर्थ असा की मन व बुध्दी ही माझे ठायी समर्पित केली गेली तर ईश्वराचे जे विश्वरूप तेच त्या भक्ताचे होते. या क्रियेत 'अहंकार 'हा घटक सहजतेने ईशप्रेमात विलीन होतो. याला 'ईश्वररूपिणी दशा' असे म्हटले जाते. अहंकार हा प्रबळ घटक मन व बुध्दीच्या माध्यमातूनच काम करू शकतो. त्यामुळे जसा प्रकाश ज्या माध्यमातून जातो तसा त्याचा रंग होतो त्याप्रमाणे, मन व बुध्दी हे माध्यम जेव्हा ईशप्रेमात रंगू लागते तेव्हा अहंकाराला आपोआपच मन व बुध्दी या घटकांना अनुसरावे लागते. अहंकार परमात्म तत्वाशी एकरूप करण्याची ही एक प्रभावी युक्तीच आहे. इथेही राजयोगांतर्गत ज्या सूक्ष्म देहातंर्गत प्रक्रिया आहेत त्याचे हे स्पष्टीकरणच आहे असे म्हणता येईल.

यालाच श्री ज्ञानेश्वरांनी व गीतेत श्रीकृष्णानी 'अभ्यासयोग' म्हटले आहे. मन व बुध्दी हळूहळू ईश्वरप्रेमात व गोडीत आणणे हा प्रयत्न म्हणजे अभ्यासयोग .

अगा अभ्यासु योगु म्हणिजे। तो हा एकु जाणिजे।
येणे काही न निपजे। ऐसें नाही।। - ज्ञा.अ.१२/११०

**अर्थ :** ज्याला अभ्यासयोग म्हणतात तो हाच. यापासून प्राप्त होणार नाही अशी कोणतीच गोष्ट नाही. यात अभ्यासामध्ये काही अडचण येत असेल तर

अभ्यासेअपि असमर्थ: असि मत्कर्मपरमो भव।
मदर्थं अपि कर्माणि कुर्वन् सिध्दि अवाप्स्यसि।। - गीता अ.१२/श्लोक १०

**अर्थ :** अभ्यासाला असमर्थ असशील तर माझ्यासाठी कर्म करणे हेच काम कर. माझ्यासाठी कर्मे करणारा तू सिध्दीस प्राप्त होशील. म्हणजे बागेमध्ये माळी नेईल तिकडे पाणी आरामात

जाते. त्याप्रमाणे कर्तृत्वाभिमान टाकून दिला की प्रवृत्ती-निवृत्तीचे ओझे बुध्दीवर पडत नाही व हे सर्व कर्म मला अर्पण कर असे गीतेत सांगितले आहे. (अध्याय १२ ) मनाचा संयम व अनन्य शरणता यात सर्व साधले जाईल व अभ्यास, ज्ञान, ध्यान,कर्मफल,त्याग, शांती अशा क्रमाने ईश्वराशी एकरूपत्वाच्या अनुभवाचे प्रयोजन सफल होईल असा पूर्ण विश्वास दिला गेला आहे.

वृत्तींच्या उदात्तीकरणाचा परिणाम म्हणून जीवनाची एक विशेष अशी दिशा ठरत जाते. त्या अनुराधाने शक्तीचे वेगवेगळे स्तर व्यक्तीच्या जीवनात कार्यरत होत असतात. ते म्हणजे शारिरिक (इंद्रियजन्य), मानसिक, बौध्दिक व आध्यात्मिक. अशा स्तरातून जीवनप्रेरणा काम करत असते. ही शक्तीमधील ऊर्जा कोणत्या माध्यमातून कुठे कशी कार्यरत करायची हे पूर्ण स्वातंत्र्य व्यक्तीला असल्याने त्याचा निर्णय विवेकपूर्ण बुध्दीच जर करेल तर तो निर्णय अर्थपूर्ण, रचनात्मक व देहस्थित अंत:सृष्टीतील शक्तींचा उलगडा करणारा ठरू शकतो व अंतत: पारमार्थिक प्रगती व सामरस्यानुभुतीच्या आनंदात त्याची परिणती होते. व जर असुरी निर्णय हा संपत्तीच्या अदैवी मार्गानी कार्यरत होणार असेल तर सुखदु:ख मिश्रीत असमाधानी, अस्थिर व अपुरेपणाच्या विषण्ण जाणिवेच्या चिमट्यात अडकलेले असे विदारक जीवनदृष्य पहायची पाळी येते. योगाचा कोणताही मार्ग असो त्यातून संचयित व संचालित शक्ती जर भक्ती व प्रेमाच्या प्रवाहाशी एकरूप केली गेली तर जीव हा ज्या शिवाचा अंश आहे त्याचेशीच जिवाचे मीलन व समर्पण होऊन जाते व एका जिवाचे मर्यादित शक्तीरूप हे चैतन्याच्या म्हणजे विश्व चेतनेच्या अमर्याद शक्तीसाठयातला भाग बनते व पिंडी ते ब्रम्हांडी हे श्री गोरक्षनाथांचे पायाभूत सूत्र सिध्द होऊन संबंधित जीव हा विश्वरूपात्मक अशी स्वत: ची अवस्था अनुभवू शकतो. इथेही रहिमचे एक सुप्रसिध्द वचन देता येते.

बिंदु भि सिंधुसमान को अचरज का सो कहे।<br>
हैरनहार हैरान, रहिमन अपने अपने।।

अर्थ असा की बिंदूच सागर झाला. अहो आश्चर्य! आता काय आणि कसे सांगायचे? या अवघड समस्येमुळे रहिम हैराण झाला. आणि म्हणून तो गप्पच बसला. व्यापकतेच्या अनुभवाची बांधणी शब्दांच्या धाग्यांनी करता येत नाही. म्हणून भक्त कबीरही म्हणतात.

जानति ते कहतचि नाही। कहती ते जानत नाही।।

**अर्थ :** जे जाणतात ते बोलत नाहीत व जे बोलतात ते जाणतच नाहीत.

मन, बुध्दी, अहंकार, चित्त व चैतन्य या अंत:करण घटकामधील क्रिया प्रतिक्रिया जर योग्यास जाणून घ्यावयाचा असतील तर या मानवी देहातील विविध यंत्रणा कोणत्या

पद्धतीने काम करतात त्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने शरीर विज्ञान समजून घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी डॉ. हेंद्री ग्रे यांचा शरीर विज्ञानावरच्या 'ॲनॉटोमी' सारखे ग्रंथ मार्गदर्शक ठरतात. अशा माध्यमातून प्रकाशकिरणांचा शरीरावर होणारा परिणाम, त्यातून शक्तिकेंद्रांचे माध्यामातून पाठीच्या कण्यातून कार्यवाहीत होणाऱ्या क्रिया, मेंदूचे कार्य, मज्जासंस्थेचे विभाग, थलॅमस, होयपोथलॅमस, पिनिअल व ऐन्डोक्राईन ग्रंथी (ग्लॅन्ड्स) पिचुइटरी ग्रंथींचे महत्वाचे कार्य, ग्रंथीमधून होणाऱ्या वेगवेगळ्या स्त्रावांचा व्यक्तीवर होणारा परिणाम इ. विषयांबाबतची माहिती योगाच्या अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाला अत्यंत उपयुक्त ठरू शकते. करीत असलेल्या अभ्यासाचा व योगक्रियांचा स्वत:वर होणारा परिणाम तो नीटपणे साक्षीभावाने समजून घेऊ शकतो. अशा अभ्यासातून जी एक साम्यरस्यावस्था प्राप्त होते ती त्या अभ्यासकाचा किंवा योग्याचा नुसता भावनेचा विषय न राहता दैहिक माध्यमातून येणाऱ्या अनुभवांचा तो विषय ठरतो. अत:करणातील मन या अशरीरी घटकाचा अनुभव प्रत्येकास येतच असतो. याबाबत 'टिचेरेन' या मनोवैज्ञानिकानी १९०३ साली केलेली नोंद खालीप्रमाणे आहे. For our own mind is the only means of interpreting the mind of another organism. We cannot imagine proccesses in another mind that we do not find in our own.[१४] (Int. to psy. Page१२) ही एक मानसिक स्तरावरची आदान प्रदान प्रक्रिया असते. मात्र जेव्हा एखादी भावना दुसऱ्याच्या क्रियेवर लादली जाते तेव्हा त्यास मानशास्त्रात Anthropomorphism म्हणतात. जेव्हा असे भावनांचे लादणे नसते त्यावेळी तो मानसिक स्तरावरचा जाणिवरूपात येणारा अनुभवच असतो.

हे शरीरविज्ञान श्री गोरक्षनाथांनी 'गोरखप्राणसंकलि' ची सोळा सूत्रे, गोरखवाणीमधील अनेक सूत्रे व गोरख योगाचे दोन भागांमधून खुलासेवार मांडलेले आहे. योग्याने ते नीट समजून घेण्याचा त्यांचा आग्रह त्यांनी ठिकठिकाणी धरलेला आहे. यावरून दिसून येते की, गोरक्षनाथांना शरीरविज्ञानाची महती अत्यंत महत्त्वाची वाटत होती. अगदी आधुनिक परिभाषा त्यांनी वापरली नाही हे खरे. तथापि शरीरविज्ञानाला त्या काळात त्यांनी महत्त्व दिले ही गोष्ट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. शरीरविज्ञानाचा विचार करूनच शक्तीसंचालनाबाबत त्यांनी काही मुद्रांचा उल्लेख केलेला दिसून येतो. गोरक्षसंहितेमध्ये ते आपणास आढळून येते. योग्याने साधना करण्यासाठी व सामरस्ययोग प्राप्तीसाठी कोणत्या मुद्रा करायला हव्यात यासंबंधी गोरक्षनाथांनी मार्गदर्शन केलेले आहे.

या योगिक साध्यतेसाठी विशिष्ट मुद्रा दिलेल्या आहेत.[१५]

१. जालंदरबंध, २. उड्डियानबंध, ३. खेचरी मुद्रा, ४. महामुद्रा, ५. नभोमुद्रा ६. मूलबंध या संबंधात विस्तृत माहिती श्री गोरक्षनाथांच्या सि.सि.प. या ग्रंथात तसेच

गोरक्षसंहितामध्ये खुलासेवार मिळते. अर्थात हा संपूर्ण तपशील मांडणे माझ्या अभ्यासविषयाचा विचार केल्यास फारसे जरूरीचे ठरणार नाही.

**४) संसारी लोकही हा योग आचरू शकतात :**

श्री गोरक्षनाथांनी गुरूअंकित होऊन योग व ज्ञान याची परमसीमा गाठल्यानंतर प्रमुखपणे जर कोणता विचार केला असेल तर तो सामाजिक परिस्थितीचा व समाजाच्या मुलभूत घटकांचा म्हणजे व्यक्तीचा. अखंड व्रतस्थ संन्यासी असले तरी सर्व तऱ्हेच्या एकांगीपणाचा निषेध करून व्यक्तीने विवेक, वैराग्य व तारतम्य यांचा समन्वय साधून जीवनातला जो आश्रम तो व्यतीत करत असेल त्यामध्ये त्याने श्रेयस व प्रेयस, भोग आणि त्याग, सुख व दु:ख अशा प्रकारच्या द्वंद्वामधून मध्यमार्ग स्वीकारून सामरस्य सिध्दी प्राप्त करावी हाच आग्रह श्री. गोरक्षनाथांनी धरलेला दिसून येतो.

'समरसं क्रियते इति सिद्धांत:'[१६] या सूत्रात (संदर्भ सि.सि.प. उपदेश ५/७) व्यष्टीपिंड व समष्टीपिंडाची एकता म्हणजे समरसता अनुभवण्यास मिळण्यासाठी गुरूकृपेची आवश्यकता ही सिद्धांतरूप असून अशा प्रकारच्या सामरस्यानुभूतीतून मानवी जीवनाची अर्थपूर्ण मांडणी करण्याचे शास्त्र म्हणजेच योगशास्त्र असा स्पष्ट विचार श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या ग्रंथातून मांडला आहे. मानवी जीवनाची अशी मांडणी करण्यासाठी व्यक्ती ही जीवनातल्या एखाद्या ठराविक आश्रमातलीच असावयास पाहिजे असे नसून विशेष म्हणजे संसारी लोकही ह्या योगाचे अनुसरण करू शकतात व जीवनामध्ये सामरस्यानुभूती अनभवू शकतात. विशेष म्हणजे शूद्रांनाही हे परमपद व अनुभव देण्याचे वचन श्री गोरक्षनाथ त्यांच्या गोरखज्ञानमध्ये खालील सूत्रातून देताना दिसून येतात. या सूत्रांना 'ज्ञानतिलक'ही म्हटलेले आहे.

वैसंदर मुषि ब्रम्ह जो होते सुद्र पढांऊँ बानी।
असंमेद् विधि ब्रम्हजग निपजा, नै जुगति जमाया पांनी।। - गो. ज्ञा./१३

**अर्थ :** वैश्वानर म्हणजे योगाग्निमध्ये भ्रमाचा होम करण्यास तयार असणाऱ्या क्षुद्रालाही मी ज्ञान देईन. हा भ्रमाचा होम म्हणजे अश्वमेघ यज्ञच आहे. त्यातूनच ब्रम्हजगत् प्रकट होते. त्याचे परिणामस्वरूप युक्तीने पाणी जमते म्हणजेच चंचल शुक्र ब्रम्हरध्रांत स्थिर होतो. मानवी देहात अनेक शक्तींची आश्चर्यकारक कामे चालू असतात. योगानुशासनांनी या शक्तींचा विकास अनेक पटीने करता येतो असे सांगितले जात असताना मानवी जीवनाची ही अवनत दशा कशामुळे होते व त्यावर उपाय काय हाच श्री गोरक्षनाथांचे तत्वज्ञानाच मुख्य विषय आहे. संसाराची व्याप्ती अमर्याद आहे म्हणून त्याला भवसागर म्हटले जाते. असा हा भवसागर तरून जाण्यासाठी प्रयत्नांबरोबरच ईश्वरी शक्तीची व गुरूंची कृपा पण हवी. हा विषय स्पष्ट करणारे प्रश्नोपनिषदात एक सूत्र आहे.

ते तम् अर्चयन्तः त्वं हि नः पिता यः अस्माकं अविद्यायाः।

परं पारं तारयसि इति।। - प्रश्नोपनिषद प्रश्न६/८

**अर्थ :** त्यांची त्यानी पूजा केली व म्हणाले तुम्हीच आमचे पिता आहात की ज्यांनी आम्हाला अविद्येच्या पलिकडे पोहचविले. अशीच प्रार्थना श्री गोरक्षनाथांना उद्देशून करून त्यांचे मार्गदर्शन जर स्वीकारले तर ते वरील बाबतीत वचनबद्ध आहेत. त्यासाठी त्यांनी 'सिद्धांत' हा शब्द त्यांच्या अनेक सूत्रांमध्ये वापरलेला आहे. इथे सिध्दांत म्हणजे निश्चितमत असा अर्थ आहे. भारतीय समाजजीवनाला ज्या सात दर्शनांनी व्यापलेले आहे त्या सर्वांचा उद्देश व त्यामागची प्रेरणा ही व्यक्ती व समाज या विषयी वाटणारा स्नेहभाव व जीवनसाफल्य कशात आहे याबाबतचे मार्गदर्शन करणे हाच आहे. त्याचप्रमाणे श्री गोरक्षनाथांचे तत्वज्ञान हे औपनिषदिक स्तरांवरचे असूनही पूर्णपणे स्नेहभावानी व अचूक मार्गदर्शनाच्या सर्व साहित्यानिशी व सोदाहरण असे उपस्थित आहे. यासाठीच श्री गोरक्षनाथांचे संजीवनीच्या रूपात असणाऱ्या प्रचंड ऊर्जेच्या चेतनेस बध्द केलेल असे जे अक्षर वाड्:मय आहे ते एका स्वतंत्र दर्शनाच्या योग्यतेचे आहे असे म्हणावे लागते. त्यांच्या तत्वज्ञानाच्या अनेक वैशिष्टयांपैकी एक म्हणजे त्यांच्या शिकवणूकीत कुठेही धार्मिक होण्याचा आग्रह नाही तर स्वतःशी प्रामाणिक होऊन स्वतःच्या व्यापकत्वाच्या अफाट कुवतीस समजून घ्या, असा आग्रह आहे.

श्री गोरक्षनाथ त्यांच्या 'नरवैबोध' मध्ये म्हणतात,

सुणो हो नरवै सुधिबुधिका विचार। पंचतत ले उतपना सकल संसार।।[१७]

- (संदर्भ नरवैबोध गोरखबानी पृष्ठ २२४)

**अर्थ :** हे नरवीरांनो सारासार विचार ऐका. हा सर्व संसार पंचतत्वातून निर्माण झालेला आहे. श्री गोरक्षनाथांच्या मार्गदर्शक अशा सर्व प्रेरणा व नियम हे व्यक्तीच्या केंद्रगामी आहेत. यालाच केंद्राभिगामी प्रेरणा (Centripetal force) असे म्हणता येईल. ही व्यक्तीची बांधणी करताना त्यांनी जात, धर्म, लिंग, संसारी का संन्यासी असे काहीही न पहाता मुख्यत्वे आत्म्याचा आविष्कार ज्या देह माध्यमातून होतो अशी व्यक्ती हेच मुख्य केंद्र धरून एका मोठया सामाजिक क्रांतीचा पायाच त्यांनी १००० वर्षापूर्वी घालून ठेवला आहे. आजच्या परिस्थितीत आपल्या समाजात किती नैतिक गोंधळ माजला आहे व किती प्रकारे मनुष्याचे अधःपतन झाले आहे हे स्पष्टपणे दिसून येतेच आहे. गोरक्षनाथांनी प्रापंचिकांना आणि इतरांनाही जो उपदेश केला त्याचे महत्त्व कोणाही ज्ञानी माणसास लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून एका सूत्रात ते म्हणतात-

घरबारी सो घर की जाणै। बाहरि जाता भीतरि आणै।
सरब निरंतरि काटै माया। सो घरबारी कहिए निरंजन की काया।।

- गोरखवाणी/४४

**अर्थ :** गृहस्थी असला तरी त्याला आपल्या स्वत:च्या शरीराचे ज्ञान असले पाहिजे. त्याने त्याचा श्वास व शक्तीचा, ज्या दोन गोष्टी शरिराच्या बाहेर जातात त्यांचा संयम केला पाहिजे. त्याने अलिप्त राहून मायेचे खंडण केले पाहिजे. अशा गृहस्थीला ते ब्रम्हतुल्य म्हणतात.

तसेच-

गिरही सो जो गिर है काया। अभि अंतरि की त्यागै माया।
सहज सील का धरै शरीर। सो गिरही गंगा का नीर।। - गोरखवाणी/४५

**अर्थ :** गृहस्थी असला तरी अशा व्यक्तींनी स्वत:चे शरीर स्वत:स वश करून घेतले पाहिजे. मायेचा त्याग केल्याने त्याचे शरीरच शीलवान व गंगेसमान पवित्र होऊन जाते. अशी व्यक्ती इतरांनाही पवित्र करत राहते. सर्वांनी पाळण्याचे काही नियम श्री गोरखनाथ सांगतात. असे नियम संसारिक लोकांनीही पाळावेत व जीवन सुखमय करून घ्यावे हेच त्यांचे आग्रहाचे सांगणे आहे.

आसन दिढ अहार दिढ जै न्यंद्रा दिढ होई।
गोरष कहै सुणौ ले पूता मरे न बूढा होई।। - गोरखवाणी/१२६

**अर्थ :** म्हणजे हे बालकांनो गोरखनाथ काय सांगतात ते ऐका. आसन, भोजन व निद्रा यांचे नियम सर्वांनी पाळावेत. अशी व्यक्ती अजर-अमर होऊन जाईल. दृढ आसन, अल्पभोजन व मर्यादित झोप असे ते नियम आहेत.

संसार मायारूप आहे खरा. पण माया ही अविद्येच्या रूपात जिवाला वश करून रहाते. पण तीच माया विद्येच्या रूपात मोक्षदायिनी होते. श्री गोरक्षनाथ गोरखवाणीमधे माया ही शक्ती आपणास विद्येच्या रूपात आशिर्वादरूप ठरावी यासाठी सर्वांनी दमनाला विरोध करावा म्हणून आग्रह धरताहेत-

दाबी न मारिबा षाली न राषिबा। जांनि बा अगनि का भेवं।
बूढी हीं थै गुरबानी हाइगी। सति सति भाषंत श्री गोरषदेवं।। - गो.वाणा/१७४

**अर्थ :** म्हणजे मनाला दाबूही नका व मोकळेही सोडू नका. अन्यथा ती आग आहे. हे नीट समजून घ्या. ही अनादिकाळापासून चालत आलेली म्हणून वृध्द असलेली मायाच तुम्हाला मुक्त करेल. हे माझे सत्यवचन ध्यानात ठेवा. श्री ज्ञानेश्वर म्हणतात - मायेने आवृत्त जीव मूळचा ब्रम्हरूपच आहे. स्वत:चे मूळ स्वरूप मायेने आवृत्त असल्यामुळे जिवाला जीवपण

आले आहे व जीवपणामुळे स्वस्वरूप समजत नाही. या विषया संबंधात ज्ञानेश्वर महाराजांनीही ज्ञानेश्वरीमध्ये भाष्य केलेले आहे.

कां जे योगमाया पडळे। हे जाले आहाती आंधळे।।

म्हणोनि प्रकाशाचेनिहि देहबळे। न देखती माते।। - ज्ञानेश्वरी /७/१५८

**अर्थ :** योगमायेच्या पडद्याने ते आंधळे झालेले असतात म्हणून देहबुध्दीच्या बळामुळे प्रकाशरूप अशा मला पाहत नाहीत.

व्यक्ती कोणत्याही आश्रमात असो निष्काम कर्म करणारास श्री गोरक्षनाथांनी योगीच म्हटले आहे. संसारी लोकांना योग सांगताना त्यांनी करूणा व प्रेम या घटकांची व्याप्ती सर्व विश्वातील प्राणी मात्रांशी एकरूप करण्याचा अग्रह धरला आहे. तसेच अभेद दृष्टी व जीवैक्यता हे विषय स्पष्ट करताना पूर्ण शाकाहाराचा आग्रह धरला आहे. जीव व ब्रम्ह एकेच ठिकाणी राहतात. म्हणून कुणीही जीवहत्या करू नये असा स्पष्ट आदेश गोरक्षनाथांनी दिला आहे.

जीव सीव संगे बासा, बधि न षाइबा रूध्र मासा।

हंस घात न करिबा गोतं, कथंत गोरष निहारी पोतं।। - गो. वाणी/२२७

**अर्थ :** जीव व शिव एकाच ठिकाणी असतात म्हणून रक्त मांस खाऊ नका. तुमच्याच नात्यातील या प्राण्यांची हत्या करू नका. ती तुमची नातवंडे आहेत असे समजा.

जीव क्या हतिये रे प्यंड धारी, मारि लै पंचभू भ्रगला

चरे थारी बुधि बाडी, जोग का मूल है दया- दाण ।। - गो. वाणी/२२८

**अर्थ :** अरे माणसांनो जीवाची (देहधारी) काय हत्या करता आहात? मारायचंच असेल तर बुद्धिरूपी कुरणात चरणाऱ्या मनरूपी हरणाला मारा. योगाचे मूळच दयादान आहे.

चालू विषयाची संदर्भात एक विशेष बाब स्पष्ट करावी वाटते ती ही की श्री गोरक्षनाथ केवळ प्रापंचिकांनाच या मार्गात आवाहन करत नव्हते तर त्यांनी समाजातील सर्व थरातील लोकांना स्वत:च्या संप्रदायात आश्रय-स्थान दिलेले दिसून येते. भर्तृहरी, गोपीचंदासारखे राजपुरूष जसे अंकित केले त्याचप्रमाणे सर्व वर्णातील स्त्रियांना ही सामावून घेतले गेले. विमलादेवी, मयनामती, मुक्ताई योगिनी इत्यादी स्त्री-शिष्या, त्याचप्रमाणे महान सिध्द बंगालचा हाडिपा हे शूद्र होते. संन्याशाची मुले म्हणून बहिष्कृत केलेली ज्ञानेश्वर-निवृत्ती-सोपान-मुक्ताबाई ही भावंडे गहिनीनाथांनी आपल्या कृपाछायेत घेऊन आपल्या समर्थ प्रवाहातीलच एक धारा बनवली. गहिनीनाथ म्हणजे प्रत्यक्ष श्रीविष्णूंची करभाजनरूप दिव्य चैतन्यशक्ती आहे असे नवनाथ भक्तीसार या ग्रंथात दिलेले आहे. त्यांच्या कालभेदक दृष्टीला असे दिसले असावे कि समाजाला काय दिले पाहिजे व कसे बांधले पाहिजे. त्याची

तरतूद श्री गहिनीनाथांनी श्री निवृत्तीनाथांना समर्थ व कृतार्थ करून श्री ज्ञानेश्वरांच्या माध्यमातून एका महायज्ञाचेच आयोजन केले. यज्ञसंकल्प होता व्यक्तिसंतुलन व सामरस्य भावाच्या निर्मितीचा. हे शक्य केव्हा होणार? तर व्यक्तीव्यक्तीला आपले सत्यस्वरूप ओळखण्याची, जाणीव व ओढ निर्माण झाली तर! त्यासाठी साधने होती ध्यान, ज्ञान, कर्म व भक्ती. यातून जो मार्ग निश्चित होतो तो स्वच्छ असतो, सर्वसमावेशक असतो व जीवनातील सर्वश्रेष्ठ उद्दिष्टाकडे नेणारा असतो. म्हणूनच या राजरस्त्याला 'पंथराज' म्हटले गेले आहे.

ऐसे विवरोनिया श्रीहरी। म्हणितले तिये अवसरी।
अर्जुना हा अवधारी। पंथराजु।। - ज्ञा.६/१५२

**अर्थ :** अशा प्रकारे सर्व विवरण करून त्यावेळी श्रीकृष्ण म्हणाले की, "हे अर्जुना ह्या पंथराजाचे अनुसरण कर. या पंथराजालाच अभ्यासयोग असे गीतेमध्ये म्हटलेले आहे. त्या काळच्या परिस्थितीत हिंदू धर्मातील अंतर्गत संघर्ष, वर्णाश्रमाची तीव्रता, अनावश्यक कर्मकांड, अंधानुकरण, बाहयअवडंबर, आध्यात्मिक ज्ञानाचा उपहास अशा चमत्कारिक परिस्थितीत श्री गोरक्षनाथ प्रणीत नाथसंप्रदायाच्या सैध्दांतिक संकेतानुसार श्री ज्ञानेश्वरांना व श्री निवृत्तीनाथांना काम करायचे होते. व हे नक्कीच अतिशय अवघड होते. त्यासाठी अशा महायज्ञात आहुतीही त्यास तोडीची असावी लागते. त्यातूनच श्री ज्ञानेश्वरांच्या तर्फे रचनात्मक व व्यापक अशा कार्याची उभारणी झाली की जो आदर्श आजच्या आधुनिक युगाला स्वीकारल्याशिवाय पर्यायच रहात नाही. आजची विचित्र सामाजिक परिस्थिती व त्यातील प्रश्न पाहिल्यावर हे स्पष्ट होत जाते.

**५) ब्रम्हचर्य दमनात्मक नाही तर एक संतुलित अवस्था :**

वरील सिध्दांतातील 'ब्रम्हचर्य', 'दमनक्रिया' व 'संतुलित अवस्था' या तीन्ही पदांना श्री गोरक्षनाथांचे दृष्टिकोनातून पहायचे आहे. वरील शब्दांचे सर्वसामान्यपणे घेतले जाणारे अर्थ सर्व परिचित आहेत. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्मात चर्या म्हणजे ब्रह्मात बुडणे. मात्र सिध्दयोगांतर्गत तत्त्वज्ञानामधे त्यांचे अर्थ वेगळे असून अभ्यासकाला एका वेगळ्याच पातळीवर नेतात. 'गोरखज्ञान' मध्ये श्री गोरक्षनाथ ब्रम्हचर्य पाळणे किंवा राखणे या व्यावहारिक कल्पनेला फाटा देऊन 'ब्रम्हचर्य अवस्था'या अर्थाने ब्रम्हचर्य कसे प्रतिष्ठित होऊ शकते हे ते सूत्ररूप मांडताना त्यांनी स्वत:चेच उदाहरण दिलेले आहेत.

अकथ कथ्या अन अषिर बांच्या, अगम गगन करि लीया।
हंस बिलंव्या बूंद न ढलकै, वहि सरवर बंध दीया।। - गो.ज्ञा./२१

**अर्थ :** न सांगता येणारी अशी, ब्रम्हवार्ता तिला अक्षररूप नसताना मी वाचली आहे व एका अगम्य अशा स्थानावर मी पोचलो आहे. व तेजशक्तीच्या सरोवरात माझा हंसरूप आत्मा बांधल्यासारखा स्थिर झाला आहे. ही ब्रम्हैक्यामुळे प्राप्त झालेली ब्रम्हचर्यावस्थेची प्रतिष्ठित अवस्थाच आहे. त्याचप्रमाणे मानवी देहातील शुक्रशक्तीचा यथार्थ उपयोग कोणता व सामान्य जीवनस्थितीची विदारकता याविषयी मार्गदर्शन करताना श्री गोरक्षनाथ म्हणतात.

बिंद और भग बाघणि औरें, बिन दांतां जग षाया।
प्रांण पुरूष का मर्म न पाया, छोडि बिगुते माया।। - गो. ज्ञान सूत्र १०

याचा अर्थ असा स्पष्ट होतो की बिंदूरक्षण व भोग ही दोन टोके आहेत. वाघिण दातानी चावून भक्ष खाते पण भोगवृत्ती ही बिन दातानी सर्व जगाला खाते आहे हे ओळखूनही जीवानाचा नेमका उद्देश जो मायेच्यावर उठणे असा आहे तो जर समजून घेतला नाही तर मायेतच नष्ट होण्याची पाळी येते. त्याचप्रमाणे सहजभावातून ब्रम्हचर्यावस्था प्राप्त होण्यासाठी प्रयत्न करणे कसे आवश्यक आहे याबाबतचे विस्तृत मागदर्शन गोरखवाणी मधील अनेक सूत्रांमधून श्री गोरक्षनाथांनी केले आहे.

उदा. अवधू सहजै लैणा सहजै दैणा, सहजै प्रीति ल्यौ लाई।
सहजै सहजै चलैगा रे अवधू, तो बासण करँगा समाई।। - गो. वाणी सूत्र २५६

**अर्थ :** समज देत देत सहजपणे मायेचा पगडा हटवून त्याठिकाणी ज्ञानप्रतिष्ठा निर्माण केली पाहिजे पण तेहि प्रेमाने। जसे जसे भांडे मोठे होईल तसे तसे त्यात सर्व सामावले जाईल. मायेचे व्यापक स्वरूप व त्यातून बाहेर पडण्यासाठी अनाहत नादाचा अनुभव घेऊन गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे कशी प्रगती करावी याबाबत गोरखवाणी मध्ये ते सांगतात.

त्रियाजीत ते पुरिषा गता, मिलि भानंत ते पुरिषा गता।
बिसासघातनी पुरिषा गता, कायरौ तत ते पुरिषा गता।
अभष भषंते पुरिषा गता, सबद हीण ते पुरिषा गता।
उदिक राषंत ते पुरिषा गता, परत्रिया राचंत ते पुरिषा गता।
सति सति भाषत गोरषबाला । इतना त्यागि रहो निराला।। - गो.वा.२५९-६०

**अर्थ -** जो पुरूष स्त्रीच्या अधीन होतो तो नष्ट होतो. जो पुरूष एकमेकांचे संबंध (भानंत) तोडतो व वैरभाव धरतो तो नष्ट होतो. विश्वासघातकी पुरूषही नष्ट होतो. जो कायर (कर्तव्यविन्मुख) आहे त्याचेही जीवन व्यर्थ जाते. अभक्ष भक्षण करणारा, गुरूंचा उपदेश न पाळणारा, वीर्यरक्षण (उदिक) न करणारा, परस्त्रीवर दृष्टी ठेवणारा हे सर्व पतित होऊन नष्ट होतात. गुरू गोरक्षनाथ म्हणतात या सर्वांचा त्याग करावा व अलग रहावे. अशी अवस्था मिळवण्यासाठी काही नियम दिले आहेत. मात्र श्री गोरक्षनाथांच्या उपदेशात कुठेही वृत्तींचे

दमन करण्यास सांगितलेले नाही. दमनाने विकार विकृत होतात. तीच विकारशक्ती योग्य मार्गस्थ केली तर व्यक्ती मायेच्या पार जाऊ शकते असे शरीरविज्ञानांतर्गत स्पष्टीकरणच त्यांच्या अधिकार वाणीतून, त्यांच्या विस्तृत वाङ्‌मय सूत्रातून प्राप्त होते. यासाठी नियम, स्वाभाविकता, संयम व शुध्द स्पष्ट उद्देश यांची आवश्यकता असते. म्हणून नियम सांगताना श्री गोरक्षनाथ म्हणतात -

षांये भीं मरिये अषणांये भी मरिये। गोरष कहै पूता संजंमि ही तरिये।

मधि निरंतर की जै बांस निहचल मनुवा थिर होई सास।। - गोरखवाणी/१४७

याचा अर्थ असा की अधाशासारखे खाणे किंवा अजिबात न खाणे हे मृत्यूस आमंत्रण ठरते. म्हणून हे मुला! दोन्हीत संयम ठेव. दोन्हीच्या मध्ये रहा, ज्यामुळे मन निश्चल होईल व श्वास स्थिर होईल. नियमांतर्गत शारिरिक संयमाबरोबरच दृढभावाचीही गरज असते. म्हणून ते पुढील सूत्रात म्हणतात.

नाथ कहै मेरा दून्यौ पंथ पूरा। जत नही तौ सत का निसूरा।

जत सत किरिया रहणि हमारी। और बलि बाकलि देवी तुम्हारी।।

- गो.वाणी /२६९

**अर्थ :** शारिरिक संयम म्हणजे यत व ह्रदयाचा दृढ भाव म्हणजे सत. हे दोन्हीही मार्ग माझ्या बाबतीत एकरूप होऊन चालताहेत. संयम नसेल तर दृढभावाची वीरता असणार नाही. संयम व दृढ भाव हीच आमची क्रिया आहे व तेच आमचे जीवन आहे. हे माये 'तुझ्या बळीसाठी' वरीलप्रमाणे ज्यांचे जीवन नाही असे बकरे असतातच. हा विषय स्पष्ट करणारी गोरखवाणीमधे अनेक सूत्रे आढळतात.

ब्रम्हचर्य, दमनविरोध व संतुलित अवस्था या योगमार्गातील महत्वाच्या विषयांचे अत्यंत सूक्ष्म विश्लेषण श्री गोरक्षनाथांच्या योगदर्शनशास्त्रामधे उपलब्ध आहे. काही ठिकाणी सूत्रांमध्ये स्पष्ट आदेश आहेत, मानसशास्त्रीय विश्लेषण आहे तर काही सूत्रांमधे संकेत रूपानी अगम्य अशी शरीरविज्ञानातील तत्वे मांडलेली आहेत. उदा.

सिध क संकेत बूझिलै सूरा। गगन अस्थांनि बाइलै तुरा।

मींमा के मारग रोपीलैं भांणं, उलटया फूल कली मै आंणं।। - गो. वाणी/११६

**अर्थ :** हे शूरा। सिध्द पुरूषांच्या संकेतास समजून घे. शून्य स्थानामधे अनाहत नाद वाजू दे! चंद्र व सूर्य या विरोधी तत्वांना 'मीनमार्गावर' आण.'ह' व 'ठ' च्या एकत्र मार्गक्रमरणातून असा जर प्रवास घडला तर फुलाची पुन्हः कळी होईल व वृध्द व्यक्ती पुन्हः बालक बनेल.

इथे वरील सूत्रातून महत्त्वाचा विषय मांडला गेलेला आहे. विकसित झालेले तत्व पुन्हः मूळ स्वरूपात व तेहि शुध्द रूपात व्यक्त होण्याचा हा एक वैज्ञानिक चमत्कारच आहे.

याचे बीज Man is a grown up child & child is a father of man या म्हणीमधे सापडते. त्याचप्रमाणे सिध्द लोकांच्या जीवनात ते पूर्ण ज्ञानी होऊनही पुन्हः बालभावात (child like innocence) आल्याचे दाखले सापडतात. Unless yee be a child or you cannot enter into the Heaven अशी बायबलमधील वचने याच अर्थाची आहेत. अशा प्रकारची एक बेजोड अशी संतुलित साम्यावस्था योगमार्गाच्या यथायोग्य अभ्यासाने साधू शकते. यालाच सुसंवादी संपादन (Harmonic Achievement) म्हटले जाते. अशा वेळी साधन, साधक व साध्य यांचे एकरस असे रसायन बनून जाते की ज्यातून जीवनातील सर्वोच्च अशी आध्यात्मिक अवस्था प्राप्त होऊ शकते. यासाठी सद्‌गुरूंचे स्थान अतिमहत्वाचे आहे हे त्यांच्या अनेक सूत्रातून स्पष्ट झालेले आहे. या क्रियायोगास श्री गोरक्षनाथांनी 'समरसीकरण सिध्दांत' असे नांव दिलेले आहे.

अशी सम व एकरूप दृष्टी ही ब्रम्हचर्यावस्थेत स्थिर होण्यासाठी, दमनक्रिया टाळण्यासाठी, एकरूप व एकरस अशी साम्यावस्था अनुभवण्यासाठी आवश्यक आहे. ब्रम्हचर्यावस्थेचा हा व्यापक अर्थ श्री गोरक्षनाथांच्या विविध सूत्रांतून स्पष्ट होतो.

ही व्यापकता व विश्‍व एकरूपता अनुभवण्यासाठीच योगाला भक्तीची जोड नाथसंप्रदायात आग्रहाने दिली गेली आहे. भक्तजीवनाचा विशेष म्हणजे हा सामरस्य प्रबोध! योगक्रियाद्वारा गुरूकृपेच्या चैतन्यप्रवाहात जेव्हा 'पिंडसंविंत्ति' अवस्था प्राप्त होते त्यावेळी तो साधक व्यष्टि व समष्टि दोन्ही पिंडांचा ज्ञानी होतो.

पिंडमध्ये चराचरं यो जानाति स योगी पिंडसंवित्तिर्भवति।।

- सि.सि.प. - उपदेश ३/१

**अर्थ :** सर्व चर अचर हे पिंडामध्येच उपस्थित आहे हे जो जाणतो तो पिंडज्ञानी होतो.

योगातून हे अनुभव येण्यासाठी योग्याची भक्तिभावावस्था असणे अत्यंत जरूर असते. ज्याप्रमाणात भक्त अशाप्रकारे गुरूतत्वाशी व विश्‍वरूपाशी किंवा त्यातल्या सूक्ष्म अर्थाशी एकरूपता अनुभवतो त्याप्रमाणात तो सहज भावातून समर्पणाच्या अहंकार शून्य अवस्थेमध्ये ब्रम्हचर्याच्या खऱ्या सिध्द अवस्थेस प्राप्त होतो. ब्रम्हचर्याची संतुलित अवस्था ही मानवी देहातील सर्व सूक्ष्म तत्वांचे, धन व ऋण शक्तींचे, देहस्थित ग्रंथीचे, बुध्दीच्या संकल्पाचे, तदनुषंगिक भावभावनांचे संवेदनाशील, कोमल पण अतिशक्तीशाली असे अवगुंठन बनते. ही योगशास्त्रातील महान आदर्शभूत अशी अवस्था असते. अशा प्रकारची ही साम्यावस्था प्राप्त करणे अतिशय अवघड आहे. म्हणूनच गीतेच्या ६ व्या अध्यायात श्‍लोक ३३ व ३४ मधे श्री अर्जुनाकडून जेव्हा ''मन चंचल, बलवान व अनावर आहे व त्याला साम्यावस्थेत ठेवणे अशक्य आहे'' असे श्रीकृष्णास सांगितले गेले तेव्हा त्यास त्यांनी

दिलेले श्लोक ३५ मधील उत्तर हे शब्दात असले तरी शाब्दिक ज्ञानाच्या पुढच्या पायरीकडे नेणारे, योगारूढ होण्याचे साधनमार्गाचे रहस्य सांगणारे असे असल्यामुळे ज्ञानेश्वरीत या अध्यायाला फार महत्व आहे.

तैसे गीतार्थाचे सार। जे विवेक सिंधूचे पार।
नाना योग विभव भांडार। उघडले कां।। - ज्ञा ६/११

**अर्थ :** तो अध्याय (६ वा) गीतार्थाचे सार आहे जे विवेकरूपी सागराचे तीर आहे अथवा योगसंपत्तीचे कोठारच जणू उघडले आहे.

जे आदि प्रकृतीचे विसवणे। जे शब्दब्रम्हासी न बोलणें।
जेथोनि गीतावल्लीचें ठाणें। प्ररोहो पावे।। - ज्ञा ६/१२

**अर्थ :** जे आदिमायेचे विश्रांतीस्थान आहे व जिथे वेदांनाही मौन धरावे लागते आणि जेथून गीतारूप वेलीला अंकुर फुटून वाढीस लागले. वेद नेति नेति म्हणतात त्याची अनुभूति मिळवण्याचे साधनरूप असा हा ६ वा अध्याय आहे असे श्री ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

जिहीं आत्म बोधाचिया आवडी। केली स्वर्ग संसाराची कुरोंडी।
तेवांचूनि एथींची गोडी। नेणती आणिक।। - ज्ञा.६/२८

**अर्थ :** ज्यांनी आत्मज्ञानासाठी स्वर्ग व संसार त्यावरून ओवाळून टाकला त्यांच्याशिवाय इथली गोडी कुणाला कळणार ?

आहाच बोलाची वालीफ फेडिजे। आणि ब्रम्हाचियाचि अंगा घडिजे।
मग सुखेसी सुरवाडिजे। सुखाचिमाजी।। - ज्ञा. ६/२५

**अर्थ :** ''श्रवणचा कमीपणा न मानता मनाने सेवन करताना शब्दांवरची साल काढून टाकून ब्रम्हरूप होऊन सुखानेच सुखाची गोडी घ्यावी. असे सांगून अर्जुनाच्या मुख्य प्रश्नालाच म्हणजे साम्यावस्था टिकवणे अशक्य'' यालाच हात घातला आहे. श्लोक ३३/३४/३५ चा भावार्थ असा की मन चंचल, बलाढय असले तरी ते वैराग्ययुक्त अभ्यासाने वळवता येते. मनाची चंचलता व विषयांचे आकर्षण हे त्याच्या चिंतनाने व भोगानुभवाने झालेला परिणाम असतो. मनास स्वत:चे सामर्थ्य ते काय? आत्म्याची शक्तीच मनामधून काम करते, त्यामुळे वैराग्ययुक्त अभ्यासाने ही स्थिती बदलली जाते.

वैराग्य म्हणजे मन विषयापासून दूर ठेवणे व अभ्यास म्हणते मन नामस्मरणात गुंतवणे. म्हणून वैराग्याशिवाय अभ्यास शक्य नाही कारण मनातून जर 'विषय' बाजूला केला तरच 'नामाला' जागा होते अन्यथा नाही. म्हणजे मनाचे व्यापार वरील उपायाने बदलता येतात व हे प्रत्येकाला शक्य आहे. कर्मस्वातंत्र्य म्हणजे हेच ! चिंतन बदलले की जीवनप्रवाह बदलू शकतो. जीवनातली विषवल्ली नष्ट होऊन अमृतवल्लीचा विस्तार प्रत्ययाला येतो. ही

अमृतवल्ली म्हणजे ज्ञान व भक्ती. म्हणून सर्व संतांनी नामस्मरण हे ईश्वरप्राप्तीचे म्हणजेच विश्वचेतनेशी पिंडचेतनेचे समरसीकरणाचे अमोघ साधन म्हणून सांगितले आहे. हे जे आत्मस्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीस ठेव म्हणून मिळालेले आहे त्यामध्ये ३ शक्तीघटक काम करतात. आत्मनिरिक्षण, ध्येयनिश्चिती व त्या ध्येयास अनुकूल असे चिंतन या ३ शक्ती + अभ्यास = याला ज्ञानेश्वरांनी 'योगबळ' म्हटलेले आहे.

आंगी योगाचे होय बळ। तरी मन केतुले चपळ।

काय महदादि हे सकळ। आपु नाहै? [३०] - ज्ञा. ६/४२६

**अर्थ :** जर योगसाधनेचे बळ अंगात असेल तर मनाच्या चंचलतेची काय बिशाद आहे? महत्‌तत्वादिकही स्वाधीन होतात. या योगबलापुढे मनोबल पूर्ण निप्रभ ठरते. त्याचप्रमाणे श्लोक ३५ च्या भाष्यात श्री ज्ञानेश्वरांनी एक महत्वाचा सिध्दांत सांगितला आहे. मन हे सुखासक्त असते म्हणून सुखासाठी ते विषयांच्या मागे धावते. पण अभ्यासाने व्यक्तीला जर आत्मसुख मिळू लागले तर ते म्हणजे मन इतर सुखाकडे जातच नाही.

परि वैराग्याचेनि आधारे। जरि लाविले अभ्यासाचिये मोहरे।

तरी केतुलेनि एके अवसरे। स्थिरावेल।। - ज्ञा ६/४१९

**अर्थ :** परंतू मनाला जर वैराग्याच्या आधाराने अभ्यासाला लावले तर काही काळाने ते स्थिर होईल. मनाच्या क्रियेचा कायदा समजला की सर्व उलगडा होतो. मनाला शक्ती देणारा मीच असल्यामुळे माझे संकल्पानुसार ते कोणतीही दिशा घेऊ शकते.

ब्रम्हचर्यावस्थेतील साम्यावस्था म्हटल्यावर वरील प्रमाणे जो विषय ज्ञानेश्वरीत व गीतेमध्येही स्पष्ट झाला तोच विषय भागवत महापुराण ग्रंथामध्ये विस्ताराने आणि नेमकेपणाने मांडलेला दिसतो. नैष्ठिक ब्रम्हचार्याने कोणते नियम पाळावेत, तीव्र तपाने वासना संपून जाऊन अंत:करणाची शुध्दी कशी होते, आवश्यकतेनुसार गृहास्थाश्रमाचा स्वीकार केला तरीही त्याहि परिस्थितीत व्रतस्थ कसे रहावे व आसक्तीरहित जीवनाच्या मांडणीतून शांती, सुख व समाधानाचा धनी कसे व्हावे याबाबतचे स्कंद ११/ अध्याय १७ श्लोक ३६,४२,४३,५२,५३,५४ आहेत. त्यामधून वरील विषय स्पष्ट होतो. गृहस्थाश्रमात राहूनही ब्रम्हचर्य पालन करता येते. याबाबतचा भागवतामधील श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

ब्रम्हचर्य तप:शौचं संतोषे भूतसौहृदम्।

गृहस्थस्याप्यृतौ गंतु: सर्वेषां मदुपासनम्।।

- भा.म. स्कंद ११/ अध्याय १८/४३

**अर्थ :** ठराविक वेळीच गृहस्थधर्मपालन व त्याचप्रमाणे तप:श्चर्या, पावित्र्य, संतोष आणि सर्व प्राणिमात्रांबद्दल प्रेमभाव हा मुख्य धर्म आहे. त्याचप्रमाणे ईश्वर उपासनाही आवश्यक आहे.

योग्याने किंवा साधकाने वैराग्य व अभ्यास यांचे अनुशीलन करत चित्ताचे बंधन आणि मोक्ष या संबंधी विचार करावा व निश्चय करावा की विषयभोगासाठी इंद्रियांचे चंचल होणे हे बंधन आहे व त्यांना नियंत्रणाखाली ठेवणे हाच मोक्ष आहे.

श्रीमद् भागवत महापुराण ग्रंथाचा संदर्भ ऊधृत करण्याचे कारण एकच की, ब्रम्हचर्याचा विषय असो किंवा आश्रम कोणताही असो, मूळ साध्य आहे 'समरसीकरण साधना' की जिला श्री गोरक्षनाथ तत्वज्ञानाच्या मूलभूत सिध्दांतात पायाभूत असे महत्व देतात. तेच निर्वाण व तीच मोक्षावस्था ! वैराग्ययुक्त अभ्यासाने अतिदुर्लभ अशी साम्यावस्था प्राप्त करता येते.

आधुनिक मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून काही प्रश्नहि निर्माण होतात. विवेक वैराग्यातून व अभ्यासातून जे साधावे असे आध्यात्मशास्त्र ठरवते ते मानवाच्या नैसर्गिक प्रेरणांच्या अभिव्यक्तीस अडथळेच आणते व त्यामुळे त्यातून विकृती निर्माण होतात असे म्हटले जाते. डॉ. फ्राईड यांनी हा विषय त्यांचा पद्धतीने स्पष्ट केला आहे. त्याचप्रमाणे विषय त्याग व संगत्याग केलेली व्यक्ती विकृत न होता आनंदीवृत्तीची होऊन अनेक दोषांचे परिमार्जन झाल्यामुळे व्यापक असे सुखसंबंध अनुभवते असे अनेक विद्वानांनी म्हटल्याचे दिसून येते. भगवद् गीतेमध्ये खालील श्लोकात हाच विषय आहे.

सुखम् आत्यंतिकं यद् तद् बुध्दिग्राह्यं अतिन्द्रियम्।
वेत्ति यत्र न च एवं अयं स्थित: चलति तत्वत:।।     - गीता अध्याय ६/२१

**अर्थ :** इंद्रियातीत शुध्द अशा सूक्ष्म बुध्दीने ग्रहण होणारा अपार आनंद ज्या अवस्थेत अनुभवाला येतो त्या अवस्थेत तो ईश्वरस्वरूपापासून कधीच विचलित होत नाही. त्याचप्रमाणे वासना त्याग करून व्यक्ती विकृत होत नाही किंवा जीवन अर्थहीन वाटून आत्महत्याही करायला जात नाही. कारण वासना या शमवून शमतच नाहीत हा जर सर्वसामान्य अनुभव आहे तर अनुभवाविरूध्द प्रश्न निर्माण करण्यात काय तथ्य आहे ? भागवत् महापुराणामधे भोगजीवन अनिर्बंधपणे अनुभवलेला चक्रवर्ती राजा ययातीच्या तोंडी जे उदगार आहेत ते म्हणजे मानसशास्त्रातल्या या जटिल प्रश्नाला दिलेले उत्तर असून ते सिध्दांतस्वरूप म्हणून मानले गेले आहे.

न जातु काम: कामानां उपभोगेन शाम्यति।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एव अभिवर्धते।।     - भाग : स्कंद ९ अध्याय १९/१४

**अर्थ :** विषयभोग कितीही सेवन केले तरी त्याची आसक्ती शांत होत नाही. अग्नीत तूप टाकल्यावर तो जसा भडकतो तसे विषयभोगाने विषयतृष्णा वाढत जाते. भक्तीसाधनेतून येणारे अनुभव व त्यातून सहजपणे निर्माण होणारी 'प्रेमानुभवाची' स्थिती यातून त्या व्यक्तीचे अंतर्विश्व आश्चर्यकारकरित्या बदलून जाते. याबाबत योगी अरविंद म्हणतात, "In that stage an individual in not at the mercy of the cravings of the physical constitution, not as modern psychologists say "terribly at the mercy of the glands" but becomes a product of harmonically balanced forces in a highly elevated and spiritualised state not only psychical or even spiritual but a highly evolved "supra-mental state" की ज्या अवस्थेला योगी अरविंदांनी ''अतिमानसाचे अवतरण '' असा शब्द वापरला आहे.[१८]

संदर्भ- मुक्तीगाथा महामानवाची पान १७९ व (Modern Indian thought page 219-220)

### ६) नाथ संप्रदाय हा शिवशक्तिसामरस्य योग आहे :

सामरस्य म्हणजे एकरूपता, सामरस्य म्हणजे समभाव, संतुलित अवस्था, म्हणजेच मध्यमार्ग म्हणजेच सिध्दयोग. या अवस्थेचा गर्भितार्थ अशा वेगवेगळया शब्दातून पण एकाच दिशेने व एकाच अर्थाने मांडला जातो. हा विषय श्री गोरक्षनाथांच्या विस्तृत वाङ्:मयातून अधिकार वाणीने मांडलेला दिसून येतो. त्याच परंपरेतून श्री. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतही या अंतरंग रहस्याचा उलगडा अनेक ठिकाणी केलेला आहे. त्याचप्रमाणे इतर सिध्द पुरूषांच्या वाङ्:मयातही हा विषय ठिकठिकाणी त्यांच्या त्यांच्या पध्दतीने व्यक्त झालेला आहे.

**अ)** श्री गोरक्षनाथांच्या सि.सि.प. या ग्रंथात उपदेश क्र.३ मधे पिंडज्ञान म्हणजे पिंडामधेच ब्रम्हांड कसे संपन्न आहे हे दिल्यानंतर उपदेश क्र.४ हे प्रकरण 'पिंडाधार' असे असून त्यामधे पिंडाचा (शरिराचा ) आधार कोणता? तर तो आहे 'शिव' तत्वांतर्गत शक्तीतत्वाचा. हे शक्तितत्व जेव्हा शिवतत्वात असते तेव्हा ते 'अकुल' (Inactive) असते व जेव्हा ते सर्वव्यापक होऊन कार्य करू लागते तेव्हा ते 'कुल' असते. कुल हे व्यक्तरूपात तर अकुल हे अव्यक्तरूपात असते. याचा अर्थ अकुल शक्ती कुल शक्तीचे रूप घेऊन विश्वात कार्यरत होते. तद्वतच 'शक्ती' बिना शिवतत्व असमर्थ बनते. 'शिवोपि शक्तिरहित:' असे सूत्ररूपात सि.सि.प. उपदेश ४ सूत्र १३ मधे दिलेले आहे. या संबंधातली एक विशेष नोंद श्री. मत्सेंद्रनाथकृत 'कौलज्ञान-निर्णय' या ग्रंथात शक्तीचे शिवात विलीनिकरण व शिवाचेही शक्तीच्या क्रियाशक्तीत विलीनीकरण जेव्हा घडते तेंव्हा फक्त 'परमशिवावस्था' अशी स्थिती रहाते.[१९] (संदर्भ-सि.सि.प.पान ८४) अशी वेळी 'विश्व' ही स्थितीच नाहिशी होते. या 'परमशिव' अवस्थेत 'कारण भावाचा' अभाव असतो तर 'शिव' अवस्थेमधे 'कारणभाव'

अंतर्भूत असतो. अशा  तऱ्हेने परमशिवावस्था भिन्न आहे. 'शिवा'वस्थेमधे कुल व अकुल असे दोन्ही आहेत.

या समतासूत्रातून काय दर्शविले जाते? तर सर्व भौतिक सृष्टीमधून निजा, परा, अपरा, सूक्ष्मा व कुंडलिनी या शक्तींच्या माध्यमातून ब्रम्हतत्व कार्यरत असते व तेच पिंडाचा आधार असते.[२०] संदर्भ सि.सि.प. पान ३.

**ब)** नाथपरंपरेतील योगसाधना म्हणजेच सिध्दयोगसाधना होय. हा विषय श्री गोरक्षनाथांनी सि.सि.प. या ग्रंथात मांडला आहे. त्याचप्रमाणे 'सिध्दसिध्दांतसंग्रह' या आचार्य बलभद्र विरचित ग्रंथात शिवशक्तिसामरस्य हाच विषय अधिक स्पष्टतेने मांडलेला दिसून येतो. या सामरस्य योगाची प्राप्ती 'जीव' रूपात असणारा साधक हा अंतरंग योगाच्या सहाय्याने (म्हणजे गुरूकृपेने जागृत झालेल्या शक्तीच्या साहाय्याने) शिवतत्वाशी एकरूपत्व प्राप्त करून घेऊ शकतो. अंतरंगयोगाची अवस्था म्हणजे अंतर्स्थित सदगुरूंची जागृतीच! ही अंतर्विश्वातील तत्वांची जागृती व त्यांचे चालन म्हणजेच जिवाशिवाची भेट होणे. म्हणजेच शिवशक्तिसाम्यरसात्मक महासुखाची अवस्था. म्हणजेच पिंडब्रम्हांड संहारणी. म्हणेच जडचेतनभेदप्रक्रियेद्वारा स्वसंवेद्य आत्मस्वरूपाची प्राप्ती म्हणजेच निजविश्रांती.

या संबंधातील वरील विषय स्पष्ट करणारी सि.सि.संग्रह ग्रंथातील सूत्रे खालीलप्रमाणे आहेत.

अखंड परिपूर्णात्मा विश्वरूपो महेश्वर:।

घटे घटे चित् प्रकाश : तिष्ठति इति प्रबुध्यताम्।।  - सि.सि.सं./उप ३/४०

म्हणजे अखंड परिपूर्णरूप आत्मा हा विश्वस्वरूपी महेश्वर आहे. तो प्रत्येक देहात चित् प्रकाशरूपाने वास्तव्य करतो असे जाणावे. जिव-शिव, आत्मा-परमात्मा एकरूपच असतात. पण आई-मुलाच्या भेटीप्रमाणे त्यांची भेट होणे व एकरूपत्व प्राप्त  होणे असा अर्थ आहे.

वरील मुद्यामध्ये जी अंतरंगशक्ती म्हणून संबोधिली आहे तिला सिध्द योगात कुंडलिनी शक्ती असे नांव असून त्या शक्तीबाबत काही श्लोकांचा अर्थ सि.सि.प. उपदेश ४ मधे दिलेला आहे.

**शक्तीचे स्वरूप :**

एकमेवाद्वितीय, अखंड, अद्वैतरूप, अविनाशी, पाप-पुण्य रहित, अवयवरहित अशी आहे. (श्लोक ११)

सृष्टीच्या उत्पत्तीची कारणभूत, ज्ञानप्रकाशाचे आश्रयस्थान, अपरंपरागत अशी ईश्वराची निरनिशय शक्ती (श्लोक १२)

अज्ञानजन्य संसाराला ज्ञानरूपात परावर्तित करणारी ही एकमेव शक्ती म्हणून तिला 'आज्ञेश्वरी' असे म्हटले जाते. (श्लोक १३)

या शक्तीच्या सहाय्यानेच शिवतत्व हे निर्गुणातून सगुणात येऊ शकते. (श्लोक १६)

वरील विवेचनातून हे स्पष्ट होते की हीच शक्ती जगव्यवहारात सगुण स्वरूपात व्यक्त होते. म्हणजेच इथे पूर्ण अद्वैतसिध्दांत म्हणजेच नाथपंरपेरतील 'द्वैताद्वैत विलक्षण' म्हणजेच पूर्ण चैतन्यवादच स्पष्ट होतो.

ही कुंडलिनी शक्ती स्वसंवेद्य व आत्मस्वरूपज्ञानाची साक्षात आश्रयस्थान असते. व तिचे जेव्हा नि:शेष उत्थान होऊन ती सुषुम्नामार्गे सहस्त्रारात शिवतत्वाशी एकरूप होते तेव्हा 'समरसीकरण' प्रक्रिया पूर्ण होऊन कुंडलिनीचे 'पिंडाधार' हे नाव सिध्द होते. या शक्तीचे स्वस्वरूपामध्ये अखंड प्रतिभान होते. त्याचे सूत्र खालीलप्रमाणे आहे.

निरूत्थाने स्वस्वरूपाखंडैव प्रतिभाति सा।। - सि.सि.सं उप. ४/३६

अर्थ वर दिलेलाच आहे.

सि. सि. संग्रह या ग्रंथातील उपदेश ५ हा सर्व अध्याय सामरस्य योग व तदनुषंगिक महत्त्वाचे विषय प्रतिपादणारा आहे. केवळ सामरस्य साधनेच्या संबंधात ७ श्लोक असून त्यामधून सामरस्य साधनेसाठी गुरूकृपा, ज्ञानोन्मेषाचा प्रत्याहार, वैश्विक धारणा, आत्मतत्त्वाशी निमग्नता, अनाहत ध्वनीचे महत्त्व अशा विविध अंगांनी तो विषय स्पष्ट केला आहे.

सि.सि.संग्रह उपदेश ७, श्लोक १३ मध्ये अनाहत नाद श्रवणाने पिंडसिध्दी प्राप्त होते व पिंड - ब्रम्हांडाचे स्वरूप समान असल्यामुळे परमसत्याची प्राप्ती होते. मात्र गुरूकृपेशिवाय हे शक्य होत नाही असा विषय मांडलेला आहे.

अशा प्रकारे 'सिध्दसिध्दांतसंग्रह' ग्रंथातील सामंरस्य साधनेचा विषय स्पष्ट होतो.

**Goraksasatakam :** या श्री स्वामी कुवलयानंद व डॉ. शुक्ल यांनी संपादित केलेल्या इंग्रजी ग्रंथात एकूण १०१ सूत्रे असून त्यामधे जीव-शीव समरसीकरणाचाच विषय मांडलेला आहे.

**योगबीज :** या श्री गोरक्षनाथांच्या ग्रंथातही सामरस्य कसे साधले जाते याची बरीच सूत्रे आहेत. म्हणजे जीवाशिवाची एकता होते व चित्त विलीन होते. प्राणामध्ये चित्ताचा लय झाला तर चित्तामध्ये प्राणाचा लय होतो. इथे मन व प्राण यांचे सामरस्य होते व हे गुरूशक्तीतून साध्य होते.

**अमरौघप्रबोध :** हा गोरक्षनाथांचा मूळ संस्कृत ग्रंथ ७४ श्लोकांचा असून आकाराने तो लहान असला तरी सिध्द योगसाधनशास्त्रातील काही मौलिक सिध्दांत त्यात आहेत.

त्यामधील क्रिया व सिध्दांत हे जीव-शिवाचे सामरस्य (ऐक्य) होण्यासाठी श्री गोरक्षनाथांनी दिलेली संजीवनीच आहे असे डॉ. के.रा. जोशी यांनी वरील ग्रंथाच्या प्रस्तावनेत नमूद केलेले आहे.

शिवशक्तिसंगमामुळे निर्माण होणारी ही अपूर्व दशा म्हणजे सिध्दयोगाची अंतिम फलश्रुती असते. श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी अध्याय ६ मध्ये त्या आनंदाची परमावधी पुढील प्रमाणे व्यक्त केली आहे.

तैसे होय तिये मेळी। मग सामरस्याचिया राऊळी।
महा सुखाची दिवाळी। जगेसि दिसे।। - ज्ञा ६/३८९

**अर्थ :** त्याचप्रमाणे जीव व ब्रम्ह यांचे ऐक्य झाल्यावर त्याची स्थिती होते. (मीठ पाण्यात एकरूप झाल्याप्रमाणे याचा संदर्भ आधीच्या ओवीशी आहे) व नंतर ब्रम्हानंदाच्या मंदिरात महासुखाची दिवाळी झाल्याप्रमाणे तो सर्व जग पाहतो. याच अर्थाचे विवरण करणारे अनेक श्लोक ज्ञानेश्वरीतील वेगवेगळ्या अध्यायामधे आलेले आहेत.

सारांश, या अवस्थेला नाथपंथात 'निरंजनपद' म्हणतात. सिध्द योग्यांना याच परमतत्वाचा अनुभव येतो.[२१] (संदर्भ- नाथसंप्रदाय उदय व विस्तार पान ३४३)

**ज्ञानेश्वरी व अमृतानुभव :**

श्री गहिनीनाथ- निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर अशा परंपरेने ज्ञानेश्वरांनी नाथपंथाची बांधणी वेगळया पध्दतीने केली. श्री गोरक्षनाथांपासून सुरू झालेली व श्री ज्ञानेश्वरांपर्यंत प्रवाहित झालेली नाथपंरापरा 'योग' साधनेच्या प्रमुख अंगातून व्यक्त होते. नंतर मात्र श्री ज्ञानेश्वरांनी योगापेक्षा कर्म, कर्मापेक्षा ज्ञान, ज्ञानापेक्षा भक्ती व तद्नुषंगिक उपासना यांना जास्त महत्व दिल्याचे ज्ञानेश्वरीतील पुढील साररूप ओव्यांवरून दिसून येते असे अनेक विद्वानांचे मत आहे.[२२] (संदर्भ - प्रेमावतारीसंत पान ८१)

स्वकर्माच्या चौखोळी। मज पूजा करूनि भली।
तेणे प्रसादे आवळी। ज्ञाननिष्ठेते।। - ज्ञा. १८/१२४७
ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ती माझी उल्लासे।
तिया मजसी समरसे। सुखिया होय।। - ज्ञा. १८/१२४८

**अर्थ :**

स्वकर्माच्या पवित्र पुष्पांनी माझी उत्तम पूजा केल्यामुळे प्रसादरूप भक्त ज्ञाननिष्ठा प्राप्त करून घेतो.

अशा ज्ञाननिष्ठेच्या प्राप्तव्यामुळे माझी भक्ती सहज उल्हासाने प्रगट होते व भक्तीने समरस होऊन तो सुखी होतो.

वरील साररूप ओव्या गी.अ. १८ मधील पुढील श्लोकाचे स्पष्टीकरणार्थ आहेत.

सर्व कर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रय:।

मत् प्रसादात अवाप्नोति शाश्वतं: पदं अव्ययम्।। - गी./१८/५६

**अर्थ :** साम्याशी एकरूप झालेला निष्काम कर्मयोगी सर्व कर्मे सतत करीत राहूनही माझ्या कृपेने अविनाशीपद प्राप्त करून घेतो.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, हरिपाठ, चांगदेव पासष्टी, अभंग या सर्व ग्रंथातून ठिकठिकाणी ज्ञानेश्वरांनी ज्ञानावरच भर दिलेला दिसत असला तरी ज्ञानयोग सुलभ करणे हाच त्यांचा उद्देश होता. कारण 'सकळांसी' येथे आहे 'अधिकार' हे त्यांचे आश्वासन होते (तुकाराम गाथा) यारे यारे लहान थोर। भलते याती नारी नर (तुकाराम गाथा ) याची प्रचिती लोकांना द्यावयाची होती. म्हणूनच 'ज्ञानेश्वरी' तील ६ वा अध्याय वगळता अन्यत्र ज्ञानेश्वरांनी योगाचे विवरण केलेले नाही. अथवा त्याचा आग्रहही धरलेला नाही. उलट हरिपाठामध्ये असे नमुद केलेले आहे की,

योग याग विधि। येणे नोहे सिध्दि।

वायाची उपाधि। दंभ धर्म।। - हरिपाठ अभंग५ / ओवी-१

**अर्थ :** अष्टांगयोग, यज्ञ, धर्मकृत्ये यांनी जीवनाला पूर्णता येत नाही, त्रास होतो व अहंकारही वाढतो.

नाथसंकेताचा विस्तृत आणि विशाल अर्थ म्हणजेच त्यांची विश्वात्मक देवाची पूजा व ती देखील स्वकर्म कुसुमांनी केलेली असा आहे.

तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा।

पूजा केली होय अपारा। तोषालागी।। - ज्ञा १८/९१७

**अर्थ :** त्या सर्वात्मक ईश्वराची स्वकर्मरूपी पुष्पानी पूजा केली असता ती पूजा त्याला अपार संतोषाला कारणीभूत होते.

वरील सर्व चिंतनातून एक महत्त्वाचा निष्कर्ष निघू शकतो तो म्हणजे नाथसंप्रदायाला विश्वात्मक तत्वज्ञानाचे अधिष्ठान देण्याचे महान कार्य श्री. ज्ञानेश्वरांनी केले आहे व हे सर्व कर्माच्या शुध्दतेतून व अंत:करणाच्या भक्तीतून साधता येते. थोडक्यात असे म्हणता येते की,

१. व्यक्ती ही केंद्रस्थानी असली तरी ती स्वार्थाकडे झुकत नाही.

२. वृत्तींची शुध्दता, संतुलित जीवन व दमन विरोध यांचे आग्रहावरून हे स्पष्ट होते की हे तत्वज्ञान व्यक्ती या घटकाची सर्व बाजूनी बांधणी करू इच्छिते. त्यातून त्या व्यक्तीचे व अशा व्यक्ती घटकांचे एकत्रिकरणातून होणाऱ्या समाजाचे खऱ्या अर्थांनी कल्याण व्हावे व नि:श्रेयस प्राप्ती व्हावी.

३. सामरस्य प्राप्ती हा अनुभवच असा आहे की ती व्यक्ती एकाचवेळी अनुभववादी, ज्ञानात्मक, आंतरनियमवादी, परार्थी, बुध्दीवादी, मूल्यवादी, साध्य व साधन या दोन्ही मूल्यांचे यथोचित आदर करणारी अशी बनते. जाणिवेच्या एका वेगळया पातळीवर जीवनाची खोली, व्यस्तता व विस्तार अनुभवते. पिंडात ब्रम्हांडाचा अनुभव आलेनंतर त्यातून जीव-ब्रम्ह ऐक्य भावाची निर्मिती होते व ही भावावस्था मर्यादेच्या सर्व कक्षा ओलांडून अमर्याद बनून ब्रम्हांड चक्रभेदन क्रियांचा अनुभव घेत परमजाणिवेच्या अवधूत अवस्थेत स्थिरावते.

**७) उपसंहार :**

अशा प्रकारे श्री गोरक्षयोग व तत्त्वज्ञान याच्यातून देहस्थपिंडातून चर-अचर अशा ब्रम्हांडापर्यंतचा समरसतेचा अनुभव घेत पिंडसंवित्ति अनुभावयाची असते. ही समरसता हा योग असून तो 'सामरस्ययोग' म्हणून नाथसंप्रदायात महत्वाचा आहे. सामरस्य योगावर चालु प्रबंधात प्रकरण ६ हे स्वतंत्र प्रकरणच आहे. श्री गोरक्षनाथांच्या वाङ्मयात त्यावर अनेक सूत्रे असून त्याची चर्चा प्रकरण ६ मध्ये केलेली आहे.

त्याचप्रमाणे भगवान गौतम बुद्धांच्या तत्वज्ञानातील 'मज्जिम निकाय' हा सिद्धांत मध्यमार्गाचा म्हणजे संतुलनाचा व त्यातून साधण्याचे समरसतेचाच आहे. काही आधुनिक अस्तित्ववाद्यांच्या चिंतनातूनही हा विषय मांडला गेला आहे. अशा सामरस्य बोधाचा अनुभव योगातून, नामसाधनेतून, विश्वप्रार्थनेतून, मंत्रोपदेशातून अनेक सिद्धयोग्यानी अनुभवला व तोच त्यांनी शब्दबद्ध करून सर्वांसाठी व्यक्त केला. श्री गोरक्षनाथांचा ब्रम्हांडी ते पिंडी व पिंडी ते ब्रम्हांडी हा सिद्धांत व्यष्टी व समष्टीची एकरूपता दाखवितो. हा शुद्धचिद्‌विलास असून अंतिम शक्ती व त्याची निर्मिती यामधील एकरूपत्वच पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातही पहावयास सापडते. या एकरूपतेलाच टोलँड यांनी सन १८०० मध्ये 'पँथीझम' (Pantheism) हा शब्द वापरला. ग्रीक तत्त्वज्ञानामध्ये या विषयावर अनेक संदर्भ मिळतात. अशा प्रकारे वेगवेगळ्या काळात हा विचार ठळकपणे मांडलेला दिसून येतो. मात्र श्री गोरक्ष तत्त्वज्ञान अभ्यासताना त्याचे एक वैशिष्ट जाणवते ते हे की त्यांचे तत्त्वज्ञान व्यक्तीचे व समाजाचे सर्व जीवन व्यापणारे आहे. सर्व मानवजातीने सर्वश्रेष्ठ कल्याणाचा ध्यास घेऊन स्वत:चे जीवन कृतार्थ करून घ्यावे व एका समर्थ आणि सद्‌विचारी समाजाची बांधणी त्यातून घडावी असे स्पष्ट निर्देश त्यांचे शिकवणूकीत आहेत. त्यासाठी अनैतिक परंपरा मोडीत काढून नितिमत्ता, तत्त्वज्ञान, तंत्र, मंत्र, गुरूपरंपरा यांचे आधारे समाजपरिवर्तनाची क्रांतिकारी क्रिया कार्यान्वित करण्याचा त्यांचा प्रयत्न हा एक विस्मयकारक असा वैज्ञानिक प्रयोगच होता. तीच योग व ज्ञानाची धारा भक्तीच्या आणि भावाच्या प्रवाहाशी पुढे जोडली जाऊन हा समाजपरिवर्तनाचा प्रयोग श्री गहिनीनाथ, निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वरांच्या माध्यमातून अखंडपणे कार्यरत होताना दिसून येतो. यानंतर गोरक्षनाथांच्या साहित्यातील सूत्रचर्चा मी प्रकरण ४ मध्ये करणार आहे.

## ८) संदर्भ व टीपा :


१. गुरूदेव आर. डी. रानडे चरित्र आणि तत्त्वज्ञान - शं. गो. तुळपुळे, यशवंत प्रकाशन, पुणे, १९८३.

२. दैवी वाणी - स्वा. विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर, १९८२.

३. शिवयोग और प्रार्थनायोग - डॉ. भगवानदास तिवारी, म. तपस्वी कुमारस्वामी, अमृत महोत्सव, कमेटी प्रकाशन, १९८५.

४. The Perfect Relationship – Swami Muktananda, Gurudeo Siddhapeeth, Ganeshpuri, 1983.

५. मुक्तिगाथा महामानवाची - प्रा. शिवाजीराव भोसले, विजयंता प्रकाशन, पुणे, १९७३.

६. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.

७. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.

८. नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर - डॉ. के. डी. भिंगारकर, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, २००७.

९. योगदर्शन भाग १ व २ - ओशो - जीवन जागृती केंद्र प्रकाशन, पुणे, १९९३.

१०. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.

११. तत्रैव.

१२. Introduction to Psychology – N. L. Munn, Oxford & B. H. Publishing Co., Bombay, 1969.

१३. गुरूदेव आर. डी. रानडे चरित्र आणि तत्त्वज्ञान - शं. गो. तुळपुळे, यशवंत प्रकाशन, पुणे, १९८३.

१४. Introduction to Psychology – N. L. Munn, Oxford & B. H. Publishing Co., Bombay, 1969.

१५. गोरक्षपद्धति व गोरक्षातक - महीधर शर्माकृत खेमराज श्रीकृष्णदास प्रकाशन, मुंबई, सं. २०६२, वि. व रामालाल श्रीवास्तव श्री. गोरखनात मंदीर, गोरखपूर, सं. २०३८, वि.

१६. सिद्धसिद्धांतपद्धति - संपादन स्वामी द्वारकादास शास्त्री, चौखंबा विद्याभवन, वाराणसी, २००६.

१७. गोरख बानी - संपादन रामलाल श्रीवास्तव, गोरखमंदीर प्रकाशन, गोरखपूर, सं. २०५१, वि.

१८. मुक्तीगाथा महामानवाची - प्रा. शिवाजीराव भोसले.

१९. सिद्धसिद्धांतपद्धति - संपादन स्वामी द्वारकादास शास्त्री, चौखंबा विद्याभवन, वाराणसी, २००६.

२०. तत्रैव.

२१. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार - डॉ. प्र. न. जोशी, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००४.

२२. प्रेमावतारी संत - डॉ. एम. बी. जोशी, अवधूत प्रकाशन, कोल्हापूर, १९९४.

# प्रकरण - चौथे

# श्री गोरक्षनाथांच्या साहित्यातील सूत्रचर्चा

## १) प्रस्तावना :

श्री. गोरक्षनाथांचे साहित्याची व्याप्ती मोठी असून त्यामधील विविध विषय, त्यांची अर्थपूर्ण व सखोल मांडणी, त्या विषयांचे मानवी जीवनातील तसेच वैश्विक संबंधातील असे महत्त्वपूर्ण स्थान हे सर्व अभ्यासकाला अचंबित करणारे आहे. नाथ संप्रदायाच्या प्रचंड साहित्यावर संशोधनही विपुल प्रमाणात झालेले आहे. व वेगवेगळया कोनातून त्यावर कामही चालू असलेले दिसून येते. नाथपंथाशी शैव, वैष्णव, शाक्त, वज्रयानी तांत्रिक, कापालिक, कौलमार्गी तसेच प्राचीन योगपरंपरेच्या अनेकानेक मार्गानी संबंध आलेला असल्यामुळे श्री गोरक्षनाथांचे साहित्यातील सूत्रचर्चा हा विषय केवळ वाङ्मयीन चिकित्सेचा नसून श्री गोरक्षनाथ हे ज्या उपरिनिर्दिष्ट प्रवाहांच्या संपर्कात आले त्यातून नीरक्षीर विवेकाने जे घ्यावयाचे होते तेवढेच त्यांनी स्वीकारले व योगानुभूतीच्या परमोच्च स्तरावर असताना व्यष्टी व समष्टीच्या सर्वांगीण धारणेसाठी त्यांना जे स्फुरण होत गेले ते आचारधर्म, साधनापध्दती व तत्वज्ञान अशा विविध अंगानी व्यक्त झालेले आहे.

त्यामुळे श्री गोरक्षनाथांचे वाङ्मयाचा विस्तार हा ‘प्रचंड’ या शब्दानीच व्यक्त करणे उचित होईल. अशा वाङ्मयातील महत्वाची सूत्रे व त्यांचे विविध विषयानुसार वर्गीकरण हा विषय तसा पूर्णांशाने हाताळणे अवघड आहे. कारण त्यांचे सर्व वाङ्मय एकाचवेळी उपलब्ध होणे काहीसे कठीण झाले आहे. त्यामुळे या प्रयत्नात अपुरेपणा रहाण्याची शक्यता गृहीत धरुनच प्रकरणाचा अभ्यास केलेला आहे. व त्यासाठी प्रथम त्यांच्या वाङ्मय विस्ताराची व्याप्ती पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## २) ग्रंथविस्तार :

श्री. गोरक्षनाथांचे म्हणून जे ग्रंथ सांगितले जातात त्या बाबत असे म्हटले जाते की काही ग्रंथ हे नक्की त्यांचेच आहेत तर काहींबाबत मूळ कर्ता कोण याबाबत संदिग्धता आहे. याबाबत स्वामी द्वारिकादासशास्त्री यांनी संपादित केलेल्या सि.सि.प. या ग्रंथात संक्षिप्त परिचयामध्ये म्हटले आहे की श्री गोरक्षनाथांच्या नांवावर तसेच इ.स.१००० चे नंतर १४ व्या शतकातले भक्त कबीरदास तसेच गुरु नानक यांचेबरोबर श्री. गोरक्षनाथांचे संवाद झाल्याची नोंद असणारे ग्रंथ उपलब्ध झालेले आहेत. म्हणून एवढेच म्हणता येईल की श्री. गोरक्षनाथांचा काळ इ.स. ९५० ते १०५०चे दरम्यान सर्व दृष्टीनी ऐतिहासिक पुराव्यानिशी नक्की झालेला आहे. असे असताना १४ व्या शतकात अगर नंतर ही त्यांचे व काही सिद्धयोग्यांचे श्री. गोरक्षनाथांशी संपर्क - संभाषण हे सूक्ष्म स्तरावर प्रगाढ ध्यानाच्या

अवस्थेमध्ये झालेले असण्याची शक्यता असू शकते का? असा प्रश्न आहे. गोरक्षनाथांचा प्रत्यक्ष कोणाशी संपर्क झाला असणे शक्य नाही मात्र त्या त्या महान तत्वचिंतकांना श्री. गोरक्षनाथांच्या साहित्यातून काही प्रेरणा मिळालेली असणे शक्य आहे. कदाचित प्रगाढ ध्यानावस्थेमध्ये त्या त्या महान विचारवंतांचे बाबतीत काही गोष्टी घडल्या असणे शक्य आहे.[१] (संदर्भ : सि.सि.प. संक्षिप्त परिचय पान ६३)

वरील सि.सि.प. या ग्रंथात असे नमूद केलेले आहे की, शैव परंपरेतील 'प्रत्यभिज्ञा दर्शन' या ग्रंथातील सिध्दांत व श्री. गोरक्षनाथांची आत्मानुभूती यांचा मनोज्ञ संगम म्हणजे त्यांचे तत्वज्ञान व योगशास्त्र! वज्रयानी साधना व संस्कृती विरोधी असे जेजे होते त्यात बदल करुन समाज व व्यक्तीच्या स्थिरतेसाठी व स्वास्थासाठी व्यक्तिमूल्याधिष्ठित सांस्कृतिक मूल्यांची प्रतिष्ठापना व संवर्धन करण्याचे सर्वसमावेशक असे तत्वज्ञान त्यानी लोकभाषेमध्ये निर्माण केलेले पहावयास सापडते. साधनेची शुध्दता व हेतूची स्पष्टता हीच त्यांच्या योगशास्त्राची व तत्त्वज्ञानाची बलस्थाने आहेत असे म्हटले तर चूक होणार नाही.[२] (संदर्भ : सि.सि.पध्दति - संक्षिप्त परिचय पान ६४)

आता त्यांच्या साहित्याचा एकूण विस्तार काय आहे हे पाहणे उचित ठरेल.

### ३) गोरक्षनाथांच्या साहित्याचा विस्तार :

श्री गोरक्षनाथकृत मी संदर्भासाठी घेतलेले संस्कृत ग्रंथ : (कंसातील आकडे हे एकूण सूत्र किंवा श्लोकांचे आहेत)

१) अमनस्क योग (२११)

२) सूक्ष्मवेद (३३६)

३) अमरौघ प्रबोध (७४ श्लोक)

४) अवधूत गीता (२७१)

५) गोरक्षपध्दती - गोरक्ष ज्ञान + योगशास्त्र (२०२)

६) गोरक्षशतक (१०१)

७) Goraksa satakam (१०१) इंग्लीश

८) गोरक्षसंहिता (२००)

(याला मिळता जुळता असा ग्रंथ आहे श्री मच्छिंद्रनाथांचा 'अकुलवीरतंत्र')

९) महार्थमंजरी (७१)

१०) योगबीज (१९०)

११) सिध्द सिध्दांत पध्दति (३५३)

१२) सिध्दसिध्दांत संग्रह (३०५)

१३) गोरक्षसिध्दांतसंग्रह (सि.सि.प.चे संक्षिप्त रुप)

या व्यतिरिक्त खालील ग्रंथ हे काही भारतीय व पाश्चिमात्य संशोधकांच्या नावावर संशोधित म्हणून उल्लेखित आहेत. पण ते सहजी उपलब्ध नाहीत. त्यांची नांवे अशी:

गोरक्षकल्प, गोरक्षकौमुदि, गोरक्षगीता, गोरक्षचिकित्सा, गोरक्षकवच, ज्ञानप्रकाश और ज्ञानप्रकाश शतक, चतुरशीत्यासन, ज्ञानशतक, ज्ञानामृतयोग, नाडीज्ञानप्रदीपिका, योगचिंतामणी, योगमार्तंड, योगसिध्दासनपध्दति, विवेकमार्तंड, हठयोग, हठसंहिता.

हिंदी ग्रंथ - 'गोरखवाणी' हा श्री. गोरक्षनाथांचा प्रसिध्द ग्रंथ असून त्यातील सूत्रे त्यांच्या तत्वज्ञानाची समर्पकता यथार्थपणे स्पष्ट करतात. गोरखवाणी मध्ये एकूण २७५ सूत्रे आहेत. गोरखवाणी या ग्रंथामध्ये पुढील विभाग केलेले असून त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

गोरखज्ञान : ४५ सूत्रे आहेते, गोरखतंत्र, (तंत्रशास्त्र+१९६मंत्र) गोरखतंत्र हा स्वतंत्र ग्रंथ असून ते रणधीर प्रकाशन, हरिद्वार इ.स. २००७ चे प्रकाशन आहे. तसेच गोरखप्राणसंकली: (१६ सूत्रे), गोरक्षद्पनिषत् (गद्य स्वरुपात) हा ग्रंथ असे Encoded Print मध्ये मिळालेला आहे. गोरक्षयोग अथवा गोरक्षपध्दति : (भाग १ - ११७ सूत्रे (भाग २ - ११४ सूत्रे ), गोरखनिर्वाण समाध (१७ सूत्रे), गोरखज्ञान गोदडी (२३ सूत्रे), गोरख गीता (७ सूत्रे ).

श्री. गोरक्षनाथांच्या हिंदी ग्रंथांचे संपादन डॉ. पीतांबरदास बडथ्वाल यांनी करुन अलाहाबाद येथील हिंदी साहित्य संमेलनात त्याचा पहिला भाग प्रसिध्द केला होता. (संदर्भ : सि.सि.प. पान ६६)[३] श्री. बडथ्वाल यांच्या प्रयत्नानी खालील ४० हिंदी ग्रंथ सर्वांसमोर येऊ शकले.

गोरक्षवाणी, सबदी, प्राणसंकली, पद, सिष्या दरसन, नरवैबोध, आत्मबोध, अभैमात्रा जोग, पंद्रह तिथी, सप्तवार, मछींद्रगोरखबोधी,रोमावली, ग्यानतिलक, ग्यान चौतीसा, पंचमात्रा, गोरखगणेशगोष्टी, गोरखदत्तगोष्टी, महादेव गोरखगुष्टी, सिष्यपुरान, दयाबोध, जाती भौरावली, नवग्रह, नवरात्र, अष्टपारछया, रहरास, ग्यानमाला, आत्मबोध, व्रत, निरंजनपुराण, गोरखवचन, इंद्रोदेवता, मूलगर्भावली, गोरखसत, अष्टमुद्रा, चोवीससिध्दी, षडक्षरी, पंचअग्नि, अष्टचक्र, अबलि सिलूक, काफिरबोध, गोरखबोध.[४] (संदर्भ : सि.सि.पध्दति संक्षिप्त परिचय पान ६७)

वरीलपैकी सबदी, गोरखबोध, गोरखवाणी, गोरखयोग हे ग्रंथ महत्वाचे असून त्यामधेच गोरखज्ञान, प्राणसंकली निर्वाणसमाध, गोदडी,गीता वगैरे भाग दिलेले आहे.

श्री. गोरक्षनाथांच्या अशा व्यापक वाङ्मयातून अभ्यासासाठी जे ग्रंथ उपलब्ध आहेत त्यामधील विविध सूत्रांतर्गत असे अनेक विषय आलेले आहेत. त्यातील अंतर्भूत अशा वेगवेगळया महत्वाच्या विषयांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. व त्यातील एकेका

विषयाचे संबंधात जी सूत्रे त्यांच्या वेगवेगळया ग्रंथात विखुरलेली आहेत त्यांचे त्या त्या विषयासंबंधी वर्गीकरण व एकत्रीकरण असे दुहेरी काम या प्रकरणामध्ये केले आहे. श्री. गोरक्षनांथाच्या वाङ्मयातील विषयांची व्याप्ती मोठी असण्याचे कारण त्यांच्या वाङ्मयाचा योग, तत्वज्ञान, व्यवहार व निरीक्षण या चारी अंगानी असणारा विस्तार, अनुभूतीच्या भक्कम आधारावर त्यांचे मानवी जीवन परीक्षण व त्याला अनुसरुन त्यांनी दिलेले संकेत, सूचना, नियम व आदेश हे सर्वच 'अंतिम निकष' या सदरातच मोडणारे आहेत नियमाना अपवाद नाही, तत्वाशी तडजोड नाही व पारमार्थिक उच्च अनुभूतीला कक्षेचे बंधन नाही अशा एका महान दार्शनिकाचे हे वाङ्मय दर्शन म्हणजे एक जीवनभाष्यच आहे. सद्गुरुदर्शनाचा व सहवासाचा परिणाम सांगताना त्यांनी जे सूत्र दिलेले आहे त्याच्या अर्थाचा अनुभव श्री. गोरक्षनांच्या अभ्यासकालाही येऊ शकेल. कारण त्यांचाच अनुभव ते सांगत असावेत.

यस्य सान्निध्यमात्रेण चिदानंदायते तनु:।।     - गोरख योग भाग १ /२

**अर्थ :** ज्यांच्या केवळ सहवासानेच हे शरीर चिदानंदमय होऊन जाते त्यांचे वाङ्मय हे प्रत्यक्ष त्यांचा सहवास देऊ शकते. अनुभूती प्रदान करु शकते.

हा जीवनाचा दुस्तर प्रवास सुखकारक व अर्थपूर्ण करुन देण्याची किमया सिध्द करुन देणारे श्री. गोरक्षनाथ हे खरे किमयागार आहेत असे अनुभवास येऊ शकते. त्यांचे वाङ्मयाचे परिशीलन करण्याचा हा प्रयत्न अशा एका वेगळया जाणिवेच्या पातळीतून करण्याचा हेतू असल्यामुळे व त्याचे कारणही वर दिल्याप्रमाणे मानवी जीवनाच्या सर्व अंगाना भिडणारे व जीवनाला अर्थ देणारे असे त्यांचे वाङ्मयाचे स्वरुप आहे, हे आहे.

योगाचे दोन प्रकार आहेत. एकाला म्हणतात 'अभावयोग'. दुसरा आहे 'महायोग'. आपण शून्य आहोत व सर्व प्रकारच्या गुणांनी रहित आहोत याला 'अभावयोग' म्हणतात व आपण आनंदपूर्ण आत्मा असून पापरहित व परमेश्वराशी अभिन्न आहोत अशा चिंतनाला 'महायोग' म्हणतात. श्री. गोरक्षनाथांचे जीवन म्हणजे या महायोगाच्या अनुभूतीची अभिव्यक्ती वाटावी अशा स्वरुपाचे असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचा केवळ वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास करणे हा माझा हेतू नाही. त्यांचे वाङमयातून मांडलेले तत्वज्ञान आणि त्यावर अधिष्ठीत जीवनदर्शन व त्यातून प्रत्ययास येणारा आदर्श या गोष्टींचा अभ्यास करणे हे माझ्या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्याशिवाय गोरक्षनाथांच्या साहित्यातून सामाजिक उत्थानाच्या चळवळीची काही एक दिशा व्यक्त झालेली दिसून येते. त्या चळवळीमागे त्यांचा हेतू कोणता होता? त्या चळवळीच्याद्वारे त्यांना नेमके काय साधायचे होते? याचाही अभ्यास करावा असा माझा हेतू आहे. या दोन हेतूंना अनुसरूनच प्रस्तुत प्रकरणाची मांडणी मी केलेली आहे.

**४) श्री. गोरक्षनाथांच्या विविध सूत्रांतर्गत विषय** (प्रमुख असे ४८ ते ५० विषय) **:**

अनिर्वचनीय ब्रम्ह, आत्मतत्व, प्रयत्नांचे महत्व, योगमार्गाचे वैशिष्ठय, चित् सहजावस्था (उन्मनी), पैगंबर महात्म्य, अनुभूतीची श्रेष्ठता, गुरुनिष्ठा (चरणमहिमा), उर्ध्वगती (ब्रम्हचर्य), समर्पण, साम्यावस्था, सत्योत्घाटन (सत्यान्वेषण) खराधर्म, अमरत्व (मरण्याची कला), तत्वग्रहण, खरे पर्यटन, योगसाधन (मुक्ति), योगी, स्वावलंबन, भिक्षान्न, आदर्श गृहस्थी, सोहंसाधना (अनाहत, ॐ), कुंडलिनी, मन व मनोधर्म, ज्ञानसाधना, सिध्दलक्षण, ज्ञानाची परमोच्च अवस्था, अवधूतलक्षण, संयम, संतसंग, विरक्तलक्षण, माया, मायाजाल, मायास्वरुप, गोरक्षमहत्ता, शब्दपांडित्य, साधकपथ्ये, कलियुग, समाधी (निजस्वरुपप्राप्ती), खरी संपत्ती, आहारविहारपथ्ये व्यसनविरोध, दमनविरोध, अंतर्मुखता, पाखंडविरोध, निष्काम कर्म, मध्य मार्ग, ब्रम्हांडी ते पिंडी इत्यादी.

श्री योगी यतींद्रनाथ जी महाराज 'गोरखवाणी और गोरखयोग' या ग्रंथाचे प्रस्तावनेत (रणधीर प्रकाशन हरिद्वार संस्कारण २००५) म्हणतात - (हिंदीचे मराठीकरण)

श्री. गोरक्षनाथांच्या परंपरेत अनेक ग्रंथांची निर्मिती झालेली आहे. नवनाथ चरित्र, गुरुगोरखनाथ चरित्रदर्शन, नाथसंप्रदाय परिचय, त्यातील कर्मकांड, स्तुती, चालिसा, गोरखतंत्र - मंत्र इत्यादी साहित्यातून नेमके गोरक्षनाथ कसे होते हे कळतेच असे नाही. ते अगम्य ज्ञानी, अष्टांग योग पारंगत, परमतत्वाचे ज्ञाते, कुंडलिनी साधक, ब्रम्हपद प्राप्त, कैवल्यानुभूतीपूर्ण असे महान योगी होते.त्यांना समजून घेण्यासाठी त्यांची ज्ञानवाणी समजून घेतली पाहिजे. सामान्य माणसाला, योग्याला, अवधूतावस्थेतील व्यक्तीलाच नव्हे तर व्यक्ती मग ती कोणत्याही धर्माची वा संप्रदायाची असो, अशा व्यक्तीला यथायोग्य मार्गदर्शन करण्याची क्षमता त्यांच्या ज्ञानवाणी सूत्रांमध्ये विद्यमान आहे. त्यादृष्टीने 'गोरखवाणी', 'गोरख योग', 'गोरखपध्दती' व 'गोरक्षनिर्वाण समाध' यामधून जी सूत्रे आहेत त्यांचे विषयवार संकलन व अर्थप्रतिपादन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्री गोरक्षनाथांनी आग्रहाने प्रतिपादलेला चिद्विलासवाद किंवा ज्याला नाथपंथात द्वैताद्वैतविलक्षणवाद म्हटले जाते तो विचार बहुचर्चित व जगत्मान्य असा असून त्यांच्या वरील तत्वज्ञानात तत्वज्ञान आणि मानवी जीवन यांच्यात फारकत आढळत नाही. भारतीय विचार परंपरेत तत्वज्ञान म्हणजेच जीवनाचे समग्र दर्शन! 'दर्शन' या शब्दात ज्ञान, कर्म, भक्ती, ध्येय, नीति अशी सर्व अंगे येतात.

श्री. गोरक्षनाथांच्या विस्तृत वाङ्मयातील विविध सूत्रे म्हणजे त्यांची ती ज्ञानवाणीच आहे. मागे नमूद केलेल्या विविध ग्रंथांमधील सूत्रांचे अवलोकन करुन त्यामध्ये आलेले विविध विषय पाहिल्यास ते वेगवेगळया विषयांना प्रमुख अशा विभागामध्ये विभागून त्यांची

मांडणी केली तर त्याचा उपयोग 'श्री. गोरक्षनाथांची ज्ञानवाणी म्हणजे एक जीवनदर्शनच आहे' या सिध्दांताचा नेमका अर्थ कळण्यासाठी होऊ शकेल असे मला वाटते.

त्यादृष्टीने

अ) नीतिविषयक, ब) ज्ञानविषयक, क) जीवनविषयक

असे वर्गीकरण मी अभ्यासासाठी समोर ठेवले आहे. तथापि ते स्थूल, संमिश्र व परस्परांना अवगुंठित करणारे आहे हे जिज्ञासूंनी ध्यानात घ्यावे.

**अ) नीतिविषयक मांडणी :**

श्री. गोरक्षनाथांच्या विविध सूत्रांमधून नीतिविषयक मांडणी कशा प्रकारची आहे हे पहात असताना श्री. गोरक्षनाथांची त्यामागची जी बैठक आहे ती नीतिशास्त्राच्या सिध्दांत स्वरुप अशा चौकटीला व्यक्त करणारी आहे का? याबाबत थोडक्यात केले जाणारे स्पष्टीकरण म्हणून महत्वाचे आहे.

१. नीतिशास्त्र हे नीतिनिर्णयाचे व त्यावर आधारित आचाराचे शास्त्र आहे.

२. मिश्र परिस्थितीत सर्व बाजूनी नैतिक दृष्टया योग्य काय व त्याचा निकष कोणता? अंतिम नैतिक आदर्श शोधणे हे समाजस्वास्थाकरिता अत्यंत आवश्य असते. त्यातूनच अंतिमत: इष्ट काय? जीवनाचे सर्वोच्च ध्येय काय असावे? या प्रश्नांची उत्तरे आपणास नीतिशास्त्राकडून मिळतात.

३. नैतिक आदर्श स्वीकारला की सदगुणांची निर्मिती होते.

४. इच्छा स्वातंत्र्य व उत्तरदायित्व हे विषयही त्यामधे येतात.

५. नैतिक जाणिवेमध्ये इच्छा, हेतु, संकल्प असे मानसिक विषय येतात.

६. कर्मविचार व नैतिक आदर्श यामधील तुलनाहि त्यात येते.

७. आध्यात्मात सर्व विश्वाचा तत्त्वविचार येतो तर नीतिशास्त्रात जीवनातील नैतिक तत्वांचा विचार येतो.

८. सद्‌गुणाचे सारसर्वस्व हे कौशल्यात नसून संकल्पात असते.

(Virtue exists only in activity and not in capacity and also essence of Virtue lies in the attitude of will and not in the possession of skill)

९. मानसशास्त्राचा विषय वर्तन हा असून नीतिशास्त्राचा विषय नौतिक तत्वांची जाणीव हा आहे. श्री. गोरक्षनाथांच्या नीतिसूत्रातून वरील मुद्दे डोकावतात का हे पहाता यावे यासाठी वरील विवेचन मांडले आहे. या विचारसरणीला समांतर असे विचार पश्चिमात्य नीतिपंडितांनीही मांडलेले दिसून येतात.

**अ) नीतिविषयक (ग्रंथ - गोरखवाणी)** पुढील आकडे सूत्रांचे आहेत.

मन व मनोधर्म : ५०, ५२, ५३, १५४, १७३, १७९, १८१, ६८, १२ (मनोलय - प्राणसंकली)

पाखंड विरोध : १९१

निष्काम कर्म : १९६, २०७

भिक्षान्न : ४३, १०९

सत्यान्वेषण : ६९, ७०, ७१, ९७, १६८,२१७, १३४

दमन विरोध : १७४

मध्यमार्ग : ३०, ३१, ३६, ६४, ७३, १४७, ३९ (गोरखज्ञान)

सामरस्य
सहजावस्था

शब्दपांडित्य : १५५, १९७, २०६,

**ब) ज्ञानविषयक (गोरखवाणी)**

वस्तुमीमांसा : ब्रम्ह, माया, आत्मा

अनिर्वचनीय ब्रम्ह : १, ३, ४, ५, ८३, ११२, १३३, १७२, १७५,१९५

आत्मतत्व : १ (गोरखज्ञान) २८ (गोरखज्ञान), २५, १९३

अमरत्व : २४२, २६, ४ (गोरखज्ञान) २५, १९३

सोहं साधना : ४६, ५४, ६१, ६२, ८१, १०७, १२५, १७८

ज्ञानसाधना : ५९, ६०, ६७, ७५, १३४, १३५,१६८,१६९,१९०

माया -मायास्वरुप: ९ (गोरखज्ञान) १७४

ब्रम्हांडी ते पिंडी : ३५ (गोरखज्ञान)

ज्ञानाची परमावस्था: ८७, ८८,८९,११६, २७ (गोरखज्ञान)

**क) जीवनविषयक**

कलियुगः १२३

स्वावलंबन :
परावलंबन : } ४०

संयम : १०३, १२४, १४६, २२८, २२९, २४२

नियम : १२६, १४१, १६५, १६६, २०९, २१४, २६१

**ड) उलटबॉसी (विशेष रचना)** (गोरखवाणी सूत्र १४५)

नीतिविषयक, ज्ञानविषयक व जीवनविषयक अशी वर्गवारी करुन त्यातील एक दोन सूत्रांचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**अ) मन व मनोधर्मासंबंधी :** गोरखवाणी मधील महत्त्वाची दोन सूत्रे :

यहु मन सकती यहु मन सीव। यहु मन पॉच तत्वका जीव।

यहु मन ले जै अुनमन रहै। तौ तीनि लोक की बातां कहै।। - गो.वाणी/५०

**अर्थ :** हे मनच शक्ती आहे व शिव पण आहे. हे मनही पाच तत्वांनी निर्माण झालेले आहे. (माया शक्तीच्या संयोगानी ब्रम्हतत्वच मनाच्या रुपानी व्यक्त होत असते). अशा मनाला जर अुन्मनावस्थेत लीन केले तर असा साधक सर्वज्ञ होतो व तीन्ही लोकांशी संपर्क करुन बोलू शकतो.

अवधू मन चंगा तो कठौती ही गंगा। बांध्या मेल्हा तौ जगत्र चेला।

बदंत गोरख सति सरुप। तत बिचारै ते रेष न रुप।। - गो. वाणी/१५४

**अर्थ :** मन जर शुध्द असेल तर गंगा आपल्या कटोऱ्यात (पात्रात) असल्याप्रमाणेच आहे. मायेच्या बंधनातून मनाला मुक्त केले तर सारे जग पायाशी येईल. गोरखची ही सत्यवाणी आहे. याचा विचार करणारा मुक्त होऊन जातो.

मनाच्या वृत्ती उर्ध्वमुखी कशा कराव्यात या संबंधीचे एक सूत्र.

मन मुषि जाता गुरमुषि लेहु, लोही मांस अगनि मुषि देहू।

मात पिता की मेटौ धात, ऐसा होई बुलावे नाथ।। - गो. वाणी/१८१

**अर्थ :** मनाचा बाहेरचा प्रवाह गुरुकडे वळवा. रक्तमास ब्रम्हाग्नीच्या अग्नीत समर्पित करा. आई-वडिलांच्या धातू (रज) ला पूर्णविराम द्या. असे केले तर स्वत: नाथ त्याला आपल्याकडे बोलावतील.

अशाप्रकारच्या अंतर्मुख साधनेच्या प्रयत्नात असताना साधकाने सर्व प्रकारचा ढोंगीपणा वर्ज्य केला पाहिजे. कारण त्यातून साधक स्वत:चीच फसवणूक करुन घेत राहील. श्री. गोरक्षनाथांची सर्व शिकवण ही स्वच्छ नेमकी व बाहय जगतच अंतरविश्वात अनुभवण्याची साधना असलेमुळे त्यात १००टक्के शुध्दता व पूर्ण गुरुशरणता असे विषय येतात. त्यासाठी ''पाखंड'' वृत्तीला तीव्र विरोध त्यांच्या शिकवणुकीत आहे. त्यासंबंधी सूत्र:

**पाखंड विरोध -**

सांग का पूरा ग्यान का ऊरा, पेट का तूरा डिंभ का सूरा।

बदंत गोरखनाथ न पायाजोग, करि पाषंड रिझाया लोग। - गो.वाणी/१९१

**अर्थ :** सोंग करण्यात पटाईत, ज्ञानात अर्धवट, मोठया पोटाचा खादाड, दंभात रमणारा असे लोक लोकांना गुंगवण्यासाठी हे सर्व करत राहतात. पण अशांना 'योग'कधीच प्राप्त होत नाही. अशा पाखंडाविषयी संत तुकाराम महाराजांचा खालील अभंग याच अर्थाचा आहे.

मुखे बोले ब्रम्हज्ञान। मनीधन अभिमान। ऐशियाची करी सेवा।
काय सुख होय जीवा। पोटासाठी संत। झाले कलीत बहुत।
विरला ऐसा कोणी। तुका त्यासी लोटांगणी। - तु.गाथा २९३

**निष्काम कर्म -**

नीतिशास्त्रामध्ये निष्काम कर्मयोगसाधनेला मध्यवर्ती महत्व व स्थान आहे असे म्हणणे संयुक्तिक होईल. कर्मचिकित्सेत नीति आपोआप स्पष्ट होते. नीतिशास्त्र म्हणजे नीतिनिर्णयाचे शास्त्र आहे. शुध्द आचार की जो बंधन ठरत नाही तर तो स्वेच्छेने स्वीकृत असतो. त्याचे विवरण श्री. गोरक्षनाथांनी त्यांच्या सूत्रांमधून केलेले आहे.

जहां गोरष तहाँ ग्यांन गरीबी, दुंद बाद नही कोई।
निसप्रेही निरदावै षेलै, गोरष कहीयै सोई।। - गो. वाणी/१९६

**अर्थ :** जिथे गोरख आहे तिथे ज्ञान नम्र होऊन रहाते, द्वंद्व नाही वाद नाही. कोणतीही कामना नाही, आग्रह नाही, असा योगी हवा, की जो निष्काम कर्मयोगी असेल.

पुढील एका सूत्रामध्ये श्री गोरक्षनाथांची जी शब्दरचना आहे ते सूत्र म्हणजे नैष्कर्म्य अवस्थेचेच वर्णन असून ती अवस्था म्हणजे निष्काम कर्म योगाची परिपक्व अवस्था होय. याच अवस्थेचे वर्णन समत्वयोग, बुध्दियोग, कर्मयोग, तदर्थकर्म, मदर्थकर्म, मत्कर्म इत्यादी नावानी भगवद्‌गीतेमध्ये केलेले आहे.[५] (संदर्भ : श्री. भगवद्‌गीता, पान ७१)

आता गोरक्षनाथ काय म्हणतात ते पाहू.

महमां धरि महमां कूं मेटै, सति का सबद बिचारी।
नांन्हां होय जिनि सदगुरु षोज्या, तिन सिर की पोट अुतारी।।
- गो.वाणी/२०७

**अर्थ :** श्रेष्ठ असूनही जे स्वत:ला तसे समजत नाहीत. अंतिम सत्याचे विचारात स्थिर असतात. लहान होऊन सदगुरुंच्या शोधात व शब्दात असतात अशा व्यक्तींचे कर्माचे ओझे उतरले जाते.

**भिक्षान्न -**

कर्ममुक्ती म्हणजेच निष्काम कर्म अशा प्रकारच्या कर्म अवस्थेसाठी एका असाधारण कर्माची महती श्री. गोरक्षनाथ त्यांच्या एका सूत्रात सांगताहेत. ती महती सांगताना भारतीय संस्कृतीतील एक विशेष कर्मप्रकार ते सांगत असून त्याचे नांव आहे, 'भिक्षा'.

भिक्षा मागून निरिच्छ योग्यांनी आपली दुपारची व्यवस्था लावावी. या भिक्षान्नाचे गुणवैशिष्ट्य व त्यामधून जोपासली जाणारी योग्याची निरिच्छवृत्ती त्याचे वैशिष्ठयासह श्री. गोरक्षनाथ खालील सूत्रात सांगताहेत.

धूतारा ते जे धूतै आपा, भिष्या भोजन नही संताप।

अहूठ पटण मैं भिष्या करै, ते अवधू सिवपुरी संचरै।। - गो.वाणी/४३

**अर्थ :** योगी धूर्तपणा कशात करतो? तर तो अहंकारालाच फसवतो. भिक्षा मागताना त्यामुळे (मी - पणा नसल्यामुळे) त्रास, संताप होत नाही. सिध्द योगी पोटासाठी बाहेरच्या जगात जसे भिक्षा मागतात त्याचप्रमाणे धूर्तपणे शरीरातही भिक्षेची कृती तो करतो ज्यातून त्याचा शिवलोकाशी म्हणजे ब्रम्हरंध्रापर्यंत संचार होत रहातो. भिक्षामहिमा सांगणारे आणखी एक सूत्र महत्वाचे आहे. ही सूत्रे कर्ममुक्तीशी संबंधित असल्यामुळे महत्त्वाची वाटतात.

भिष्या हमारी कामधेनि बोलिये, संसार हमारी वाडी।

गुर परसादै भिष्या षाइबा, अंतकालि न होइगी भारी।। - गो. वाणी/१०९

**अर्थ :** भिक्षा हीच आमची कामधेनू आहे, व संसार हेच आमचे शेतीक्षेत्र आहें. भिक्षान्न गुरूपसाद म्हणून खाल्ले तर अंतकाली कर्माचे दडपण रहणार नाही.

वरील विषय चिंतनाचे दृष्टीने खूपच विस्तृत होऊ शकतो. त्याविषयी नीतिविषयक सर्व सूत्रांच्या संबंधित अशा विवेचनात हा विषय विचारात घेतला आहे.

**सत्यान्वेशण -**

सत्यान्वेषण म्हणजे सत्याचा शोध. याचा व नीतिशास्त्राचा संबंध कसा हेहि स्पष्ट व्हायला पाहिजे. नैतिक शास्त्रात नैतिक तत्वांचा विचार होतो. या सर्व गोष्टी व्यक्ती व समाज यांचे संबंधात विचारात घेतल्या जातात. जीवनामध्ये जेव्हा विचित्र परिस्थिती निर्माण होते तेव्हा सर्व बाजूनी नैतिक म्हणजे काय, योग्य काय व त्याचा निकष कोणता धरायचा? असे प्रश्न निर्माण होतात. फक्त व्यक्तीची सोय का सामाजिक स्वास्थ? अशावेळी अंतिम नैतिक निकष शोधावा लागतो. त्यातूनच योग्य, इष्ट व सर्वोच्च ध्येय अशा टप्प्याने जेव्हा त्याचा विचार करायचा असतो तेव्हा योगशास्त्र व योगी (साधक) यांच्यासाठी अंतीम इष्ट काय? या बाबतीत सत्याची मांडणी, त्याचा शोध या बाबतीत श्री.गोरक्षनाथ काय म्हणतात हे पहायचे आहे.

हा विषय जसा 'नीतिविषयक' या सदरात येतो तसा तो 'ज्ञानविषयक' या सदरात पण येतो. 'गोरखवाणी' मध्ये या विषयाला खालील सूत्रांमधून व्यक्त केले गेले आहे. त्यातील काही सूत्रे नीतिविषयक दृष्टीकोन स्पष्ट होण्यासाठी म्हणून या पहिल्या भागात आहेत व काही सूत्रे ज्ञानविषयक भागात आहेत.

त्या आदिशक्तीचे स्वरुप कसे आहे? त्याबाबतचे सूत्र -

प्यंडे होइ तौ मरै न कोई, ब्रम्हंडे देषै सब लोई।

प्यंड ब्रम्हंड निरंतर बास, भणंत गोरष मच्छ्यंद्र का दास।। - गो.वाणी/७१

**अर्थ :** शरिरातच जर परमात्मा सतत असेल तर कुणी मरणारच नाही. ब्रम्हांडात असेल तर सर्वाना दिसला पाहिजे. म्हणून मत्स्येंद्र शिष्य गोरख म्हणताहेत की या सर्वाच्या पलिकडे ते परमतत्व आहे.

**दमनविरोध :**

श्री. गोरक्षनाथांनी वासनांच्या दमनाला विरोध केला आहे. आणि हे मानसशास्त्राला धरुनच आहे. दमन ही अवस्था कृत्रीम होते. स्वाभाविक स्वरुपात वृत्तीचे उन्नयन व परिवर्तन हे अभ्यास, वैराग्य व गुरुशरणता यानेच होऊ शकते. त्याचे सूत्र खालीलप्रमाणे आहे.

दाबि न मारिबा षाली न राषिबा जांनिबा अगनिका भेवं।

बूढी ही थै गुरबानी होइगी, सति सति भाषंत श्री गोरषदेवं।। - गो.वाणी सूत्र १७४

**अर्थः** मनाला दाबून मारायचे पण नाही व मोकळ पण सोडायचे नाही. योगाग्नी म्हणजे काय हे जाणून घ्यायला हवे. म्हणजे अनंत काळातून चालत आलेली ही माया (म्हणून ती म्हातारी) जी सर्वांना बंधनात घालते तीच मुक्त करणारी होते. हे गोरखचे सत्य सत्य वचन आहे. मायेचे द्विमुखी कार्य या ठिकाणी स्पष्ट होत असल्यामुळे हे अत्यंत महत्त्वाचे असे सूत्र आहे.

वरील वचने अशी आहेत की त्याचा अर्थबोध व्यापक रुपानेही घेता येतो. आता वरील दमनविरोधी सूत्रामध्ये मायेचे विद्यात्मक रुप व अविद्यात्मकरुप असून एकातून उध्दार होतो तर एकातून बंधन निर्माण होते. हा विषय गोरक्षसूत्रांमधील वस्तुमीमांसा (metaphysics) मध्येही येतो. ब्रम्ह, माया, आत्मतत्व, अमरत्व, सोहं साधना, ब्रम्हांड - पिंड-स्वरुप इत्यादी अनेक विषय वस्तुमीमांसेमध्ये येतात की ज्यातून गोरक्षतत्वज्ञान हे ‘दर्शन’ स्वरुपात भारतीय संस्कृतीत का मानले जाते हे स्पष्ट होते.

यादृष्टीने प्रत्येक विषयाचे नमुन्यादाखल एक किंवा आवश्यक तिथे दोन सूत्रे घेऊन हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**मध्यमार्ग, सामरस्य व सहजावस्था :**

नीतिविषयक विचारांचा विस्तार करताना श्री. गोरक्षनाथांची जी सूत्रे जीवनातील सर्वसमावेशक संतुलनासाठी मध्यमार्ग, सामरस्य योग व सहजावस्था यांची मांडणी करतात त्यांचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे आहे.

मध्यमार्गाचा आग्रह धरणारी गोरखवाणीमधील सूत्रे (संतुलन) क्र. ३०, ३१, ३६, ६४, ७३, १४७, ३९ (गोरखज्ञान) अशी आहेत. त्यातील उदा. दाखल काही सूत्रे:

स्वामी बनषंडि जाऊं तो बुध्या व्यापै नग्री जाऊं त माया।

भरि भरि षांउं त बिंद बियापै क्यों सीझति जल ब्यंद की काया।।

- गोरखवाणी/३०

**अर्थ :** हे स्वामी! अरण्यात गेला की भूक सतावते. शहरात गेलो की मायेच्या वेढयात अडकतो. जास्त खाल्ले की कामवासना वाढते. मग हे शुक्र धातूपासून बनलेले शरीर कसे सिध्द (सीझति) करावे?

हबकि न बोलिबा ठबकि न चालिबा धीरै धरिबा पावं ।

गरब न करिबा सहजै रहिबा भणत गोरषरावं।। - गो.वाणी/२७

**अर्थ :** बोलणे, चालणे मर्यादेत व सावकाश करा. गर्व न करता सहज भावात रहा. असा उपदेश श्री.गोरक्षनाथ करताहेत अशा प्रकारची मध्यमार्ग, संतुलन, सहजावस्था किंवा साम्यावस्था स्पष्ट करणारी अनेक सूत्रे श्री. गोरक्षनाथानी सांगितली आहेत. उदा. स्वरूप एक सूत्र -

लौ लष पातरि आगै नाचै पीछै सहज अषाडा।

ऐ सै मन लै जोगी षेलै तव अंतरि बसे भँडारा।। - गोरखज्ञान/ ३९

**अर्थ :** ९ लाख पुतळया समोर नाचताहेत व मागे सहजज्ञान व वैराग्याचा आखाडा अशा परिस्थितीत योग्याने दोन्हीच्या मध्ये स्थिर असायला हवे. म्हणजेच मध्यमार्ग, म्हणजेच साम्यावस्था, संतुलन! गोरखपरंपरेतील श्री ज्ञानेश्वरांनीही हाच विषय महत्त्वाचा मानला आहे.

श्री. ज्ञानेश्वर महाराजांच्या हरिपाठामध्ये या सहजावस्थेचे वेचक विवेचन मिळते.

समाधी हरीची समसुखेंविण। न साधेल जाण द्वैतबुध्दी।। - अभंग १३/१

**अर्थ :** भगवंत स्वत:तच रमतात. अशी एकतानता साधली नाही तर वेगळेपण रहाते. द्वैतबुद्धीतून अद्वैतबुद्धीत समरस झाल्याखेरीज समाधी साधत नाही.

**शब्दपांडित्य -**

पंडित ग्यांनी षड तर बोलै, सति का सबद उछेदै।

काया कै बलि करडा बोले, भीतरि तत्त न भेदे।। (२०६)

**अर्थ :** अर्धवट ज्ञानी मनुष्य खऱ्या खोट्याचा विचार न करता 'सत्य' या शब्दालाच अव्हेरल्यामुळे मूलभूत तत्त्वापासून तो दूर जातो. शरिरालाच सर्व काही समजल्यामुळे व ज्ञान होऊ न शकल्यामुळे शरिराच्या जोरावर कठोर भाषाच बोलली जात राहते.

**ब) ज्ञानविषयक :**

**वस्तुमीमांसा (metaphysics)** -

च्या सदरामध्ये ब्रम्ह, आत्मतत्व, अमरत्व, ज्ञानसाधना, सोहं व ॐ साधना, माया-त्याचे स्वरुप, ब्रम्हांडी ते पिंडी, ज्ञानाची परमावस्था अशा वेगवेगळया दृष्टीकोनातून श्री.गोरक्षनाथांनी त्यांचे तत्वज्ञान मांडलेले आहे. त्याचा परामर्ष पुढीलप्रमाणे पाहता येतो.

**अनिर्वचनीय ब्रम्ह -**

बसति न सून्यं सून्यं न बसति अगम अगोचर ऐसा।

गगन सिषर महि बालक बोलै ताका नाँव धरहुगे कैसा।। -गोरखवाणी/१

**अर्थ :** परब्रम्ह तत्व हे अगम्य आहे. तिथपर्यंत कोणी पोचू शकत नाही. ते तत्व अगोचर आहे. भाव-अभाव, सत-असत च्या पलिकडे 'उभयपर' असे ते आहे. ब्रम्हरंध्रात बालभावात परमात्मा शुध्द स्वरुपात असतो. त्याला काय नावाने संबोधायचे? आणखी एक सूत्र:

अलश बिनांणी दोइ दीपक रचिलै तीन भवन इक जोती।

तास बिचारत त्रिभवन सुझै चुणिल्यो माणिक मोती।। -गोरखवाणी/५

**अर्थ :** अक्षर ब्रम्हाने दोन दिवे (व्यक्त व अव्यक्त) व तिन्ही लोकाची निर्मिती केली. त्या दिव्याचा (दिव्य प्रकाशाचा) विचार केला तर तीन लोक म्हणजे काय समजू शकेल. अशा वेळी हंस स्वरुप आत्मा ज्ञानरुप मोती खाऊ लागतो व त्यास कैवल्यानुभूती प्राप्त होते.

नमुन्यादाखल काही सूत्रे :

पाथर मै पारस अबिनासी ज्यू असट धात मै सोनां।

यूं सब जुग मांहि समझि अबिनासी, ता घटि पाप न पूनां।। - गोरखज्ञान/२८

**अर्थ :** ज्याप्रमाणे दगडामध्ये अविनाशी पारसमणी असतो किंवा ८ धातूंमध्ये सोने असते तशा प्रकारे या सर्व दृकसंसारामध्ये सर्वत्र अविनाशी परब्रम्हच आहे. या ज्ञानाचा जेव्हां अनुभव येतो त्या शरिरात पाप -पुण्य हे विषयच रहात नाहीत.

सप्त दीप नवखंड ब्रम्हंडा, धरती आकाश देवा रविचंदा।

तजिबा तिहूँ लोक निवासा, तहाँ निरंजन जोति प्रकासा।। - गो. प्राणसंकली/३

**अर्थ :** सप्त, द्वीप,९ खंड सर्व ब्रम्हांड आकाशातले देव, चंद्र सूर्य असा बाहेरचा सर्व शोध सोडा. बाजूला ठेवा. अंतर्मुख व्हा, निर्वाण पदाचा शोध हा शरिरातच केला पाहिजे. तिथेच निरंजन ब्रम्ह प्रकाशमान आहे. तिथे काळाचाही स्पर्श नाही.

गोरखप्राणसंकली मधील हे सूत्र अत्यंत महत्वाचे आहे. मानवाचे दैहिक माध्यमच सर्व जगतरहस्याचे भांडार असून त्या माध्यमातूनच अंतिम मोक्षप्राप्ती होते. त्यासाठीच प्रणवोपासना व अंतर्मुखता! जगतप्रपंच ही चैतन्याचीच परिव्याप्ती आहे ही धारणा व हा अद्वैतानुभवाचा आनंद घेण्यासाठी सिध्दसंगती व अंतिमोत्तर ठरणारा सद्‌गुरुंचा सिध्दशब्द हाच नाथसंप्रदायातला शक्तिपातसिध्दांत आहे असा या सूत्रांचा अर्थ निघतो.

सर्व परमार्थ तत्वज्ञानाचे सार काढायचे म्हटले तर ते ब्रम्हभावैक्य अनुभूती हेच निघेल. याबाबत 'गोरख सप्तश्लोकी गीता' मध्ये म्हटले आहे :

वेदा न लोका न सुरा न यज्ञा वर्णाश्रमो न एव कुलं न जाति।

न धूम्र मार्गो न च दीप्त मार्गो ब्रम्हैक रुपं परमार्थ तत्वम्।। - गोरखगीता - १

**अर्थ :** वेदशास्त्र, सप्तलोक, यज्ञव्यवस्था, वर्णव्यवस्था, कुल व जातिपरंपरा व श्रेष्ठता, पूर्वमार्ग वा पश्चिममार्ग असे योगसिध्दीचे मार्ग या पलिकडे असे हे परमार्थ तत्व आहे व ते म्हणजे अनिर्वचनीय परब्रम्ह तत्व! श्री भगवान शिव व मुनिश्रेष्ठ वामदेवजी यांचेमधील एक संवाद महायोगी श्री.गोरक्षनाथ रचित 'अमनस्क योग' या दुर्मिळ व पुरातन ग्रंथात असून ब्रम्ह या परम तत्वाबद्दलचे उल्लेख खालीलप्रमाणे आहेत.

अनाकारं अविच्छिन्नं अग्राह्यं अचलं ध्रुवम्।

सर्वोपाधिविनिमुक्तं सर्वकाम विवर्जितम्।। - अमनस्क योग श्लोक २५ (पूर्वार्ध)

**अर्थ :** ते परमतत्व निराकार, अविच्छिन्न म्हणजे जन्म व मरण याची बाधा नसलेले, मन आणि वाणी यांना अगम्य, निश्चल, सर्व उपाधीपासून मुक्त असे ते तत्व आहे.

**आत्मतत्त्व -**

'महार्थमंजरी' हा श्री. गोरक्षनाथांचा आणखी एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. यामध्ये ७१ श्लोक (गाथा) आहेत. महेश्वरानंद असेही नांव लेखकाचे म्हणून उधृत केले गेलेले दिसते. पण महेश्वरानंद म्हणजेच श्री.गोरक्षनाथ असा स्पष्ट निर्देश गोरखनाथमंदीर प्रकाशन ग्रंथामध्ये गोरक्षपीठाधीश्वर महंत श्री अवेद्यनाथ यांनी आशिर्वचन प्रस्तावनेमध्ये पान ११ वर दिला आहे. हा ग्रंथ म्हणजे सर्व योगजगतास मिळालेली दार्शनिक देणगीच आहे.[६] (संदर्भ - प्रस्तावना, प्रस्तुत ग्रंथ पान ४६) हा ग्रंथ महायोग ज्ञानतत्वरुप असून त्यात परमार्थ तत्वाचा अनुभवरस चाखायला मिळतो. हा विश्वविलास हाच परमात्म्याचा प्रकाश आहे. हाच सिद्धांत त्यात प्रस्थापित केला आहे.

आत्मा खलु विश्वमूलं तत्र प्रमाणं न कोप्यर्थयते।

कस्य वा भवति पिपासा गंगास्त्रोतसि निमग्नस्य।। - म.मंजरि गाथा क्र. ३

**अर्थः** आत्मतत्वच सर्व विश्वाचे मूळ कारण आहे. त्याला प्रमाणाची आवश्यकता नाही. गंगेच्या धारेत जे प्राणी असतात त्यांना तहान लागल्यावर वेगळे काही करावे लागत नाही. गंगेच्या धारेतील प्राण्यांप्रमाणे हा विश्वविलास परमात्म्यामध्ये सहजपणे स्थित आहे. ही सद्वस्तूमीमांसाच असून परमशिव तत्व सर्वत्र सर्वव्यापक रुपाने असून सर्व विश्व शिवमय आहे. हेच महार्थ मंजरीस्थित महायोगविज्ञान असून परमात्मरसातून ब्रम्ह प्रकाश अनुभवणे व या परमात्म - प्रकाशाची सत्ता सृष्टीमध्ये कशी विद्यमान आहे याचा ज्ञानानुभव घेणे हे महार्थमंजरीचे उद्दिष्ट आहे. हा अनुभवाचा ज्ञानाग्नि सर्व कर्माना भस्म करतो व साधक मुक्त होतो. भगवद्गीतेतील खालील वचन त्यासाठी आधारभूत आहे.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुतेर्जुन।।                - गीता - ४/३७.

**अर्थ :** हे अर्जुना! ज्ञानाग्नि सर्व कर्मांना भस्म करतो.

**अमरत्व -**

अमरत्व (Immortality) हा विषय श्री.गोरक्षनाथांच्या बऱ्याच सूत्रांमधून आलेला आहे. त्याचा म्हणजे अमरत्वाचा नेमका अर्थ काय? पंचभौतिक शरिरास असे अमरत्व शक्य आहे काय? श्री.गोरक्षनाथांना काय अर्थ अभिप्रेत आहे?

त्यासंबंधीचे श्री. गोरक्षनाथांचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

मरौ वे जोगी मरौ मरौ मरण है मीठा।

तिस मरणीं मरौ जिस मरणीं गोरष मरि दीठा।।            - गोरखवाणी/२६

**अर्थ :** हे योगियांनो मरा पण मरण गोड असते हे अनुभवून मरा. गोरक्ष ज्याप्रमाणे मरण गोड करुन मेला त्याप्रमाणे मरा.

**सूक्ष्मार्थ :** मरण हे गोड व्हायला हवे. एक मरण असे असते की ज्यामध्ये परतत्वाचे दर्शन होते. अशा वेळी ही जीवनमुक्तावस्था म्हणजे मृत्यूच असतो. गोरखनाथ म्हणतात की मी त्या प्रकारे मृत्यू गोड केला.

आणखी एक सूत्र:

गोरष कहै हमारा षडतर पंथ, जिभ्या इंद्री दीजै बंध।

लोग जुगती मै रहै समाय, ता लोगी कूं काल न षाय।।   - गोरखवाणी/२२१

**अर्थ :** श्री गोरक्षनाथ म्हणताहेत की आमचा पंथ खडतर आहे. जीभ व सर्व इंद्रियांना बंधनात ठेवावे लागते. जे लोक या युक्तीत राहू शकतात अशांना काळ सुध्दा खाऊ शकत नाही.

वरील सूत्रांमधून हे स्पष्ट होते की हे अमरत्व म्हणजे आत्म्याच्या नित्यमुक्त अवस्थेचा अनुभव व त्यानंतरचे निष्काम असे उपकारक व साक्षी अवस्थेतले जीवन ही जीवनाची परम प्रकाशरुप अशी मोक्षावस्था असते.

वरील 'अमरत्व' या संकल्पनेविषयी श्री गोरक्षनाथांच्या ''अमनस्क योग'' यामध्ये एक महत्वाचा संदर्भ आहे.[७] (संदर्भ : 'अमनस्क योग' पान २० व २२)

तारक योग किंवा समनस्क योग व विमनस्क योग किंवा अमनस्क योग या विषयी विवेचनात्मक जे श्लोक आहेत त्यामधील एक महत्वाच्या संदर्भाची नोंद करावी वाटते.

पुष्पात् प्रकाशते यद्वत् फलं पुष्पविघातकम्।

देहात् प्रकाशते तत्वम् तत्वं देह विनाशकम्।।   - श्लोक १७ उत्तरार्ध भाग २

**अर्थ :** फुलापासून जसे फळ प्रगट होते पण त्याचबरोबर फुलाचा नाश होतो त्याप्रमाणे देहातून तत्व प्रगट होते पण देहाचा नाश होतो.

इथेही लक्ष्यार्थच घेतला पाहिजे. तत्व प्रगट होऊन साक्षात्कारी अवस्थेतील सिध्द महात्मे नंतर जिवंत राहून समाज-अभिमुख होऊन रहात होतेच. देहाचा नाश म्हणजे देहजाणिवेचा नाश असाच अर्थ घेणे योग्य होईल.

वरील विषयाचे संदर्भात श्री गोरक्षनाथांच्या इतर ग्रंथांमध्येही थोड्या फार फरकाने पण तोच विषय मांडणारे उल्लेख आलेले आहेत.

उदा. 'गोरक्षशतक' (इंग्रजी) श्लोक ९८ व १०१व गोरक्षपध्दती श्लोक ८९

गोरखनाथ मंदीर गोरखपूर प्रकाशन 'गोरखबानी' मध्ये वरील विषयासंबंधीचा उल्लेख

''जीवात्माको शिवमे निवास करना चाहिये। चौदहो भुवनों, ब्रम्हांडोका प्राण परब्रम्ह परमेश्वर है। वही चैतन्यघन सर्वत्र विद्यमान है। इसतरह जीव और शिव की एकता हो जाने पर मृत्यू का भय समाप्त हो जाता है। पवन प्राण को सुषुम्ना के मार्ग से उध्वमुख कर, ब्रम्हरंध्र, सहस्त्रार, शून्य गगन, अंबर का निर्मल स्वरुप प्रकाशित करना चाहिए।।''[८]

(सं. गोरखबानी पान १२०)

**सोहंसाधना -**

आता सोहं साधना व ज्ञानसाधनेच्या संबंधातील सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत:

गोरखवाणीमधील सोहं साधना: सूत्र क्र. ४६, ५४, ६१, ६२, ८१, १०७, १२५, १७८.

गोरखवाणीमधील ज्ञानसाधना: सूत्र क्र. ५९, ६०, ६७, ७५, १३४, १३५, १६८, १६९, १९०.

गोरखज्ञानमधील - ज्ञानसाधना सूत्र क्र. १

सोहं साधनेमध्ये नादानुसंधान व प्रणव उपासनाही अंतर्भूत होऊ शकते. कारण या साधना नादाच्या धारणेशी निगडित आहेत.

या विषयाच्या स्पष्टीकरणार्थ:

गोरक्षसिध्दांत संग्रहमध्ये :- नादानुसंधानसे राजयोगकी प्राप्ती (पान ८८) प्रणव महिमा (पान ११२) ॐ महिमा (पान १३५) 'अमरौघप्रबोध' ग्रंथातील श्लोक ४५ ते ५३ मध्ये नादाच्या अवस्था दिल्या आहेत.

महार्थमंजरी ग्रंथामध्ये :- गाथा ५६ सोहं स्थितीचे महत्व विशद करते.

गोरखबानी मध्ये ग्यान चौतीसा पान २३४वर 'नादा' बद्दल ची सूत्रे आहेत.

गोरक्षशतक मध्ये :- (हिंदी संस्करण गोरखनाथ मंदीर गोरखपूर) सूत्र ४४ ते ४६ पान ९ व १०.
गोरक्षसंहितेमध्ये :- (हिंदी संस्करण संस्कृती संस्थान - बरेली) पान ७०-७१
योगबीजमध्ये :- श्लोक १४४ व १४५

'सिध्दसिध्दांतपध्दति' या ग्रंथात अनादि पिंडापासून आद्यपिंडाची उत्पत्ती होत असताना 'ते मी आहे' या सोहं भावाची उत्पत्ती कशी होते याचे विवरण दिलेले आहे.
आता क्रमाने प्रत्येकाची नमुन्यादाखल १ किंवा २ सूत्रे घेऊ.
सोहंसाधना :-

अमरा निरमल पाप न पुंनि। सत रज बिबरजित सुंनि।
सोहं हंसा सुमिरै सबद। तिहि परमारथ अनंत सिध।। - गोरखवाणी सूत्र ४६

**अर्थ :** जो अमर आहे, निर्मल आहे, पाप-पुण्य विवर्जित आहे, सत-रज-तम या त्रिगुणापासून दूर आहे. सोहं -हंसा या शब्दाचे नित्य स्मरण करतो, त्याला अनंत परमार्थ सिध्द होतो.

सुसबदे हीरा बेधिलै अवधू जिभ्या करि टकसाल।
औगुंन मध्ये गुंन करिलै तौ चेला सकल संसार।। - गोरखवाणी/६१

**अर्थ :** जिभेची टंकसाळ करुन (सतत असा अर्थ ) अभेद्य परमतत्वरुप हिऱ्याचा सु-शब्दाने म्हणजे सोहं-हंसा जपाने वेध कर. अशा प्रकारे अवगुणांचा गर्दीत गुणांची निर्मिती कर. असे झाले तर सर्व संसार तुमच्या पायाशी येईल (चेला होईल)
गोरक्षसिध्दांतसंग्रह मधील नादानुसंधान :-

अस्तु वा मास्तु वा मुक्तिरत्रैवाखंडित महत्।
लयामृतं इदम् (लयोभ्दवमिदं) सौख्यं राजयोगादवप्यते।। - हटयोगप्रदीपिका ४/७८

**अर्थ :** साधनांच्या द्वारा मुक्ति मिळो वा न मिळो पण या नादानुसंधानातच अखंडसुख आहे. असे हे अमृतस्वरुप सुख राजयोगांतर्गत पण आहे.

याच संबंधात 'ॐ' महिमा बाबत गोरक्षसिध्दांत संग्रहमध्ये:
अद्वैतोपरिवर्तिनाथ उदितो यत्र ध्वनि: संततो
नाथो बिंदुरुतापि शक्तिरुदिता सा चार्ध्दमात्रात्मिका।। - गो.सि.सं.सूत्र पान १३५.

**अर्थ :** जिथे निरंतर ॐ रुपापेक्षाही सूक्ष्मातिसूक्ष्म अनाहत ध्वनी होतो आहे तेथे अैद्वैतावस्थेच्या पलिकडील परमपदामध्ये महानाथ विद्यमान असतात.
'अमरौघ प्रबोधात':-

ब्रम्हग्रन्थेर्भवेद वेधात् आनंदानुभव: स्वयम्।
विचित्र क्वणको देहे अनाहत: श्रूयते ध्वनि:।। - अ.प्र:- सूत्र ४६

**अर्थ :** ब्रम्हग्रंथीचा वेधामुळे आनंद उत्पन्न होतो व विचित्र प्रकारचा अनाहत ध्वनि कानात ऐकू येऊ लागतो.

'महार्थमंजरी' ग्रंथामध्ये :-

यदि निजहृदयोल्हासं निर्णेतुं नित्यनिष्कलमिच्छा।

मध्य तुटि स्त्रुटितव्यास्त्रं यतो: सोमसूर्ययो:।। - म.मं. सूत्र ५६

**अर्थ :** जर आपल्या हृदयात नित्य व मायारहित उल्हासाची इच्छा असेल तर 'स' व 'ह' (पूरक व रेचक करताना होणारा ध्वनि) मधील स्थिती विसर्जित केली गेली तर त्यावेळी सोहं स्थितीतील आत्मतत्वाचा बोध होतो.

'गोरखबानी' मध्ये :-

आदिनाथदि पारब्रम्ह ॐ सिव सकती।

नाद बिदं लोकाया उतपति।

नाद बिंद रुपी बोलिये ॐ कार।। - ग्यान चौतीसा पान २३४

**अर्थ :** आदिनाथ परमेश्वरच ॐ रुप आहे. अनादि ब्रम्हात भुवनत्रयाची स्थापना म्हणजेच त्या अलखनिरंजन आदिनाथाचे रुप आहे.

गोरक्षशतक व गोरक्षसंहिते मध्ये :-

हंसात्ममालिका वर्णब्रम्हकाल प्रचोदिता।

परमात्मा पुमनिति ब्रम्हसंपत्तिकारिणी।।

- पाशुपत ब्रम्होपनिषद् (गोरक्षसंहिता पान ४५)

अजपा नाम गायत्री योगिनां मोक्षदायिनी ।

अस्या: संकल्पमात्रेण सर्व पापै: प्रमुच्चते।।

-गोरक्षपध्दति - श्लोक ४२/४४, गोरक्षसंहिता ४३, गोरक्षशतक- ४४

**अर्थ :** १) 'हंस:' चा जपच वर्णब्रम्ह आहे. याच्या मार्गानेच ब्रम्हाची प्राप्ति होते. हा परमात्मा आहे व पुरुष पण आहे.

**अर्थ :** २) 'अजपा' गायत्री योगीलोकांना मोक्ष देते. त्याच्या संकल्पानीच सर्व पापांचा नाश होतो.

३) त्रय: काल:, त्रय: वेद:, त्रय: लोक:, त्रय:स्वरा:।

त्रयो देवा:स्थिता यत्र तत् परं ज्योतिरोमिति।। - गो.सं. सूत्र ८४.

**अर्थ :** त्या ॐ मध्ये तीन काळ, तीन वेद, तीन लोक, तीन स्वर, व तीन देवता स्थिर आहेत. ते ज्योतिस्वरुप आहे. .

योगबीज''मध्ये :-

हकारेण बहिर्याति सकारेण विशेन्मुरुत्।

हंसहंसेति मंत्रोयं सर्वजीवा जपंति तम्।। - यो.बीज श्लोक १४४

**अर्थ :** 'ह' असा आवाज करत प्राणवायू बाहेर जातो व 'स' असा आवाज करत वायू आत प्रवेश करतो. हंस हंस असा गायत्रीचा जप सर्व जीव नेहमी करत असतात.

याचा पुढचा श्लोक महत्वाचा आहे.

गुरुवाक्यात् सुषुम्णायां विपरीतो भवेज्जप:।

सोहं हंस: अहम् इति प्राप्तो मंत्रयोग: स उच्चते।। - यो.बीज श्लोक १४

**अर्थ:** गुरुकृपा झाली की 'हंस' हा मंत्रजप सोहं सोहं असा होतो. यालाच महायोगांतर्गत मंत्रयोग म्हणतात.

'सिध्दसिध्दांतपध्दति' ग्रंथात :-

अनाद्य पिंड से आद्य पिंड पुरुष की उत्पत्ती मधील सूत्र:

अनाद्यात् परमानंद : परमानंदात् प्रबोध: प्रबोधात् चिदुदय:

चिदुदयात् चित्प्रकाश: चित् प्रकाशात् सोहंभाव: - सि.सिं.प./२५

**अर्थ:** अनादि पिंडापासून परमानंद, त्यापासून प्रबोध, त्यापासून चिदुदय, त्यापासून चितप्रकाश व त्यापासून सोहंभाव म्हणजे 'तो मी आहे' हा भाव अभिव्यक्त होतो.

**ज्ञानसाधना -**

पढि देखि पंडिता रहि देषि सारं, अपणी करणी उतरिबा पारं।

बदंत गोरषनाथ कहि धू साषी, घटि घटि दीपक बलै षणि पसू न पेषे आंषी।।

- गोरखबाणी/६०

**अर्थ:** हे पंडितानो तुम्ही जे ज्ञान शिकलात ते प्रत्यक्ष जगून पहा. शिकलेल्यानी साधना पण केली पाहिजे. संसार सागर पार करायचा असेल तर स्वत:च्या वर्तनातूनच ते शक्य आहे. गोरक्षनाथ म्हणताहेत की मी कुणाला साक्षी देऊ की घटाघटामध्ये ब्रम्ह जगमगते आहे. असा प्रकाश आपल्या स्वत:मध्ये स्थिर झालेले पशू डोळे असूनही पाहू शकत नाहीत.

वरील सूत्रात साधनेची आवश्यकता व पुस्तकी पांडित्याचा अपुरेपणा स्पष्टपणे मांडला आहे. साधनेच्या एका महत्त्वाच्या सूत्रातून खरे ज्ञान कशात आहे व ते कसे प्राप्त करता येते याचे योगतंत्र दिलेले आहे.

नव नाडी बहोतरि कोठा, ए अष्टांग सब झूठा।

कुंची ताली सुषमन करै उलटि जिभ्या ले तालू धरै।। - गोरखवाणी/१३४

**अर्थ :** मानव देहातल्या ह्या नाड्या, कोठे, अष्टांग योग हे सर्व ज्ञान खरे ज्ञान नव्हे. वास्तविक ज्ञान तेच की जे अनुभूतीतून मिळालेले असेल. सुषुम्नेतून ब्रम्हरंध्राचा वेध झाला किंवा जीभ उलटी फिरवून पडजिभेच्यावर नेली तर जेव्हा चंद्रांमृत मिळते तो अनुभव खरा.
खुलासा - सुषुम्नेतून ब्रम्हरंध्र भेदन म्हणजे षडंगयोगांतर्गत पश्चिम मार्ग साधना व जीभ उलटी फिरवणे हे खेचरीमुद्रेच्या अंतर्गत विधी आहेत. या खेचरी मुद्रेला 'नभोमुद्रा' पण म्हणतात.[९] (संदर्भ: योगसूत्र ५७ गोरक्षपध्दति. पान ३०) किंवा 'व्योमचक्र' पण म्हणतात.[१०] (संदर्भ : सूत्र गोरक्षपध्दती पान ३९)

**माया व मायेचे स्वरूप -**

ले लुट्या जिनि षवरि न पाई, कसि करि यंद्री डांडी।
तन मन की कछु षवरि न पाई, सुरति बियोगा रांडी।।   - गोरखज्ञान/९

**अर्थ :** लोक मायेने लुटले जात आहेत पण त्यांना त्याची वार्ता नाही आणि दंड किंवा दमन (त्रास) मात्र ते इंद्रियांना देतात. शरीर व मन या बाबत बेफिकीर रहातात. अशा प्रकारे मायेच्या जंजाळात आपली आध्यात्मिकता नष्ट करुन घेतात.

मायेच्या बाबतीत गोरखवाणीतले महत्वाचे सूत्र :-

दाबि न मारिबा षाली न राषिबा, जांनिबा अगनि का भेवं।
बूढी ही थै गुरबानी होइगी सतिसति भाषंत श्री गोरषदेवं।। - गोरखवाणी/१७४

**अर्थ:** मनाला माारायच पण नाही व मोकळ पण ठेवायच नाही. (empty mind is devil's workshop.) तर योगाग्नीच रहस्य जाणायला पाहिजे असे झाले तर जी बूढी (खूप अनादी काळापासून चालत आलेली) माया जी बंधनात अडकवते तीच मायेची शक्ती गुरुरुप होऊन मोक्षप्रदान करते. इथे 'शक्ती' या मायास्वरुप घटकाची आपण कोणती दिशा स्वीकारतो हा विषय असतो व इथे आपणास पूर्ण कर्मनिर्णय स्वातंत्र्य असते. विशेष वचन: पंच महा रिषि तहाँ कटवाल, तिनकी तृया महा झूझारि। इनहि मारि जे लागौ पंथा, सुंदरि जीतै लोक सौ कंथा।। प्राणसंकली -१५

**अर्थ:** या शरीरामध्ये पाचऋषी वा कोतवाल आहेत. त्यांची स्त्री(मन) युध्दकुशल आहे. या पाच जणांना मारुन जो पुढे जाईल तो या सुंदरीला, जगाला व शरीरपण जिंकतो.सद्मिमांसा या सदरामध्ये गोरक्षनाथांचे अत्यंत महत्वाचे केद्रंस्थानी असणारे सूत्र खालीलप्रमाणे आहे.

**ब्रह्मांडी ते पिंडी :**

तूंबी मै तिरलोक समाणा, तिरबेणी रवि चंदा।
बूझौ हौ कोई ब्रम्ह गियांनी, अनहतनाद अभंगा।।     - गोरखज्ञान/३५

**अर्थ :** तुंबी म्हणजे हे शरीर यातच त्रैलोक्य सामावले आहे. इथेच त्रिवेणी संगम आहे. चंद्र सूर्य आहेत. या देहामध्ये अनाहतनाद अखंड चालू आहे. कुणी ब्रम्हज्ञानीच या विषयाला समजू शकेल.

श्री गोरक्षनाथांचे ब्रम्हांडी ते पिंडी हे महत्वाचे सूत्रच या ठिकाणी मांडले गेले आहे. देहमाध्यमाची अुपेक्षा करुन कृत्रिमरित्या नेम-नियम करुन पुस्तकी पांडित्याच्या अभिमानात हरवलेल्या व्यक्तींना व अशा समाजाला योग्य दिशा देण्याची आवश्यकता यातून व्यक्त होते. त्यासाठी मूलभूत विषय आहे व्यक्तिघटकाचे शुध्दीकरण व शक्तिजागरण. त्यातूनच अपेक्षित क्रांती होऊ शकेल. उत्क्रांतिवादी सुखवादात (evolutionary Hedonism) जी सेंद्रीय सिध्दांताची मांडणी (Organic whole) ही परस्परावलंबी घटकांचा संघात अशी आहे. वरील मांडणी अणुसंघातसिध्दांताच्या (Atomic whole) मांडणीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. उत्क्रांतिवादापूर्वीचे समाजशास्त्रज्ञ समाजापेक्षा व्यक्तीला महत्व देत असत. उत्क्रांतिवादाने व्यक्तीपेक्षा समाजाला श्रेष्ठत्व प्रदान केले. समाज आहे म्हणून व्यक्ती आहे असे तत्व मांडले.[११] - (संदर्भ: नीतिमीमांसा - पान१४६)

श्री गोरक्षनाथांनी सुरु केलेले जे सामाजिक अभियान होते त्याची बैठक या उत्क्रांतिवादी सुरवावादापेक्षा वेगळी असून ती अणुसंघात तत्वावर (Atomic whole) वर आधारित असली तरी व्यक्ती हा घटक सर्व बाजूनी जर शुध्द व संतुलित झाला तरच समाजाचे अस्तित्व टिकू शकेल अन्यथा समाज म्हणजे स्वैर घटकांची गर्दी होईल. इथे व्यक्तीचे सामाजिक संदर्भही महत्त्वाचे मानलेले आहेत. नीतिशास्त्रीय दृष्टीने समाजाची भरभराट हा नीतीनिर्णयाचा निकष ठरतो. ही प्रगती व भरभराट फक्त ऐहिक व स्वार्थी असून चालणार नाही तर ती त्याग व ऐहिक व परमार्थिक सुखावर आधारित अशी एक संतुलित अवस्था असली पाहिजे. त्यामध्ये शरीर, मन व बुध्दी या सर्वांचे एका विकसित पूर्णत्वात रुपांतरण होण्याची प्रक्रिया अपेक्षित असते.

याच विषयासंदर्भांत निंबाळचे प्रसिध्द साक्षात्कारी गुरुदेव आर.डी. रानडे काय म्हणतात? वरील विचारांना अधिक नेमकीपणा देत ते म्हणतात:

योग म्हणजे अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी लागणारी क्रियाशील साधननिष्ठा (Positive, Persistent and Final determination to seek out the truth) व भक्ती म्हणजे देवाविषयी व तद्द्वारा अखिल मानवतेविषयी वाटणारे प्रेम. (Bhakti is love to God and through this in love to man) पुढे ते लिहितात:

अलिकडे 'मानव धर्मा' विषयी बरेच बोलण्यात येते व भक्तिरहित असे नैतिक आणि परोपकारी जीवन असू शकते असे सांगितले जाते. पण भक्ती हा मानवधर्माचा पाया आहे. हे सांगताना ते म्हणतात:

Love to humanity must be based on love to God. If it is not, them it is bound to have a shaky foundation. It is the love which we bear to God that inspires us with love to man and those who love man otherwise (differently) love him accidently and not essentially.[१३] (संदर्भ : गुरुदेव रानडे चरित्र आणि तत्वज्ञान पान १७७)

**ज्ञानाची परमावस्था -**

'ज्ञान' या विषयीच्या काही सूत्रांचा विचार वर मांडला. ही जी ज्ञानाची अवस्था आहे या अवस्थेची 'परमावस्था' कशी असते या विषयीची विचारशक्तीला अचंबित करणारी अशी काही सूत्रे आहेत. उदा.

सबद एक पूछिबा कहौ गुरु दयाळं। बिरिधि थै क्यूं करि होइबा बालं।

फुल्या फूल कळी क्यू होई। पूछें कहै तौ गोरष सोई।। - गोरखवाणी/८७

**अर्थ :** हे दयाळू गुरु मी तुम्हास एक शब्द विचारतो की वृध्द (बिरिधि) पुन्ह: बालक केव्हां होतो? जे फूल फुललेलं आहे ते पुन्ह: कळी कसे होऊ शकते? या प्रश्नाचे जो उत्तर देऊ शकेल तो गोरक्षसमानच आहे. या प्रश्नाचे उत्तर पुढील सूत्रात आहे.

सुणौ हो देवल तजौ जंजालं, अमिय पीवत तब होइना बालं।

ब्रम्ह अगनि सिंचन मूलं, फूल्या फूल कली फिरि फूलं।। - गोरखवाणी/८८

**अर्थ :** हे देवलनाथ, जगाच्या गोंधळाला, गुंत्याला सोड. योगाच्या युक्तीने अमृत पान (चंद्रामृत) करु शकलास तर पुन्ह: लहान बालक होऊ शकशील. ब्रम्हाग्नीनें मुळाशी संधान जोडलेस तर जे फूल उमललेले आहे ते फूलपुन्ह: कळी होऊ शकते.

ही सूत्रे खोल अर्थाची आहेत. कळीचे फूल होणे किंवा बालकाचा वृध्द मनुष्य होणे ही चेतनेची स्वाभाविक अभिव्यक्ती असली तरी ती चेतनेची क्षीणता दर्शवते. मात्र वरील सूत्रे म्हणजे चेतनेचे शक्तीरुपात पुनरागमनच होय. या सूत्रांच्या आधार श्री गोरक्षनाथांचे योगविज्ञान असून या सर्व क्रिया दैहिक माध्यमांतर्गत आहेत. वरील सूत्रात सांगितलेली अवस्था ही जिव-शिव ऐक्य अनुभूतीतून सहजावस्थेमध्ये निर्माण होत असते. ही अवस्था ज्ञानातीत असून बुध्दीच्या पलिकडील चैतन्यावस्थेतील सामरस्य अनुभूती असते. विद्वतेचा प्रांत खूप अलिकडे रहातो, व नित्यशुध्द, निर्दोष निष्कपट अंत:करणाची स्थिती निर्माण होते. अज्ञानी म्हणजे Ignorant व बालपणातील स्वाभाविक निष्कपट अवस्था म्हणजे Innocence. तर समाधीच्या अनुभवानंतर येणारी ही निष्पाप अवस्था ही Par-excellence अशी असते.

या न्यायाने 'बुध्दी' या शब्दाला intellect व intelligence असे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. पण त्यात खूप फरक आहे. जे आपण बाहेरुन मिळवतो व मेंदूत

संग्रहित केले जाते, त्यास intellect हा शब्द वापरला जातो व जे आपणाजवळ स्वाभाविकपणे उपजतच असते ते intelligence या शब्दाने व्यक्त केले जाते.

या दृष्टीने विचार करता येशू ख्रिस्त, भक्त कबीर, मीरा या व्यक्ती काही पंडित नव्हत्या. पण हे लोक अत्यंत बुध्दिमान होते. त्यांची झेप विश्वाच्या कारणमीमांसेपासून ते जिवाच्या अंतिम धारणेच्या कल्पनेपर्यंत व अनुभवापर्यंत जाऊ शकली. या प्रकारच्या व्यक्तींचे आत्मे ह्या त्यांच्या शुध्द निष्पाप ईश्वरेच्छेनुसार कार्यान्वित होणाऱ्या अंत:करणरुपी आरशातून परावर्तित होत असतात.

ही शुद्ध निष्पाप अवस्था म्हणजेच बालभाव! सिध्द पुरुष अशा बालभावात असल्याचे अनेक दाखले वाङ्मयात मिळतात.

फुलांची कळी होणे किंवा वृध्दावस्थेतून बालक होणे याचा असा गर्भितार्थ वरील सूत्रांमध्ये आहे. म्हणून चिंतनीय व विलक्षण अशी ही सूत्रे आहेत.

**क) जीवनविषयक :**

मानवी जीवनाचा अर्थ व उद्देश, त्याच्या समस्या व उपाय, कलियुगाचा महिमा व त्यातूनही जीवन साफल्याकरता कलियुगाचा परिणाम स्वत:वर होऊ न देता त्या युगावरच परिणाम करणारे स्वत:चे परिमाणस्वरुप मूल्य कसे निर्माण करायचे या उद्देशानेच श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या कार्याची मांडणी केलेली आहे. प्रचंड तळमळीतून व तत्वज्ञानांतर्गत जीवनमांडणीतून व्यक्तिजीवन घडवण्याचा प्रयत्न त्यानी केला. त्याची साक्षच त्यांची वाङ्मयीन निर्मिती देते. सूत्रासूत्रातून, संवादातून, प्रश्नोत्तरातून, हरप्रयत्नातून समाजधारणेच्या मूलस्त्रोतासच शुध्द, प्रवाही व व्यापक करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**कलियुग -**

त्यासंबंधीच्या काही सूत्रांच्या आता मागोवा घेणे इष्ट ठरेल.

हिरदा का भाव हाथ मै जाणिये यहु कलि आई षोटी।
बदंत गोरष सुणौ रे अवधू करवै होई सु निकसै टोटी।। - गोरखवाणी/१२३

**अर्थ :** हा कलियुगाचा काळ विचित्र आहे. हृदयात जे आहे तेच हातातून येत आहे. म्हणजे आत वाईट भाव आहेत म्हणूनच वाईट कर्मे घडत आहेत. म्हणून हे अवधू! ऐक. अरे जे कमंडलूत असेल तेच तोटीतून बाहेर येईल ना?

**स्वावलंबन व परावलंबन -**

त्यासाठी स्वावलंबन, परावलंब टाळणे, नियम व संयमाचे जीवन या गोष्टी आवश्यक आहेत. यासाठी सद्‌गुरु या माध्यमाचे महत्व व त्याचा स्वीकार, प्रयत्नांची पराकाष्ठा हेही तितकेच आवश्यक आहे.

जीवनयशाचे हे मंत्र समजून घेऊन त्याचा पाठपुरावा करणे जरुर आहे.

त्यासंबंधातील सूत्रांचा आता विचार पाहू.

परावलंबनाबाबत :-

दूधाधारी पर धरि चित्त, नागा लकडी चाहे नित।

मोनी करै म्यंत्र की आस बिन गुर गुदडी नही बेसास।। - गोरखवाणी/४०

**अर्थ :** दुधावर रहाणारा नेहमी दूध कुठल्या घरात मिळेल या विवंचनेत असतो. नागा (साधू) थंडीपासून रक्षण करण्यासाठी अग्नी पाहिजे म्हणून सतत लाकडाच्या काळजीत असतो. मौन धरणाराला मदतीला नेहमी कोणीतरी मित्र लागतो त्याशिवाय काम कसे चालणार? विश्वास ही गोष्ट सद्‌गुरुशिवाय होऊ शकत नाही.

**संयम व नियम -**

संयम व नियम यासाठी त्यांच्या (श्री गोरक्षनाथांच्या) ग्रंथात अनेक सूत्रे आहेत.

गोरखवाणी मधील सूत्रे :

संयमासाठी सूत्रे:- १०३, १२४, १४६, २२८, २२९, २४२)

नियमासाठी सूत्रे :- १२६, १४१, १६५, १६६, २०९, २१४, २६१

त्यातील नमुन्यादाखल २/२ घेऊ.

संयमाबाबत :-

जोगी सो जे मन जोगवै, बिना बिलाइत राज भोगवै।

कनक कांमनी त्यागे दोइ, सो जोगेस्वर निरभै होइ।। - गोरखवाणी/१०३

**अर्थ :** योगी जो स्वत:चे मन जागवतो म्हणजे संयमित करतो तो प्रदेश नसूनही मोठे राज्य उपभोगतो. जो योगी कनक कामिनीचा त्याग करतो तो सदा निर्भय व आनंदी रहातो.

जल कै संगमि अटल अकास, अन कै संजमि जोति प्रकास।

पवना संजमि लागै बंद, ब्यंद के संजमि थिर व्है कंद।। - गोरखवाणी/१२४

**अर्थ :** पाण्याच्या संयमानी आकाश तत्व स्थिर होते. अन्नाच्या संयमानी तेज तत्व वाढते. वायूच्या संयमानी बंद लागतो (म्हणजे ९ द्वार बंद होतात) व बिंदूच्या म्हणजे शुक्राच्या संयमानी शरीर स्थिर होते.

नियमासाठीची सूत्रे :-

आसन दिढ अहार दिढ जै न्यंद्रा दिढ होई।

गोरष कहै सुणौ ले पूता मरे न बूढा कोई।। - गोरखवाणी सूत्र १२६

**अर्थ:** हे पूतानो म्हणजे शिष्यानो ऐका. आसन, भोजन व निद्रा याबाबतीत नियम पाळल्यास तो योगी अजर-अमर होतो.

अवधू षारै षिरै षाटै झरै मीठै उपजे रोगं।

गोरष कहै सुणौ रे अवधू अनै पाणी जोगं।। - गोरखवाणी/१४१

**अर्थ :** मिठाने शुक्र नष्ट होतो, आंबट पदार्थानी तो झरतो तर गोड पदार्थानी रोग पैदा होतात. म्हणून हे पूता, योगात अन्नपाण्याचे नियम फार महत्वाचे आहेत.

सद्‌गुरु महिमा वर्णन करणारी २ सूत्रे विचारात घेऊ. (या संबंधात अनेक सूत्रे गोरखवाणी मध्ये आहेत.

मांन्यां सबद चुकाया दंद, निहचै राजा भरधरी परचै गोपीचंद।

निहचै नरवै भए निरदंद, परचै जोगी परमानंद।। - गोरखवाणी/१५

**अर्थ :** ज्यानी गुरुवचन प्रमाण मानले त्यांची दुविधा नष्ट होते भर्तरीची सिध्दावस्था व गोपीचंद राजाचा उध्दार व ज्ञान प्राप्ती ही गुरुंच्या आशिर्वादानेच झाली. ('नवनाथ भक्तिसार' मध्ये राजा भर्तरी व राजा गोपीचंदाची कथा विस्ताराने आलेली आहे) राजे लोकांना युध्दापासून परावृत्त करुन निर्भय व आनंदी बनवले, असे गुरुंचे महिमान आहे.

सुणिगुणवंता सुणि बधिवंता अनंत सिधां की बांणी।

सीस नवावत सत गुर मिलिया जागत रैणि विहांणी।। - गोरखवाणी/१०८

**अर्थ :** हे गुणी व बुध्दिवंतांनो। अनंत सिध्दांचे बोल ऐका. सद्‌गुरुची भेट व त्यांची शरणांगती पत्करलीत की जीवनातली रात्रही ज्ञानमय होऊन जाते.

प्रयत्नांच्या महत्त्वाच्या बाबतीची सूत्रे (गोरखवाणीमधील) :-

सूत्र क्र. ६०, ९१, ९३, ११५

असाध साधंत गगन गाजंत अुनमनी लागंत ताली।

उलटंत पवनं पलटंत बाणीं अपींव पीबत जे ब्रम्हज्ञानी।। - गोरखवाणी/९१

**अर्थ :** योगी लोक जिंकण्यास अवघड मनावर संयम ठेवतात, अंतरात (शरीरात) अनाहत नाद ध्वनी चालू ठेवतात, अुन्मनी समाधी लावतात, वायूला उलटे फिरवतात, असे प्रयत्नशील योगी अमृताचे पान करतात.

निहचल धरि बैसिबा पवन, निरोधि बा कदे न होइबा रोगी।

बरस दिन मै तीनिबर काया पलटिबा नाग बंग नासपती जोगी।।

- गोरखवाणी सूत्र ९३

**अर्थ :** प्रयत्नपूर्वक स्थिर व निश्चल होऊन प्राणायाम विधी अभ्यासलात तर कधीच रोग होणार नाही. तरीही वर्षातून तीन वेळ नाग बंग (शिसे+टिन) चे भस्म व वनस्पतीचे प्रयोग केले पाहिजेत.

सिध क संकेत बुझिलै सूरा, गगन अस्थांनी बाइलै तूरा।

मीमा के मारग रोपिलैं भांणं। उलत्या फूल कली मै आणं।। - गो. वाणी/११६

**अर्थ :** हे शूंरा। सिध्दसंकेत समजून घे. गगनात अनाहत वाजला पाहिजे सूर्याला 'मीन' मार्गावर आणले पाहिजे. याचा अर्थ - सूर्य व चंद्र नाडी एकत्रून मध्यमार्ग म्हणजे सुषुम्ना म्हणजे मीनमार्गावर येऊन योग साधायचा आहे. हे प्रयत्नसाध्य आहे. हे जेव्हा होते तेव्हा फुलाची कळी व वृध्दाचा बालक होतो.

**ड) उलटबाँसी :**

नाथपंथीय काव्यात या काव्यशैलीचा उपयोग बऱ्याच प्रमाणात केलेला दिसून येतो. उलटबाँसी या हिंदी शब्दास कूटकाव्य असा पर्यायी शब्द वापरता येईल. हा काव्य प्रकार खूप प्राचीन असून वेद व उपनिषदांमध्येही अशा प्रकारची वचने आढळतात. त्यानंतर साधना गुप्त ठेवण्याचे उद्देशाने तांत्रिकांनी याचा उपयोग केल्याचे दिसून येते. डॉ. रामकुमार वर्मा म्हणतात. ''प्रतिकरुप किंवा धर्मविषयक रुपकाला उलटबाँसी म्हटले जाते. एकप्रकारे ही सांकेतिक भाषाच सत्याला काव्याचे रुप देते. नाथसंप्रदायात या पध्दतीचा उपयोग केला गेला आहे. उलटबाँसीत वरवरचा अर्थ विपरीत व बुध्दीला न पटणारा वाटतो. पण एकदा प्रतीक लक्षात आले की यौगीक अर्थ स्पष्ट होतो. प्रतीकांचे अर्थ परंपरेने फक्त शिष्यांनाच माहित होत असत.''[१३] (संदर्भ : नाथसंप्रदाय व ज्ञानेश्वर पान २०३)

उदा: चींटी केरा नेत्रमे गजेंद्र समाइला। गावडीके मूष बाघला ववाइला।।

बारे बरसे बंझ ब्यायी हात पाव टूटा। बदंतगोरखनाथ मच्छिंद्रनापूता।। - गो.बानी

**अर्थ :** मुंगीच्या डोळ्यात हत्ती सामावला म्हणजे सूक्ष्म आध्यात्मिक स्वरुपात स्थूल भौतिक रुप सामावले, गाईच्या मुखातून वाघीण जन्म घेते म्हणजे या भौतिक जीवनातच आध्यात्मिक ज्ञान उत्पन्न होते. बारा वर्षानंतर बंधेला पुत्र झाला पण प्रसुतीचे वेळी हातपाय तुटले म्हणजे हे मायिक जीवन निष्फळ असते म्हणजे ते जीवन वंध्या ठरते. पण खूप तप व परिश्रमानंतर ज्ञान प्राप्त होते म्हणजे तिला पुत्र होतो. ज्ञानाचा उदय झाला की माया शक्तिहीन होते म्हणजेच तिचे हातपाय तुटतात. हे सर्व मच्छिंद्रपूत गोरख सांगत आहे.[१४] (संदर्भ : नाथसंप्रदाय व ज्ञानेश्वर पान २०४-२०५)

'गोरखबानी' मध्ये व श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातही हा प्रकार मुक्तपणे वापरलेला दिसून येतो.

अवधू ईश्वर हमारै चेला भणींजै मछीद्रं बोलिये नाती।

निगरी पिरथी परलै जाती ताथै हम उल्टी थापना थापी।। - गो. वाणी/१४५

**अर्थ :** हे अवधूत ईश्वर (शिव) माझा चेला (शिष्य) आहे व मच्छिंद्र हा नात म्हणजे चेल्याचा चेला आहे. हा उलटा क्रम जर आम्ही स्थापन केला नाही तर गुरुविना पृथ्वीवर प्रलय होईल.

श्री गोरक्षनाथांच्या वाङ्मयातील निवडक सूत्रांची मांडणी अर्थासह करुन त्यातून कोणते विषय स्पष्ट होतात ते पाहिले.

**५) उपसंहार :**

अशाप्रकारे श्री गोरक्षनाथांच्या नीति, ज्ञान-विज्ञान व मानवीजीवन यांना सवार्थाने व्यापून स्पष्ट करणाऱ्या सूत्रांचा व त्यासंबंधित ग्रंथाचा परामर्श घेण्याचा वरील प्रकरण ४ मध्ये यथाशक्ती प्रयत्न केला आहे. नाथ तत्वज्ञानाचे मनोज्ञ दर्शन वरील प्रकरणात होऊ शकते. श्री. गोरक्षनाथांना मानवी जीवनातले परमप्राप्तव्य म्हणजे आत्मप्रचिती व तद्नुषंगिक सामाजिक कर्तव्याची जाणिव असे अभिप्रेत आहे. याचा अर्थ श्री. गोरक्षनाथांना उत्क्रांतीवादातील सेंद्रिय सिद्धांन्त व व्यक्तिवादी अणुसिद्धान्त यांचा समन्वय अपेक्षित आहे.याचा अर्थ ते नुसते समाजवादी नाहीत व व्यक्तिवादीही नाहीत. अजर अमर अशा आत्मतत्वाची अभिव्यक्ती समाजातही प्रक्षेपित व्हायला हवी. यातूनच समाजाच्या चिरस्थायी अस्तित्वाची व्यवस्था (System of Social Immortalisation) होऊ शकते. मात्र ही परम प्राप्ती फक्त योगी पुरूषालाच होते असे नसून अन्य सामान्य जनानाही प्राप्त करता येते. यासाठी पूर्वअट अशी आहे की, सामान्य जनानीही या सर्व सूत्रांचा सखोल अभ्यास करून त्यानुसार आचरण करावे. असे घडून आल्यास 'ज्ञानामृतं समरसं गगनोपमोऽहम्' म्हणजेच मीच सत्‌चित् आनंदरूप असून आकाशतत्वाप्रमाणे अमर्याद आहे अशी अनुभूती सामान्य जनानाही येऊ शकते. थोडक्यात श्री. गोरक्षनाथांच्या नीति, ज्ञान-विज्ञान व मानवी जीवन यांना सर्वार्थाने व्यापून राहणाऱ्या काही सूत्रांचा व संबंधित ग्रंथांचा थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. नाथ तत्त्वज्ञानाचे मनोज्ञ असे दर्शन या प्रकरणात अभ्यासकाला होऊ शकेल असा विश्वास मला वाटतो. सूत्रांची व्याप्ती खूपच मोठी असल्याने मी केलेल्या विवेचनात स्वाभाविकच काही मर्यादा पडल्या आहेत. तरीसुद्धा त्या मर्यादा विचारात घेऊन मी या प्रकरणात गोरक्षनाथांच्या ज्ञान, नीति व जीवनविषयक विचारांचा मागोवा घेतला आहे. यानंतर गोरक्षनाथांनी प्रतिपादन केलेली सदवस्तुमीमांसा हा विषय मी ५ व्या प्रकरणात घेतला आहे. तेथेही मला असलेल्या सर्व मर्यादांचे भान ठेवून मी संक्षिप्त स्वरूपात मांडणी केली आहे.

**६) संदर्भ व टीपा :**


१. सि.सि.पध्दति - संपादक अनुवादक स्वामी द्वारिकादास शास्त्री चौखंबा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, २००६ ई.

२. तत्रैव.

३. तत्रैव.

४. तत्रैव.

५. श्रीमद्भगवद्गीता - गीता प्रेस गोरखपूर प्रकाशन, सं. २०६०.

६. महार्थ मंजरी - प्रस्तावना, गोरखनाथ मंदीर प्रकाशन, गोरखपूर, सं. २०४४.

७. अमनस्कयोग - विनयानंद चॅरिटेबल होम. मौजे वडगांव जि. कोल्हापूर, २००२

८. गोरखबानी - गोरखनाथ मंदीर प्रकाशन, गोरखपूर, २०५१ वि.

९. गोरक्षपध्दति - महीधर्म शर्मा कृत खेमराज, श्रीकृष्णदास प्रकाशन मुंबई, सं.२०६२.

१०. तत्रैव.

११. नीतिमीमांसा - आधीचे नोंदीप्रमाणे.

१२. गुरुदेव रानडे - चरित्र व तत्त्वज्ञान - ले. शं.गो. तुळपुळे. यशवंत प्रकाशन, पुणे, १९८३.

१३. नाथसंप्रदाय व ज्ञानेश्वर - ले. डॉ. के. डी. भिंगारकर, पद्मगंधा प्रकाशन, २००७.

१४. तत्रैव.

## प्रकरण - पाचवे

## श्री गोरक्षनाथकृत सद्‌वस्तुमीमांसा

### १) प्रस्तावना :

श्री. गोरक्षनाथांच्या विविध विषयांवरील सूत्रांचा आढावा मी मागील प्रकरणात घेतला. आता गोरक्षनाथांना अभिप्रेत असलेली सद्‌वस्तुमीमांसा अभ्यासणार आहे. गोरक्षनाथांच्या मते अंतिम सत्य कोणते? त्या अंतिम सत्याचे स्वरूप कसे असते? ज्या जगात आपण वावरतो त्या जगाशी त्या अंतिम सत्याचा कोणता संबंध असतो? अंतिम सत्याचे ज्ञान कसे होऊ शकते? ह्या व अशा स्वरूपाच्या प्रश्नांची काही उत्तरे मला गोरक्षनाथांच्या विविध ग्रंथात आढळली आहेत. ती सर्व उत्तरे माझ्या परीने शक्य तितक्या नेमकेपणाने मांडावीत हा या प्रकरणाचा मुख्य उद्देश आहे. या पूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे नैतिक आदर्शाची मांडणी करणे ही गोरक्षनाथांची मुख्य भूमिका आहे. त्या भूमिकेला अनुसरून त्यांनी आपली सद्‌वस्तूमीमांसा केली आहे. गोरक्षनाथ हे जसे महायोगी होते तसेच ते तत्त्वचिंतक, मानसशास्त्रज्ञ व व्यापक अर्थाने समाजशास्त्रज्ञही होते. त्यांच्या मते मानवी जीवनामध्ये अंतिम सत्य हे अंर्तहित असते. या अर्थाने अंतिम सत्याला जसे वस्तूनिष्ठ मूल्य असते तसेच ते व्यक्तिनिष्ठ मूल्यही असते. कोणीही व्यक्ती एकटी नसते तर ती व्यापक असा समाजाचा घटक असते. म्हणूनच मानवी व्यक्ती ही गोरक्षनाथांच्या सद्‌वस्तुमीमांसेच्या केंद्रस्थानी असल्याचे मला आढळून आले आहे.

### २) सद्‌वस्तुमीमांसा :

आता श्री गोरक्षनाथांची सद्‌वस्तुमीमांसा समजून घेण्यासठी त्यांनी वेगवेगळ्या ग्रंथात प्रतिपादन केलेली जी विविध सूत्रे आहेत त्याचा क्रमवार परामर्श घेऊ.

महायोगी श्री गोरक्षनाथ यांच्या विविध ग्रंथातील चरमसत्याबद्दलची सूत्रे खालीलप्रमाणे.

**सिद्धसिद्धांत पध्दति -**

यदा नास्ति स्वयं कर्ता, कारणं न कुलाकुलम्।<br>
अव्यक्तं च परं ब्रम्ह, अनामा विद्यते तदा।। - सि.सि.प.प्रथम उपदेश/४

**अर्थ :** जेव्हां (सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी) कोणीही कर्ता नाही, कारण नाही, शक्तिक्रम (कुल) वा योगक्रम (अकुल) नाही अशावेळी परब्रम्ह नामरहित व अव्यक्त असते.

अनामेति-स्वयमनादिसिध्दम् एकमेव अनादि निधनं सिध्द सिध्दांत प्रसिध्दम्।।

- सि.सि.प.प्रथम उपदेश /५

**अर्थ :** हे परब्रम्ह नामरहित आहे. (ते स्वत:च व्यक्त होते.) ते स्वत: अनादिकाळापासून सिध्द एकमेव सत्य, जन्म मृत्युरहित आहे असा सिध्दांचा सिध्दांत प्रसिध्द आहे.

परब्रम्हाची स्वत:ची शक्ती सृष्टिनिर्मितीच्या वेळी विकास पावते किंवा प्रलयाचे वेळी संकोचित होते. या शक्तीला 'निजा' शक्ती म्हटलेले आहे. ही निजाशक्ती सृष्टीनिर्मितीचे वेळी जेव्हा स्फुरित होते तेव्हा तिला पराशक्ती म्हटले आहे.

तस्य उन्मुखत्वमात्रेण पराशक्तिरुत्थिता।। - सि.सि.प.प्रथम उपदेश/६

**अर्थ :** त्याच्या म्हणजे निजाशक्तीच्या स्फुरणातून परा शक्ती उद्भूत होते.

या शक्तीतून अपरा शक्ती, त्यातून सूक्ष्माशक्ती (विमर्श किंवा मीमांसा शक्ती) यालाच वेदामध्ये ब्रम्हविद्या म्हटले आहे. यातूनच महिमामयी 'माया' किंवा कुंडलिनी प्रादुर्भूत होते. पुढील सूत्रांमधून सृष्टीची निर्मिती कशी होते हा विषय सि.सि.प. या ग्रंथात घेतलेला आहे.

**महार्थमंजरी -**

यामध्ये एकूण ७१ श्लोक आहेत. त्यांना 'गाथा' म्हटलेले आहे. त्यापैकी गाथा क्र. १०,१८,१९व ५३ यामध्ये मूळ शक्तीचे स्वरुपाबद्दल निर्देश आहेत.

ऊर्ध्वो ज्वलतिप्रकाशो लोकालोकस्य मंगलप्रदीप:।
विमर्शदशामुखानीतदह्यमानमलालितैल विच्छर्द:।। - म.मं.गाथा/१०

**अर्थ :** ज्याप्रमाणे तेलाने भरलेला दिवा अंध:काराचा नाश करुन उजेड फैलावतो त्याप्रमाणे पूर्णप्रकाशरुप परमेश्वर ज्ञानक्रियारुप विमर्षामध्ये प्रकाशमान होऊन मायेचा मळ आपल्या तेजाने भस्म करतो. (या ठिकाणी परमतत्त्व प्रकाशरुप आहे)

सर्वकर: सर्वज्ञ: पूर्णो नित्य: असंकुचंश्च।
विपरीत इव महेशो याभिस्ता भवंति पंचशक्त्य:।। - म.मं.गाथा/१८

**अर्थ :** परमात्मा परमशिव सर्वकर्ता, सर्वज्ञ, पूर्ण, नित्य, व संकोचरहित आहे. पण ते शिवतत्व, त्याच्या ज्या पाच शक्ती आहेत, त्यातून विपरीत दिसते. (त्या पाच शक्ती आहेत राग, कला, विद्या, नियती व काल!)

य एष विश्वनाटकशैलूष: शुध्दसंविच्छम्भु:।
वर्णकपरिग्रहमयी तस्य दशा कापि पुरुषो भवति।। - म.मं.गाथा/१९

**अर्थ :** परमस्वतंत्र ज्ञानस्वरुप शिवच या विश्वनाटकाचा सूत्रधार आहे. ज्याप्रमाणे नट विविध वेषभूषेतून नाटक सादर करतो त्याप्रमाणे वेगवेगळया शक्तींच्या रुपाने परमात्मा अभिनय सादर करत जातो. या विश्वनाट्याचा सूत्रधार ते शिवतत्व आहे.

**गोरक्षपध्दती -**

या ग्रंथामध्ये एकूण २०२ श्लोक आहेत व ते दोन शतकात विभागलेले आहेत. त्यापैकी शतक २ मधील श्लोक ९२, ९३, ९४,व ९६ अशा श्लोकांमध्ये त्या परमसत्याविषयी विवेचन आहे. वरील श्लोक विभाग२ मधील आहेत.

निराद्यंतं निरालंबं निष्प्रपंच निरामयम्।

निराश्रयं निराकारं तत्वं जानाति योग वित् ।। - गो.पध्दती/शतक२/९२

**अर्थ :** आदिअंत नाही, निमित्त नाही, निरामय, ते कोणाच्याही आश्रयाने रहात नाही (म्हणजे स्वत:हून अस्तित्वात असणारे), आकाररहित असे ते परमतत्व योगी जाणतो.

निर्मलं निश्चलं नित्यं निष्क्रियं निर्गुणं महत्।

व्योमविज्ञानं आनंदम् ब्रम्हं ब्रम्हविदो विदु:।। - गो.पध्दती/शतक२/९३

**अर्थ :** निर्मल, निश्चल, नित्य, निष्क्रीय, निर्गुण, महान, व्योमरूप (चिदाकाशस्वरुप), विज्ञानरूप (अशा) आनंदब्रम्हाला योगी जाणतात.

**गोरक्षसंहिता -**

या ग्रंथात २०० श्लोक असून त्याचेही दोन भाग आहेत. ते प्रथम शतक व द्वितीय शतक असे आहेत. ब्रम्ह हेच जगताचे कारण व ॐ हे ब्रम्हाचे स्वरुप आहे अशा अर्थाचे बरेच श्लोक आहेत. त्यापैकी काही उदाहरणादाखल घेतले आहेत.

त्रय: काला: त्रय: वेदा: त्रय: लोका: त्रय : स्वर।

त्रयो देवा: स्थिता यत्र तत्परं ज्योतिरोमिति।। - गो.सं/शतक१/८४

**अर्थ :** ॐ मध्ये तीन काल, तीन वेद, तीन लोक, तीन स्वर, तीन देवता हे सर्व परमज्योतिस्वरुप आहेत.

इच्छा ज्ञानं क्रियाचैव ब्राम्ही रौद्रीच वैष्णवी।

त्रिधा: शक्ती स्थिता यत्र तत्परं ज्योतिरोमिति।। - गो.सं/शतक१/८५

**अर्थ :** (त्याच ॐ मध्ये) इच्छा, ज्ञान, ब्राम्ही, रौद्री व वैष्णवी या तीन्ही शक्ती उपस्थित आहेत व त्या परमज्योति स्वरुपच आहेत.

अकारश्च उकारश्च मकारो बिंदुसंज्ञक:।

त्रिधा मात्रा स्थिता यत्र तत्पर ज्योतिरोमिति।। - गो.सं/शतक१/८६

**अर्थ :** अकार, उकार व बिंदुरुप मकार या तिन्ही मात्रा ज्यामध्ये स्थित आहेत असा ॐ ज्योतिस्वरुप आहे. या श्लोकातून परमसत्याचे प्रकाश स्वरूप व्यक्त होते.

**योगबीज -**

या ग्रंथात कैवल्यपद स्पष्ट करणारे पुढील श्लोक आहेत. ते १०, ११,१२ व १३ असे आहेत.

अनिर्वाच्यपदं वक्तुं शक्यते न सुरैरपि।

स्वात्मप्रकाशरुपं तत् किं शास्त्रेण प्रकाश्यते?।। - यो.बी./१०

**अर्थ :** कैवल्यपद हे अनिर्वचनीय असल्यामुळे देवही त्याचे वर्णन करु शकत नाहीत. स्वत:च स्वत:ला प्रकाशित करणारे हे कैवल्यपद कोणत्याही शास्त्रामुळे स्पष्ट किंवा प्रकाशित होत नाही.

निश्चलं निर्मलं शांतं सर्वातीतं निरामयम्।

तदेतज्जीवरुपेण पुण्यपापफलैर्वृतम्।। - यो.बी./११

**अर्थ :** आत्मस्वरुप हे निश्चल, अत्यंत निर्मल, शांत, सर्वाच्या पलिकडे, व निरामय असे आहे. असे आत्मतत्त्व जीवरुप होते व जीवनातील फळे भोगत असते.

परमात्मपदं नित्यं तत्कथं जीवतां गतम्।

तत्त्वातीतं महादेव प्रसादात्कथयस्वमे।। - यो.बी./१२

**अर्थ :** हे महादेव! सर्व तत्त्वांच्या पलिकडे व नित्य असलेले परमात्मपद हे जीव दशेला कसे प्राप्त झाले ते मला प्रसन्नतापूर्वक निवेदन करा अशी विनंती पार्वतीने केली आहे व त्यास उत्तर म्हणून यो. बीज १३ वा श्लोक आहे.

सर्वाभावपदातीतं ज्ञानरुपं निरंजनम्।

वारिवत्स्फुरितं स्वस्मिंस्तत्राहंकार उत्थित:।। - यो.बी./१३

**अर्थ :** सर्व भावाच्या पलिकडे असलेले ज्ञानरुप व शुध्द असे आत्मस्वरुपावर, पाण्यावर तरंगाचे स्फुरण व्हावे त्याप्रमाणे जिवाचे स्फुरण होऊन अहंकार उत्पन्न होतो.

**गोरखबानी (हिंदी) -**

या ग्रंथामध्ये 'प्राणसंकली' या शीर्षकाखाली सूत्र क्र. २ व सूत्र क्र. ३ (पान २१८-२१९) महत्वाची असून श्री गोरक्षनाथांच्या मूलभूत सिध्दांताप्रमाणे हे परमतत्व मानवी देहातच कसे विद्यमान आहे व त्याचा अनुभव कशा प्रकारे घेता येतो व त्याचे स्वरुप कसे अनुभवास येते हे स्पष्ट केले आहे.

पाप पुन करम का बासा। मोष मुक्ति चेतहु हरि पासा।

जोग जुक्त जब पाओ ग्यांना। काया षोजौ पद नृबाना।। - गो.बा./२

**अर्थ :** पाप पुण्य हे कर्मबंधात्मक आहे. मोक्ष, मुक्ती यामध्ये चित्ताचा लय होतो व हरिचिंतनामुळे कर्म बंधनकारक रहात नाही. योगाची युक्ती जेव्हा समजेल तेव्हाच आपल्या देहात निर्वाणपद कसे शोधायचे हे समजेल. यावरून हे स्पष्ट होते की, गोरक्षनाथांच्या मते व्यक्ती विशिष्ट देहामध्येच परब्रह्माचा साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे.

**गोरखवाणी -**

या ग्रंथात ब्रम्हतत्व, आत्मतत्व, प्रकाश या संबंधी बरीच सूत्रे आहेत. त्यापैकी काही सूत्रांचा उल्लेख यापूर्वीच्या प्रकरणात केला आहे. त्याचा अर्थ असा की, परमात्मा अथवा परमतत्त्व हे अगम्य, अगोचर आहे. तो भावात्मक नाही अथवा अभावात्मकही नाही. मग तो आहे कसा? ह्याचे उत्तर गोरक्षनाथांच्या मते ते परमात्म स्वरूप आकाशमंडल भरून राहिलेले आहे. धर्मग्रंथांचे आधाराने त्या परमतत्त्वाचे वर्णन शक्य झालेले नाही.

परब्रह्म अथवा परमतत्त्व असले तरी ते शब्दरूप म्हणावयाचे का? अशी एक चर्चा प्राचीन दर्शनकारांनी केलेली आहे. मात्र त्या चर्चेच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. तथापि, पंडित गोपीनाथ कविराज यांचे एक मत याठिकाणी मी उधृत करत आहे. ''सिद्धयोग्यांच्या सानिध्यात'' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यात ते म्हणतात, ''ब्रह्मेति परमात्मेति भगवानीति इति शब्द्यते'' याचा अर्थ एकमेवाद्वितीय असलेले अद्वैत तत्त्वच ब्रह्म, परमात्मा व भगवान अशा तिनही शब्दांनी व्यक्त केले जाते. सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास ज्ञानाच्या दृष्टीने ते ब्रह्म असते, योग्याच्या दृष्टीने ते परमात्मा असते व भक्ताच्या दृष्टीने ते भगवान असते. मूलत: ब्रह्म हे निराकार आहे.[१] (संदर्भ - सि. योग्यांच्या सानिध्यात, पान १९५-१९६)

**अमनस्क योग :**

या ग्रंथामध्ये परतत्वाचा उल्लेख पुढीलप्रमाणे दिसून येतो.

यस्मात् उत्पद्यते सर्वै यस्मिन सर्व प्रतिष्ठितम्।
यस्मिन विलियते सर्व परतत्वं तदुच्यते।। - अ.यो./२३

**अर्थ :** ज्याच्यापासून यच्चयावत् उत्पन्न होते, ज्याच्यामध्ये सर्व काही सामावलेले आहे आणि ज्यामध्ये सर्व विलीन होते त्यास 'परतत्व' असे म्हणतात.

भावाभावविनिर्मुक्तं विनोशोत्पत्तिवर्जितम्।
सर्व संकल्पनातीतं परतत्वं तदुच्चते।। - अ.यो./२४

**अर्थ :** भाव-अभाव स्थितींपासून पूर्णपणे मुक्त, विनाश आणि उत्पत्ती विरहित व सर्व कल्पनांच्या पलिकडे असे जे तत्व त्यास 'परतत्व' म्हणतात.

वर जी काही सूत्रे सांगीतली व त्याचा अर्थही समजून घेतला तर अंतिम अशा ब्रह्मतत्त्वाचे स्वरूप समजून घेणे शक्य होते. गोरक्षनाथ म्हणतात त्याप्रमाणे ब्रह्मतत्त्व हे विशाल अशा समुद्राप्रमाणे आहे आणि हे संपूर्ण विश्व म्हणजे ब्रह्मांड हे त्यातील लाटांप्रमाणे आहे. लाटांना वेगळेपण कसे प्राप्त होते? याचे उत्तर असे की, नाम व रूप या दोन गोष्टींमुळे लाटांना वेगळेपण प्राप्त होते. नामरूपे, स्थल, काळ, दिक् व कार्यकारण यांच्यामुळेच अस्तित्वात येतात. समुद्राचे समुद्रपण लाटांमुळे असत नाही तथापि, समुद्र व

लाटा हे एकरूप आहेत असे गोरक्षनाथांचे म्हणणे आहे. हेच वेगळ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास लाटा असतील ही तिनही तत्त्वे असतात व लाटा नसतील ही तिनही तत्त्वे नसतात. येथे 'आहे' 'नाही' असे परस्पर विरूद्ध शब्द येतात. तथापि, ते त्याचे वरवरचे रूप आहे. मूलत: समुद्र व त्याच्या लाटा एकरूपच असतात.

**३) गोरक्ष वाङ्मयातील 'माया' विवरण :**

**सिध्दसिध्दांतपध्दति -**

या ब्रह्मतत्त्वाचा अनुभव घ्यायचा असेल तर देश, काल, कार्यकारण व व्यक्तीच्या भोवतालची परिस्थिती ही बंधने पार करावी लागतात. या बंधनालाच 'मायेचे स्वरूप' असे म्हटले जाते. मग मायेबाबत श्री. गोरक्षनाथ काय म्हणतात ते पाहिल्यास तो विषय स्पष्ट होईल. श्री. गोरक्षनाथांनी मायेचे स्वरूप मद, मत्सर, दंभ, कृत्रिमता व असत्य या गुणरूपात सि.सि.प. मध्ये स्पष्ट केले आहे. त्या दृष्टीनो गोरक्ष वाङ्मयातील मायेची मांडणी थोडक्यात पाहू.

**गोरखवाणी -**

या ग्रंथात मायेचे स्वरूप वर्णन करणारी दोन सूत्रे आहेत.

तुंबी मे तिरलोक समाया, त्रिबेणी रविचंदा।
बूझो रे ब्रंभ गियानी, अनहत नाद अभंगा।। - गो. वाणी/२५७

**अर्थ :** मायेच्या पोटात बीजरुपाने समस्त त्रैलोक्य, त्रिवेणी, सूर्यचंद्र सर्व सामावलेले आहेत. हे ब्रम्ह ज्ञानियांनो! कधीही खंड न पडणारा अनाहत नाद ऐकण्याचा प्रयत्न करा. मायेच्या पकडीतून बाहेर पडण्याचा हा एकमेव उपाय आहे.

बहती नदी भाव भरि थांमी, सुरज देषि पछांही।
दुलभ देवल मन अगोचह, ता बेल्यां फल षांही।। - गोरखज्ञान/२९

**अर्थ :** त्यामधील गूढार्थासह अर्थ देणे योग्य वाटते. सूर्याचा अस्त होताना पाहून नदी स्तंभित झाली. त्यामुळे मन अगोचर ब्रम्हात लीन झाले व हे दुर्लभ शरीर कायासिध्द झाले. योगी लोक 'माया' रुपी वेलीचे फळ अशाप्रकारे खातात.

**गोरक्षशतकम् -**

या ग्रंथातील सूत्र

भवभयवने वन्हिर्मुक्ति सोपान मार्गत:।
अद्वयत्वं व्रजेन्नित्यं योगवित्परमेपदे।। - गो. शतक श्लोक १०१

**अर्थ :** हा जो मुक्ति सोपानाचा मार्ग आहे तो मायारुपी संसाराचे जे भयंकर अरण्य आहे त्यास अग्नीप्रमाणे आहे. योगी लोक नित्य अद्वयावस्थेतून त्यांच्या परमावस्थेत पोचतात.

**महार्थमंजरी -**

या ग्रंथातील एक सूत्र (गाथा)

ज्ञानक्रियामायानां गुणानां सत्वरजतमस्स्वभावानाम्।

अविभागावस्थायां तत्वं प्रकृतिरिति शांभवी शक्तिः।। - महार्थमंजरी गाथा क्र.२०

**अर्थ :** (समन्वयात्मक)

साम्यावस्तेतील प्रकृती जेव्हा सत्वगुणात्मक असते तेव्हा ती ज्ञानशक्ती आहे. रजोगुणात्मक असेल तर क्रियाशक्ती आहे. व तमोगुणात्मक असेल तर 'माया' शक्ती आहे. या शक्ती विभक्तपणे वरीलप्रमाणे काम करतात. पण जेव्हा प्रकृती संतुलनावस्थेमध्ये असते तेव्हा तिला शांभवी शक्ती म्हणतात. गोरक्षनाथांना प्रकृतीची ही मूळ साम्यावस्था अत्यंत महत्त्वाची वाटते.

यादृष्टीने विचार केल्यास गोरक्षनाथ ज्या नाथपंथाचे प्रणेते आहेत त्या पंथाच्या मतानुसार हे दृश्य व अदृश्य जग मिथ्या नाही. आद्यशंकराचार्यांनी जगाला मिथ्या म्हटले. तथापि, नाथपंथ जगाला मिथ्या म्हणत नाही. या संप्रदायाच्या मते माया ही एक शक्ती आहे. शिवतत्त्वाचे ते खरेखुरे सामर्थ्य असून त्या मधून जो काही विकास व उत्क्रांती घडून येईल ती घटना खरीखुरी असते तो कोणत्याही अर्थाने कल्पनाविलास नसतो. तसेच तो भ्रमही नसतो. म्हणजे नाथसंप्रदायाच्या मते, संपूर्ण सृष्टीची उत्पत्ती शक्तीने युक्त असलेल्या शिवतत्त्वातून होत असते. यावरून स्पष्ट होत जाते की, नाथपंथ हा जसा शिवाचा उपासक आहे. तसाच तो शक्तीचाही उपासक आहे. शिवशक्ती असे द्वैत नाथपंथास मान्य नाही. दुसऱ्या बाजूने विचार केल्यास नाथसंप्रदाय सगुण निर्गुणाच्या पलिकडे जाणारा संप्रदाय आहे. त्याने एवढे स्पष्ट केले आहे की, जीव हा ईश्वर रूपच असतो. त्यावर अज्ञानाचे आवरण असते. ते आवरण दूर झाले की, जीव आणि परमात्मा यांच्यात एकरूपत्व होते. श्री गोरक्षनाथांनी याबाबतीत स्पष्टपणे सिध्दांतरुप अशी मांडणी करुन जे काही ब्रम्हांडात आहे ते सर्व पिंडात म्हणजे देहात आहे असे प्रतिपादन सि. सि. पध्दती या त्यांच्या प्रसिध्द ग्रंथात केलेले असून त्यासंबंधी श्लोक खालीलप्रमाणे आहे.

ब्रम्हांडवर्ति यत्किंचित् तत् पिंडेप्यस्थि सर्वथा।

इति निश्चय एवात्र पिंडसंवित्तिरुच्यते।। - सि.सि.प/उपदेश३/२

**अर्थ :** ब्रम्हांडात जे आहे तेच पिंडस्थित आहे व असा निश्चय होणे (अनुभव येणे) यालाच पिंडसंवित्ति म्हणतात. नाथांच्या भाषेत सांगायचे झाल्यास निजपिंड व परपिंड एकरूप होतात. या अर्थाचा श्लोक सि.सि. संग्रह मध्ये आढळून येतो.

परापरविमर्शरुपिणी संविन्नानाशक्तिरुपेण निखिल पिंडाधारकत्वेन वर्तते इति सिध्दांतः।।

- सि.सि.संग्रह/उप४/२९

**अर्थ :** परासंवित् स्वरुप शिव आणि शक्ती यांच्या समरसतेचा स्पष्ट निर्णय आहे. व्यष्टी व समष्टी मधील सच्चिदानंद चेतन ब्रम्हच सर्व पिंडाचा आधार आहे.

प्रसरं भासते शक्ति: संकोचं भासते शिव:।

तयोर्योगस्य कर्ता य: स भवेत सिध्दयोगिराट्।। - सि.सि.प/उप६/६३

**अर्थ :** शक्ती सृष्टीच्या प्रसारातून व्यक्त होते. तर शिव तत्त्व त्याचा संहार करते. या दोन्ही शक्तींचा जो योग साधतो तोच सामरस्य योग होय व अशा सिद्धास सिद्धयोगीराट म्हटले जाते.

**४) ब्रह्मजगत संबंध व त्याच्या कारणउपपत्ती -**

गोरक्ष तत्त्वज्ञानात ब्रह्मजगत् संबंध हे कोणत्या पारिभाषित शब्दातून मांडलेले आहे ते पाहू. त्या मांडणीतून मूळ शक्तीतत्त्व सृष्टीच्या व मानवाच्या निर्मितीमध्ये कसे आविष्कृत झाले ते स्पष्ट होते.

परब्रम्ह (त्यातील आदिम शक्तितत्त्वे - निजा, परा, अपरा, सूक्ष्मा, कुंडलिनी)
↓
परपिंड (अविनाशी सगुण साकार परमेश्वर पिंड)
↓
अनादिपिंड (आदिम शक्तितत्त्वे पिंडस्वरुपात)
↓
आद्यपिंड (हिरण्यगर्भ : पंचमहाभूतांचे समष्टीरुप)
↓
महासाकारपिंड (पंचभूतात्मक समष्टीरुप)
↓
प्रकृतिपिंड (पंचभौतिक शरीर - पिंडशरीर)
↓
→ स्त्री पुरुषरुप पिंडोत्पत्ति.[२] (संदर्भ - सि.सि.प. उपदेश १)

परब्रम्हस्थित आदिम शक्तितत्त्वापैकी 'निजा' ही जी शक्ती आहे तिलाच वेदांतात 'माया' म्हटले जाते तर सांख्य हिला प्रकृति म्हणतात. या शक्तीचे सृजन व प्रसरण व संकोच यावर सर्व सृष्टीचक्र स्थित असते. त्याचप्रमाणे देहस्थित शक्तीतत्वाला कुंडलिनी म्हणतात व विश्वात व्याप्त असणाऱ्या शक्तीला महाकुंडलिनी म्हणतात. नाथमताप्रमाणे हा सर्व शिव-शक्तीचा विलास असून शक्तीच्या व्यक्त रुपाला 'कुल' म्हणतात तर अव्यक्त रुपाला 'अकुल' म्हणतात. पिंडी ते ब्रम्हांडी म्हणजे काय तर वरील सृजनाच्या क्रियेप्रमाणे ब्रम्हांडतत्वेच साकार पिंडात व्यक्त होत असतात. पिंड ही ब्रम्हांडाचीच छोटी आवृत्ती असते. या ज्ञानालाच 'पिडंसंवित्ति' म्हटलेले आहे मानवाच्या कोणकोणत्या शरीरांगात ब्रम्हांडाचा कोणकोणता अंश आहे याचे विवेचन सि.सि.प. तृतीय उपदेशात आहे.

या संदर्भात भारतीय तत्त्वज्ञानातील विविध उपपत्ती गोरक्षनाथ नाकारतात. बिंबप्रतिबिंबवाद, अध्यासवाद, विविर्तवाद, भेदाभेदवाद अशा सर्व उपपत्ती त्यांनी नाकारलेल्या आहेत. त्यांना ब्रह्मपरिणामवाद फक्त मान्य आहे.

ब्रम्हपरिणामवाद स्पष्ट करणारी श्री गोरक्षनाथांची सूत्रे खालीलप्रमाणे आहेत.

ब्रम्हांडवर्ति यत्किंश्चित् तत् पिंडप्यस्ति सर्वथा।

इतिनिश्चय एवात्र पिंडसंवित्तिरुच्च्यते।। - सि.सि.संग्रह उप. ३/२

शिवस्याभ्यंतरे शक्ति: शक्तरेभ्यंतरे शिव:।

अंतरन एव जानीयात् चंद्रचंद्रिकयोरिव।। - सि.सि.प. उप. ४/२६

**अर्थ :** जे ब्रम्हांडात आहे ते सर्व या पिंडात (देहात) आहे. अशा निश्चयाला पिंडसंवित्ति म्हणतात.

**अर्थ :** शिवात शक्ती आहे व शक्तीत शिव आहे.जसे चंद्र व चांदणी यांत फरक नसतो त्याप्रमाणे शिवशक्तीत फरक नाही.

श्री गोरक्षनाथांच्या विविध सूत्रांमधून ब्रम्हपरिणामवाद वरीलप्रमाणे व्यक्त झालेला आहे. श्री गोरक्षनाथांच्या वाङ्मयात किंवा ज्याला नाथवाङ्मय किंवा नाथमत म्हणता येईल त्यामध्ये हे अद्वैत, परमाद्वैत स्वरुपात किंवा सामरस्य सिध्दांत स्वरूपामध्ये स्पष्टपणे मांडलेले दिसून येते. मानवी जीवन अशा परमबोधापर्यंत नेणारा एक स्वतंत्र योगमार्ग श्री गोरक्षनाथांनी सिध्द केला. त्यांचा सिध्दांतवाद 'पदपिंडपध्दती' या नावाने रुढ झाला. ''पिंडमध्ये चराचरं यो जानाति स योगी पिंडसंवित्तिर्भवति'' हे सि.सि.प. तृतीय उपदेश सूत्र १ (अर्थ: देहपिंडामध्ये चराचर उपस्थित आहे असे जो जाणतो तो व्यष्टी आणि समष्टी पिंडाचा ज्ञानी होतो) किंवा ''एवं कुलाकुलरुपा सामरस्य प्रकाशभूमिकास्फुटीकरण एकएव समर्था या सा ऽ परंपरा शक्तिरेवावशिष्यते'' - सि.सि.प./उपदेश/४/१०

**अर्थ :** अशा प्रकारे ही कुलाकुलरुप परा शक्ती समरसता रुप अभेदएकतेच्या प्रकाशरुप स्थितीला प्रकट करत असताना (प्रलयावस्थेत) अपरंपरा 'निजा' शक्तीच्या रुपाने शिल्लक रहाते. या श्लोकांच्या माध्यमातून परमाद्वैताची भूमिकाच मांडली जाते. श्री ज्ञानेश्वरांनी या शक्तीच्या जगतव्यापारास 'चिद्‌विलास' या नावाने सर्वांना सुपरिचित केले. नाथसंप्रदायातील प्रमुख सिध्दांचे हे मत माया, शक्ती, अविद्या, आभास, भ्रम सर्व मानते. पण 'जगन्मिथ्यावाद त्यांना मान्य नाही. ते 'आभास' हा शक्तिभाव व 'निराभास' हा शिवभाव मानतात. शिव आणि शक्ति किंवा ब्रम्ह आणि माया हे अविभक्त तर आहेतच. तसेच एक निर्गुण व दुसरे सगुण असे असून अंतिमत: ते एकरुपच आहेत.

याचा अर्थ असा की संकोचाची आदि व अंत ही शिवावस्थाच आहे. शिव व शक्ति यांचा संयोग घडवणे हाच योग होय. या योगात पिंडब्रम्हांड एकरुप होतात. पिंडाने पिंडाचा ग्रास होतो. या प्रक्रियेलाच श्री ज्ञानेश्वरांनी 'पंथराज' म्हटले आहे. हे शिवतत्त्व द्वैताद्वैत विलक्षण असे आहे. ते परम अद्वैत आहे. म्हणजेच ते द्वैत किंवा अद्वैतरहित सर्वत्र सर्व काळ

अद्वैत असे असून या प्रकारच्या सिध्दांताला ‘सिध्दमत’ म्हटलेले आहे. महायोगी श्री गोरक्षनाथ त्यांच्या ‘सिध्दमताची’ श्रेष्ठता स्पष्ट करत असतानाच खालील श्लोकाद्वारे त्यांचे द्वैताद्वैतविलक्षण मतही स्पष्ट करत आहेत.

वेदांती बहुतर्क कर्कशमतिर्ग्रस्त: परं मायया।
भाट्टा: कर्मकलाकुला हतधियो द्वैतेन वैशेषिका:।
अन्ये भेदरता: विवादविकला: सत्तत्त्वतोवंचिता:।
तस्मात् सिध्दमतं स्वभावसमयं धीर: सदा संश्रयेत्।। - सि.सि.प./उपदेश६/७३

**अर्थ :** वेदांती लोक विविध तर्ककठोर अवस्थेत ग्रस्त रहातात, व मायेचे खंडन करत जगताला मिथ्या व ब्रम्हाला सत्य म्हणत असतानाच स्वत: मायेने भ्रांत रहातात, कुमारिल भट्ट मतानुयायी मीमांसक केवळ कर्मामध्ये अडकून द्वैतवादामुळे मतीभ्रष्ट होतात, वैशेषिक दर्शन मांडणारे विद्वानही द्वैतात अडकतात. अन्य विभिन्न मताचे अनुयायी भेदभेदात कठोर वाद करत स्वात्मबोधाला (सत्तत्त्व) वंचित रहातात. म्हणून सिध्दमतानुयायांनी (सिध्दयोगमार्गानुयायी) स्वाभाविकपणेच द्वैतअद्वैतरहित अशा सिध्दमताचा नेहमी आश्रय घेतात. या प्रकारे ‘सिध्दमता’ नुसार द्वैताद्वैतविलक्षण भेदातीत अवस्थेत जाणे हे महासिध्द योग्याचे लक्षण असून शक्ति व शिव या रुपात हे सिध्दलोक अद्वयानुभव घेतात.

वरील विवेचनात श्री शंकरार्यांचे अद्वैत व श्री गोरक्षनाथांचे अद्वैत एकमेकाचे साक्षीने समोरासमोर जगत प्रपंचाच्या सत्यस्वरुपाच्या चिकित्सेसाठी अहंकार निरपेक्ष भूमिकेत व या ज्ञान चिकित्सेचा सामाजिक व वैयक्तिक संदर्भाचे भान ठेवत प्रयत्नशील आहेत. त्यादृष्टीने दोन्हीचे तुलनात्मक समालोचन (commentary) हे श्री गोरक्षनाथांचे सामरस्यसिध्दांतरुपी परमाद्वैत समजण्यासाठी आवश्यक वाटते.

इथे शांकर अद्वैत व नाथांचे परमाद्वैत हे एकमेकासमोर उभे असले तरी हे दोन्हीही प्रवाह वेदांत या मूळ प्रवाहाच्या शाखा आहेत हे स्पष्टपणे समोर असणे जरुर आहे. श्री शंकराचार्य, रामानुज, मध्व, वल्लभ, निंबार्क हे वेगवेगळ्या विचार भिन्नतेचे प्रतिनिधी आहेत. त्यामुळे वैचारिक व सैध्दांतिक भिन्नता असली तरी शत्रुत्व नाही.

त्याचप्रमाणे या दर्शनशास्त्रांचा केवळ तात्विक पातळीवर विचार न करता त्यांचा सामाजिक संदर्भ पहाणेही जरुरीचे आहे. वर नमूद केलेल्या वेगवेगळ्या शाखांचे प्रमुख हे वृत्तीने सन्यस्त असले तरी त्यांचे जीवनात कर्म, ज्ञान व भक्ती यांचा परिपोष व त्या अनुशंगाने मानवी जीवन ज्ञानसंपन्न, सुख समाधान युक्त, दु:खमुक्त करण्याचा पराकोटीचा आटापिटा त्यांची तीव्र अशी प्रेमयुक्त तळमळच दर्शवतो. सत्यदर्शनासाठी विश्व व व्यक्तीस दोन प्रकारे विचारात घेतलेले दिसून येते.

१) स्वीकार, २) अस्वीकार, ३) उदा. शंकराचार्यांनी ब्रह्माचा स्वीकार केला व जगताचा अस्वीकार केला. तर गोरक्षनाथांनी असे काही न करता संपूर्ण विश्व हेच आत्म्यात सामावलेले आहे. असे स्वच्छपणे सांगीतले. याचा अर्थ असा की, ब्रह्म हे जसे अंतिमत: सत्य असते तसेच आत्मतत्त्वही तितकेच सत्य असते. एवढेच नव्हे तर विश्व आणि व्यक्ती यांच्यात एकरूपता असते. स्वाभाविकच जगाचा आणि अंतिम सत्याचा संबंध उभयविध आहे, म्हणजे दोन्ही बाजूनी आहे. म्हणूनच गोरक्षनाथ म्हणतात पिंडी ते ब्रह्मांडी व ब्रह्मांडी ते पिंडी. असा उभयविध संबंध कितीतरी विचारवंतांनी व दर्शनकारांनी मांडलेला दिसत नाही.

विशिष्टाद्वैतवाद्यांचे मते कार्य हे कधीच कारणापासून भिन्न नसते. कार्य हे कारणाचेच रुपांतर असते. म्हणून हे विश्व जर कार्य असेल आणि त्याचे ईश्वर हे जर कारण असेल तर विश्व हे ईश्वररुपच असले पाहिजे. ईश्वरच या जगाचे निमित्त आहे व उपादान पण (सामग्री) आहे. आता ईश्वर हे कारण पूर्ण शुध्द व पूर्ण आहे तर त्यातून निर्माण होणारे हे जग असे कसे? तर त्या वादाचे म्हणणे असे आहे की ईश्वर, प्रकृति व जीव या तीन्ही सत्ता एकच आहेत. ईश्वर हा जणुकाही आत्मा आहे व प्रकृती व जीव हा देह आहे. याचा अर्थ असा की हे सर्व विश्व ब्रम्हांड व समस्त जीव ही त्या ईश्वराचा देह आहेत व ईश्वर त्यांचा आत्मा आहे (म्हणजे सर्व आत्मांचा आत्मा) या विश्वदेहात घडणाऱ्या बदलांचा त्या विश्वात्म्यावर काही परिणाम होत नाही. विशिष्टाद्वैत वाद्यांच्या मते या विश्वात असा एकही कण नाही की ज्यात तो ईश्वर नाही. जीवात्मे हे समर्याद असतात. सर्व व्यापक नसतात विकास झाला म्हणजे पूर्णत्व पावल्यानंतर हे आत्मे ईश्वरासन्निध राहू शकतात.[३] (संदर्भ : ज्ञानयोग - स्वा.विवेकानंद पान ३६२-३६४) विशिष्टाद्वैतामधील जे सैध्दांतिक विचार वर दिले त्याची पुढची पायरी किंवा त्यातील प्रगत अवस्था म्हणजे ही ईश्वरीसत्ताच हे विश्व बनत असली तरी ही सत्ता कोणत्या माध्यमातून व्यक्त होऊन काम करते? ते माध्यम म्हणजे सर्वसत्ताधीश आत्मतत्त्व! आत्मतत्त्व हे अनंत, सर्वातीत, ज्ञानातीत, असून त्याच्यामध्ये व त्याच्या मधूनच हे विश्व अनुभवले जाते. हे तत्त्वच केवळ एकमेवाद्वितीय सत्य असून ते सर्वाच्या अतीत आहे. नामरुपात्मक भेदामुळे त्या सत्यात फरक पडतो. हे सर्व विश्व त्या आत्म्याचेच प्रतिबिंब आहे. आरसा जसा असेल तसे प्रतिबिंब मिळते. हे आत्मतत्त्व मानवाच्या माध्यमातून सर्वश्रेष्ठ तऱ्हेने व्यक्त होऊ शकते. त्यामुळे आत्मतत्त्व जेव्हा परिपूर्णतेने मानवातून व्यक्त होते तेव्हा तो मानवच ईश्वररुप होतो. या मुद्याबद्दल स्वामी विवेकानंद म्हणतात ''भूतकाळी, वर्तमानकाळी आणि भविष्यकाळी कधीही अस्तित्वात असलेला एकमात्र ईश्वर म्हणजे मानवच होय. म्हणून मला माझी स्वत:चीच आराधना करायची आहे. आपल्या आत्म्याचीच उपासना आपणास करायची आहे.''[४] (संदर्भ-

आत्म्याच्या विकासावस्था  ज्ञानयोग  पान ३६९) या पूजा प्रकाराला 'सोपान महापूजा' असा शब्द समर्थ संप्रदायी सिध्द पुरुष श्री. श्रीधरस्वामी यांनी वापरला आहे. विश्वरुपी अनंत आत्मतत्वाशी आपल्या आत्म्याचे एकरुपत्व अनुभवास येणे, त्या अनंत आत्मशक्तीत व्यक्तीचे नाहीसे होणे  व सर्व द्वैत अद्वैत भावावस्थांच्या पलिकडे जाणे ही स्थिती म्हणजेच निखळ अद्वैत! म्हणजेच परमाद्वैत! म्हणजेच द्वैताद्वैतविलक्षण! नाथमतांचा हा अभिप्राय आहे. त्यात  हा अर्थ अनुस्मूत आहे.

त्याचा सामाजिक संदर्भ व त्यातील अनुस्यूत उद्देशसूत्रही पाहू.

श्री गोरक्षनाथ हे महायोगी होते. तसेच ते महान कर्मयोगी पण होते. ही एकच गोष्ट त्यांच्या सामाजिक उत्कर्ष व स्वास्थाच्या तीव्र तळमळीची साक्ष देते. त्यानी स्वत:ची सिध्दता आत्मानुभूतीतून व गुरुकृपाशिर्वादातून सिध्द केली व त्याचे फलस्वरुप ते समाजजागृतीच्या रुपात नाथसंप्रदायाचे शुध्द स्वरुपातील बीजारोपण करु शकले. सर्व तऱ्हेच्या अनैतिकतेचा त्यांनी निषेध केला व ज्ञानरूप व प्रकाशरूप अशा आत्म्याच्या प्रगटीकरणासाठी आग्रह धरला. त्यासाठी आवश्यक त्या प्रयत्नांची मांडणीच त्यानी त्यांच्या विविध ग्रंथात केली आहे. त्यामध्ये सि.सि.पध्दती या ग्रंथातील त्यांची सूत्रे हे त्यांचे अनुभवसिध्द सिध्दांत असल्यामुळे त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्यांचा परमाद्वैतरुप परमपदसिध्दीसाठी स्वानुभव (self realisation) हा त्यांचा एकमेव दंडक आहे. तिथे अन्य कोणतेही प्रमाण नाही. सि.सि. पध्दतीच्या पंचम उपदेशात सूत्र क्र २ व सूत्र क्र. ६ ही त्याचीच निदर्शक आहेत.

परमपदम् इति स्वसंवेद्यम् अत्यंताभासाभासकमयम्।।  - उप. ५/२

**अर्थ :** ते स्वसंवेद्य परमपद फक्त स्वानुभवानेच  कळू शकते. अन्यथा ते अतिशय भास आभासमय आहे.

यस्मिन दर्शिते सति तत्क्षणात् स्वयंवेद्य साक्षात्कार: समुपद्यते।। - सि.सि.प.उप./६

**अर्थ :** गुरुंच्या कृपाशिर्वादरुप दृष्टीक्षेपणातच हा परमपदाचा अनुभव देणारा (स्वसंवेद्य) साक्षात्कार घडत असतो.

हा आत्मतत्त्वाचा प्रकाशरुप अनुभव ही जीवनसमस्यांवरचा एकमेव तोडगा श्री गोरक्षनाथ समजतात. श्री गोरक्षनाथांची सामाजिक सुस्थितीची धारणा ही सुखवाद व बुध्दिवाद याबाबत समाज शास्त्रज्ञांच्या व नीतिशास्त्रातल्या ज्या धारणा आहेत त्यापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. आत्म्याचा सारभूत अंश हा भावना (emotions) का बुध्दी (intellect) हा विषय श्री गोरक्षनाथांचे दृष्टीने महत्वाचा नसून दोन्हीचा यथार्थ समन्वय ही बाब महत्वाची आहे. दोन्हीचा समन्वय झाला तरच बुध्दी भावनेचे नियमन करते व भावना बुध्दीला शुष्कतेपासून दूर ठेवते.  समरसता, एकरुपता या अवस्थांवर श्री. गोरक्षनाथांचा फार आग्रह आहे. कारण समन्वयासाठी, संतुलनासाठी अन्य मार्ग नाही. श्री गोरक्षनाथांनी सामाजिक

बदल घडवून आणण्यासाठी समाज व व्यक्ती या घटकानाच केंद्रस्थानी ठेवून व्यक्तीच्या संपूर्ण परिवर्तनाचा आग्रह धरला. यातला महत्वाचा घटक व्यक्ती असून समाजाचा विचार त्या अनुशंगाने केला आहे. यासाठी समाज व व्यक्ती या दोन्ही घटकांचे नीतिशास्त्रात विवेचन आहे. श्री गोरक्षनाथाच्या परमाद्वैत शिकवणुकीतील मूलभूत तत्त्व आहे व्यक्तीच्या आत्मतत्वाचा विकास व विश्वव्यापकत्वाचा प्रकाशरुपात अनुभव. त्यादृष्टीने व्यक्ती व्यक्ती मिळून समाज बनतो तर व्यक्ती- कुटुंब -गाव- देश- राष्ट्र अशा चढत्या क्रमाने समाजाची संकल्पना करावी लागते. आपण व्यक्ती या नात्याने समाजाचे घटक आहोत तर समाजातील इतर घटकांची सेवा करण्याबरोबरच प्रथमत: घटक या नात्याने आपणच आपली सेवा करणे आवश्यक आहे का? याचे उत्तर होय असे असेल तर प्रत्येक व्यक्तीने निस्वार्थपणे स्वत:ला घडवणे व ईश्वरी प्रेमासारख्या व्यापक अशा पातळीवर स्वत:चे जीवन नेणे ही स्वत:ची स्वत: केलेली सेवाच ठरते. प्रत्येकजण दुसऱ्या कुणीतरी आपली सेवा करावी असे अपेक्षितो. मात्र जोपर्यंत आपण आपली सेवा करुन (म्हणजे आपल्या अंत:स्थित आत्मतत्वाची सेवा करुन) व्यापक समाजसेवेसाठी सुयोग्य बनत नाही तोपर्यंत अन्य घटकांची सेवा ही दांभिक किंवा अर्थाजनाचे साधन ठरण्याचीच शक्यता जास्त असते. स्वत:ची ही एक अनोखी सेवा ही स्वच्छेने स्वीकारली जात असल्याने, जबरदस्ती नसल्याने, त्यातून सहज प्रत्याहार जेव्हा घडू लागतो तेव्हा दया, क्षमा, सत्य, अहिंसा, संयम असे संयमित जीवन स्वखुशीने स्वीकारले जाते व वागणेही तसेच घडते. त्यामुळे न्याय-अन्याय, स्वार्थ-नि:स्वार्थ, काय करावे वा करु नये हा सारासार विचार व्यक्तीला नेहमी संयमित अशा मध्यमार्गावरच ठेवतो. हा मध्यमार्ग हाच खऱ्या समाजसेवेचा राजमार्ग आहे असे श्री गोरक्षनाथ म्हणतात. समन्वयात्मक मध्यमार्ग हा सामान्य विषय नसून सर्व मानवी जीवन तोलून धरुन ते सर्व तऱ्हेच्या दु:खापासून मुक्त करण्याचे व ते जीवन निर्वाण सुखापर्यंत म्हणजे मोक्षापर्यंत नेण्याचे अमोघ सामर्थ्य या मार्गात आहे. म्हणूनच श्री गौ.बुध्दांनी या मार्गाला त्यांच्या महत्त्वाच्या सिध्दांतात समाविष्ट केले आहे. श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या योगसाधनेमध्ये श्री गौतमबुध्दांच्या 'मज्जिम निकाय' या मध्य मार्गास अत्यंत महत्त्वाचे स्थान दिलेले असून श्री गोरक्षनाथांचे तत्वज्ञानाच्या मूलभूत सिध्दांतांपैकी तो एक सिध्दांत मानला जातो. 'समयुत्त निकाय' असा शब्दही श्री गौतम बुद्धांनी 'मध्यस्थित'सत्याचे स्वरूपाबद्दल वापरला आहे.[५] (संदर्भ - Spiritual Heritage of India, Page 177)

### ५) अंतिम शक्तीची अनुभाव्यता :

श्री गोरक्षनाथांच्या सद्वस्तुमीमांसें अंतर्गत आणखी विषय आहे तो हा की त्या अंतिम तत्वाचा, शक्तीचा, अनुभव येतो का? ते तत्त्व अनुभाव्य आहे का? जगात आदिम जमाती पासून ते प्रगत मानवापर्यंत अनेक धर्म व त्यातील अनेकांचे अनुभव हा एक स्वतंत्र विषय

होऊ शकतो. श्री गोरक्षनाथांच्या वाङ्मयात अशा शक्तीचा अनुभवासंबंधीचे संदर्भ खालीलप्रमाणे देता येतात.

एतानि साधनानि सर्वाणि दैहिकानि परित्यज्य।

परमपदे ऽ दैहिके स्थीयते सिध्दपुरुषैरिति।। - सि.सि.प./उप५/६३

**अर्थ :** वरील सर्व साधने देहमाध्यमातूनच साध्य होतात. म्हणून यामधे आसक्त न होता सिध्दपुरुष व योगी अदैहिक परमपदाच्या साधनेत स्थिर होतात.

अशा स्थितीनंतर त्या परमपदाचा अनुभव येण्याचा उपाय काय? तर

गुरुदृक्‌पातनात् प्रायो दृढानां सत्यवादिनां स्थितिर्जायते।। - सि.सि.प./उप५/६४

प्रसादात् स्वगुरो: सम्यक प्राप्यते परम् पदम्।। - सि.सि.प. उप५/६५

**दोन्हीचा अर्थ :** सत्यदर्शनाची इच्छा धरुन योगाभ्यासात स्थिर झालेल्यांना गुरुच्या करुणामय दृष्टीच्या प्रसादानेच, त्या कृपेनेच त्या परमपदाची प्राप्ति होते. /६४

अशा प्रकारची प्राप्ती झाल्यानंतर योगी अवधूत अवस्थेत प्रविष्ट होतो. ही सम्यक अवस्था गुरु प्रसादानेच प्राप्त होते./६५ हे अनुभवास येणारे तत्त्व अव्याख्येय असल्यामुळे त्याची अभिव्यक्ती विविध तऱ्हेने होत रहाते. त्यामुळे साक्षात्कारी लोकांचे अनुभव कथनात त्यांच्या त्यांच्या भावदशेप्रमाणे भिन्नता आढळते. मात्र या विविध अनुभवांचे काही निकष (criterion) ठरवता आले तर ते पहायचे आहे. या निकषांचे आधारावर अनुभवांची सत्यता पडताळता येऊ शकते. ते निकष साधारणपणे असे मांडता येतील.

अ) अनुभवाची सार्वत्रिकता (Universality)

ब) अनुभवाचे अखंडत्व (Continuity)

क) त्यातील आनंदावस्था (Beatification)

ड) अनुभवांचे अतींद्रियत्व (Super sensuousness)

उपासनेतून जी शक्ती निर्माण होते, ती मेंदूतील पाच ज्ञानेंद्रियांच्या केंद्रावर आघात करते. त्याची प्रतिक्रिया म्हणून हे अनुभव येतात.

ततः प्रातिभश्रावणवेदनादर्शास्वादवार्ता जायन्ते- पातंजल यो. सू. ३६ विभूतिपाद

**अर्थ :** संयमशक्तीने प्रातिभ (दूरस्थ दृष्टी), श्रावण (दिव्य शब्द) वेदन (दिव्य स्पर्शानुभव) आदर्श (दिव्यरुप दर्शन ) आस्वाद (दिव्य रसानुभव) व वार्ता (दिव्य सुवासअनुभव) अशा सहा प्रकारच्या सिध्दी(शक्ती) प्राप्त होतात. हे अनुभव काल्पनिक नसतात. सत्य असतात. अनुभव येणाऱ्या व्यक्तीमध्ये बुध्दी, भावना व क्रियाशक्ती या एकरुपत्वाने कार्यरत होतात. अनुभवानंतरचे जीवन अतिशय उदात्त व नैतिक असते. अनुभव आलेली व्यक्ती आत्मतृप्त

(self gratified) असते. ही एक अुन्मनावस्था असते. (State of sublimation) याचे वर्णन छांदोग्य उपनिषद (७.२५) मध्ये आत्मरति, आत्ममिथुन व आत्मक्रीड असे केलेले आहे.[६]

(संदर्भ: गुरूदेव आर. डी. रानडे, चरित्र आणि तत्त्वज्ञान, पान २४७-२५४)

साक्षात्काराचा लाभ हे मानवी जीवनातले अत्यंत श्रेष्ठ व अत्यंत दुरापास्त असे लक्ष्य असते. अपूर्णतेकडून पूर्णतेकडे, मूळ क्रमसंकोचित अवस्थेतील चेतनेच्या प्रकाशाकडे नेणारी ही घटना एकदम घडल्यासारखी जरी दिसली तरी ती क्रमाक्रमाने विकसित होणारी प्रक्रियाच असते.[७] (संदर्भ: आत्मसाक्षात्काराचे तत्त्वज्ञान पान) या प्रक्रिया कोणकोणत्या मार्गाने घडू शकतात? हे प्रक्रिया मार्ग म्हणजेच वेगवेगळे साधनमार्ग. या वेगवेगळ्या मार्गामधील मुख्य विषय असतो आत्मस्वरुपाचे झालेले विस्मरण. हा अनात्मबोध (Non self consciousness) आत्मबोधाच्या (self consciousness) अनुभवामध्ये स्थिर होणे हे उद्दिष्ट असते. त्यासाठी केले जाणारे प्रयत्न म्हणजे साधना. साधन हे दैहिक माध्यमातूनच करावे लागते. त्यामुळे कर्म अटळ आहे. म्हणून व्यक्तिप्रकृतिधर्मपरत्वे वेगवेगळ्या उपासना पध्दती स्वीकाराव्या लागतात.

भारतीय धर्मपरंपरेत सर्वांना सामावून घेण्याच्या वैशिष्ठ्यानुसार उपासनेचे विविध मार्ग विकसित होत आलेले आहेत. त्यातील प्रमुख मार्ग : हठयोग, राजयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, शिवयोग. या व्यतिरिक्त तंत्रयोग, मंत्रयोग, यंत्रयोग, क्रियायोग, लययोग अशा अनेक अंगानी हा विषय सूक्ष्मस्तरावर विस्तारलेला आहे. अर्थाच्या दृष्टिकोनातून हठयोग म्हणजे शरीरयोग, राजयोग म्हणजे चित्तयोग, भक्तियोग म्हणजे भावयोग, ज्ञानयोगाला बुध्दियोग असे सर्वार्थरमणीय नाव श्रीमद् भगवद्गीतेमध्ये आहे.

जगाच्या इतिहासात हजारो वर्षे ह्या परंपरागत मार्गांचा उहापोह चाललेला दिसून येतो. वरील सर्व मार्गातील प्रयत्नांचा उद्देश फक्त आत्मानुभूती जर असेल तर ते सर्व प्रयत्न हे ब्रम्हविद्यामंदिराच्या पायऱ्यांप्रमाणे सिध्द होतात. सर्व प्रयत्नांच्या विविधतेतून फलनिष्पत्तीरुप एकताच स्पष्ट होते. त्यामुळे वेगळेपणातूनही विविध मार्गातले सहचर्य, सहकार्य व सहनिष्पत्तीरुप फलनिष्पती अपेक्षित असते. यामुळे 'समत्वं योग उच्यते' असे भगवद्गीता म्हणते (गीता २/४८) तर 'समरसं क्रियते इति सिध्दांत:', सि.सि.प.उप. ५/७ असे गोरक्षयोग स्पष्ट करतो. श्री गोरक्षतत्वज्ञानांतर्गत जे योगशास्त्र समोर येते त्यामध्ये वर निर्देश केलेल्या मार्गांपैकी कोणते मार्ग कशा प्रकारे मांडले गेले आहेत हे पहायचे आहे व जे मार्ग ब्रम्हविद्यांतर्गत असतात त्यांचे कांही मानसशास्त्र असल्यास तेहि थोडक्यात मांडावे असा हेतू आहे.

## ६) श्री गोरक्षतत्त्वज्ञानांतर्गत विविध योगांची मांडणी :

**हठयोग -**

हठयोगसाधना ही प्राणसाधना असून त्या बद्दलची सूत्रे :

हकार: कीर्तित: सूर्यष्ठकारश्चंद्र उच्चते।

सूर्याचन्द्रमसोर्योगाद् हठयोगो निगद्यते।। - सि.सि.प.उप१/६९

**अर्थ :** 'ह'कारास सूर्य म्हटले आहे व 'ठ'काराला चंद्र। या सूर्य-चंद्राच्या या योगालाच हठयोग म्हणतात.

हकारेण तु सूर्यो ऽ सौ ठरारेणदुरुच्च्यते।। - योगबीज/१४६

**अर्थ :** 'ह' काराला सूर्य व 'ठ' काराला चंद्र म्हटले जाते.

हठयोग साधनेचे साधन आहे मानवी शरीर म्हणून अनेक चमत्कारांनी भरलेल्या मानवी देहाच्या गहन तत्त्वातून ब्रम्हांड तत्त्वाशी समरसता साधण्याच्या क्रियेला हटयोग म्हटले जाते.

आत्मा हे शिवतत्व व शरीर ही त्याची शक्ती असून त्यांचे मीलनात शारिरिक व मानसिक क्रियांचा समावेश प्राणसाधनेच्या रुपात होतो. हठयोगाचे बाबतीत नाथसंप्रदायी साधना व पतंजलींचे योगदर्शन प्रमाण मानले जाते. पतंजलींनी अष्टांगयोगाची मांडणी केली. (समाधिपाद सूत्र ३०) तर श्री गोरक्षनाथांनी अष्टांगयोग (सि.सि.प. उपदेश २ / सूत्र ३२) व षडंगयोग (गोरखयोग सूत्र ७) अशी मांडणी केली. या सर्व प्रक्रियांमध्ये गुरुमार्गदर्शन व त्यांच्या कृपेची अनिवार्यता स्पष्ट करताना 'गुरुमयं ज्ञेयं निरुत्थं पदम्' (सि.सि.प.उपदेश ६/ सूत्र ९३) अशी अनेक सूत्रे त्यांचे वाङ्मयात आहेत.

श्री गोरक्ष तत्वज्ञान हे एक यथार्थ दर्शन असल्यामुळे योगाच्या सर्व अंगांचा विचार सि.सि.पध्दतीत व गोरखयोग (गोरखपध्दती भाग १ व भाग २) यामध्ये तसेच योगबीज, गोरक्षशतकम् (इंग्रजी) या ग्रंथामध्ये केला गेलेला असून त्यातील विविध योगक्रियांचा उद्देश प्राणशक्तीच्या मानसिक क्रिया मानसिक उपायांनीच संयमित करणे व पिंडस्थित ब्रम्हांडाचा अनुभव घेणे हा राजयोगांतर्गत विषय आहे. 'अमनस्क योग' ग्रंथात उत्तरार्थामध्ये

राजयोग: स कथित: स एव मुनिपुंगव।

राजत्वात् सर्व योगानां राजयोग इति स्मृत:।। - अ.योग/३/उत्तरार्थ

**अर्थ :** हे मुनिश्रेष्ठा, याला राजयोग म्हणतात कारण तो योगात सर्व योगांचा राजाच आहे.

या सूत्रापूर्वी अमनस्क योगामध्ये योगाचे दोन भाग मांडलेले आहेत. योगाच्या बाह्य मुद्रांचा समावेश असतो तो 'तारक योग व अंतर्मुद्रांचा' समावेश असतो तो 'अमनस्क योग' असे म्हटलेले असून हा अमनस्क योग म्हणजेच राजयोग. वरील विषयाचे विवेचन श्री

गोरक्षनाथ विरचित 'अमनस्क योग' या मध्ये असून ते भगवानशिव व मुनिश्रेष्ठ वामदेव यांच्यामधील संवाद रुपात आहे. पूर्वाधात ९८ श्लोक व उत्तरार्धात ११३ श्लोक असून राजयोगांतर्गत विवेचनाबरोबरच तारकयोग रहस्य, गुरुची लक्षणे, योगसाधनेचे प्रकार, विभूति लक्षण, कर्मकांडनिषेध, शांभवी मुद्रा रहस्य, आनंदावस्था, सिध्दांचे प्रकार असा सर्व विषय त्यात अंतर्भूत आहेत. श्री गोरक्षप्रमाणित योगसाधन प्रणालीचाच हा भाग आहे.

**कर्मयोग :**

श्री गोरक्षनाथांच्या कर्मयोगाबद्दल जितके लिहावे तितके कमीच पडेल. नाथसंप्रदायाचे प्रवर्तक श्री गोरक्षनाथ हे मध्ययुगातील महान धर्मनेता होते. अपूर्व संघटन कौशल्य, कुशाग्र बुध्दी, श्री ज्ञानेश्वरांनी ज्यांचे वर्णन 'विषयविध्वंसैकवीरु' म्हणून करुन त्यांच्या अुज्वल शुध्द स्फटिकवत चारित्र्याची प्रशंसा केली असे श्री गोरक्षनाथ त्यांच्या गुरुकृपांकित अशा अतुलनीय योगबलासह मध्ययुगीन वामाचार व पाखंडी साधन प्रणाल्यांच्या विरोधात उभे राहून सर्व तऱ्हेच्या दुराचरणाला विरोध करताना दिसून येतात. नाथसंप्रदायाचे शुध्दीकरणाचे सर्व श्रेय श्री गोरक्षनाथांकडे जाते. कर्मयोग सिध्द करताना कर्म करणारी व्यक्ती ही केंद्रस्थानी मानून बाह्य अवडंबराचे खंडन करत असताना व्यक्तीला स्वत:चे सत्यस्वरुप कळल्याशिवाय स्वत:चे जीवनात व सामाजिक जीवनात खऱ्या अर्थान सुख, समाधान व प्रगती साधता येणार नाही असे सिध्दांत स्वरुप तत्वज्ञान त्यांनी त्यांचे ग्रंथातून स्पष्टपणे मांडले आहे. या संबंधातही काही सूत्रे अतिशय अर्थपूर्ण आहेत. ज्या युगात समाजसेवा करायची आहे ते युग किंवा काळ कसा आहे? हेही पाहणे आवश्यक आहे.

हिरदा का भाव हाथ मै जाणिये यहु कलि आई षोटी।

बदन्त गोरष सुणौरे अवधू करवै होई सु निकसै टोटी।। - गोरखवाणी/१२३

**अर्थ :** हटदयात जसा भाव तसे हातातून कर्म घडते. हे कलियुग वाईट आहे. म्हणून श्री गोरखनाथ म्हणतात की हे अवधूत, जे कमंडलूत असेल तेच तोटीतून निघेल. मानवी जीवन हेच कर्मक्षेत्र आहे. त्या क्षेत्राची व्यवहार्य अशी जाणीव काम करणारास असली पाहिजे. समाजकार्य करत असताना व्यक्तीने कमलवत राहून कर्मयोग सिध्द केला पाहिजे. म्हणून ते एका सूत्रात म्हणतात.

ग्यांन सरीष गुरु न मिलिया, चित्त सरीषा चेला।

मन सरीषा मेलु न मिलिया, तीथै गोरष फिरै अकेला।। - गोरखवाणी/१९०

**अर्थ :** ज्ञानासारखा गुरु नाही, चित्ता सारखा शिष्य नाही, मनासारखा समजूत काढणारा मिळाला नाही. म्हणून ज्ञान, चित्त व मनाच्या सोबतीने श्री गोरक्षनाथ एकटेच फिरत असतात.

इथे त्यानी स्वत:ची कमलवत स्थिती स्पष्ट करुन कर्मयोग सिध्द करताना त्यातली पथ्यच सांगितले आहे.

श्री गोरक्षनाथ निष्काम कर्मयोगी होते. त्याबाबतचे सूत्र

जहां गोरष तहाँ ग्यांन गरीबी, दुंद बाद नही कोई।

निसप्रेही निरदावै षेलै, गोरष कहीयै सोई ।। - गोरखवाणी/१९६

**अर्थ :** जिथे गोरक्ष तिथे ज्ञानस्थिती असते. तिथे मायाकृत द्वैतभावना व वाद नसतो. नाथयोगी निस्पृह भावानी अटीविना साधना करतो. गोरखनाथ म्हणतात. की ज्ञान हेच माझे स्वरुप आहे. कर्मयोग आचारताना सर्व प्रकारच्या एकांगी व अतिरेकी वर्तनास विरोध करुन श्री गोरक्षनाथांनी जीवनातील संतुलनाला महत्व दिले आहे. त्यासाठी गौतम बुद्धांचा 'मज्जिम निकाय' हे तत्त्व त्यांनी त्याचे तत्वज्ञानाचे महत्वाचे सूत्र म्हणून स्वीकारले आहे. या मध्यमार्गाची त्यांची अनेक सूत्रे आहेत. त्यापैकी एक सूत्र:

लौ लष पातरि आगै नाचै, पीछै सहज अषाडा ।

ऐसै मन लै जोगी षेलै, तब अंतरि बसे भँडारा ।। - गोरख ज्ञानतिलक/३९

**अर्थ :** नऊ लाख पुतळ्या समोर नाचत असोत, व मागे ज्ञान वैराग्याचा आखाडा असो या दोन्हीच्या मध्ये योग्याची स्थिती असली पाहिजे. अशा मध्यस्थितीत जेव्हा योगी साधनारत रहातो तेव्हा तो अंतरविश्वात तृप्त होत जातो. अशा प्रकारे योग व जीवनकर्म यांचा संयोग साधत श्री गोरक्षनाथांनी एक परिपूर्ण असे कर्मयोगशास्त्र जीवनदर्शन स्वरुपात दिले. ते बेजोड आहे. तुलनेच्या पलिकडे आहे.

**ज्ञानयोग :**

ज्ञानयोग किंवा साख्ययोग म्हणतात त्याला एकाद्या व्याख्येत बंद करण्याचा प्रयत्न नेहमीच अपुरा ठरण्याची शक्यता आहे. सामान्यपणे असे म्हणता येईल की मन व इंद्रियांच्या द्वारा शरीरातून होणाऱ्या सर्व क्रियांच्या कर्तेपणाचा अभिमान सोडून सर्वव्यापी सच्चिदानंदघन परमात्म्यात निरंतर ऐक्य भावाने स्थिर रहाण्याच्या अवस्थेकडे नेणाऱ्या मार्गाला ज्ञानयोग किंवा सन्यासयोग असेही म्हणतात.[८] (संदर्भ: श्रीमद्भगवदगीता अन्वयार्थ पान ७०)

ज्ञानयोगात 'ज्ञान' या शब्दाची 'योग' या शब्दाशी जी सांगड आहे त्यातून ज्ञानावस्थेची अनुभूती हा अर्थ व्यक्त होतो. इथे ज्ञान म्हणजे वस्तुजाताच्या मूळ तत्त्वाची अनुभूती (metaphysical experience) असा अर्थ आहे. हे ज्ञान शाब्दिक नाही, ग्रंथीय नाही तर ती परमतत्वाशी एकरसात्मक अवस्था असते की ज्याला भगवान गौ. बुध्द संबोधी म्हणाले.

**बुद्धियोग -**

यथार्थ बुध्दियोगातून जे समत्व प्राप्त होते ती समतावस्थाच सर्व पाप व दु:खापासून मुक्तता देते. बुद्धियोगात कर्मयोग अनिवार्य आहे. हे कर्म फलाशा टाकून करणे आवश्यक असते. पाप-पुण्य फलाशेतून निर्माण होते. योगस्थ होऊन ईश्वरचिंतन करीत, कर्मासक्ती व फलाशा सोडून कर्म करत राहिले तर अहंकार व वासना क्षीण होतात व देहतादात्याचा भ्रम दूर होत जातो व शब्दातीत अशा आनंदात चित्तवृत्ती शांत होत जातात. अशा प्रकारे समत्वयोग साधला जातो. हेच बुद्धियोगाचे फलित ठरते. अशा समत्वयोगावस्थेत जाण्याला मोठा अडथळा असतो तो म्हणजे अनेक विषयचिंतनाने भरलेली बुध्दी! याचा स्पष्ट निर्देश भगवद्‌गीता अध्याय २ मध्ये आहे.

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।
समाधावचला बुध्दिस्तदा योगम् अवाप्स्यसि ।। - गीता अध्याय २/५३

**अर्थ :** अनेक प्रकारच्या सिध्दांत श्रवणाने विचलित वा अस्थिर झालेली बुध्दि (श्रुतिविप्रतिपन्न) परमात्म्याचे स्वरुपी स्थिर राहील तेव्हाच तू समत्वयोगास प्राप्त होशील. अशा प्रकारे प्रथम बुध्दी स्थिर होणे अगत्याचे आहे. त्यानंतरची साक्षात अनुभवाची स्थिती येईतो विषयांतील रस नाहीसा होणे शक्य होत नाही. विषय दूर रहातील पण गोडी असतेच म्हणून ईश्वरी अनुभवाची महत्ता श्रेष्ठ असून त्याला पर्याय म्हणून अन्य काही अस्वीकार्य ठरते असा सिध्दांचा स्पष्ट संकेत आहे.

बुध्दियोगाचे संदर्भात मूलभूत शास्त्रसूत्रांचे संदर्भ विवेचनातूनच बुध्दी या अंत:करण पंचकातील घटकाचे कार्य समजू शकते. परमतत्व हे मायेच्या पडद्याआड लपलेले असल्यामुळे केवळ अतिसूक्ष्म तीव्र बुध्दीच्या द्वाराच ते गम्य होऊ शकते. अशा प्रकारची स्पष्ट मांडणी कठोपनिषद् सूत्र १,३,१२ मध्ये आहे. याबाबतीत महायोगी गोरक्षनाथांनी या प्रक्रियेत देहमाध्यम किती महत्त्वाचे आहे याची मांडणी सूत्ररूपात केली आहे.

पंथचले चलि पवना तूटै, तन छीजै तत जाई।
काया तै कछू अगम बतावै ताकी मूंडू माई।। - गोरखवाणी/२२५

**अर्थ:** इकडे तिकडे जिज्ञासावृत्तीने फिरण्याने इंद्रिये चंचल होतात. शरीरातील प्राणशक्ती क्षीण होते. शरीरापेक्षा अन्य अगम असे तत्व नाही. परमात्म्याचे अनुभवाचे तेच माध्यम आहे. योगयुक्तीने हा अनुभव घेणे म्हणजे बुध्दियोग.

श्री गोरक्षनाथ हे स्वत:च ज्ञानरुप होते. ते स्वत:ची ही आत्मज्ञानरुप प्रचीती स्वत:चे शब्दातच देतात.

जहां गोरष तहाँ ज्ञान गरीबी दुंद बाद नही कोई।। - गोरखवाणी/१९६

**अर्थ :** जिथे गोरख तिथे ज्ञानच! तिथे द्वैत, वाद काहीही नाही श्री गोरक्षनाथोपदिष्ट ‘‘योगबीज’’ मध्ये ज्ञानयोग व सिध्दयोग यांच्यातील अभेदावस्थेचे सूत्र आहे.

ज्ञानेनैव विना योगो न सिध्यति कदाचन।

तस्माद अत्र वरारोहे तयोर्भेदो न निद्यते।। - योगबीज/७०

**अर्थ :** ज्ञानप्राप्तीशिवाय योग सिध्द होत नाही (योगाचे लक्ष ज्ञानप्राप्ती हेच आहे) या सिध्दयोग मार्गामध्ये योग व ज्ञान यात भेद नाही. हा योग व ज्ञान यांच्यातील संबंध अनोन्याश्रयी संबंधासारखा आहे. युध्दाशिवाय युध्दात जय नाही तसे योगाशिवाय ज्ञानातून मोक्षसिध्दी नाही.

**भावयोग -**

ज्ञानयोग किंवा योगाचे कोणतेही अंग असो त्यामध्ये ‘भाव’ (Sentiment or mental state) या मानसिक अवस्थेला मोठे महत्त्व आहे. श्री गोरक्षनाथांच्या ‘महार्थ मंजरी’ या गाथाग्रंथातील ‘भाव’ स्थितीच्या दूरगामी परिणामाचे व फलप्राप्तव्याविषयीचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

यो यस्य भावयोग: तस्यखलुस एव देवता भवति।

तद् भावभाविता अभिलषितं तथा फलंति प्रतिमा:।। - महार्थमंजरी गाथा/४७

**अर्थ :** ज्याचा जो भावयोग असेल त्याप्रमाणे त्याची उपास्यदेवता ठरते. त्या भावाने प्रतिष्ठित चैतन्यमूर्तीच उपासकाला इष्ट फल प्रदान करते.

भावाचा अर्थ आहे हृदयात प्रस्फुटित झालेली भावशक्ती. ही भावदशा तीव्र इच्छाशक्तीतून जन्म घेते. ही भावशक्ती किंवा इच्छाशक्ती ही जेव्हा ज्ञानतंतूच्या क्रियेत व्यक्त होऊ पहाते तेव्हा तिला विद्युतप्रवाहासारखे रुप येते. त्यामुळे शरीरांतर्गत सर्व गती तालबध्द व नियमित होतात. म्हणजे एकाभिमुख होतात. अशावेळी ही भावशक्ती एक विद्युतजनरेटरच बनते. ही भाव शक्ती अशा प्रकारे विद्युतप्रवाह बनून मूलाधारस्थित कुंडलिनी शक्तीस जागृत करुन साधकाला इष्ट फल प्रदान करत असते.[१] (संदर्भ: ‘राजयोग’ पान ८०) हा भावयोग म्हणजेच भक्तीयोग.

श्री गोरक्षनाथांचे जीवनचरित्र त्यांचे संबधित वाङ्मयातून जे उपलब्ध आहे त्यातून हे स्पष्ट होत जाते की ते जसे एक महान हठयोगी व कर्मयोगी होते तसेच ते ज्ञानयोगी ही होते व या सर्व जीवनरचनेचा पाया त्यांच्या अनन्य गुरुभक्तीत व समर्पणात होता. त्यांचा जन्मच श्री मछिंद्रनाथांचा कृपाप्रसादरुप आहे. त्यामुळे सर्व योगांचे पर्यवसान भक्तियोगात व भावदशेत झाल्याचे स्पष्ट होत जाते. उदाहरणादाखल असे पहाता येईल की ‘गोरखवाणी’ और ‘‘गोरखयोग’’ या ग्रंथात विषयांची वर्गवारी पाहिल्यास असे दिसून येते की,

साधारणपणे ५० विषय वेगवेगळ्या प्रकारे सूत्रांमधून मांडले गेले आहेत व त्यामध्ये योगमार्ग, गुरूनिष्ठा व गुरूमार्ग यावर जास्त सूत्रे आहेत. वरील पाश्वभूमीवर श्री गोरक्षनाथांचा भक्तियोग समजून घेताना त्यांची गुरुंच्या ठिकाणची अनन्यता व गुरुमाध्यमाचे अनन्यत्व पाहिले की त्यांच्या भावावस्थेची स्पष्ट कल्पना येते.

**७) नाथसंप्रदाय व त्यातील गुरूमहिमा :**

'सि.सि.पध्दति' या त्यांच्या ग्रंथात पंचम उपदेश मध्ये परमपद प्राप्तीसाठी गुरुप्रसाद (कृपा) हाच उपाय आहे. त्यासंबंधात व सद्‌गुरुसंबंधात सूत्र ६४ ते सूत्र ८४ अशी २० सूत्रे आहेत.

त्याचप्रमाणे 'गोरक्षशतक', 'महार्थमंजरी', 'गोरक्षसंहिता', 'अमरौघ प्रबोध', 'सिध्दसिध्दांतसंग्रह', 'योगबीज', 'गोरक्षपध्दति' अशा विविध ग्रंथात गुरुमहिमा उत्कटतेने व्यक्त केलेला आहे.

हा गुरुमहिम्याचा चमत्कारच श्री गोरक्षनाथांच्या रुपाने साकार झालेला दिसून येतो. ''योगाब्जीनि सरोवरु। विषय विध्दंसैकवीरु।'' असे ज्यांचे वर्णन श्री ज्ञानेश्वरांनी केले (ज्ञा. अ. १८/१७५५ ) ते हे गोरक्षरुपी कमळ योगरुपी सरोवरात कसे अभिषिक्त राजाप्रमाणे शोभले ते वरील ग्रंथातील गुरुमहिमा व गुरुप्रेम व्यक्त करणारी काही सूत्रे जरी पाहिली तरी श्री गोरक्षनाथांच्या असामान्य जीवन घडणीमागचा पायाभूत आधारच स्पष्ट होतो. श्री गोरक्षनाथांचे शब्दात गुरुमहिमा त्यांच्या वेगवेगळ्या ग्रंथातील संदर्भश्लोकातून (नमुन्या दाखल एक किंवा दोन) खालीलप्रमाणे व्यक्त झालेला आहे.

**सि.सि.पध्दति -**

गुरुदृक्पादनात् प्रायो दृढानां सत्यवादिनां सा स्थितिजयिते।। - सि.सि.प.उप५/६४

**अर्थ :** सत्यस्वरुपाचे दर्शनाची इच्छा असणारे दृढ योगाभ्यासामध्ये विधिपूर्वक स्थिर झालेले गुरुंच्या उपदेशामृतानी ते परमपद प्राप्त करु शकतात. (ती स्थिती)

प्रसादात् स्वगुरो: सम्यक प्राप्यते परमं पदम्।। - सि.सि.प. उप५/६५

**अर्थ :** गुरुंच्या कृपाशिर्वादाने हे साम्यावस्थेतले परम पद प्राप्त होते.

न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं शिवशासनत: शिवशासनत: शिवशासनत: शिवशासनत:।। - सि.सि.प. उप५/६६

**अर्थ :** गुरुच्या कृपेशिवाय अन्य काही उपाय नाही, त्यापेक्षा श्रेष्ठ असे काही नाही. असे भगवान शिवच ''आदेश'' म्हणून त्यावर शिक्कामोर्तब करत आहेत.

**गोरखवाणी -**

गगन मंडल मै. ऊंधा कूबा तहाँ अमृत का बासा।
सगुरा होइ सु भरि भरि पीवै निगुरा जाइ पियासा।। - गो.वाणी/२३

**अर्थ :** आकाश मंडलामध्ये (ब्रम्हरंध्रामध्ये) अशी एक विहीर आहे ज्यात अमृत आहे. समर्थ गुरुच्या सेवेत (सगुरा) असणाराच ते अमृत भरभरुन पिऊ शकतो. जो गुरुशरण नाही (निगुरा) त्याला तहानलेलेच रहावे लागते. ( ते अमृत त्यास मिळत नाही.)

**गोरक्षशतक -**

श्री गुरुं परमानंदं वंदे स्वानंदविग्रहम्।
यस्य सान्निध्य मात्रेण चिदानंदायते तनु:।। - गो. शतक/१

**अर्थ :** श्री गोरक्षनाथ म्हणतात मी माझे गुरु श्री मच्छींद्रनाथ की जे साक्षात परमानंदस्वरुप आहेत, मूर्तिमंत आनंद आहेत त्यांना वंदन करतो. त्यांचा केवळ सहवासानेही हे शरीर चिन्मय व आनंदमय होऊन जाते.

**महार्थमंजरी -**

क्षणमात्रस्पृष्टे नाप्यमृत स्वभावेनानेन भावेन।
सर्वोत्तीर्ण: सर्व: सर्वचिरं लभते सर्वसौभाग्यम्।। - म.मंजरी गाथा/६६

**अर्थ :** केवळ अंशमात्र (क्षणमात्र) ही या अमृतस्वभावरुप गुरुभावाचा स्पर्श झाला तरी योगी सर्वामधे यशस्वी होतो (सर्वोत्तीर्ण). सर्व बंधनापासून मुक्त होतो. व सततच्या भाग्याचा धनी होतो.

**गोरक्षसंहिता -**

नमस्कृत्य गुरुभक्त्या गोरक्षोज्ञानमुत्तमम्।
अभष्टिं योगिनां ब्रूते परमानंदकारकम् ।। - गो. स./२

**अर्थ :** श्री गोरक्षनाथ आपल्या गुरुंना भक्तिसहित नमस्कार करुन पूर्णयोगाच्या मार्गाचे बोधक ज्ञान सांगताहेत की जे ज्ञान योग्यांना परमानंद देईल.

**अमरौघप्रबोध -**

यो जानात्यनयोस्सारं सद्‌गुरोरुपदेशत:।
कायाक्लेशजराव्याधि पापमृत्युभयं कुत:।। - अ. प्रबोध/१५

**अर्थ :** जो साधक सद्‌गुरुउपदेशाने त्यातले सार जाणून घेतो (नाद व बिंदू या दोन्ही गोष्टींचे सार) त्याला शारिरिक क्लेश, वार्धक्य, व्याधी, पाप, मृत्यू यांचे भय कुठून राहील?

**सिध्दसिध्दांतसंग्रह -**

परमेग पदेन तस्य कुर्यात् रससाम्यं मतिमान् गुरुक्ति दृष्ट्या।।
- सि. सि.संग्रह उप. ५/२

**अर्थ :** परमपदाच्या रसास्वादाशी समत्व साधावे यासाठी सांप्रदायिक सिध्द गुरुवचनाची जरुरी असते. (शब्दाद्वारे होणारा शक्तिपात)

तेन संदर्शिते मार्गे स्वसंवेद्यस्य दर्शनम्। भवतीति गुरुं देवभावेन परिचिंतयेत्।।

- सि. स. संग्रह उप. ५/८

**अर्थ :** तशा (योग्य) श्री गुरुमाउलीने दाखविलेल्या मार्गानेच स्वसंवेद्य आत्मरुप दर्शन होते.म्हणून सद्गुरुंचे नेहमी देवभावनेने चिंतन करावे.

**योगबीज -**

वेदांततर्कोक्तिभिरागमैश्च नानाविधै: शास्त्रकदंबकैश्च।

ध्यानादिभि: सत्करणैर्न गम्यं चिंतामणिंत्वेक गुरुं विहाय।। - यो.बीज./६६

**अर्थ :** वेदांताच्या निरनिराळ्या तर्कामुळे, विविध प्रकारच्या आगमांमुळे, वृक्षाप्रमाणे विस्तारलेल्या नाना शास्त्रांमुळे ध्यान क्रियेमुळे, सिध्दसंकेतानी सांगितलेले परमतत्व अगम्य रहाते. त्यासाठी चिंतामणीरुप गुरुचाच साधकाला आश्रय घ्यावा लागतो.

**सूक्ष्मार्थ :** हाच सिध्दयोग होय व सिध्दयोगामध्ये योग आणि ज्ञान यात भेद नाही. ज्ञानाशिवाय योग नाही व योगाचे अंतिम लक्ष ज्ञानप्राप्तीच आहे. - योगबीज/७१

**गोरक्षपध्दति -**

नमस्कृत्य गुरुं भक्त्या गोरक्षो ज्ञानमुत्तमम्।

अभिष्टं योगिनां ब्रूते परमानंदकारकम्।। - गो. पध्दति/३

**अर्थ :** श्री गोरक्षनाथ भक्तिपूर्वक गुरुंना प्रणाम करुन योग्यांना मनोवांछित असे परमानंद देणारे परमज्ञान (योगशास्त्ररुप) देत आहेत.

अशाप्रकारे श्री गोरक्षनाथांच्या विविध ग्रंथात सद्गुरुंचे स्थान, ज्ञान, महिमा, त्यांची कृपा, त्यासाठी समर्पण याची महती व गुरुमहिमा मुक्त अशा विनम्रतेने व आग्रहाने प्रतिपादलेला दिसून येतो. सि.सि.पध्दती या त्यांच्या ग्रंथात उपदेश ५/ सूत्रे ३१, ३२, ३३, ३४ व ३५ यामध्ये गुरुसेवा, गुरुउपदेश, गुरुकृपा यांची अनिवार्यता स्पष्टपणे मांडलेली आहे. अमनस्क योग (पूर्वार्ध) सूत्र १३ 'निजगुरुमुखादेव विहिता' म्हणजे तारकयोगाची प्राप्ती ही फक्त गुरुच्या मुखातून दिल्या जाणाऱ्या ज्ञानातूनच होते असे स्पष्टपणे म्हटलेले आहे.

साक्षात्कार अवस्थेत नेणारा, सायुज्यमुक्ती प्रदान करु शकणारा भक्तिमार्ग हा गुरुगम्य असून त्यास अन्य पर्याय नाही असे सिध्दांतरूप प्रतिपादन श्री गोरक्षनाथांनी त्यांचे ग्रंथात करुन सर्वश्रेष्ठ साधनासाठी गुरुतत्वाची अनिवार्यता पुन्ह:पुन्ह: मांडली आहे.

श्री गोरक्षनाथ हे हठयोगी होते, ज्ञानयोगी होते, कर्मयोगी होते तसेच ते सर्वार्थाने भक्तियोगीही होते. त्यांच्या जीवनचरित्रातून त्यांची अनन्य गुरुनिष्ठा, उत्कट गुरुसेवा व अनन्यशरणता अनेक प्रसंगातून व्यक्त झालेली आहे. ही गुरुभक्तीच त्यांच्या विविध साधन मार्गातील यशस्वी संचारामागची आधारशीलाच आहे असे दिसून येते.

## ८) विविध मानसिक अवस्था व मछिंद्र-गोरक्ष-निवृत्ती संबंध :

श्री गोरक्षनाथांचे कर्मयोगामागची मानसिक बाजूही पहाणेचा प्रयत्न करता येणे शक्य आहे. माणसाचे अस्तित्व तीन स्तरात विभागून संबंधित विषय विचारात घेता येतो. शारीरमाध्यम, बुद्धीमाध्यम व हृदयमाध्यम अशी ती विभागणी करता येते.

शरिराची यात्रा कर्माद्वारे, बुध्दीची यात्रा विचाराद्वारे व हृदयाची यात्रा भावावस्थेद्वारे सुरु होऊ शकते. क्रमश: स्थूल-सूक्ष्म-अतिसूक्ष्म असे या स्तरांचे स्वरुप रहाते. ''भावावस्थेचा'' हा जो तिसरा स्तर आहे त्याचेच नांव आहे 'भक्तियोग'. बुध्दीच्या मर्यादा पाहून भक्तियोग म्हणतो की बुध्दी हा घटक जरा बाजूला ठेवून तुम्ही पुढे जाऊ शकता. ईश्वरी शक्तीच्या उपस्थितीत सर्व अघटित घटित होऊ शकते. वरील चिकित्सेच्या पार्श्व भूमीवर श्री गोरक्षनाथांची कार्यपध्दती पहाता येते.

श्री गोरक्षनाथांनी या तिन्ही स्तरांवर प्रथमत: स्वत:च्या बाबतीत पूर्ण प्राविण्य व ताबा मिळवला. व त्या त्या स्तराचे विज्ञान अनुभवाच्या बळावर व सद्‌गुरुंच्या कृपेने निर्माण करुन नंतर समाजबांधणीच्या स्तरावर ते उतरले. श्री आद्यशंकराचार्यंच्या व श्री भगवान गौतमबुध्दांच्या नंतर श्री गोरक्षनाथांच्या इतका प्रभावशाली व महिमान्वित महापुरुष दुसरा कुणी झाला नाही. त्याचमुळे भारतवर्षात कोपऱ्या कोपऱ्यात सर्वदूर त्यांचे नांव व अनुयायी विस्तारलेले आहेत. प्रथम त्यांनी 'योगमार्गाचे' माध्यमातून शक्तिशाली असे धार्मिक आंदोलन केले. व त्याचे माध्यमातून व्यक्तीचे 'शरीर' हे माध्यम कर्मयोगाच्या रुपात कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. व्यक्तीचे बुध्दी हे माध्यम व्यापण्यासाठी लोकभाषेतून, हिंदीभाषेतून व संस्कृतभाषेतून थक्क होण्यासारखी वाङ्मय निर्मिती केली. व व्यक्तीचे हृदय म्हणजे भावविश्व व्यापण्यासाठी सर्वांगाने परिपूर्ण असे जीवनपुष्प आपल्या सद्‌गुरुंच्या म्हणजे श्री मच्छिंद्रनाथांच्या चरणकमलावर वाहून जीवन साफल्याचा परमानंद शिवशक्ति सामरस्यातून कसा घेता येतो हे दाखवून पिंडब्रम्हांड ऐक्याचा महत्त्वाचा सिध्दांत त्यानी प्रस्थापित केला. म्हणून त्यानी म्हटले.

एवं सर्व देषु विश्वरुपपरमेश्वर परमात्मा अखंड स्वभावेन घटे घटे चित्स्वरुप: तिष्ठति। एवं पिंडसंवित्ति र्भवति।। सि.सि.प.उपदेश ३/१३

**अर्थ :** अशा प्रकारे सर्व देहांमध्ये हा विश्वरुप परमात्मा परमेश्वर अखंडस्वरुपात प्रत्येक शरिरात एकरुप होऊन स्थित आहे. हे ज्ञान ज्याला झाले तोच साधक पिंडज्ञानी होऊ शकतो. त्यानी स्वत: सिध्द केलेली गुरुतत्वाशी म्हणजेच शिवतत्वाशी समता व समरसता ही केवळ गुरुकृपेमुळेच होऊ शकते हे नि:संदिग्ध विधान त्यांची भावदशा जशी दाखवते तसे ते वस्तुस्थिती निदर्शक पण आहे. म्हणून ते म्हणतात -

तस्मात् गुरुकटाक्ष पातात् स्वसंवेद्यतयाच महासिध्दयोगिभि: स्वकीयं पिंड निरुत्थानानुभवेन समरसं क्रियते इति सिध्दांत:।। - सि.सि.प. उप५/७

**अर्थ :** म्हणून महानसिध्दयोगी सुध्दा गुरुच्या कृपाकटाक्षानी व स्वत:च्या मनोनिग्रहादि योगसाधनांनी स्वत:चा व्यष्टिपिंडाचे समष्टि पिंडाशी अभिनत्व जाणून समरसता अनुभवतात (व सत्चिदानंदस्वरुप होऊन जातात) असे हे योगियांचे निश्चित मत आहे.

भक्तीच्या सारस्वतात भक्तीबाबत अनेक व्याख्या व निर्देश आहेत. त्यापैकी कोणत्याही व्याख्येच्या किंवा निर्देशाच्या पाश्वभूमीवर श्री गोरक्षनाथांचे बुध्दिवैभव व भावविश्व अभ्यासकाला स्तंभित केल्याशिवाय रहात नाही. योगांच्या सर्व शाखात सर्वश्रेष्ठ अशी त्यांची अवस्था होती. गुणात व प्रकृतीत असूनही ते त्यांच्या अतीत होते व इच्छामात्रेकरुन ते स्वत: व त्याचे योगगुरु श्री मच्छिंद्रनाथ प्रकृतीच्या सर्व खेळामध्ये रमून कर्मयोग व भावयोग दोन्हीही सिध्द करत होते. त्यामुळे साक्षात्कारी जीवनातील प्रकृतीगुणधर्मानुसार येणारे विविध अनुभव या गुरुशिष्यांच्या जीवनात कसे घडत गेले याची नोंद त्यांचे चरित्रात मिळते. गुरु आणि भक्त किंवा देव आणि भक्त यांचे परस्पर संबंधातील उत्कट अनुभव व्यक्त करण्याचे ठळकपणे पाच प्रकार पडतात.

१) मी - तू संवाद

२) मी संपला - तू राहिला.

३) मी म्हणजेच ब्रम्ह. मीचे अंतर्याम म्हणजेच परमात्मा.

४) मी नाही - तू नाही. (दोघेही विराट शून्यात हरवले)

५) ते तत्त्व (गुरुतत्त्व वा ईश्वर) उभयपर आहे.

श्री गोरक्षनाथांच्या जीवनात श्री मच्छिंद्रनाथांचे स्थान हे एकमेकाद्वितीय असे वडिलकीचे व गुरुंचे होते. ते एकमेकात एकरुप झाले व पुन्ह: व्यक्ती या नात्याने प्राकृतिक स्तरावर स्वतंत्रपणे अभिव्यक्त होत राहिले. अशा परिस्थितीत 'मी' पण होतो व 'तू' पण होता. स्वतंत्र व्यक्तिमत्वे सांभाळूनही एकमेकांशिवाय पर्याय नाही असा त्यांचा जीवनसंवाद घडत गेला. उभयतांचे चरित्रातून ही बाब स्पष्ट होत रहाते. हाच तो मी -तू-संवाद. दुसरी अभिव्यक्ती आहे. ''मी संपला - तू राहिला'' श्री मछिंद्र - गोरक्षचरित्रात याचे प्रमुख दाखले मिळतात. उदा. दोघांच्या भारतभ्रमणात ते कनकगिरी शहरात आले असता श्री मच्छिंद्रनाथांना भिक्षेतून आलेले वडे आवडणे, ते पुन्ह: आणण्यासाठी त्यांनी गोरक्षनाथांना सांगणे व त्यासाठी भिक्षा घालणाऱ्या बाईंनी गोरक्षनाथांच्या डोळा मागणे व तो त्यांनी डोळ्याचे खोबणीत बोटे घालून काढून देणे हा लोककथेतील प्रसंगच ते सद्गुरुंना किती समर्पित झाले होते हे दाखवतो. श्री गोरक्षनाथ हे गुरुसेवेत व गुरुप्रेमात संपूनच गेले होते. हे शरीर -मन-

बुध्दीवर तुळसीपत्र ठेऊन सिध्द केलेले गुरुप्रेमसमर्पणच होते. ही अभिव्यक्ती आहे ''मी संपला - तू राहिला'' याची. तिसरी अभिव्यक्ती आहे स्वत:च्या ब्रम्हस्वरुपाची त्या ब्रम्हस्वरुपात सद्‌गुरुही आले. ब्रम्हांडी ते पिंडी व पिंडीते ब्रम्हांडी हा श्री गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानातला प्रसिध्द सिध्दांत आत्म्याची परमतत्वात झालेली अभिव्यक्तीच दाखवतो. हीच ती अहं ब्रम्हास्मिची वेदांताची अभिव्यक्ती. इथे परमात्मा किंवा गुरुतत्व किंवा शिवतत्त्वच 'मी' चे अंतर्याम असते.

चवथी अभिव्यक्ती आहे ''मी नाही - तू नाही.'' उभयतांच्या चरित्रात असे प्रसंगही आहेत की दोघेही एकमेकाचे प्राकृतिक भिन्नत्व विसरुन एकमेकात विरघळून गेले, व समरसतेचा, एकरुपतेचा अनुभव घेत राहिले. उदा. दाखल असे दिसते की स्त्रीराज्यात जाऊन जेव्हा श्री गोरक्षनाथ आपल्या गुरुंना म्हणजे श्री मच्छिंद्रनाथांना परत आणण्यासाठी हरप्रयत्ने प्रयास करत असतात व जेव्हा श्री गोरक्षनाथ प्रगट होतात तेव्हा श्री मच्छिंद्रनाथ त्यांना 'बाळ' म्हणून आपल्या छातीशी कवटाळून जेव्हा मांडीवर घेतात तेव्हाची दोघांची मनस्थिती जी चरित्रांमध्ये मांडली गेली आहे त्याचे वर्णनच जर करायचे झाले तर त्यावेळी दोघेही स्वत:चे अस्तित्व विसरुन प्रेमाच्या सरोवरात डुंबत होते, दोघांनाही कशाचेच भान नव्हते. ही अभिव्यक्ती आहे ''मी नाही - तू हि नाही'' याची. पाचवी अभिव्यक्ती आहे ती सर्व प्रकारच्या द्वंद्वातीत अश्या तत्त्वाची उपस्थिती. या अनुभवाला 'उभयपर' असे शांडिल्यऋषीनी म्हटलेले आहे. भक्ति तत्वातील सर्वात सूक्ष्म असे हे तत्त्व आहे. द्वंद्वात पूर्ण विरोधी भाव असतो. त्यातही ते तत्त्व उपस्थित असते. याचा अर्थच ते तत्त्व सर्वव्यापक व स्थल काल व कारणमीमांसेच्या नियमापलिकडे स्वत:च्या तेजात व सामर्थ्यात उपस्थित असते. हा विषय श्री मच्छिंद्रनाथ व श्री गोरक्षनाथांसारख्या सिध्द योग्यांच्या बाबतीत कशाप्रकारे पडताळून पहायचा? त्यासाठी चरित्रातले काही प्रसंग ऐतिहासिक दृष्या सत्य म्हणून मान्य झालेले आहेत. त्यातील दोन उदाहरणे विचारार्थ समोर ठेवता येतात.

१) नाथसंप्रदायाची भक्ति परंपरा निवृत्तीनाथाचे माध्यमातून (इ.स. १२७३ ते १२९७) प्रत्यक्ष श्री गहीनीनाथांनी ज्यांचा कार्यकाळ साधारणपणे ११ वे शतकाचा आहे. त्रिब्यंकेश्वराजवळ गुहेत दर्शन देऊन कार्यान्वित केली हा इतिहास सर्वमान्य आहे. तो क्षण श्री निवृत्तीनाथांनी ''गहिनी कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्णनामे।।'' अशा प्रकारे शब्दबंध्द केला आहे. स्थळकाळ कारणमीमांसेच्या पलिकडचे असे हे सहज-संचार सिध्द योग्यांच्या चरित्रात दिसून येतात. असे ऐतिहासिक संदर्भ मिळत असल्यामुळे त्याकडे डोळसपणे पाहून विचार करण्याची आवश्यकता वाटते.

२) कोकणातील सावंतवाडी जवळ बांदा म्हणून गांव आहे. तेथे १७१४ साली जन्मलेले सोहिरोबा अंबिये नांवाचे गृहस्थ सावंतवाडी संस्थानात नोकरीस असताना घडलेली ही विशेष

घटना. ब्रिटिश अमदानीत सरकारी नोकरीत ते होते. दूरच्या ठिकाणी अचानक हजर होण्याचा आदेश आलेनंतर ते सावंतवाडीस निघाले बरोबर फणस (न्याहरीसाठी) घेतला होता. दुपारच्या वेळेस प्रवासात तो फोडून खाणार एवढ्यात एक भव्य, दिव्य विभुती समोर आली व त्या व्यक्तीने काही खाण्यास मिळेल का म्हणून विचारल्यावर सोहिरोबानी सोललेला सर्व फणस त्यांना अर्पण केला. खुश होऊन त्या विभुतीने फलाहार करुन ५ गरे सोहिरोबाना खाण्यास दिले. व फणसाचा चीक त्या विभुतीचे हातास लागलेला होता तो कुठे पुसू म्हणून त्यानी विचारल्यावर सोहिरोबानी स्वत:चे डोके पुढे केले कारण त्यानी डोक्याला भरपूर तेल लावले होते. व फणसाचा चीक तेलाने लवकर निघतो. पुढे केलेल्या डोक्यास त्या सिध्द विभुतीने हात पुसताच सोहिरोबाना समाधी लागली. त्या अवस्थेत ते सतपुरुष निघून गेले. मात्र सोहिरोबा पूर्ण बदलून गेले. त्यांची दिव्य मेधाशक्ती जागृत झाली. अंत:स्फूर्ती (intuition) उफाळून येऊ लागली व हजारो ओव्या सूत्रे रचली गेली. ते सोहिरोबानाथ बनले. हा चमत्कार करणारे नंतर जेव्हा सोहिरोबांना भेटले तेव्हा त्यांना कळले की ते प्रत्यक्ष श्री गोरक्षनाथ होते. हा चमत्कार करणारे श्री गहिनीनाथ होते असा उल्लेख बांद्याहून प्रसिध्द होणाऱ्या मासिकात आहे.[१०]

(संदर्भ :१) अभ्यासाची पाखर पडे पान ५२-५३ २) पुण्यक्षेत्र पान ७)

ते श्री गोरक्षनाथ असो वा श्री गहिनीनाथ असोत, दोघांचा काळ १० व्या किंवा ११ व्या शतकाचा आहे. सोहिरोबा हे १८ व्या शतकातील आहेत. म्हणजे ७०० ते ८०० वर्षाचा काळ (Period) हा 'नाथ' या अवस्थेपर्यंत पोचलेल्यांच्या हिशेबात असतोच असे नाही. म्हणजे काळ व स्थळांचे कोणतेच बंधन या सर्वव्यापी आत्मतत्त्वांना नसते का? हे शक्तितत्त्व उपस्थित असते व 'नाथ' पदवीला पोचलेले सिध्दयोगी शिवरुपच असल्याकारणाने "ते त्यावेळी होते. आता देहमाध्यमात नाहीत" पण हे 'होते- नाहीत' किंवा 'आहे - नाही' अवस्थेचे त्याना बंधन पडत नाही असेच ह्या घटनेवरुन म्हणता येईल का? हे सूक्ष्मतत्वच अशाप्रकारे 'उभयपर' स्वरुपात सृष्टीच्या व्यापारातून कार्यरत होत असावे. हे सर्व सूक्ष्म आहे, धूसर आहे, रहस्यमय आहे. पण या क्षेत्रातले अधिकारी लोक याचा खुलासा असा करतात की ही सृष्टीतली रहस्ये भक्ताच्या प्रेमभक्ती व समर्पणामुळे उलगडली जातात. ही सिध्दयोग्यांच्या भक्तीची झेप शब्दांच्या तुलनात्मक किंवा संबंधात्मक (Comparative or Corelative) ज्ञानाच्या पलिकडची असते असे वाटते.

**९) उपसंहार :**

अंतिम सत्याचे स्वरुप स्पष्ट करण्यामागे श्री गोरक्षनाथ व अन्य ज्ञानियांचा हेतू काय? ती एक बौध्दिक चिकित्सा असते का त्यामागे काही कारण असते? श्री गोरक्षनाथांचे समग्र

तत्त्वज्ञान पहाता त्यांचा कार्यावतार नैतिक आदर्शांचे प्रस्थापन करण्यासाठीच होता असे दिसून येते. नैतिक आदर्शांची मांडणी व पेरणी व्यक्ती व्यक्तींच्या जीवनात प्रत्यक्षपणे केल्याशिवाय पर्याय नाही हे त्यांनी निश्चित केले. प्रस्तुत प्रबंधामध्ये शक्य असेल तिथे श्री गोरक्षनाथांच्या कार्यप्रणालीत मानसशास्त्राचा आधार कसा कसा दिसून येतो हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. श्री गोरक्षनाथ हे जसे महान योगी व तत्वज्ञ होते त्याचप्रमाणे परिपूर्ण मानसज्ञ पण होते ते कसे हे हि त्यातून स्पष्ट होत जाते. अंतिम सत्य  हे मानवी जीवनाचे वस्तुनिष्ठ मूल्य असते.

या वस्तुनिष्ठ मूल्याचा विचार जेव्हा केला जातो त्यावेळी विचार करणारी व्यक्ती एकटी नसून ती समाजप्रवाहात एक भाग म्हणून कार्यरत असते. त्यामुळे त्या व्यक्तीने समाजाच्या वर्तमान अवस्थेचा विचार करणे अगत्याचे असते. चालू घडीला समाजाची जी बेभान व संभ्रमित अवस्था दिसून येते त्याला 'स्वार्थदशा' म्हणजेच ठीक होईल. ही मोठी चिंतनीय बाब आहे हा सामाजिक कॅन्सर एकदम झालेला नाही, होऊ शकत नाही. त्याचे बीजारोपण जागतिक स्तरावर पन्नास वर्षापूर्वीच झाल्याचे दिसून येते. डॉ. राधाकृष्णन यांचा "The present crisis of faith" हा १९७० सालचा ग्रंथ पाहिल्यानंतर वरील विधानाची सत्यता स्पष्ट होते. त्यांनी crisis हा शब्दप्रयोग करुन नैतिक व सर्वसामान्य स्तरावरील सामाजिक स्थितीच्या संदर्भात आणीबाणी घोषित केल्यासारखे दिसते. त्या ग्रंथाच्या संबंधात जी वाक्ये आहेत व त्याचा जो ध्वनितार्थ आहे तेच काम श्री. गोरक्षनाथांना अपेक्षित आहे म्हणून त्याचा उल्लेख अनिवार्य वाटतो. डॉ. राधाकृष्णन यांच्या वरील ग्रंथाच्या मलपृष्ठावर खालील उल्लेख आहे.

"Dr. Radhakrishnan's clarion call to save the world from cultural disintegration and spiritual starvation is a testament of unshaken faith in the destiny of mankind He wants us to share his faith and recoup the lost joy and harmony in our lives. He suggests a way of life for the modern man"[११]

(Ref: " The Present crisis of faith"- The cover)

श्री गोरक्षनाथांच्या वेळची म्हणजे इ.स. ९५० ते इ.स. ११०० चे दरम्यानची सामाजिक परिस्थिती कशी होती त्याचे स्वरुप 'नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर' या ग्रंथात प्रथम प्रकरण (ले. डॉ. के.डी. भिंगारकर लिखित प्रबंध पद्मगंधा प्रकाशन पुणे स. २००७) आणि 'नाथसंप्रदाय - उद्य व विस्तार' (ले.डॉ. प्र.न.जोशी प्रकाशक अंजली पब्लिशिंग हाऊस पुणे स. २००४) या ग्रंथातील तिसरे प्रकरण पाहिल्यानंतर बरेचसे स्पष्ट होते. तशाच प्रकारची सामाजिक परिस्थिती, विघटन व स्वैराचाराचे दृष्टीने, सध्या विद्यमान आहे. चालू काळातील वैज्ञानिक प्रगती व बहिर्गत संपन्नतेच्या व्यक्तिवादी व सुखवादी जीवन पध्दतीतही

खरे सुख, मनाची शांती व समाधान मिळवून कशा प्रकारे जीवनसाफल्याप्रत जाता येईल याचा अुहापोह श्री गोरक्षनाथांनी अनेक अंगानी त्यांच्या तत्वज्ञानातून केलेला दिसून येतो. म्हणून इथे मुद्दाम नमूद करणे आवश्यक आहे, की श्री गोरक्षनाथांनी आध्यात्मशास्त्र (metyphysics) व योगशास्त्र यांची आश्चर्यकारक अशी सांगड घालून ते जीवनव्यापी व जीवनदायी कसे होईल यांचे असे एक बेजोड शास्त्रच निर्माण केले की जे 'गोरक्षदर्शन' असे ओळखले जाऊन ते खऱ्या अर्थाने जीवनदर्शनच ठरले. या पुढील प्रकरणात गोरक्षनाथांनी प्रतिपादन केलेल्या सामरस्ययोगाबाबत साकल्याने मांडणी केलेली आहे.

## १०) संदर्भ व टीपा :


१. सिद्ध योग्यांच्या सान्निध्यात - पं. गोपीनाथ कविराज, व्होरा आणि कं. पब्लिशर्स प्रा. लि. पुणे, १९७५.

२. सि.सि.प. उपदेश १.

३. ज्ञानयोग - स्वा. विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर, १९७९.

४. तत्रैव.

५. Spiritual Heritage of India – Swami Prabhavananda, Ramkrishna Math, Madras,1993.

६. गुरूदेव आर. डी. रानडे चरित्र आणि तत्त्वज्ञान - शं. गो. तुळपुळे, यशवंत प्रकाशन, पुणे, १९८३.

७. तत्रैव.

८. श्रीमद् भगवद्गीता अन्वयार्थ - गीता प्रेस, गोरखपूर, सं. २०६०, वि.

९. राजयोग - स्वा. विवेकानंद, रामकृष्ण प्रकाशन, मद्रास, १९८०.

१०. अभ्यासाची पाखर पडे - शिरीष शां. कवडे, श्री. वामनराज प्रकाशन, पुणे, २००३.

११. The Present Crisis of Faith – Dr. Radhakrishnan, Hind Pocket Book Pri. Ltd., Delhi, 1970.

# प्रकरण - सहावे

# सामरस्ययोग

## १) प्रस्तावना :

सद्‌वस्तुमीमांसेच्या आधारे प्रत्यक्ष जीवन जगत असताना सामरस्ययोगाची अनुभूती कशी साध्य करता येईल? ‘सामरस्ययोग’ म्हणजे काय? त्याच्या सहजावस्थेशी नेमका कोणता संबंध येतो? सामरस्य व सहजावस्था या दोघांना एकच म्हणता येईल काय? श्री. गोरक्षनाथांची या संदर्भातली भूमिका समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. यातील कारण असे की ‘सामरस्ययोग’ ही श्री गोरक्षनाथांची एकूणच भारतीय तत्वज्ञानाला मिळालेली देणगी आहे. तत्वविवेचन हा भाग जरूर महत्त्वाचा आहे. परंतु भारतीय तत्वज्ञानाने नुसतेच तत्वज्ञान मांडावे, शुष्क तात्विक चर्चा करीत बसावे अशी भूमिका घेतलेली नाही. भारतीय तत्वज्ञानामध्ये ‘जीवनदर्शन’ ही गोष्ट महत्त्वपूर्ण मानली गेलेली आहे. श्री गोरक्षनाथ हे देखील समग्र मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करणारे थोर तत्वचिंतक होते. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणात ‘सामरस्ययोग’ या संबंधात त्यांनी सांगितलेल्या सूत्रांचा अभ्यास पुढे करणार आहोत आणि त्या आधारावर ‘सामरस्ययोग’ या संकल्पनेचा शोध मी घेणार आहे. त्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण सूत्रे पुढे चर्चेसाठी घेतलेली आहेत.

## २) सामरस्ययोगाचा अर्थ :

श्री. गोरक्षनाथांचे वाङमयात सामरस्ययोगाचे जे उल्लेख आहेत. त्यांचा अर्थ कशा प्रकारे स्पष्ट होतो त्यासाठी त्यांचे एक सूत्र समोर ठेऊ.

एवं सर्व देहेषु विश्वरुप परमेश्वर: परमात्मा अखंड स्वभावेन घटे घटे चित्स्वरुप: तिष्ठति। एवं पिंडसंवित्तिर्भवति।।

- सि.सि.प. तृतीय उप/१३

**अर्थ :** अशा प्रकारे सर्व देहांमध्ये हा विश्वरुप परमात्मा परमेश्वर अखंडस्वरुपात प्रत्येक शरिरात (घटेघटे) एकरुप होऊन रहात आहे हे जाणणाऱ्या योगसाधकालाच पिंडज्ञानी म्हटले जाते. यालाच पिंडसंवित्ति म्हणतात. याचा अर्थ स्पष्ट आहे की जेथे जीवात्मा व परमात्मा पूर्णत: अभेद अवस्थेत असतात त्यासच ‘सामरस्यसिद्धी’ म्हटले आहे. या ठिकाणी असा एक प्रश्न उपस्थि होतो की या सामरस्यसिद्धीचा अनुभव कसा प्राप्त होतो? या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. गोरक्षनाथांनी म्हटले आहे की,

महासिध्दयोगिन: स्वस्वरुपतयानुसंधानेन निजावेशो भवति, निजावेशान् निष्पीडित निरुत्थान दशामहोदय: कश्चित जायते।

- सि.सि.प. पंचम उप/८

**अर्थ :** योगी जेव्हा स्वत:च्या स्वरुपाच्या अनुसंधानातून एक आवेश अनुभवतो त्याच प्रमाणे याचा परिणाम म्हणून निरुत्थानदशेचा किंवा समरसतेचा उदय होतो. या अवस्थेत आत्म्याचे जे संवेदन असते त्या संवेदनेतच चमत्कार घडतो व प्रकाशरुप आत्मबोध होतो. जर समरसतेचा अनुभव योग्याला येऊ शकतो तर त्यासाठी कोणते साधन उपयोगी पडते? त्या साधनाचा उपयोग केल्याने कोणते साध्य प्राप्त होते? या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. गोरक्षनाथ म्हणतात की,

अत एव महासिध्दयोगिभि: सम्यग् गुरुप्रसादं लब्ध्वा अवधान बलेन ऐक्यं भजमानैस्ततत्क्षणात् परमं पदं एव अनुभूयते।। - सि. सि. पध्दती/पंचम उप/९

**अर्थ :** म्हणून उत्तम सिध्दयोगी योग्य तो गुरुप्रसाद प्राप्त करुन सावधानतेच्या बळावर ऐक्य अनुभवतो व तत्क्षणी परमपदाचा तो अनुभव घेऊ लागतो.

वरील सर्व साधना दैहिक स्वरुपाच्या आहेत. यातून जे साध्य साधायचे ते साधल्यानंतर योगी अदैहिक साधनामध्ये स्थिर होतो. या अवस्थेला 'अवधूत' अवस्था म्हटलेले आहे.

य: सर्वान् प्रकृतिविकारान् अवधुनोति इति अवधूत:।

- सि.सि.पध्दती/उपदेश६/ श्लोकांचा सुरवातीपूर्वीचे सूत्र.

**अर्थ :** जो सर्व प्रकृतिविकारांचा त्याग करतो तो अवधूत.

या संदर्भात गुरूप्रसाद प्राप्त केलेला योगी हाच उत्तम ठरतो. म्हणजेच श्री. गोरक्षनाथ गुरूप्रसादाला महत्त्वपूर्ण स्थान देतात असे दिसते. सि.सि.प. मध्ये याची सूत्रे आहेत.

तस्मात् गुरूकटाक्षपातात् स्वसंवेद्यतयाच महासिद्ध योगिभि: स्वकीयं पिंडं निरूत्थानानुभवेन समरसं क्रियते इति सिद्धांत:। - सि.सि.प.उप ५/७

**अर्थ :** मोठ्यातला मोठा योगीसुद्धा गुरूंची कृपादृष्टी व स्वत:च्या योगसाधनेतून व्यष्टिपिंडाचे समष्टीपिंडाशी समरसत्व म्हणजे एकरूपत्व (निरूत्थान) साधू शकतात. असे योग्यांचे निश्चित मत आहे.

अतएव शिवेनोक्तम्:

न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं।

शिवशासनत: शिवशासनत: शिवशासनत: शिवशासनत:।।

- सि.सि.पध्दती/उप५/६६

**अर्थ :** म्हणून भगवान शिव म्हणतात की या परमपदाच्या प्राप्तीमध्ये गुरुकृपेशिवाय अन्य कोणताही उपाय नाही, नाही, नाही. हा साक्षात शिवाचा आदेश आहे, आदेश आहे, आदेश आहे.

या दोन्ही श्लोकावरून सिद्ध होणाऱ्या गोष्टी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ) व्यष्टिपिंडाचे समष्टिपिंडाशी समरसत्व साध्य करणे शक्य आहे.

ब) मात्र ते साध्य गुरूकृपेशिवाय साधता येणार नाही.

क) हा शिवाचाच आदेश आहे.

हीच भूमिका ‘आमरौघप्रबोध’ या श्री. गोरक्षनारथांच्या ग्रंथात श्लोक १७ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

एव एवामरौघो हि राजयोगभिधानक:<br>
लयादिभिस्समायुक्तश्चतुर्थो दीयते कथम्।।

- अमरौघ प्रबोध श्लोक १७/८१

**अर्थ :** राजयोग नांवाचा हाच एक अमरौघ म्हणजे अमृत प्रदान करणारा सहस्त्रारात शिव-शक्तीचे सामरस्य घडवणारा योग आहे. हठ, लय, मंत्र इत्यादी योगात जे प्रवृत्त झाले आहेत त्यांना हा चवथा योग (राजयोग) का व कसा द्यावा? या श्लोकाच्या अर्थावरून हे ध्यानात येते की हठ, मंत्र, लय या सर्व योगप्रकारात व्यक्तिगत प्रयत्न महत्त्वाचेअसतात. तथापि ‘सिद्धयोग’ हा त्याहून वेगळा आहे. सिद्धयोग हा कृपायोग आहे. कारण सद्‌गुरूंच्या कृपाशिर्वादाशिवाय कुंडलिनीशक्ती योग्य पद्धतीने जागरूक होणे शक्य नसते. ती जागृत झाल्यानंतरच शिवशक्तीशी म्हणजेच चैतन्याशी योग्याची गाठभेट होऊ शकते. असे घडून आल्यास त्या योग्याला शिवशक्ती, एकरूपता अनुभविता येते. या ठिकाणी द्रष्टा, दृश्य व दर्शन ही त्रिपुटीच एकमेकांत समरस होऊन जाते. याचाच अर्थ शिव, शक्ती आणि द्रष्टा यांचे ऐक्य गोरक्षनाथांना अभिप्रेत आहे. हे ऐक्य त्यांच्यात शब्दात सांगायचे झाल्यास पिंडब्रम्हांडयुक्त प्रपंच एकमेकांत लीन होणारे असतात. ही एक सर्वोच्च अनुभूति असते. ती कशी असते याचे वर्णन ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्ययातील ओवी ३९६ व ३९७ यामध्ये यथार्थरितीने केलेले आहे.

याचे स्पष्टीकरण करताना असे दिसून येते की हठ, मंत्र, लय वगैरे योगप्रकारात व्यक्तिगत प्रयत्न हे महत्वाचे अंग असते. परंतु सिध्दयोग की ज्याची यथोचित मीमांसा श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या ‘योगबीज’ मध्ये केली आहे. तो योग ‘कृपायोग’ स्वरुपाचा आहे कारण सद्‌गुरुच्या कृपाशिर्वादरुप शक्तिपातातूनच कुंडलिनी शक्तीचे जागरण होऊन जेव्हा तिची भेट ‘शिव’शक्तीशी (चैतन्यरुप) सहस्त्रारात होते त्यावेळी नदी समुद्रास मिळून जसे नदीचे पाणी समुद्राशी समरस किंवा एकरुप होते त्याप्रमाणे कृपांकित योग्यास जेव्हा ही शिव - शक्ती एकरसता अनुभवण्यास मिळते तेव्हा द्रष्टा, दृष्य व दर्शन ही त्रिपुटीच एकमेकात समरस होऊन द्रष्टा श्री शिवदर्शनशक्ती व दृष्य पिडंब्रम्हांडयुक्त प्रपंच हे एकमेकात लीन होतात. श्री ज्ञानेश्वर यासंबंधात म्हणतात.

जे देखिलियाचिसवे। दृष्य द्रष्टा हे आघवे।

एकवट कालवे। सामरस्ये।।                    - ज्ञा.अध्याय १३/९३६

**अर्थ :** ज्याचे दर्शन झाल्यावर दृष्य व द्रष्टा यांचे सामरस्य होऊन एकमेकात मिसळून जातात.

मग तेचि होय ज्ञान। ज्ञाता ज्ञेय हन।

जेणे गमिजे स्थान। तेहि तेचि।।                    - ज्ञा. १३/९३७

**अर्थ :** मग तीच ज्ञाता ज्ञेय व ज्ञान यांची एकरुप स्थिती होते व त्यातूनच मूळ स्थान कोणते ते कळते.

यावरून स्पष्ट होते की, अमरोघप्रबोध मध्ये श्लोक १७ मध्ये श्री. गोरक्षनाथांना जे अभिप्रत आहे. तेच ज्ञानेश्वरांनाही अभिप्रत आहे. त्या अर्थाच्या काही ओव्या ज्ञानेश्वरीच्या १८व्या अध्ययातही आढळून येतात.

मग तयाचेनि प्रसादे। सर्वोप शांति प्रमदे।

कांतु होऊनिया स्वानंदे। स्वरुपीचि रमसी।।     - ज्ञा. १८/१३२०

**अर्थ :** मग त्या ईश्वराच्या प्रसादाने सर्वांचा लय होणाऱ्या शांतिरुप तरुण स्त्रीचा पती होऊन निजानंदात रममाण होशील .

संभूति जेणे संभवे। विश्रांति जेथे विसंवे।

अनुभूतिही अनुभवे। अनुभवा जया।।                    - ज्ञा. १८/१३२१

**अर्थ :** उत्पत्ती स्थिती लय ज्यामुळे होते विश्रांती जेथे विसावा घेते व अनुभूती ज्या अनुभवास अनुभवत असते.

तिये निजात्मपदीचा रावो। होऊनि ठाकसी अव्ययो।

म्हणे लक्ष्मीनाहो। पार्था तू गा।।                    - ज्ञा. १८/ १३२२

**अर्थ :** अशा आत्मस्थितीचा तू राजा होशील अक्षयपद भोगशील असे लक्ष्मीपती कृष्ण पार्थास म्हणाले.

ज्ञानेश्वरीमध्ये ज्या पद्धतीने हा विषय मांडलेला आहे त्या पद्धतीने ज्या क्रिया घडून येतात त्यांना ‘संहारिणी क्रिया’ म्हटले आहे. ही क्रिया विश्वाचे अथवा घटाच्या निर्मितीपेक्षा नेमकी उलटी असते. त्याला ‘प्रतिप्रसवक्रिया’ म्हटले आहे. त्या प्रतिप्रसव क्रियेने संहारीणि होऊन म्हणजेच लय पाहून जीव हा आत्मस्वरूपाशी शांती अनुभवितो. ही गोष्ट आत्मसाध्य आहे. म्हणजे योग्यानी अथवा कोणाही सामान्य माणसांनी त्या स्थितीचा अनुभव घेणे शक्य आहे असा निर्वाळा श्री. ज्ञानेश्वरांनी दिलेला आहे. अमरौघ प्रबोध श्लोक १७ मधील राजयोगांतर्गत कृपायोगामध्ये दैहिक माध्यमातील वरील क्रियांचा अंतर्भाव होतो व तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

श्री. गोरक्षनाथांना हीच गोष्ट अभिप्रेत आहे. सामरस्य ही एक अद्‌भुत अशी गोष्ट असून महार्थमंजरी ग्रंथातील गाथा क्र.६५ मध्ये श्री. गोरक्षनाथांनी हेच पटवून दिले आहे.

अहो संसारसुखातिशय: अहो सुलभं मोक्षमार्ग सौभाग्यम्।

त्रुटित आतंक कलंका अहो शिवयोगिनां यामली सिध्दि:।।

- महार्थमंजरी गाथा ६५

**अर्थ :** अरे। संसार सुखही मिळते आहे. मोक्ष मार्गाचे सौभाग्यही सुलभ रितीने उपलब्ध आहे. यामध्ये कोणत्याही तऱ्हेच्या प्रतिक्रियात्मक क्रिया प्रतिक्रियांचा गोंधळ नाही, भय नाही. शिवयोगी साधकांची हीच भोगमोक्षाची सामरस्य सिध्दी होय. ही शिवाची अनुग्रहमयी शक्तीच असते.

नाथसंप्रदायाचे बहुतेक सर्व ग्रंथामध्ये 'सामरस्य' स्थितीचे यथायोग्य वर्णन केल्याचे आढळते. त्या दृष्टीने 'गोरखवाणी' और 'गोरखयोग' या श्री गोरक्षनाथांच्या प्रमुख ग्रंथातील सूत्रे अभ्यासासाठी समोर ठेवल्यास असे दिसून येते की ही सर्व सूत्रे सामरस्यानुभूतीच्या सर्वश्रेष्ठ अनुभूतीच्या स्थितीमध्ये जाण्याचे मार्गातील प्रमुख अटीच्या स्वरुपात आहेत हे प्रथम स्पष्ट होणे जरुर आहे. 'सामरस्य' हा योग आहे. व योगमार्गातील आवश्यक त्या शर्ती पूर्ण करणे अत्यावश्यक असते.

सामरस्य योगाचे अधिष्ठान शुध्द अद्वैत तत्वज्ञानात आहे. श्री शंकराचार्यांचे अद्वैत हे एकमेवाद्वितीय आहे. दोन भिन्न वस्तू मानून एकाचे खंडन करुन अद्वैत सिध्द केले जाते. परंतु श्री गोरक्षपरंपरेत अद्वैत हे 'विलक्षण अद्वैत' स्वरुपात स्वीकारलेले आहे. सामरस्य स्थितीकडे जातानाच्या मार्गातील साधनरुप अशीही गोरखवाणीतील सूत्रे, संतुलन साधत जीवनातील सुवर्णमध्य साधण्यासाठी अहंकार विसर्जनाच्या मानसिक प्रक्रियांमधून सर्व प्रकारच्या 'अती' चे विर्सजन कसे करावे याचे मार्गदर्शन करतात. गोरक्षतत्तवज्ञानातील ही मानसिक बैठक लक्षात घेणे जरुर आहे. अहंकाराचा प्राण असतो 'अती' चा हव्यास. याला पूर्णविराम दिला की अहंकार मरुन जातो. विसर्जित होतो. अंत:करणपंचकातील अहंकार ह्या घटकाचे नियमन आणि विसर्जन याचे चिंतनासाठी सिध्दयोग्यांनी अथक प्रयत्न करुन काही नियमच प्रस्थापित केले. त्याचे यथार्थ दर्शन श्री गोरक्षनाथांच्या या 'मध्यमार्गाच्या' सूत्रांतून स्पष्ट होते. ही सर्व सूत्रे संतुलन साधण्याची, मध्यावर उभे रहाण्याची आहेत. मध्यावर मन स्थिर ठेवले तर अहंकार त्याचे काम करु शकत नाही. कोणत्याही प्रकारचा अतिरेक टाळणे आवश्यक आहे. नियमांच्या पालनाशिवाय वैयक्तिक व सामाजिक स्तरावर सुख व शांतीची अनुभूती येऊ शकणार नाही असेच त्यांना आग्रहाने सांगायचे आहे. 'अतिरेक टाळा' या मंत्राचा उद्‌घोष 'योगाब्जीनि सरोवरु' अशा श्री गोरक्षनाथांच्या मुखातून झाला आणि ते 'सामरस्य'

साधनेचे नियमच झाले. ह्या आवाजाचा, मंत्राचा प्रतिध्वनि सर्वदूर ग्रीस पर्यंत पोहोचला असे म्हणता येते. ग्रीसमधील 'डेल्फि' या शहरात 'अपोलो' देवतेचे जे जगप्रसिध्द मंदीर आहे त्याच्या शिखरावर खालील वाक्य कोरलेले आहे?[१] तर "Nothing in Excess" (MEDEN-AGAN) (Ref : Dimensions of yoga – Page 118)

**३) मध्यमार्गाची व सामरस्य साधनेची काही सूत्रे :**

हसिबा षेलिबा रहिबा रंग। काम क्रोध न करिबा संग।

हसिबा षेलिबा गाइबागीत। दिढ करि राशि आपनाचीत।। - गो.वाणी/७

**अर्थ :** हसत खेळत आपल्याच नादात रंगून असावे, काम व क्रोधाची साथ करु नये. हसत खेळत गीत ही गात असावे, अशा प्रकारे आपल्या चित्ताला स्थिर ठेवावे.

हबकि न बोलिबा ढबकि न चालिबा धीरै धीरबा पावं।

गरब न करिबा सहजै रहिबा भणत गोरष रावं।। - गो. वाणी/२७

**अर्थ :** फटकुन् बोलू नका. पाय आपटत गर्वाने चालू नका. सावकाश धीमेपणे चालावे कुठल्याही गोष्टीचा गर्व न करता सहजस्थितीत रहा. असे गोरक्षनाथांचे म्हणणे आहे.

धाये न षाइ्बा भूषेन मरिबा अहनिसि लेबा ब्रम्ह अगनिका भेवं।

हठ न करिबा पडया न रहिबा यूँ बोल्या गोरष देवं।। - गो. वाणी/३१

**अर्थ :** अधिक खाऊ नका, पोट मारु नका, ब्रम्हज्ञानाचा अग्नी सतत तेवत ठेवला पाहिजे. शरिरास हट्टीपणाने त्रासही देऊ नका व आळशी बनून लोळत पडू नका. असे गोरक्षदेवांचे वचन आहे.

दूधाधारि परिघरि चित्त नागालकडी चाहै नित्त।

मौनी करै म्यंत्र की आस बिन गुर गुदडी नही बेसास।। - गो. वाणी/४०

**अर्थ :** दुधाचाच आहार घेणाराला सतत दूध कुठे मिळेल याचीच चिंता रहाते तर नागास (जमात) सतत अग्नीसाठी लाकडाची काळजी रहाते. मौनव्रत धारण केलेला मदतीसाठी कुणीतरी मित्राची इच्छा करतो. म्हणून गुरुशिवाय ज्ञान नाही व विश्वासही नाही.

वरील सूत्रांचे अर्थातून एकच एक निष्कर्ष स्पष्ट होतो तो हा की हे संतुलन किंवा मध्यमार्ग म्हणजे आपल्या जीवनातील विषयांची एक निश्चित व्यवस्था. जीवन ही एक वीणाच आहे. या जीवन-वीणेच्या तारा जास्त ताणलेल्याही असू नयेत वा जास्त सैलही असू नयेत तरच संगीत निर्माण होऊ शकेल. या संगीताच्या नादलहरीमधूनच त्या परमतत्वाकडे जाण्याचा मार्ग निश्चित होत जातो व अंतिमत: सामरस्याचा म्हणजे जिव-शिव एकत्वाचा अनुभव येतो.

श्री गोरक्षपरंपरेमधील श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये हे सामरस्याचे अद्वैतविलक्षण स्पष्ट करताना ६ व्या अध्यायामध्ये ह्या एकरुपतेचे, एकरसतेचे, सामरस्याचे अतिशय मनोज्ञ असे वर्णन केलेले आहे . उदा. ज्ञानेश्वरीत

तया हृदयाच्या परिवरी। कुंडलिनीया परमेश्वरी।
तेजाची शिदोरी। विनियोगिली।। - ज्ञा. ६/२८१

**अर्थ :** आत्म्याच्या घरी कुंडलिनी परमेश्वरी पाहुणी आल्यावर तेजरुपाची मेजवानी दिली.

बुद्धीचेनि शाके। हातबोने निके।
द्वैत जेथ न देखे। तैसे केले।। - ज्ञा. ६/१८२

**अर्थ :** बुध्दीरुप भाजीसह ताट वाढून की ज्यात द्वैताचा भास देखील होऊ नये अशी मेजवानी दिली.

हे सर्व पाहिल्यानंतर सामरस्य कसे प्रस्थापित होते? त्यासंबंधातील सूत्रे -

तंव महाभुतांची जवनिक फिटे। मग दोहीसि होय झटें।
तेथ गगनासकट आटे। समरसी तिये।। - ज्ञा. ६/३०६

**अर्थ :** त्यावेळी पंचमहाभुतांचा पडदा नाहीसा होऊन शिवशक्तीचे ऐक्य होते. त्या ठिकाणी ती शक्ती आकाशासह ब्रम्हानंदात मिळून जाते.

ही सहजस्थिती व हे सामरस्य हा सर्व विश्वाचा आधार आहे.

जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ।
जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।। - ज्ञा. ६/३२१

**अर्थ :** हे समरसतापूर्ण ब्रम्हतत्व हे सर्व विश्वाचे मूळ योगरुप वृक्षाचे फळ व आनंदाचे जीवन आहे. या सर्व सामरस्यानुभूतीकडे मध्यमार्गातून जायचे आहे. त्यामुळे मध्यमार्गाची, संतुलन साधनेची जी जी सूत्रे आहेत ती सर्व सामरस्य साधनेचीच अंगे आहेत स्पष्ट होते. ही सहज स्थितीची जशी श्री गोरक्षनाथांची सूत्रे आहेत त्याचप्रमाणे श्री ज्ञानेश्वरांनीही संयमाने तोल सांभाळून योगाची युक्ती कशी साधावी. हे हि सांगितले आहे. अशा महत्त्वाचीअनेक ओव्या ज्ञानेश्वरीत आहेत उदा.

म्हणौनि अतिशये विषयो सेवावा। तैसा विरोधु नोहावा।
का सर्वथा निरोधावा। हेही नको।। - ज्ञा. ६/३४८

**अर्थ :** म्हणून विषयांचे अति सेवन करावे अशी विरोधी वूत्ती नसावी किंवा सर्वार्थानी विरोध तर मुळीच नसावा.

ही युक्ती साधली की असा साधक मोक्षाचे राज्याचा स्वामी होतो.

म्हणोनि युक्ति हे पांडवा। घडे जया सदैवा।
तो अपवर्गीचिये राणिवा। अळंकरिजे।। - ज्ञा. ६/३५६

**अर्थ :** म्हणून हे अर्जुना ही युक्ती ज्याला नेहमीचीच साधली तो मोक्षाच्या राज्यात शोभून दिसतो.

मनाचा ''जिथे चटक लागेल तिथे थांबणे'' हा गुणधर्म ओळखून मनाला आत्मसुखाकडे वळवावे असा निर्देश श्री ज्ञानेश्वरांनी दिला आहे. श्री गोरक्षनाथांच्या अन्य ग्रंथांमध्ये हा सामरस्याचा विषय कसा विचारात घेतला आहे ते थोडक्यात पाहू.

**गोरक्षशतकम्** (इंग्रजीमधे)

दुग्धे क्षीरं घृते सर्पिरग्नौ वन्हिरिवार्पित:।
अद्वयत्वं व्रजेन्नित्यं योगविद् परमे पदे।। १००

**अर्थ :** In the highest stage a knower of yoga always attains non-duality as milk poured into milk or ghee into ghee or fire into fire.

भवभयवने वन्हिर्मुक्तिसोपानमार्गत:।
अद्वयत्वं व्रजेन्नित्यं योगविद् परमे पदे।। १०१

**अर्थ :** In the highest stage a knower of yoga always attains non-duality along the way of this 'मुक्तिसोपान' which is a veritable fire to the terrible forest in the form of samsara (wordly existance)

**गोरक्षपध्दति**

यथा घृते घृतं क्षिप्त्वं घृतमेव हि जायते!
क्षीरं क्षीरे तथा योगी तत्वमेव हि जायते।। ९६

**अर्थ :** जसे तुपात तूप घातले तर तूपच रहाते किंवा दुधात दूध मिसळले तर दूधच होते तसे योगी त्या परमतत्वाशी एकरुप होऊन जातो.

**सिध्दसिध्दांतसंग्रह**

निरुत्थाने स्वस्वरुपाखंडैव प्रतिभाति सा।। ३६

**अर्थ :** निरुत्थान अवस्थेत स्वस्वरुपामध्ये या शक्तीचे अखंड प्रतिभान होते.

**अन्वयार्थ :** जेव्हा कुंडलिनी शक्तीचे निरुत्थान होते म्हणजे मूलाधारातून सुषुम्नामार्गे सहस्त्रारात 'शिवाशी' समरस होते तेव्हा स्वस्वरुपामध्ये या शक्तीचे अखंड प्रतिभान होते.

**अवधूत गीता** (श्री दत्तात्रेयांचा ग्रंथ) (इंग्रजीमध्ये)

विंदति विंदति नहि नहि यत्र छंदोलक्षणं नहि नहि तत्र।
समरस मग्नो भावितपूत: प्रलपति तत्वं परमवधूत:।। अध्याय ७/१५

**अर्थ :** Where the intellect cannot reach, how can there be any form or composition? The great Avadhuta, after purifying himself through meditation

and becoming absorbed in infinite bliss, has sung spontaneously about Brahman.

**४) सामरस्यानुभूति :**

सामरस्यानुभूति ही अनुभाव्य गोष्ट आहे. अनुभवाच्या या पातळीवर अनेक सिद्धपुरूषांना सामरस्ययोगाचे महत्त्व निर्विवादपणे मान्य झालेले आहे. त्यादृष्टीने काही उल्लेख केलेले आहेत. त्यासंदर्भात उदाहरण म्हणून दासबोधातील खालील ओव्या व त्यांचा अर्थ समजून घेणे अगत्याचे आहे.

अवघिया चत्वार मुक्ती। वेदशास्त्रे बोलती।
तयामध्ये तीन नासती। चवथी ते अविनाश। - दास./दशक ४/समास९/२८

**अर्थ :** वेदांनी सांगितलेल्या ४ मुक्तीपैकी ३विनाशी असून चवथी अविनाशी आहे.
(चार मुक्ती: सलोकता, समीपता, स्वरुपता, सायोज्जता)

निर्गुणी अनन्य असता। तेणे होये सायोज्यता।
सायोज्यता म्हणिजे स्वरुपता। निर्गुण भक्ती।। - दास./दशक ४/समास९/३०

**अर्थ :** निर्गुण परमात्म्याशी अनन्य असणे हीच सायुज्यता सायुज्यता म्हणजे स्वस्वरुपता. तिलाच निर्गुण भक्ती म्हणतात.

वरील विवेचनातून हे दिसून येते की 'सायुज्यता' ही जी मुक्तीची अवस्था आहे तिलाच नाथपरंपरेत सामरस्यावस्था म्हटलेले आहे. निर्गुण निराकार अशा शिवतत्वात म्हणजेच ब्रम्हतत्वात जिवाचे विसावणे असाच त्याचा अभिप्राय आहे. अशा प्रकारे जैन, बौद्ध, शांडिल्यऋषी अशा दर्शनविचारांमध्ये ह्याच अंतिम स्थितीची मांडणी थोड्या भिन्न प्रकारे केलेली दिसून येते. अंतिमस्थिती जी अनुभवावयाची आहे तिला भावात्मक किंवा अभावात्मक समजणे थोडेसे कठिण आहे. तथापि गोरक्षनाथांची भूमिका ही सर्वांपेक्षा वेगळी व अत्युच्च ठरते. याला आणखी एक आधार पंडित गोपीनाथ कविराज यांच्या ग्रंथात सापडतो. त्यांनी म्हटले आहे की, सामरस्य म्हणजे साम्य. ज्यावेळी दोन किंवा अधिक सत्ता पूर्ण रुपाने अभिन्न होऊन प्रकाशमान होतात त्यावेळी सामरस्य घडून येते. या अवस्थेत परस्पर भेद प्रतीत होत नाहीत. शिव व शक्ती यांमध्ये जेव्हा सामरस्य घडून येते तेव्हा शिव ही रहात नाही व शक्तीही रहात नाही. किंवा दोन्हीही रहातात. परंतु त्यांचे ठिकाणी कोणत्याही प्रकारचे गुणवैषम्य, शक्तिवैषम्य किंवा भाववैषम्य उरत नाही.[२] (संदर्भ: सिद्ध योग्यांच्या सान्निध्यात पान २००) जी गोष्ट गो. कविराजांची तीच गोष्ट बाबामहाराज अर्विकरांचीही होती असे मला स्पष्ट झाले आहे. सामरस्याचा प्रकर्षाने बोध होणे भक्तजीवनाचा विशेष होय. ''पिंडेपिंडाचा ग्रासू'' होवून स्वत: ईश्वरच भक्ताचे माध्यमातून

व्यक्त होऊ लागतो असे आर्वीकरांचे म्हणणे आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, कोणतीही योगसाधना भक्तीभावशून्य असू नये. गुरूप्रेमामुळे विश्वाशी एकरूप होण्याची मानसिक अवस्था आपोआप साध्य होत जाते. अर्थात त्यासाठी भक्तांनी आपल्या गुरूशी समरस होणे जरूरीचे असते. ज्या प्रमाणात भक्त गुरूशी समरस होतो त्या प्रमाणात त्याचे रूप विश्वव्यापक असल्याची अनुभूती येत जाते. आपली जीवनशक्ती व विश्व या दोन्ही गोष्टी एकच आहेत हे त्यास उमजू लागते. हीच गोष्ट निवृत्तीनाथांच्या शब्दात सांगता येते. ते म्हणजात -

ब्रम्हसुखे झालो मी सदा संपन्न। ब्रम्ह परिपूर्ण अनुभवले।

गुरुकृपे ज्यासी सतपथ पावला। जीव सुखावला ब्रम्हसुखे।।      - निवृत्तिनाथ

**अर्थ :** गुरुंच्या दिव्य प्रेमाची संवेदना अनुभवत असतानाच विश्वाच्या तत्वरुपाची संवेदना भक्त अनुभवू शकतो व यावेळी मानवी देहातील अवस्थांचे गूढ उकलू लागते.

**५) अवधूत संप्रदाय व नाथ संप्रदाय :**

अवधूत संप्रदाय हा अतिप्राचीन असून 'अवधूत' या शब्दाची पुढील प्रमाणे केली जाते. ''यः सर्वान् प्रकृतिविकारान अवधुनोति इति अवधूतः'' त्यावरून सर्वविकार जिंकण्याचे मार्गदर्शन करणारी ती एक व्यवस्थाच आहे. वेद, उपनिषदे, पुराणग्रंथ, हंसगीता, अवधूतगीता, गुरुगीता, जीवनमुक्तगीता इत्यादी ग्रंथातून अवधूतांचे जे उल्लेख व संदर्भ सापडतात त्यावरुन हा संप्रदाय अतिप्राचीन असावा असे स्पष्ट होते. अवधूतांचे व्यक्तिमत्व 'दत्तात्रय' या विभूतीशी साम्य दर्शविणारे असल्यामुळे अवधूत हे दत्तात्रेयांचे एक पर्यायी नामच ठरले गेले.[३] (संदर्भः प्रेमावतारी संत पान ७५) श्री दत्तात्रेयांपासून - श्रीपाद श्रीवल्लभ - नरसिंह सरस्वती - अक्कलकोटचे स्वामी समर्थ त्यानंतर श्री गजानन महाराज, श्री साईबाबा (शिरडी), श्री टेंबेस्वामी - श्री गुळवणी महाराज (पुणे) श्री द.तथा मामा देशपांडे आनंदनगरपुणे अशा प्रवाहातून हा अवधूत साधनापंथ वारकरी संप्रदाया प्रमाणेच एकमेकांना साक्षी ठेवत व साथ देत वाढताना दिसून येतो. नाथ संप्रदाय व दत्तसंप्रदाय यांच्यामधील जेजे म्हणून अवघड होते ते ते सहज स्वीकृतीस सोपे व्हावे यासाठी द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादींचा समन्वय साधणारे तत्वज्ञान अवधूतसंप्रदायांनी सम्यकदृष्टिकोनाचे बनवले. श्री पंतमहाराज बाळेकुंद्री यांनी त्यास 'निःशब्द श्रुतिमार्ग' असे म्हटले. ''वाङ्मनासी दूर सारुनी। धरिला गुरुपंथ। जाहलो शुध्द अवधूत।। (संदर्भः प्रेमावतारी संत पान ८५)[४] श्री पंतमहाराज बाळेकुंद्री यांनी अवधूत मार्गाला अनुभवमार्ग, दत्तपंथराजमार्ग असेही म्हटले आहे.

वेद शास्त्रांसी मागे सारुनी अवधूत मथित मार्ग दावितो
अनुभवपंथी आणुनी सर्व। स्वानुभवस्वरुपी मिळवितो।।[५]
(संदर्भ : प्रेमावतारी संत पान ८८)

अशा श्रेष्ठ अवधूत संप्रदायाचे प्रतिनिधी श्री. पंतमहाराज बाळेकुंद्री यांची २७०० पेक्षा जास्त पद्य - भजने आहेत. त्या मधील सामरस्य व एकरुपत्व दर्शविणारी १/२ उदाहरणे खाली दिली आहेत.[११] (संदर्भ: प्रेमावतारी संत पान २४,२१४,२१८)

अ) काय मागु तुज सदा दिगंबर। दत्त स्मशान वासी
भुक्ती न मागे मुक्ती न लगे बुडवी समरसी ।।धृ.।।
तुजविण अन्य जगती नाही कवणा काय देशी।
मागे त्याचा पत्ता नाही तुचि सर्व देशी ।।१।।
तव चरणाची साक्ष मी देतो काही न मागे।
कृपा दृष्टीने दीन दासा पाही अनुरागे ।।२।।
कर्तृत्वाचे असह्य ओझे घेई तू मागे
निश्चिंतीने सहज दत्त भजन रंगी रंगे।।३।।

ब) ''दत्ताचे पायी आम्ही'' वस्ती केली अखंड
धरियेली गोडी नामी। शांति सेवू उदंड।
अखंड गुरुभजन। करिता जन्म आटणी।
नको तीर्थ वीजन। पुरे भाव गुरुचरणी।
सहज निरंजन। प्राप्त नाम स्मरणी।।[६] (प्रेमावतारी संत पान २१४)

अशा प्रकारे पूर्ण सद्‌गुरुशरणभाव म्हणजे प्रपत्ति व स्वत:ला सद्‌गुरुंच्या प्रेमात विसर्जन करण्याची तीव्र इच्छा अशा अत्युत्कट भावभावनांनी मंडित अशी हजारो पद्ये श्री पंतमहाराजांनी त्यांच्या 'अमृतनानुभव -भावात' रचून सध्याच्या युगातही ब्रम्हविद्येचा सुकाळ करायचा असेल तर नाथ व दत्त यांचा समन्वय करण्याशिवाय पर्याय नाही. हे जाणून बालमुकुंद परंपरेतून हे कार्य सिध्द करण्याचा प्रयत्न केला. नाथ संप्रदायातील प्रेम व भक्ती, महानुभाव पंथातील त्याग, दत्त संप्रदायातील कडक नियम व समर्थसंप्रदायातील समाज प्रबोधन व नीतिन्याय, मर्यादा यांचा आग्रह या सर्व प्रवाहांचा एक मनोज्ञ संगमच 'अवधूत' रुपाने घडत गेला व त्याचे प्रेमस्वरुप प्रतिनिधित्व श्री. पंतमहाराजांनी (बाळेकुंद्री) केले असे स्पष्ट होते. अशा प्रकारे सहजावस्थेतून साम्यावस्थेकडे जाण्याचे मार्गदर्शन अनेक सिध्दपुरुषांच्या चरित्रातून दिसून येते.

### ६) उपसंहार :

सामरस्य ही काही कल्पित वस्तू किंवा अवस्था नसून ती एक योगावस्था आहे. योग म्हणजेच समरसता. एकता. ही एकता, व्यक्ती आणि विश्व,विचार आणि कृती, आत्म तत्त्व व ईश्वरीतत्त्व तसेच प्राणी जीवन आणि वनस्पतीजीवन यांचा श्वासोश्वासक्रियेशी असणारा संबंध अशा सर्व संबंधातून प्रगट होत असते. याचा अर्थच असा की व्यक्ती या घटकाचे सर्व चराचरसृष्टीशी जे संबंध असतात त्यामध्ये काही वेळा सहकार्य असते, काही वेळा संघर्ष असतो तर काहीवेळा ते अक्रियात्मक असतात. यालाच व्यक्तीची जीवनधारणा म्हणता येईल, जीवनदृष्टी म्हणता येईल. वर्तमानजीवन तसेच भविष्यकालीन जीवनाबाबतीत प्रत्येक व्यक्तीच्या तीन प्रकारच्या जीवनधारणा असू शकतात.

विचारमार्ग - विचाराची पध्दत (Way of thinking)

जीवन मार्ग - जीवनाविषयीचा दृष्टीकोन (Way of Life)

उपासना मार्ग - सृष्टीनिर्माणशक्ती व आपलासंबंध. (Way of worship)

या तीन्ही प्रणालींच्या बाबत ज्याज्या क्रिया-प्रतिक्रया जीवनात घडत जातात तसेतसे परिणामस्वरुप जीवनाची दिशा व दशा दोन्ही नक्की होत जातात. विचाराच्या पध्दतीमध्ये (Way of thinking) भोगयोग किंवा भक्तियोग असे दोन पर्याय उपलब्ध असतात. भोगातून परिणामी वैफल्यग्रस्तता तर भक्तितून सुख शांती समाधानाची निर्मिती होते. जीवनविषयक दृष्टिकोन (Way of Life) यामध्ये तीन प्रकारे संबंधांची देवाणघेवाण होत असते. माणूस × माणूस, माणूस × समाज, माणूस × निसर्ग. या तीन्ही प्रकारात सहयोग अपेक्षित असतो. संतुलिन जीवनासाठी सहयोगाखेरीज पर्याय नाही. काही वेळा संघर्ष अनिवार्य वा अनपेक्षित असू शकतो. अशावेळी संघर्ष 'सहयोगात्मक' हवा. जसे मूल आणि आई हा संबंध नक्की झाला की त्यात उत्पन्न होणारा संघर्ष हा सहयोगात्मक रहातो. त्याचप्रमाणे निसर्ग - मानव व समाज - मानव वा मानव - मानव यांच्यामधले संबंध स्पष्ट व नक्की होणे गरजेचे आहे. जर त्यांच्यात संघर्ष उद्‌भवला तर तो सहयोगात्मक राहील अन्यथा स्वार्थ, द्वेष, अहंकार यांच्या परिणामकारक हस्तक्षेपाने टोकाचे मतभेद, तंटे व हिंसा घडत रहातील. स्वार्थपरायण जीवनास काही मर्यादाच रहाणार नाहीत. म्हणून सहयोग असो अगर संघर्ष असो जीवनधारणा नक्की करणारे एकूण चार घटक आहेत. ते पुढीलप्रमाणे १. नीतिन्यायमर्यादा २. तारतम्य ३. विवेक वैराग्य आणि ४. स्वधर्माचरण. या चारही घटकांचा अभ्यास करुन व त्या योगे विचार प्रणाली याचा योग्य तो अभ्यास व त्यातून बोध घेऊन विचारप्रणाली, जीवनप्रणाली व भक्तिप्रणाली नेमकी ठरणे व ती मान्य करणे याशिवाय संतुलित जीवनासाठी अन्य पर्याय उपलब्ध नाही. संतुलनातूनच नंतर सामरस्यावस्थेकडे वाटचाल होऊ शकते. अन्यथा नाही.

या पार्श्वभूमीवर पाहिले तर पश्चिमेकडील देशांमध्ये व्यक्तीची धारणा ही कार्यशक्तीचा विकास सत्ता व सुख त्यांची क्षितिजे वाढवण्यासाठीच करायचा अशी आहे. तुलनात्मक दृष्टीने सद्सद्विवेक व समाधान याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. याउलट भावनिक जीवनाला अवास्तव असे महत्व देऊन अकर्मण्यता निर्माण झाली तरी खोटे समाधान मानणे अशी पौर्वात्य धारणा दिसून येते. अशा दोन्हीही पध्दतीचा त्याग करणे व संतुलित जीवनाचा सुवर्णमध्य साधणे आवश्यक आहे. ह्या सर्व विषयाच्या केंद्रस्थानी आहे प्रत्येक व्यक्ती! प्रत्येक माणूस! आणि त्याला या सामरस्याच्या प्रक्रिया साधायच्या आहेत. वैश्विक तत्वाशी समरसता साधण्याचा विचार करताना ज्या दैहिक माध्यमाद्वारे हे सर्व साधायचे त्या 'मानवी शरीर' यंत्रणेत हे सामरस्य कसे निर्माण करायचे हाहि एक मूलभूत विचारच आहे. म्हणजे पिंड ब्रम्हांड एकरुपता अनुभवण्याअगोदर हा पिंड म्हणजे मानवी देहाची अजबता व त्यात व्यक्त होणारी निसर्गाची मानवी मन थक्क करणारी कार्यपध्दती पाहिली की शरीरशास्त्रातली तज्ञ मंडलीही मौनच पसंत करतात

शरीर विज्ञानांतर्गत अर्थाने 'प्राण' व 'अपान' या दोन वायूंचे एकीकरण म्हणजे सामरस्ययोग व त्याचेसाठी प्राणायामाद्वारा श्वसनावरील संयम हा आवश्यक मानला गेला आहे. वैद्यकीय शास्त्रानुसार श्वसनक्रिया ही 'व्हॅगस' (Vagus) या मज्जातंतूच्या अधिपत्याखाली असते. व्हॅगस मज्जातंतूला अंतर्गामी व बहिर्गामी (Afferent and efferent) असे तंतू जोडलेले असतात. अंतर्गामीतंतूचे उत्तेजन बहिर्गामीश्वास थांबवते व श्वास आत घेण्याची क्रिया चालू होते. व बहिर्गामी तंतूचे उत्तेजन श्वास आत घेण्याची क्रिया थांबवते व श्वास बाहेर टाकला जातो. या क्रियांच्या नियंत्रणातून प्राण व अपान यांचा मिलाफ घडवून आणण्याचे शास्त्र म्हणजेच योगशास्त्र होय. दैहिक माध्यमातूनच विश्वाशी संपर्क साधणे व त्यातूनच ''हे विश्वची माझे घर ऐसी मती जयाची स्थिर'' हा अनुभव घेणे म्हणजेच सामरस्य अवस्थेची अनुभूती होय. मग मानवाला अशा स्थितीत वेगळे प्राप्तव्य काहीच रहात नाही.

'सामरस्य योग' या चालू प्रकरणाबद्दल निष्कर्षरुप असे म्हणता येईल की १००० वर्षापूर्वीच्या विशिष्ठ सामाजिक पार्श्वभूमीवर गोरक्षतत्वज्ञान अभ्यासिले पाहिजे. पांडित्यास कमतरता नव्हती. पण अपार दु:ख, आक्रमणे, दुर्वर्तन, मोह व भ्रमांनी वेढलेल्या समाजाचे परिवर्तन कसे करायचे? त्यासाठी आत्म्याचा दिव्य आविष्कार जर घडवायचा असेल तर तो ज्या शरिरात असतो तिथूनच बदलण्याची प्रक्रिया साधण्यासाठी सर्व योग प्रक्रियांचे माध्यम जो स्थूल व सूक्ष्म देह त्याचेच विज्ञान निश्चित करुन श्री. गोरक्षनाथांनी वर्तनाचे शास्त्र बनवले. त्यानी स्वत:चे जीवन तपस्या, समर्पण व गुरुभक्तीच्या रुपाने यज्ञरुप केले. जीवनातील द्वंद्वाचा नुसता आत्मविज्ञानाशी मेळ न घालता शरीरविज्ञानातून तत्वज्ञानाची

उभारणी केली. श्री शंकराचार्यांच्या विवेकचुडामणीतील त्रिविध तापांना शांत करणारे पाणी म्हणजे जसे  अद्वैत ब्रम्हानुभव आहे त्याचप्रमाणे ब्रम्हांडशक्तीचे पिंडाशी असणारे सामरस्य व एकरुपता साधली की 'विलक्षण अद्वैत' सिध्द होते की ज्याचे वर्णन श्री ज्ञानेश्वर करतात:

''जे आकाराचा प्रांतु। मोक्षाचा एकांतु। जेथ आदि आणि अंतु। विरोनी गेले।''

- ज्ञा. अ. ६/३२१

**अर्थ :** जेथे आकाशाचा शेवट व मोक्षाची अद्वैतस्थिती असते व त्याठिकाणी आदि आणि अंत याचा लय होतो. येथपर्यंत ''सामरस्ययोग'' ह्या गोरक्षनाथप्रणित मुख्य विषयाचे विवेचन मी केले आहे. ह्यानंतर ७ व्या प्रकरणात गोरक्षनाथांचे हे तत्त्वज्ञान वर्तमानकाळात कितपत प्रस्तुत ठरते ह्याची चर्चा केलेली आहे.

## ७) संदर्भ व टीपा :


१) Dimensions of Yoga – by H.H. Kumarswami Chapter 8. Pupublisher. Shri. Kumarswami foundation, Tapovan, Dharwad edition 1988 page 118

२) सिध्द योग्यांच्या सान्निध्यात डॉ. भगवतीप्रसाद सिंह बोरा पब्लिशर्स मुंबई.

३) प्रेमावतारी संत - डॉ. एम.बी. जोशी कराड प्रकरण २ पान ७५. अवधूत प्रकाशन कोल्हापूर.

४) तत्रैव.

५) तत्रैव.

६) तत्रैव.

# प्रकरण - सातवे
# श्री गोरक्ष तत्त्वज्ञानाची वर्तमानकालीन प्रस्तुतता

## १) प्रस्तावना :

प्रस्तुत शोधप्रबंधातील सहाव्या प्रकरणाअखेरपर्यंत मी श्रीयुत गोरक्षनाथांच्या एकूण तत्त्वज्ञानाचा अभ्यास मांडलेला आहे. त्या तत्त्वज्ञानाचे समर्थक अथवा उपासक कोणकोण होऊन गेले, त्यांच्या उल्लेखही या आधीच्या प्रकरणात केलेला आहे. आत्तापर्यंत केलेल्या विवेचनाच्या आधारे एक गोष्ट स्पष्ट होत गेली की, श्री. गोरक्षनाथांचे जे प्रमुख सिद्धांत आहेत ते शुष्क व निष्फळ अशी तात्विक चर्चा करणारे नाहीत. ते सिद्धांत अथवा तत्वज्ञान मानवी जीवनाला भिडण्याचा प्रयत्न करणारे आहेत. उघडच आहे की निव्वळ बौद्धिक चर्चा करण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभूती हीच महत्त्वपूर्ण ठरणारी असते. म्हणून मला असे म्हणावेसे वाटते की श्री. गोरक्षनाथांचे सिद्धांत हे जसे एक समग्र तत्वज्ञान म्हणून पुढे येते. त्याच प्रमाणे ते विशाल अशा मानवी जीवनाला साद घालणारे चिंतनही आहे. अशा या चिंतनाचा रोख व्यक्ती व व्यक्तीने बनलेला समाज, म्हणजेच व्यक्ती व समष्टी या दिशेने घेऊन जाणारा आहे. व्यक्ती आणि समाज हे दोन्ही एकरूप असावेत, नव्हे ते एकरूप असलेच पाहिजेत आणि संपूर्ण जीवनाला व्यापून राहणारी एक सुस्पष्ट विचारधारा म्हणजेच श्री. गोरक्षतत्त्वज्ञान होय. मानवी जीवन ही एक परिपूर्ण व्यवस्था असू शकते यावर श्री. गोरक्षनाथांनी भर दिल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर या जीवनाची रचना कशी असावी याचे मार्गदर्शनही श्री. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानात आपणास आढळून येते.

हे गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान, त्यांनी सांगितलेले सिद्धांत, त्यांनी केलेली विविध काव्यरचना, त्यांचा आपणास होणारा अर्थबोध या सर्व गोष्टी आजच्या जीवनात प्रस्तुत ठरतील काय? आजचे जीवन बदलून टाकण्यासाठी श्री. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे काय? या प्रश्नांना काहीएक उत्तर शोधण्याचा प्रयत्न मी प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे. माझी अशी धारणा आहे की, श्री. गोरक्षनाथांच्या तात्त्विक विचारांचा अंगिकार केला असता आपण आपले सध्याचे जीवन अंतर्बाह्य बदलू शकतो. यासाठी आजचे आपले जीवन कसे आहे? ते कोणकोणत्या गर्तेत सापडले आहे? ते कसे भरकटत निघाले आहे? हे दिशाहीन जीवन असेच जगावयाचे काय? ते बदलून टाकून, त्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी व्यक्ती व समष्टी या दोहोंना श्री. गोरक्षतत्त्वज्ञानाची कशी आवश्यकता आहे हे दाखवून देण्याचा नम्र प्रयत्न मी या प्रकरणात केला आहे.

आता प्रत्यक्ष आजचे जीवन कसे आहे ते पाहू.

## २) वर्तमानकालीन जीवन व त्यातील समस्या :

वर्तमानकालीन मानवी जीवन हे कोणत्याही अंगाने पाहिल्यास त्यात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. व्यक्तिगत पातळीवर पाहिल्यास सर्वच व्यक्ती समाधानी आहेत व सुखाने जीवन जगत आहेत असे म्हणणे धाडसाचे होईल. कौटुंबिक पातळीवरून पाहिल्यास एकाच कुटूंबातील व्यक्तींना अनेक ताणतणावांना तोंड द्यावे लागत आहे. अनेक कुटूंबे उध्वस्त झाल्याचे पहावयास मिळते. अनेक कुटूंबानी मिळून समाज बनतो. त्या सामाजिक पातळीवरून विचार केल्यास तेथेही आपल्या पदरी निराशाच पडते. राजकीय व धार्मिक अशी मानवी जीवनाची महत्त्वपूर्ण अंगे जवळून पाहिल्यास तेथेही अराजक सदृश पद्धती निर्माण झाल्याचे दिसून येते. जागतिक पातळीवरून विचार करू गेल्यास दहशतवाद व हिंसाचार वाढत असल्याचे दिसून येते. अण्वस्त्रांची स्पर्धा राष्ट्राराष्ट्रांमध्ये निर्माण झाल्याचे दिसून येते. हे जग काही क्षणात नष्ट होऊ शकते अशी भीति अनेक विचारवंतांना वाटू लागली आहे. आजच्या जगाच्या स्थितीचे वर्णन स्वा. विवेकानंदानी 'भौतिक संपन्नतेचा ज्वालामुखी' या शब्दात केले आहे. डॉ. राधाकृष्णन यांनीही त्यांच्या 'Present Crisis of Faith' या ग्रंथात मानवी जीवनाला विधायक दिशा कशी देता येईल याचे विवेचन केलेले दिसून येते. P.H.Nowell Smith यांनी त्यांच्या "Ethics" मध्ये आजच्या स्थितीचे वर्णन Cancereous condition या शब्दात केलेले आहे. मी व माझ्या इच्छा यांच्यात जर संघर्ष उत्पन्न झाला तर तो संघर्ष सर्व जगाला वेढून राहणारा असू शकतो. आधुनिक जगातील माणसाला यातले काही कळेनासे झाले आहे. भौतिक सुखाचे व संपन्नतेचे मागे लागून तो आता अशा ठिकाणी आला आहे की तेथून मागेही फिरता येत नाही. म्हणून आधुनिक काळातील मनुष्य जसा आहे व जिथे आहे तेथेच श्री. गोरक्षनाथांचा सिद्धांत, त्यांनी सांगितलेले योगमहात्म्य, त्यांनी दिलेला कर्मावरचा भर, इ. महत्त्वपूर्ण गोष्टी जर माणसाला समजून सांगता आल्या व त्याने त्या समजून घेतल्या तर त्या माणसाचे उन्नयन आजच्या परिस्थितीत होऊ शकते असा मला विश्वास वाटतो. व्यक्तीचे उन्नयन झाले की समाजाचे उन्नयन स्वाभाविकच होत जाते. त्यासाठी आजच्या परिस्थितीतून मार्ग काढणे आवश्यक होऊन बसले आहे. या संदर्भात श्री. गोरक्षनाथांनी सांगितलेले पायाभूत सिद्धांत विचारात घेऊन ते सिद्धांत आजच्या मानवी जीवनाशी परस्पर संबंधांना एकरूपता उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कसे उपयुक्त आहेत हे स्पष्ट होते.

संबंधीत सिद्धांत पुढील विवेचनासाठी नंतर घेतलेले आहेतच. त्या सिद्धांतांच्या अनुरोधाने वर्तमान परिस्थितीत त्याची कार्यवाही कशी होवू शकते यासंबंधात खुलासेवार विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील विवेचनात जाण्यापूर्वी वर्तमान परिस्थिती, त्या परिस्थितीकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन व त्याची व्यापकता थोड्या विस्ताराने पाहणे उपयुक्त ठरेल.

आज ज्या प्रश्नांनी समाजाला वेढले आहे त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या अंगाला ते प्रश्न घासले जात आहेत. मग त्यात त्या व्यक्तीची इच्छा असो वा नसो. परिस्थितीच्या तीव्रतेत व गंभीरतेत फरक असेल पण श्री गोरक्षनाथांच्या आधी हजारो वर्षात अनेकानेक जीवनसमस्या निर्माण होत राहिल्या व त्या त्या काळात समाजावर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्ती किंवा सत्ताधीश यांचेकडून उपायही शोधले गेले व वापरले गेले. या सर्व क्रियांमध्ये उपायांचे नेमकेपण व त्यांची कार्यवाही हा विषय नेहमीच प्रश्नचिन्हांकित रहात आला. व्यक्ती हा एक घटक व तदंगभूत समाजनिर्मिती होत असताना नीतिशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र अशा अनेक विषयांचा प्रादुर्भाव त्यात होत असल्याकारणाने तत्वज्ञानाचे माध्यमातून सामाजिक प्रश्नांची उत्तरे शोधणे तसे अवघड काम असते. व त्यात नेमकेपणा किती हा एक स्वतंत्रच विषय असतो. सामाजिक प्रश्नांना भिडण्याबाबत श्री गोरक्षनाथांचे कोणते सिध्दांत व ठाम मते आहेत ते पुढील विवेचनात स्पष्ट होत जाईल. परंतु तत्वज्ञानांतर्गत सिध्दांतातून जीवनातील प्रश्नांची सोडवणूक करताना अडचणी जरी असल्या तरी या पध्दतीचा फायदा व वैशिष्ठय श्री. बर्ट्रँड रसेल यांनी मार्मिकपणे त्यांच्या ग्रंथात मांडले आहे. ते नमूद करण्यासारखेच आहे. ते म्हणतात.

"Philosophy is to be studied, not for the sake of any definite answers to its questions, since no definite answers can, as a rule, be known to be true, but rather for the sake of questions themselves because these questions enlarge our conception of what is possible, enrich our intellect and diminish our dogmatism. The greatness of the universe which philosophy contemplates renders greatness to the mind which becomes capable of union with the universe!"[१] ( Ref : Problems of Philosophy – page 161)

श्री. गोरक्ष - तत्वज्ञानाची वर्तमानकाळात काय जरुरी? काय उपयुक्तता? भूत, भविष्य आणि वर्तमान या शब्दांना जेव्हा 'काळ' हा शब्द जोडला जातो तेव्हा त्यांच्या अर्थाचे आयाम फार वेगळे व अर्थपूर्ण असे व्यक्त होतात. सामान्यपणे 'काळाचे' तीन प्रकारे विभाजन मांडले जाते. भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ. यातील भूतकाळ व भविष्यकाळ कसे निर्माण होतात? याची निर्मिती करणारे इंद्रिय आहे मन. मनच काळाचा

आयाम निर्माण करते. भूतकाळाचे स्मरण हे मनातूनच होत असते. मग समजा जर स्मृतीच नाहीशी झाली तर? तर भूतकाळ हा रहातच नाही. नाहीसा होतो. भविष्यकाळही मनामध्येच निवास करतो. जर कल्पनाच गळून पडल्या तर भविष्यकाळाचेही असणे संपून जाते. परंतु वर्तमानक्षण हा नेहमी असतोच. वर्तमान क्षण हा आपल्यावर किंवा आपल्या मनावर अवलंबून नाही. वर्तमानक्षण हा अस्तित्वगत आहे. चालू क्षणच फक्त सत्य असतो. या आयामाचा अशा वेगळया प्रकारे विचार करण्याचे कारण हे की वर्तमान क्षणाचा विचार हा मूलभूत व सिध्दांतरुप आहे. त्याच्या अर्थाचे संदर्भातच चालू वर्तमान परिस्थितीची चिकित्सा केल्यास काही निष्कर्ष निघू शकतात. अन्यथा तो एक सामाजिक परिस्थितीचे निरीक्षणाचा प्रकार होईल.

हजारो वर्षे वहात आलेला बहुमिश्रित संस्कृतीचा असा हा जो समाजप्रवाह आहे त्यातील एक घटक या नात्याने सिंहावलोकन करताना काय स्पष्ट होत जाते? वर्तमान स्थिती ही भूतकाळाच्या उदरातील सर्व संचित कर्माचे क्रियमाण कर्म आहे असे म्हणता येईल. आताच्या सामाजिक परिस्थितीचा जन्म किंवा अस्तित्व ही काही अचानक व अनपेक्षित अशी घडलेली घटना नव्हे. त्याचे दातृत्व मागील पिढयांवर टाकताना त्याच पिढयांचे आपण वंशज असल्यामुळे आपणच आपणाकडे बोट दाखवण्याचाच प्रकर होईल. इथे समाज म्हणजे आपण ज्या लोकांमध्ये वाढलो तो असा मर्यादीत अर्थ होतो. मग फक्त त्याचाच विचार हा पुरेसा आहे का ? मग 'हे विश्वची माझे घर' ही विचारांची व्यापकता कशासाठी? मूलभूत सिध्दांतरुप विचार करताना समाजाच्या कोणत्या सीमेपर्यंत आपण जायचे? कोणत्याही सीमेपर्यंत जरी विचार केला तरी मानवी जीवनाची जडणघडण करणारे अत्यंत महत्वाचे दोनच दृष्टीकोन समोर येतात. भौतिक व अभौतिक, किंवा आत्मज्ञान व विज्ञान. ज्ञान किंवा शास्त्र म्हणून जेजे आहे त्यांच्या सर्व शाखा-उपशाखा वरील दोनच दृष्टिकोनांत सामावल्या जातात. मग ती कोणतीही शाखा असो. त्यामुळे श्री गोरक्षनाथांच्या 'दर्शन' शास्त्रातले जे मूलभूत विचार आहेत की जे सिध्दांतांच्या भाषेत मांडले गेले आहेत त्यांचा विचार, त्यांची व्याप्ती, त्याचे जीवनावरचे परिणाम हे कोणत्याही एका जातीचे, धर्माचे, पंथाचे वा व्यक्तिगत नसून ती विश्वांतर्गत अशी 'नियत' (निसर्गनियमाने बांधलेली) तत्वे आहेत. त्यामुळे त्यांचे अबाधित्व आपोआपच रहात जाते.

श्री. गोरक्षतत्वज्ञानातील सिद्धांतांचा जेव्हा विज्ञान व आत्मज्ञान या दोन्हींच्या संदर्भात विचार करावयाचा असेल त्यावेळी असे दिसून येते की, तत्वज्ञानाचे काही सिद्धांत हे विज्ञानाच्या प्रायोगिक पद्धतीतून स्पष्ट करता येतीलच असे नाही. कारण तिथे अनुभव व त्यानुसार घडलेले जीवन हाच पुरावा असतो. असे जे प्रातिभज्ञान असते ते आत्मशक्तीतून

स्फुरत असल्यामुळे त्याचे खुलाशासाठी विज्ञान असमर्थ ठरते. अशा विज्ञानाच्या मर्यादा समोर ठेऊनही विवेचनात जिथे जिथे विज्ञानाचा आधार घेता येईल तेथे घेऊन विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. शरीरविज्ञान व मनोविज्ञानापर्यंत गेल्यानंतरच्या आत्म्याच्या प्रांतात मात्र त्याची शक्ती व स्फूर्तीच काम करत असल्यामुळे त्याचे संबंधात अनुभवी सिद्ध लोक किंवा संत लोक यांचे निष्कर्ष प्रमाण मानून पुढे जावे लागते.

जागतिक व पर्यायाने भारतीय सामाजिक जीवनाकडे ऐतिहासिक दृष्टीने पहाण्याचा प्रयत्न करु. मानवाच्या गरजा व त्यानुसार होणारे संशोधन, तसेच जिज्ञासांचा पाठपुरावा करताना होणारी प्रगती व अनुभव अशाप्रकारे वाङ्मय, विज्ञान व धर्म या तिन्ही क्षेत्रात गेल्या ३०० वर्षात मोठया उलाढाली व बदल झाले. विज्ञानाच्या क्षेत्रात अणुविज्ञान व इलेक्ट्रॉनिकस, वाङ्मयाच्या क्षेत्रात जितक्या म्हणून कला आहेत त्या सर्व क्षेत्रात प्रचंड वाङ्मयनिर्मिती झालेली असून जगातली ग्रंथालये ओसंडून वहात आहेत. धार्मिक क्षेत्रात सर्व धर्मांची तत्वे उच्च असूनही धर्म म्हणजे सत्य, धर्म म्हणजे प्रेम, धर्म म्हणजे परोपकार, धर्म म्हणजे मानवता असे असूनही व्यक्तिगत स्वार्थ व अहंकाराला प्राधन्य दिले जात आहे. एकांगीपणा, संकुचितता यामुळे संतुलनातून साधले जाणारे सर्वसमावेशकत्व अत्यंत क्षीण झालेले असल्यामुळे वैश्विक एकात्मतेचा विषय ज्यानी तोलून धरायचा त्या धर्मसंस्थांचे कार्याचा परिणाम व्यापक स्वरुपात अनुभवास येत असल्याचे दिसत नाही. विश्व कल्याण व विश्वएकात्मता हे विषय फक्त वैचारिक स्वरुपाचे ठरत आहेत. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय व राजकीय भूमिकेवर घट्ट उभे राहून शेजाऱ्यासाठी किंवा व्यापक भूमिकेतून जागतिक स्थैर्यासाठी कोणतीही तडजोडच जर करणार नसेल तर जीवनाच्या सर्व स्तरावर हळूहळू तणाव निर्माण होणार. व सर्व विषय या प्रकारे ताणले जाऊन अस्तित्वालाच जर भिडू लागले तर जी परिस्थिती निर्माण होऊ शकते तशा प्रकारच्या परिस्थितीत आज माणूस ओढला जात आहे. आज दिसणारी संपन्नता, साधनविपुलता व जीवनाचा वेग हे सर्व विषय जगाच्या ३०० वर्षाच्या स्वान्त-सुखाला अव्हेरुनच हाताळलेले आहेत. त्यामुळे त्यात मोठया प्रमाणात मानसिक व भावनिक पोकळी व कमतरता निर्माण झाली आहे.

विशेषत: गेल्या १५० वर्षात भौतिक विज्ञानाचा मानवी जीवनावर क्रांतिकारक परिणाम होत राहिला आहे. विज्ञानाच्या गतीमुळे जीवन हरघडी बदलते आहे. मात्र हा बदल होत असताना जे स्थैर्य त्या बदलामुळे आले पाहिजे त्याची लक्षणे दिसत नाहीत. स्थिरतेचे लक्षण आहे शांती व समाधान. या दोन गोष्टी दिसतात का हे पहायला हवे. विज्ञानाची प्रगती इतक्या वेगाने होत आहे की कोणता पल्ला गाठला जाईल व त्या अनुशंगाने माणसाचे जीवन तो बदलाचा वेग पेलू शकेल का हा प्रश्न आहे. अन्यथा मोठी समस्या निर्माण होऊ शकते एवढा एकच निर्णय समोर येतो.

वर्तमान काळात कोणत्याही स्तरावर असो, सुख, शांती व समाधान यांचा शोध घ्यावा लागतो आहे. शोधून काय दिसते हा पुढचा प्रश्न. कारण शोध घेण्याइतपत हे विषय कमीकमी होत चालले आहेत. सर्व बाजूनी संतुष्ट व पुष्ट अशी समाजव्यवस्था शक्य आहे का? हा मूलभूत प्रश्न आहे. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न 'क्रांती' या नावाखाली बऱ्याच देशात झालेले आहेत. सर्वसामान्यांच्या सुखाचे व समृध्दीचे नावाखाली लाखो लोकांची कत्तल व रक्तपात झाला. सत्तास्थानावरची माणसे फक्त बदलत गेली, अशा परिस्थितीत वर्तमान काळात सामान्य माणसास पोरके झाल्याची जाणीव सतत होत रहाणे ही काय अवस्था आहे? याला जबाबदार कोण? या असाधारण परिस्थितीवर उपाय आहे का? त्या दृष्टीने श्री. गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान अभ्यासणाचा हा विषय आहे.

श्री. गोरक्षनाथांचे प्रमुख सिद्धांत पुढीलप्रमाणे असून त्यांचे आधारे जीवनातील समस्यांचे निरसन कशाप्रकारे होऊ शकते ते पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

१) ब्रम्हांडी ते पिंडी व पिंडी ते ब्रम्हांडी, २) वृत्तींचे उदात्तीकरण व शक्तींचे संचालन, ३) संसारी लोकही हे योगाचरण करून समाज संतुलन साधू शकतात, ४) ब्रम्हचर्य ही अवस्था दमनात्मक नको तर सहज संतुलनावस्था हवी, ५) नाथमत म्हणजे शिव-शक्ती सामरस्य.

या पाचही सिद्धांतांची सविस्तर चर्चा प्रकरण तीन मध्ये करण्यात आलेली आहे. त्या तपशीलात पुन्हा शिरण्याचे कारण नाही. मुख्यत: पिंडी ते ब्रह्मांडी हे सूत्र गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र आहे. संतुलित आनंदावस्था साध्य केल्यानंतर व्यक्तीच्या समाधानात व शांत वृत्तीत भर पडत जाते. त्यासाठी व्यक्तीला आपल्या वृत्तींचे उदात्तीकरण करणे क्रमप्राप्त आहे. योगशास्त्राच्या अभ्यासातून ही स्थिती व्यक्तीला प्राप्त करता येते. गुरूकृपेचे महत्त्वही मी यासंदर्भात यापूर्वीच नोंदविले आहे. व्यक्तीचे ठिकाणचे आत्मतत्व हे जितके सूक्ष्म आहे तितकेच ते सर्वव्यापी आहे. व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या शक्ती व त्यांचे योग्यप्रकारे होणारे संचालन हे योगप्रक्रियेचे फलित होय. इंद्रिय, मन, बुद्धी व अंत:करण अशा सर्व घटकांचे परस्परावलंबन कसे असते याचे विवेचनही मी तिसऱ्या प्रकरणात केलेले आहे. त्याच्या तपशीलातही येथे जाण्याचे कारण नाही.

व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, बौद्धीक व अध्यात्मिक अशा सर्व शक्तींचा उपयोग भक्ती व प्रेम यांचेशी एकरूप होण्यासाठी आवश्यक आहे. गोरक्षनाथांच्या मते, जीव हा शिवाचा अंश आहे. त्या शिवतत्त्वाशी एकरूप होणे त्यांना अभिप्रेत आहे. खुद्द गोरक्षनाथांनी ही एकरूपता अथवा समरसता अनुभवली होती. ही अनुभूती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी

सन्यासमार्ग पत्करला असे झाले नाही. ते सन्याशी होतेच. तरीही त्यांनी एकांगीपणाचा अतिरेक टाळला. विवेक, वैराग्य व तारतम्य यांचा समन्वय म्हणजे गोरक्षनाथ होत. मानवी जीवन समाधानी कसे होईल यासाठी गौतम बुद्धांप्रमाणेच तेही देशभर फिरत राहिले. सारांश असे म्हणता येईल की, समाजाच्या भौतिक व अध्यात्मिक उन्नतीसाठी ते आयुष्यभर झटत राहिले. हे करताना त्यांनी आपली विचारसरणी व प्रत्यक्ष जीवन जातीधर्माच्या भिंतीपलिकडे नेले होते. आजच्या जीवनातदेखील ही भूमिका कोणालाही आचरता येण्याजोगी आहे. फक्त तसा निश्चय करायला हवा. समरसीकरणाच्या दिशेने पावले टाकायला हवीत. असा आग्रह गोरक्षनाथांच्या नंतर अनेक साधूसंतांनी धरल्याचे दिसून येते. म्हणून आजच्या मानवापुढील सर्वप्रकारच्या समस्या सोडवायच्या असतील तर अंतर्मुख होऊन स्वत:चे सामर्थ्य समजावून घ्यावे लागेल. गोरक्षनाथांच्या ''सामरस्ययोग'' या संकल्पनेपर्यंत पोहचणे प्रत्येक व्यक्तीला शक्य आहे.

म्हणून माझ्या मते गोरक्षतत्त्वज्ञान हेच आजच्या सामाजिक परिस्थितीत निश्चितपणे कार्यरत होऊ शकते. जीवनाच्या विविध अंगामधून चेतनाजागृती घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे. हे झाले तरच व्यक्तीगत व सामाजिक स्तरावर अपेक्षित असे बदल घडू शकतील. एका शब्दात सांगावयाचे झाल्यास गोरक्षतत्त्वज्ञान हे एक संपूर्ण जीवनाला व्यापणारे तत्त्वज्ञान आहे. त्यांनी सांगीतलेले तात्त्विक सिद्धांत हे व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनप्रणालींशी संबंधीत असेच आहेत. नि:श्रेयसाची प्राप्ती हेच आपणा सर्वांचे सर्वोच्च ध्येय असले पाहिजे.

वरील सर्व विवेचन हे श्री गोरक्षतत्वज्ञान हे आताच्या विपरीत सामाजिक परिस्थितीत कशा प्रकारे कार्यरत होऊ शकेल व जीवनाच्या विविध अंगातून जे चेतनेचे अध:पतन व ऱ्हास चालू आहे. ते कसे थांबवता येईल व सर्वाधाने वैयक्तिक व सामाजिक स्तरावर ज्ञान व विज्ञान यांच्या माध्यमातून संपन्नता व सुख शांती समाधानाची निर्मिती करता येईल याचे स्पष्टीकरणार्थ केलेले आहे.

श्री गोरक्ष तत्वज्ञान हे काही नुसते भावनिक चिंतन नाही तर ते जीवनविज्ञान आहे. असे विधान करताना त्याचा आधार काय? याचे साठी हे सर्व विवेचन करताना श्री गोरक्षनाथांचे तात्विक सिध्दांत हे व्यक्तीच्या व तदनुसार समाजाच्या जीवनप्रणालीशी व त्यातूनही अभ्युदय व नि:श्रेयस साधण्यासाठी कसे आवश्यक आहेत व ते प्रथमत: व्यक्ती या केंद्राशी भिडून तिथूनच सर्व समाज, राष्ट्र व विश्वाचा विचार करणे कसे जरुर आहे याचेच हे विवेचन आहे.

श्री गोरक्षनाथांचे तत्वज्ञानांतर्गत ज्ञानाचे व विज्ञानाचे जे सूक्ष्म धागे आहेत त्या धाग्यांच्या योग्य संयोजनातून जर जीवनवस्त्र विणण्याचा विचार केला व प्रयत्न केला तर पुन्हः या भूतलावरच्या मानवाचे उत्थान अशक्य नाही. किबंहुना खूप विचारांती असे निश्चितपणे निष्कर्ष निघू पहातो की त्यानी (म्हणजे श्री गोरक्षनाथांनी) जीवन परिवर्तन कोणत्या केंद्रातून प्रथम सुरु झाले पाहिजे की ज्याचे परिणाम स्वरुप इतर क्षेत्रांमधील परिवर्तन व रचनात्मक बांधणी होऊ शकेल याचा जो सिध्दांत आपणासर्वासमोर मांडला आहे. तो आहे केंद्राभिगामी प्रेरणांचा सिध्दांत! मी त्यास “Doctrine of centripetal force” म्हटले आहे.

श्री गोरखनाथांच्या विस्तृत वाङ्‌मयातून जे तत्वज्ञान व योगशास्त्र मांडले गेले आहे त्यात व्यक्ती (Individual) हा घटक केंद्रस्थानी आहे. पण याचा अर्थ त्यांनी ‘समाज’ या घटकाकडे दुर्लक्ष करण्यास परवानगी दिली असा होत नाही. चालू घडीला सर्वांना जाणवणारी जी समाजातील अस्थिरता व असंतुलन आहे ते राजकीय किंवा आर्थिक विषयाशी काही अल्प प्रमाणात संबंधित आहे हे खरे. परंतु प्रमुखपणे ते नैतिक बाबीतील विकृत धारणांशी व व्यवहाराशी संबंधित आहे. मानवाचे अस्तित्व भौतिक सुखसाधनांमध्ये फक्त टिकून असणे हा काही सामाजिक स्वास्थाचा मानदंड होऊ शकत नाही.

हजारो वर्षाच्या इतिहासात सामाजिक व वैयक्तिक सुखाचे वेगवेगळे मानदंड स्विकारलेले दिसून येतात. व्यक्तीचे शारीरिक सुख हेच प्रमुख असा विचार भारतात बृहस्पतीनी मांडला. न्याय व वैशेषिक दर्शनाचे कर्ते गौतम व कणाद यांनी शरिरापेक्षा मानसिक सुखावर भर दिला. अर्वाचीन काळात बेंथॅम व मिल (Bentham and Mill) यांनी क्षणिक सुखापेक्षा दीर्घकालीन सुख व तेहि केवळ व्यक्तिगत नाही तर जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख हाच योग्य काय व अयोग्य काय (Measure of right and wrong) याचा मानदंड निश्चित केला. मिल (Mill) यांनी सुखाचा दर्जाही महत्वाचा आहे अशा प्रमुख मुद्याची त्यात भर घातली. श्री मिल यांचे त्याबाबतचे प्रसिध्द विधान खालीलप्रमाणे आहे.

“It is better to be a human being dissatisfied than a pig satisfied, better to be Socrates dissatisfied than a fool satisfied” This is strongly reminiscent of Epicurian distinction between physical and mental pleasures"[२] (Ref: Dimensions of Yoga - Page No 230-231)

श्री मिल यांचा व्यापक सुखवादी तत्वज्ञानाची स्वीकृती ‘सुखाचा दर्जा’ (Quality of Pleasure) हा महत्वाचा मुद्दा पूर्णपणे विसरुन जेव्हा होते तेव्हा यातून काय निष्पन्न होते हे आता जागतिक स्तरावर दिसतेच आहे. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर सुखाच्या विकृत कल्पनांचा स्वीकार हा निसर्गावर हुकमत मिळवत असतानाच स्वत:वरची हुकमत गमावत गेल्यामुळे झाला आहे. त्यामुळे मानवी देहांतर्गत ज्या निम्न स्तरावरच्या वासनांचा जोर असतो.[३] (This

is indicated by a id” and term” libido” in psychology (Ref: Psychology of Munn- Page 139) त्यातून बाहेर पडण्याचा विचार व त्यानुसार आचार जर झाला नाही तर नैतिक संकट किंवा आणीबाणी (Moral crisis) शिवाय दुसरे काहीही संभवणे शक्य नाही. त्यामुळे व्यक्ती जोपर्यंत निसर्गाने दिलेली ‘कर्मस्वातंत्र्याची’ अदभुत शक्ती योग्य प्रकारे वापरत नाही किंवा वापरणार नाही. तो पर्यंत सद्सद्विवेकबुध्दी कार्यान्वित होऊ शकत नाही. ह्या उस्फूर्त शक्तीच्या विकासावर म्हणजे त्या तत्वज्ञानावरच कॉंट (Kant ) यांनी विकसित केलेले त्यांचे निष्काम कर्मवादाचे तत्वज्ञान आधारित असून त्यांचे प्रसिध्द विधान खालीलप्रमाणे आहे. “There is nothing than unconditionaly good except a good will.[४] (संदर्भ: नीतिमीमांसा, पान १६२) नैतिक क्षेत्रात व्यापकपणे स्वीकारलेला हा सिध्दांत असून कर्म योगाच्या मानसशास्त्राचे संपूर्ण विज्ञान म्हणजेच श्रीमद् भगवदगीता हा ग्रंथ होय.

कर्माबरोबर ‘कर्तव्य’ नक्की होत असते. ज्या एका परंपरेतून आपण ह्या समाज प्रवाहात आहोत त्या बाबतीत प्रत्येक व्यक्तीला काही ऋणे असतात ती पुरी करण्याच्या भावनेतूनच कर्तव्याची योग्यता निश्चित होते.

या सर्व सामाजिक संबंधातील कर्तव्ये यशस्वीपणे व सर्वांना हितकारक अशी पार पाडायची असतील तर त्यासाठी मुळात ‘व्यक्ती’ हे माध्यमच सर्वार्थाने शुध्द व समर्थ असणे आवश्यक आहे.

शुध्दता (शुचिता) ही अंतर्बाह्य नीतिनियमांचे पालन करुन प्राप्त करावी लागते व सामर्थ्य हे, स्वत:ची यथार्थ ओळख होऊन आत्मतत्वाची अनुभूती यावी अशी उत्कट इच्छा व तसे प्रयत्न असतील तरच प्राप्त होऊ शकते.

शुचिता म्हणजे काय? हे मांडायचे झाल्यास मन-बुध्दी -चित्त -अहंकार हे निसर्गदत्त शक्तिचतुष्टय परिशुध्दतेच्या श्रेष्ठ पातळीवर ठेवण्याचा सर्व व्यवहार व कर्मयोग म्हणजे शुचिता. शुचितेची संकल्पना तीन भागातून व्यक्त करता येते.

१. सावधानता - योग अयोग्य याबाबत

२. समभावना - सर्वाठायी समत्व.

३. सत्कामना - निस्वार्थ कर्मपूर्ती

व्यक्तिगत धर्म म्हणजे अशा प्रकारे व्यक्तीची चारित्र्यबांधणी होणे.

यासाठी प्रत्येक व्यक्तीने काही नित्य अशी कर्तव्ये व साधना करणे जरुर असते. की ज्यातून त्यास त्याची स्वत:ची ओळख होऊ शकेल. ही स्वत:ची ओळख म्हणजेच स्वत:च्या मूलभूत अस्तित्वाचा परिचय असतो. त्यातूनच प्रत्येक व्यक्तीत जे आत्मतत्व उपस्थित असते.

त्याचा अनुभव येऊ शकतो. हे जमले तरच व्यक्ती व समाज यांची अभ्युदय व नि:श्रेयस हे दोन्ही साधणारी बांधणी होऊ शकते. म्हणून प्रत्येक व्यक्तीचा धर्म कोणता? तर स्वत:चा नेमका यथार्थ परिचय करुन घेणे हाच तो धर्म होय.

व्यक्ती व समाज यांचे हितसंबंध अशा प्रकारे जोडले गेले तरच योग्य अर्थाने विज्ञाननिष्ठ समाजाची स्थापना होऊ शकेल. हा सर्व विचार संपूर्ण सृष्टीची धारणा ज्या व्यवस्थेतून होते त्यामध्ये येतो.

विश्वातील ग्रहगोल, नक्षत्रे सूर्यमाला अशा ब्रम्हांडाची व्यवस्था ज्या नियमांनुसार चालते ती आहे वैश्विक व्यवस्था. (Cosmic Order)

मनुष्येतर सृष्टी, मानवसमाज, वनस्पती, पशू, पक्षी यासर्वांची जीवन धारणा. सभोवतालच्या परिस्थितीशी संबंधित व्यवस्था. (Eeological Order)

माणसामाणसातील सामाजिक संबंधाची व्यवस्था. (Social Order)

माणसाच्या अंतर्विश्वाची म्हणजे भावविश्वाची धारणा. (Mental Order)

यामधील वैश्यिक व्यवस्था व सभोवतालच्या परिस्थितीची व्यवस्था मधील नियम हे नियतीचे म्हणजे निसर्गाचे नियम काटेकोर व नक्की असतात. त्यात चुकीला क्षमा नसते. त्याना 'ऋत' म्हटले जाते. सामाजिक व्यवस्था व भावविश्वाची व्यवस्था यांचे नियम इतके काटेकोर नसतात. त्यात चुकीला क्षमा असते. अशा नियमांना 'सत' म्हटले जाते.

ऋत+सत अशी ही व्यापक विश्वधारणा असून त्याचे 'ज्ञान' हेच जीवनाचे 'विज्ञान' बनते. याला भारतीय परंपरेत 'धर्म' ही संज्ञा असून त्यात जाति वाचकता किंवा जन्मप्रामाण्य असा कोणताही विषय नाही.[५]

(संदर्भ संतधर्म जीवन दर्शन - पान १८)

हे जे यशस्वी व साफल्य प्रदान करणारे असे जीवनाचे विज्ञान आहे ते शास्त्र असून तो काही नुसता विचार नाही किंवा भावभावनांचा पाठपुरावा पण नाही.

जीवनाचे हे गहन विज्ञानच श्री गोरक्षनाथांनी 'नरवैबोध' या १३ सूत्रांच्या गुंफणीतून मांडलेले असून त्यांनी त्यांच्या सर्व जीवनाचे चिंतनच जणू त्यातून व्यक्त केलेले आहे. त्यातील सूत्रांचा रोध व बोध थोडक्यात पाहिला तर 'व्यक्ती' या केंद्राची (Unit) बांधणी भक्कमपणे होऊन अशा व्यक्ती समाजात आदर्शभूत होऊन जेव्हा उभ्या रहातील त्याचवेळी नैतिक उत्थान शक्य आहे. श्री गोरक्षनाथांनी ज्या ऋध्दिसिध्दि कठोर साधनेतून मिळवल्या, मंत्र-तंत्र-यंत्राचे शास्त्र उभे केले त्याच श्री गोरक्षनाथांनी समाजबांधणीसाठी त्यांचा उपयोग जसा केला तसा त्यांचे मर्यादित महत्व व धोके ओळखून त्यांचा त्यागही करायला सांगितला आहे.

याचा अर्थ स्पष्ट आहे. व्यक्तीच्या देहमाध्यमातील सर्व घटकांचे नुसते उन्नयन (sublimation) नव्हे तर त्या घटकांचे पवित्र परिवर्तन (Divine Transformation) साधणे व अशा व्यक्तींच्या माध्यमातून समाजात नैतिक तत्वांची प्रतिष्ठापना करत असतानाच व्यावहारिक व आध्यात्मिक अशा दोन्ही पातळयांवर सहचर्य, सहकार्य, विश्वास, प्रेम व सहनशीलता अशा गुणांची निर्मिती करत माणुसकी व मानवता अनुभवणे, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे असा सामाजिक उत्क्रांतीचा उद्देश व आदेशच श्री गोरक्षनाथ त्यांच्या जीवनातून देत आहेत.

त्यादृष्टीने 'नरवैबोध' मधील सूत्रांचा थोडक्यात परामर्श घेणे आवश्यक आहे.[६]

- (संदर्भ : 'गोरखबानी' पान २२४)

**नाथमत म्हणजेच शिव-शक्ती सामरस्य व ''नरवैबोध'' सूत्रे**

शिव-शक्ती सामरस्यावस्थेचा अनुभव घ्यायचा असेल तर नरवैबोध मधील सर्व सूत्रांचा अभ्यास आवश्यक आहे. ही सूत्रे म्हणजे श्री. गोरक्षनाथांचे समग्र जीवनतत्त्व ज्ञानाची मांडणी असून जीवन सर्व बाजूनी संतुलित, समरसतापूर्ण व समर्थक असे घडू शकते याचा वस्तुनिष्ठपाठच त्यांनी सर्वांना दिला आहे.

**सूत्र क्र. १**

सुणौ हो नरवै सुधि बुधिका विचार। पंचतत ले उतपना सकळ संसार।

पहलै आरंभ घट घरचा करौ निसपति। नरवै बोध कथंत श्री गोरष जती।।

**अर्थ व खुलासा :** हे नरवीरांनो। सम्राटांनो। मी जे सांगतो आहे. ती बोधाची गोष्ट ऐका. हा सर्व संसार पाच तत्वातून उभा राहिला आहे. गर्भितार्थ असा आहे की असा संसार हा क्षणभंगूर असून तुम्ही धावाधाव थांबवून शांतपणे विचार केला पाहिजे. त्यासाठी त्यांनी चार गोष्टी सांगितल्या आहेत. आरंभ, घट, परचा व निस्पत्ती. आरंभ म्हणजे अंतर्मुखता. यालाच पतंजलींनी प्रत्याहार म्हटले. महावीरांनी प्रतिक्रमण म्हटले. येशू ख्रिस्तांनी कनव्हर्जन म्हटले. जीवनातल्या क्रांतीची सुरवात इथून होते. दुसरी गोष्ट आहे घट. घट म्हणजे शरीर. शरिराचे विज्ञान रहस्यमय आहे. कोट्यावधी पेशींचे बनलेले हे शरीर व त्याचे आपण मालक. मालकास शरिराची ओळख हवी. त्याचप्रमाणे शरीर हे परमात्म्याचे मंदीर म्हटले जाते. ते निरोगी, आनंदी, सदृढ असायला हवे. इतके झाले म्हणजे आपण म्हणजे कोण व काय आहोत याचे परिचयाची घटना घडते. तिसरी गोष्ट आह परचा. म्हणजे परिचयाची. तिथे चेतनेच्या कार्यप्रणालीची प्रचिती येते. नंतर चवथी गोष्ट घडते निसपति. म्हणजे निष्पत्ति. आपण खरोखरच चेतनेने व्याप्त असे चैतन्यरुप आहोत तेच आपले खरे स्वरुप आहे याचा अनुभव येतो. जीवनाचा अर्थ कळतो. नरवैबोधमधील सूत्रे ही व्यक्ती या घटकाची बांधणी

करणारी व अशा व्यक्तीच्या जीवनातील प्रेरणांच्या आदान-प्रदान प्रक्रियांच्याद्वारा समाजपरिर्वतन घडविणारी अशी आहे.

सूत्र १ मध्ये मांडलेल्या आवश्यक गरजांसाठी काय काय केले पाहिजे हे पुढील १३ सूत्रात गंफून जी मांडणी झाली आहे ती म्हणजे व्यक्तीच्या आत्मतत्वाकडे जाणाऱ्या केंद्राभिगामी प्रेरणांच्या निर्मितीचे व गतिजन्य कार्यप्रणालीचे विज्ञानच आहे असे म्हणता येईल. ते सिध्दांतरुप असून त्यालाच मी 'केंद्राभिगामी प्रेरणांचा सिद्धांत' (Doctrine of centripetal Force) म्हटले आहे.

हया केंद्राभिगामी प्रेरणा जेव्हा व्यक्तीच्या अस्तित्वाच्या केंद्राशी एकरुप होऊ लागतात (Concentrating at the centre of man's existence) तेव्हा त्या अणूहूनही अतिसूक्ष्म आत्मतत्वातून प्रचंड शक्तींचे प्रक्षेपण होऊ लागते. अशी आत्मशक्ती जागृत झालेली व्यक्ती हे वैश्विक चैतन्य शक्तीचे भांडारच होते व अशी व्यक्ती जेव्हा अंत:प्रेरणेने समाजकामात उतरते तेव्हा त्या व्यक्तीच्या कार्यक्षेत्राचा परीघ व त्या परीघाची गती तीव्र असते. ही गती भौतिक स्तरावर दिसेल किंवा न दिसेल पण त्याचे परिणाम होतातच. व ते दूरगामी व केंद्रगामी असतात.

**सूत्र क्र. २**

पहलै आरंभ छांडौ काम क्रोध अहंकार। मन माया विषै विकार।

हंसा पकडी घात जिनि करौ। तुस्ना तजौ लोभ परहरौ।।

**ध्वनितार्थ :** काम, क्रोध, अहंकार, मन, माया, विषयविकार या सर्वानी जणू आत्म्याला (हंसरुपी जीव) गळा दाबून मारुन टाकले आहे. म्हणून सर्व तृष्णा, लोभ सोडा. या सर्वामुळेच परावलंबन येते. आत्मतत्वाकडे जी अंतर्यात्रा अपेक्षित आहे त्यामधील अडथळे व धोक्यांची ही यादीच आहे.

**सूत्र क्र. ३**

छांडौ दंड रहौ निरदंद। तजौ अल्यंगन रहै अबंध।

सहज जुगतिलै आसण करौ। तन मन पवना दिट करि धरौ।

**ध्वनितार्थ :** मी - तू या द्वंद्वाच्या पलिकडे जायला पाहिजे. कारण द्वंद्वाच्या पलिकडे एक निरव शांतता असते. व अशा प्रकारची शांतता बाहेरील कोणत्याही कारणाने भंग होणार नाही. त्याच बरोबर बाहेरच्या संबंधांचे, भावनिक गुंतवणुकीचे परावलंबन पण संपवले पाहिजे. हे साधतानाच सहजपणाने साधेपणाने म्हणजे कुणाच्या तरी अनुकरणातून कृत्रीम जीवन न स्वीकारता आपण जसे आहोत तसे जगण्याची स्वाभाविक वृत्ती ठेवली पाहिजे.

अशी वृत्ती असली की तन, मन, देहांतर्गत वायू,श्वास हे सर्व शांत होत जातात. सर्व तऱ्हेच्या अस्वाभाविक कृतींनी जीवन वेढलेले असते. म्हणून त्यातून सुटका करुन घेण्यासाठी ही सहजसाधना श्री गोरक्षनाथ सांगत आहेत.

**सूत्र क्र. ४**

संजम चितओ जुगत अहार। न्यद्रा त्यजौ जीवन का काल।

छंडौ तंत मंत बैदंत। जंत्र गुटिका धात पाषंड।।''

**ध्वनितार्थ :** संयमित आहार हवा. इथे झोप सोडा म्हणजे विश्रांती घेऊ नका असा अर्थ नाही तर निरनिराळया विचारांच्या ओझ्याखाली सतत न रहाता थोडे निर्विचार अवस्थेतही रहाण्याचा अभ्यास करा तर खऱ्या अर्थी जागेपण येऊ लागेल व त्यातून शाश्वत जीवनाचा अनुभव येऊ लागेल. त्याचप्रमाणे तंत्र, मंत्र, वैद्यकी व सर्व प्रकारचे पाखंड सोडण्यास ते सांगत आहेत.

**सूत्र क्र. ५**

जडी बुटी का नांव त्रिनि लेहु। राज दुवार पाव जिनि देहु।

थंमन मोहन बिसिकरन छाडौ औचट। सुणौ हो जोगेसरो जोगारंभ की बाट।।

**ध्वनितार्थ :** श्री गोरक्षनाथ काही पथ्य सांगताहेत. लौकिक जगतात व खोटया प्रतिष्ठेत न अडकण्यासाठीची ती पथ्ये आहेत. जडी, बुटी, राजकारण, स्तंभन, मोहन, वशीकरण हे सर्व टाळा. त्या रस्त्याला जाऊ नका. योगाचा खरा मार्ग सांगण्याची ग्वाही ते देताहेत.

**सूत्र क्र. ६**

और दसा परहरौ छतीस। सकलविधि ध्यावो जगदीश।

बहुविधि नाटारंभ निवारी। काम क्रोध अंहकारहि जारि।।

**ध्वनितार्थ :** परमात्म्याच्या मागणीखेरीज अन्य सर्व इच्छा सोडून द्या. इतर सर्व विधी, नाटकीपणा सोडून द्या. ती सर्व काम क्रोधाची व अहंकाराची नवी रुपे आहेत. त्यापासून सावध रहाणे जरुर आहे.

**सूत्र क्र. ७**

नैण महारस फिरी जिनि देस। जटा भार बंधौ जिनि केस।

रुष बिरष बाडी जिनि करौ। कूवा निर्वांण षोदि जिनि मरौ।।

**ध्वनितार्थ :** डोळयात वासना असताना कितीही यात्रा केली तरी काही उपयोग नाही. जटाभार ठेवला, झाडे लावली, बागा केल्या, विहिरी खणल्या तर श्री गोरक्षनाथ म्हणताहेत की त्याच विहिरीत पडून मराल. अशाने काहीही पुण्य जमा होणार नाही. याचा अर्थ असा नव्हे की ही कामे करु नयेत. पण जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत करणाराला याचा काहीच फायदा नाही.

**सूत्र क्र. ८**

टूटै पवना छीजै काया । आसण दिढ करि वैसो राया।

तीरथ बर्त कदै जिनि करौ। गिर परबतां चढि प्रानमति हरौ।।

**अन्वयार्थ :** निसर्ग नियमाप्रमाणे शरिराची छीज होत जाईल, श्वास तुटू लागेल, म्हातारपण येईल म्हणून हे राजा, हे सम्राटा (हा उल्लेख प्रत्येक सामान्य माणसासाठी ते करत आहेत) स्वत:ला सावर. व्यर्थ तीर्थे फिरुन फिरुन प्राणाला सतावू नकोस. स्वत:ला सावर याचा अर्थ असा की मृत्यूनंतरही जे बरोबर येऊ शकते असे धन तू मिळव. ते म्हणजे समाधीचा अनुभव ज्याला. हा अनुभव आला त्याच्याकडून मृत्यू काहीही हिरावून घेऊ शकत नाही.

**सूत्र क्र. ९**

पूजा पाति जपौ जिति आप। जागे माहि विटबौ आप।

छांडौ वैद बणज व्यापार। पढिबा गुणिबा लोकाचार।।

अन्वयार्थ : पूजा, पाठ, जप हेच जर नुसते होत राहिले तर ते योगाचे विडंबनच आहे. त्याला व्यवसायाचे स्वरुप दिले की ते विडंबन होते. मग तुम्ही कितीही शिकलेला असलात, गुणी असलात, लोकाचार पाळण्यात तरबेज असलात, तरी शेवटी याचा काहीच उपयोग नाही. अंतिमक्षणी काय येणार बरोबर?

**सूत्र क्र. १०**

बहुचेला का संग निबारी। उपाधि मसांणबाद विषटारि।

येता कहिये प्रतच्छि काल। एकाएकी रहौ भूवाल।।

**अन्वयार्थ :** शिष्यांच्या घोळक्यात अडकू नका अहंकार वाढवत असतील तर वेगवेगळया पदव्या किंवा उद्योग विषसमान माना. अन्यथा शेवटी एकट्यासच पश्चाताप करण्याची पाळी येईल.

**सूत्र क्र. ११**

सभो देषि मांडी मति ग्यांन । गुंगा गहिला होइ रहौ अजांण।

छाडव राव रंक की आस । भिछ्या भोजन परम उदास।।

**अन्वयार्थ :** लोकांच्या मेळाव्यात जर कुणी जिज्ञासू असेल तरच ज्ञान बोला. अन्यथा गप्प रहा. सरळ अज्ञानी बनून जा. तसेच आपण आहोत त्यापेक्षा वेगळे बनण्याची, श्रीमंत होण्याची इच्छा किंवा खरे सुख गरिबीतच असते असल्या कल्पना सोडून द्या. जे नियतीने दिलेले आहे, मिळालेले आहे त्यातच समाधानी रहा. निरिच्छ रहा.

**सूत्र क्र. १२**

रस रसांइन गोटिका निवारी । रिधि परहरौ सिधि लेहुविचारी।

परहरौ सुरापांत अरुभंग। तातै उपजै नाना रंग।।

**अन्वयार्थ :** चमत्कार करण्याची शक्ती म्हणजे ऋध्दि. ती सोडली तर सिध्दि मिळेल. ऋध्दि हे अहंकाराचे नवे नवे मार्ग आहेत. तसेच सुरापान, भांग या नशा सोडा. कारण त्यातून नाना कल्पनेचे रंग निर्माण होतात व त्यातच आपण गुंतत जातो.

**सूत्र क्र. १३**

नारी, सारी कींगुरी। तीन्यू सतगुर परहरी।

आरंभ घट पर चै निसपति। नरवैबोध कथंत श्री गोरषजती।।

**अन्वयार्थ :** स्त्री, मैनेचा उपयोग करुन पैसे मिळवणे आणि सारंगी वाजवून पोटभरणे या बाहेरच्या गोष्टी सोडायला सद्‌गुरु सांगताहेत. इथपर्यंत आल्यानंतर श्री गोरक्षनाथ पुन्ह: आठवण देताहेत की प्रथम आरंभ म्हणजे अंतयात्रेला सुरुवात करा, नंतर घट म्हणजे शरिररुपी मंदिराची नीट ओळख करुन घ्या. नंतर परचै म्हणजे आत्मतत्वाची ओळख करुन घ्या की तुम्ही कोण आहात? व ज्या दिवशी हे जमेल त्याचदिवशी जीवन सफल होऊन जाईल. म्हणून श्री गोरक्षनाथ म्हणताहेत की हे सम्राटांनो हाच एक बोध मी तुम्हाला देऊ इच्छितो.

याचा अर्थ असा आहे की ही क्षमता प्रत्येकात दडलेली आहे. झाड जसे बीजात दडलेले असते तसेच ते परमतत्व प्रत्येकात दडलेले आहे. गोरक्षनाथांना यातून जे स्पष्ट करायचे आहे ते असे की व्यक्ती एक थेंब असेल तर तो थेंब समुद्र बनू शकतो. ही व्यापक होण्याची, विश्वाशी एकरुप होण्याची अभीप्सा दाहक अग्नीप्रमाणे अशा व्यक्तीस वेढू शकते की ज्यात अनावश्यक, अपवित्र, अमंगल असे जेजे असेल ते जळून जाईल व मागे राहील परम शुध्द असे अस्तित्वगत जीवन. असे जीवन प्राप्त होण्यासाठी जो आदेश श्री गोरक्षनाथ त्यांच्या शब्दात अन्य एके ठिकाणी देताहेत. तो आदेश असा आहे.[१७]

मरौ वे जोगी मरौ, मरण है मीठा।

तिस मरणीं मरौ, जिस मरणीं गोरष मरि दीठा।। - (संदर्भ - गो. वाणी/१६)

**अर्थ :** म्हणजे श्री गोरक्षनाथांनी मरणाची कला प्राप्त करुन ज्याप्रमाणे परमावस्था प्राप्त करुन घेतली त्या अवस्थेमध्ये खऱ्या अर्थाने अमरत्व प्राप्त होते व मानवी जीवनाचा शेवट 'गोड' होतो. यासाठीच सर्व अट्टाहास असावा.

**४) श्री गोरक्षनाथांचा केंद्राभिगामी प्रेरणांचा सिद्धांत :**

श्री गोरक्षनाथांनी केंद्राभिगामी (Centripetal) प्रेरणाची सूत्ररुपात जी मांडणी आहे त्यामधून असे सूचित केले आहे की व्यक्तीला व्यापून रहाणाऱ्या व त्या व्यक्तीस पंचभौतिक तत्वात बध्द करण्याऱ्या या ज्या ऋणात्मक प्रेरणा आहेत (-ve forces) त्या गुरुकृपेने व कर्मस्वातंत्र्याच्या बळावर उपासनेच्या मार्गानी धनात्मक प्रेरणांमध्ये बदलता येऊ शकतात व

जीवाला अंतस्थ पुरुषाचे म्हणजे शिवरुप आत्मतत्वाचेच दर्शन व एकरुपता प्राप्त होते. हे तत्व अणूहून, इलेक्ट्रॉन किंवा प्रोटॉन किंवा अणूकेंद्रस्थ न्यूट्रॉनहूनही सूक्ष्म म्हणजे अतिसूक्ष्म असून ते आत्मकेंद्र हे अमानवीय शक्तीचे भांडारच असते कारण ते ब्रम्हांडाचेच सूक्ष्मतत्व आहे. हा श्री गोरक्षनाथांचाच सिध्दांत आहे.

श्री गोरक्षनाथांनी केंद्राभिगामी प्रेरणांचा आग्रह धरला तो का? तर केंद्रोत्सारी म्हणजे व्यक्तीला बहिर्गामी करुन बंधनात टाकणाऱ्या ज्या 'ऋण' प्रेरणा आहेत त्यापासून दूर व्हा व 'धन' प्रेरणा स्वीकारुन अंतमुर्खतेचा प्रवास सुरु करा असे त्यांना सुचवावयाचे आहे. आत्मकेंद्रस्थ किंवा आत्मगर्भस्थ शक्तीस्त्रोत, त्याची कार्यवाही व तत्पूर्वी त्याचा अनुभव हा विषय विज्ञानाच्या परिभाषेत आधुनिक काळातील शास्त्रज्ञ व तत्वज्ञ मांडू लागले आहेत. काहीजण स्पष्टपणे विषयांची मांडणी करतात. काहीजणांच्या मांडणीत सूचक निर्देश असतात.

१) अमेरिकेचे नामांकित भौतिक शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग त्यांच्या 'द गँड डिझाइन' या ग्रंथात म्हणतात ''गुरुत्वाकर्षणासारख्या नियमामुळे ब्रम्हांड आहे व ते स्वत:ची निर्मिती कशाचाही आधार न घेता करु शकते. ही एक उस्फूर्त प्रक्रिया आहे आणि हेच कारण आहे की तिथे काही नसताना काही आहे. म्हणून आपण आहोत आणि विश्व आहे.''[७] (संदर्भ : झेरॉक्स प्रत)

२) पुण्यामध्ये झालेला एक सेमिनॉर "shri shri Anandamurti's contribution to Science & Philosophoy and Linguistics in focus" मधील श्री उत्तम पती (डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी, जवाहरलाल नेहरु युनिव्हर्सिटी, न्यू दिल्ली) यांनी वस्तुमान आणि प्रेरणा यांच्यातील एकरुपता स्पष्ट करताना 'आनंदमार्ग'चे प्रवक्ते श्री आनंदमूर्ती यांनी मांडलेला `Microvitum' चा सिध्दांत स्पष्ट केला आहे. तो असा "Microvitum is a mysterious emanation of cosmic factor which is the answer to link the crude from the subtle. In the psychic sphere there may be entities smaller than ectoplasm or its coverage endoplasm, smaller entity beyond electron or proton."[८] ( Ref : झेरॉक्स प्रत )

३) हाच विषय महातपस्वी एच. एच. कुमारस्वामी त्यांच्या "Dimensions of yoga" मध्ये मांडतात -

"Life is an urge and it has to make its way through matter by moulding it, shaping, and controlling it. It mounts from
Material → Vital → mental → Moral → Spiritual.

But its criterion is not changed. It remains what it is – the creative force. This creative force is “Shakti”. Energy and matter are the bipolar expression of this shakti.[९] (Ref: “Dimensions of yoga- page157)

स्टीफन हॉकिंग यांनी मांडलेली ब्रम्हांडनिर्मिती मागची उत्स्फूर्त प्रक्रिया किंवा श्री आनंदमूर्ती यांची मायक्रोव्हिटमची मांडणी - यामधील अस्पष्टता व असंदिग्धता श्री स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या ‘ज्ञानयोग’ ग्रंथात नेमक्या शब्दात अचुकपणे खुलासा करून स्पष्ट केले आहे.

‘‘वस्तुमात्राचे, समस्त विश्वब्रम्हांडाचे केंद्र जिवात्म्याच्या गाभाऱ्यात, मानवाच्या अंतरात्म्यातच आहे. अस्तित्वात असलेले सर्व काही एकाच केंद्राकडे गुरुत्वाकर्षित होत आहे. त्याचप्रमाणे क्रमविकासाच्या आधी (macrocosm) क्रमसंकोच (microcosm) हा असतोच. या सिध्द नियमाखेरीज डार्विनचा विकाससिध्दांत पूर्ण होऊ शकत नाही. हे क्रमसंकुचित चैतन्य असून ते स्वत:ला हळूहळू व्यक्त करत असते. हे चैतन्य जर प्रारंभी विद्यमान नसेल तर क्रमविकासाची क्रिया होणारच नाही. हे सर्व शक्तीच्या चिरंतनत्वाच्या नियमाला धरुन आहे. (Law of Conservation of energy) या मूलभूत प्रेरणेलाच ‘ईश्वर’ हे नांव भारतीयांनी दिलेले आहे. म्हणून चैतन्यच या सर्व सृष्टीचे कारण आहे. ‘ईश्वर’ हा पारिभाषिक शब्द आहे. परंतु तो शब्द म्हणजे त्या मूलभूत चैतन्यशक्तीचे नामकरण असून तो अनुभवाचा विषय असल्यामुळेच वैज्ञानिकांना किंवा तत्ववेत्यांना नेमकी मांडणी करताना अडचण येते आहे असे वाटते.’’[१०] (संदर्भ : ‘ज्ञानयोग’ पान १९० व २८९)

वरील सर्व विषय हा श्री गोरक्षनाथांच्या शक्तीतत्वाच्या मूलभूत सिध्दांताशी निगडित आहे म्हणून तो खुलासेवार घेणे आवश्यक वाटले श्री. गोरक्षनाथ म्हणतात.

शिवस्याम्यंतरे शक्ति: शक्तेरभ्यंतर: शिव:।
अंतर न एव जानीयात चंद्रचंद्रिकयोरिव।। (सि.सि.प. उप/ ४)

**अर्थ :** शिवात शक्ती आहे. शक्तीत शिवतत्व आहे. चंद्र व चंद्रिकेमध्ये जसा स्वरुपभेद नसतो त्याप्रमाणे शिव व शक्तीमध्ये काहीही भेद नाही. त्याचप्रमाणे.

प्रसरं भासते शक्ति: संकोचं भासते शिव:।
तयोर्योगस्य कर्ता य: स भवेत सिध्दयोगिराट।। (सि.सि.प. उप ६/६३)

**अर्थ:** शक्ती सृष्टीचा प्रसार करते तर शिव संहार संकोच करते. या शिव व शक्ती तत्वांचे ऐक्य जो साधतो तो सिध्द योगिराट् म्हणून ओळखला जातो.

साधना व गुरूकृपा ही व्यक्तीतून समाजामध्ये कशा प्रकारे कार्यान्वित होते त्याची मांडणी खालीलप्रमाणे करता येते. व्यक्ती ही मन, बुद्धी, चित्त व अहंकार या चार शक्तीघटकातून खालीलप्रमाणे जीवनाचे क्षेत्र व्यापत असते.

मनाचे क्षेत्र आहे → भावना (देवालये व तीर्थक्षेत्र)

बुध्दीचे क्षेत्र आहे → ज्ञान (विद्यापीठ)

चित्ताचे क्षेत्र आहे → कुटुंब

अहंकाराचे क्षेत्र आहे → ग्राम किंवा गांव

मानवी जीवनाची विभागणी या ४ क्षेत्रातच होते. कोणतीही व्यक्ती घेतली तरी या ४ क्षेत्रात कुठेतरी असतेच व या चारी क्षेत्रांचा आधारभूत घटक आहे व्यक्ती. सुरवात व्यक्तीच्या अंतर बाहय जीवनरचनेपासूनच सामाजिक रचनेचा विचार होतो व तो प्रत्यक्षात परिणामस्वरुप उतरणे शक्य आहे.[११] (संदर्भ : संतधर्म जीवनदर्शन पान ५७)

वरील विषयाचे संबंधात डॉ. राधाकृष्णन यांनी "The present crisis of Faith" या त्यांच्या प्रसिध्द ग्रंथात विविध संदर्भ देऊन अतिशय मर्मग्राही असे जे विश्लेषण केले आहे. त्यातून श्री गोरक्षनाथांचे तत्वज्ञानच अधिक स्पष्ट होत जाते असे म्हणता येईल. त्यांच्या वरील ग्रंथात ते म्हणतात - "In all religions the life affirming and life denying impulses confront each other. It is the interplay of these two impulses that has again and again renewed Indian thought. On the rock of moral law and not on the shifting sands of political or economic expediency can be built a civilized society. Active coexistence and fraternity are the ideals supported by Ram mohan Roy, Ramkrishna, Tagore and Gandhiji"[१२] (Ref: The present crisis of faith Page 24)

श्री. गोरक्षतत्वज्ञानात वृत्तीचे उदात्तीकरणास महत्व आहे. त्यातून जी व्यापकता येते त्यातून सामाजिक स्वास्थ व जीवनाची शुध्दता हे व्यापकतेचे सहज परिणाम म्हणून अनुभवास येऊ लागतात. यासंबंधात डॉ. राधाकृष्णन त्यांच्या वरील ग्रंथात म्हटले आहे की, "We must develop those loyalties to the free mind and spirit which transcend the narrower loyalties of class, caste, race and nation. Whatever progress we make at the expense of these values is morally wrong."

सध्याची जागतिक परिस्थिती व त्यातील ताणतणाव याबद्दल प्रसिध्द तत्वचिंतकांनी व्यक्त केलेले विचार डॉ. राधाकृष्णन यांच्या वरील ग्रंथात वेगवेगळ्या ठिकाणी नमूद केले गेले आहेत. ते थोडक्यात संकलितरित्या खालीलप्रमाणे नमूद करता येतात.

a) Hillel : What is hateful unto thee do not do unto thy fellow.
b) St. Paul: I appeal to you by all the mercy of God to dedicate your bodies as a living sacrifice. That is your cult and spiritual life.
c) John Deway : What I know about the future of progress is that it depends upon man to say whether he wants it or not.
d) H.G.Wells : A frightful queerness has come into the life. Hitherto events have been held together by a certain logical consistency, as the heavenly

bodies have been held together by the golden cord of gravitation. Now it is as if the cord has vanished.

e) Carl Gustav: ( The great psychologist) misguided development of the soul must lead to psychic mass destruction. The present situation is so sinister that one cannot suppress the suspicion that the creater is planning another deluge that will finaly exterminate the existing race of man.

f) Dr. Radhakrishnan: Scientific progress is precarions and conditional. If we are only learned without being truly cultured we become a danger to society.

g) Aristotle : Man when perfected is the best of animals but when separated from law and justice he is the worst of all.

h) G. Buddha: None else compels. Ye suffer from yourselves. धर्म एव हतो हंति धर्मो रक्षति रक्षित:[१३]

(Ref: The Present crisis of Faith Page 102, 103, 148, 150)

i) H. Excellancy : कुमारस्वामी ( Kumarswami)

In former times when social and moral efforts fail, there were strong and virile people to bring new blood and stern discipline. This time it does not so happen. Degeneration is almost universal and regeneration will be very slow. Modern civilization is almost showing signs of rapid decay and heading towards a point of no return.

ते पुढे म्हणतात - (इंग्रजीचे भाषांतर)

इतिहासाच्या अवलोकनातून असे दिसते की प्रसिध्द रोमन साम्राज्याचा ऱ्हास होण्यास नैतिक अध:पतन हेच कारण ठरले होते. निष्ठुर अशी गुलामीची पध्दत व गर्भश्रीमंत भांडवली वर्ग यांच्यातील संघर्षच पुढील उठावाला कारणीभूत ठरला दडपशाहीच्या कार्यपध्दतीत अधिकारी भ्रष्ट झाले. शेवटी सत्ताधीशच दुर्गुणांचे व अविचारी वासनांचे गुलाम बनले. त्याचप्रमाणे ब्रिटिशांच्या अमदानीतही गोऱ्या लोकांचे विशेषाधिकार व काळया वर्णाच्या लोकांचे शोषण यातूनच त्यांच्या सत्तेला आव्हान दिले गेले. सध्याच्या काळातील हे सामाजिक अध:पतन व गोंधळ हा विध्वंसकारी शस्त्रे, अश्लील वाङ्मय, भ्रष्ट करमणूक व प्रसारमाध्यमांचा परिणामस्वरुप आहे असे दिसून येते.[१४] (Ref : “Dimensions of yoga” Page 241-242)

या प्रकारच्या सामाजिक अधोगतीच्या वेगास योगाचे माध्यमातून निर्माण होणारी अंतर्मुखता व त्याचे परिणामस्वरुप नैतिक शुध्द व परोपकारी जीवनच रोखू शकेल. वर उल्लेखलेल्या सर्व विचारवंताचे विचारातून हाच मुद्दा अधोरेखित होताना दिसतो.

आणखी काही प्रसिध्द विचारवंतांचे वरील विषयाशी संबंधित असे काही निर्देश पाहू.

१) श्री.शंकराचार्य : त्यांच्या 'भजगोविंदम्' या सूत्ररचनेमधील सूत्र क्र. २६ हे व्यक्तीने काही नियम पाळून अंतर्मुख होण्याचा आग्रह धरते.

कामं क्रोधं मोहं त्यक्त्वा आत्मानं भावय कोहं।

आत्मज्ञानविहीना मूढा: ते पच्यन्ते नरकनिगूढा:।।

**अर्थ :** काम, क्रोध व मोह सोडून (संयम करुन) स्वत:वर ध्यान कर. आत्मज्ञान झाले नाही तर त्यांना नरकयातनेप्रमाणे दु:खच मिळेल.[१५] (संदर्भ: श्री. शंकराचार्य - भजगोविदंम्/२६)

२) योगी श्री अरविंद : व्यक्तीमधल्या अपेक्षित बदलाला अत्यंत महत्व आहे. त्याशिवाय समाजात अपेक्षित बदल संभवत नाही. ते म्हणतात:

This evolution has a triple character. It is widening, heightening and integrating. When body becomes organized and refined, life emerges with heightening of mind and consciousners. At this juneture psychic, spiritual and supramental changes take place effecting descent of higher light into our being which gives an abiding sense of infinite enlarging of our nature.

भौतिक व वैज्ञानिक सुधारणांचे गर्दीमध्ये व त्यांच्या जीवनातील वेगवान प्रवेशामुळे व्यक्तिगत जीवनच विस्कटले गेले. याबाबत श्री अरविंद म्हणतात.

This process tended to cancel that very individuality, Increasing specialization brought petrification and desiccation. This process generated a false subjectivism which ignored that the ego is not the self. Individual egoism got transformed into social egoism. Doctrines of racial and national superiority found a fruitful soil and aggression became the order of the day. This is the inevitable paradox of modern scientific society. Therefore inspite of successful manipulation of the subjective and objective attitudes there is a crisis in life.[१६]

(Ref: “Modern Indian Thought Page 224-225)

३) जे कृष्णमूर्ती : त्यांच्या 'जीवनभाष्ये' ग्रंथांत ते म्हणतात. 'संवेदनाशून्य माणसांकडून होणारी कर्मे ही जगाला विनाशाकडे, भौतिक असुरक्षिततेकडे व प्रलयाकडेच अपरिहार्यपणे खेचून नेत असतात. जेव्हा जीवनातला 'आज' (Today) अर्थहीन बनतो तेव्हा भूत व भविष्य काळाकडे पहात बसतो. पण खरे सुख या दोहातही नाही तर ते गतिशील अशा नित्यनूतन वर्तमानात बसत असते.[१७] (संदर्भ: जीवनभाष्ये पान ३३०)

त्यांच्या 'जीवनाचे भाष्यकार' या ग्रंथामध्ये त्यांनी सद्य:स्थितीतील सामाजिक समस्यांवर मूलग्राही चिंतन केलेले असून आत्मशोधनाचे परिणामस्वरूपच या सामाजिक समस्यांना तोंड देता येईल असा विचार व्यक्त केला आहे. ते म्हणतात जगातील सर्व समस्यांचे कारण विकृत मन हेच होय. माणसातला अहंकार हा अशाश्वत व भ्रामक आहे. सर्व समस्यांचे एकच उत्तर आहे ते म्हणजे आपल्या आत जी क्रिया प्रतिक्रिया चालते ती

शोधल्यास जगातील समस्यांचा उलगडा होईल कारण वैयक्तिक समस्यांचे प्रतिबिंबच जगातील समस्यांमध्ये उमटलेले असते. म्हणून निर्विचार अशा मनाच्या अवस्थेतून अखंड सावधानता साधली पाहिजे. यालाच "Choiceless awareness" म्हणतात. अशा मनातच सर्व श्रेष्ठ ज्ञानाचा साक्षात्कार शक्य आहे.[१८] (संदर्भ 'जीवनाचे भाष्यकार' पान नं.३१)

सामाजिक संकट टाळण्यासाठी व्यक्तीचा जीवनविषय दृष्टीकोन कसा हवा याबद्दल ४) मानव व निसर्ग यांच्यामधील संतुलन व सहयोग किती महत्त्वाचा आहे हे स्पष्ट करताना रविंद्रनाथ टागोर म्हणतात. -

Nature and Human life are united not merely because both are animated but also because both display rhythum and harmony. They are like two stanzas of the same poem. We feel at home with nature because the language of harmony in nature is the mother tongue of our soul. Man's true power lies is abandoning his brute strength and exchanging it for the freedom of the spirit, turning his vision inward.[१९] (Ref : Modern Indian Thought Page 142)

**५) नैतिक संकट :**

या प्रकारच्या नैतिक संकटांची निर्मिती कशी होते? त्याची बीजे कशात असतात? ही संकटे ही कशाशी निगडीत आहेत? परिस्थितीशी का प्रवृत्तीशी? प्रवृत्तींचा जन्म परिस्थितीत का आपल्या धारणांमध्ये! अशा मर्मग्राही चिंतनातून पूज्य म. गांधींनी भविष्याचा वेध घेत सात प्रकारच्या सामाजिक पातकांचा उल्लेख करुन त्यांची निर्मिती कशी होत राहील याची सूत्रबध्द मांडणीच करुन सर्वांसमोर ठेवली आहे. ती मांडणी सिध्दांतस्वरुपातच आहे असे म्हणता येईल.[२०] (संदर्भ: यंग इंडिया मुखपत्र)

'यंग इंडिया' या मुखपत्राच्या १९२५ सालच्या एका अंकात ठळक अशा ७ सामाजिक गुन्हयांची त्यांनी मांडणी केलेली दिसून येतो. वर्ध्याच्या त्यांच्या आश्रमातही सूचक शिक्षण व सावधगिरीची सूचना अशा दृष्टिकोनातून एका फलकावर वरील मुद्दे दर्शनी ठेवलेले आहेत अशीही माहिती मिळाली. ती खालीलप्रमाणे आहे.

१) राजकारणात तत्वाचा अभाव.

२) ज्ञानाच्या क्षेत्रात चारित्र्याचा अभाव.

३) विज्ञानाच्या क्षेत्रात मानवतेचा अभाव.

४) आनंदाच्या क्षेत्रात विवेकाचा अभाव.

५) उद्योग व व्यापार क्षेत्रात सचोटीचा अभाव.

६) श्रमाचे क्षेत्रात श्रमप्रतिष्ठेचा अभाव. (याचा अर्थ श्रमाशिवाय पैसा मिळवणे)

७) त्यागाचे विषयात भक्तीचा अभाव.

सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवरचे हे गुन्हे म्हणजे पापनिर्मिती असून अशा वृत्ती वाढीस लागून व्यक्तीचे, समाजाचे आणि अंततः राष्ट्राचे अध:पतन अटळ आहे. थोडक्यात लबाडी, हीन दर्जाचे राजकरण, सत्तेसाठी सर्व तत्वांना तिलांजली याचा म. गांधीनी नि:संदिग्ध शब्दात निषेध केला आहे.

अशा श्रेष्ठ पुरुषांचा वारसा हा मौलिक परंपरेचा वारसा असतो. तोच जर खंडित होत गेला तर आधुनिक विज्ञान मानवाला कोणत्या दिशेला व कोणत्या वेगाने नेईल हे ठरविणे अवघड होत जाते. त्यासाठी आधुनिकतेला परंपरेची जोड निर्विवादापणे आवश्यक दिसते. परंपरा म्हणजे जुनाटपणा, परंपरा म्हणजे टाकावू अंधश्रध्दा असे अत्यंत चुकीचे व समाजहिताला घातक असे विचार जर समाजात या ना त्या प्रकारे रुजवले गेले व स्वार्थी विचारांमुळे अशा चुकीच्या प्रचारांचा विरोध जर केला नाही तर वर्तमान काळात जे घडते आहे तेच घडत राहील. त्यामुळे परंपरेतली जी तत्वे मानवी जीवनास पोषक आहेत ती स्वच्छपणे स्वीकारायला हरकत नसावी असे अनुमान काढणे चुकीचे ठरणार नाही.

भारताच्या प्राचीन परंपरेतील वैज्ञानिक प्रगतीचे आश्चर्यकारक पुरावे उपलब्ध असून त्या त्या विषयांवर भरपूर वाङ्मय निर्मिती झालेली आहे. चालू विषयाच्या संबंधात ईशावास्य उपनिषदातील श्लोक उदाहणादाखल महत्त्वाचा वाटतो.

विद्यां चाविद्यां च यस्तद् वेदोभयं सह।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्यायाम् अमृतम् अश्नुते।।[२१] - ईषा.उप./११
(संदर्भ - ईशादि नौ उपनिषद,पान १०)

**अर्थ :** जो विद्या (अध्यात्म) आणि अविद्या (भौतिक ज्ञान) या दोन्ही एकत्रपणे जाणतो तो अविद्येच्या (म्हणजे भौतिक ज्ञानाचे शक्तीचे मदतीने) सहाय्याने मृत्यूवर मात करुन विद्येच्या सहाय्याने ब्रम्ह प्राप्त करुन घेतो.

वरील श्लोक हा एक विचारच नसून अभ्युदय व नि:श्चेयस साधून देणारा सिध्दांत (Doctrine) असून त्यास अपवाद नाही. अध्यात्म व भौतिकता यांचा समन्वय व समतोल म्हणजेच जीवनाची उभयांगी प्रगती. वरील सिध्दांताचा अधिक्षेप हा विनाशास निमंत्रण देईल असा गर्भितार्थच वरील श्लोकात व पू.महात्मा गांधीच्या वाणीत व्यक्त झालेला आहे. जीवनमूल्यांची ही परंपराच श्री गोरक्षनाथांच्या सामरस्य सूत्रांमधून, मध्यमार्गाच्या संतुलनावस्थेच्या सूत्रांमधून स्पष्टपणे व्यक्त केल्या गेलेल्या आहेत. श्री. गोरक्षसिध्दांतांचा अर्थबोध व्यवस्थीत करुन घेत गेल्यास प्रगत सुखी व संपन्न अशा सुरक्षित समाज व कुटुंब व्यवस्थेच्या आधारभूत धारणाच त्यामध्ये आहेत हे स्पष्ट होईल.

तत्वाचा अभाव, सचोटीचा अभाव, चारित्र्याचा अभाव, माणुसकीचा अभाव, विवेकाचा अभाव, श्रमप्रतिष्ठेचा अभाव, व भक्तीचा अभाव हा विषय त्यात्या क्षेत्रांशी कसा

संबंधित असेल हे म. गांधीनी सांगितले. त्याप्रमाणे समाजामध्ये सर्वसामान्यपणे हे विषय कसे मूळ धरुन वाढीस लागले आहेत हे दिसून येते. पूर्वीच्या ऐतिहासिक काळात हे प्रकार नव्हते असे नाही. पण प्रमाण अत्यल्प असे व असल्या गुन्हेगारी प्रवृत्तींना मान्यता दिली जात नसे. सध्याच्या वर्तमान युगात या अपप्रवृत्ती वाढताना दिसतात व त्याचे कुणालाच काही विशेष असे वाटत नाही. अपप्रवृत्ती या मान्यतेच्या सदराखाली जात रहाणे हे फार विचित्र व काळजीचे ठरत जाते. या परिस्थितीचे नेमके व विदारक स्वरुप व्यक्त करताना डॉ. राधाकृष्णन म्हणतात- Life has become too hurried. We have no time to understand one another. To justify our conduct we are setting up exaggerated claims on behalf of the individual will and strongly protest against discipline. We are confusing self expression with instincts and passion. We tend to look upon ourselves as healthy animals and not spiritual beings. We philosophize and justify our sins. Disguised feeling is masquerading as advanced thought. Sex irregularities are becoming less shaking and more popular. Woman is becoming masculine and mechanical. This creates a conflict with our own nature.[२२] (Ref: The Hindu view of life-Page 87-88-89) मागे उधृत केलेल्या वेगवेगळया क्षेत्रातल्या (म्हणजे जीवनातील ) 'अभावा' मागे कोणत्या प्रवृत्ती किंवा विकार दिसतात? तर स्वार्थ, वासना, क्रूरता, लोभ, अहंकार हेच घटक त्यांचे मुळाशी आहेत हे स्पष्ट होते. या विकारवश प्रवृत्तींना संयमित करत करत त्यांचा निचरा कसा करायचा? श्री गोरक्षनाथांच्या तत्वसूत्रांच्या स्वीकृतीतून या दोषांचे परिमार्जन कसे होऊ शकते? मानवी जीवनात योग्य बदल कशा प्रकारे करता येतो ? यांचा खुलासा म्हणजेच या रोगावरील उपाय असेल.

**६) मानसिक संतुलनाची आवश्यकता :**

सध्याच्या या विचित्र अशा सामाजिक परिस्थितीत कौटुंबिक, व्यक्तिगत, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्व स्तरांमध्ये एक प्रकारची विचित्र अशी अस्थिरता जाणवते. त्यात बऱ्याच ठिकाणी विषण्णता, असमाधान, उमेदीचे खच्चीकरण, विकृत मनोव्यापार, स्थिरतेसाठी जीवघेणी स्पर्धा, त्यातून घडणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया असेच वैयक्तिक व व्यावहारिक जीवन स्वीकारावे लागते. त्याचे परिणामस्वरुप शरीर, मन व बुध्दी ही तिन्ही माध्यमे विसंगत रितीने कार्य करत रहातात. त्यांच्यातला ताल (rhythum) बिघडतो. हा बिघडलेला ताल अनेक प्रकारच्या सूक्ष्म विसंगतींना व निराशांना जन्म देतो. त्यांना मानसशास्त्रीय भाषेत Frustration म्हटले जाते. श्री. मन् (Munn) यांच्या मानसशास्त्राच्या ग्रंथात त्याची वर्गवारी दिलेली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

a) Homeostasis : प्रश्नांची सोडवणूक न करता अहंकाराचे पोषण करणे.

b) Fantacy : कल्पनेतून सुख घेणे.

c) Projecting : आपले विचार व इच्छा दुसऱ्यावर लादणे.

d) Rationalising   स्वत:चेच बरोबर आहे म्हणणे किंवा मनात असूनही एखादी गोष्ट मिळाली नाही तरी आनंदच आहे असे म्हणणे.

e) Repressing:  त्रास देणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे.

f) Regressing : पोरकटपणाचे वर्तन.

g) Identifying : इतर व्यक्ती किंवा परिस्थितीमध्ये भाग घेताना स्वत:चा अहंकार न सोडणे.

h) Blaming other: इतरांना नांवे ठेवणे.

i) Over compensating : जरुरीपेक्षा जादा काम केल्याचे भांडवल करणे.

j) Sublimating : अप्रत्यक्षपणे समाधान मानणे.[२३] (Ref : “Psychology” Page 231)

मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे. ज्या पंचतत्वातून (पृथ्वी-आप-तेज-वायू-आकाश) मानव शरीर बनते तीच तत्वे बाहेरच्या निसर्गात व विश्वात उपस्थित असतात. पिंडी ते ब्रम्हांडी म्हणजे हीच ती एकरुपता. ही एकरुपत्वाची जाणीव अनादि काळापासून वेगवेगळया मार्गानी मानवास होत गेली. ही शब्दातीत जाणीव त्या त्या काळातील लोकांनी शब्दबध्द करण्याचा प्रयत्नही केला. तत्वज्ञानाच्या क्षेत्रातील ग्रीक संस्कृतीचे योगदान मोठे आहे. त्यांचे प्रतिनिधित्व करणारे काही प्रसिध्द तत्वज्ञ याबाबत त्यांचे विचार कशा प्रकारे व्यक्त करत गेले हे पहाणेही उदबोधक आहे.

### ७) पिंडब्रह्मांड एकता व प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानातील संदर्भ :

निसर्ग व त्यातील विविध कार्यप्रणालींच्या व्यवस्था हया मानवाशी कशा घनिष्टपणे निगडित आहेत हाच Ecology चा विषय आहे. अनावश्यक गोष्टी टाकून देणे व आवश्यक घटकांचा सुयोग्य उपयोग करुन लय व संतुलन साधत सतेज व सदाबहार अशा जीवनाची निर्मिती करण्याच्या क्रिया पाहिल्यानंतर निसर्गाला गोठलेली बुध्दिमत्ता (Frozen intelligence) का म्हणतात हे लक्षात येते. म्हणून निसर्ग हा मित्र, डॉक्टर, गुरु अशा विविध भूमिका पार पाडत मानवास सर्वतऱ्हेने हरघडी मदत करायला तयार असतो. या निसर्गशक्तीचा योग्य तो उपयोग करण्याची आवश्यकता जर पटली तर व्यक्तीची दृष्टी त्याच्या अंतरजगताकडे ही वळू शकते व असे जेव्हा घडू लागते तेव्हा त्यास येणारे अनुभव, त्याच्यात होणारे बदल हे जीवनात विशेष स्वरुपात रचनात्मक असेच असतात. हा सर्व विषय वर्तमान युगातील नैतिक संकटाशी  (social crisis) अशा प्रकारे निगडित आहे. त्यासाठीच प्राचीन ग्रीक तत्वज्ञानात थोडे डोकावयाचे आहे.

**अॅनॅक्सिमँडर (Anaximander – 610-547)**

निसर्गात न्याय देण्याची एक सहज व्यवस्था कार्यान्वित होत असते. त्याला त्यांनी "Conception of justice" म्हटले व त्याचे कार्य "negatively by preventing disorder and positively by creating harmony" अशा प्रकारे समतोल व एकरुपता निर्माण करत चालू असते असा विचार मांडला.

**पायथागोरस (Pythagoras 572-500)**

त्यानी तत्वज्ञानाची व्याख्याच मुळी Highest music which is a feeling of harmony and beauty अशी करुन धार्मिक माणूस कुणाला म्हणावे तर One who listens the music of unlimited within himself असे म्हणून जाणिवेच्या सर्वोच्च पातळीचाच आग्रह धरला.

**हेरॅक्लिटस (Heraclitus 540-475)**

सर्व जागृत लोकांना जग एकसारखेच दिसते यातून वैश्विक एकात्मता अनुभवण्याची अटच स्पष्ट होते. ती अट म्हणजे व्यक्तीची जागृत अवस्था (Awareness) ज्ञानाचा उद्देश तरी काय? याबाबत ते म्हणतात. "Purpose of wisdom is to feel the operation of the logos. And logos is source of justice and Harmony. This experience of harmony puts us at the heart of the infinite and creative reality."

**सॉक्रेटिस (Socrates- 469-399)**

त्यांनी कुठल्याही तात्विक पध्दतीचा आग्रह धरला नाही पण लोकांना विचार प्रवृत्त व्हा हाच आग्रह धरुन अहंकारयुक्त बुध्दिवाद्यांना सत्याकडे नेण्याचा प्रयत्न केला ते म्हणत - "To behave rightly man must have knowledge and what is knowledge? Virtue is knowledge and acquisition of knowledge is awakening of memory dormant in the soul which he called "Reminiscence".

**प्लेटो (Plato 427-347)**

His aim was to counterbalance the incompleteness of protagorian theory of knowledge based on sense experiences which fail short to know real knowledge free from contradictions. Contradictions can be removed when we refer all our cognitive processes to the rational self which is the central core of entire concrete experience.

उदाहरणादाखल घेतलेले वरील विचार हे व्यक्तीला अंतर्मुख होण्याकडे व निसर्गाची जवळीक साधण्याचा आग्रह होण्याकडे व निसर्गाची जवळीक साधण्याचा आग्रह धरण्याकडेच निर्देश करताना स्पष्ट दिसतात.[२४] (Ref : History fo western Philosophy Page 48, 49, 50, 68, 74 )

गोरक्षनाथांचे तत्वदर्शनातील जे प्रमुख सिध्दांत आहेत ते केवळ तात्विक स्वरुपाचे तार्किक वा बौध्दिक प्रतिपादन नसून मानवी जीवनरुपी जलप्रवाहाचे ते विज्ञानच आहे असे म्हटले तर ते संयुक्तिक ठरेल. व्यक्तीची व त्यातून समाजाची विशुध्द जीवनरचना करणारी व्यापक व विशाल अशी विचारधारा म्हणजे श्री गोरक्ष तत्वज्ञान असा अनुभव त्यांचे तत्वसिध्दांतांचे अवगाहनातून येत रहातो. मानवी जीवन म्हणजे केवळ बौध्दिक व भावनिक क्रिया प्रक्रियांची साखळी नसून ते योगाचे विज्ञान व रहस्यात्मक अशी दिव्य जीवन व्यवस्था आहे. ती प्रत्येकाला प्रयत्नसाध्य आहे याची हमी ते त्यांचे सूत्रातून देतात. प्रयत्नस्थित साधकाला श्री गोरक्षनाथ कसा अनुभव देतात.? (इथे सद्‌गुरुमहिमा स्पष्ट केला जात आहे)

- तर -

थंभ बिहूँणी गगन रचीलै, तेल बिहूँणी बाती।

गुरु गोरष के वचन पतिआया, तब द्यौंस नही तहां राती।। - गो. वाणी/२०५

**अर्थ :** जेव्हा सद्‌गुरु गोरक्षनाथांच्या वचनावर विश्वास बसला तेव्हा खांबाविना स्थिर झालेले आकाश व तेल आणि ज्योतीविना ज्ञानाचा प्रकाश अनुभवास आला. सतत ज्ञानाचे प्रकाशात दिवस व रात्र हा प्रश्नच संपून गेला.

त्याचप्रमाणे योगाचे विज्ञान ही रहस्यात्मक अशी जीवनव्यवस्था आहे. म्हणजे कशी हेहि एकेठिकाणी प्रश्नोत्तर रुपात गोरखवाणीत दिलेली असून त्या सूत्रांचा गर्भितार्थ समजून घेतल्यास चेतनेच्या पुनरागमनाची स्तंभित होणारी घटना कशी घडू शकते ते उलट बॉसीच्या पध्दतीने व्यक्त केलेले आहे.

वृध्द बालक कसा होऊ शकतो? जे फूल उमललेले आहे ते पुन्ह: कळी होऊ शकते का? असा प्रश्न विचारल्यानंतर (गो.वाणी सूत्र ८७)

सुणौ हो देवल तजौ जंजालं, अमिय पीवत होइना बाल।

ब्रह्म अगनि सींचत मूलं फुल्या फूल कली फिरी फूलं।। - गो.वाणी./८८

**अर्थ :** हे देवळ नाथ, ऐक. जगजंजाळास सोड. योगयुक्तीने अमृतपान केलेस तर तू बालक होऊ शकतोस. ब्रह्माग्नीने मुळास सिंचन केलेस तर फुलाची पुन्ह: कळी होऊ शकते.

अशा ज्ञानानुभवाच्या अवस्थेत श्री गोरक्षनाथ सर्व मानवजातीस आवाहन करताहेत.

सुणि गुणवंता सुणि बधिवंता, अनंत सिधां की बांणी।

सीस नवावत सत गुर मिलिया, जागत रैणि विहांणी।। - गो.वाणी/१०८

**अर्थ :** हे गुणवंतांनो! बुध्दिवंतांनो ऐका! सिध्दांची वाणी ऐका. सद्‌गुरुशरणतेत सतत ज्ञानावस्था सहजपणे रहात जाते त्यामुळे जिवास अज्ञानरुपी झोप येऊच शकत नाही.

**८) उपसंहार :**

प्रस्तुत प्रकरणात मानवी जीवनाची वर्तमानकालीन अवस्था स्पष्ट करण्याचा प्रयत्न मी केला आहे. ती आवस्था बदलून टाकण्याचे दृष्टीने श्री. गोरक्षनाथांच्या पाच सिद्धांतांचा प्रत्यक्ष मानवी जीवनात कसा उपयोग होऊ शकतो ते दाखवून देण्याचा हा प्रयत्न आहे. हे करताना आजच्या परिस्थितीत मानवी जीवनाला संभाव्य धोके कोणते आहेत ते त्या त्या संदर्भात मी नोंदवले आहेत. हेतू असा आहे की आजचे मानवी जीवनर जर धोक्याच्या पातळीवर गेले आहे तर अशा जीवनाला पुन्हा एकदा शांत व समाधानी कसे बनवता येईल? त्यामध्ये आवश्यक असलेले परिवर्तन कसे घडवून आणता येईल? या संबंधीचे थोर विचारवंतांचे दाखले या प्रकरणात त्या त्या ठिकाणी घेतले आहे हे प्रकरण माझ्या प्रबंधाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी अतिशय अनुकूल ठरेल असे वाटते.

## ९) संदर्भ व टीपा :


१. Problems of Philosophy by B. Russel, Oxford University Press. 1970.

२. Dimensions of Yoga, Kumarswami, Kumarswami Foundation, Dharwad, 1988.

३. Psychology by Munn -

४. नीतिमीमांसा - प्रा. चौधरी, ए. बी. मुरकुटे विद्या प्रकाशन, नागपूर, १९६२.

५. संतधर्म जीवनदर्शन - बाबा महाराज अर्वीकर, सांगाती प्रकाशन समिती, माचणूर, जि. सोलापूर, १९९४.

६. गोरखबानी - श्री गोरखनाथ, संपा. श्री रामलाल श्रीवास्तव, गोरखनाथ मंदिर, गोरखपूर, सं. २०५१ वि.

७. स्टीफन हॉकिंग - झेरॉक्स.

८. आनंद मुर्तीचे मायक्रोव्हीटम - झेरॉक्स.

९. Dimensions of Yoga, Kumarswami, Kumarswami Foundation, Dharwad, 1988.

१०. ज्ञानयोग - स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर, १९७९.

११. संतधर्म जीवनदर्शन - बाबा महाराज अर्वीकर, सांगाती प्रकाशन समिती, माचणूर, जि. सोलापूर, १९९४.

१२. Present Crises of Faith - Dr. Radhakrishnan, Hind Pocket Book Pvt. Ltd., Delhi, 1970.

१३. तत्रैव.

१४. Dimensions of Yoga, Kumarswami, Kumarswami Foundation, Dharwad, 1988.

१५. भजगोविंदम् - शंकराचार्य संपा. ओशो, जीवनजागृती केंद्र पुणे, १९९३.

१६. Modern Indian Thought - V. S. Naravane, Asia Publishing House, Bombay, 1967.

१७. जीवनभाष्ये - जे. कृष्णमूर्ती, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९९५.

१८. जीवनाचे भाष्यकार - जे. कृष्णमूर्ती, कृष्णप्रेमी, के. भी. ढवळे प्रकाशन, १९९०.

१९. Modern Indian Thought - V. S. Naravane, Asia Publishing House, Bombay, 1967.

२०. यंग इंडिया मुखपत्र - महात्मा गांधी, वर्धा आश्रम, १९२५.

२१. ईषादि नौ उपनिषद् - ह. गोयंदका, गीता प्रेस गोरखपूर, सं. २०६० वि.

२२. Hindu View of Life - Dr. Radhakrishanan, The Macmillan Co., New York, 1928.

२३. Psychology by Munn -

२४. History of Wesern Philosophy - N. V. Joshi, Z. N. Kadri, Bombay, 1963.

# प्रकरण - आठवे

# नाथ संप्रदायाचा वैश्विक चिद्‌विलासवाद

## १) प्रस्तावना :

नाथ संप्रदाय व त्या संप्रदायाच्या विचारसरणीचा प्रभाव आजपर्यंतच्या विविध संप्रदायावर पडल्याचे दिसून येते. ते कसे घडले असावे? अशी कोणती अनिवार्यता संत महात्म्यांना वाटली की ज्यामुळे गोरक्षनाथांच्या विचाराने ते प्रभावित झाले? आणखी असे की गोरक्षनाथांचा जो जो विचार ज्या कोणाला पटला तो तो विचार त्या प्रत्येकाने आत्मसात केला आणि तो सर्व लोकांमध्ये पोहचवण्याचा प्रयत्न केला. हे आजच्या संदर्भातले वास्तव म्हणून अधोरेखित केले पाहिजे. माझ्या मते काळाच्या ओघात जे काही घडून आले त्याचे कारण मूळ गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान हे तितकेच सामर्थ्यवान असून ते जीवनव्यापी असल्यामुळे त्यांच्या विचारांची स्वीकृती करणे अनेकांना आवश्यक वाटले. याचेही कारण असे आहे की श्री. गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान हे एक स्वतंत्र दर्शनच आहे. त्या जीवन दर्शनामध्ये मानवी जीवन व समग्र विश्व सामावलेले आहे. असे म्हणता येईल की प्राचीन भारतीय तत्वचिंतनाचा एक समग्र आढावा घेतल्यास आपणास असे दिसून येते की गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान हा एक स्वतंत्र विचार प्रवाह आहे. या प्रास्ताविकानंतर आता प्रस्तुत शोधप्रबंधाच्या निष्कर्षाप्रत जावयाचे आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या दोन प्रकरणात माझी भूमिका थोडक्यात विशद करून शोध प्रबंधाच्या तांत्रिक बाबींचा खुलासा मी केला आहे. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाच्या वेध घेणाऱ्या नाथ पंथाचा उदय केव्हा व कसा झाला याविषयी माझे म्हणणे सुरूवातीलाच नमुद केले आहे. मुख्यत: गोरक्षनाथांचे सिद्धांत व त्यांचा तत्वव्यवहार अभ्यासणे हेच मी माझे उद्दिष्ट मानले आहे. दुसरे असे की गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान आधुनिक ज्ञान विज्ञानाशी कसे संबंधित आहे ते दाखवून देण्याचा प्रयत्न मी याच दोन प्रकरणात केलेला आहे. प्रकरण तीनमध्ये गोरक्षनाथांच्या मूलभूत तात्विक सिद्धांतांचे विवेचन मी त्यांच्या विविध सूत्रांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे. गोरक्षनाथांचे हे तत्त्वज्ञान मानवी जीवनासह संपूर्ण विश्वाला गवसणी घालण्याचे काम करत आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न प्रकरण चारमध्ये केलेला आहे. तसे पाहिल्यास विविध अंगानी मानवी जीवन व्यापणारे असे जे आधारभूत घटक आहेत त्या सर्वांचा उहापोह मी याच प्रकरणात केला आहे.

पाचव्या प्रकरणात गोरक्षनाथांच्या सद्‌वस्तुमीमांसेला मी हात घातला आहे. पैकी सुरूवातीला गोरक्षनाथांची सद्‌वस्तुमीमांसा विचारात घेतली आहे आणि त्यानंतर गोरक्षनाथांच्या याच सद्‌वस्तुमीमांसेचे समर्थन करणारे काही सिद्धपुरूष व काही पाश्चात्य

तत्वचिंतक यांच्या प्रतिपादनाचा अभ्यास या पाचव्या प्रकरणात केला आहे. 'सामरस्ययोग' हे गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी येते. वस्तुतः सामरस्ययोग हे गोरक्षनाथांचे समग्र भारतीय तत्त्वज्ञान परंपरेला लाभलेले फार मोठे योगदान आहे. हे ध्यानात घेऊन प्रकरण सहाची योजना केली आहे. येथे मी असे दाखवून दिले आहे की सामरस्ययोग हा मध्यमार्ग आहेच परंतू ती केवळ व्यवहारिक तडजोड नाही. याचे कारण असे की योगविद्येचे सर्व नियम सामरस्ययोगामध्ये अंतर्भूत आहेत. व्यक्तीला अथवा समाजाला सुखशांतीचा अथवा समाधानाचा मार्ग दाखवण्याचे सामर्थ्य गोरक्षनाथांच्या सामरस्ययोगामध्ये आहे. तत्त्वज्ञान हे कधीही पोकळीत वसत नाही. भारतीय परंपरेत तर तत्त्वज्ञान म्हणजे जीवन दर्शनच होय. जोपर्यंत त्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला जात नाही तो पर्यंत ते अमूर्त चिंतनच ठरते. तेव्हा गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाची वर्तमानकालीन जीवनाशी सांगड घालता येईल का? जर तसे घडून आले तरच व्यक्तिगत व सामाजिक जीवन उन्नत होण्याची शक्यता दाखवून देता येईल. त्या दृष्टीने आजच्या जीवनातले धोके, नैतिक अध:पतन व मानवी जीवनाला ग्रासून राहिलेल्या विविध समस्या विचारात घेणे मला आवश्यक वाटते. हा मुख्य हेतू समोर ठेऊन प्रस्तुत शोध प्रबंधातील सातव्या प्रकरणाची योजना केलेली आहे. मानव जातीला तिच्या अस्तित्वाचे भान करून देणे व व्यक्तीला तिच्या मूळ स्वरूपाचे आकलन करून देणे हे माझे प्रबंधाचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने प्रकरण सातमध्ये मी विस्ताराने चर्चा केली आहे. आठवे प्रकरण म्हणजे इथपर्यंत केलेल्या चर्चेचे सारच म्हणावे लागेल. त्याच्या तपशिलात आता मी जाणार आहे.

### २) गोरक्षनाथांच्या परमार्थ साधनेचे स्वरूप :

प्रस्तुत शोध प्रबंधाचा मुख्य निष्कर्ष असा की गोरक्षनाथांना अभिप्रेत असलेले तत्त्वज्ञान हे 'चिद्‌विलासवाद' या संज्ञेखाली आणणे शक्य आहे. खुद्द गोरक्षनाथांच्या विविध सिद्धांतांचा मी जो मागोवा घेतला त्यावरून माझ्या असे ध्यानात आले की गोरक्षनाथ फक्त हठयोग सांगत नाहीत. किंवा किंबहुना केवळ हठ योगावरच भर द्यावा अशी त्यांची भूमिकाच नाही. योग सामर्थ्याला त्यांची मान्यता आहे. तथापि, तिथेच ते थांबत नाहीत. त्यांच्या मते, योग हे साधन होय. त्यातून संपूर्ण जीवनाला व्यापून राहणारे एक समग्र तत्त्वज्ञान मांडावे अशी भूमिका त्यांनी घेतल्याचे दिसून येते. ते मांडत असताना गोरक्षनाथांना अभिप्रेत असलेल्या गुरूकृपेचा महिमाही मी स्पष्टपणे समजून घेतला आहे. जे मला समजले ते मी त्या त्या प्रकरणात नोंदवले आहे. श्री. गोरक्षनाथांच्या मते मनुष्याला जी काही साधना करावयाची आहे त्यातून 'चिद्‌विलास' प्रगट होऊ शकतो. त्यासाठी व्यक्तीने अनुभूतीसाठी तयार असले पाहिजे. याचाच अर्थ असा की गोरक्षनाथ निष्फळ काथ्याकूट करीत बसत नाहीत. त्यांना त्या

काळात दिसलेला समाज व त्यामधील असलेले व्यक्तीचे जीवन याची प्रचंड तफावत आढळून आली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी ज्ञान, कर्म, भक्ती व योग आदींच्या सहय्याने चिद्‌विलासवादाचे परिपूर्ण असे दर्शन त्यांनी मानव जातीपुढे ठेवले आहे. लौकिक भाषेत यास 'परामार्थसाधना' असे एक सर्वसमावेशक नाव अनेकांनी दिलेले आहे.

सर्व प्रथम गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानातील काही श्लोक मी पुढे घेतले आहेत.

पिंडमधे चराचरं यो जानाति स योगी पिंडसंवित्तीर्भवति।।

- सि.सि. प. उप ३/१

**अर्थ :** या पिंडामध्ये जो चराचर ब्रम्हांडाचे ज्ञान प्राप्त करुन घेतो तो पिंडसंवित्ति अनुभवतो. यालाच सिध्दांतस्वरुप देताना श्री गोरक्षनाथ त्यांच्या प्रसिध्द सूत्रात म्हणतात

एवं सर्वदेहेषु विश्वरुप परमेश्वर: परमात्मा अखंड स्वभावेन।

घटे घटे चित्स्वरुप: तिष्ठति। एवं पिंडसंवित्तिर्भवति।।

- सि. सि. प. उप ३/१३

**अर्थ :** अशा प्रकारे सर्व देहघटकांमधे विश्वरुप परमेश्वरी चैतन्य अखंडपणे त्याच्या चित्स्वरुपात उपस्थित आहे. असे जो जाणतो तोच (खऱ्या अर्थाने) पिंडज्ञानी होतो. असे हे विश्वचैतन्य शिवरूपात स्थित असते. ते व्यक्त होते शक्तितत्त्वातून. त्यांचा अन्योन्य संबंध श्री. गोरक्षनाथ पुढीलप्रमाणे व्यक्त करतात.

शिवस्याभ्यंतरे शक्ति: शक्तेरभ्यंतरे शिव:।

अंतरं न एव जानीयात चंद्रचंद्रिकयो रिव।।     - सि.सि.प. उप ४/१३

**अर्थ :** शिवतत्वामध्ये शक्ती अनुस्यूत आहे. व शक्तीतत्त्वामध्येच शिव अंतर्भूत आहे. चंद्रमा व चांदणे यात जसे अद्वैत असते त्याप्रमाणेच शिव-शक्ती यामध्ये अद्वैत असते. (सांख्यांच्या प्रकृतिपुरुषाप्रमाणेच ही मांडणी आहे) वरील श्लोकांचे अर्थ ध्यानात घेतल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की कोणीही व्यक्ती पिंडसंवित्ति अनुभवू शकते. त्याचप्रमाणे मनुष्याच्या देहामध्येच ते चैतन्य चित् स्वरूपात उपस्थित असते. याचे ज्ञान ज्याला होते तोच पिंडज्ञानी होतो. आता प्रश्न असा आहे की गोरक्षनाथांना अभिप्रेत असलेले हे तत्त्वज्ञान कोठून आले? या प्रश्नाला एक उत्तर असे देता येईल की ते तत्त्वज्ञान त्यांना मत्स्येंद्रनाथांकडून प्राप्त झाले. पुढे खुद्द गोरक्षनाथांच्या मार्फत ते गहिनीनाथांच्या पर्यंत येऊन पोहचले. गहिनीनाथांच्या कडून ते निवृत्तिनाथांच्याकडे व निवृत्तिनाथांच्याकडून ते ज्ञानेश्वरापर्यंत येऊन पोचल्याचे दिसते. ज्ञानेश्वरांनी कर्मकौशल्य व ज्ञानशक्तीच्या आधारे भक्तिपंथाची स्थापना केली. आणि त्यातूनच वारकरी संप्रदाय विशिष्ट प्रकारे कार्यान्वित झाला. भक्ती ही अंध नसते, तिच्यात पुरूषार्थ असतो. ही गोष्ट आपण ध्यानात घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष व्यवहारात

नाथ संप्रदाय म्हटला की तंत्र, मंत्र, यंत्र एवढ्याच गोष्टी पुढे येतात. मात्र त्या संबंधात तात्त्विक व मानसशस्त्रीय चिकित्सा सहसा केली जात नाही.

**टीप :** तत्संबंधी सविस्तर विश्लेषण **परिशिष्ट क्र. १** मध्ये केलेले आहे.

खरे पाहता गोरक्षनाथांची भूमिका ही जशी व्यापक आहे तशीच ती युगप्रवर्तक ही आहे. माझ्या मते गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानातून मानवी जीवनाच्या वैश्विक धारणा स्पष्टपणे मांडलेल्या आहेत. मानवी जीवनाची शुद्धता आणि व्यापकता इतकी महत्त्वाची आहे की सर्वच सामाजिक समस्यांचे ते उत्तर ठरू शकते. वर्तमानकालीन मानवी जीवनातील समस्यांना कसे भिडता येईल? हा माझ्यापुढचा सर्वात मोठा प्रश्न होता. म्हणून प्रस्तुत प्रबंधात हीच भूमिका मी प्रधान मानली आहे.

गोरक्षनाथांच्या संपूर्ण चिंतनाची बैठक ही सद्गुरूंच्या उपदेशावर आधारित आहे. उदा. 'गोरखबोध' हा एक गुरूशिष्य संवाद आहे. त्यामध्ये गोरक्षनाथ प्रश्न विचारीत आहेत आणि मच्छिंद्रनाथ त्याची उत्तरे देत आहेत. या संवादामध्ये एकूण १२९ प्रश्न व त्याची उत्तरे समाविष्ट करण्यात आली आहेत. उदा. पाहणारा कोण? त्याने काय पहावे? कोणत्या गोष्टीचा विचार करावा? इ. मूलभूत प्रश्न गोरक्षनाथ विचारतात आणि मत्स्येंद्रनाथ त्या प्रश्नांची उत्तरे देतात. योग म्हणजे काय? भक्ती कशास म्हणावे? असेही तत्त्वज्ञानात्मक प्रश्न या संवादात उपस्थित केलेले आहेत. या प्रश्नांची उत्तरेही तितक्याच सूक्ष्म रितीने मत्स्येंद्रनाथांनी दिली आहेत.

श्री. दत्तात्रेय हे श्री. मत्स्येंद्रनाथांचे गुरू होत. एका अर्थाने ते श्री. गोरक्षनाथांचे परापरत्पर गुरू होतात. त्यांचेशीही काही प्रश्नोत्तरे झाल्याचे दिसून येते. नरवै बोध (१४ श्लोक), प्राणसंकली (१८श्लोक) आणि गुरूदत्तात्रयांशी झालेला संवाद ''ग्यानदीपबोधसंवादे योगशास्त्रं संपूरण समाप्त'' (५२ प्रश्नोत्तरे) या सर्वांमधून योग व मानसशास्त्र यांचीच चर्चा केलेली दिसून येते.

श्री दत्तात्रेय व श्री मच्छिद्रनाथ यांचेकडून जे हठयोगविज्ञान श्री गोरक्षनाथांना मिळाले तेच त्यांनी 'गोरखपध्दती' भाग १ व भाग २ मध्ये ग्रथित करुन या सर्व ज्ञानाच्या व अनुभवाच्या पाश्वभूमीवरच श्री गोरक्षनाथांची 'गोरखवाणी' मधील २७५ सूत्रे, तसेच त्यांचे इतर वाङ्मयातील म्हणजे गोरखबानी, महार्थ मंजरी, अमनस्क योग, गोरक्षगीता, असे संस्कृत व हिंदी तसेच बोलीभाषेत प्रचंड वाङ्मय आहे. श्री गोरक्षगीतेमध्ये तर मनाचे उन्मन करणे, अजपाजप, सोहं साधना, नाद, शिवतत्व, देवतादर्शन, सिध्दी, आसन व बंध विचार, आरोग्य, अनुभूतीच्या वेळची भीतीची भावना, पिंडे पिंडाचा ग्रास, शक्तिजागरण, कुंडलिनीचे टप्याटप्याने होणारे कार्य, चक्रभेदन, मायेचे निराकरण, ज्ञान, गुरुमहिमा असे

अनेक विषय आहेत. त्यातील दोन ओव्या श्री गोरक्षपरंपरा श्री ज्ञानेश्वरांकडे कशी स्थिर झाली याचे स्पष्टीकरण करतात.

श्री गोरक्षे उपदेशिला। योग गहिनीने केला।
समाधी लाहोनी बुडाला। महासुखी।। - गो. गीता/११२
आत डोळा बाहेर डोळा। सर्वांगाचा झाला डोळा।
स्वरुप पाहोनी झाला भोळा। गहिनीनाथ।। - गो. गीता/११३

**दोन्ही सूत्रांचा अर्थ :** श्री गोरक्षनाथांच्या उपदेशाप्रमाणे श्री गहिनी नाथांनी योग साधना केली व त्यातून समाधीअवस्था प्राप्त होऊन महासुखामधेच तो बुडून गेला. (त्यातून अनुभव असा आला की) आत, बाहेर सर्वांगाला दृष्टी प्राप्त झाली व त्या विशाल दृष्टीला स्वरुपदर्शन घडले व त्यामुळे गहिनीनाथ कोमल अशा बालभावास प्राप्त झाले.

**३) चिद्‌विलासवादाची सामाजिक अभिव्यक्ती :**

अशा प्रकारे श्री मच्छिंद्रनाथांकडून प्राप्त झालेला योग, ज्ञान व गुरुभक्ती श्री. गोरक्षनाथांनी सामाजिक स्तरावर कार्यान्वित केली. त्याला स्वत:च्या अनुभूतीपूर्ण समर्पित जीवनाचे अधिष्ठान दिले. त्यांच्या विशाल वाङ्‌मयातून त्यांची महायोगावस्थेची अपूर्वता स्पष्ट होत जाते. व तेच तत्त्वज्ञान श्री ज्ञानेश्वरांनी कार्यान्वित करताना चिद्‌विलासाच्या अद्वैतविलक्षपण स्वरुपाला भावाचे अधिष्ठान निर्माण करुन समन्वयात्मक क्रमयोग व भक्तीला पाचव्या पुरुषार्थाची उंची कशी निर्माण केली तेहि स्पष्ट होत जाते.

वर उल्लेखलेल्या विविध संवाद, प्रश्नोत्तरातील ज्ञानकणांनीच पुढे वेगवेगळया सूत्रांचे रुप घेतले आहे. याची काही उदाहरणे: तीच सूत्रे गोरखवाणीच्या रुपात प्रगट झाली.
गोरखबोध गुरुशिष्यसंवाद सूत्र २ - गोरखवाणी सूत्र ३२, ३३, ३६
सूत्र ४ -- गोरखवाणी सूत्र २
सूत्र १४ -- गोरखवाणी सूत्र २७१
सूत्र २४ -- गोरखवाणी सूत्र ५०
सूत्र ३६ -- गोरखवाणी सूत्र २३
सूत्र ५२ -- गोरखवाणी सूत्र ४१
सूत्र ८० -- गोरखवाणी सूत्र ७, ८, २५६
गुरुदत्तात्रेय संवाद : सूत्र ५ -- गोरखवाणी सूत्र ३०
सूत्र २० -- गोरखवाणी सूत्र ६

अशा प्रकारे गुरुज्ञान, भक्ती व मानवी जीवनातले साधारणपणे ४० ते ५० प्रकारचे विविध विषय सूत्रबद्ध केलेले असून त्यातून एका महान दार्शनिकाचे योगदर्शनच सर्वांसाठी उपलब्ध झालेले आहे.

श्री मच्छिंद्र-गोरक्षप्रणीत नाथसंप्रदायातील ‘चिद्‌विलासवाद’ व विलक्षण अद्वैतावस्था अशा शब्दातून जी मांडणी केलेली आहे ती तत्वज्ञानांतर्गत घटकांच्या संदर्भातून असून ब्रम्हविचार, आत्मा, जगतुत्पत्ति, जीवजगतसंबंध, ब्रम्हजगतसंबंध, मोक्ष, माया अशा विविध अंगानी केली आहे. यातूनच श्री गोरक्षदर्शनातील मूलभूत सिध्दांत प्रस्थापित झाले आहेत. हाच प्रवाह श्री गहिनीनाथांच्या कृपाधारेतून श्री ज्ञानेश्वरापर्यंत पोहोचला. व ते अनुभवरुपी अमृताचे धनी झाले. अमृताचा रंग कसा असतो याची चर्चा कुठेच दिसत नाही. पण ज्ञानेश्वरांच्या माध्यमातून अमृताला रंग प्राप्त झाले. व ते विखुरले गेले ज्ञानेश्वरीतून, चांगदेव पासष्टीमधून, अभंगातून, अमृतानुभवातून व हरिपाठातून! मानवी जीवनाला प्राप्त झालेले हे वैश्विक योगदानच सर्व तऱ्हेच्या विनाशी परिस्थितीत मानवाला मार्गदर्शक ठरेल व माणसातला ‘माणूस’ शिल्लक राहील. असा दृढविश्वास श्री गोरक्ष व श्री ज्ञानेश्वरांच्या चिंतनातून निर्माण होतो असे मला वाटते.

सामरस्ययोगाविषयी आपण माहिती करून घेतलेली आहेच. हा सामरस्ययोग अनुभूतीचा विषय आहे. हा अनुभव प्रत्येकाने घ्यावा असा गोरक्षनाथांचा आग्रह आहे. कोरड्या ज्ञानातून काहीच निष्पन्न होत नाही. सि.सि.प. मध्ये परब्रम्हतत्वाला स्वसंवेद्य व अनुभवगम्य म्हटलेले आहे.

तस्मात् गुरुकटाक्षपातात् स्वसंवेद्यतयाच महासिध्दयोगिभि:।
स्वकीयं पिंड निरुत्थानानुभवेन समरसं क्रियते इति सिध्दत:।।

- सि.सि.प.उपदेश ५/७

**अर्थ :** म्हणून मोठ्यातला मोठा योगीसुद्धा गुरूंचा कृपाकटाक्ष व स्वत:चा मनोनिग्रह इ. योगसाधनांचे माध्यमातून स्वत:चे व्यष्टिपिंडाचे समष्टिपिंडाशी अभिन्नत्व अनुभवतात व समरसात्मक एकता होते असे योगियांचे निश्चित मत (सिद्धांत) आहे. ही सामरस्यातून निर्माण होणारी निरुत्थानावस्था पुस्तकी ज्ञानातून होत नाही. नुसत्या पुस्तकी पांडित्यास व भक्तीहीन कर्मकांडास गोरक्षनाथ विरोध करतात. त्याची अनेक सूत्रे असून त्यापैकी एक महत्त्वाचे सूत्र पूढे दिले आहे.

वेदे न शास्त्रे कतेबे न कुराणे पुस्तके न बंचा जाई।
ते पद जाना बिरला जोगी और दूनी सब धंदे लाई।। - गोरखवाणी/६

**अर्थ :** वेद, शास्त्र, कुराण आदि ग्रंथातून ब्रम्हपद समजू शकत नाही. ते पद फक्त काही अपवादात्मक योगीच जाणू शकतात. अन्यथा जगात मायेच्या पकडीत सर्व धंदाच चालतो. गोरक्षनाथांना माया मान्य नाही. तसेच त्यांची एकूण मांडणी चिद्‌विलासवादाच्या अंगाने जाणारी आहे. चिद्‌विलासवादाच्या या भूमिकेबद्दल विद्वानांमध्ये मतभिन्नता असल्याचे

दिसून येते. प्रश्न असा उपस्थित केला जातो की, नाथसंप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा उगम शांकरवेदांतात का काश्मिरीशैवागमात? याबद्दल दोन पक्ष दिसून येतात. श्री. पांगारकर, बी. जे. टिळक, केळकर, शं. दा. पेंडसे, डॉ. भांडारकर, प्रा. मिराशी यांसारख्या विद्वानामध्ये नाथसंप्रदायाला शांकरवेदांताची बैठक प्राप्त झालेली आहे. याउलट गोरक्षतत्त्वज्ञानाचा उगम काश्मिरी शैवागमात शोधला पाहिजे अशी भूमिका बाळाचार्य खुपेरकर शास्त्री, ग. दि. ढवळे, भा. पं. बहिरट, नागेंद्रनाथ उपाध्याय, म. म. कविराज, हजारीप्रसाद द्विवेदी, कल्याणी मलिक इत्यादी विद्वानांनी घेतली आहे. श्री. खुपेरकर शास्त्री यांनी जगत्‌मिथ्यावादाला नाकारण्यासाठी नाथसंप्रदायाचा उगम झाला असे स्पष्टपणे म्हटले आहे. म्हणून नाथसंप्रदायाचा उगम काश्मिरी शैवागमातही शोधला जातो. सि.सि.प. या ग्रंथात खुद्द गोरक्षनाथांनी शंकराचार्यांचावर पुढील शब्दात टीका केली आहे.

''वेदांती बहुतर्ककर्कशम्‌ अतिग्रस्त: परं मायया'' असे सि.सि.प. उपदेश ६/७३ मधे म्हटले आहे.[१] - संदर्भ: नाथसंप्रदाय उदय व विस्तार पान ३४९ (अ)

याचाच अर्थ असा की, जर नाथसंप्रदाय ही एक सलग परंपरा आहे असे मानले आणि गोरक्षनाथांच्यापासून ते ज्ञानेश्वरापर्यंत तिच्यात वैचारिक एकात्मता आढळते असे मानले तर शांकरवेदांतापेक्षा काश्मिरी शैवदर्शनच ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाशी मिळते जुळते आहे असे म्हणावे लागते. दृश्य विश्व हे आत्मचैतन्याचे स्वरूप आहे. जग हे ब्रह्मवस्तूचीच प्रभा आहे असा विचार अमृतानुभवात मांडलेला आहे.

प्रकाश तो प्रकाश की। यासी न वचे घेई चुकी।।
म्हणौ नि जग असकी। वस्तुप्रभा।।

- अमृतानुभव अज्ञानखंडण प्रकरण ७/२८९

**अर्थ :** प्रकाश तो प्रकाशच आहे असे म्हणण्यात काही चूक नाही हे नीट समजावे. म्हणून जग असे नांव दिले तरी जी आहे ती आत्मप्रभाच (प्रकाश) आहे.

मायेने व मायाभरित दृष्य विश्वाने परमात्मा आच्छादित आहे असे शांकरमत आहे तर दृष्य विश्वाने आत्मतत्त्व झाकलेले नसून ते प्रगट झाले आहे असा विचार चिदविलासवादाचा आहे. हे तत्त्वज्ञान काश्मिरी शैवदर्शनाशी तसे मिळते जुळते आहे. अशाच प्रकारचा पूर्ण अद्वैताचा विचार बुध्दिझम येण्यापूर्वी चीनमधे ताओ (Tao) व कन्फ्यूशिअस धर्मामधे मांडलेला दिसून येतो. ताओ धर्माचे प्रवक्ते लाओ त्झे (Lao Jse) व चँग चाऊ (Chang chau) यांनी सर्व प्रकारचे द्वैत अमान्य करुन त्यात फरक करताच येत नाही, द्वैतघटक एकच आहेत ते Tao मधून येतात व Tao मधेच विसर्जित होतात. मानव व निसर्ग हे एकमेकावर अवलंबून असून ते त्याप्रमाणे परिणाम करतात असा विचार मांडून परमेश्वराने सर्व ब्रम्हांड झाकले आहे असे स्पष्ट केले आहे.[२] - (Ref: world Famous Religions page 111)

थोडक्यात असे म्हणता येईल की नाथपंथाने आपले तत्त्वज्ञान साकारताना उपनिषदातील अनेक विचारांचा मागोवा घेत घेत अद्वैताची एक वेगळी मांडणी काश्मिरी शैव दर्शनाचा आधारावर केली. त्याचे फलस्वरुप हे विलक्षण अद्वैत म्हणजेच द्वैताद्वैतविलक्षणावस्था! मूळ शिवतत्त्व शक्तितत्वातून कार्यान्वित होताना ते चैतन्य, शक्तीतून क्रियाप्रधान स्वरुपात जेव्हा व्यक्त होऊ लागते त्यावेळी 'हिरण्यगर्भ' अवस्था निर्माण होते. ही ब्रम्हतत्त्वाची 'अपरा' शक्तीच्या माध्यमातून व्यक्त होण्याची पध्दत आहे. त्या तत्वाची सर्व सृष्टीच्या स्वरुपात पुढे व्यक्त होण्यासाठी जी इच्छा असते ती इच्छा अहंकाराचे माध्यमातून पुरी केली जाते. यालाच उपनिषदानी ब्रम्हविद्या म्हटले व सर्व जगतव्यवहारात कार्यरत होणारी उभयांगी शक्ती असलेली ''माया'' ही शक्ती वैश्विक स्तरावर महाकुंडलिनी व व्यक्तिस्तरावर कुंडलिनी अशा रितीने जिवाला बंधनात ठेवणारी व बंधनाचे पार ही नेणारी अशा रितीने कार्यरत रहाते. हा सर्व जगत प्रपंच हे ब्रम्हतत्वाचे शुध्द स्वरूपात अवतरण (Decending) आहे हे वरील विवेचनातून स्पष्ट होते.[३]

- (संदर्भ: सि.सि.पध्दति पान १ ते ३०)

**४) चिद्‌विलासवादाची चिकित्सा :**

ब्रम्हांड हा चितशक्तीचा अद्वयविलासच आहे या सिध्दांताची मांडणी श्री गोरक्षनाथांच्या प्रथमप्रमाणस्वरुप अशा सि.सि.प. ग्रंथात सुरवातीलाच सूचकार्थाने दिलेली आहे असे म्हणता येईल. आधुनिक विज्ञानाच्या आजघडीच्या प्रगत अशा अवस्थेत या सृष्टीमधील सर्व चराचर व घटक हे कोणत्या मूलभूत कणांपासून तयार होतात हे स्पष्ट झाले आहे. व ते म्हणजे फक्त दोन प्रकारचे कण: न्यूक्लिऑन (Neuclion) व इलेक्ट्रॉन. न्यूक्लिऑनमध्ये दोन प्रकार आहेत.

१) धन विद्युत धारी = प्रोटॉन (Proton)

२) विद्युतभार विरहित = न्यूट्रॉन (Neutron)

(Basic Particles) यांना मूलभूत कण म्हणतात.

इलेक्ट्रॉनवर ऋण विद्युतभार असतो. न्युक्लिऑन हा वास्तविक एकच प्रकार आहे. त्यात फक्त विद्युतभारामधील फरक एवढाच विषय असतो. The existence of such chargless protons or neutrons was suggested by Rutherford in 1920. In fact it is known that protons can turn in to neutrons by losing their positive charge and neutrons can turn into protons by acquiring it.[४] (Ref: One Two Three to Infinity. Page 149)

याचा अर्थच असा की विज्ञानाला माहित झालेल्या सर्व मूलभूत धातूंची संख्या १०० पर्यंत जात असली तरी प्रत्येक धातू (Element) म्हणजे एकाच प्रकारच्या अणूंचा संघात

असतो. (when a substance consists of one kind of atoms only it is called an element.) या अणूची अंतर्गत रचना पाहिली तर धनविद्युतधारी केंद्र (गर्भ) ज्याला ”nucleus” म्हणतात त्याच्या भोवती ऋणविद्युतभार असलेले कण (electrons) फिरत असतात. त्यांच्या वेगवेगळया कक्षा (orbits) असतात. अणूचे सर्व वस्तुमान (mass) केंद्रात एकवटलेले असते. प्रोटॉनवरचा भार हा इलेक्ट्रॉनचे भारा इतकाच असतो त्यामुळे या अणूची रचना ही संतुलित रहात असते (The charge of the proton is numerically equal to that of the electron but is of opposite sign). त्याचप्रमाणे केंद्राभोवती विद्युतक्षेत्रात फिरणाऱ्या इलेक्ट्रॉनची संख्या ही अणुगर्भात (केंद्राभोवती) असणाऱ्या प्रोट्रॉन्सइतकीच असते. याला Atomic number ही संज्ञा असून प्रत्येक धातूचा हा Atomic number निश्चित असतो. बाहेरच्या भ्रमणकक्षेतील इलेक्ट्रॉन कमी केला जाणे किंवा त्यात भर पडणे, असे ज्यावेळी होते त्या स्थितीला “ion” असे म्हणतात. रासायनिक प्रक्रियांमधून जे नवनवीन पदार्थ बनतात त्यामधे ही इलेक्ट्रॉन्सची देवाणघेवाण होत असते. वस्तुमानाच्या निर्मितीचे व त्यातून निर्माण होणाऱ्या पसाऱ्याचे सर्व रहस्य या अणुगर्भस्थ रचनेमध्ये व त्यांच्या इतर अणूंशी होणाऱ्या प्रक्रियांमध्ये आहे हे स्पष्ट होते.[५]

(Ref: Book of knowledge page 75 & Dictionary of Science page 177)

वरील वैज्ञनिक माहितीचा सूक्ष्मातून विचार करता असे स्पष्ट होते की त्या अनाम ब्रम्हतत्वातून स्फुरण होऊन जेव्हा अपरा शक्तीच्या अवस्थेमधे निर्मितीचे स्फुरण होते त्यास ‘हिरण्यगर्भ’ ही जी स्थिती आहे ती हीच वरील स्थिती असून त्या शक्तिमाध्यमातून जेव्हा ‘शिव’शक्तीचे स्फुरण चैतन्याचे स्वरुपात कार्यरत होऊ इच्छिते तेव्हा विद्युतभारविरहित असणारे न्यूट्रॉन्स हीच अत्यंत सूक्ष्म स्तरावरची सामग्री त्या शक्ती तत्त्वाच्या हातात असते. चैतन्य शक्ती त्यातून धन + ve व ऋण-ve असे दोन प्रकार निर्मित करुन त्यांचे संतुलन राखण्यासाठी केंद्र व केंद्राभोवती फिरणारे इलेक्ट्रॉन्स अशी सृष्टीची मूलभूत अशी आंतररचना तयार होऊन त्यातून नंतर विविध प्रकारच्या रचना तयार होत गेल्या. अशा रितीने या ‘अपरा’ शक्तीच्या अवस्थेपर्यंत विज्ञानातून खुलासा होऊ शकतो. त्याचेआधीच्या अवस्था या शब्दात मांडल्या गेल्या असल्या तरी त्या शब्द सामर्थ्याच्या पलिकडे आहेत हे स्पष्टच होते. त्यामुळेच हे विश्व व त्याची अंतरव्यवस्था यामध्ये हे जे अणूपरमाणूंचे अखंड नृत्य सृष्टीच्या अंतररचनेत चालू आहे ते व त्याचे कार्य हे ‘शिवनृत्याचे’ स्वरुपात (Dance of Shiva) दाखवलेले गेले आहे.[६]

(Ref: The Tao of physics page Paper cutting and Page 33 of Tech. of opening the third eye.)

वरील विषय श्री गोरक्षनाथांच्या चिद्विलासवादचेच वैज्ञानिक स्पष्टीकरण आहे असे स्पष्ट होते. ब्रम्हतत्त्वातून झालेल्या चैतन्यस्फुरणाचेच दृष्य स्वरुप म्हणजे ही सृष्टी, हे जग, हे सर्व चराचर. हे चैतन्यनृत्य आहे. ही चैतन्यप्रभा आहे. या ब्रम्हपरिणामवादाबद्दल (Transformation theory) श्री ज्ञानेश्वरांच्या मांडणीची नोंद करण्यापूर्वी श्री गोरक्षनाथांचे वाङ्मयातील या विषयासंबंधीचे संदर्भ पाहू.

१) उदै न अस्त राति न दिन सरबे सचराचर भाव न भिन।

सोई निरंजन डाल न मूल सब व्यापीक सुषम न अस्थूल।। - गो. वाणी/११२

**अर्थ :** इथे उदय नाही, अस्त नाही, रात्र नाही दिवसही नाही. सर्व चराचर सृष्टीमध्ये कोणताही भिन्नतेचा भाव नाही. शुध्द निरंजन ब्रम्हच फक्त उपस्थित आहे. मूळ व शाखा हा भेदच रहात नाही. असे हे सर्वव्यापी ब्रम्ह स्थूलही नाही व सूक्ष्मही नाही.

२) सर्व संसार अविनाशी ब्रम्हरुप आहे. याचे सूत्र:

पाथर मै पारस अबिनासी, ज्यूं असट धात मै सोना।

यूं सब जुग माहिं समझि अबिनासी, ता घटि पाप न पूनां।। - गो. ज्ञान/२८

**अर्थ :** दगडामधे जसा परीस (अविनाशी) असतो, जशी आठ धातूंमध्ये सोन्याची उपस्थिती असते. तसेच हा संसार सर्वदृष्टया ब्रम्हरुप अविनाशी आहे असे समज. ब्रम्हप्राप्त शरिरामध्ये पापही रहात नाही व पुण्यही रहात नाही.

३) शरिरातच त्रैलोक्य आहे, पिंडातच सर्व ब्रम्हांड आहे. ही एकरुपता म्हणजेच परम अद्वैत अवस्था होय. त्याचे सूत्र:-

तुंबी मै तिरलोक समाणा, तिर बेणी रवि चंदा।

बूझौ हो कोई ब्रम्ह गियांनी, अनहत नाद अभंगा।। - गो. ज्ञान/३५

**अर्थ :** या शरिरातच त्रैलोक्य समावलेले आहे. त्रिवेणी संगम, सूर्य, चंद्र यातच आहेत. यातच अखंड असा अनाहत नाद होत आहे. कुणी ब्रम्हज्ञानीच हे समजू शकेल.

४) विलक्षण अद्वैताच्या परमसूक्ष्मावस्थेचे सूत्र:

बास सहेती सब जग बास्या स्वाद सहेता मीठा।

साच कहूँ तो सद्गुर मानै रुप सहेता दीठा।। - गो. वाणी सूत्र २५

**अर्थ :** ब्रम्हसुगंधीने जग व्याप्त आहे. त्यामुळे सर्व जगत गोड सुगंधयुक्त (आनंदमय) आहे. हा विवेकानुभव सद्गुरुकडूनच शक्य आहे. कारण सद्गुरुदत्त प्रकाशातच हा अनुभव येतो.

जग हे ब्रम्हरुप आहे हे शब्दातून व्यक्त झाले. पण याचा वास्तविक अर्थ काय? तो अर्थ या शब्दामधेच अडकला आहे. शब्दात अडकलेला अर्थ दुसऱ्या शब्दानीच मोकळा करता येतो. तो शब्द आहे ॐ. परब्रम्हाचा अर्थ वाङ्मयगोचर नाही. प्रणवाची महत्ता शब्दबध्द करता येत नाही. ते रहस्यच रहाते. ब्रम्ह व ब्रम्हज्ञान एकच. याचा अर्थ त्याचा

अनुभव हेच त्याचे उत्तर. आणि हा अनुभव सद्गुरुंच्या शब्दानीच येऊ शकतो. अशा या गूढ व महत्वाच्या विषयाची मांडणी सूत्ररुपात श्री. गोरक्षनाथांनी खालील सूत्रात केलेली आहे.

सबदहि ताला सबदहि कूची सबदहि सबद भया उजियाला।

कांटा सेटी कांटा षूटै कूंची सेती ताला।

सिध्द मिलै तो साधक निपजै जब घटि होय उजाला।। - गोरखज्ञान/१

(याला गोरखतिलक असेही म्हणतात)

**अर्थ :** ब्रम्हाला बंद करणारा 'शब्दच' आहे व 'शब्दच' त्याची किल्ली आहे. व त्यातूनच परमात्म्याचे दर्शन होते. काट्यानी जसा काटा काढतात, किल्लीने कुलुप उघडते. त्याप्रमाणे सद्गुरुंच्या शब्दानी ते काम होते व साधकाचे शरीर अंतर्बाहय उजळून जाते.

विलक्षण अद्वैतानुभूती हा शाब्दिक खेळ नाही. अनुभव नसेल तर आध्यात्मकथन खोटे आहे असे स्पष्ट करत असताना त्या अनुभवक्षणी साधकाची स्थिती कशी होते? तर अनुभवातच अनुभवी (अनुभव घेणारा) विरुन जाऊ लागतो. अनुभव घेणारा शिल्लकच रहात नाही. हे गोरक्षनाथांनी गो.ज्ञान मध्ये सूत्ररुपात मांडले आहे.

अलख पुरुष मेरी दिष्टि समाना, सोसा गया अपूठा।

जब लग पुरुषा तनमन नहि निपजै, कथै बदै सब छूटा।। - गो. ज्ञान सूत्र २

**अर्थ :** तो अलख निरंजन पुरुष माझे दृष्टीत सामावला गेला. त्याचे परिणामस्वरुप मीच त्यात शोषला गेलो. जोपर्यंत तो परम पुरुष (तत्त्व) शरीर व मनात परिव्याप्त होत नाही तोपर्यंत अध्यात्म बोलला तरी तो खोटाच असतो. श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या विविध वाङ्मयामध्ये हाच चिद्विलास स्पष्टपणे मांडला आहे. त्यांच्या 'महार्थमंजरी' या ग्रंथातील नमुन्यादाखल तीन सूत्रे-

तथातथा दृष्यमानानां शक्तिसहस्त्राणां एकसंघट:।

निज ह्रदयउद्यमरुपो भवति शिवोनाम परम स्वच्छंद:।। - महार्थमंजरी - गाथा/१३

**अर्थ :** याप्रमाणे शक्तीची ही हजारोहजार विभिन्नरुपे व त्यातील ऐक्य निजह्रदयउद्यमरुप 'शिव' या नांवाने ओळखले जाते. (म्हणजेच विश्व हे शिवशक्तीचाच विस्तार आहे.)

विश्वोज्ञानविरुढानि गंधप्रमुखानी सुगंधीनि पुष्पाणि।

पंचाप्याजिघ्रन् क्रीडति त्रैलोक्यधूर्तोदेव:।। - महार्थमंजरी - गाथा/२४

**अर्थ :** विश्वाच्या बागेत शब्दस्पर्शरुपरसगंधरुप विषयातून रसास्वाद घेत तिन्ही लोकातील व्यवहारातून कुशल परमेश्वर क्रीडा करत असतो. (प्रगट होत असतो)

ज्ञाता स आत्मा ज्ञेयस्वभावश्च लोकव्यवहार:।

एकरसां संसृष्टिं यत्र गतौ सा खलु निस्तुषा विद्या।। - महार्थमंजरी - गाथा/१६

**अर्थ :** आत्मतत्त्वच ज्ञाता आहे व हा विश्वविलासरुपी लोकव्यवहारच ज्ञेय आहे. ज्ञाता व ज्ञेय यांचे एकरसात्मक सामरस्य हीच शुध्द विद्या आहे. अशा प्रकारच्या सामरस्यामुळे परमात्मा व लोकव्यवहार अभिन्न आहेत.

'अवधूत गीते'मधील पूर्णअद्वैताचा श्लोक:

आब्रम्हस्तंभपर्यंतं संपूर्ण परमात्मनि।

भिन्नाभिन्नं न पश्यामि तस्याहं पंचमाश्रमो।। - गो.सि. संग्रह पान ७५

**अर्थ :** ब्रम्हापासून सर्व चराचर जगत परमात्म्यामधेच अधिष्ठित आहे. पंचमाश्रमात स्थिर असा मी अवधूत त्यात कोणताही भेद करत नाही.

'गोरखआरती'मधे:

दीपक जोति अषंडत बाती। परम जोति जगै दिनराती।

सकल भवन उजियारा होई। देव निरंजन और न कोई।।

**अर्थ:** ज्योतिस्वरुप ब्रम्हच विराजमान असून ती अखंड बत्तीची ज्योतच आहे. सर्व लोकात त्याचा प्रकाश असून त्या प्रकाशात निरंजन ब्रम्हाशिवाय दुसरे काहीच दिसत नाही.

**५) नाथसंप्रदायातील ब्रम्हतत्त्व :**

श्री गोरक्षनाथांच्या वरील विविध सूत्रांमधून ब्रम्हाचे द्वैताद्वैतविलक्षण स्वरुप तसेच त्या तत्त्वाचा मुक्त आनंदविलास म्हणजेच हे विश्व हे स्पष्ट होत जाते. या मांडणीचे स्वरुप थोडक्यात पहायचे झाल्यास

१) ब्रम्हतत्त्व व आत्मा यांचे स्वरुप एकच असून केवळ अंशात्मक भेद असतो. यासाठी प्रतिबिंबवादाचा आधार घेऊन ज्याप्रमाणे पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब दिसते त्याप्रमाणे आत्म्यामध्ये परमात्म्याचे दर्शन होते.

२) ब्रम्हतत्त्व हे स्वसंवेद्य व अनुभवगम्य आहे. - सि.सि.प.उप ५/७

३) गुरुकृपेशिवाय हे ज्ञान प्राप्त होत नाही याबाबतचे सूत्र :

तन्नित्यं कलानोज्झितं गुरुमयं ज्ञेयं निरुत्थं पदं।। - सि.सि.प.उप ६/९३

**अर्थ :** हे नित्य संकल्पातीत पद गुरुकृपेमुळेच ज्ञानाचे कक्षेत येते.

४) हे तत्त्व निर्गुण निराकार व सर्वव्यापी आहे. तसेच ते सगुण साकार पण आहे व ते सगुणनिर्गुणातीतही आहे. परब्रम्हाची द्वैताद्वैतविलक्षण मांडणी ती हीच . गो. वाणी मध्ये श्री गोरक्षनाथ म्हणतात.

बसति न सून्यं सून्यं न बसति, अगम अगोचर ऐसा।

गगन सिषर महि बालक बोलै, ताका नाँव धरहुगे कैसा।। - गो. वाणी /१

**अर्थ :** ते तत्त्व भाव (बस्ती) व अभाव याच्या पलिकडे असून ते इंद्रियगोचर नाही. ते शुध्द तत्त्व ब्रम्हरंध्रामधेच (गगनसिषर) अनुभवास येते. अशाला कोणते नांव द्यायचे? यावरून ध्यानात घ्यावयाचे ते हे की, नाथसंप्रदायातील ब्रह्मतत्त्व जसे शुद्धतत्त्व आहे तसेच ते अनुभाव्यपण आहे. योग्याला स्वप्रयत्नानी व निरनिराळ्या योगीक्रियांच्या आधारे त्या तत्त्वाचा अनुभव घेता येतो.

## ६) चिद्‌विलासवादी तत्त्वज्ञानाचे पाश्चात्य पुरस्कर्ते :

God किंवा ब्रम्ह हे शब्द धर्मामधील ईश्वर किंवा तत्त्वज्ञानामधील अंतिम परिपूर्ण सत्य अशा अर्थाने भारतीय तत्त्वज्ञानात, तसेच पाश्चिमात्य तत्त्वज्ञानात परमेश्वर (God) हा शब्द वरील प्रमाणे व्यापक अर्थाने स्पिनोझा (Spinoza) हेगेल (Hegel), व्हाइटहेड (White head), ब्रॅडले (Bradley) यांनी त्यांचे तात्विक मांडणीत वापरला आहे.[७]

(Ref: Introduction to Indian Philosophy Page 367)

**1) Spinoza :**

God of Spinoza is infinite immutable and eternal intellect. A principle is eternal not because God wills it but He understands it and by understanding He creates it. Thus the universe remains thoroughly rational and intellectual. Every thing follows from God with the same necessity as the three $<^{s}$ of a $\wedge$ = 2rt. $<^{s}$. This insistence on the rational nature of reality alone justifies the possibility of real connection of God and the reality of every idea. This gives rise to the absolute monotheism or pantheism.[८] (Ref: Critical History of modern philosophy, page 340)

**2) Hegel :**

Being implicitly contains Becoming and without Becoming, Being could not be Being. The higher categories contain the lower explicitly but the lower catergories also contain the higher implicitly Thus the whole world is really a system of categories, inter related dialectically in such a way that the Absoulte is the reason of Being and Being too is implicitly the reason of the Absolute.[९] (Ref: Critical History of modern philosophy, Page 318-319)

**3) Bradley :**

Appearances do belong to Reality, only appearances are higher and lower. Reality is an organic whole. This whole appears in immediate experience which itself is a whole always pointing to a larger whole. You have here a whole which at the same time is each and all of its parts and you have parts each of which makes a difference to all the rest and to the whole. Expansion and harmony are the two criteria of Reality.[१०] (Ref:- Critical History of modern philosophy page 367)

हे तत्त्व अतिव्यापक व स्वनियंत्रित (Boundless and self governing) शुध्द, पूर्ण ज्ञानयुक्त व पूर्ण शक्तियुक्त (Purest possessing all knowledge and power) असे असते. त्याचे Frozen Intelligence असे यथार्थ वर्णन करता येते. या सर्व निसर्गव्यवस्थेमध्ये निश्चित स्वरुपाच्या कार्यकारणभावात्मक न्यायपूर्ण क्रिया चालू रहात असतात. हा विचार ग्रीक तत्वज्ञानात ॲनॅक्झिमँडर (इ.स.पू. ६१०-५४७). तसेच ॲनाक्झोगोरस (इ.स.पू. ५००-४२८) यांनी, तर बुध्दिप्रामाण्यवादाचे पुरस्कर्ते देकार्त, स्पिनोझा, लायबनीज यांनीही मांडलेला दिसून येतो. लायबनीज यांनी पूर्वप्रस्थापित सुसंवादाचा सिध्दांत मांडला. (Doctrine of pre-established Harmony) त्यातून हे स्पष्ट केले गेले की विश्वरचनेमागे अंतर्गत तर्कातून कार्यरत होणारी अशी एक शक्ती, तादात्म्य व विरोध अशा दोन्ही अंगानी कार्य करत ऐक्यरुप अशा विश्वरचनेची निर्मिती करते.

(Inner Logic which operates through identity and contradiction creating harmony.) विलक्षण अद्वैत किंवा चिद्‌विलास या तात्विक मांडणीचा उगम उपनिषदांतर्गत अद्वेत व रामानुजांचे विशिष्टाद्वैत यामध्ये असल्याचे स्पष्ट होते. दोन्हीमधे 'माया' ही संकल्पना आहेच. पण रामानुजांच्या विशिष्टाद्वैतात 'माया' ही परमेश्वराची अद्‌भुत शक्ती असून तिच्या मार्फत जगताची खऱ्या अर्थाने निर्मिती होते. ब्रम्हस्थित मुख्य वस्तूत खऱ्या अर्थाने बदल होतो. याचा अर्थ जगतही तितकेच सत्य आहे जितके ब्रम्ह सत्य आहे. हाच ब्रम्हपरिणामवाद होय. अस्तित्वाचा पूर्णपणे व स्वच्छपणे (Total & Open) स्वीकार असे धोरण असून 'माया' या कल्पनेलाच फाटा दिला जातो. चिद्‌विलासवादाची ही पार्श्वभूमी स्पष्टपणे समोर असणे आवश्यक आहे. कारण या वैचारिक सिध्दांताचे ठामपणावरच वैयक्तिक व सामाजिक सुधारणा व बांधणीला काही अर्थ निष्पन्न होतो. आपण ही सत्य आहोत, नैतिक अध:पतन व सामाजिक प्रश्नांची गंभीरता व भीषणताही सत्य आहे व या सर्व परिस्थितीवर मात करण्याची विजिगीषु प्रबळ धारणा व प्रेरणा आवश्यक आहे हेहि सत्य आहे. वर्तमान परिस्थितीची स्पष्ट जाणीव व कार्यप्रवणता यातून निर्माण होऊ शकते.

हे अद्वैतापेक्षा वेगळे असे 'द्वैताद्वैतविलक्षण' तत्त्व या नाथसंप्रदायाचे वैशिष्ठ्य आहे. त्याचे विशेष खुलाशासाठी गोरक्षसिध्दांत संग्रहातील २ सूत्रे व श्री ज्ञानेश्वरांचा एक अर्थगंभीर असा अभंग पाहू.

अद्वैतं केचिदिच्छंति द्वैतम् इच्छंति चापरे।
समतत्त्वं न जानाति द्वैताद्वैत विलक्षणम्।।

- गो. सि. संग्रह, पान २४ व अवधूत गीता १/३६

**अर्थ :** काही लोक अद्वैत इच्छितात. काही लोक द्वैत इच्छितात. पण या दोन्हीच्या पलिकडील द्वैताद्वैतविलक्षण तत्त्व जाणण्याची कोणीच इच्छा करत नाही.

यदि सर्वागतो देव: स्थिर: पूर्णो निरंतर:।
अहो माया महामोहो द्वैताद्वैत विकल्पना।।

- गो. सि. संग्रह, पान २४ व अवधूत गीता १/६०

**अर्थ :** जर सर्व ठिकाणी परमेश्वर स्थिर, पूर्ण व निरंतरतत्त्व आहे तर त्याच्या ठिकाणी द्वैत किंवा अद्वैताची कल्पना करणे हेच मोठे विपरीत आहे.

तसेच ज्ञानेश्वरांचा एक सर्वपरिचित अभंग सर्व विरूद्ध तत्त्वांचे वा स्थितींचे एकरूपत्व दाखवतो:

तुज सगुण म्हणू की निर्गुणरे। सगुण निर्गुण एकु गोविंदुरे।
तुज दृष्य म्हणू की अदृष्य रे। दृष्य अदृष्य एकु गोविंदुरे।।
तुज साकार म्हणू की निराकार रे। साकार निराकार गोविंदुरे।।
तुज स्थूल म्हणू की सूक्ष्मरे। स्थूल सूक्ष्म एकु गोविंदुरे।।
निवृत्ति प्रसादे ज्ञानदेव बोले। बाप रखुमा देवी वरु विठ्ठलुरे।।
एक गोविंदुरे।। - ज्ञानेश्वर अभंग

परमतत्त्वाचे प्रगटीकरण व त्यातील सामरस्यात्मक अनुभव हाच विषय साधकाला अभिप्रेत असतो. तत्पूर्वी नाथसंप्रदायाने ऐक्यानुभूतीस दिलेले अनन्य साधारण महत्वच सिध्दपुरुषांच्या विविध सूत्रांमधून स्पष्ट होत जाते. अनुभूतीसाठीच सर्व योग प्रपंच व गुरुकृपा वगैरे विषय येतात. 'मी ब्रम्ह आहे' या व्यतिरेक बोधास किंवा 'सर्व ब्रम्हस्वरुप आहे' या अन्वय बोधास अनुभवाशिवाय काहीच अर्थ नाही. ती नुसतीच शब्दमांडणी झाली. प्रचितीसाठी जशी स्वपिंडरचना समजली पाहिजे तशीच ब्रम्हांड रचना, त्यातील चक्रांचा शास्त्रविचारही समजला पाहिजे. पिंडचक्रांचा व ब्रम्हांडचक्रांचा अदृष्य संबंध व त्यांचेमधे सामरस्य निर्माण होण्यासाठी साधना केल्यास सामरस्याचा रसास्वाद मिळू शकतो.

यद्वै तत्सुकृतं रसो वै स:। रसम् हि अयम् लब्ध्वा आनंदी भवति।।[११]

(संदर्भ : ईशादि नौ उपनिषद् पान ३६५)

**अर्थ :** जो निश्चितपणे सुकृत (आपण स्वत:च बनलेला ) आहे तोच रसरुप (आनंदमय) आहे. (हा जीव) हा रसरुप आनंद प्राप्त होऊनच आनंदयुक्त होतो.

हा रस 'रसौ वै स:' या सूत्रानुसार परमात्म्याचे व्यापक अस्तित्वातूनच पाझरत असतो. सध्या रुढ असलेल्या पातंजल योग विचारात हा बारकावा स्पष्ट होत नाही. नाथसंप्रदायी योग वाङ्मयातील सर्व प्रकरणे एकमुखाने अनुभवप्रामाण्य विश्वव्यापकत्त्व व त्याचेशी समरसता व गुरुकृपांकित भक्तिप्रधान योग यांचीच महती सांगतात. कारण नाथांचा योग हा भक्तिप्रधान आहे. कारण गुरुभक्तीशिवाय योग सुरुच होत नाही. त्यामुळे नाथप्रणीत हठयोग हा कोरडा प्रयोग नसून त्यामागे प्रेम, निष्ठा, कृपाकांक्षा, समर्पण असे घटक कार्यरत असल्यामुळे

योग्यास मोक्षाच्या पलिकडे शब्दातीत अशा शिवतत्त्वात नेले जाते. या महत्वाच्या विषयावर श्री बाबामहाराज आर्वीकर म्हणतात:

''भक्तियोगात पिंडातील चक्रे जेव्हा उमलतात व उच्च आनंदाचा लाभ घडतो तेव्हाच ब्रम्हांडातील शक्तिकेंद्रेही उमलून विश्वाचे एक वेगळेच दर्शन होऊ लागते. यावेळी विश्वाचे जडरुप दूर सरुन त्याचे खरेखुरे जे मूळ स्वरुप ते प्रगट होऊ लागते. या पिंडगत अनुभवास आनंद म्हणतात व ब्रम्हांडातील अनुभवास ज्ञान म्हणतात. पिंडब्रम्हांड ऐक्यानुभवासाठी भक्तिप्रधान योग आवश्यक आहे. इथे नाथसंप्रदायातील आणखी एक मुद्दा स्पष्ट होतो. तो हा की 'योग' हा निसर्गाविरुध्द नाही तर निसर्ग नियमांनाच योग्य दिशेला नेणारा असतो. त्यासाठी सृष्टिनिर्मितीमधे जे संतुलन आहे व सहजता आहे तसेच संतुलन व सहजता योगातून साधली गेली पाहिजे. या संबंधात श्री. गोरक्षनाथांनी स्पष्टपणे मांडले आहे की -

दाबि न मारिबा षाली न रषिबा, जांनिबा अगनि का भेवं।

बूढी ही थै गुरबानी होइगी, सति सति भाषंत श्री गोरषदेवं।। - गो. वाणी/१७४

**अर्थ :** मनाला दाबून मारता कामा नये, त्या मनाला मोकळ पण ठेवता कामा नये. तर योगाग्नी म्हणजे काय हे जाणून घेतले पाहिजे. असे जर केले तर ती वृध्द म्हातारी (म्हणजे अनादि काळापासून चालत आलेली माया) जी बंधनात अडकवते तीच माया विद्येच्या रुपात गुरुरुप बनते व मोक्षदायिनी होते. इथे मनाची शुध्दता अनिवार्य आहे.

श्री योगी अरविंद याबाबत म्हणतात, "Human Consciousness cannot bear a constant decent of the light or power or cannot at once receive and absorb it. It needs periods of assimilation".[१२] (Ref: basis of yoga page 46) तसेच पिंडशक्ती व विश्वशक्ती (self energy & cosmic energy) यामध्ये जी एकरसता अनुभवास आली पाहिजे त्याचेच वर्णन श्री गोरक्षनाथ सि.सि.प.उपदेश ५ मधे 'निरुत्थान अवस्था' म्हणून करतात.

निजपिंडपरीक्षाच स्वरुपकिरणानंदोन्मेषमात्रम्।

यस्योन्मेषस्य प्रत्याहरणम् एव समरसकरणं भवति।।

- सि.सि.प./ पंचम उपदेश /११

**अर्थ :** पिंड-परपिंडाची एकता हा अनुभव (निजपिंडपरीक्षा) स्वत:च्या शरिरात परमात्म्याच्या स्वरुपकिरणांमुळे जो आनंद पसरतो त्यातून होतो. हा आनंद स्वत:च्या शरिरात एकरुप झाला की त्या परमतत्वाशी एकरुपतेचा जो अनुभव येतो त्याला 'समरसकरण' म्हणतात.

श्री गोरक्षनाथांच्या 'महार्थमंजरी' या ग्रंथात याच अर्थाची गाथा क्र.३४ दिलेली आहे. म्हणून योगावर लिखण केल्यानंतर 'ज्ञानगोदडी' मधे श्री मत्स्येंद्रनाथ श्री गोरक्षनाथांना सांगतात.

श्रध्दा चँवर प्रीति की धूपा। निष्ठानाम गुरु का रुपा।

अनहत नाद नाम की पूजा। ब्रम्ह वैराग्य देव नही दूजा।। - गोरखज्ञान गोदडी/२०

**अर्थ :** श्रध्देवर प्रेमाचा धूप घालून निष्ठा नावाच्या गुरुरुपाची अनाहत नादानी पूजा करा. कारण वैराग्य व ब्रम्ह ही ईश्वराचीच रुपे आहेत.

विश्वचेतनेचा हा जो मुक्त आविष्कार की ज्याला चिद्‌विलास म्हटले आहे तो अनिर्बंध नसून तो सहज, संतुलित व नियमबध्द आहे. या सर्व कार्यपध्दतीच्या मागे एक अनाम बुध्दितत्त्व काम करत असते. हा विषय स्पष्ट करणारी सूत्रे 'महार्थमंजरी' मधे गाथा क्र. १९ व गाथा क्र. २० अशी आहेत. या दोन गांथामध्ये विश्वनाट्याचा सूत्रधार 'शिव' तत्त्व असून मूलभूत शांभवी शक्तीच्या द्वाराच ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती व मायाशक्तीचे नियंत्रण चालते असा विषय मांडला आहे. ते मूलभूत अनामतत्त्व म्हणजेच ही शांभवी शक्ती.[१३] (संदर्भ - महार्थमंजरी, पान २०,२१)

### ७) चिद्‌विलासवाद म्हणजे वैश्विक एकता

चिद्‌विलासवाद हे एका अर्थी वैश्विक एकतेचेच तत्त्वज्ञान आहे. श्री गोरक्षनाथांचा काळ (इ.स.१००० चे दरम्यान) व त्या काळची सामाजिक परिस्थिती ऐतिहासिक दृष्टीने पहाता सातव्या ते बाराव्या शतकापर्यंतचा राजा हर्षोत्तर कालखंड हा सामाजिक विघटनासाठी व विविध जातिजमातींच्या निर्मितीसाठी प्रमुखपणे नोंदला गेला आहे. जैन व बौध्दांचा पारंपारिक वर्णव्यवस्थेस झालेला विरोध व त्यांच्या धर्मप्रवेशासाठी सर्वांना दिलेली सवलत, त्याचप्रमाणे महायान, हीनयान, मंत्रयान, वज्रयान, सहजयान इत्यादी धर्ममतांचा सहजसुलभ परंतु तांत्रिक व गूढ असा परिणाम समाजावर होत राहिला. यातून मूळ भारतीय जीवनात विविध धर्म, पंथ, मते यांचा एक विपरित परिणाम झालेला दिसून येतो. दुसऱ्या बाजूला इ. स. ७०० - ८०० पासूनच अनेक आक्रमकांनी भारतावर स्वाऱ्या केल्या. त्यामध्ये ग. महमूद, महमद घोरी आदींचा उल्लेख करता येईल. स्वाभाविकपणे भारतीय जीवनाला मुस्लिम धर्माचा परिचय होऊ लागला. मुळ भारतीय समाजव्यवस्थेवर या सर्व घटकांचा जो परिणाम झाला त्यामुळे संपूर्ण भारतीय समाज विस्कटून जाईल की काय अशी भिती निर्माण झाली. अशा परिस्थितीत नैतिक आदर्शांचा आग्रह धरून सर्व समाज घटकांना एका विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या आधारावर संघटित करण्याची गरज निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत गोरक्षनाथांसारख्या महायोग्याने भारतीय जीवनाला व समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. त्यासाठी व्यक्ती हा मूलभूत घटक समोर ठेवून संपूर्ण समाजस्थिती सर्वसमावेशक कशी होईल ह्या विचाराला प्राधान्य दिले. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाच्या निर्मितीमागे ही संपूर्ण तत्कालीन परिस्थिती कारणीभूत होती असे म्हणता येईल.

गोरक्षनाथानी त्यांच्या आधी होवून गेलेल्या ज्ञानपरंपरा विचारात घेतल्या. काही प्रमाणात त्यांचा स्वीकारही केला. तथापि, स्वत:ला व स्वत:च्या अनुभवाला पटेल असे कितीतरी बदल त्या मूळ परंपरेत केले. अद्वैत संकल्पनेचा स्वीकार त्यांनी केला. मात्र तो विचार शिवशक्ती सामरस्याशी जोडला. पिंडब्रह्मांडाची एकता त्यांनी प्रतिपादन केली. हे जर जीवनसाध्य मानले तर त्यासाठी आवश्यक असलेली योगसाधना, समर्पण बुद्धी, त्यातून निर्माण होणारी भक्ती अशा विविध विषयांची मांडणी करून त्यातून स्वत:च्या प्रज्ञेच्या आधारे एक समग्र जीवनदर्शन त्यांनी आपल्याला दिले. हे करताना ज्ञान, भक्ती, कर्म असे वेगवेगळे विषय आणि कप्पे न करता त्या सर्वांना एकत्र गुंफण्याचे काम गोरक्षनाथांनी केले. एका व्यापक भूमिकेतून त्यांनी आपले तत्त्वज्ञान सिद्ध केलेले आहे. समन्वय हे नाथसंप्रदायाचे वैशिष्ट्य होय. गोरक्षनाथांनी आपल्या तत्त्वज्ञानात या समन्वयाला सर्वोच्च महत्त्व देण्याचे काम केलेले आहे. ती भूमिका खालील सूत्रातून स्पष्ट होते.

सर्व दर्शनानां स्वरुपदर्शने समन्वयं करोति स: अवधूत योगी स्यात्।।

- सि.सि.प.उपदेश ६/२०

**अर्थ :** सर्व दर्शनांचा स्वस्वरुपात समन्वय करुन जो वागतो तो अवधूत. त्यामुळे इतर उपासना पंथांना विरोध करण्याचा प्रश्नच रहात नाही.

इ.स. च्या १३ व्या शतकापासून महाराष्ट्रात भागवत धर्माचा प्रचार व प्रसार सुरू झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये श्री. ज्ञानेश्वरांचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांनी त्यांच्या एकूणच विवेचनाला वैश्विक परिमाण प्राप्त करून दिले. हे त्यांचे स्वतंत्र असे वेगळेपण म्हणावे लागेल. इतर संतांनीही आपाल्या पद्धतीने हीच वैश्विक दृष्टी स्वीकारल्याचे दिसून येते. माणूस इथून तिथून एकसारखाच दिसत असला तरी त्यात मोठ्या प्रमाणात स्वभाव भिन्नता असते. त्याला दिशा दाखवण्याची गरज सर्व संतांनी प्रतिपादन केली. सर्व संतांच्या विचारामध्ये ईश्वरभक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे असूनही विविध संप्रदाय निर्माण झाले. प्रत्येक संप्रदायाचा अधिकारी पुरूष वेगळा! प्रत्येकाच्या आचार विचारात भिन्नता आढळून येत असे. मला या ठिकाणी एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे. ज्ञानेश्वरानंतरच्या गेल्या १ हजार वर्षाच्या कालखंडात सर्व संप्रदायांमध्ये एकता कधीच निर्माण झाली नाही. व्यक्तीच्या पातळीवरही समरसतेच्या भावनेचा अभाव दिसून येतो. मध्ययुगात व त्यानंतरही विविध सामाजिक आंदोलने चालू राहिली असेही इतिहास सांगतो. मात्र सर्व समाज घटकांमध्ये स्नेहपूर्ण संबंध व बंधुभाव निर्माण झाल्याचे दिसत नाही. आजअखेर हीच परिस्थिती दिसून येते. श्री. गोरक्षनाथांनी व्यक्तीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा विचार करून त्या आधारावर एक सबळ व प्रगत असा समाज निर्माण

करावा अशी भूमिका घेतली. त्यासाठी गोरक्षनाथांनी पिंड संवित्तिचा व साम्यरसतेचा आग्रह धरला होता. काळाच्या ओघात भारतीय समाजात एक विनाशकारी रोग उत्पन्न झालेला दिसतो. ''नीतिशून्य स्वार्थ'' असे त्या रोगाचे नामकरण करता येईल. आज हा रोग गणिती पद्धतीने वाढताना दिसतो आहे. या रोगावर काही उपाय असेल तर त्याचा शोध घ्यावा असा हेतू मी या प्रबंधात ठेवलेला आहे.

**८) श्री. ज्ञानेश्वरांचे ऐतिहासिक योगदान :**

कालौघामधे नाथसंप्रदायाचे जीवनव्यापी मौलिक तत्त्वज्ञान नीतिशून्य व स्वार्थी जीवनाच्या मांडणीत एका बाजूला पडू लागले होते. तत्त्वज्ञानाची मौलिकता व काळाची गरज या दोन्हीचा यथोचित मेळ घालण्याची किमया करणे हे एक आव्हानच होते व हे आव्हान श्री ज्ञानेश्वरांनी त्यांच्या निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताई या भावंडांच्या सहयोगात स्वीकारल्याचे दिसून येते. त्याची ऐतिहासीक नोंद अशी आहे की श्री. ज्ञानेश्वरांच्या पणजोबांना (श्री. त्र्यंबकपंत कुलकर्णी) प्रत्यक्ष गोरक्षनाथांचा अनुग्रह मिळालेला होता. त्यांचेनंतर श्री. ज्ञानेश्वरांचे आजोबा (श्री. गोविंदपंत) यांना श्री गहिनीनाथांचा अनुग्रह मिळाला होता. त्याच गहिनीनाथांचा अनुग्रह श्री. ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू श्री निवृत्तीनाथांना मिळाला. व त्यांचे मार्फत ही परंपरा पुढे चालू राहिली. यातून एक गोष्ट स्पष्ट होताना दिसते की निवृत्ती ज्ञानेश्वरांचे माध्यमातून जे दिव्य वैश्विक चैतन्य प्रगट झाले त्यामागे ही गोरक्षपरंपराच होती.

१) ही परंपरेतून संक्रमित झालेली गुरुकृपाच श्री गहिनीनाथांच्या तर्फे श्री निवृत्तिनाथांकडे आली. श्री निवृत्तिनाथ त्यांच्या अभंगात म्हणतात.

निवृत्ती गयनी कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्णनामे।।

नाथपंथाचा उगम शिवापासून! पण भगवान विष्णू मत्स्यरुपात उपदेश ग्रहण करतात. वारकरी पंथामधे शिवतत्त्व व विष्णुतत्त्व यांची एकरुपता जी मानली जाते त्याचा उगम वरील धारणेमधे आहे.

२) श्री ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याची रुपरेषाही त्यांचे तात्कालीन परिस्थितीचे निरीक्षण व अंत:प्रज्ञा या दोन घटकांनी निश्चित केली गेली असे दिसून येते. त्या अनुशंगाने त्यांनी नाथसंप्रदायात काही वैचारिक बदलही केले व काही नवीन धारणांची भरही घातली.

**बदलांचे बाबतीत :** अष्टांग किंवा षडंग योगाच्या अवघड वाटा चालण्याऐवजी सहज योगाचा स्वीकार करावा. याबद्दल ते ज्ञानेश्वरीत म्हणतात-

वांचूनी योगाचेनि बळे। अधिक काही मिळे। ऐसे नाही आगळे। कष्टचि तया।।

-ज्ञा. १२/५९

**अर्थ :** योगाच्या बळाने काही अधिक प्राप्ती होते असे नाही. तर यातना सोसाव्या लागतात.

म्हणोनि योगाचिया वाटा। जे निगाले गा सुभटा।
तया दु:खाचाचि वाटा। भागा आला।। - ज्ञा. १२/६९

**अर्थ :** म्हणून हे वीरा! असे योग साधन करण्यास जे निघाले त्यांच्या नशिबी दु:खाचा वाटाच आला.

म्हणोनि येर ते पार्था। नेणतीचि हे व्यथा। जे का भक्तिपंथा। वोटंगले।।
- ज्ञा. १२/७५

**अर्थ :** म्हणून पार्था! ज्यांनी भक्तिमार्गाचा स्वीकार केला त्यांना असे कष्ट सोसावे लागत नाहीत.

स्वत: ज्ञानेश्वर हे योगेश्वर होते हे अनेक अंगानी स्पष्ट झालेले आहे. पण त्यानी सर्व विषय सुसह्य व सामान्य माणसाच्या शक्यतेत आणून सोडला. त्यासाठी सोहं साधना व नामजप याचे महत्व ते विशद करतात.

नामजपयज्ञु तो परम। बाधू न शके स्नानादि कर्म।
नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रम्ह वेदार्थे।। - ज्ञा. १०/२३३

**अर्थ:** तो नामजप हा श्रेष्ठ असून ज्यास स्नानादि कर्मे बांधू शकत नाहीत, किंवा नित्यकर्मात व्यतय आणू शकत नाहीत. ज्या नावाने धर्म व अधर्म पवित्र होतात व वेदामधे ज्याला परब्रम्ह म्हणतात तो मीच आहे.

नामसाधनेतून व सोहंसाधनेतून देहस्थित शक्तींचा अनेक अंगानी विकास होत जातो व तो जेव्हा व्यापकतेच्या स्वरुपात साधकातून प्रगट होऊ पहातो तेव्हा तो त्या आदिशक्तीचा चिद्‌विलासच असतो. त्याचे स्वरुप अभेदभक्तियोगाचे असते.

३) श्री ज्ञानेश्वरांनी भक्तीस साध्य म्हणून स्वतंत्र मूल्य दिले. नाथपंथात भक्ती ही श्रेष्ठच होती. परंतू श्री ज्ञानेश्वरांनी भक्तितत्वास एक स्वतंत्र असे अधिष्ठान प्राप्त करून दिले. श्री ज्ञानेश्वरांनी नाथपंथास दिलेली ही सर्वात मोठी देणगी आहे. ही भक्ति 'ज्ञानोत्तर भक्ती' म्हणून ओळखली जाते. हीच ती अद्वैती भक्ती. अशा अवस्थेत ज्ञान व भक्ती एकरूप कशी होतात हे गोरक्षनाथांच्या 'योगबीज' ग्रंथामध्ये स्पष्ट झालेले आहे. या भक्तीचे ध्येय मोक्ष नसून 'भक्ति-प्रेम-साधना' मानले आहे. मोक्ष या पुरुषार्था ऐवजी भक्ती हा नवा पुरुषार्थ श्री ज्ञानेश्वरांनी स्वत:च्या अलौकिक जीवनातून सिद्ध केला आहे. श्री ज्ञानेश्वरांनी कर्म, ज्ञान, भक्ती, वैराग्य यांना कर्मयोगातच जिरवून 'क्रमयोग' ही काश्मिरी शैवागमातील पारिभाषिक संज्ञा परमार्थ विवरणासाठी वापरली.[१४] (संदर्भ : नाथ संप्रदाय उदय व विस्तार, पान ३७३,३७४)

अशा या परमप्रेमरूपा भक्तीतत्त्वावर भाष्य करण्यासाठी भगवद्गीता अध्याय १३ मधील सातव्या श्लोकातील 'आचार्योपासन' म्हणजे गुरूभक्ती या पदाचा आधार घेऊन श्री ज्ञानेश्वरांनी ३६९ ते ४५५ अशा ८१ ओव्या शब्दबद्ध केल्या आहेत व तीथेही त्यांना थांबायचे नव्हते असे पुढे वाचताना लक्षात येते. अशा भक्तीस केवळ मोक्षसाधन न समजता ''भक्ती हे एक असामान्य साध्य'' आहे. अशा साध्यात साधनांचा ठावच रहात नाही. ही भक्ती 'अद्वैत स्वरुपा' असून आपणच आपला भक्त, आपणच आपला शिष्य अशी ही स्वरुपसाधना म्हणजे ही सोपान महापूजाच असून भक्त ईश्वररुप तर होतोच पण तो 'ईश्वर' या संकल्पनेच्या पुढे निघून जातो. म्हणून श्री ज्ञानेश्वर अनुभवामृतात (अमृनानुभव) म्हणताहेत.

अ) देव देऊळ परिवारु! की जे कोरुनि डोंगरु।
तैसा भक्तिचा वेव्हारु। कां न व्हावा?।। - अमृतानुभव ९/४३

**अर्थ :** एकाच डोंगरात पाषाण कोरुन देव, देऊळ व परिवारातल्या इतर मूर्ती बनतात तसा भक्तीचा व्यवहार एकरुपतेत का होऊ नये?

याच विषयावर भाष्य करताना श्री ज्ञानेश्वर ९ व्या अध्यायात म्हणतात:

ब) तू मन हे मीचि करी। माझिया भजनी प्रेम धरी।
सर्वत्र नमस्कारी। मज एकाते।। - ज्ञा. ९/५१७

**अर्थ :** तू आपले मन माझ्याशी एकरुप करुन प्रेमाने भजन कर. आणि सर्व ठिकाणी मीच आहे ही धारणा धरुन नमस्कार कर.

क) ऐसा मिया आथिला होसी। तेथ माझिया स्वरुपा पावसी।
हे अंत:करणीचे तुजपाशी। बोलिजत असे।। - ज्ञा ९/ ५१९

**अर्थ :** ''असा माझ्या योगाने जेव्हा संपन्न होशील त्याचवेळा तू माझ्या स्वरुपाला पावशील. ही माझ्या अंत:कारणातील गुप्त गोष्ट मी तुला सांगितली आहे.''

ड) तरि झडझडोनि वहिला निघ। इये भक्तीचिये वाटे लाग।
जिया पावसी अव्यंग । निजधाम माझे।। - ज्ञा. ९/५१६

**अर्थ :** तरी झटदिशी वेगळा हो व ज्यायोगे माझ्या अविनाशी पदाला प्राप्त होशील त्या भक्तिमार्गाला त्वरित लाग.

४) श्री ज्ञानेश्वरांची ही भक्ति-प्रेम साधनाच भागवत धर्माच्या नवीन स्वरुपातून स्पष्ट होते. भागवत धर्माची बीजे वेदकाळापासून दिसतात. मध्ययुगीन काळात त्याचा अधिक विस्तार झाला. अज्ञ जनांना सुलभपणे आत्मज्ञान व्हावे म्हणून भगवंतांनी जे उपाय सांगितले त्यामध्ये 'भगवत' नाम महत्त्वाचे आहे.[१५]

(संदर्भ: श्रीमद्भागवत महापुराण खंड२/स्कंध ११/ अध्याय२/३४)

'भक्ती' या संबंधात श्रीमद्भागवत महापुराणमधील एक महत्वाचा संदर्भ:

भागवत दशम स्कंदामधे श्री कृष्णानी राजा मुचुकंदास असे सांगितले आहे की जर अंत:करणात भक्तीचे आंदोलन नसेल तर समाधी अवस्थेपर्यंत गेलेले मनही पुन्हः वासना अंशानुसार उसळी मारते.

अक्षीण वासनं राजन् दृष्यते पुनरुत्थितम्।।[१६]

(संदर्भ: श्रीमद्भागवत महापुराण खंड२/स्कंध १०/ अध्याय५१/६१)

नामस्मरण, कीर्तन, सत्संग, मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ ही भागवत धर्मातील वैशिष्ठ्ये पुढे वारकरी संप्रदायात स्थिर झाली. विष्णुस्वरुपी विठ्ठल हे ज्ञानेश्वरपंथाचे दैवत. हे दैवतच सृष्टीच्या सृजनतत्त्वाचे म्हणजे शिवतत्त्वाचे रहस्यमय स्वरुप आहे. हीच परंपरा नामदेव, एकनाथ, तुकाराम आदींनी पुढे चालवली.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगल।
कोणाही जिवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।
तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दु:ख जीव भोग पावे।। - तुकाराम

५) श्री मच्छिंद्रनाथांनी व श्री गोरक्षनाथांनी त्यांचा नाथपंथ जसा सर्व जातीजमातींना खुला केला, त्याचप्रमाणे श्री ज्ञानेश्वरांनी तीच परंपरा त्यांच्या भक्तिमार्गात स्वीकारली व त्यास 'पंथराज' म्हटले.

ऐसे विवरोनिया श्रीहरी। म्हणितले तिये अवसरी।
अर्जुना हा अवधारी। पंथराजु।। - ज्ञा ६/१५२

त्यामुळे वैश्विक ऐक्याच्या आदर्श विचारांचे मूळ रूजले गेले. त्याचा प्रत्ययच विविध जातीमधील संतांनी दिला. नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, सेवा न्हावी, चोखा महार या संतांच्या रुपानी भविष्यातल्या एका वेगळ्याच सर्वसमावेश अशा समाजाचे प्रतिनिधित्व केल्यासारखे झाले. भक्तितत्वातून व्यक्त होणाऱ्या चिद्विलासाचाच हा पुरावा आहे.

६) श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील चिद्विलासाची मांडणी अर्थपूर्ण अशी आहे.

**अमृतानुभव:**

आवडीचेनि वेगे। येकयेकाते गिळिती अंगे।
की द्वैताचेनि पांगे। उगळि ते आहाती।। - प्र. 'शिवशक्तिसमावेशन'/३

**अर्थ :** आवडीच्या ओढीने तो दोघे एकमेकाना इतकी घट्ट मिठी मारतात की एकमेकाना जणू ते गिळतात असे वाटते. आनंदासाठी एकजण दुसऱ्याचे शरीर आपल्या शरिरातून बाहेर काढतो आहे असे वाटते. चैतन्य व जडद्रव्याची ही एकरुपता आहे. (matter. Energy matrix)

तया आत्मयाच्या भाखा। न पडेचि दुसरी रेखा।।

जही विश्वा अशेखा। भरला आहे।। - अमृ./अज्ञानखंडन/१४६

**अर्थ :** जरी हे भेदाने भरलेले जग समोर भासमान होत असले तरी आत्मस्वरुपाच्या ठिकाणी द्वैताची रेषा उमटत नाही. तेथे द्वैत नसते.

**चांगदेव पासष्टी :**

बांधयाचिया मोडी। बांधा न होनि गुळाची गोडी।।

तयापरी जग परवडी। संवित्ति जाण।। १४

**अर्थ :** गुळामधे असलेली गोडी त्याची ढेप केल्याने गोडीची ढेप होत नाही किंवा ढेप मोडल्याने गोडी मोडत नाही. त्याप्रमाणे जगात अनेक प्रकारची द्वैत प्रचीती आली तरी एक परमात्माच आहे. द्वैत म्हणून पदार्थच नाही.

**हरिपाठ :** वेदशास्त्राचा निर्णय म्हणून हरिपाठातला अभंग-

एक हरि आत्मा जीवशिवसमा। वाया तू दुर्गमा न घाली मन।

ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ। भरला घनदाट हरि दिसे।। - ह.पा./अभंग२/३,४

**अर्थ :** श्री हरी व आत्मा एकच आहेत. एकच श्रीहरी शिव बनला आहे म्हणून अवघड साधनमार्गात मन घालू नकोस. हरीचे नामस्मरण हाच माझा नित्य पाठ आहे कारण श्री हरीच सर्वत्र भरभरुन राहिला आहे.

**ज्ञानेश्वरी :** अनेक ओव्या आहेत. उदा. दाखल दोन ओव्या घेतल्या आहेत.

येऱ्हवी मी नसे ऐसे। काय वस्तुजात असे?

पाहे पां कवण जळरसे। रहित आहे? - ज्ञा.अ. ७/ १५९

**अर्थ :** मी ज्यात नाही अशी एक तरी वस्तू आहे का? पहा की कोणतेही पाणी रसविरहित आहे का?

पवन कवणाते न शिवेचि? आकाश कें न समायेचि।

हे असो एक मीचि। विश्वी असे।। - ज्ञा. अ. ७/१६०

**अर्थ :** वारा कोणाला स्पर्श करत नाही? आकाश कोठे सामावत नाही? असो. अवघ्या विश्वात मीच एकटा भरलेलो आहे.

वर उधृत केलेले उल्लेख स्पष्टपणे शिवशक्तीचे अभेद पण स्पष्ट करत असल्यामुळे नाथसंप्रदायाची चिद्‌विलासवादाची भूमिका स्पष्ट होते.

७) चिद्‌विलासाचे जे सुरम्य दर्शन श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्‌मयात दिसून येते ते वेदवाङ्‌मयात 'सिध्दांत' व 'अटल सत्य' अशा स्वरुपात आलेले आहे. 'सर्वं खल्विदं ब्रम्हं', किंवा 'एकमेवाद्वितीय ब्रम्ह' या सूत्रांमधून ब्रम्हाचे एकमेव सत्य व परिपूर्ण असे स्वरुप व अशा

ब्रम्हतत्वाला 'बहुस्याम् प्रजायैयेति'. (तैत्तिरीय उपनिषद २.६) म्हणजे स्वत:च प्रजा होण्याची इच्छा होऊन हा सर्व प्रपंच दिसू लागला. म्हणजे निर्गुण सगुण झाले व शिवच सर्वरुप झाला. म्हणून श्री ज्ञानेश्वर भाष्य करताहेत-

एऱ्हवी मी तरी कैसा। मुखाप्रति भानु का जैसा।।
कही दिसे न दिसे ऐसा। वाणिचा नव्हे।। - ज्ञा. अ. ९/६३

**अर्थ :** सूर्य जसा समोरच असतो तसाच मी नेहमी समोरच असतो. सूर्य दिवसा असतो रात्री नसतो असा मी नाही.

हे अव्यक्तपणे थिजले। तेचि मग विश्वाकारे वोथिजले
तैसे अमूर्त मूर्ति मियां विस्तारले। त्रैलोक्य जाणे। - ज्ञा. अ. ९/६६

**अर्थ :** अव्यक्त अवस्थेत गोठलेले असे माझे रुपच विश्वाकार घेते. निर्गुण असून साकार असे मी सर्व त्रैलोक्य व्यापले आहे.

श्री ज्ञानेश्वरीतील वरील उल्लेख म्हणजे एकोहं अशा शिवाचा बहुपणाचा उत्सवच असल्यासारखे होते. तर अमृतानुभवात १० प्रकरणात ८०७ ओव्यामधे उपमा, दृष्टांत यांची न थांबणारी मालिकाच आहे. त्यात आत्मतत्त्वाची सखोल अनुभूती गांभिर्यपूर्ण पण शब्दालंकारांच्या सजावटीत मांडून वाङ्मयास परतत्त्वाचा स्पर्श असेल तर ते वाङ्मय 'अक्षर' वाङ्मय कसे होऊ शकते याचीच ते साक्ष देतात. ते म्हणतात

वाचे बरवे कवित्व। कवित्वी बरवे रसिकत्व।
रसिकत्वि परतत्त्व। स्पर्शू जैसा।। - ज्ञा. अ. १८/३४७

**अर्थ :** वाणीत कवित्व असावे, त्यात रसिकता असावी व त्या रसिकतेत आत्मतत्त्वाचा स्पर्श असावा.

अशा अवस्थेत काय घेडते? तर

माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। - ज्ञा. अ. ६/१४

**अर्थ :** माझे हे शब्द प्राकृत (मराठी) आहेत हे खरे. पण ते अमृतालाही पैजेने जिंकतील अशी रसभरित अक्षररचना मी करीन.

ऐका रसाळपणाचिया लोभा। की श्रवणीचि होति जिभा।
बोले इंद्रिया लाभे कळंभा। एकमेका।। - ज्ञा. अ. ६/१५

**अर्थ :** अक्षरांच्या रसाळपणाच्या आशेने कानच जिभा होतील. अशा शब्दांमुळे इंद्रियांच्यात असे भांडण लागेल.

सहजे शब्दु तरी विषयो श्रवणाचा। परी रसना म्हणे हा रस आमुचा।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा। हा तोचि होईल।। - ज्ञा. अ. ६/१६

**अर्थ :** शब्द हा खरोखर कानाचा विषय आहे. पण जीभ म्हणेल की हा आमचा 'रस -विषय' आहे. नाकाला वाटेल की हा आमचा 'गंध विषय' आहे. असे सर्व भास या माझ्या शब्दचातुर्यामुळे होतील.

श्री ज्ञानेश्वरांची ही इंद्रियांचे गुणधर्म बदलण्याची शक्ती व तीहि शब्दस्पर्शातून, ही कशाची द्योतक आहे? ''अरुपाचे रुप शब्दातून दाखवीन!'' हा अहंकार नसून दिव्यानुभूतीचा शब्दातीत अधिकार आहे. अशा वेळी ते असामान्यही आहेत, सामान्य मानव पण आहेत व नाथांचे, भगवान श्रीकृष्णाचे व कृष्णनामाचे अधिकारी व निवृत्तीनाथांचे दासानुदास पण आहेत. प्रकृतीच्या सर्व प्रकारच्या नृत्याविष्कारात ते नृत्यशिक्षकपण आहेत, नृत्यकारपण आहेत व प्रेक्षकपण होऊन जीवनाची स्वीकृती स्वीकारत नियतीलाही मान व न्याय देतात. अशा दिव्य जीवनाचे मंगल दर्शन घडवणारे दार्शनिक श्री ज्ञानेश्वरांचे आत्मविश्वासाचे गंभीर शब्द कसे आहेत? तर

तेणे कारणे मी बोलेन। बोली अरुपाचे रुप दावीन।
अतींद्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवी।। - ज्ञा. अ. ६/३६

**अर्थ :** त्या योगाचे मी बोलेन, बोलण्यातून सर्वांना निराकार वस्तू प्राप्त करुन देईन, व इंद्रियातीत वस्तू इंद्रियांकडून भोगवीन. वाणीच्या अधिकाराबरोबरच तिचा चातुर्याने उपयोग करण्यामागचा हेतूही ते स्पष्ट करतात.

तैसे आध्यात्मशास्त्री इथे। अंतरंगचि अधिकारिये।
परी लोकु वाक्चातुर्ये। होईल सुखिया।। - ज्ञा. अ. १८/१७४९

**अर्थ :** जे अंतरंगाचे अधिकारी आहेत. त्यांना इथे आध्यात्मशास्त्र तर मिळेलच पण जे सर्व सामान्य आहेत ते माझ्या वाणीच्या चातुर्यानेच समाधानी होतील.

भगवद्गीतेवर भाष्य करताना मूळ ग्रंथ बाजूला ठेवलात तरी चालेल. मी तुम्हाला ''गीतेविण रंगू दावी'' असे ते म्हणतात. - ज्ञा. अ. १८/१७४१

ज्ञानेश्वरीमध्ये वाङ्मयातील नाना प्रकार म्हणजे उलटबाँसी, विरोध, सौंदर्य, गेयता, संवादात्मकता, शांत व शृंगार रस, अलंकार, रुपके, उपमा, अनुप्रास, छंद, असे सर्व प्रकार मुक्तपणे व्यक्त झालेले आहेत. ज्यांच्यापुढे प्रत्यक्ष काव्यशास्त्र हे नृत्यझंकार सादर करु इच्छिते अशा ईश्वररुप कवीविषयी श्री समर्थ रामदासांनीही आपली तरल भावना व्यक्त करताना फुलांच्या पाकळ्या पसराव्यात अशी शब्दांची मांडणी केली आहे.

आता वंदू कवीश्वर। शब्दसृष्टीचे ईश्वर।
नातरी हे परमेश्वर। वेदावतारी।। - दास.द. १/स. ७/ओ. १
कवी सृष्टीचा अलंकार । कवी लक्ष्मीचा शृंगार।
सकल सिध्दिचा निर्धार। ते हे कवी।। - दास. द. १/स. ७/ओ.१८

**दोन्हीचा अर्थ:** शब्दसृष्टीचे ईश्वर असणाऱ्या अशा कवींना मी नमस्कार करतो. असे कवी वेदस्वरुप परमेश्वरासारखेच आहेत. असा कवी या सृष्टीचा अलंकार, लक्ष्मीचा शृंगार असून त्यांचेतून सर्व सिध्दींचा निश्चयच व्यक्त होत असतो.

चिद्‌विलासवाद हे परमार्थ अभ्यासाचे फलस्वरुप दर्शन आहे. आणि त्याचे साधन आहे 'श्री गोरक्षनाथांचे योगशास्त्र.'! व त्या सर्व प्रक्रियेतील गुरुतत्त्वाचे अनन्यसाधारण महत्व हे साधकाचे दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. परमार्थपरंपरेत गुरुमार्गात साधन गुप्त ठेवण्याचा प्रघात हा व्यक्तिपरत्वे पिंडभिन्नता असल्यामुळे रुढ होत आला असला तरी त्या त्या व्यक्तीस साधन सिध्द करण्याची युक्ती सद्‌गुरुकडूनच मिळू शकते. ही जी युक्ती आहे त्याचे विवरण गीता अध्याय ६ वरील भाष्यात श्री ज्ञानेश्वर करतात. व सद्‌गुरुस्मरणाचा चमत्कार काय काय प्रक्रिया घडवून आणतो ते स्पष्ट करताना ते म्हणतात:

मग तेथ आपण। एकाग्र अंत:करण।
करुनि सद्‌गुरु स्मरण। अनुभविजे।।  - ज्ञा. अ. ६/ १८६

**अर्थ :** त्या ठिकाणी आपण एकाग्र अंत:करण करुन सद्‌गुरुंचे स्मरण करावे व अनुभव घ्यावा असा सरळ अर्थ आहे. परंतु नाथसंप्रदायात याचा जरा वेगळ्या प्रकारे अर्थ लावला जातो. अंत:करण एकाग्र करु म्हणून होत नाही. ही क्रिया अप्रत्यक्षपणे करुन घ्यायची असते. त्यासाठी सद्‌गुरुस्मरण अत्यंत श्रध्देने व प्रेमाने केले की एकाग्रता होऊ लागते. व त्याचा अनुभव आपण घेऊ शकतो.

जेथे स्मरतेनि आदरे। सभाह्य सात्विक भरे।
जव काठिण्य विरे। अहंभावाचे।।  - ज्ञा. अ.६/१८७

**अर्थ :** त्याचप्रमाणे गुरुस्मरणाने अहंकाराचा कठिणपणा इतका नाहीसा होतो की ते ह्रदय अष्टसात्विकभावाने भरुन जाते.

अहंकाराचा कठिणपणा गुरुस्मरणाने इतका कमी कमी होत जातो की त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून -

विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। ह्रदयामाजी।।  - ज्ञा. अ. ६/१८८

**अर्थ :** विषयांचा विसर पडू लागतो. इंद्रियांची, विषयांची हाव व तळमळ नाहीशी घेऊ लागते व मनाची ह्रदयातच घडी पडते.

ऐसी शरिराबाहेरलीकडे। अभ्यासाची पाखर पडे।
तव आत त्रायमोडे। मनोधर्माची।।  - ज्ञा. अ. ६/ ओ. २११

**अर्थ :** अशा प्रकारे शरिराच्या बाहेरुन अभ्यास सुरु झाला की आतल्या मनाच्या विविध धर्माचे बळ नाहीसे होते. नाथसंप्रदायातील हठयोगाचा आग्रह कमी करण्यावर व भक्ती व

समर्पण हयावर भर देतानाच श्री ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायातील गुरुतत्वाच्या महत्ततेचे विश्लेषण वरील प्रकारे करुन सर्व योगाभ्यासाचे मागे गुरुंचे मार्गदर्शन व पाठबळ किती महत्वाचे आहे व त्या तत्वाचे कार्य सूक्ष्मस्वरुपात देहमाध्यमात कसे चालते हे थोडक्यात स्पष्ट केले आहे. चिद्‌विलासाचा यथार्थ अनुभव घेऊ इच्छिणारास नाथसंप्रदायाची ही युक्ती माहित असणे आवश्यक आहे.

चिद्‌विलासाबाबत इतर काही संदर्भ -

१) ऋग्वेदीय प्रार्थना :

ॐ आपो ज्योती रसोमृतं ब्रम्हभूर्भुव: स्वरोम्।।

**अर्थ :** सर्वव्यापी, सर्वप्रकाशक सर्वोत्कृष्ट नित्यमुक्त सत्‌चित् आनंदस्वरुप ॐ स्वरुप जे ब्रम्ह आहे तेच मी आहे. (व हेच ब्रह्म सर्व जगाचे अधिष्ठान आहे)

२) कुराणमधील पूर्णाद्वैतवाद:

They are in error who refuse to ascribe reality to the seen world. Islam rejects the view of maya as utterly false and Kurf. Quran says that the universe was created" Bil-Hagg which means it is true & has a purpose. Creation is not a toy or a dream.[१७] (Ref: Origin of Life / The Quran on Man & Nature, Page 35)

३) पंतमहाराज बाळेकुंद्री :

विश्व हे केवळ सत्तारुपी आत्म्याचा स्फूर्तिविलास आहे. "It is a circle which has no cirumference but has centre every where"[१८]

(संदर्भ : श्री दत्तप्रेमलहरी पुष्प ७, पान १४)

४) पश्चिमात्य तत्त्वज्ञानात (Metaphysics) Pantheism व Panentheism अशा प्रकारे पूर्णाद्वैताची मांडणी दिसून येते Pantheism मधे विशिष्ट (Particular) व वैश्विक (Universal) असे दोन भाग असले तरी 'भाग ईश्वररुप असणे' वा 'सर्व जगच ईश्वररुप असणे' असाच फक्त फरक आहे. स्टॉइक्स (Stoics) म्हणतात की जगत् आत्मा हा ईश्वररुप आहे. (world soul as God) नीतिशास्त्रीय जगदीश्वरवाद (Ethical Pantheism) मधे "Moral order that runs through the universe represents the Divine being. Dr. Krause tried to reconsile Theism and Pantheism and called it Panentheism. परमेश्वर जगाच्या वर पण असतो व जगात पण असतो.[१९] (Ref: Introduction to Indian Phi., Page 366)

## ९) समारोप :

श्री. गोरक्षनाथांच्या वाङ्‌मयाभ्यासातून व चिंतनातून अभ्यासकाला एका सर्वसमावेशक व समन्वयात्मक अशा समर्थ जीवनाचे दर्शन होते. ही जीवनाची परिशुद्धता व व्यापकता मानवी जीवनातील जागतिक स्तरापर्यंतच्या सर्व समस्यांना उत्तर ठरू शकेल असा

विश्वास श्री. गोरक्षनाथांनी योगतंत्राच्या माध्यमातून निर्माण केलेला दिसून येतो. योगतंत्र ही रूपांतरणाची प्रक्रिया आहे. जीवनातील विषय व व्यवहार यासाठी कर्मतत्त्व (अविद्या) व पारलौकीक जीवनासाठी ज्ञानतत्त्व (विद्या) या औपनिषदिक (ईशावास्योपनिषद) सिद्धांतांचा आधार घेऊन समत्व बुद्धीयोग साधणे म्हणजेच योगतंत्रात्मक कर्मकौशल्य होय. आगमतंत्रात्मक साधनेतून अशरीरी तत्त्वाचा वेध घेण्याचे शास्त्र 'गोरक्षयोगात' निश्चित केले गेलेले आहे. त्याच वेळी या व्यक्तीगत साधनेचा उद्देश परमतत्त्वाचा अनुभव व ऐहिक जीवनाचा आदर असा दुहेरी ठेवल्याचे दिसून येते. ऐहिक जीवन मूल्यांकित व निरामय होण्यासाठी गोरक्षनाथांनी शिवमुखातून व्यक्त झालेल्या शैवागमतत्त्वाची मांडणी शास्त्ररूपात करून भौतिक जीवन हे शिवचैतन्याचे प्रगटीकरण असल्याने ते बंधनास कारण ठरत नाही असे ठामपणे मांडले. त्यामुळे इहलोकाकडे बघण्याचा सामान्य माणसाचा आयामच बदलून गेला. बदल हा जगाचा स्थायीभाव असला तरी ते क्षणभंगूर नाही तर परिवर्तनशील आहे. त्यामुळे त्याचे सत्यत्व आबाधित राहते. श्री. गोरक्षनाथांनी क्रियाशून्यतेला व उदासीनतेला पूर्णपणे अमान्य केलेले आहे. त्यांच्या ''गोरखबोध' मधून प्रत्येक व्यक्तीने स्वत:चे व लोकजीवनाचे उत्तरदायित्व स्वीकारण्याचा आग्रह धरलेला आहे. तसाच विश्वात्मक एकतेच्या अनुभवाचे पसायदान स्वीकारण्याचा आग्रहही गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञान परंपरेत केंद्रस्थानी दिसून येतो. त्यांचे तत्त्वज्ञान समग्रलक्षी असून ते खऱ्या अर्थाने जीवन घडवू शकते. कारण चिद्वाद व मानवी जीवन यात ते फारकत करत नाहीत. ''सर्वदर्शनानाम् स्वस्वरूपदर्शने समन्वयम् करोति'' या त्यांच्या सिद्धांतातून समत्त्वयोगातून पूर्ण विकासाकडे जाण्याचा मार्गच दाखवला जातो. त्यासाठी अज्ञेयवादाची (Agnosticism) तसेच विज्ञानवादाची (Idealism) मांडणी करत अंतिमत: वास्तववाद (Realism) स्वीकारून आयुष्य जसे आहे तसे स्वीकारून त्यास सामोर जा व जीवन यशस्वी व आनंदी करा असा रचनात्मक विचार देताना श्री. गोरक्षनाथ गोरखवाणीमध्ये म्हणतात.

सुसबदे हीरा बधिले अवधू जिभ्या करि टकसाल।
अवगुनमधे गुन करिले तो चेला सकल संसार।। - गो. वाणी/६१

अवगुणांनी भरलेल्या जगात साम्यावस्थेचे महत्त्व विषद करणारेच हे सूत्र आहे.

श्री गोरक्षनाथांच्या संबंधीत प्राचीन वाङ्मयामध्ये एक बाब विशेषकरून दिसून येते की, 'द्वैताद्वैतविलक्षण' म्हणजेच 'विलक्षणअद्वैत' असा शब्दप्रयोग 'चिद्विलास' या अर्थानेच केलेला आहे. उदा. श्री गोरक्षनाथांचे परात्पर गुरू श्री दत्तात्रेय यांच्या 'अवधूतगीते'मध्ये 'समतत्त्वं न जानाति द्वैताद्वैत विलक्षणम्' असे सूत्र अध्याय १ मध्ये आहे. अशीच मांडणी गोरक्षवाङ्मयात इतरत्र (उदा. सि.सि.संग्रह) केलेली दिसून येते. विलक्षणअद्वैताचा हाच विचार श्री ज्ञानेश्वरांनी 'चिद्विलास' अशा शब्दातून त्यांच्या

वाङ्मयात रूढ केलेला दिसून येतो. एकाच अर्थाच्या मांडणीतील हा फरक अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. हे विश्‍व ही शिवलीला आहे व ती शब्दसामर्थ्याच्या पलिकडे असली तरी शब्दमाध्यमातून ती वेगवेगळ्या प्रकारे अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न झालेला आहे. अशा द्वैताद्वैतविलक्षण अवस्थेची प्रत्यक्ष उदाहरण स्वरुप चिद्‌विलासाची मांडणी ज्ञानेश्‍वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ व अभंगातून श्री ज्ञानेश्‍वरांनी केली. त्यातून ईश्‍वरी लीलांचे दर्शन घडत राहते. त्याच्या मननाने व अभ्यासाने व्यक्ती गीता अध्याय १६ मधील अनेक गुणांनी भरु लागतेच. पण आत्मतत्त्वचिंतन व अनुभूती हा जो केंद्रिय विषय त्यांच्या वाङ्मयात आहे त्यामुळे व्यक्ती ही सजग होते, स्वत:कडे तटस्थपणे पाहू लागते, 'मी' च्या शोधात वाट्याला येणारी तगमग, मानलेल्या दैवताच्या प्रेमळ सहवासात व भावशक्तीच्या आधारावर भक्त सोसत रहातो. त्यातूनच त्याला जीवनाचा अर्थ उमगू लागतो. विश्‍वव्यवस्थेमधे एक व्यक्ती ती काय? पण श्री ज्ञानेश्‍वरांनी नाथसंप्रदायी तत्त्वज्ञानाचे जे पुनरुज्जीवन व विस्तार केला त्यामुळे सामान्य मनुष्यही स्वत:कडे व सभोवती एका वेगळया व व्यापक दृष्टीने पाहू लागला. सलगपणे भोवती पहाणे व त्याचवेळी 'मी' च्या शोधाची वाट हुडकावी असे वाटणे व त्या अनुशंगाने जीवनाची मांडणी व दैनंदिन व्यवहार होणे जरूर आहे असा व्यापक विचार सर्वदूर पसरत जाऊन ज्ञानेशांच्या या विश्‍वव्यापक विचारांमुळे मध्यंतरीच्या काळात विस्कळित झालेला नाथसंप्रदाय पुन्हः भक्कम पायावर स्थिर झाला. त्यामुळे श्री गोरक्षनाथांनी त्यांच्या असाधारण कर्तृत्वाने जसे एक युगप्रवर्तन केले तसेच श्री ज्ञानेशांनीही त्या युगप्रवर्तनास एक वेगळीच बैठक व तत्त्वज्ञानाचा आधार देऊन मानवी जीवनास व्यापक अशा चैतन्यशक्तीच्या अभिव्यक्तीचे मूल्य प्रदान केले.

नाथसंप्रदायातील तंत्र, मंत्र व यंत्र यासाठी **परिशिष्ट क्र. १** पहावे.

## १०) संदर्भ व टीपा :


१. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार - डॉ. प्र. न. जोशी, प्रकाशक - अंजली पब्लिशिंग हाऊस - पुणे, २००४.

२. World Famous Religions – Rajendra Kumar Family Books Pri. Ltd., Delhi, 1990.

३. सिद्धसिद्धांतपद्धति - स्वा. द्वारकादास शास्त्री चौखंबा विद्याभवन प्रकाशन, २००६.

४. One-Two-Three to Infinity – George Ganmow, Mentor Books, New York, 1955.

५. Book of Knowledge, Dictionary of Science – E. B. Uvarov, Penguin Books, London, 1959.

६. Technique of Opening the Third Eye – Kumarswami, Tapovan Publication, Dharwad, 1985.

७. Introduction to Indian Philosophy – Chatterji & Dutta, S. Kanjilal Calcutta University Press, 1960.

८. Critical History of Modern Philosophy –

९. तत्रैव.

१०. तत्रैव.

११. ईषादि नौ उपनिषद् - तौतिरीयोपनिषद, गीता प्रेस, गोरखपूर, सं. २०६०.

१२. Basis of Yoga – Yogi Aravind – All India Book, Pondicherry, 1985.

१३. महार्थ मंजरी - संपादन - रामलाल श्रीवास्तव, गोरखनाथ मंदीर प्रकाशन, गोरखपूर, सं. २०४४.

१४. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार - डॉ. प्र. न. जोशी, प्रकाशक - अंजली पब्लिशिंग हाऊस - पुणे, २००४.

१५. भागवत महापुराण - गीता प्रेस, गोरखपूर, सं. २०६५.

१६. तत्रैव.

१७. Origin of Life – Ibrahim Syed, Islamic Research Foundation, U.S.A.

१८. श्री दत्तप्रेमलहरी - पंतमहाराज बाळेकुंद्री, पंत वाङ्मय प्रकाशन मंडळ, बेळगाव, २००३.

१९. Introduction to Indian Philosophy – Chatterji & Dutta, S. Kanjilal Calcutta University Press, 1960.

# संदर्भ ग्रंथ सूची

## मराठी संदर्भ ग्रंथ -


१. अमरौघप्रबोध - श्री. गोरक्षनाथ, संपा.- डॉ. के. आर. जोशी, सिद्धयोग प्रकाशन, २००१.

२. अमनस्कयोग - श्री. गोरक्षनाथ, विनयानंद, विनयानंद चॅरिटेबल होम, हुपरी, कोल्हापूर, २००२.

३. आद्यशंकराचार्य स्वामी अपूर्वानंद - रामकृष्ण मठ, नागपूर, १९९५.

४. ओशो पातंजल योग - आचार्य रजनीश, जीवन जागृती केंद्र, पुणे, १९९५.

५. अभ्यासाची पाखर पडे - शि. शां. कवडे, श्री. वामनराज प्रकाशन, पुणे, २००३.

६. उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपण - डॉ. आर. व्ही. वर्तक, वर्तकाश्रम प्रकाशन, पुणे, १९९०.

७. ईषादिनौउपनिषद - ह. गोयंदका, गीता प्रेस गोरखपूर, सं. २०६० वि.

८. कल्पवृक्षातळी - स्वामी मुक्तानंद, गुरूदेव सिद्धपीठ, गणेशपुरी, ठाणे, १९८६.

९. गीतारहस्य - लो. टिळक, १९१५.

१०. गुरूचरित्र - सरस्वती गंगाधर, अनमोल प्रकाशन, पुणे, १९९२.

११. गुरूदेव आर. डी. रानडे चरित्र आणि तत्त्वज्ञान - शं. गो. तुळपुळे, यशवंत प्रकाशन, पुणे, १९८३.

१२. गोरक्षनाथ सूत्र्यभाष्ये - ओशो, जीवन जागृती केंद्र, पुणे, १९८०.

१३. गोरखवाणी और गोरखयोग - श्री. गोरक्षनाथ, संपा. योगी यतींद्रनाथजी, रणधीर प्रकाशन, हरिद्वार, २००५.

१४. गोरखबानी (हिंदी) - श्री. गोरक्षनाथ, संपा. श्री. रामलाल श्रीवास्तव, गोरखनाथ मंदीर, गोरखपूर, सं. २०५१. वि.

१५. गोरखपद्धति - श्री. गोरक्षनाथ, संपा. महिधर शर्मा, खेमराज-कृष्णदास प्रकाशन, मुंबई, सं. २०६२ वि.

१६. गोरक्षसिद्धांत संग्रह - संपा. श्री. रामलाल श्रीवास्तव, गोरखनाथ मंदीर, गोरखपूर, सं. २०३६ वि.

१७. गोरखतंत्र - तांत्रिक बहल, रणधीर प्रकाशन, हरिद्वार, २००७.

१८. गोरखनाथ चरित्र - मोहित शर्मा, आनंद प्रकाशन, दिल्ली.

१९. गोरखनाथ शाबरविद्या - रघुवंशी प्रकाशन, गजानन बुक डेपो, मुंबई-७५.

२०. गोरक्षशतक (हिंदी) - श्री. गोरक्षनाथ, संपा. रामलाल श्रीवास्तव, गोरखनाथ मंदीर, गोरखपूर, सं. २०३८ वि.

२१. चांगदेव पासष्टी - किसनमहाराज साखरे, यशोधन प्रकाशन, आळंदी-पुणे, २००१.
२२. चैतन्यधारा - प्रा. गुरूनाथ मुंगळे, गायगौरी प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.
२३. जे. कृष्णमूर्ती जीवनभाष्ये - जे. कृष्णमूर्ती (अनु. विमलाबाई देशपांडे), चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९९५.
२४. जे. कृष्णमूर्ती जीवन आणि जीवनदृष्टी - भां. ग. बापट, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९९४.
२५. जीवनाचे भाष्यकार जे. कृष्णमूर्ती - कृष्णप्रेमी, के. भि. ढवळे प्रकाशन, १९९०.
२६. ताजुद्दीनबाबा - इंटरनेट प्रिंट.
२७. तत्त्वज्ञान मासिक - पांडुरंगशास्त्री आठवले, सद्‌विचार दर्शन ट्रस्ट, मुंबई.
२८. दासबोध - श्री. रामदास, गीता प्रेस गोरखपूर, २००६.
२९. दत्तप्रेमलहरी - श्री. पंत महाराज बाळेकुंद्रीकर, श्री. पंत वाङ्‌मय प्रकाशन मंडळ, बाळेकुंद्री, बेळगाव, १९९९, २००३.
३०. दिव्यामृतधारा - बाबामहाराज आर्वीकर, के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, २००७.
३१. दैवीवाणी - स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ प्रकाशन, नागपूर, १९८२.
३२. धवलगिरी - न्यायरत्न धुंडीराज शास्त्री विनोद, प्रा. डॉ. व्ही. डी. गोखले प्रकाशन, पुणे, १९६०.
३३. नीतिमीमांसा - प्रा. चौधरी, ए. बी. मुरकुटे विद्या प्रकाशन, नागपूर, १९६२.
३४. नवनाथ भक्तिसार - धुंडीराज मालु कवी, आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे, १९९६.
३५. नाथसंप्रदाय - उदय व विस्तार - डॉ. प्र. न. जोशी, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००४.
३६. नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर - डॉ. के. डी. भिंगारकर, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, २००७.
३७. नवविधाभक्तियोग - बाबामहाराज आर्वीकर, माधव स्वामी, श्री. क्षेत्र टाकळी, मोक्षधाम प्रकाशन, माचणूर, २००३.
३८. नारद भक्तिसूत्रे - चं. वा. दांडेकर, सारथी प्रकाशन, पुणे, १९८७.
३९. नित्यनैमित्तिक उपासना - वि. के. कुलकर्णी - गोंदवलेकर महाराज आरती मंडळ, कराड, २००२.
४०. परमार्थपथ - स्वामी स्वरूपानंद सरस्वती, श्री माता कंप्युसिस प्रा. लि., वाराणसी, सं. २०६०.

४१. पावसचा प्रेमदीप - स्वामी सत्यदेवानंद सरस्वती, स्वरूपानंद सेवा मंडळ, पावस प्रकाशन, १९९१.
४२. पातंजल योगसूत्रे - स्वामा विवेकानंद, रामकृष्ण प्रकाशन, मद्रास.
४३. पातंजल योगदर्शन - ह. गोयंदका, गीता प्रेस गोरखपूर, सं. २०६४. वि.
४४. प्रेमावतारी संत - डॉ. एम. बी. जोशी, अवधूत प्रकाशन, कोल्हापूर, १९९४.
४५. भजगोविंदम् - शंकराचार्य संपा. ओशो, जीवन जागृती केंद्र, पुणे, १९९३.
४६. भागवतप्रबोध - श्री. स्वरूपानंद सरस्वती, निर्मलस्वरूप धर्माथ न्यास प्रकाशन, कलकत्ता, सं. २०६०.
४७. भागवतमहापुराण - गीता प्रेस गोरखपूर, सं. २०६५.
४८. भगवतगीता श्लोकार्थ संगती - शं. गो. तुळपुळे, यशवंत प्रकाशन, पुणे.
४९. मरौ है जोगी मरो - ओशो, जीवन जागृती केंद्र, पुणे, १९८०.
५०. मंत्रशास्त्र - द. शं. केळकर, प्रका. आर. व्ही. रघुवंशी, दादर, मुंबई.
५१. महार्थमंजरी - श्री. गोरक्षनाथ, संपा. रामलाल श्रीवास्तव, गोरखनाथ मंदीर, गोरखपूर, सं. २०४४ वि.
५२. माणूस नावाचा संत - रमेश जोशी, बापूसाहेब परूळेकर प्रकाशन, मुंबई, १९८९.
५३. मुक्तिगाथा महामानवाची - प्रा. शिवाजीराव भोसले, विजयंता प्रकाशन, पुणे, १९७३.
५४. यंग इंडिया मुखपत्र - वर्धा आश्रम, १९२५.
५५. योगदर्शन भाग १, २ व ३ - ओशो, जीवन जागृती केंद्र, पुणे, १९९३, १९९५.
५६. योगीकथामृत - स्वामी योगानंद, योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया, २००४.
५७. योगविद्या - श्री. शं. खानवेलकर, यशवंत प्रकाशन, पुणे, १९७०.
५८. योगबीज - श्री. गोरक्षनाथ, संपा. डॉ. के. आर. जोशी, श्री. वासुदेव प्रकाशन, पुणे.
५९. राजयोग - स्वामी विवेकानंद रामकृष्ण प्रकाशन, मद्रास, १९८०.
६०. विज्ञान इतिहास -
६१. शरीर साक्षात परमेश्वर - वामनराव पै, नाथसंप्रदाय मंडळ, मुंबई, २००३.
६२. शिवयोग और प्रार्थनायोग - डॉ. भगवानदास तिवारी, कुमारस्वामी अमृत महोत्सव कमिटी, धारवाड, १९८५.
६३. संतधर्म जीवन दर्शन - बाबामहाराज आर्वीकर, सांगाती प्रकाशन समिती, माचणूर, जि. सोलापूर, १९९४.
६४. सद्‌गुरू जंगली महाराज - श्री. गोविंद म. गोखले - तांबेकर जंगली महाराज मंदिर प्रकाशन, पुणे, १९७४.

६५. स्वामी विवेकानंद चरित्र - सत्येंद्रनाथ मुजुमदार, रामकृष्ण प्रकाशन, मद्रास.
६६. सार्थ अमृतानुभव - दि. अ. घैसास, रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००८.
६७. सार्थ चांगदेव पासष्टी - किसनमहाराज साखरे, यशोधन प्रकाशन आळंदी-पुणे, २००१.
६८. संतांचे आत्मचरित्र - के. वि. बेलसरे, त्रिदल प्रकाशन, मुंबई, १९९६.
६९. सिद्धयोग्यांच्या सान्निध्यात - पंडित गोपीनाथ कवीराज, व्होरा आणि कं. पब्लिशर्स प्रा. लि. पुणे, १९७५.
७०. सिद्धसिद्धांत संग्रह - आचार्य बलभद्र, संपा. डॉ. के. आर. जोशी, सिद्धयोग प्रकाशन, पुणे, १९९८.
७१. सिद्धसिद्धांत पद्धति - श्री. गोरक्षनाथ, संपा. स्वामी द्वारकादास शास्त्री, चौखंबा विद्याभवन, वाराणसी प्रकाशन, २००६.
७२. सिद्ध पंचाक्षरी विद्या - जी. एम. कार्लेकर, प्रका.- आर. वाय. क्षीरसागर, पुणे.
७३. श्रीपाद श्री वल्लभ चरित्रामृत - श्री. शंकर भट्ट, श्रीपाद श्री वल्लभ महासंस्थान, पीठापूर, आंध्रप्रदेश, २००७.
७४. श्रीधरस्वामी प्रवचने - डॉ. केशवराव मुळे, श्रीधर संदेश नाशिक प्रकाशन, १९८५.
७५. श्रीमद्भगवद्गीता - गीता प्रेस गोरखपूर प्रकाशन, सं. २०६०.
७६. श्री परब्रह्म गोपाळनाथ महाराज - डॉ. डी. व्ही. देशपांडे, श्री नाथसेवा मंडळ त्रिपुटी प्रकाशन, सातारा, १९९४.
७७. श्री ज्ञानेश्वरांची गुरवी भक्ती - डॉ. बी. टी. शाळीग्राम, श्री. कैवल्यानंद प्रकाशन, पुणे, १९८३.
७८. ज्ञानेश्वरी - किसनमहाराज साखरे, यशोधन प्रकाशन, आळंदी-पुणे, २००९.
७९. ज्ञानयोग - स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ नागपूर, १९७९.

## इंग्रजी संदर्भ ग्रंथ -

१. A Simple Study of Western Philosophy – B. S. Pandit, Sujit Book Depot, Delhi, 1967.
२. Avdhoot Geeta – Shri. Dattatraya, Ed. Swami Chetnananda, Advait Ashram, Calcutta, 1998.
३. Basis of Yoga – Yogi Arvind, All India Book, Pondicherry, 1985.
४. British Launderer’s – Research Association, London, Pocket Book, B.L.R.A. Laboratories, 1960.

५. Book of Knowledge –

६. Critical History of Modern Philosophy -

७. Dimensions of Yoga – Kumarswami, Kumarswami Foundation, Dharwad, 1988.

८. Dictionary of Science – E. B. Uvarov, Pneguin Books, London, 1959.

९. Eternal Drama of Souls, Matter and God – B. K. Jagdish Chandar, P. B. K. I. W. Vidyalaya, Shantinagar, Delhi, 1985.

१०. Geo Chemistry for Everyone – A Fersman, Foreign Languages Publishing House, Moscow, 1958.

११. Hindu View of Life – Dr. Radhakrishnan, The Macmillan Co., New York, 1928.

१२. History of Western Philosophy – N. V. Joshi, Z. N. Kadri, Bombay, 1963.

१३. Introduction to Psychology – N. L. Munn, Oxford & B. H. Publishing Co., Bombay, 1969.

१४. Introduction to Indian Philosophy – Chatterji and Dutta, S. Kanjilal, Calcutta University Press, 1960.

१५. Modern Indian Thought – V. S. Naravane, Asia Publishing House, Bombay, 1967.

१६. Nature of Physical World – Sir Arthur Rddington, Comet Books, London, 1928.

१७. Origin of Life – Ibrahim Syed, Islamic Research Foundation, Int. Inc. U.S.A., Internet.

१८. One-Tow-Three to Infinity – George Gamow, Mentor Books, New York, 1955.

१९. Presuppositions of Indian Philosophies – K. H. Potter, Prentice, Hall of India Limited, Delhi, 1965.

२०. Problems of Philosophy – B. Russel, Oxford University Press, London, 1970.

२१. Paths of Meditation – Shri. Ramkrishna Math, Madras, 1980.

२२. Six Existentialist Thinkers – H. J. Blackham, Routledge & Kegan Paul Ltd., London, 1967.

२३. Spiritual Heritage of India – Swami Prabhavananda, Ramakrishna Math, Madras, 1993.

२४. Shri. Gorkshashatkam – Shri. Gorkshanath, Ed. Swami Kuvalayandna & Dr. Shukla, Kaivalayadham, Lonavala Prakshan, 2006.

२५. The Perfect Relationship – Swami Muktananda, Gurudeo Siddha Peeth Ganeshpuri, 1983.
२६. The Present Crisis of Faith – Dr. Radhakrishnan – Hind Pocket Book Pvt. Ltd., Delhi, 1970.
२७. Technique of Opening the Thrid Eye – Kumarswami, Tapovan Publication, Dharwad, 1985.
२८. Tantra Vision – Osho, Dimond Pocket Books Pvt. Ltd. New Delhi, 1991.
२९. The Supreme Truth – B. Sridhar, Sri. Sridhar Seva Manda, Varadpur, Sagar, 2007.
३०. The Wonderful Life & Teaching of Shri Sai-Baba – N. V. Gunaji, K. S. Pathak, Shirdi-Sansthan, Bombay, 1974.
३१. Undreamed Possibilities Booklet – Y. S. Society, Yogada Satsanga Society, Ranchi.
३२. World Famous Religions – Rajendra Kumar, Family Books Pvt. Ltd., Delhi, 1990.

**परिशिष्ट क्र. १ नाथसंप्रदायातील तंत्र, मंत्र व यंत्र**

नाथसंप्रदाय म्हटले की तंत्र -मंत्र -यंत्र यांचा विचार अपरिहार्य आहे.

भारतीय परंपरेतील आत्मसाधना निगम व आगम यावर आधारलेली आहे.

निगम म्हणजे कर्म, उपासना, ज्ञान यांचे स्वरुप व त्यांच्या साधनांचा म्हणजे मार्गाचा विचार म्हणजे आगम. आगमाची ७ लक्षणे आहेत. सृष्टी, प्रलय, देवतार्जन, सर्वसाधन, पुरश्चरण, षटकर्मसाधन, व ध्यानयोग, त्याचप्रमाणे शांती, वशीकरण, स्तंभन, विद्वेषण, उच्चाटण, मारण यांचाही विचार आगमात येतो.

तंत्रशास्त्र हा आगमाचा भाग मानला जातो. आगमाचे तीन प्रकार पुढीलप्रमाणे पहाता येतात.

शैवागम - कापालिक, कालामुख, पाशुपत, शैव वगैरे

शाक्तागम - दक्षिणाचार (वेदमानणारे ) वामाचार (अवैदिक)

वैष्णवागम - वैखानस व पांचरात्र.

या आगमांचा ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात विकास झाला असावा.

(संदर्भ: नाथसंप्रदाय उदय व विस्तार पान ४९)

या विषयावर मोठया प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. या विषयाचा उगम भारतातच असून विपुलता व रहस्य ही दोन वैशिष्ठ्ये आहेत. याचा प्रसार तिबेट, मंगोलिया, नेपाळ, चीन, इंडोनेशिया, लंका असा झालेला दिसतो. ही तांत्रिक पध्दती वैदिक का अवैदिक? याबाबत हरित ऋषी म्हणतात ''श्रुतिश्च द्विविधा वैदिकी तांत्रिकीच''

हरित ऋषींचा उल्लेख तीन ठिकाणी मिळतो.

१) नाथसंप्रदाय उदय व विस्तार - पान १४३ डॉ. जोशी प्र. न.

२) The Hindu view of life - पान ८३ डॉ. राधाकृष्णन

३) Dimensions of yoga - पान २४६ महातपस्वी कुमारस्वामी

तंत्रशास्त्र प्रमुखपणे क्रियात्मक असते. देवतांना प्रसन्न करुन घेणे, शिवशक्तीचे मिलन घडवणे हा उद्देश असतो. वेदांप्रमाणेच तंत्रशास्त्र हे ईश्वरप्रणीत मानले गेले असून शिव, शक्ती व विष्णूची ती वाणी आहे असे समजले जाते.

बौध्द व जैन परंपरेमधेही तांत्रिक विषयाचे महत्त्व दिसते. तांत्रिक प्रभावामुळेच गौ. बुध्दांचा समाधियोग नंतर तांत्रिक झालेला दिसतो. महायान पंथातील भक्तीचे महत्व त्यामुळे निर्माण झाले. पूजा, उपासना महत्वाच्या ठरल्या. 'ॐ माणिपद्मे हूँ' हा मंत्र आजही तिबेटमधे प्रमुख मानतात. बौध्द तांत्रिक तत्त्वांमधे मंत्र, तंत्र, पंचमकार, शक्ती, नाडी, चक्र, कमल, अधिष्ठात्री देवी यांना महत्त्व आहे. नाथसंप्रदायात जसा शिव-शक्तिसंबंध तसाच बौध्दांमधे बुध्द - प्रज्ञापारमिता यांचा संबंध मानतात. बुध्द काळात तंत्र विद्या तिच्या चरमसीमेपर्यंत गेली. व बुध्दयुग तंत्रयुग म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यातून सर्वसामान्यांना पल्लवित करणारी एक धारणा निर्माण झाली की साधक संसारी जीवनात असूनही तो बंधनातून मुक्त होऊ शकतो. बौध्द तंत्राचा हाच विषय व विकास नाथसंप्रदायात प्रवाहित झालेला आहे.

(संदर्भ ''गोरखतंत्र'' पान १७४-१७५ )

नाथपंथाच्या आदिस्थानी दैवत आहे ''शिव'' हेच द्वैवत तंत्रमार्गातही प्रमुख आहे. मानवी गुरुमाध्यमातून हे शिवतत्त्वच कार्यरत होत असते. सर्व तंत्रग्रंथात शिव-पार्वती यांच्यातील प्रश्नोत्तर रुपात शास्त्र मांडणी आहे. गुरुकडून मिळणाऱ्या दीक्षामंत्रात प्रणव, शक्तीबीज, व देवता ही तिन्ही तत्त्वे असतात. एका अर्थी गुरु + मंत्र + देवता या तीन प्रमुख तत्त्वांनी तंत्रधर्म पूर्ण होतो. तंत्रधर्मामधे वेदाचार, वैष्णवाचार, शैवाचार, दक्षिणाचार, वामाचार, सिध्दांताचार, कौलाचार असे सात आचार आहेत.

तंत्र, मंत्र व यंत्र हे शब्द सर्व परिचित आहेत. त्यांची व्याख्येच्या रुपात मांडणी करायची झाल्यास ती पुढीलप्रमाणे केली गेली आहे.

तंत्र = चेतनेचा विस्तार करण्याची कला

(Techniques of expanding our consciousness)

मंत्र = व्यक्तीच्या अंतरविश्वातील लय किंवा ध्वनी किंवा स्पंद याचा शोध.

(Finding Inner sound or rhythum or vibe)

यंत्र = एक आकृती की जी व्यक्तीच्या अंतरंगात एक अवस्था निर्माण करते.

(A certain figure which creates a state in you)

(Ref: " Tantra Vision" by OSHO Page 11)

तंत्रशास्त्र ईश्वरी संपर्कासाठी कोणीही मध्यस्थ मानत नाही. सामान्यपणे तंत्र हा धर्मही नाही, धर्मग्रंथ नाही व विधीपण नाही. तर तंत्र साधनेतून प्रत्यक्ष सत्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न असतो. (Direct approach to reality).

तंत्र व्यक्तीखेरीज कुठेही विश्वास ठेवत नाही. तंत्र सामान्य माणसात व त्याच्या व्यक्तिमत्वात विश्वास ठेवतो. तंत्र व्यक्तीच्या शरीरावर, इंद्रियशक्तीवर, विश्वास ठेवून काहीही न नाकारता इद्रियस्थ शक्तींचे परिवर्तन करु इच्छितो. व्यक्तीचे देहमाध्यम हे प्रधान साधन असून शरिरांतर्गत साधनेतून देहमाध्यमाच्या पलिकडे जाण्याची किमया तंत्रशास्त्र शिकवते. एका अर्थाने तंत्र शरिराचा धर्म व त्याचे विज्ञान प्रगट करते. साधकाला शरिराच्या पलिकडे नेण्यासाठी तंत्रसाधनेमधे खालील तीन नियम महत्वाचे मानले जातात.

1) शरीर हे सर्व तऱ्हेच्या तणावापासून मोकळे ठेवले पाहिजे. त्यासाठी योग व प्राणायामाद्वारे देहमाध्यमाशी मैत्रीच्या पध्दतीने वागले पाहिजे.
2) (Befriending the physical energies)
   ज्ञानेंद्रिये शुध्द व जागृत हवीत (Purified and alert senses)
3) सर्व तऱ्हेच्या मानसिक विकृतींपासून अलग (free from neurotic complexes)

तंत्र हे व्यक्तीला स्वत:ची स्वीकृति शिकवते. (Love oneself and accept yourself as you are.) यामधे परंपरागत सवयीपासून स्वत:स मोकळे करुन तीच क्रिया वेगळया पध्दतीने करण्यास तंत्र सांगते. विकृतींपासून मनास मुक्त करण्यासाठी स्वत:स साक्षी होऊन तटस्थपणे मनोव्यापार पहात पहात स्वत:च्या पलिकडे जाताना एक वेगळीच तटस्थ व साक्षी अशी दृष्टी येते व अशा वेळी आपणच आपणासमोर असतो (we are in front of ourselves) यालाच तंत्रविज्ञान पध्दती म्हटले आहे.

(Ref: Tantra Vision Page 51-52)

अशा अवस्थेत देहमाध्यमधील सर्व द्वंद्वे संपुष्टात येतात व अंतरंगात एक शुध्द व शांत अवस्था निर्माण होते. तेव्हा अनुभवास येते की बाहेरही तुम्हीच आहात व आतमधे सर्व बर्हिजग उपस्थित आहे. सूक्ष्म स्तरावरचा हा अंतर्बाहय एकरुपतेचा अनुभवच श्री गोरक्षनाथांनी एकरुपतेचा व समरसतेचा सिध्दांत म्हणून मांडला आहे.

''विश्वरुप परमेश्वर : परमात्मा अखंड स्वभावेन घटे घटे
चित्स्वरुप: तिष्ठति एवं पिडंसंवित्तिर्भवति''

- सि. सि. प. उपदेश ३/१३

**अर्थ :** अशा प्रकारे सर्व देहांमधे हा विश्वरुप ईश्वर अखंडपणे प्रत्येक शरिरामधे एकरुप होऊन राहिला आहे. हे जाणणारा योगीच पिंडज्ञानी म्हटला जातो.

विश्वाशी एकरुपता साधण्याच्या ज्या योगक्रिया श्री. गोरक्षनाथांनी दिल्या आहेत त्याचे मागची आधारभूत तत्त्वे वर नमूद केलेल्या तंत्रशास्त्रांतर्गत सिध्दांतात किंवा नियमात आहेत. कोणत्याही प्रकारचे दडपण नाही, दबलेल्या इच्छा वासनांचा अडसर नाही अशावेळी शरीरातील चेतना सर्वात वरच्या पातळीवर कार्यरत होऊ शकते. त्याचवेळी साक्षी अवस्थेमुळे व्यक्ती एका अर्थाने स्वत:चीच मालक होते. ही शरीरस्थ चेतना जेव्हा विराट चैतन्याचा अनुभव घेऊ इच्छिते त्यावेळी पिंडब्रम्हांड हा फरकच न रहाता ती व्यक्ती एकरुपत्वाचा व व्यापकत्वाचा अनुभव घेऊन कृतार्थ जीवनाचा खरा अर्थ काय ते अनुभवू शकते.

**मंत्र व यंत्र :** या धारणा नाथसंप्रदायात आहेत. त्याचे स्वरुप काय?

मंत्राची व्याख्या: ''मननात् त्राणसंहित: इति मंत्र:'' अशी आहे. ही एक गुप्त विद्या असून ही विद्या वेदापेक्षाही प्राचीन असावी. ऋग्वेदकाळात मंत्रसंख्या ७० लाखाचे जवळपास असावी. त्यानंतर त्यात भरच पडत गेली आहे. मंत्रशास्त्रांचे ग्रंथात असे नमूद आहे की वैदिक मंत्रांना ब्रम्हाने शक्ती प्रेरित केली, तांत्रिक मंत्रांना भगवान शिव यांनी शक्ती प्रदान केली तर शाबर मंत्रांना शिवाततार गुरु गोरक्षनाथांनी अद्‌भुत बनवले.

'मंत्र' या शब्दाचा अर्थच मनन करण्यायोग्य शब्द। मंत्र उपासनेच्या मागचा नियम दिलेला आहे तो आहे जपाचा ''जपात् सिध्द: जपात् सिध्द: जपात् सिध्द: न संशय:'' हे जप उच्चरण कसे? तर ''गुह्याप्ति गुहय गोपतृतव'' याचा अर्थ मंत्रजपासाठी 'सुषुम्नास्वर' हवा. म्हणजे नाकाचे दोन्ही छिद्रातून समानरुपानी हवा जात येत असली पाहिजे. मंत्रउपासना हाही एक योगच आहे. कारण मंत्राचे माध्यमातून आत्मस्थित शक्ती जागृत होत जाते व प्रगट होते. मंत्रउपासनेतून आकाशतत्त्वाशी संबंध जोडला जातो. त्यामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रात व्यापकता व शुध्दता अनुभवास येऊ लागते. या प्राचीन विद्येचे विज्ञान तर्काच्या किंवा बुध्दीच्या माध्यमातून नेमके उमगत नाही. ते फक्त 'अनुभवगम्य' आहे असे सांगितले जाते. याचा अर्थ हे शास्त्र हे अनुमानाचे नसून अनुभवाचे आहे. याला आधारभूत सूत्र आहे ते असे-

अमंत्रं अक्षरं नास्ति, नास्ति मूलं अनौषधम्।
अयोग्य पुरुषो नास्ति योजकसतत्रदुर्लभ:।।

पुरातन काळापासून ही विद्या विकसित होत आल्यामुळे त्यामधे वेगवेगळे स्तर निर्माण झाले. उदा. वेदोक्त मंत्र, पुराणोक्त मंत्र, तंत्रोक्त मंत्र, व्यासरचित मंत्र, शाबरमंत्र वगैरे.

मंत्र म्हणजे काही अक्षरांमधून केलेली ध्वनीची गुंफण असते. मंत्रातील अक्षरे म्हणजे त्या ध्वनीची चिन्हे असे म्हणता येईल. ध्वनीचा परिणाम देहमाध्यम व बाहेरचे वातावरण असा दुहेरी होत जातो. यांचे परिणामस्वरुप अनुभव येतात असे या शास्त्राचे साधारणस्वरुप मांडता येईल. असा एकादा शब्दसमूहात्मक मंत्र जेव्हा सिध्द अशा गुरुकडून दिला जातो तेव्हा स्वाभाविकपणे ती गुरुशक्तीही त्याचेमागे कार्यरत रहाते व त्याचा प्रभाव स्पष्ट होत जातो. वरील सर्व विवेचनासाठी संदर्भ:


१) गोरखनाथ चरित्र ले. मोहित शर्मा. आनंद प्रकाशन दिल्ली

२) गोरखनाथ लिखित शाबरविद्या - रघुवंशी प्रकाशन गजानन बुक डेपो मुंबई - ७५.

३) सिध्द पंचाक्षरी विद्या ले. जी.एम. कार्लेकर. प्रकाशक आर.वाय. क्षीरसागर पुणे

४) मंत्र शास्त्र: ले. द.शं. केळकर प्रकाशक आर. व्ही. रघुवंशी दादर, मुंबई


**यंत्र :** धार्मिक क्षेत्रातील उपासनेमधे जी यंत्रे पहाण्यात किंवा विविध ग्रंथात आढळतात त्या उभ्या -आडव्या चौकटी व त्यात काही अक्षरे आकडे किंवा बीजाक्षरे असतात. भूर्जपत्र किंवा तांब्याचापत्रा त्यासाठी वापरला जातो. त्या त्या यंत्राशी संबंधित शक्ती त्या त्या प्रमाणे कार्यरत होऊ शकते असे सूचित केलेले असते. सिध्द पुरुषांनी हे शास्त्र कसे बसवले हे एक आश्चर्यच आहे. ''सुबोध भृगुसंहिता'' (ढवळे प्रकाशन गिरगांव मुंबई सन १९९६) या ग्रंथाचे प्रस्तावनेत म्हटले आहे ''ही शास्त्रे म्हणजे ऋषिमुनींचा कल्पनाविलास नाही. अनेक वर्षाच्या संशोधनाचे ते फलित आहे. या सृष्टीचे कालचक्र ठराविक गतीने चालत असून त्याचे नियमन एका अनाम शक्तीने होताना दिसते. या कालचक्राच्या गतीचा मागोवा घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. व रहस्य भेदाच्या प्रयत्नात अनेक सत्ये सापडली. व त्याचे चिकित्सेतून ही शास्त्रे उपलब्ध झाली. त्याकाळी मुद्रणकला अस्तित्वात नसल्यामुळे या रहस्यामागील नियमांचा तपशील नाहीसा झाला व निष्कर्ष तेवढे मागे राहिले व मग ते चमत्कार ठरले.'' श्री भृगुसंहिता नरपतचरिया ज्योतिषखंड'' या सारखे अनेक ग्रंथ केवळ यंत्रासाठी प्रसिध्द आहेत.